म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. १३०८
REFBK-0016014

1978

१३०६

अ.नं.

# अकथित कहाणी

## ( The Untold Story )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................. दि: ..................
संकेत .................. नों. दि: ..................

: मूळ लेखक :

लेफ्टनंट जनरल बी. एम्. कौल

REFBK-0016014

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६०१४
मूल्य १ रुपये

मनोरंजन प्रकाशन, मुंबई ७.

मराठी आवृत्तीचे सर्व हक्क
मनोरंजन प्रकाशनाच्या
स्वाधीन आहेत. हें पुस्तक
अलाईड पब्लिशर्स,
ग्रॅहम रोड, मुंबई १ यांच्या
परवानगीनें प्रसिद्ध केलें.

प्रकाशिका
सौ. **मंदाकिनी टेकाडे**
अभ्यंकर बिल्डिंग
स्लेटर रोड, मुंबई ७.

प्रथमावृत्ति
जून १९६७

मुद्रक
**चिंतामण वामन जोशी**
माधव प्रिंटिंग प्रेस
अलिबाग, जि. कुलाबा.

अ र्प ण . . .

माझी पत्नी धनराज किशोरी
व कन्या अनुराधा व चित्रलेखा
यांना—

# या पुस्तकांतली छायाचित्रें


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १) | 'राजपुताना रायफलसमध्यें' १९३५ सालीं सेकंड लेफ्टनंट असताना लेखक | ८१ |
| २) | अमेरिकेंतील भारतीय दूत व लेखक. (१५ ऑगस्ट १९४७ : वॉशिंगटन येथें ध्वजारोपण करताना.) | ८९ |
| ३) | सर गोपालस्वामी अय्यंगार, एम्. सी. सेटलवाड, व लेखक. (सुरक्षा समितीत १९४८ साली काश्मीर प्रश्न गेला तेव्हां) | ८९ |
| ४) | ग्रोमिको, शेख अबदुल्ला व लेखक. (सुरक्षा समितीत १९४८ साली काश्मीर प्रश्न चर्चेला आला तेव्हां.) | १०५ |
| ५) | जनरल मॅक्स्वेल टेलर व लेखक (कोरियांत १९५३ मध्यें) | ११३ |
| ६) | रोहरंग खिंडीजवळ १९५५ साली एका सहाय्यक कामगिरीवर असताना लेखक. | १२१ |
| ७) | १९५८ मध्यें एका 'फायटर' विमानांतून उड्डाण संपवून उतरतांना लेखक. | १२९ |
| ८) | उजवीकडून डावीकडे एअर मार्शल मुखर्जी, लेखक व सारीन (१९५९) | १३७ |
| ९) | जनरल के. एस्. थिमय्या यांचेबरोबर बातचीत करतांना लेखक. (मागील बाजूस फरटोपी घातलेले बक्षी गुलाम महंमद.) | १५६ |
| १०) | पंडित नेहरू, कृष्ण मेनन व लेखक. (१९५९) | १६६ |
| ११) | नेहरू व सौ. कौल. (१९५९) | १८२ |
| १२) | नेहरू व कौल यांच्या दोन्ही कन्या. (१९५९) | २०१ |
| १३) | १९५९ सालीं लोंगजू येथें जात असतांना दोन थागिन गिरिजनांसह लेखक (१९५९) | २१७ |
| १४) | लडाखमध्ये १९६० साली, एअर व्हाईस मार्शल पिंटो व लेखक. (हिवाळी कपडे घातलेले.) | २३३ |
| १५) | गाझा येथें १९६१ साली एका भारतीय कार्पोरल बरोबर लेखक. | २४९ |
| १६) | डावीकडून उजवीकडे अमेरिकन दूत गालब्रेथ, सौ. केनेडी, सौ. गालब्रेथ व लेखकाची मुलगी. (सौ. केनेडी यांच्या स्वागताच्यावेळी.) | २७५ |
| १७) | मेजर डुबे व लेखक (१९६२ च्या उन्हाळयांत काश्मीरमध्यें कुठेतरी.) | ३४५ |

# गुणनिर्देश व ऋणनिर्देश :

पुस्तकें अनेक प्रकारची असतात. विचारानें जीं थोर पुस्तकें आजपर्यंत निर्माण झालीं ती सर्व पृष्ठसंख्येनें फारच लहान आहेत, असें आढळून येईल. जी वाचनीय पुस्तकें असतात ती एकतर उत्तम रितीनें लिहिलेली असतात, किंवा महत्त्वाची तरी असतात. महत्त्वाची पुस्तकें उत्तम रितीनें लिहिलीं जातातच असें नाहीं.

लेफ्ट. जन. कौल यांचे ' अनटोल्ड स्टोरी ' हें महत्त्वाचें पुस्तक आहे. यावर विपुल लिहिलें गेलें आहे. पुढें लिहिलें जाईलहि.

या पुस्तकाचें महत्त्व याकरतां आहे, कीं अगदीं प्रथमच भारतीय सेनादलांचें वर्णन आपल्याला या पुस्तकांत मिळतें. भारतीय सेनेची रचना कशी आहे ? निरनिराळ्या श्रेणींतील कमांडरांचे अधिकार काय आहेत ? सेनेचीं शस्त्रें काय असतात ? किती असावी लागतात ? मुलकी सरकारशीं सेनेचें काय नातें असतें ? संरक्षणमंत्रालय, संरक्षण-मंत्री व पंतप्रधान यांचे परस्पर संबंध कसे असतात; या सर्व गोष्टींची माहिती, लेफ्ट. जन. कौल यांनीं सांगितली आहे. या गोष्टी आजपर्यंत लोकसभेला किंवा जनतेला सांगण्यांत आलेल्या नव्हत्या. जणूं हें सर्व गुप्त राहणेंच आवश्यक आहे असें भासत असे.

नेफा-लडाखमधील आपल्या पराभवाला लेफ्ट. जन. कौल यांनीं, नेहरू व संरक्षणमंत्री मेनन यांना मुख्यत: जबाबदार धरलें आहे. नेहरूंचें व मेननचें स्वभावचित्र त्यांनीं उत्तम रीतीनें रेखाटलें आहे. लेफ्ट. जन. कौल यांनीं दोघांवर केलेले आरोप नुसते स्पष्ट नाहींत, तर ते गंभीर आहेत.

१२ ऑक्टोबर १९६२ या दिवशीं नेहरूंनीं चिन्यांना हुसकून लावण्यासंबंधीं जे जाहीर विधान केलें तें महत्त्वाचें आहे. १३ ऑक्टोबर

१९६२ या दिवशीं कलकत्त्याच्या ‘स्टेट्स्मन्’ पत्रांत हें विधान ठळकपणें प्रसिद्ध झालें आहे. तें असें होतें :

*‘नेफामधील लष्करी हालचाल सुरू झाल्यानंतर प्रथमच नेहरूंनीं निःसंदिग्ध शब्दांत असें सांगितलें कीं, सेनेला आक्रमक चिन्यांना बाहेर हुसकावण्याचा आदेश दिलेला आहे. “आमच्या सूचना आहेत, कीं आपला प्रदेश मोकळा करून घ्या.” असें नेहरू म्हणाले, तेव्हां नेहरूंना विचारण्यांत आलें कीं, “हें केव्हां होईल?” तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें, “मी नक्की तारीख देऊं शकत नाहीं, हें सर्वस्वी सेनेनें ठरवावयाचें आहे.”*

— स्टेट्स्मन : १३–१०–६२

नेफा पराभवाची भरपूर चिकित्सा कौल यांनीं केलेली आहे; परंतु जनरल चौधरी यांनीं त्यांना १५ मे १९६३ रोजीं जो महत्त्वाचा प्रश्न केला कीं, चिन्यांशीं लढणें एवढें अशक्य होतें, तर तुम्हीं त्याच वेळीं चिन्यांविरुद्ध कारवाई करण्यास नकार कां दिला नाहीं. यावर कौल सांगतात, “मी योग्य तें उत्तर दिलें.” हें उत्तर काय होतें, तें कौल यांनीं सांगायला हवें होतें.

नेफांतील पराभवासंबंधीं लेफ्टनंट जनरल हेंडरसन ब्रुकस् यांचा अहवाल सरकारनें आजपर्यंत प्रसिद्ध केलेला नाहीं. हा अहवाल लोकसभेंतील मागणीनुसार आतां जर सरकारनें प्रसिद्ध केला, तरच लेफ्टनंट जनरल कौल यांनीं सांगितलेली नेफा पराभवाची ही ‘अकथित कहाणी’ कितपत विश्वासार्ह आहे, हें वाचकांना ठरवतां येईल. तोपर्यंत ही ‘कौल कहाणीच’ लोकांचे याबाबतींत कुतूहल भागवील. लेफ्ट. जनरल कौल यांनीं सांगून टाकलें आहे, कीं या हेंडरसन अहवालानुसार नेफा पराभवाबद्दल कुणाहि जनरलला जबाबदार धरण्यांत आलेलें नाहीं.

इंग्रजी भाषेंतील हें पुस्तक मराठी भाषेंत आणण्याचें काम मी केलें आहे. हें पुस्तक लवकरांत लवकर मराठी वाचकांना उपलब्ध करणें आवश्यक असल्यानें, मराठी संस्करण केल्यानंतर पुनः त्यावर सावकाशीनें नजर टाकायलाहि मला प्रकाशकांनीं फुरसत दिली नाहीं. काळ काम, वेगाच्या या व्यस्त गणितामुळें, जर कांहीं दोष यांत आले असतील, तर त्याचें हें कारण आहे.

मूळ पुस्तकांत नसलेला नेफा क्षेत्राचा नकाशा या पुस्तकांत मी समाविष्ट केला आहे. भारत–चीन रणभूमीची कल्पना यामुळें अधिक चांगली येईल.

या पुस्तकांत सेनेसंबंधी कांहीं अधिक तांत्रिक माहिती, मी क्वचित ठिकाणीं वाचकांच्या सोयीसाठीं दिली आहे. यासाठीं मला प्रा. अ. त्रि. बेंद्रे यांच्या 'युद्धशास्त्र–यंत्र व तंत्र' या पुस्तकाचा उपयोग झाला, हें मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतो.

या पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करण्यांत, मला श्री. अ. वि. गणपत्ये, चि. उषा व चि. श्रीधर या माझ्या दोन्ही मुलांनीं मोठीच मदत केली आहे.

६७५ सदाशिव पेठ,
फाटक वाडा, पुणें २

वि. ग. कानिटकर
(रा. म. शास्त्री)

वि. ग. कानिटकर

प्रकाशित पुस्तकें

- मनांतलें चांदणें (कथासंग्रह)
- खोला धावे पाणी (कादंबरी)
- शहरचे दिवे (कादंबरी)
- फ्रँक वॉरेल (चरित्र)
- दर्शन ज्ञानेश्वरी (संपादित)
- नाझी भस्मासुराचा उदयास्त (इतिहास)

# प्रस्तावना

**नियती नेहमींच** दया दाखवते असें नाहीं. मोठ मोठे मुत्सद्दी, सेनानी आणि संत, हे नियतीचे बळी ठरले आहेत व त्यांचें मोल कस्पटासमान मानलें गेलें आहे. मी स्वत:ला थोर समजत नाहीं. परंतु मलाहि हें सर्व भोगावें लागलें आणि त्यांच्यापैकीं कांहीजणांप्रमाणेंच, मी माझ्या आयुष्याचें चित्र रेखाटणार आहे; अशा करितां कीं मी लहानाचा मोठा होत असतांना, परिस्थिति काय होती, माझ्यावर तिचे संस्कार काय झाले आणि मायभूमीच्या सेवेंत मी काय कामगिरी केली याचें दर्शन यांतून व्हावें.

मला कमीपणा देणारे बरेंच बोललें गेलें आहे. कांहीं कांहीं प्रसंगाच्या संदर्भात, गेल्या कांहीं वर्षांत याचा जाहीर उच्चार झाला आहे, परंतु मी मात्र अजून कांहीं सांगितलेलें नाहीं. यामुळें योग्य तें मूल्यमापन झालेलें नाहीं. या पुस्तकामुळें वाचकाला, झाल्या घटनांना मी वा इतर कितपत जबाबदार आहेत हे ठरवतां येईल.

स्वातंत्र्यपूर्व काळांत सैन्यांत दोनच प्रकारचे अधिकारी असत. कांहीं भारताच्या स्वातंत्र्य-लढ्याला पाठिंबा देत तर इतर एक तर या प्रयत्नांविषयी विरोधी असत किंवा या चळवळीविषयीं उदासीन असत. या दुसऱ्या प्रकारच्या अधिकाऱ्यांनीं, त्यांचे ब्रिटिशांशीं संबंध चांगले राहावेत यासाठीं, माझ्या राष्ट्रीय वृत्तीबद्दल व मला नेहरूंविषयीं व इतर राष्ट्रीय पुढाऱ्यांविषयीं वाटणाऱ्या प्रेमादराबद्दल माझी कुचेष्टा केलेली आहे. ब्रिटिश सत्तेचे हे परम उपासक, १९४७ सालीं भारत स्वतंत्र होतांच कांहीं काळ गांगरले, परंतु उगवत्या सूर्याला अर्घ्य देण्याची तयारी असल्यानें, शहाणपणानें, ज्या भारताच्या नेत्यांची त्यांनीं कांहीं कालापूर्वीं टर उडवली, त्या नेत्यांच्या दिशेनेंच आपल्या निष्ठा रातोरात फिरवल्या. असें करूनहि ब्रिटिश आमदानींत त्यांनीं जी भूमिका वठवली होती. त्यामुळें, त्यांचे मन त्यांना खात असें व स्वतंत्र भारतांत त्यांना नेहमी असुरक्षित वाटत असें. यामुळें अर्थातच, अधिकारावर आल्यानंतर राष्ट्रीय पुढाऱ्यांकडे व विशेषत: नेहरूंकडे माझें जाणें येणें आहे, ही गोष्ट त्यांना धोका–धक्का-

दायक वाटे. राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या कठीण काळांतहि, मी मला त्यांच्यापासून वेगळा समजत नसे व या उलट आतां सरड्याप्रमाणें रंग बदललेले हे अधिकारी, त्यांच्याशीं पूर्वीं फटकून वागत असत, याचा हा परिणाम होता. शिवाय अधुनमधुन माझा सल्ला पुढाऱ्यांनी मागावा याला इतरहि कारणें होतीं. ही परिस्थिति कांहीं मुद्दाम निर्माण केलेली नव्हती तर ऐतिहासिक घटनांनी निर्माण झालेली ही परिस्थिति होती. मी जसजसा आयुष्यांत पुढें पुढें सरकत गेलों, तसतसा मी या मंडळींना शापासारखा वाटूं लागलों. त्यांना माझ्याविषयीं वाटणाऱ्या असुयेमुळें, संधि मिळेल त्या त्या वेळीं, त्यांच्या वजनदार मित्र-मंडळींत, समाजांत, ठिकठिकाणीं देशांत व परदेशांतहि, माझ्याविरुद्ध यांची कुजबुज सुरू झाली, वदंता पसरवल्या जाऊं लागल्या, माझी पद्धतशीर बदनामी सुरू झाली. यासाठीं निरनिराळी परिस्थिति त्यांनी राबविली, पद्धतशीरपणानें व सातत्यानें अनेक स्वरांत मी अंगीं गुण नसतांना व योग्य ती लायकीहि नसतांना राजकीय वशिल्यानें वर चढत गेलेला अधिकारी आहे, अशी भावना प्रसृत करण्यांत त्यांनीं पुष्कळसें यशहि मिळवलें.

जबाबदारीच्या जागांसाठी माझी वेळोवेळीं जी निवड झाली, त्या प्रत्येक वेळीं सरकारनें, स्वातंत्र्यपूर्व कालांत व नंतरहि, यासाठीं जीं मोजमापें नियुक्त केलीं गेली होतीं, तीं मला लावून पाहिली होती. माझ्या बाबतींत, पुरेशा अनुभवाची किंवा इतर कुठलीहि आवश्यक अट, एकदांहि शिथिल करण्यात आलेली नाहीं. माझ्या या पेशांत निरनिराळ्या कालांत, मला कांहीं अपवादात्मक अशा थोर व्यक्तींच्या हाताखालीं महत्त्वपूर्ण प्रसंगांत काम करण्याची संधि लाभली. या कालखंडांत पुष्कळ विलक्षण व कठीण प्रसंगांतून मला जावें लागल्यानें मी एकदम प्रकाश झोतांत आलों. मानवी व्यवहारांत नेहमीं घडतें त्याप्रमाणें या प्रसंगा-प्रसंगांत, मी माझ्याशीं स्पर्धा करणाऱ्यांचा रोष ओढवून घेतला व मला खालीं ओढण्यासाठीं त्यांनीं करावयाचें तें सर्व केलें. कांहीं कांहीं वर्तुळांत मला वेळोवेळीं दुषणें दिली जात असतांना, जाहीररीत्या माझी बाजू मांडण्यासाठीं संधि सरकारनें मला दिली नाहीं. नेहरूंनीं मात्र एकापेक्षां अधिक वेळा लोकसभेंत व कांहीं वृत्तपत्र प्रतिनिधींच्या बैठकींत माझी तरफदारी केली. परंतु माझ्या

टीकाकारांनीं असेंच म्हटलें कीं नेहरु फक्त माझ्यावर सारवासारव करीत आहेत. हा अन्याय मी बराच काळ सहन केला, परंतु या पुस्तकांत पुढें सांगितल्याप्रमाणें लवकरच अशी एक वेळ आली कीं, मला माझ्या लष्करी पेशांतून अकालींच निवृत्त व्हावें लागलें.

मी निवृत्त झाल्यानंतरही, माझ्या विरोधकांनीं माझ्यावर आग पाखडणें थांबवलें नाहीं. मी यानंतर नेहरूंना पत्र लिहिलें व त्यांच्याकडून २८ सप्टेंबर १९६३ या तारखेचें मला खालील पत्र आलें--

'आतांच मला तुमचें २६ सप्टेंबरचें पत्र मिळालें. या बाबतींत तुमच्या मनस्थितीची मला कल्पना आहे व योग्य त्या वेळीं तुमच्याविषयीं जे गैरसमज असण्याची शक्यता आहे, त्याचें निराकरण तुम्ही करावें याशीं मी सहमत आहे तुम्ही हें लक्षांत घ्या, कीं या क्षणीं तुमच्यावर विशेष हल्ला चालू नसून त्याचा मुख्य रोख व्ही. के. कृष्णमेनन यांचेवर व कांही अंशी माझेवर आहे. काय करावें—मी अनेक लोकांच्या इच्छेआड व महत्त्वाकांक्षेआड येतो खरा ! तुमचा व कृष्णमेननचा उपयोग माझ्यावर हल्ला करण्यासाठीं केला जात आहे. मला योग्य दिसतें त्यानुसार आपण या गोष्टींचा मुकाबला करूं. जेव्हां योग्य ती वेळ येईल तेव्हां तुम्ही तुम्हांला आवश्यक वाटतात तीं सत्यें, लोकांपुढें मांडू शकतां. मला असें दिसतें आहे, की सध्याच्या वातावरणांत या दृष्टीनें तुम्ही कांहीही सांगण्याचा फारसा उपयोग होणार नाहीं.'

नेहरूंच्या उपदेशाचा आदर ठेवून, मी आतांपर्यंत जाहीररीत्या कांहींही बोललों नव्हतो. पण नेहरूंच्या मृत्युनंतरहि माझ्यावर चिखलफेंक चालूच आहे. मला वाटतें कांहीं सत्यें लोकांना सांगण्याची योग्य ती वेळ आतां आलेली आहे. हें पुस्तक लिहायला मला तीन वर्षें लागलीं. या पुस्तकांत मी अनेक व्यक्तींची व विषयांची मोकळेपणानें चर्चा केली आहे. मी यांत सांगितलेल्या कांहीं सत्य घटना ह्या कदाचित् पचनीं पडणाऱ्या नसतील, परतु सत्य हें सांगितले गेलेंच पाहिजे.

दिल्ली कँटोनमेंट,
१ जानेवारी १९६७

बी. अेम्. कौल

# १

# नांदी

९६०१८

# १ : नांदी

त्या दिवशीं माझा सातवा वाढदिवस होता. त्यानुसार व्हायचे ते विधी व गरिबांना अन्नदान झालें. मला [illegible] कपडे घालायला मिळाले व अनेक सुंदर सुंदर भेटी मिळाल्या. थोडक्यांत, वर्षानें येणाऱ्या या आनंदाच्या प्रसंगीं माझें खूपच कौतुक झालें. मला वाटे वाढदिवस लवकर लवकर कां येत नाहींत !

यानंतर कांहीं आठवडे गेले. त्या दिवशीं मी लवकर झोपीं गेलों होतों. रात्र काळोखी व उदास होती. मी जेव्हां दचकून जागा झालों तेव्हां मात्र चांगलेंच उजाडलें होतें. आकाशांत ढगांची गर्दी झाली होती. विजा चमकत होत्या. गडगडत होतें व मुसळधार पाऊस पडत होता. गरजणाऱ्या पावसाळी वाऱ्यानें, झाडें लवत होतीं, डोलत होतीं. मी अंथरुणांत अर्धवट जागा होऊन लोळत होतों. एकीकडे वाढदिवशीं थोड्याच दिवसांपूर्वी ज्या गंमती जमती केल्या, त्या आठवणी मनांत येत होत्या. इतक्यांत माझे वडील एकदम खोलींत आले व त्यांनीं सांगितलें, कीं माझी आई गेली ! ते काय म्हणत होते याचा अर्थ माझ्या ध्यानांत यायला थोडा वेळ लागला आणि मग मात्र मी दुःखवेडा होऊन ओक्साबोक्शीं रडूं लागलों.

आईचें पंचविसावें वर्ष कुठें चालूं होतें. आई कॉलऱ्यानें मरण पावली. तिला औषधपाणीहि मिळूं शकलें नाहीं, कारण आम्ही राहात होतो त्या जांग गांवाजवळील खेड्यांत डॉक्टर नव्हता, कीं रुग्णालय नव्हतें. हें खेडें आतां पाकिस्तानांत गेलें आहे. मी पाहिलेला हा पहिला मृत्यू होय.

प्रत्येक हिंदू मुलाची ज्योतिषाकडून जन्मपत्रिका तयार करण्यांत येते. आतां कुटुंबांत माझ्या आगमनानंतर हें दुर्दैव आलें, म्हणून माझ्या आजीनें माझी पत्रिका पुन्हा ज्योतिष्याला दाखविली. ज्योतिषीबुवांनी पुन्हां सांगितलें कीं पत्रिका उत्तम आहे. माझा जन्मच मुळीं बुद्धजयंतीच्या मंगल दिवशीं

झालेला असल्यानें, माझें भाग्यग्रह उज्ज्वल भविष्यकाल पुढें आहे, अशी त्यांनी खात्री दिली.

वडीलांची तिशी चालू होती. घरांत त्यांचा शब्द प्रमाण असे व साधे-सुधे परंतु कडक शिस्तीचें वातावरण त्यांनीं घरांत ठेवलें होतें. ते निर्व्यसनी होते व सनातनी होते. झुंजुमुंजु होतें न होतें, तोंच मला उठावें लागे. थंडी असो वा उन्हाळा असो, आंघोळ थंड पाण्यानें करावी लागे. सायंकाळीं जेवून सात वाजतां मी झोपायच्या तयारीला लागत असे.

दोन वर्षांनीं वडिलांनी पुन: विवाह केला. माझी नवी आई मला पसंत पडली. अमृतसर जवळच्या तर्णतारण या छोट्या गांवांत आम्ही यावेळीं राहात होतो. वडील इरिगेशन खात्यांत इंजिनिअर होते व त्यांची गांवोगांव बदली होत असे. यामुळें माझ्या पुष्कळच शाळा झाल्या. वडिलांनीं मला ख्रिश्चन, मुसलमानी, शीख व हिंदू शाळांतून, आलटून पालटून निरनिराळ्या वर्षीं धाडलें. मुलाला सर्व धर्मांविषयीं माहिती व्हावी व आदर वाटावा या श्रद्धेनें त्यांनीं हें केलें. वडिलांनीं सांगितलें कीं प्रत्येक धर्ममताचा विवेचनकार असेच मानतो, कीं परमेश्वराच्या आदेशाचा खरा अर्थ त्यालाच समजावून देतां येईल. इतरांना फक्त अर्धसत्यच कळलेलें आहे. वडील निक्षून सांगत कीं देव एकच असून सर्व धर्म हे त्याच्याकडेच नेणारे आहेत. परंतु देव म्हणजे काय हें कुणीच निश्चितपणें व्याख्या करून सांगितलें नाहीं. त्याला अनेक नांवें रूपें दिलीं जातात. कुणी मानवी रुपांत त्याला पाहतात, तर कुणी आपल्या नशिबाप्रमाणें त्याचें रूप ठरवतात. कांहींचे म्हणणें असें आहे, कीं परमेश्वर अन्य कांहीं नसून ती एक अशी मोठी शक्ति आहे कीं जी अनादि आहे, अनंत आहे. ही सर्वश्रेष्ठ शक्तीच जीवनमात्राचें नियंत्रण करते. जीवनच आपल्याला परमेश्वराची भक्ति करण्यास सांगतें, कारण याच शुभ शक्तीमुळें आपण श्वासोच्छ्वास करतो, आपलें हृदय स्पंदन पावते व ही पृथ्वी आसांभोवतीं फिरत राहिलेली आहे.

रोज सकाळीं शाळेची वेळ होण्यापूर्वी, मी फादर गेलफोर्ड यांना, आपल्या एक घोड्याच्या बगींतून आमच्या दारावरून जातांना पाहात असे. गिलफोर्ड हे वैद्यकीय व्यवसायांतील ब्रिटिश धर्मप्रसारक होते. त्यांचें वय जवळ जवळ ऐंशी असावें. त्यांनीं आपल्या हयातींतील उमेदीची वर्षें,

भयानक रोगांत झिजणाऱ्या महारोग्यांच्या दुःख परिहारासाठीं खर्च केली होती. फादर गिलफोर्ड यांनीं जीवनांत व्रतस्थता पत्करली होती व सर्वस्व महारोगानें पछाडलेल्या अनेक रोग्यांच्या जीवनांत थोडाफार आनंद व समाधान निर्माण करण्यासाठीं अर्पण केलें होतें. फार मोठा काल त्यांनीं या भागांत त्यागमय जीवन व्यतित केलें असल्यानें, त्यांचें गुणवर्णन सर्वत्र ऐकूं येत असें.

एक दिवशीं गिलफोर्ड यांनी मला त्यांच्या घरीं नेलें. आपल्या रोजच्या जीवनांत प्रभुनें जी अनेकविध दया पसरून ठेवली आहे, त्यासंबंधीं कृतज्ञता व्यक्त करण्याचे व प्रार्थनेचें महत्त्व, यावर त्यांनीं मला उपदेश केला. जेवण संपल्यावर आम्ही दोघांनीं प्रार्थना केली. एक हिंदू बालक परमेश्वरापुढें एका ख्रिश्चन पाद्र्याबरोबर नतमस्तक झालें होतें.

दुसऱ्या दिवशीं मी गिल्डफोर्ड कसें काम करतात हें पाहण्यासाठीं गेलों. आपल्या दवाखान्यांत डॉ. दास या आपल्या भारतीय सहकाऱ्यासमवेत उभे असलेले गिल्डफोर्ड, मला अजून आठवतात. त्यांची दयार्द्र दृष्टी व धीरोदात्त मुद्रा आठवते. एका मोडकळीस आलेल्या घरांतच हा दवाखाना होता. त्यांच्यापासून थोड्याच अंतरावर रोग्यांची रांग लागलेली होती. फाटक्या कपड्यांत थंडीनें कुडकुडणारी, हातापायाची अर्ध्याहून अधिक बोटें झडलेलीं व पायांना पट्ट्या बांधलेली रोग्यांची रांग अजून नजरेसमोर दिसते. त्या सगळ्या वास्तूलाच त्या रोगाची दुर्गंधी जडली होती. तो मिशनरी डॉक्टर, त्या रोग्यांच्या जखमांवर हळुवार हातानें इलाज करीत होता. त्यागमय निःस्वार्थ सेवेचें तें दृश्य हृदय हेलावणारें होतें.

येथून मी मिशनच्या मुख्य इमारतींत गेलों. येथें कांहीं रोग्यांना प्रवेश देऊन ठेवून घेण्यांत आलेलें होतें. त्यांना स्वच्छ कपडे व बिछाने देण्यांत आले होते. आयुष्यांत कदाचित पहिल्याप्रथमच त्यांना इथें सहानुभूति व वैयक्तिगत शुश्रुषा लाभलेली असेल. रोज सकाळीं गिलफोर्ड त्यांची प्रार्थना घेत असत. प्रार्थना म्हणत असतांना त्यांचे आवाज सुरांत नसत. परंतु चुकतमाकत आनंदानें ते प्रार्थना म्हणत असत. या दुर्दैवी जीवांना या रोगांतून बरे होण्याची केवढी मोठी आशा वाटत होती आणि प्रत्यक्षांत ही गोष्ट घडण्याची किती कमी शक्यता होती !

तर्णतारण येथें असेपर्यंत मी या महारोग्यांच्या रुग्णालयाला अनेक वेळां भेट दिली. अगदीं प्रथमच मी दुसऱ्यांचे दु:ख अगदीं जवळून पाहिलें. हा सर्व अनुभव मला मनाला शांति देणारा व स्फूर्तिदायक वाटला.

माझी बहीण दुलारी दिसायला सुरेख होती. तिचें माझ्यावर प्रेम होतें व मी तिचे लाड करीत असे. वडिलांनीं मात्र घरांत बरेच जाचक नियम केलेले होते आणि कांटेकोरपणें ते त्यांची अंमलबजावणी करीत. उदाहरणार्थ संध्याकाळीं काळोख पडण्यापूर्वीं घरीं आलें पाहिजे, असा माझेवर निर्बंध होता. दोनदां मी बाहेर जादा रमलों व मला कडक तंबी मिळालेली होती. यानंतर पुन्हां जेव्हां एकदां संध्याकाळीं घरीं यायला मला उशीर झाला, तेव्हां मला जो मार मिळाला तो मी कधींच विसरणार नाहीं. परंतु याहून माझ्या लक्षांत कांहीं राहिलें असेल तर वडिलांच्या तडख्यांतून, मला पाठीशीं घालण्याचा दुलारीचा त्या वेळचा प्रयत्न. तिच्या या करण्यानें तिनें माझें मन कायमचें जिंकलें.

एकदां धडा मिळाल्यानंतर, मी सायंकाळीं खेळून झाल्यावर, अंधार पडण्यापूर्वीं घरीं परतूं लागलो. पुढें पुष्कळ महिन्यानंतर शाळेंत कांहींतरी समारंभ असल्यानें मला घरीं यायला पुन्हां उशीर झाला. पुढें काय वाढून ठेवलें आहे याची कल्पना असल्यानें मी चांगलाच घाबरलों होतों. अंगद नांवाचा माझा एक शीख वर्गमित्र होता. त्याला माझी परिस्थिति सांगितल्यावर त्यानें खात्रीपूर्वक सांगितलें कीं, जर 'जप जी साहिब' या शीखांच्या प्रार्थनेच्या पहिल्या कडव्याचा सतत जप केला तर मला कसलीही भीति नाहीं. माझा यावर विश्वास बसेना. परंतु अखेरचा उपाय म्हणून मी सांगितल्याप्रमाणें केलें. 'अेक ओंकार सत् नाम– कर्ता पुरख्...' हें कडवें शिकायलाच मला अर्धा तास लागला. जोरजोरानें मनापासून मी या ओळीचा जप करीत झपाट्यानें घराकडे निघालो. पाय न वाजवतां मी घरांत पाऊल टाकलें, तों समोरच आमचा वृद्ध गडी भेटला. त्यानें जेव्हां सांगितलें कीं तासाभरापूर्वींच कांहीं तातडतोब्रीच्या सरकारी कामासाठीं वडिलांना बोलावणें आलें व ते घराबाहेर पडले आहेत. तेव्हां मी अगदीं थक्क झालों. खरोखरच घरीं उशीरा आल्याबद्दल मला फैलावर घेण्यासाठीं

घरांत वडीलच नव्हते ! अंगदचें सांगणें अखेर तंतोतंत खरें ठरलें. शीख धर्माविषयीं माझा आदर त्यादिवशीं जन्म पावला.

दुलारीचें लग्न एका सधन तरुणाशीं झालें. दुर्दैवानें त्या दोघांचे पहिल्या दिवसापासून नीट जमलें नाहीं व दोघांत दुरावा निर्माण झाला. प्रथम कुणापाशीं न बोलतां तिनें सर्व सहन केलें. मात्र सतत मानसिक दुःखानें तिच्या आधींच नाजुक असलेल्या देहावर परिणाम होऊं लागला. असह्य झालें तेव्हां तिनें घाईघाईनें वडिलांना पत्र लिहिलें. त्या पत्रांत तिनें विनवणी केली, कीं जर ती जिवंत दृष्टीस पडावी असें वाटत असेल तर पत्र पोंचताच त्यांनीं तिकडे निघून यावें. वडिलांना आकाशांतून कुऱ्हाड पडावी तसा हा धक्का होता. जेव्हां वडिलांनीं तिला प्रत्यक्ष पाहिली तेव्हां ते हादरलेच. त्यांची लाडकी लेक पूर्वीच्या रुपाची केवळ पडछाया उरली होती. चेहरा दुःखानें काळवंडलेला होता. अंगांत खूप तापहि होता. वडिलांनी तात्काळ ठरवलें, कीं ती जिथें होती तिथें अधिक काळ कंठण्याचा आतां प्रश्नच नव्हता. वडील तिला बरोबर घेऊनच घरीं परतले.

दुलारीला घरीं आणल्याबरोबर लगेच तिची कसून वैद्यकीय तपासणी करण्यांत आली. डॉक्टरांनी क्षयरोगाचें निदान केलें. तिची दोन्हीं फुप्फुसें क्षयानें ग्रासली होतीं. वडिलांनी देशांतील नाणावलेल्या तज्ज्ञांचा सल्ला घेऊन तिच्यासाठीं सर्व कांहीं केलें. या रोगाच्या कचाटयांतून ती सुटावी, यासाठीं त्यांनी जिवाचें रान केलें. पण हें सर्व निष्फळच ठरणार होतें. क्षयानें शरिरांत मुळें धरली होतीं आणि शोचनीय गोष्ट ही होती, कीं दुलारीला स्वतःलाच जगण्याची इच्छा उरली नव्हती. हळू हळू तिची प्रकृती ढांसळत गेली व वडिलांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरून दुलारी गेली. तिच्या मृत्यूनें कैक महिने आमचीं आयुष्यें काळवंडून गेलीं. आमचे ग्रहच फिरलेले दिसत होते.

अमृतसरला आम्ही होतो तेव्हां निम्मीचे आईवडील आमच्याच पलीकडे राहात असत. तिचे वय माझ्याच एवढे साधारण होते—चौदा वर्षांचें—आणि ती मोठी चुणचुणीत होती. पोरवयांत वाटतो त्यापेक्षा बराच ओढा, आम्हांला एकमेकांविषयीं वाटत असे. दर शनिवारीं रात्रीं, माझे वडील आम्हां दोघांना त्यांच्या लिहा-वाचायच्या खोलींत

बोलावून घेत व आम्हांला इतिहासासंबंधी व चालू परिस्थितीसंबंधी सांगत असत. १९१९ सालांत अमृतसरला जालियनवालाबाग येथें ब्रिटिशांनीं जी कत्तल उडवली, त्याचे तपशीलवार वर्णन त्यांनीं केलें. तो दिवस मला आठवतो. आम्ही दोघं चिकटून बसलों होतों व वडील वर्णन करीत होते. या दुर्घटनेसंबंधी सांगतांना वडिलांनी आम्हांला अब्राहम लिंकनच्या वचनाची आठवण दिली. त्यानें म्हटलें आहे.

'दुसऱ्या देशांवर राज्य करण्याइतकी थोरवी कुठल्याच राष्ट्रापाशीं नसतें.' त्यांनीं सांगितलें कीं जुलमी सत्तेपासून स्वतंत्र होण्याचा अधिकार नाहीं, असा एकही देश नाहीं. ब्रिटिशांच्या भारतांतील सत्तेचा इतिहास सांगून झाल्यावर त्यांनीं सांगितलें, कीं हा एक असा देश आहे कीं जेथली जनता एकीकडे अभिमानानें असें सांगते, 'आम्ही कधींही गुलाम होणार नाहीं' व दुसरीकडे त्यांनींच निर्लज्जपणें भारताला गुलाम केलें आहे. त्यांनीं शेवटीं सांगितलें, कीं कितीही उदारतेनें विचार केला तरी भारतावरील त्यांच्या राजवटीच्या काळांत, ब्रिटिशांना शरम वाटावी असें बरेंच घडलेलें आहे. अशा प्रकारच्या भाषणांनी माझ्या अंतःकरणांत देशभक्तीची तीव्र भावना प्रथमच जागृत झाली.

कांहीं दिवसांनी वडिलांची अमृतसरहून बदली झाली व भरल्या डोळ्यांनी मी निम्मीचा निरोप घेतला.

वडिलांचे बरेच ठाम सिद्धांत होते. ते कुणाला वाद घालूं देत नसत. उलट उत्तरें त्यांना सहन होत नसत. कसल्याही बयादी त्यांना चालत नसत. नाटकें, सिनेमा व संगीत वर्ज्य होतें. रंगीबेरंगी कपड्यांना बंदी होती. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें शाळेंत नेमलेल्या पुस्तकांचें वाचन पुरेसें असें. व्यायाम म्हणजे घोड्यावरून केलेल्या दुरदूरच्या रपेटी. मी दहा वर्षांचा असतांनाच त्यांनीं मला घोड्यावर बसवून तसेंच सोडून दिलें. मला आपोआप घोड्यावर बसतां येऊं लागेल, असें त्यांचें म्हणणें असे मी अनेक वेळां घोड्यावरून पडलों; परंतु अखेर याच दुष्कर पद्धतीनें घोड्यावर बसायला शिकलों. समजा घोड्यावरून पडून लागलें बिगलें तरी लगेंच ते मला पुन्हां घोड्यावर चढवीत; लागल्याचें कौतुक करायला वेळ

नसे. छोटचा कालव्यांत मला ढकलून केवळ इच्छाशक्तीच्या बळावर मला पोहतां येईल, असें समजून ते काठावर मजा बघत बसून राहात.

कॉलेजमध्यें जाऊं लागल्यावर वडिलांनीं मला सायकल विकत घेतली. शाळेंत असतांना मात्र, कसल्याही परिस्थितींत–उन्हांत, पावसांत थंडींत–दूर दूर पायीं जाण्याची संवय व्हावी म्हणून मी चालतच शाळेंत जात असे. खिशांत ठेवायला पैसे मिळत नसत, कारण त्यानें वाईट संवयी लागतात असें त्यांना वाटे. ते म्हणत माणसाला कर्जांत जावें लागणें हें एखादा दुर्गुण जडण्यासारखेंच आहे.

मी प्रथम जवाहरलाल नेहरुंना पाहिलें तें एका सभेंत ते बोलत असतांना १९२९ सालीं. तेव्हां ते नुकतेच कॉंग्रेसचे सर्वांत तरुण असे अध्यक्ष झालेले होते. त्यांनी व्यासपीठावर पदक्षेप करतांच, प्रचंड जयघोषांनीं भारताच्या पुनरुत्थानाचें प्रतीक असलेल्या या राजस व शांत अशा प्रतिमेचें लोकांनीं स्वागत केलें. कांतीव व सुंदर अशी ती नेहरुंची आकृती एखाद्या संगमरवरी पुतळ्यासारखी भासत होती. तो प्रचंड जनसागर त्यांनीं क्रांतीचा निधडेपणानें उघड उल्लेख करून हेलावून सोडला. त्यांनीं दुःखित मनानें सांगितलें, कीं भारताची चिरडलेली व भुकेकंगाल जनता पाहतांना सर्वांबरोबर लज्जेनें त्यांचीहि मान खालीं जाते. केंब्रिज विद्यापीठाची पदवी घेतलेल्या या तरुणानें, भारताचें भवितव्य व मानवतेचें भवितव्य यांची सांगड घालतांच आम्हां सर्वांच्या अंगांतून वीज सळसळली. पूर्व व पश्चिमेचा समन्वय साधणारा ध्येयवादी नेता आता लाभला होता. जिथें जिथें स्वातंत्र्याला धोका होता, तिथें तिथें जीवावर उदार होऊन धावून जाण्याचें ध्येय त्यांच्या डोळ्यापुढें होतें. भारताव्यतिरिक्त हीच मूर्ति पुढील कांहीं वर्षांत, बार्सिलोना येथें फॅसिस्टांच्या गोळ्यांचा वर्षाव होत असतांना, किंवा चुंकिंग येथें बॉम्ब वर्षाव चालू असतांना, इतिहासाबरोबर पावलें टाकतांना सर्वांनीं पाहिली. मला त्यावेळीं याची कल्पनाही नव्हती. हीच व्यक्ति, माझ्या आयुष्यांत पुढें मोठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

भारतांत राष्ट्रीय चळवळ यावेळीं ऐन जोमात होती. इतर अनेकांप्रमाणें मी देखील या उत्थानांत सहभागी होण्यास आसुसलेला होतो. याच सुमारांस केव्हां तरी राज नांवाच्या माझ्या परिचयांतील कॉलेजांतील मुलीनें

मला रात्रीं तिच्या घरीं जेवण्याचें निमंत्रण दिलें. जेवण झाल्यावर जेव्हां आम्ही दोघेच समवेत होतो–तिची आई विश्रांतीसाठीं निघून गेली होती–तेव्हां तिनें मला विचारलें कीं, मी दहशतवादी चळवळीत कांहीं भाग घेऊं इच्छितो काय ? माझा माझ्या कानांवर विश्वासच बसेना. अशाच संधीची तर मी वाट पाहात होतो. जालियनवाला बागेंतील भयानक हत्याकांडाची हकिगत ऐकल्यापासून अशी संधि केव्हांतरी मिळावी असें मला फार वाटत असे. मी ताबडतोब रुकार दिला. तिनें मला कांहीं कबूल करण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करण्यास सांगितलें. कदाचित माझ्यावर सोपवलेल्या कामगिरींत पुष्कळच धोका संभवणार होता. यामुळें तर मी माझा विचार पक्काच केला. या मुलीच्या अंगांत देशप्रेम कसें धगधगत होतें हें मी पाहात होतों. माझें अभिनंदन करण्यासाठीं, निरोप घेतांना तिनें भावनापूर्ण हस्तांदोलन केलें.

थोड्याच दिवसांनंतर मला पहिली कामगिरी मिळाली. एक राष्ट्रीय पत्रक एका ब्रिटिश अधिकाऱ्याच्या राहत्या निवासावर डकवण्याचें हें काम होतें. निवासावर पहारा होता. परकीय सत्तेला आव्हानात्मक असें हें कृत्य होतें. अशी धाडशी कामगिरी करावी लागणार आहे, या विचारानें मी पुल-कीत झालों होतों. मी तीन चार रात्री निरनिराळ्या वेळीं, निवास-रचनेची पाहणी केली. माझ्या ध्यानांत आलें, कीं मध्यरात्रीनंतर पहाऱ्यावरचा पहारेकरी, निवासाच्या कंपाउंडच्या कडेनें फेऱ्या मारतांना, निदान कांहीं मिनिटें निवासाच्या प्रवेशद्वारापासून दूर जात असे. या वेळांत मला माझें काम उरकतां येणार होतें. एक दिवशीं रात्री मी लपतछपत प्रवेशद्वारा-जवळ सरकलों; व नियोजित पत्रक तिथें डकवून सायकलीवरून झरकन पसार झालों. या क्षेत्रांतील माझ्या या पहिल्याच कामगिरीनें मी अगदीं हरखून गेलों.

लवकरच दुसरी कामगिरी आली. एक छोटेसें बंडल, जुन्या किल्ल्यांत जाऊन तेथील एका भिकाऱ्याच्या स्वाधीन करावयाचें होतें. मध्यरात्री मी ही कामगिरी केली. ज्यानें तें बंडल स्वीकारलें तो कोण होता, त्या बंडलांत काय होतें किंवा त्याचा पुढें काय उपयोग होता यातील मला

कांहीही माहीत नव्हतें. अशा तऱ्हेच्या लपून छपून चाललेल्या व्यवहारांत असें चालतेंच.

सर जॉन सायमन याच वेळीं भारतांत आले होते. भारताला स्वायत्तता द्यावी काय किंवा दिल्यास किती द्यावी, याची चौकशी करण्याकरितां आलेल्या कमिशनचे ते अध्यक्ष होते. या सायमन कमिशनविरुद्ध देशांत क्षोभ माजला होता. भारताला स्वायत्त सरकार मिळण्यांत कोलदांडे घालण्या-साठींच ब्रिटिश सरकारची ही योजना होती, अशी सर्वत्र समजूत होती. 'सायमन परत जा.' अशा घोषणांनीं व काळ्या निशाणांनी त्यांच्यापुढें सर्वत्र निदर्शनें झालीं. तें दिल्लीला पोचले, तेव्हां मी सुद्धां या निदर्शनांत भाग घेतला. लाखाहून अधिक जनता निरनिराळ्या स्तरांतून यासाठीं एकत्र आली होती. आणि नको असलेल्या या आगंतुक पाहुण्याचें त्यांनीं खासें स्वागत केलें. आठवणीत राहावा असा तो दिवस होता.

मी अधून मधून लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत, पंडित मोतीलाल नेहरू, मदन मोहन मालवीय, महंमदअली जिना यांच्यासारख्या रथी महारथींची भाषणें एकण्यासाठीं जात असे. एक दिवशीं मी असाच 'पब्लिक सेफ्टी बिल–' समाज सुरक्षा कायदा यावरील चर्चा ऐकण्यासाठीं गेलों होतों. सरकार हें बिल सभागृहांत पास करून घेण्यासाठीं धडपडत होतें. कारण एकदां हें बिल पास झालें कीं, कुणालाही चौकशीविना अटकेंत ठेवण्याचें मुखत्यारपत्र ब्रिटिश सरकारला मिळणार होतें. या खळबळजनक दिवशीं, प्रेक्षकांच्या गॅलऱ्या तुडुंब भरलेल्या होत्या. मला आठवतें पंडित मोतीलाल नेहरू आवे-शानें भाषणांत सांगत होते, 'मी कांहीं कच्च्या दिलाचा लटपटणारा माणूस नाहीं की जो परकीय सत्तेचे–' एवढे वाक्य उच्चारलें जातें न जातें, तोंच सभागृहांत एकच कल्लोळ माजला. माझ्या पलीकडेच बसलेल्या दोन अनोळखी तरुणांनीं एकदम उठून, त्यापैकी एकानें कोटांत लपवलेलें पत्र-कांचें भेंडोळे सभागृहांत भिरकावलें. या पत्रकाचे शीर्षक होतें– 'बहि-ऱ्यांनाही ऐकूं जावें यासाठीं' फ्रेंच राज्यक्रांतीचें हें परवलीचें वाक्य होतें! निमिषार्धांत दोन बॉम्ब पाठोपाठ सभागृहात फेकले गेले. भगतसिंगाचें व बटुकेश्वर दत्त यांचें हें धाडसी कृत्य होतें. बॉम्ब सभागृहाच्या लादीवर आदळले व मोठाले स्फोट झाले. सर्वत्र गोंधळ माजला. माणसें वाट

फुटेल तिकडे पळत सुटली. एक घाबरलेला लठ्ठ सरकारनियुक्त सभासद तर कातडी वाचवण्यासाठीं बाकाखालीं शिरला. दुसरा एक मुतारींत पळाला. दोघेच नेते दगडासारखे निश्चल उभे होते. विठ्ठलभाई पटेल व पंडित मोतीलाल नेहरू ! मोतीलालजी आपल्या पक्षांतील सभासदांना ओरडून म्हणाले– 'अरे भाई भागते क्यों ! यह तो कोई अपने आदमी मालूम होते हैं।'

संशयावरून ज्यांना पकडून ठेवण्यांत आलें त्यांत मी होतो. परंतु कुणाहि निरपराध्यांना त्रास होऊं नये म्हणून भगतसिंग व बटुकेश्वर दत्त आपणहून पोलिसांच्या स्वाधीन झाले. या दोन क्रांतीकारकांना असेंब्ली सभागृहांतून पोलीस पहाऱ्यांत, कोठडीकडे नेत असतांना त्यांनी गर्जना केली– 'इन्किलाब झिंदाबाद.' (क्रांतीचा विजय असो.) अशा घोषणा करीत वाघाच्या बेडरपणानें पावलें टाकीत, ते दोघे दृष्टीआड झाले. त्यांना पाहतांना माझा ऊर अभिमानानें भरून आला. त्यांनीं फेकलेल्या बॉम्ब मुळें देश खडबडून उठला. (भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांच्या या हिंसक कृत्याबद्दल आपणास काय वाटते ? असा प्रश्न जेव्हा कुणी तरी गांधीजींना विचारला तेव्हां ते म्हणाले––' शांततेवर माझा विश्वास आहे. परंतु याचा अर्थ कसलीही किंमत देऊन ती मला हवी आहे. असे नाही. दगडधोंड्यांची शांतता किंवा स्मशान शांतता मला नको आहे. भीरुता कीं हिंसा असा प्रश्न जेव्हा पडतो, तेव्हां मी हिंसाचार पत्करीन.')

यापूर्वींच कांहीं दिवस लाला लजपतराय या पंजाबच्या सिंहाचें दुःखद निधन झाल्याचें मी ऐकलें होतें. सॉंडर्स नांवाच्या ब्रिटिश पोलीस अधिकाऱ्यानें, लजपतराय यांच्या नेतृत्वाखालीं निघालेल्या राष्ट्रीय मिरवणूकीवर जो अमानुष लाठीमार केला, त्या हल्ल्यांत लजपतराय जखमी झाले होते व त्यातच त्यांचा अंत झाला. या घटनेमुळें जनता क्षुब्ध झालेली होती. क्रांतिकारी पक्षाचें सभासदत्व घेतलेल्या भगतसिंगानें मोठ्या धाडसानें पोलिस हेडक्वार्टरच्या समोरच सॉंडर्सला गोळ्या घालून ठार केलें. खुनाचा बदला त्यानें खुनानें घेतला. या घटनेनंतर फरारी झालेले भगतसिंग वर सांगितल्याप्रमाणें, आपणहून आतां सरकारच्या स्वाधीन झाले होते.

भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांच्यावरील खटला चालून, त्यांत भगतसिंगाला

देहांत शासनाची व बटुकेश्वर दत्तांना काळ्या पाण्याची शिक्षा फर्मावण्यात आली. एक दिवशीं ब्रिटिश मालाची होळी होती. त्या ठिकाणीं मी निघालों असतां, मला कुणीतरी वाटेंत सांगितलें कीं भगतसिंगांना लाहोर येथील डिस्ट्रिक्ट तुरुंगांत त्याच दिवशीं फांशी देण्यांत येणार होतें. मला हें ऐकून काय करावें हें सुचेना मी तडक ज्या तुरुंगाच्या भिंतीआड भगतसिंगांना फांसावर लटकवण्यांत येणार होतें, त्या तुरुंगाच्या बाहेर जागा हेरून बसलों.

सगळा देश वेदना सोशीत होता. मूकपणें, निस्तब्धतेंत ! मी देखील तें दुःख अनुभवलें. भगतसिंग हे किती निधड्या छातीनें फांशी गेले याची डोळांदेखली हकिगत नंतर मला ऐकायला मिळाली. भगतसिंग, राजगुरु व सुखदेव या तिघांना त्यांच्या देशप्रेमाखातर त्या दिवशीं फांसावर लटकवण्यांत आलें. भगतसिंगाची पाळी आली तेव्हां चेहरा झांकण्यासाठीं त्यांच्याजवळ एका फांशी-टोपी देण्यांत आली होती. फांशीची फळी चढतांना त्यांनीं ती फेकून दिली. धीरगंभीर मुद्रेनें, धीरोदात्त मुद्रेनें व स्थिरपणें फांशीफळी ते चढले. धीमेपणानें त्यांनीं फांसाचें चुंबन घेतलें. चुंबन घेतांना ते म्हणाले, कीं देशासाठीं प्राण समर्पण करण्याची संधि मिळाली हें केवढें भाग्य होय ! मग त्यांनीं तिथल्या उपस्थितांतील भारतीय तुरुंगाधिकारी, हजर असलेले डॉक्टर व न्यायाधिश यांचा निरोप घेतला. स्तब्धपणें हें सर्वजण पाहात होते. ओठांवर क्रांतीचा मंत्र व डोळ्यांतून आग बाहेर पडत असतांनाच, भगतसिंगांना फांशी देण्यांत आलें. तिथें हजर असलेल्या मूठभर हिंदी अधिकाऱ्यांच्या माना, हा स्वकीय देशभक्त फांसांवर जात असतांना दुःखानें व शरमेनें खाली गेल्या होत्या.

भगतसिंगाचा मृतदेह ब्रिटिशांनीं त्याच्या नातेवाईकांच्या स्वाधीन केला नाहीं. आम जनतेला यामुळें चिथावणी मिळेल अशी भीति त्यांना वाटत होती. असें सांगतात, कीं त्यांचा अर्धवट जळालेला मृतदेह सतलज नदीच्या कोरड्या पात्रांत दुसऱ्या दिवशीं सकाळी तेथील कांहीं स्थानिक मंडळींना आढळला. हा देह लाहोरला आणण्यांत आला. आपल्या आवडत्या बहादुराचा तो अवशेष दृष्टीस पडतांच लोक सैरावैरा करूं लागले. वीस पंचवीस हजार लोकांनी हा मृतदेह मिरवणुकीनें स्मशानभूमीवर नेला. या लोकांत मी

देखील होतो. तिथें भगतसिंगांना सर्वांनी श्रद्धांजली वाहिली. सगळ्या देशानें या वीरासाठीं अश्रुपात केला.

छत्तीस वर्षांनंतर माझ्या कानीं आलें कीं, सुप्रसिद्ध देशभक्त बटुकेश्वर दत्त हे दिल्ली येथील मेडिकल इन्स्टिटयूटमध्यें अतिशय आजारी आहेत. त्यांची प्रकृति कशी आहे हें पाहण्यासाठीं ११ फेब्रुवारी १९६५ रोजीं मी गेलो. १९२९ नंतर मी त्यांना पुन्हां पाहिलेलें नव्हतें. मी जेव्हां त्यांना सांगितलें की भगतसिंगांनी व त्यांनीं लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत खूप वर्षांपूर्वी बॉम्ब टाकले, तेव्हां मी तिथें हजर होतो, तेव्हां त्यांचे डोळे एकदम चमकले. त्यांनीं सांगितलें कीं वयाच्या सतराव्या वर्षीं ते दहशतवादी संघटनेचे सभासद झाले. पण आपण एक दिवस वृत्तपत्रांतून असे गाजू असें त्यांना वाटलें नव्हतें. भगसिंगांनीं व त्यांनीं ही कामगिरी आपणहून पत्करली व याचे गंभीर परिणाम काय आहेत याचीही त्यांना कल्पना होती. आपल्या मातृभूमीच्या सेवेकरता, जीवनें समर्पित करता आली याचा आनंद त्यांना होता. त्यांनीं सांगितलें कीं, भगतसिंग व ते आपण होऊन पोलिसांच्या स्वाधीन होईपर्यंत, त्यांचा कुणाला संशय आलेला नव्हता. निरपराधी भारतीय माणसांवर, त्यांच्या कृत्याचा सूड घेतला जाऊं नये म्हणून, त्या दोघांनीं हा मार्ग पत्करला. थोड्या कांहीं वर्षांनंतर दत्तांना ब्रिटिश सरकारनें सोडलें. परंतु १९४२ सालीं त्यांना पुन: पकडण्यांत आलें. तुरुंगांत आणि तुरुंगाबाहेर त्यांना ज्या यातना सहन कराव्या लागल्या, त्यामुळें त्यांची प्रकृति कायमची ढांसळली. गेले कांहीं महिने ते फारच आजारी झाले होते. त्यांनी सांगितलें कीं, गुलझारीलाल नंदा यांनीं त्यांना उपचारासाठीं इथें आणलें होतें. भगतसिंगाविषयीं बोलतांना ते म्हणाले, कीं भगतसिंगांना अधिकाऱ्यांनी एक दिवशी सायंकाळीं सांगितलें कीं कांहीं तासांनीच त्यांना फांशी देण्यांत येईल. भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना फांशी दिल्यानंतर त्यांचे मृतदेह सरकारनें सतलज नदीच्या तीरावर त्याच दिवशीं जाळले.

एके काळचा हा थोर क्रांतिकारक, विकलावस्थेंत अस्थिपंजर स्थितींत पहातांना माझी जी स्थिति झाली ती शब्दानें सांगता येत नाहीं. आजहि त्यांच्या डोळ्यांत तेज होतें व वृत्तींत बेडरपणा होता. त्यांचा निरोप घेतांना

मी त्यांना लवकरच आराम पडो अशी इच्छा व्यक्त केली व सांगितलें, कीं त्यांची कांहीं लहान सहान सेवा करण्याची संधि मिळाली तर मी स्वत:ला भाग्यवान समजेन. त्यांच्या नेत्रांत अश्रु जमा झालेले होते. गदगदलेल्या स्वरांत ते म्हणाले– ‘ मला कुणाकडून कांहीही मागावयाचें नाही.’

(दैवगती अशी की जुलै १९६५ मध्यें बटुकेश्वर दत्त निधन पावल्यानंतर सर्वांनीं त्यांच्या गौरवपर उद्‌गार काढले तरी, ज्या दत्तांनी आपल्या शौर्यानें देशाचें स्वातंत्र्य जवळ आणलें त्या दत्तांना १९४७ सालानंतरही स्वत:ची भाकरी कष्टाने मिळवावी लागत होती. त्यांनी बेकरी चालवली व खाजगी मोटार वहातुकीचा व्यवसाय केला. फेरोजपूर जवळ जेथें भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांच्या देहावर अंत्य संस्कार झाले तेथेंच बटुकेश्वरांना अंत्य-संस्कार करण्यांत आलें.)

ऑफिसांतून वडील एक दिवशीं अचानक घरीं आले. त्यांचे डोकें अतिशय दुखूं लागलें होतें. थोडया वेळानें त्यांना भोवळ येईलसें वाटूं लागलें व कांहीं कालानें त्यांची शुद्धि गेली व दृष्टि गेली. डॉक्टरांनी निदान केलें, कीं मेंदूत रक्तस्राव सुरू झाला आहे. याचा अर्थ कुठल्याही क्षणीं ते आम्हांला आतां सोडून जाणार असा होता. आई व मी या कल्पनेनें अगदीं खचून गेलों. आपण आतां जगत नाहीं हें त्यांना कळले होते. ते अजून बोलूं शकत होते. त्यांनीं आम्हांला जवळ बोलावलें व अगदीं क्षीण आवाजांत त्यांनीं सांगितलें––

‘ माझी वेळ होत आली आहे. जाण्यापूर्वी मला कांहीं सांगितलें पाहिजें. मला खात्री आहे, कीं तुम्ही धीराने वागाल. हरनारायण व अझीझ यांना मी पैसे दिलेले आहेत ते परत मागूं नका. दोघे माझे जुने मित्र आहेत. त्यांची परिस्थिति फार कठीण आहे व माझे पैसे परत करण्यासारखी त्यांची स्थिती नाहीं. मला ठाऊक आहे कीं तुम्हांलाहि पैशाची गरज भासणार आहे; परंतु कसें झालें तरी तुम्ही तरुण आहांत तसे ते नाहींत. माझी इच्छा आहे कीं त्यांच्या वाटेला तुम्ही जाऊं नये.’

इतके म्हणून त्यांनी माझ्या आईचा हात माझे हातीं दिला व सांगितलें– ‘ माझी इच्छा आहे कीं, तूं हिची नीट काळजी घ्यावीस.’

अगदीं अंत जवळ आला तेव्हां खोल गेलेल्या आवाजांत ते पुटपुटले--

'लक्षांत ठेवा, पैसा हा या आयुष्यांत सगळया दु:खाचें कारण होतो. पैशाची हांव धरूं नका. कुणाकडून उसने घेऊं नका. आतां... निरोप घेतो.'

श्वासासाठीं त्यांची धडपड सुरूं झाली व आमच्याकडे असाहाय्यपणे पाहात त्यांनी डोळे मिटले. ते आम्हांला कायमचे सोडून गेले. मार्च १९३० मध्यें आमच्या घरावर हा दु:खाचा डोंगर कोसळला. मी त्या वेळीं १८ वर्षांचा होतो.

लवकरच आम्ही आमचे घर बंद करायचें ठरवलें. जुने नोकर आतां ठेवण्याची ऐपत उरली नव्हती. आम्हीं त्यांना कमी केलें, आम्हांला सोडून जातांना सर्वजण रडत होते.

दिवस जात होते व आमच्या कुटुंबाच्या मित्रांची संख्या विरळ होत चालली होती. दिल्लींतच राहाण्याची उमेद आतां उरली नव्हती. आम्ही लाहोरला जायचें ठरवलें. आम्ही निघालों तेव्हां आम्हांला पोचवायला फारसे कुणीच आलें नाहीं. कठिण समय येतां कोण कामास येतो याचा अनुभव पहिल्यानेंच आला. पुढेहि हा अनुभव येणार होताच.

लाहोरला पोहोंचल्यावर जायचें कुठें हें निघण्यापूर्वीं ठरवलेलें नव्हतें. रेल्वे स्टेशनांत माझ्या दोन्ही भावांना व बहिणीला घेऊन, सामानाजवळ आई बसून राहिली व मी भाड्याची जागा शोधण्यासाठीं स्टेशना-बाहेर पडलो. योगायोगानें त्याच दिवशीं दुपारनंतर मला एक बऱ्यापैकीं जागा मिळाली व आम्ही पांची जण तिथे येऊन पोचलों. त्या दिवशी आई, मी किंवा माझ्या भावंडांनी कांहींच पोटांत न घालता रात्र काढली. सकाळीं आम्हांला जाग आली तेव्हां लक्षांत आलें कीं नवें घर आम्हा पांच जणांना फारच अपुरें पडणार होतें. तुलना नेहमींच क्लेश-कारक असतात. परंतु पूर्वीच्या सुखासीनतेची आठवण सतत होतच असे. हळूहळू आम्ही या नव्या जीवनाशीं जमवून घेतलें.

वडिलांनी उतरवलेले विमे, हप्ते न भरल्याने थांबलेले होते. बहिणीच्या आजारांत सर्व मालमत्ता गहाणांत गेलेली होती. म्हणूनच सांगण्यासारखे

कांहींही आम्हांला त्यांनीं मागें ठेवलेलें नव्हतें. जगावें कसें हा प्रश्न आमच्या पुढें होता. वडील गेले ते अवघ्या ४७ व्या वर्षी ! परिस्थितीनें असें आव्हान दिल्यानें मला जगण्याचें प्रयोजन सांपडलें

लाहोरच्या सरकारी कॉलेजांत मला प्रवेश मिळाला. या कॉलेजांतील अध्यापकवर्ग नाणावलेला होता. प्रा. गॅरट, प्रा. डिकिन्सन्, प्रा. लाँगहॉर्न, प्रा. अहमदशहा बुखारी यांच्यासारखा अध्यापक वर्ग, या कॉलेजांत होता. मी कसून अभ्यास करीत असे व त्याच बरोबर कॉलेजच्या, खळ, नाटकें, वक्तृत्व अशा इतर गोष्टींतही भाग घेत असे. क्रिकेट हा माझा आवडता खेळ होता.

मी दिल्लीला सेंट स्टिफन्स कॉलेजमध्यें होतो, तेव्हां तेथील माझ्या बरोबरचा विद्यार्थी हरिश सरकार व आणखी कांहींजण विमान दलांत भरती झालेले मी पाहिले होते. मला त्यांचाच कित्ता गिरवण्याची इच्छा होती. या कॉलेजांतील माझ्या दोन सहाध्यायांचीहि सैन्यांत निवड झाली होती व ते मलाही अर्ज करण्याचा आग्रह करीत असत. मी जेव्हां लाहोरच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला यासाठीं भेटलों, तेव्हां त्यांनीं सांगितले कीं माझ्या राजकीय चळवळींमुळें माझा अर्ज वरपर्यंत जाईल कीं नाहीं याची शंका होती. कसें कां होईना मला सेनादलाच्या प्रवेश परिक्षेस बसण्याची परवानगी मिळाली. ब्रिटिशांचे व्यवहारी शहाणपण हें कीं माझा पूर्वेतिहास अनुकुल नसतांनाही, त्यांनीं तोंडी परिक्षेंत मला खूपच वर गुण दिले. कांहीं महिन्या-नंतर सँडर्स्ट येथील अभ्यासक्रमासाठीं माझी निवड झाली दैव पुनः अनुकुल होऊं लागलें होतें व माझ्याकडे पुनः लोक आशेनें पाहूं लागले. ठिकठिकाणां-हून मला असंख्य अभिनंदनाचीं पत्रें आलीं. माझ्या आईचा चेहरा आनंदानें उजळला.

सँडर्ससाठीं निवड झाली इथवर ठीक झालें. प्रश्न होता तो परदेशांतील खर्चासाठीं लागणाऱ्या पैशांचा. जवळ कांहीं नव्हतें. आईच्या तुटपंज्या पैशाला स्पर्श करण्याचा विचारहि मनाला शिवत नव्हता. जरी आईनें आपल्याजवळचें होतें नव्हतें. तें देऊं केलें होतें, तरी मी स्वतःच माझे पैसे उभे करण्याचा निश्चय केला होता. मी सर्व प्रथम ॲडज्युटंट जनरल आर्मी हेडक्वार्टर्स यांचेकडे आर्थिक मदतीसाठीं अर्ज केला. अर्जात

माझ्या हलाखीच्या परिस्थितीचें कारण मी नमूद केले होतें. मी माझा अर्ज नेहमीच्या पद्धतीनें धाडला. परंतु पाठोपाठ आर्मी हेडक्वार्टर्स यांना गाठण्यासाठीं मी सिमल्याची वारी केली. भारताच्या या 'पेंटॅगॉन' मधील (अमेरिकेंतील लष्करी महामंडळाला वापरण्यांत येणारा समानार्थी शब्द) कोणीच माझ्या परिचयाचें नव्हतें. बरेच दिवस वाटोळे वाटोळे हेलपाटे मारल्यानंतर, मी अॅडज्युटंट जनरल यांची भेट मिळविण्यांत यशस्वी झालों. माझी आठवण बरोबर असेल तर लेफ्ट. जन. टिवस हे त्यावेळीं या पदावर होते. मी त्यांच्यापुढें उभा राहिलों तेव्हां एकाद्या राक्षसानें एकाद्या कीटकाकडे पाहावें तसा मला भास झाला. त्यांचे खेकसणें त्यांच्या खडसावण्यापेक्षां भयंकर होतें. त्यांनीं माझी हकिगत थोडक्यांत ऐकली व कर्णा फुंकावा एवढ्या मोठ्यानें ते म्हणाले—

'मी करतो आहे ते बरोबर आहे कीं नाहीं कुणास ठाऊक, परंतु इथल्या चक्रव्युहांतून घुसून तूं माझ्यापर्यंत येऊन एकट्यानें थडकलास याबद्दल तुझ्या ढुंगणावर फटके जसे मारायला हवेत तसेच तुझें कौतुकही केलें पाहिजे. तुझ्या वाईट आर्थिक परिस्थितीचा विचार करून मी तुला फी मध्ये पांच हजारांची सूट देतो. देव तुझें भलें करो!'

आपण या माणसाला मानलें बुवा! ब्रिटिशांच्या रक्तांत हा जो खिळाडूपणा व्यक्त होत असें त्याचेंच जगाला कौतुक वाटे.

मी लाहोरला परत आलो. मोठ्या अडचणींतून मी सरकारला भरावयाची उरलेली रक्कम कर्जाऊ उभी केली व इंग्लंडच्या बोटींत चढण्याची मार्गप्रतिक्षा करूं लागलों.

याच सुमारास निम्मीच्या आईकडून मला निरोप आला, कीं ती अतिशय आजारी असून, वातांत ती मला बोलावीत असते. एक मिनिट वाया न दवडता मी धांवत तिच्याकडे गेलो. ती निस्तेज व हडकलेली होती. केस विखुरलेले होते. डोळ्यांत जीव असा नव्हता. ओठ विलग होऊन मध्येंच थरथरत होते. मी तिच्या अंथरूणाशेजारी गुडघे टेकून बसलो, तिचे कृश थरथरणारे हात माझ्या हातीं घेतले. देवाची प्रार्थना केली, कीं हिला लवकर बरें वाटो. ती तापानें फणफणत होती व तिला अतिशय यातना होत

होत्या. तिच्या आईनें मला शेजारच्या खोलीत नेऊन सांगितलें, कीं डॉक्टरांनी मॅनेंन्जाइटीस ठरवला आहे व आशा सोडलेली आहे. अंतकाळच्या ज्या यातना तिच्या चेहऱ्यावर दृग्गोचर होत होत्या, त्या प्रत्यक्ष मृत्यूपेक्षांही असह्य दिसत होत्या. ती हळू हळू अखेरच्या घटका मोजूं लागली. आम्ही सर्व तिच्या अंथरुणाभोंवतीं जमलों. नंतर कांहीं मिनिटांतच तिचें प्राणोत्क्रमण झालें. इतकी सुंदर देहयष्टी लांकडासारखी ताठ झाली. जिवंतपणाची सगळीं चिन्हे संपली. ती आतां पुन: कधीं बोलणार नाहीं ही कल्पना सहन होत नव्हती. तें दृश्यच भयानक होतें. फक्त एकोणीस वर्षांचें वय होतें. तिची आठवण आजतागायत मला अनेक वेळा येत असते.

दुसऱ्याच दिवशीं मी मुंबईमार्गें इंग्लंडला रवाना झालों. मला निरोप देण्यासाठीं खूपच गर्दी झाली होती. मी लाहोर सोडलें तेव्हां गाडी हलण्यापूर्वीं ब्रिजलाल नांवाच्या माझ्या शिक्षकांनीं, मागून पुढें येऊन माझ्या हातात एक कपटा सारला. शंभर रुपयांची ती नोट होती. त्यावर पेन्सिलीनें लिहिलें होतें—'शुभेच्छा' ज्या गृहस्थांना महिना कसा जातो ती सतत काळजी होती, अशा या माझ्या शिक्षकांनीं हें करावे! माझा कंठ दाटून आला.

एस्. एस्. मांटुआ बोटीने एका सुप्रभातीं मी मुंबईचा किनारा सोडला. माझ्याबरोबर इतर दहा उमेदवार (कॅंडेटस्) होते. आम्ही सर्वजण विशींतलेच होतो. परदेशीं निघालो आहोत या विचारानें आम्ही सर्व आनंदांत होतो. त्या दिवशी सायंकाळी आम्ही उपाहारगृहांत कॉकटेल पार्टीसाठीं जमलो असतांना, बटलर, प्रत्येकाला त्याला हव्या असलेल्या मद्याचें नांव विचारू लागला. प्रत्येकानें व्हिस्की, जिन् वा इतर काहीं मद्य सराईताप्रमाणें सांगितलें. मी जेव्हा साधे थंड पेय आणण्यास सांगितलें, तेव्हां सर्वजण मला थोडें तरी मद्य घेण्याचा आग्रह करूं लागले. मी नकार देत राहिल्यानें ते माझी चेष्टा करूं लागले. माझ्याभोंवतीं त्यांनीं गिल्ला उडवला व मी चिडलों. मी मग माझें मत मुळींच बदललें नाहीं. उलट मी थोडा अधिकच दृढ झालों. परिणामी आजपर्यंत मी धूम्रपान केलेलें नाहीं किंवा मद्यालाही स्पर्श केलेला नाहीं. मी कांही मोठा सद्‌गुण म्हणून हें सांगत नाहीं, तर फक्त वस्तुस्थिति सांगतो आहे.

## २४ : अकथित कहाणी

पोर्ट सैद, जिब्राल्टर, मार्सेलीस मार्गे आम्ही लंडनला पोहोंचलो. तेथल्या चित्तवेधक दर्शनानें माझी उत्सुकता सारखी वाढतच गेली. आम्ही लंडन-वरून पुढें गेलों तेव्हां रात्र झालेली होती. रंगीबेरंगी दिव्यांच्या रांगा डोळ्यांपुढून सरकत होत्या. परीनगरांतील अकल्पित देखावे जणूं नजरे-समोरून पळत होते. सँडर्स हे लंडनपासून मोटारीने तासाभरांत पोहोंचावे इतकें जवळ आहे. आम्ही जेव्हां तिथें पोचलो तेव्हा गांव निपचीत होतें. सभोंवार काय आहे हे देखील नीटसे दिसत नव्हते. क्वार्टरमास्टर सार्जंट या पदावर काम करणाऱ्या एका लंडनवासियानें आमची तेथे पोचल्यावर गांठ घेतली. तो जरा देखील हंसेलसे वाटत नव्हते. दुर्मुखलेला तो माणूस बोलत नव्हताच, तर खेंकसत होता. त्यानें मला सांगितलें कीं कंपनी क्रमांक एक मध्ये माझी नेमणूक झालेली आहे. त्या दिवशीं रात्री मी कांहीं केलें असेल तर खोलींत जातांच ताणून दिली. तो दिवस महत्त्वाचा ठरला होता.

पुढच्या कांहीं दिवसांत अनेक लहान सहान अधिकाऱ्यांनी आम्हांला या ठिकाणाविषयीं सर्व कांहीं सांगितलें. त्याचा सारांश असा.

सँडर्स येथील, रॉयल मिलिटरी कॉलेज तें हेंच अशा तऱ्हेची ही सर्वांत उत्तम संस्था होती. RMC हा या संस्थेचा लघुनामोच्चार होता. येथली परंपरा मोठी अद्वितीय होती, व शिस्तीचा ही मक्का होती. सहा सहा महिन्यांच्या तीन टर्म पुऱ्या करून जगलों वाचलों तर आम्ही अधिकारी होणार होतो. सर्व अभ्यासक्रम पुरा होईपर्यंत दोन मोठ्या सुट्या मध्यंतरी मिळणार होत्या. आम्हाला ' जंटलमन कॅडेट ' अशी संज्ञा होती. अधिकारी होण्याची आमची आकांक्षा असली, तरी आम्ही पुरते जंटलमन नव्हतो किंवा पुरते अधिकारीही नव्हतो. सर्व प्रकारच्या खेळांची इथें सोय होती. कॉलेजच्या मुख्य इमारती दोन होत्या. एक नवी व एक जुनी होती. कंपनी क्रमांक एक व तीन या नव्या इमारतींत व क्रमांक चार व पांच या जुन्या इमारतींत असत. जुन्या इमारतीसमोर एक तळें होतें, व त्यांत बोटींगची सोय असे. कॉलेजच्या मागेंच बॅरोसा नांवाचें दाट खोरें होतें. त्यांतच गोल्फचे मैदान पसरलेलें होतें. आम्हांला काही खास उच्चार सांगण्यांत आले. बंदुकीला रायफल न म्हणतां हार्प म्हणत, बुलविचा उल्लेख शॉप एवढाच

करीत. रेजिमेंटच्या ध्वजापुढून जातांना प्रत्येक वेळी त्याला लष्करी प्रणाम करण्याची पद्धत होती.

या कॉलेजचा कमांडर होता मेजर जनरल सर रेजिनाल्ड मे. के. बी. ओ., सी. बी., सी. एम्. जी, डी. एस्. ओ, पी. अेस. सी. सॅंडर्सचे कमांडर हे विशेष कर्तृत्त्वाचे असे वेचक अधिकारी असत व कॉलेजचा अध्यापक वर्गही मोठ्या कसोशीनें निवडला जात असे.

पहिल्या दिवशी आम्ही आमची पुस्तकें, लेखन साहित्य व इतर सामान ताब्यांत घेतलें. गणवेषासाठीं शिप्याकडून आमची मापें घेण्यात आली. शिवाय दिवसभर या ठिकाणापासून त्या ठिकाणीं निरनिराळ्या कारणां-साठीं डबल मार्च करीत आम्हाला पिदडण्यात आलें. थापटून थोपटून सर्व उमेदवारांना जणूं आकार दिला जात होता, व आमच्यांतला आळस झटकून टाकण्यांत येत होता. पहिल्या वेळेस 'गेस्ट नाईट' या रात्रीच्या जेवणां-साठी आम्ही सर्व एकत्र आलो, तेव्हा मी अगदी दिपून गेलो. देखावा मोठा छाप पाडणारा होता. जवळ जवळ एक हजार कॅडेटस् प्रमाणशीर रीतीने मांडलेल्या, असंख्य टेबलांच्या रांगांतून टेबलाभोंवतीं वसले होते. रॉयल ब्लू रंगाच्या सैलशा कपड्यांत सर्वजण सजलेले होते. जेवण संपल्यावर 'पोर्ट' व 'शेरी या मद्याची मोठाली कांचपात्रे टेबलावरून सरकत सरकत माझेकडे येऊ लागतांच मला अस्वस्थता आली. राजाला आयुरारोग्य चिंतन करावयाच्या या मद्यप्राशनाला, नकार कसा देतां येईल या विचारानें मी बुचकळ्यांत पडलों. सुदैवानें माझ्या शेजारीं आमचा शिक्षक असलेला एक ब्रिटिश मेजर बसलेला होता. त्याच्या लक्षांत माझी परिस्थिति आली आणि त्याने सांगितले कीं, मी मद्य घेत नसलो तरी—घाबरण्याचें कारण नाही. तो देखील मद्य घेत नसे सोडा किंवा पाणी प्राशन करूनही राजाचे आयुरारोग्य चिंतलें तरी चालतें. मी सुटकेचा श्वास टाकला

कवायतीसाठीं, शारीरिक शिक्षणासाठीं घोड्यावर बसण्यापूर्वी व इतर असंख्य सैनिकी कवायती सुरू करण्यापूर्वी आम्हाला मैदानांत एका रांगेंत पळत येऊन उभें रहावें लागे. यावेळीं एखादा सीनियर अंडर ऑफिसर आमची पाहणी करी. पाहणी करता करतां तो एकदम वसकन् ओरडे— 'हेअर कट...' ( केस कापायला हवे आहेत... ) हें ओरडणें तसें हवेंत

असें. कारण आम्ही आदल्याच दिवशीं केस कापलेले असत. असें असलें तरी अधिकाऱ्यांपैकी शिस्तीच्या एका म्होरक्याने हे शब्द उच्चारलेले असल्याने तें प्रमाण मानावे लागत. त्याला उलट उत्तर दिलें तर त्यांतून गंभीर प्रकरण निर्माण व्हायचें.या शिस्तीच्या खेळांतलाच हा एक भाग होता तुम्ही शिस्त यांतूनच शिकतां.मुकाट्यानें त्याला शिव्या घालीत दुपारीं जाऊन पुन: केस कापून घ्यावे लागत. न्हावी देखील या खेळांतला जुना जाणता होता. तो देखील डोकें इतकें तासून टाकी कीं निदान दुसऱ्या दिवशीं तरी तुम्ही पुन: त्याच्याकडे येऊं नये ! दुसऱ्या एखाद्या वेळीं एखादा सीनिअर अंडर ऑफिसर हातांतल्या वेताच्या छडीच्या टोकानें तुमच्या खांद्याला स्पर्श करीत पुटपुटे 'परेडला कोळीष्टकं कशाला !' याचा अर्थ अंगातल्या ट्युनिकवर वाऱ्यावर उडून आलेले कांहींतरी कणभर चिकटले आहे ! अशी कांहीं ना कांहीं दमबाजी चालूच असे.

आम्ही कनिष्ठ गटांत असल्यानें डोक्यावर कांहींतरी घातल्याखेरीज बाहेर जाणें किंवा कोटा-जाकिटाची बटणें उघडी टाकून वा खिशांत हात घालून फिरणें, या गोष्टी करायला मज्जाव असे. या शिवाय आमचा कनिष्ठपणा सिद्ध व्हावा म्हणून इतर अनेक बंधनें आमच्यावर होतीं.

'सीनिअर अंडर ऑफिसर' या पदाचा अधिकार मनोरंजक होता. कॅडेटस्‌वर त्याची मोठी सत्ता चाले आणि मुख्य म्हणजे ही सत्ता तो गाजवीत असे. कवायत, शारीरिक शिक्षण व इतर अभ्यासांत सामान्याहून अधिक प्राविण्य मिळालेल्यांतून याची निवड होत असे. त्यानें आदर्श ठेवावा व आम्ही त्याचें अनुकरण मुकाट्यानें करावें अशी अपेक्षा असे. यापैकींच कुणीतरी शेवटच्या सहामाहीच्या अखेरीस, राजपदक किंवा मानाची तलवार मिळवत असे. हे बहुमान हेवा वाटावा असे असत.

कॅडेटस् कवायतीसाठीं मैदानांत आले कीं सर्वांत उंच मुलगा उजवीकडे व सर्वात बुटका डावीकडे असे रांगेत उभे रहावें लागे. 'कंपनी सार्जंट मेजर' मग अधिकार सूत्रें हातीं घेई. तो ओरडे, 'कंपनी– अटेन्ऽऽऽ शन्' पाठोपाठ हुकमी शब्दांचे मोहोळ उठे– 'बाय दि राईट्-- क्विक् मार्च... लेफ्-- राय्ऽऽ लेफ्... राय्ऽऽऽ' मध्येंच सार्जंट मेजर ओरडे-- 'अहो तुम्ही ! आतां जागे व्हा देवा !– हलूं नका !– अहो तुम्हांला सांगतोय...

हलू नका ! ! ' पुन: सुरू होई— ' लेफ्... राय् ऽऽऽ ' मग सगळ्यांकडे एक तिरस्कारयुक्त कटाक्ष टाकून, लांबटांग्या परंतु ताठ यष्टीचा देखभाल्या ओरडे— ' समोर पहा– माना खाली कशाला घालताय– सरळ बघा– हात हलूं देत, छाती पुढें हवी— लेफ्--राय ऽऽ लेफ्– राय ऽऽ... ' जरा कुठें कंपनी ताळ्यावर आली कीं तो म्हणे– ' ठीक आहे– छान आहे– ' आणि एकदम सांगे– ' कंपनी– हॉल्ट ! '

अशा इझ्नावारी कवायती चालत. दिवसांमागून दिवस जात. आज्ञेचा शब्द निघाल्याबरोबर आज्ञेप्रमाणें हालचाल करण्याची संवय हाडामासांत भिनत जात होती.

सार्जंट मेजर हा, समोरचा कॅडेट कुठल्या थोर घराण्यांतला आहे की काय याची पर्वा करीत नसे. या कॅडेटस्मधून उत्तम अधिकारी नेते निर्माण करण्यासाठीं तो आपलें काम चोखपणें करीत असे. परेडच्या मैदानावर– सुरवातीला तो आम्हांला ' सर ' वगैरे म्हणे. परंतु शेवट बहुधा शिव्यांनीं होत असे !

कांही वॉरंट ऑफिसर्स, दोन रांगातील पावलें मोजतांना एक, दोन, तीन, चार असे न मोजतां एस, किंग, क्वीन, जॅक (एक्का, राजा, राणी, गुलाम...) असें मोजीत असत. त्यांत थोडेसें नाविन्य. अशा प्रकारें अधिकाऱ्यांच्या बऱ्याच तऱ्हेवाईक गोष्टी असत. त्यांजकडे सोपवलेलें काम तें जीव ओतून करीत व ते करीत असतांना वरचा तपासणी अधिकारी हजर असला तरी ते दबून जात नसत.

ब्रिटिश समाजांतील निरनिराळ्या स्तरांतून सँडर्स येथें उमेदवार येत असत. कुणी लॉर्ड, ड्यूक किंवा राजघराण्यांशी संबंधित असत. ॲटन्, हॅरो, वेलिंग्टन येथील मुलेंहि असत. यांतील कुणी सरकार वाड्यांतील घोडेस्वार पथकांत तर कुणी इतर आघाडीच्या पथकांत दाखल होऊं इच्छित असत.

माझ्या असें कानावर आलें कीं, चर्चिल यांना सँडर्स मध्यें प्रवेश मिळण्यापूर्वीं तिनदां ठोकरा खाव्या लागल्या. मॉंटगोमोरी याला तर सरळ प्रवेश न मिळाल्यानें, खाजगी खर्चानें या कॉलेजचा अभ्यासक्रम करावा लागला. यामुळें मी इथलें जीवन व अभ्यासक्रम आरामाचा आहे असें समजत नव्हतो.

अर्थात जे इथें चमकले ते पुढील जीवनांत यशस्वी ठरलेंच असेंहि नाहीं. उलट जे इथें फारसे यशस्वी ठरले नाहींत, अशापैकींच कांहींनीं पुढील आयुष्यांत नांव केलें. याचे कारण ज्यांनीं युद्धांत पराक्रम गाजवून मानचिन्हें मिळवली, त्यांनाच सैन्यांत तेवढ्या कारणानें वरच्या जागा मिळतात असें नाहीं. वरच्या अधिकारावर काम करूं लागतांच त्यांच्या खांद्यावर इतर बऱ्याच प्रकारच्या जबाबदाऱ्या येऊन पडतात व या यशस्वी पार पाडाव-याच्या तर अंगी बरेच गुण असावे लागतात.

शारीरिक शिक्षणांत दोरीवरून चढणें, बहालांवरून चढणें असें कांहीं सोपेसुपें व कांही गुंतागुंतीचें शिक्षण असें. एकत्र काम करण्याची संघवृत्ति या शिक्षणानें उत्पन्न होत असे.

घोड्यावर बसणें मी पूर्वींच शिकलेलों असल्यानें मला रपेटीला मजा वाटे. मी गोल्फ् ही खेळायला शिकलो. परंतु मायदेशी परतल्यावर मात्र हा महागडा खेळ मी सोडला.

प्रत्येक सहामाहीच्या शेवटी जुन्या व नव्या इमारतींतील सर्व कॅडेटस् एकमेकांच्या अंगावर सायकलवर बसून चाल करून जात. खूप आरड्या-ओरड्यांत हा कार्यक्रम होई. यांत अनेकांना लागत असे, परंतु यामुळें उमेदवारांना मागचा पुढचा विचार न करतां अंगावर चालून जाण्याचा धडा शिकायला मिळत असे. या दिवशीं ज्या कुणी उमेदवारानें कुचराई केल्यानें, एखाद्या संघाला पराभव पत्करावा लागून हातांतली चँपियनशिप गेली असेल, अशा कॅडेटला तळ्यांत ढकलण्यांत येत असे. ही एक सायंकाळ धांगडधिंग्याची व आरडाओरडीची अशी असे.

माझ्या हें निदर्शनास आलें कीं, भारतीयांना जास्तीत जास्त मानाचा हुद्दा लाभत असे तो कॉर्पोरलचा. यापेक्षां वरची जागा त्याला उपलब्ध नसे. इतरांना मात्र वरच्या जागा मिळूं शकत. सँडर्स सारख्या मोठ्या लष्करी विद्यालयांत असा पक्तिप्रपंच असावा ही मोठी विचित्र गोष्ट होती.

त्या वेळीं इंग्लंडचे राजपुत्र प्रिन्स ऑफ वेल्स ज्या प्रकारची गवती टोपी घालत असत, अशी टोपी अनेक कॅडेट वापरूं लागले व ती फॅशनच पडली. मीसुद्धां तशी एक टोपी आठवड्याच्या सुटींत लंडनमध्यें गेलो असतां

तेथें विकत घेतली व ती घालूनच सँडर्सला परत आलो. एका ब्रिटिश अंडर ऑफिसरनें मला ही हॅट घालून आलेला पाहतांच तो ओरडला—

'तुला ही हॅट घालतां येणार नाहीं!'

'इतके जण घालतात! मग मीच कां घालूं नये?' मी उलट विचारलें.

यावर तो खेकसला– 'मी सांगतो म्हणून!'

मला कांहीं कळण्यापूर्वीच त्यानें माझी हॅट उडवली व पायाखाली तिचा चोळामोळा करून टाकला. त्याच्याच शेजारी दोन ब्रिटिश पोरं उभी होती, ती फिदीफिदी हंसली.

'आतां खड्ड्यांत जा!' अंडर ऑफिसर ओरडून म्हणाला.

मी माझा राग गिळला. परतु अपमानानें मी रडायच्या बेतांत आलो होतो. पण या गोष्टीचा सूड दोनच दिवसांनी घेतां आला. दोन दिवसांनंतर कॅडेट वाघेलसिंग व मी आमच्या खोलींत हर्मोनियम वाजवीत बसलो होतो. मी बाजाची पेटी भारतांतून निघतांना बरोबर आणली होती. सायंकाळीं कधीं हार्मोनियम मोठ्यानें वाजूं लागला की ब्रिटिश कॅडेट बोंबलूं लागत, कारण ते मृदू आंग्ल संगीतावर यावेळीं गाणी म्हणत असत. सायंकाळच्या जेवणासाठी जो वेळ ठेवला होता त्यांतली ही वेळ होतो. आम्ही आमच्या सोयीनें जेवायला जाणार होतो. मी पेटीवर मोठ्यानें भारतीय गाणीं म्हणत होतो. मला माहीत होते कीं यामुळें गडबड उडणार, पण मला तेच हवे होते. ज्या अडर ऑफिसरनें माझी हॅट पायाखाली तुडविली होती त्याची खोली आमच्या शेजारीच होती आणि अपेक्षेप्रमाणें तो चिडून बाहेर आमच्या खोलीपाशीं आला.

'बंद करा ही कटकट!' त्यानें हुकूम सोडला.

या वेळीं माझा मित्र वाघेल माझ्याजवळ असल्यानें मी त्याच्याकडे ढुंकूनहि न पाहतां वाजवीत राहिलो. त्यामुळें तो सतापला.

'वाजवायचें बद झालें नाहीं तर मी तें वाद्य उचलून खिडकींतून फेकून देईन...' त्यानें धमकी दिली.

आम्हीं दोघें उठलोच. वाघेल यानें मला डाव्या हातानें दूर करून आवेशानें त्या इंग्रजाच्या दिशेने पावलें टाकलीं.

'हलकट माणसा, जर तोंडांतून आणखी शब्द काढशील तर या खिडकींतून मी तुलाच फेकून देईन—' वाघेलनें असा चमकावतांच तो अंडर ऑफिसर समजला कीं, मामला कठीण आहे. त्याचें सगळें अवसान गळालें. कारण त्याला वाटलें हा बॉक्सर आपला जीव घेतो कीं काय! जास्त शहाणपणा करण्यांत अर्थ नाहीं, एवढें शहाणपण नेहमींप्रमाणें त्याला सुचलें व तो दांडगा निघून गेला.

कांही दिवसांनंतर एक ब्रिटिश कॅडेट माझ्या खोलींत घुसला व म्हणाला—

'गांधींविषयी मला काय वाटते तें माहीत आहे?'

मला प्रश्न विचारणारा हा उपटसुंभ कोण हेंच मला कळेना. मी म्हटले, 'नाहीं बुवा!'

कुचेष्टेनें गाणें म्हणावें तसे तो गाऊं लागला—

'Oh, this Gandy, his legs are bandy' (गांडी रे गांडी, त्याची तंगडीत तंगडी' असें कांहीं अर्वाच्य.)

मी संतापानें लाल झालो. जीझस् ख्राइस्ट याच्या संबंधीं असली पोरकट कुचेष्टा ऐकतांना इंग्लिश कॅडेटला असेंच वाटलें असतें. परंतु मी जागेवरून उठेपर्यंत धाडकन् दरवाजा लोटून तो पळाला. वाळलेल्या गवताच्या गंजींत पडलेली टांचणी अदृश्य व्हावी तसा तो दृष्टीआड झाला.

एखाद्या कॅडेटला जर किंग्ज कॅडेटशिप ही मिळाली, तर या बहुमानाबरोबरच बरेच पैसेहि मिळत असत. मला वाटलें होतें कीं, माझ्या वाट्याला ही गंगा कधींच येणार नाहीं. कारण सँडर्सला आल्यापासून माझी कुणाकुणाशी बाचाबाची चालूच होती. परंतु एक दिवशीं युद्ध खात्याकडून मला पत्र आलें व हें पारितोषिक मला देण्याचें ठरविण्यांत आल्याचें मला कळविण्यांत आलें. मोठीच सुखद बातमी होती. एका फटक्यांत या पैशांमुळें मी भारतांत काढलेल्या कर्जांतून मुक्त होणार होतो. मी स्वत: हें कर्ज फेडायचें म्हटलें असतें तर किती तरी वर्षें लागलीं असती. कारण मिळणाऱ्या पगाराच्या मानानें माझ्या जबाबदाऱ्या मोठ्या होत्या. अशा रीतीनें ब्रिटिशांची न्यायबुद्धि मोठ्या सुखद रीतीनें मदतीला धांवून येत होती!

उन्हाळ्याची सुटी दोन महिन्यांची असे. या काळांत सर्वजण आपापल्या

घरी जात असत. भारतीय कॅडेटस, मात्र कुणी लंडनला तर कुणी पॅरिसला तेथील आराम सदनांतून राहून सुटी घालवीत. खेळ खेळावे, मजा करावी अशांतच ही सुटी संपे. मला डोंगर दऱ्यांचा नाद असाल्यानें मी स्कॉटलंड मधील एका छोटया सुंदर खेडयांत सुटी घालविण्यासाठीं गेलो. पिट्लडॉक्री या नांवाचा हा पहाडी मुलूख होता. तेथें पोचलें कीं जगाशीं संबंध तुटल्या-सारखा वाटत असे. माझ्या व्यतिरिक्त त्या ठिकाणीं सुरवातीला आणखी दोन पाहुणे आलेले होते. मॅकी नांवाचा एक उतार वयाचा स्कॉच व त्याची बायको. जवळ जवळ ओसाड पडलेल्या नॉकेनडारॉश् नांवाच्या एका बोर्डिंगांत आम्ही उतरलो होतो. दुसऱ्याच दिवशी या स्कॉच दांपत्याच्या दोन्ही मुली मार्गारेट व एना, या पंधरा दिवसांच्या सुटीवर तेथें आल्या. एना ही अवखळ व उत्साहानें सदा भरलेली असे, या उलट मार्गारेट होती. मार्गारेट रेखीव होती,तिची चाल पाहात राहावी अशी असे,लवचिक बांध्याची नाजुक हातांची ही मुलगी काहीशी अबोल होती. रेशमासारखे मऊ सोनेरी केस तिला लाभले होते. आम्ही दोघं एकत्र खात पीत असूं व आसपासच्या टेकडयांवर सहली काढत असूं. आम्ही एकमेकांच्या सहवासांतील प्रत्येक क्षण मजेंत घालवला. पुष्कळ वेळा नॉकेनडॉशच्या मऊसर हिरवळीवर एक-मेकांना आठवणी सांगत पडून राहाण्यांत आमचा वेळ जाई. आम्ही एक-मेकांवर मूक प्रेम करूं लागलो होतो यांत शंका नव्हती. परंतु उच्चार होत नव्हता. मला यापूर्वी इतके कुणीच झपाटून टाकलेलें नव्हते व या अवस्थेंत माझा इतर गोष्टींकडे पाहाण्याचा दृष्टीकोनहि बदलूं लागला होता. आकाश अधिक निळें भासें, तारे अधिकच चमकदार वाटत व आसमंतातलें संगी-तहि मला ऐकूं येऊं लागलें होतें. वाऱ्यावरून फुलांचा सुगंध तरंगत यावा तशी मार्गारेट माझ्या आयुष्यांत आली होती. बायरननें माझी ही मनस्थिति आपल्या कवितेच्या एका कडव्यांत चांगली व्यक्त केलेली आहे.

ती जीवन त्याचें
तीच सागर—
विचार-तटिनी संथ वहाते, जिथें संपतें.
कांहीं न झुरते !

काळ भराभर गेला. अशा वेळी दिवस असेच कापरासारखे उडून

जातात. मॅकी कुटुंब जायचा दिवस जवळ जवळ येऊं लागला. त्या आधींच एका रात्री मी घाईघाईनें कागदावर मार्गारेटला चिठ्ठी लिहिली. त्या दिवशी रात्री, ती मला एकटी पांच मिनिटे भेटूं शकेल कां अशी विचारणा मी त्या चिठ्ठींत केली होती. माझ्या मनांत जो विचारांचा संघर्ष उडाला होता तो तिला सांगावा, मी माझे प्रेम का व्यक्त करूं शकत नाही हें तिला सांगावे यासाठीं मी उत्सुक होतो. त्या दिवशीं सायंकाळींच मी तिच्या खोलींत गेलो व तिच्या उशीखाली ती चिठ्ठी गुपचूप ठेवून मी परत आलो. परंतु घोटाळा झाला. तिचा बिछाना सारखा करण्यासाठीं मोलकरीण आली व तिनें ती उशीखालची चिठ्ठी मार्गारेटच्या आईवडिलांच्या हातांत दिली ! या प्रकारानंतर त्यांनीं तसा तमाशा वगैरे केला नाहीं पण तिच्या आईवडिलांच्या वागण्यांतून तें स्पष्ट झालें आहे हें माझ्या लक्षांत आलें. दुसऱ्या दिवशी त्यांना निरोप द्यायला मी स्टेशनवर गेलो. अगदी निघण्यापूर्वी मॅकी दंपती माझ्याशी पुन: सलोख्यानें बोलूं लागली इतकेंच नव्हे तर पिट्लॉकी येथें एकट्यानें राहण्यापेक्षां उरलेली सुटी मी त्यांच्या 'ब्रॉटीफेरी' या गांवी घालवावी, सेंट अँण्ड्र्यूजचे जवळचे चर्चही पहातां येईल व स्कॉटलंडमधील इतर स्थळेंहि पहातां येतील असा आग्रह त्यांनीं केला. मला आग्रहाची काय जरूर होती ?' पाठोपाठी डंडी जवळील त्यांच्या ब्रॉटी फेरी या निवासांत मी दाखल झालो. त्यांच्या घराचे नांव होते 'चिमो.'

मार्गारेट व मी या वास्तव्यांत बाजारहाट करीत होतो, सिनेमा पाहात होतो व तिनें मला बर्फावरचे स्केटिंगहि शिकवलें. 'ऱ्ही' नांवाचें स्कॉटिश नृत्यहि मी तिच्याजवळ शिकलो. (हेंच नृत्य कमिशन मिळालेल्या अधिकाऱ्यांना 'राजपुताना रायफल्स' या सैन्यविभागांत शिकावें लागते असें पुढें माझ्या लक्षांत आले.) रॉबी बर्न्सची कांहीं गाणीं तिनें शिकवलीं. आम्ही बहुतांशी एकत्र असूनहि आमच्यासंबंधी आम्ही क्वचितच बोलत असू. कदाचित मीच कांहीं प्रथम बोलावें याची ती वाट पाहात असेल.

एक दिवशी आम्ही दोघेच घरांत होतो. दिवस थंडीचा होता व बैठकीच्या खोलींतल्या दिवाण-शेगडीत निखारे फुललेले होते. या भिंतीतील शेगडीजवळ एका छोट्या स्टुलावर माझ्या शेजारीं मार्गारेट बसलेली होती.

'तुला कांहीच बोलावेसे वाटत नाही कां ?' ती हळू आवाजांत म्हणाली.

मी अडखळत म्हणालो--

'मला... खूप खूप बोलायचे आहे...'

'मग थांबला आहेस कां ?' तिनें उत्सुकता लपवली नाहीं. तीच पुढें म्हणाली,

'हें बघ बिज, आपण आज रात्रीं नृत्याला जाऊं या का ? तुझ्या मनांत जें साचलें आहे तें आपण एकत्र नृत्य करूं लागलो, कीं सांगणं कदाचित तुला सोपं जाईल—'

'तुझ्याबरोबर नृत्य करायला मला आवडणार कां नाहीं मार्गारिट ? पण मला नृत्य येत नाहीं...'

'चल रे ! मी आज रात्रीं शिकवते तुला. आहे काय त्यांत ? संगीतावर पावलं टाकायची संवय तर तुला आहेच—' ती म्हणत होती.

माझ्या कपाळाच्या शिरा थडाथडा उडत होत्या. हृदयाचे ठोके वाढले होते. आम्ही उठलो व जायला निघालो, तोंच दारावरची घंटा घणघणली. तिचे आईवडील अपेक्षेपेक्षां लवकर परतले होते. वडिलांना एकदम बरें वाटत नाहींसें झालें होतें व तेथील मुक्काम हलवून घरी जाण्याचा त्यांचा विचार ठरला होता. आम्ही दोघं बाहेर पडणें आता शक्यच नव्हतें. मार्गारिट मला नृत्य शिकवणार नव्हती, निदान त्या दिवशी तरी ! थोड्याच वेळानें आम्ही निरोप घेतला व आपआपल्या खोल्यांत निजण्यासाठीं गेलो. माझी मन:स्थिती अतिशय तापलेली होती. मी ठरवले कीं, मार्गारिटनें पहिलें पदन्यास शिकवल्याखेरीज नृत्य शिकायचेंच नाहीं व आजपर्यंत मी खरोखरच नृत्य शिकलेलो नाहीं. मी तिला त्याच रात्रीं एक प्रदीर्घ पत्र लिहिलें. त्यांत तिला कळवलें होतें. की, मी उत्तर रात्रींच लंडनला निघून जात आहे. तिचा निरोप न घेता जाणार आहे, कारण ती निद्रेंत आहे. मी त्या पत्रांत मला तिच्याविषयी निर्माण झालेल्या आकर्षणाची कबुली दिली व माझ्या मानसिक ओढाताणीची कल्पना दिली. कांही गोष्टींमुळें मला तिच्यापासून दूरच राहावे लागते आहे हें मी तिला सांगितलें. माझें तिच्याशी वागणें म्हणजे केवळ तिच्याशीं खेळणें नव्हतें याची मी तिला ग्वाही दिली...व यापुढें मी तिची

प्रणयाराधना करीत राहिलो, तर पुढचे आयुष्य मला तिच्याबरोबरच काढले पाहिजे ही गोष्टहि कबूल केली. पण इथेंच सर्व अडचणी होत्या. यामुळें तिची परिस्थिति चमत्कारिक होणार होती.माझें कुटुंब मोठें होतें व त्यांची जबाबदारी माझ्यावर होती. याचा आर्थिक बोजा इतका होता कीं तिच्यावर अन्याय होणें अटळ होते. माझे तिच्यावर इतकें प्रेम होते कीं मला तिला सुखी करतां आलें नसतें, तर तें योग्य होणार नव्हतें. शिवाय भारतांत ब्रिटिशां-विरुद्ध जो झगडा चालू होता, त्याचें स्वरूपहि उग्र होत होतें. ती ब्रिटिश असल्यानें या परिस्थितीची झळ तिला लागणें अटळ होते. बऱ्याच प्रसंगीं तिची कुचंबणा झाली असती. या सौद्यांत पुढें येणाऱ्या अतर्क्य प्रसंगांत तिची होरपळ झाली असती व हें मला नको होतें. माझें प्रेमपुष्प उमलण्यापूर्वीच यासाठीं खुंटणें आवश्यक होते; कारण माझ्या स्वार्थासाठीं हें प्रेम वाढू देणें इष्ट नव्हत. जड अंत:करणानें मी पत्र बंद केलें व तिच्या खोलीच्या दाराच्या फटींतून तें आंत सरकवून, अगदी पहांटे मी त्या घराचा निरोप घेतला. यानंतर माझ्या लाडक्या मार्गारेटचें दर्शन मला पुन: झालेलें नाहीं. यामुळें माझें मन पिळवटले गेले, तरी झाले हेंच ठीक झालें.

लंडनला पोचल्यावर मार्गारेटचे उत्तर आलें. तिनें माझ्या भावनांना प्रतिसाद दिला व निरोपहि न घेतां अशा तऱ्हेनें गुपचूप निघून गेल्याबद्दल तिनें माझी प्रेमळ कानउघाडणी केली होती.

माझ्या पुढील जीवनांत मार्गारेट माझ्या आसपास अनेक वेळा आली परंतु प्रत्यक्ष भेटली नाहीं. आकाशांत इंद्रधनुष्याची कमान पसरावी परंतु त्याला स्पर्श मात्र करतां येऊं नये असें घडलें.

अजून माझी थोडी सुटी शिल्लक होती. मी मग युरोपांत गेलों. पॅरिस, व्हेनिस, नेपल्स, बर्लिन, बुडापेस्ट येथील संगीतांत आणि सौंदर्यस्वादांत रंगून जाऊन, मार्गारेटच्या आठवणी व तिची प्रतिमा यांपासून दूर पळण्याचा हा प्रयत्न होता.

सँडर्सच्या अभ्यासक्रमांत मी पुन: दाखल झालों. एक टर्म संपली. दुसरी आली. मी हळूहळू सैनिक बनत होतो. दुसऱ्या सहामाहींत कंपनी कमांडर मेजर हॉर्टन यानें माझ्या अहवालांत लिहिलें–

'या अधिकाऱ्याजवळ कर्तृत्व आहे. याची वागणूक चांगली आहे. याचें व्यक्तित्व व स्वभाव नजरेत भरतो. आत्मविश्वासू व हौशी आहे. काम चांगले आहे. हुषार आहे. पुढे नांव काढील. या दृष्टीनें ही सुरुवात समाधानकारक आहे. खेळांतही प्रवीण आहे.'

अखेर शेवटच्या सहामाहीचे अखेरचे दिवस आले. सेकंड लेफ्टनंट या हुद्द्यानिशीं जुलै १९३३ मध्यें झालेल्या भव्य 'पासिंग आउट परेड' मध्यें मी विद्यालयांतून बाहेर पडलों.

मी सँडर्स येथें पुष्कळ कांही शिकलों. वागण्याचे नियम, शिस्तीची संवय आणि अभिमानाचे स्वारस्य हीं सर्व माझ्या ठिकाणीं आलीं. अभिमान हा माणसाच्या अंतर्यामीं असावा. माणसाच्या सद्सद्विवेक बुद्धीसारखा तो आंत असावा. याशिवाय माणसानें जगू नये. कांहीं मुलभूत तत्वांची अशी एक सांहिता तिथें शिकतां आली, कीं ज्याच्या अनुरोधानें योग्य काय तें ठरवतां येऊं लागलें. लष्करी ज्ञानाचीं मुळाक्षरें आत्मसात झालीं. आमच्या व्यवसायांतल्या खांचाखोंचा समजल्या. सुखकारक आणि क्लेशकारक प्रसंगाला सारख्या वृत्तीनें कसें तोंड द्यावें, हें समजलें. नेतृत्वाच्या गुणांची ओळख झाली. अनेक मूल्यांचा अर्थ ध्यानांत आला. स्वदेशाची निस्वार्थ बुद्धीनें व निष्ठनें सेवा करण्यांत सन्मान आहे हें मनावर ठसलें.

इंग्लिश माणसांच्या गुंतागुंतीच्या स्वभावाची चांगली ओळख मला आतां झालेली होती. इंग्लिश माणूस वेस्टमिनिस्टर अॅबेच्या परंपरा मिरवित जगतो कसा, राजघराणें, पार्लमेंट यावर त्याचा किती पूर्ण विश्वास आहे व नि:पक्षपातीपणा व त्याग या विषयींच्या त्याच्या कशा खास कल्पना आहेत, हें मला समजून आलें. त्याच्या समजुतीशी सुसंबद्ध नसलेली एखादी गोष्ट घडली, तर तो वेळोवेळीं गांगरून जातो. ठरलेली शाळा, ठरलेलें विश्वविद्यालय, ठराविक क्लब व ठराविक शब्दोच्चार असले कीं तो खूष. मग जीवनांत त्याला कशाची उणीव भासत नसे. मीठ लावून वाळलेल्या मासळीवर तो निर्वाह करतो व हातातल्या मद्याच्या द्राक्षांची जात त्याला ठाऊक असते. 'पंच' आणि 'टाईम्स' वाचणें ही त्याची आवडीची गोष्ट आणि 'बी. बी. सी' चा मोठा अभिमान. 'बी. ओ. एसी.' आणि 'रोल्स-रॉयस्' हीं आणखी दोन अभिमानाचीं स्थानें. नेल्सनचीं दलें, पिकॅडली, लंडन

टॉवर, विम्बल्डन, वेम्बले आणि लॉर्डवरचे कसोटी सामने यांचे इतिहास त्याला मुखोद्‌गत् असतात. इंग्लिश माणसाला हें शिकवलें जात होतें कीं खेळ खेळायचा तो जिकण्यासाठीं वा हरण्यासाठीं नसून--व्यायामासाठीं खेळ खेळायचा असतो.

इंग्लिश माणूस सहसा कुणाच्या भानगडींत पडणार नाही व एकटा एकटाच राहील. आगगाडींत किंवा बसमध्यें कुणी परदेशी पाहुणा असला तर कुणाशीं मैत्री होणें दुरापास्तच. बारमोरल, बकिंगहॅम राजवाडा, घोड्याच्या शर्यती, कुत्री आणि जॉनी वॉकर हें मद्य यावर त्याचं खास प्रेम असतें. हाईड पार्क मधल्या एकांड्या वक्त्याचें वक्तृत्व त्याला चालूं शकते. आपल्या नाट्यसृष्टीचा त्याला सार्थ अभिमान असतो. शेक्सपिअर हा सर्व जगताचा असूं शकेल हे तो मान्य करतो.

आतां मला कळून चुकलें, कीं इंग्लिश माणसाला ' जॉन बुल ' कां म्हणतात व त्यांचे राष्ट्र इतके सुसंघटीत का आहे.

परततांचा माझा प्रवास चांगला झाला व मी पुनः मायदेशीं आलों. फ्रांटियर मेल स्टेशनांत पुरती थांबण्यापूर्वीच आईला पुढें घुसतांना मी पाहिली. इतक्या दिवसानंतर मला पाहतांना ती अगदीं आनंदून गेली होती. जणू युगानंतर आम्ही भेटत होतो, अशी प्रश्नांची सरबत्ती तिनें सुरू केली. तिकडच्या हकिगती ती विचारत होती. हरवलेले मित्र बऱ्याच कालांतरानें भेटावे तसें आम्हांला वाटत होतं. माझे भाऊ व बहीण हीं सावत्र असलीं तरी मला ती कधींच सावत्र वाटलेली नव्हती. बाबू, टॉमी आणि नानी तर मला पाहतांच उड्या मारूं लागली. माझ्या लष्करी गणवेषाकडे आई अभिमानानें नजर खिळल्यासारखी पाहात होती. त्या दिवशीं रात्रीं आम्ही किती तरी वेळ बोलत होतो.

आतां वर्षभर मला ब्रिटिश तुकडींत अधिकारी म्हणून वावरावयाचें होतें इंग्लिश लोकांना वाटत असें कीं भारतीय लोकांजवळ नेतृत्वाचें गुण नसतात. ब्रिटिश सैन्याचें सोडा पण कुठल्याच सैन्याचें नेतृत्व म्हणूनच त्यांना करतां येणार नाहीं. अधिकारी म्हणून राहायला आम्ही लायक आहोंत कीं नाहीं अशी त्यांना शंका असे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें आमची मनेंच न्यूनगंडानें पछाडलेलीं होतीं. विमानांची गुंतागुंतीची रचना, टॅंक किंवा

बंदुका चालवणें, या युद्धांतील कठीण गोष्टी आम्हांला जमण्यांतल्याच नव्हत्या. लॉर्ड एलिनबरोनें १८३३ मध्यें सांगून ठेवलें आहे त्याची आठवण अशा वेळी मला येई. त्यानें सांगितलें होतें कीं भारतांतील ब्रिटिशांचें अस्तित्व अबाधित राहायचे तर भारतीयांना लष्करापासून व राजकीय सत्तेपासून दूर ठेवलें पाहिजे.

अशा या ब्रिटिशांची चाकरी मला करावयाची होती. व्यक्ति म्हणून ही माणसें उत्तम होतीं. तरी त्यांचें भारतांतलें राज्य लवकरांत लवकर संपुष्टांत आलें पाहिजे. आपणच आपल्या देशाचें राज्य चालवलें पाहिजे, याबद्दल माझ्या मनांत शंका नव्हती.

अशा कांहींशा आव्हानात्मक विचारसरणींतच मी 'इस्ट सरे' रेजिमेंटच्या क्रमांक एक या बटालियनमध्यें नोकरीसाठीं रुजू झालों. ही तुकडी लाहोर येथें 'बर्डवुड बरॅक' मध्यें होती. साल होतें १९३३. मी एकवीस वर्षांचा होतो व नव्या जीवनाच्या उंबरठ्यावर उभा राहिलो होतो.

सर्वच भारतीय सेनाधिकाऱ्यांना एक वर्ष ब्रिटिश बटालियनमध्यें काढावें लागत असें. माझ्या कमांडिंग ऑफिसरचें नांव होतें लेफ्ट. कर्नल शोमबर्ग. मध्यम वयाचा हा माणूस शिस्तीचा मोठा भोक्ता होता व लष्करी परंपरेचा उपासक होता. साशंकपणेंच त्यानें माझें स्वागत केलें. नव्या आलेल्या प्रत्येकाशीं सुरुवातीला असेंच वागण्याची त्याची पद्धत होती.

प्रत्येक ब्रिटिश तुकडी ही एक उत्तम संस्था आहे. खानदानी परंपरेच्या कुटुंबासारखे इथे असे. कमांडिंग ऑफिसर हा या तुकडीचा आई बाप सारें कांहीं असे. त्याचा शब्द हा कायदा व तो तुकडीचा अनभिषिक्त राजा अशी परिस्थिति असे. त्याचे निर्णय हे अचूक समजले जात. आम्हां सर्वांस तो भव्य असा कुणी वाटे. त्याला आम्ही प्रत्यक्ष क्वचितच् पाहात असू. त्याचा नजिकचा खालचा अधिकारी हाच खरा अधिकारी. जेवण व्यवस्था, बँड पथक, हिशोब वगैरे सर्व गोष्टी हाच पाहात असे. या नंतरचा अधिकारी म्हणजे अॅड्ज्युटंट. याला कांही खास अधिकार असत. महत्त्वाचे समारंभ व कवायती या संबंधी सर्व हा पाही व याचा कनिष्ठांना मोठा वचक असे शिस्तीचें पालन नीट होतें आहे कीं नाहीं, हें पहाणें याचें काम असल्यानें या कामीं तो बहुधा अप्रिय झालेला असे. कॅप्टनच्या हुद्द्याखालील कमिशन

घेतलेल्या अधिकाऱ्यांत दोन भाग असत. सीनिअर व ज्यूनिअर. वरिष्ठ व कनिष्ठ. परंतु सेवेच्या कालानुसार यांतला वरिष्ठ हा सात ते पंधरा वर्षें नोकरी झालेला असे. यांना वरची जागा मिळायची ती वर मोकळी जागा झाली तरच—केवळ वेतनश्रेणींत वाढला म्हणून नव्हे. यामुळें हें वरिष्ठ गटांतले लोक पुष्कळ वेळां नाउमेद झालेले असत व सर्व कनिष्ठ गटांतल्या लोकांना त्रास देण्याची त्यांची विघ्नसंतोषी वृत्ती असे.

आम्हांला पुष्कळ अलिखित नियम पाळावे लागत. कवायतीसाठीं पांच मिनिटें आधींच मैदानावर येणें, वरिष्ठ अधिकाऱ्यांना उलट जबाब न देणें व वाद न घालणें, अमुक शिक्षा करीन अशी धमकी न देत बसतां शिक्षा करून टाकणे, आपल्या पथकाचा पुरेसा इतिहास व चालिरिती ठाऊक असणें, अशा या गोष्टी असत.

कनिष्ठ गटांतल्या कमिशन मिळालेल्या अधिकाऱ्यांना सार्वजनिक भोजनालयांतच जेवावें लागे व वरीष्ठांची सेवाही करावी लागे. अठराव्या शतकांत सुरू झालेलीं हीं भोजनगृहेंच त्यांची घरें होत असत. भोजनालयांत लवकर यायचें व जायची घाई करावयाची नाहीं अशी अपेक्षा असे. यांत कसूर झाली तर दुसऱ्या दिवशीं सकाळी बोर्डावर जावें लागे. होणारी शिक्षा ही हंसण्यासारखी नसे.

प्रत्येक ब्रिटिश बटालियनच्या भोजनगृहांतील चालिरीती वेगवेगळ्या असत. कुणी मद्य घेतांना उभे राहून राजाचें आयुरारोग्य चिंतीत तर कुणी बसून. कांहीं तुकड्यांत तर ही पद्धतच नसे.

'बी कंपनी' मधील सहाव्या प्लॅटूनचें नेतृत्व मला देण्यांत आलें होतें. या तुकडीची सैनिकसंख्या किती आहे, कोणत्या वंशवर्गांतले लोक यांत आहेत, इत्यादि गोष्टींप्रमाणें प्रत्येक सैनिकाबद्दल तपशीलांतील कांहीं माहिती मला असणें अपेक्षित होतें. मी या तुकडीपुढें व्यक्तिगत आचरणांत व सैनिकी व्यवहारांत मोठा आदर्श म्हणून राहाणें मला आवश्यक असे. या दृष्टीनें यशस्वी होण्याची धडपड करतांना, मला माझ्या आयुष्याचें वाढलेलें महत्त्व व जीवनाला लाभलेलें कांहीं प्रयोजन, याचा अनुभव घेतां येत असे.

बहुतेक अधिकारी हे सायकली वापरीत असत. कमांडिंग ऑफिसरजवळ मात्र कधीं कधीं मोटारगाडी असे. अर्थात ही मोटारगाडी बहुधा दुसऱ्या विक्रीची–सेकंड हॅन्ड शिथिलगात्री अशी असे. हजार-बाराशेंत मिळालेली. एक दिवशी मी मोटार सायकल विकत घेतली व दुपारच्या जेवण्याच्या वेळेला, मी तीवर बसून भोजनगृहाच्या कंपाउंडमध्यें मजेंत आलो. तिचा आवाज कानांवर जातांच कमांडिंग ऑफिसर जेवणगृहांतून धावत बाहेर आला. तो वाचत असलेलें वृत्तपत्र त्याच्या हातांत तसेंच होतें. संतापानें लाल झालेला तो अधिकारी ओरडला–

'कुणाच्या परवानगीने आपण हें वाहन घेतलेंत ?'

मी असा काय मोठा भ्रष्टाकार केला तेंच मला कळेना.

'पुन: यावर बसून फिरतांना तूं दिसता कामा नयेस. ऐकूं येतंय कीं नाहीं ? वाहनच हवें असेल तर घोडा घे.'

अर्थात यापुढें बोलणें शक्यच नव्हतें. निदान त्या दिवसांत तरी ! शिस्त अशीच भिनत होती.

आम्ही कुणाकुणाला थोडा वेळ भेटलो तरी चालेल अशा व्यक्तींची एक खास यादी बटालियननें तयार केलेली असे. यांत मुलकी व लष्करी नोकरीतील 'योग्य' ते ब्रिटिश व भारतीय सज्जन अंतर्भूत केलेले असत.

फलटणींतला दिवस सकाळीं कवायतीनें किंवा निशाणबाजीनें सुरू होत असे. नंतर कार्यालयांत जायचें, तिथें जवानांची प्रगतिपत्रकें तपासायची. निशाणबाजीचे निकाल पाहायचे, कुणाची रजा, कुणाची कपड्यांची मागणी, गुन्हे चौकशी, मान पदकाची व बक्षिसांची योजना, अशी अनेक कामें असत. जवानांचे खेळ सामान-सुमान आहे–नाहीं पाहाणें, खेळांत भाग घेणें या गोष्टीहि असत. यांतच वेळ काढून जेवण घ्यायचे असें.

उन्हाळ्यांत प्रत्येकाला खास काळजी घ्यावी लागे, कारण ब्रिटिशांना सतत धास्ती वाटत असें कीं कर्कवृत्ताच्या पट्ट्यांतला एखादा रोग गांठील किंवा उष्माघात होईल. अगदीं धार्मिक कर्मकांडाप्रमाणें ब्रिटिश लोक पाणी उकळून पीत; शिप्तरासारखी मोठी टोपी घालत, सारखा बर्फ आसपास ठेवीत. सायंकाळ झाली रे झाली कीं शर्टाच्या बाह्या खालीं घेऊन उघडे हात झांकून टाकीत व झोपतांना कटाक्षानें मच्छरदाणींत झोपत.

पुष्कळदां शनिवारीं मी ब्रिजलाल यांना जेवायला बोलावीत असे. मी सँडर्सला निघालों तेव्हां यांनींच माझ्या हातांत शंभराची नोट सरकवली होती. मी भारतांत परतल्यावर त्यांना विचारलें कीं मी त्यांच्यासाठीं कांहीं करूं इच्छितो. परंतु त्यांनीं उत्तर दिलें कीं आयुष्यांत भरपुर मद्य पिण्यापलीकडे आतां त्यांना कांहींही नको होतें. या प्रकारचें वळण त्यांच्या आयुष्यानें घेतलें, कारण त्यांचा अनेक बाबतींत झालेला भ्रमनिरास. मी त्यांच्या इच्छेप्रमाणें करीत राहिलों. मी वर्षअखेर ब्रिटिश रेजिमेंट सोडून वायव्य सरहद्द प्रांतांत जाईपर्यंत आम्ही असेच भेटत होतो. ते मद्य घेत असतांना मी त्यांच्याबरोबर फक्त थंड पाणी घेत असे व माझी ही संवय त्यांनी चालवून घेतली.

उष्मा सुरू होतांच, गोऱ्या फलटणी, पाहुण्या प्रवाशासारख्या, हिल स्टेशनवर मुक्काम हलवीत असत. आम्ही डागशाई या ठिकाणीं गेलों. कासुली पासून हें ठिकाण सात मैलांवर होतें. या अशा ठिकाणीं, नेहमींच्या इतर गोष्टींबरोबरच आम्हांला डोंगरमाथीं चढून जाण्याच्या शर्यतींत वारंवार भाग घ्यावा लागत असे. दोन दोन हजार फूट उंचीपर्यंत चढून जाणें, आमच्या तंदुरुस्तीसाठीं आवश्यक असे! या मोठमोठ्या शर्यती इतक्या जीव घेणाऱ्या असत कीं त्या जिंकण्याच्या उपद्व्यापांत माझ्या तोंडांतून कधीं कधीं रक्त पडत असे.

माझा मुक्काम डागशाई येथें असतांना श्री. हकसार हे आय. सी. एस्. प्रोबेशनर कासुली येथे नोकरीच्या निमित्तानें आलेले होते. ते व मी कॉलेजांत एकत्र होतो. त्यांची बहीण धनराज किशोरी ही त्यांचे बरोबर राही व ती माझ्यापेक्षा दोन वर्षांनीं लहान होती. ही दिसायला सुंदर होती व तिच्या अंगीं पुष्कळ गुण होते. माझी तिची ओळख होतांच तिच्या सहवासांत मी रमूं लागलों. परिणामीं मी कासुलीला पुनः पुनः खेपा मारूं लागलों. जातांना ठीक असे परंतु येतांना चौदा मैल डोंगराळ मुलुख तुडवीत परतावें लागे. टॅक्सी करून येणें परवडणारें नव्हतें. जातांना दिवस असे, परंतु येतांना बहुधा काळोख पडलेला असे. कधीं कधीं मध्यरात्री मी परत येत असे. अशा अडनीड वेळीं मध्यरात्रीं जंगलाच्या कडेकडेनें यायचें म्हणजे एक थरारक अनुभवच होता. एक दिवशीं मी हकसार यांना विचारलें, कीं मला

त्यांच्या बहिणीशी लग्न करतां येईल कां म्हणून. पहिल्यांदा त्यांनीं सांगितलें कीं तिचें लग्न लहानपणापासून तिचा परिचय असलेल्या कुणाशीं तरी ठरलेलें आहे. कांहीं महिने असेच गेले व मग त्यांनीच मला सांगितलें, कीं तिचा विचार फिरला आहे. माझ्याशीं लग्न करण्याची तिचीही आतां इच्छा आहे.

सेकंड लेफ्टनंट म्हणून मला महिना चारशें पन्नास रुपये मिळत. यांतून मला जेवणखाण्याचा खर्च करून, शिवाय ब्रिटिश फलटणींतील अधिकाऱ्याला शोभेलशा पद्धतीनें राहावें लागे, दीडशें रुपये मला घरीं आईला पाठवावे लागत. तेव्हां तिचे तिकडे भागत असे. मला व आईला या कालांत काट-कसरीनें राहावें लागत होतें. माझें आयुष्य तपस्व्यासारखे होतें व त्यांत चैनीला जागाच नव्हती. आईचा आजार, भावांचें व बहिणीचें शिक्षण व चालू खर्च, या सगळ्याला पुरें पडणें मला शक्यच नव्हतें. मला कर्ज काढावें लागलें. अव्वाच्या सव्वा व्याजानें मी कर्ज काढलें व हा व्यवहार पुढलीं कित्येक वर्षे मला सतावीत राहिला.

या फलटणीतलें जीवन मी फार जवळून पाहिलें. भारतीयांची परिस्थिति त्या दिवसांत कठीण होती. हिंदी अधिकाऱ्यांचा उल्लेख अनादरानें वॉगज् (wogs) असा केला जात असे. वॉगज् म्हणजे आंग्लाळलेले हिंदी महा-भाग ! (Westernised Oriental Gentlemen) यांना ब्रिटिश लोक हाताच्या अंतरावर ठेवीत. आम्हांला इथें टिकून राहण्यासाठीं झगडा करावा लागे.

इंग्लिश अधिकारी हे आपल्याच लोकांत मिसळत असत. तसा त्यांचा इतरांशी संबंधच येत नसे... त्यांचे विश्व अगदीं बंदिस्त असे. त्यांना पगार चांगले असत, इंग्लिश वस्तुच ते कटाक्षाने खरेदी करीत असत, प्रशस्त अलिशान बंगल्यांतून आपापल्या कुटुंबियांसह राहात असत. बेरा, खानसामा, मशालजी, भिस्ती, मेहतर, आया, हीं माणसें कमी मजुरींत त्यांना लाभत असत. ते इथें इंग्लंडप्रमाणें स्वत:चा स्वैपाक करीत नसत कीं धुणीं धूत नसत.

सकाळीं उठून साहेब परेडला गेला कीं मेमसाहेब, ब्रिज, कॉफी किंवा गप्पाटप्पा यांत वेळ काढी. हीच संवय हिंदी स्त्रियांनीं उचलली ! दुपारीं वामकुक्षी, सायंकाळीं क्लबमधें थोडें मद्यप्राशन किंवा पोहणें आणि जेवणा-

नंतर सिनेमा. सिनेमा पाहतांना तर या बायका कधीं कधीं चक्क झोपत असत. एकंदरींत त्यांचें आयुष्य मोठें सुखाचें ऐषआरामाचें होतें परंतु ते दाखवीत मात्र असें, कीं आपल्या देशासाठीं हुतात्मे होण्यासाठीं ते इथें आलेले आहेत. हिंदुस्थानांत उष्मा फार, माशा, डांस बेसुमार. घाण व रोगराई अनंत व एकंदरीत इथें जीवन कंठणें कर्मकठीण व कंटाळवाणें असें त्यांना वाटत असे. आमच्या लोकांच्या चालीरीती, आमची निरक्षरता, आमची जगण्याची एकंदर पद्धत, आमचा मागासलेपणा या सर्व बाबतींत ते नाकें मुरडीत. हें सगळें कशाकरितां तर ते इथें केवढा सुखत्याग करून राहात आहेत हें सिद्ध करण्यासाठीं ! हिंदुस्थानावर अनेक अंगाने शितोडे उडवून वस्तुत: ते येथील ब्रिटिश राजसत्तेचें अस्तित्व कसें न्याय्य आहे, हें सिद्ध करूं पाहात, ब्रिटिश सत्ता ही येथें, येथील मागासलेल्या लोकांना सुधारण्यासाठींच आहे असें ते समजतात. ते जें कांहीं बोलत तें ब्रह्मवाक्य, व भारतांतील राष्ट्रीय वृत्तीची माणसें करीत तो देशद्रोह, असें त्यांचें समीकरण असें. स्वतंत्र भारतासंबंधी कुणी बोलूं लागला तर ते त्याची टर उडवीत. जणूं भारताच्या स्वातंत्र्याचा विचार हे पाखंड होतें. तरी बरें कीं ओसमंड बर्कनेंच म्हटलें आहे— 'सर्व जमातची जमात बदनाम करण्याची एखादी पद्धत असलीच, तर मला तरी ती ठाऊक नाहीं.'

ब्रिटिश फलटणींत मी एकटाच हिंदी माणूस होतो. या फलटणींत जवळ जवळ तीस अधिकारी होते; व सातशें सैनिक होते. माझ्या सहकारी ब्रिटिश अधिकाऱ्यांबरोबर माझे नेहमीं तावातावाचे वादविवाद होत. आमची निरक्षरता, दारिद्र्य, खेडवळ समजुती आणि इतर अनेक कारणांमुळें, ब्रिटिश राज्य येथें असल्याशिवाय भागणार नाहीं व ते आहेत हें हिंदुस्थानच्या फायद्याचें आहे असा पक्ष तें करीत. मी सांगत असे कीं आमची अशी परिस्थिती आहे याला कारण इथली परकी सत्ता ! कसेंही असलें तरी परकीय सत्तेचें इथलें अस्तित्व न्याय्य आहे हें सिद्ध करणें शक्यच नाहीं व स्वराज्याचा आमचा हक्क आम्हांला मिळालाच पाहिजे ही गोष्ट मी ठणकावून सांगत असें. याचा परिणाम असा झाला कीं, मी राजकारणांत रस असलेला एक आहे असा आरोप माझ्यावर माझेच कांहीं स्वकीय व इंग्लिश लोक करूं लागले.

माझा अुमेदवारीचा ठराविक काळ संपण्यापूर्वी कांहीं दिवस, मी पुढें कुठल्या भारतीय तुकडींत काम करूं इच्छितो हे मला कळवायचें होते. मी 'राजपुताना रायफल्स' ची सहावी फलटण निवडली. १७७५ सालीं हिची अुभारणी झालेली होती. मिनिटाला १४० पावलें टाकण्याची हिला परवानगी असे. या फलटणीची परंपरा अुत्तम होती व लढाईंत पुष्कळ मानचिन्हें या तुकडीला मिळाली होती. अशा या बंदुकधारी फलटणींत असण्यांत मोठा मान होता. वझिरिस्तान मध्यें रझमाक येथें असलेल्या या फलटणीनें माझा स्वीकार केला हें माझें नशिब होय.

हिंदी सेनादलांत, ब्रिटिशांनीं अशी समजूत पसरवून टाकलेली होती, कीं हिंदी अधिकारी हा जातीय विचारसरणीचा असतो व बढत्या देतांना या बाबतींत तो पक्षपात करतो. साहेब हा मात्र या बाबतींत अगदी 'न्यायी व नि:पक्षपाती' असतो! यामुळें सेनेंतील कनिष्ठ अधिकारी व सैनिक हें आमच्या सारख्याबाबत साशंक असत. शिवाय साहेबाच्या बरोबरीच्या नात्यानें वावरलेले हिंदी अधिकारी त्यांनीं पाहिलेले नसल्यानें, त्यांना अशीही धाकधुक असे की आम्ही गोऱ्या साहेबाशी तुलना करतांना सर्व बाबतींत लायक ठरूं की नाही. आम्हांला त्यामुळें अतिशय काम करावे लागे व ते करीत असतांना रागावूनही चालत नसे. ब्रिटिशांच्या या तथा-कथित श्रेष्ठत्वाचा गवगवा सन्याचें हिंदीकरण होऊं लागलें, तसतसा कमी कमी होत गेला; व दुसऱ्या महायुद्धांत प्रत्यक्ष रणांगणावर आम्ही हिंदी अधिकाऱ्यांनीं आमची लायकी सिद्ध करतांच हा भ्रमाचा भोपळा पुरता फुटला.

ही जरी हिंदी तुकडी होती, तरी भोजनागृहांत आमच्या देशी भाषेंत बोललेले चालत नसे. रेडिओवर भारतीय संगीतही लावावयाचे नाहीं व सणावारां-खेरीज हिंदी पदार्थ खायलाही मिळायचे नाहीत. बोलणें चालणें करायचे ते खेळ किंवा अशाच अविवाद्य विषयांवर आठवड्यांतून चार वेळी रात्रीचे जेवण भोजनगृहांतच घेतले पाहिजे असा दंडक होता. या वेळी रेजिमेंटचा बॅन्ड हा वाजवला जात असे. गप्पाटप्पांत आमच्या पेशासंबंधी बोलायला किंवा स्त्रियांची नांवें कशाही संबंधांत घेण्यास मनाई होती. जर यांत चूक झाली तर शिक्षा म्हणून सर्वांना स्वत:च्या खर्चानें मद्य पाजावे लागे. मला

स्पष्टपणें आठवते की मी व आणखी कांहीं थोडेजण भोजनगृहांत किंवा इतरत्र आपल्या राष्ट्रीय लढ्यासंबंधी कधींकधीं वादविवाद करीत असलो, तर आमचेच कांहीं स्वकीय या वादविवादांत गांधीजी व नेहरूसारख्या राष्ट्रीय पुढाऱ्यांबद्दल बेजबाबदार अशी टीका करीत. ब्रिटिश राज्य व ब्रिटिश लोक यांची स्तुती करीत. हें सर्व, आपल्या धन्याची खुषामत करून भुक्कड लोकप्रियता मिळविण्यासाठीं असें. यांतले पुष्कळजण पुढे उच्च अशा लष्करीपदावर चढले. मेकॉल साहेबानें बहुधा या प्रकारच्या लोकांचे स्वप्न फार पूर्वींच पाहिलेलें होतें. १३० वर्षांपूर्वी तो म्हणाला होता—

'आपण व ज्यांच्यावर राज्य करतो ते लाखों लोक, यांच्यांत संवाद साधू शकणाऱ्या हिंदी लोकांचा, एक वर्ग निर्माण करण्याची आपण कोशीश केली पाहिजे. ही माणसें रक्तानें व रंगानें हिंदी असली तरी त्यांच्या आवडी–निवडी, मते, भाषा, आणि बुद्धी ही सर्व आंग्लाळलेली असली पाहिजेत.'

सेनादलांतील हिंदी अधिकाऱ्यांचे ब्रिटिश अधिकाऱ्यांशी असलेलें प्रमाण जसजसे वाढत गेले, तसतसे हे वातावरण हळूहळू बदलत गेले. परंतु या मधल्या काळांत, हिंदी अधिकारी हे ब्रिटिशांचे लांगूलचालन करीत व आपल्याच देशबांधवांचें अहित करीत. द्वेष करावा, चुगल्या कराव्या, कार-स्थानें रचावी या गोष्टी ते करीत; यामुळें हिंदी अधिकाऱ्यांतच एकी निर्माण न होता दुही निर्माण झाली. त्या वेळीं सर्व भारत वर्षांत जें चित्र होतें त्यासारखेच हें सेनांतर्गत चित्र होतें.

मी एकदा लाहोरहून रावळपिंडीला माझ्या आईला घेऊन जात होतो. मी पहिल्या वर्गाच्या डब्यांत चढायला गेलो, तों डब्याचा दरवाजा आंतून खिटी घालून बंद केलेला. मी दरवाजा ठोकूं लागताच, कांचेच्या तावदानाआडून एक इंग्लिश बाई माझ्यावर मूठ उगारून मला हांकलून देऊं लागली. ती दारच उघडेना. मी या प्रकारानें चिडलो व स्टेशन मास्तरला घेऊन आलो. समोर मेमसाहेब पाहतांच तो हिंदी स्टेशनमास्तर टरकला व दार उघडा-वयाचा हुकूम देण्यास कां कूं करूं लागला. मी देखील हट्टाला पेटलो. तमाशा सुरू झाला व भोंवताली खूपच गर्दी जमूं लागली. ब्रिटिशांना अशा या बघ्या गर्दीचा अगदी तिरस्कार असें. मेमसाहेब यामुळें चीत झाली व

अखेर तिनें माघार घेतली आणि मला दरवाजा उघडून मिळाला. त्या दिवसांत हिंदी माणसांना आपल्या बरोबर प्रवास करूं न देण्याचा, इंग्लिश लोकांचा सामान्यपणें रिवाज होता. हिंदी माणसांची त्यांना बहुधा चीडच असे.

आमचा कमांडिंग ऑफिसर लेफ्ट० कर्नल फर्ग्युसन होता. मोठी लहरी व आपल्याच धुंदींत वावरणारी ही स्कॉच आसामी होती. तो जुन्या पठडींतला होता. ज्या राजस्थानमधून या राजपुताना रायफलस मधील बहुसंख्य लोक भरती होत असत, त्या ठिकाणीं अधिकाऱ्यांनीं आपल्या रजेपैकीं कांहीं दिवस काढले पाहिजेत असा त्याचा आग्रह असे. तो कुणी रजा मागितली की नाकारतांना म्हणत असे– ' रजा हा विशेष हक्क आहे परंतु अधिकार नाहीं.'

अलिकडेच भरती झालेला अधिकारी या दृष्टीनें माझ्याकडे बरीच सटर फटर कामें दिलेलीं होतीं. उदाहरणार्थ भोजनगृह व्यवस्थेचा मी तिसरा सभासद होतो. फलटणीचा हिशेबनीस होतो. खेळांची व्यवस्थाही माझ्या-कडेच असे. वझिरिस्तान मधील हॉकींतील व शारीरिक कसरतींतील प्राविण्य-पदकें आमच्या फलटणीला मिळालीं पाहिजेत, असा फर्ग्युसनचा आग्रह होता. रात्रंदिवस खपून मी ही प्राविण्यपदकें मिळवून आणली व याची कदर होऊन, मला उमरावसिंग हा रजेवर जातांच क्वार्टर मास्टर म्हणून त्याचे जागीं बढती मिळाली. उमरावसिंग यांनीं मला आमच्या तुकडींतील रीतीरिवाज व तत्संबंधी कामें या बाबतींत मार्गदर्शन केलें.

इतक्यांत माझी आई किडनीच्या विकारानें आजारी झाली व तिचें ऑपरेशन ठरलें. मला त्या वेळीं तिच्याजवळ हजर राहाणें भाग होते. परंतु मी नेहमीप्रमाणें पैशाच्या चणचणीत होतो. काय करावें हें ठरेना. रॅझमाक-पासून लाहोरला जाणें हें माझ्या बाबतींत मॉस्कोहून लंडनला जाण्या-सारखेच होते. या वेळी उमरावसिंगनेंच मदत केली. त्यानें आपली मॉरिस मोटारगाडी, माझ्या दिमतीला दिली व ड्रायव्हर व पेट्रोलचीहि व्यवस्था करून माझ्या जाण्यायेण्यासाठीं इतरहि मदत केली.

वायव्य सरहद्दीवर रॅझमाक हें, सीमेपासून दूर असलेलें लष्करी ठाणें, वझिरिस्तानच्या अगदीं मध्यावर होते. येथील प्रमुख दोन टोळ्या म्हणजे महसूद व अफ्रिडी, रॅझमाकपासून सात मैलांवरील ' अलेक्झांड्रा पिक्वेट '

हे लष्करी ठाणें होते. तेथें आलटून पालटून अधिकारी पाठविले जात. प्रत्येकाला एक एक महिना तिथें काढावा लागे. या तीस दिवसांत, या ठाण्याच्या अधिकाऱ्याला अगदीं एकलकोंडे आयुष्य काढावें लागें. आसपासच्या क्षितीज रेषेवर, गडबड करणाऱ्यावर नजर रोखून बसावें लागें. अफाट समुद्रांत, आसपास शार्क माशांची धोकादायक गडबड असतांना, मध्यभागीं एखादें दीपगृह जसें सगळें पाहात राहिलेलें असावें, तसेंच हें जीवन होतें. तो परकीय मुलुख व रानदांडगे टोळीवाले, यांनी वेढलेला असे. जरा त्यांचे हातून एखादी चुकीची हालचाल केली गेली, तर महसूद टोळीवाल्यांच्या बंदुकीच्या फैरी झाडल्याच म्हणून समजा. टोळीवाले गोळ्या झाडीत ते दयामाया न दाखवता, सतत झाडींत असत. जर मैत्री झाली तर ते उत्तम मित्र असत; परंतु शत्रू झाले, तर जबरदस्त असत. तळहातावर शिर घेऊनच ते अखंड वावरत असत. एखाद्या बाईसाठीं, जमिनीच्या भांडणापायीं किंवा परंपरागत वैरापायीं, ते प्राणाची पर्वा ठेवीत नसत. ब्रिटिशांचे ते कट्टर शत्रू होते कारण आपली भूमि त्यांनी बळकावली आहे व स्वातंत्र्य हरण करून त्यांनी त्यांच्या खासगी जीवनांतच ढवळाढवळ केलेली आहे ही गोष्ट त्यांना चीड आणीत असे म्हणून तें दयामाया दाखवीत नसत आणि त्यांना कुणी दाखवावी, अशी त्यांची अपेक्षाही नसे. आमच्या तुकड्या अधूनमधून पठाण प्रदेशांतून संचलनासाठीही जात असत. या संचलनांना 'कॉलम' असे म्हणत. एका वेळीं बरेंच दिवस हे संचलन चालें व पठाण प्रदेशांत खूप आंतवर जायचे असल्यानें, हत्यारें पात्यारें बरोबर ठेवावी लागत. या वेळीं एखादे वेळी झटापटी उडायच्या तरी एकंदरीत शांतता असे. मी अनेक वेळा या 'कॉलम' मध्यें भाग घेतला व बऱ्याच वेळां या गोळीबारांत सांपडलो.

मी पुश्तू भाषा शिकलो व त्यासाठीं त्याचे प्राथमिक पुस्तक 'हगा डागा' शिकावे लागले. मला उर्दू व पर्शियन येत असल्यानें, मला पुश्तू चटकन येऊं लागली. ही भाषा शिकण्यांत मोठी मौज असे. तरुण अधिकाऱ्याला वझिरिस्तानांतील या काळखंडांत जो वेगळा अनुभव मिळें त्या अनुभवाचा त्याला पुढें फार उपयोग होत असे.

रॅझमाक हें ब्रिटिशांचें लष्करी ठाणें होतेंच व शिवाय तें त्यांच्या साम्राज्य

रक्षणाच्या भाल्याचे टोंक होते. या उंच ठिकाणीं राहतांना, विस्तीर्ण साम्राज्याची कल्पना मनांत येऊन आपण आपल्या राजाचें व देशाचें रक्षण करीत आहोंत असें ब्रिटिशांना वाटे. एका टोळीला दुसऱ्या टोळीविरुद्ध चिथावणी देऊन, कपटानें व धनप्रयोगानें ब्रिटिश त्यांना हतबल करून टाकीत. फोडा व झोडा ही नीति, त्यांनीं येथें मोठ्या प्रमाणावर वापरली. ज्या प्रमाणें बरेंच हिंदी लोक या भेदनीतीला भारतांत बळी पडले, त्याच प्रमाणें या टोळीवाल्यांची गत झाली. बहुसंख्य टोळीवाले मात्र हिंदी माणसांप्रमाणेंच आपल्या भूमीशी इमान ठेवून, स्वातंत्र्यरक्षणार्थ सतत लढले. भारत अखेर स्वतंत्र झाला, परंतु पठाण मात्र स्वातंत्र्यासाठीं अजून झगडतच आहेत ! त्यांचा खडतर लढा संपलेला नाहीं. स्वातंत्र्य हें कांहीं काळ नाकारतां आलें तरी तें सतत नाकारणें मात्र कुणालाच शक्य नाहीं.

आमच्या बटालियनमध्यें दीनसिंग हा एक म्हातारा व साळस सुभेदार होता. मोठा प्रेमळ. कमांडिंग ऑफिसरनें कांहींही सांगितले तरी 'ठीक है हुजुर.' म्हणायचा. एकदा सुभेदार दीनसिंग सैनिकांचा निशाणबाजीची सराव घेत असतांना, कमांडिंग ऑफिसर मैदानावर गेला. मोडक्या तोडक्या हिंदींत कमांडिंग ऑफिसरनें ओरडून सांगितले—

'दीनसिंग...... मशिनगन... छे अुंगले... समझते?— छा छा . . .'

ऑफिसर सांगत होता 'दीनसिंग, मशिनगन सहा इंच वर धरायला हवी !' दीनसिंग ताबडतोब म्हणाला,

'ठीक है हुजुर.'

वस्तुत: दिनसिंगाला कांहींही समजलेलें नव्हतें. कमांडिंग ऑफिसर गेल्यावर मी जेव्हां त्याला म्हटलें की कर्नल साहेब काय म्हणाला, यांतले अक्षरही मला कळलेले नाही, तेव्हां दीनासिंग म्हणाला, 'मेरे समझमें भी कुछ नही आया !'

दीनसिगानें सांगितले कीं, कमांडिंग ऑफिसरला उलट कांहीं विचारण्या-पेक्षां 'जी हुजूर' म्हणून मोकळे होणेंच चांगलें. त्याचें म्हणणें एकदां 'जी हुजूर' म्हटलें कीं पुढचें कांहीं ऐकावे लागत नाहीं.

हिंदी लोकांच्या भावना ओळखून ब्रिटिश लोक वागत. मात्र केव्हां केव्हां या बाबतींत, त्यांच्या हातून गफलत घडत असे. रॅझमाक येथेंच एकदा आमच्या रेजिमेंटच्या खाटीकखान्यावर त्यांनीं हिंदु रक्षक नेमला. या कत्तलखान्यांत गायी मारण्यांत येत असत. कारण इंग्लिश व मुसलमान सैनिकांना हे गोमांस लागे. एका हिंदुच्या देखत पवित्र गायीची हत्या घडली व ती त्याला पाहावी लागली ! ह्या घटनेमुळें आमच्या तुकडींतील हिंदूंना संताप आला. त्यांनीं एका बंदुकधारी रक्षकांकरवी कांहीं खाटकांना गोळ्या घातल्या. या प्रसंगानें धमाल उडाली. एखाद्या मुसलमान वा इंग्लिश सैनिकालाच ही रक्षकाची चाकरी सांगितली असती, तर हा प्रसंग टळला असता. या गोळ्या घालणाऱ्या रक्षकाची लष्करी न्यायालयीन चौकशी होऊन त्याला

केनेथ गाय नांवाचा उपअधिकारी होता. ही मोठी खाष्ट म्हातारी होती. सगळ्यांना त्याची चीड येत असे. भोजनगृहांत किंवा मैदानावर संचलनाच्या वेळीं, खिशांत हात घातले म्हणून, किंवा अधिकाऱ्याशीं बोलतांना सिगरेट ओढली म्हणून, अशा कारणावरून तो कनिष्ठ अधिकाऱ्यांची सारखी कानउघाडणी करीत असे. अखेर स्वारी मेजर म्हणून निवृत्त झाली व व्हॉइसरॉयच्या बंगल्यावर गृहाधिकारी म्हणून पुन: नेमणूक त्यानें मिळवली.

एकदा भोजनगृहांत माझ्यावरच प्रसग गुदरला. एक दिवशीं मी माझ्या एका सहकाऱ्याबरोबर तिथे गेलो असतां, चेष्टेनें तेथील जनरल सर चार्लस् नेपिअर यांच्या मोठ्या समग्र तैलचित्रापुढें जाऊन उभा राहिलो. आमच्या बटालियनाचा हा संस्थापक. अशा या मोठ्या व्यक्तीच्या त्या जीर्णशीर्ण तैलाचित्रापुढें ' अटेन्शन ' पवित्रा घेऊन मी ओरडलो,

' मिस्टर नेपिअर ! केस कापायला हवे आहेत. तुमचा अवतार झालाय. आणि गणवेष फाटलेला आहे. याबद्दल दोन जादा परेड करा ! ऐकू येतंय कां? मि... स्टर नेपिअर. '

खूप गमत केली, या आनंदांत मागे वळून पाहतो तो काय...! मागच्या दरवाज्यांतूज आंत येऊन तिथें केनेथ गाय उभा. माझें सर्व पाखंड त्यानें ऐकले होते. अर्थातच सतापानें त्याचा शब्द फुटत नाहींसा झाला होता. तो गरजला—

'कांहीं शरम वाटते कां? एवढ्या थोर माणसांपुढें हें काय चालवलें आहेस?'

माझ्या तळहातावर जो रपाटा बसला त्याची आठवण कधीं विसरणें शक्य नाहीं. अर्थात झालें तें योग्यच झालें.

सुभेदार मेजर ह्याचे बटालियन मधील स्थान विशेष मानाचे असे. आमचा सुभेदार मेजर ह्यानें तर शांतता काळांत व युद्धांतही उल्लेखनीय कामगिरी केलेली होती व सर्वच श्रेणींत त्याच्याबद्दल आदर होता. एखादी गोष्ट करायची तर कमांडिग ऑफिसर या सुभेदार मेजरचा सल्ला घेई. कमांडिग ऑफिसरचा उजवा हात असल्यानें सर्वजण त्याला लक्षणीय असा मान देत.

एकदां केली नांवाच्या कनिष्ठ अधिकाऱ्यानें या सुभेदार मेजरशी उद्धट-पणा केला. अशा तऱ्हेची वागणूक मिळण्याची संवय नसल्यानें सुभेदार मेजर रागानें लालीलाल झाला. कमरेचा पट्टा काढून, त्यानें तो कमांडिग ऑफिसर-पुढें ठेवला व सांगितलें, जर बटालियनमधील अधिकारी अशा तऱ्हेनें वागवणार असतील तर निवृत्त होणें चांगलें! कर्नल साहेबांनीं त्याला शांत केला व केली यांना नोकरींतून कमी करण्याची धमकी दिली. केली यांनीं विनाअट संपूर्ण माफी मागितली व खालच्या मानेनें तो निघून गेल्यानें प्रकरण मिटलें. सुभेदार मेजर या पदाची प्रतिष्ठा अशी कसोशीनें राखली जात असे.

भारतीय सेनेच्या निर्मितींत जवानांनीं महत्त्वाचा वांटा उचललेला आहे. जवानांची सेवा, निष्ठा व परंपरागत इमान ही भारतीय सेनेची खास भुषणें आहेत. भारतीय जवान हा मोठा उमदा असतो. त्याचा सरळ स्वभाव व आज्ञाधारकता, यामुळें ज्यांच्या हाताखालीं तो वावरतो त्या सगळ्यांचा तो लाडका होतो. आपल्या जवळील जे उत्तम गुण आहेत, ते तो आपल्या तुकडीच्या व पर्यायानें भारतीय सेनेच्या कारणी लावतो व या बदल्यांत मागतो काय? किरकोळ सुटीची सवलत! सैनिकी सेवेच्या अडचणीमुळें त्याला घरचीं गांवाकडचीं कामें करायला, रजा हवी तेव्हां नेमकी मिळत नाही. यामुळें नियमानुसार मिळणाऱ्या रजेव्यतिरिक्त त्याला अधुनमधून किरकोळ रजा लागते. आपल्या सरळ स्वभावामुळें आपल्या वरिष्ठांची

रजेच्या निकडीविषयीं खात्री पटविण्यासाठीं, मग तो बटालियनच्या पत्त्यावर खोटया तारा मागवतो. या तारेंत असा कांहींतरी मजकुर असायचाच—

‘घर पडलें, रेडा मेला, परिस्थिती गंभीर, ताबडतोब यावें.’

त्याच्या कधीं लक्षांत येत नाहीं,कीं तो जशी चाकरी करतो त्याच जातीची चाकरी इतर वरचे अधिकारी जरा अधिक वरच्या पातळीवरून करतात व त्यानें स्वतःला कमी दर्जाचें किंवा अविश्वासार्ह समजण्याची जरुरी नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें तार असली, की एका वेळींच इतकी संकटें आल्या-नंतर वरिष्ठांचें मन विरघळणारच, असा भरंवसा त्याला वाटतो! वरि-ष्ठांची मात्र या त्याच त्याच तारा वाचून करमणूक होते. अखेर आवश्यक असेल तेव्हां व त्याच प्रकरणीं रजा मंजूर होते.

मेजर रीझ हा इंग्लिश अधिकारी आमच्या बटालियनमध्यें सी कंपनीचा अधिकारी होता. १९३४ च्या नोव्हेंबरांत मी प्रथम त्याला पाहिला तेव्हां तो चाळिशीपर्यंत आलेला होता. तरीहि खूपच तरुण वाटत होता. त्याचा उत्साह अमाप असे. लष्करी ज्ञान उत्तम व त्याचें बोलणें अचूक असें. वचनाचा अत्यंत धड, सत्यवचनी व पापभीरू असा हा मनुष्य, निर्णयांत न चुकणारा असल्यानें, सर्व सैनिकांचा त्याच्यावर फार लोभ असे. उदार व दयाळु असला तरी त्याचें अंतःकरण तेजस्वी होते. हा मोठा धाडशी व कडक शिस्तीचा होता. निस्पृह असून, न्याय्य तें करण्यांस कधीं कचरत नसे. स्वयंकर्तृत्व त्याचें ठिकाणीं होते व म्हणेल ते, वाटेल त्या परिस्थतींत तो करीत असे. कागदी घोडयांचा तो तिटकारा करी व यामुळें आपल्या अधिकारांना तो वेसण घालून देत नसे. आपल्या सगळ्या रीतीरिवाजांचा व सर्व धर्ममतांचा मान तो ठेवीत असे. हा मेजर माझा आदर्श होता व माझ्या पुढच्या पेशांत मी त्याच्या प्रमाणेंच आचरण ठेवण्याचा प्रयत्न केला.

माझ्या पुरतें बोलायचें तर त्यानें बटालियनमध्यें महत्त्वाचे काम केलें. कधीं कधीं तो रात्रीं माझ्या खोलीत येई व लष्करांचे इतिहास, डावपेंच व रेजिमेंट, या संबंधी माझ्याशीं बोलत बसे. एकदां त्यानें मला विचारलें, कीं

दा. क्र. ९२०७४

सुटीच्या दिवशीं व रोज सायंकाळीं मी काय करतों. मी सांगितलें कीं मी खेळतो. नंतर रात्रीं रेडिओ ऐकतो. रेडिओ त्या वेळीं नवीन होता. कधीं कधीं कादंबऱ्या वगैरे वाचतो. मी माझें लष्करी ज्ञान वाढावें यासाठीं शक्य असून कांहींच वेळ खर्च करीत नसतो हें ऐकून त्याला आश्चर्य वाटलें. त्यानें सांगितलें, की वीस वर्षें ह्या पेशांत जागरूकतेनें काढल्यानंतरहि, अंजून शिकण्यासारखें खूप उरलेलेंच होतें असें त्याला वाटतें. मी माझ्या व्यवसायावर लक्ष केंद्रित केलें नाहीं, तर पुढें माझें काय होईल याची त्याला कल्पना करवत नव्हती. त्या दिवसापासून मी माझ्या पेशाचा अभ्यास जाणीवपूर्वक करूं लागलो. त्या वेळीं माझी फक्त वर्षभर नोकरी झालेली होती. लष्करी डावपेंच व इतिहास याच्या अभ्यासाबरोबरच मी ज्युलिअस, सिझर, अलेक्झांडर, नेपोलियन बोनापार्ट, केमाल अतार्तुक, अरेबियाचा लॉरेन्स इत्यादि थोर लष्करी नेत्यांच्या जीवनचरित्रांची ओळखहि करून घेण्यास सुरुवात केली.

मेजर रीझ यानें एकदां मला आपल्याबरोबर घेतलें. रॅझमाक छावणी-भोंवतीं रात्रभर न थांबता चलन करण्याचा हा कार्यक्रम होता. यावेळी मी बी कंपनीचा अधिकारी होतो. पाठीवर सामानाचे वजनदार ओझें घेऊन, आम्ही विश्रांती न घेतां पंधरा मैल चालत गेलो. दहा तास सतत चालत होतो न थांबता ! हें ठिकाण समुद्रसपाटीपासून ७००० फूट उंचीवरचें आहे हे विशेष ! अशारीतीनें तो स्वत: उदाहरण घालून देत असे. रीझ हा एक असा वरीष्ठ अधिकारी होता, की जो केवळ साम्राज्य वाढवण्यासाठीं येथे आलेला नव्हता. लोकांची सेवा त्याला करायची होती.

याच सुमारास मला आईची तार आली, कीं मोठ्या शस्त्रक्रियेसाठीं दोन हजार रुपये पाठव. यांतली कांही रक्कम मी खाजगीरीत्या कर्जाऊ काढली, व उरलेली माझा ग्रामफोन, सतरंजी व इतर कांही वस्तू विकून उभी केली. माझ्या कमांडिंग ऑफिसरला जेव्हां कळलें, कीं मी खाजगी कर्ज केलें आहे, तेव्हां त्यानें मला आठवण दिली, कीं हे लष्करी नियमांच्या विरुद्ध आहे. मी त्याला सांगितलें कीं मला हा नियम माहीत आहे परंतु आईला या कठीण परिस्थितींत मदत करायची, तर यावाचून दुसरा मार्गच नव्हता. माझ्या या ब्रिटिश कमांडिंग ऑफिसरला, माझ्या या सरळ उत्तराचें कौतुकच

वाटलें असावें. कारण त्यानें मला रेजिमेंटच्या फंडांतून एवढें कर्ज दिलें, की मी खाजगी कर्जांतून ऋणमुक्त झालोच व मला शस्त्रक्रियेपूर्वी व नंतरही आईची नीट देखभाल त्या पैशांतून करता आली.

आई त्यानंतर मात्र सतत आजारीच राहिली. तिच्या औषधोपचारासाठीं अधिकाधिक पैसा लागूं लागला. शिवाय तिचा संसारखर्च होताच. मी पाठविलेल्या महिन्याच्या ठराविक रकमेंत तिचें भागेनासें झालें; व ती कर्ज काढूं लागली. अशा परिस्थितींत मला माझी मिळकत वाढवणेंच भाग होते. आहे यापेक्षां अधिक पगार मिळेल अशा एखाद्या जागेवर बदली करून घेणें, याशिवाय दुसरा वैध मार्ग नव्हता. याचा अर्थ मला ही बटालियन सोडून जावें लागणार होते. 'राजपुताना रायफलस' ही बटालियन सोडणेंही माझ्या जिवावर आलें होतें. मी पंचायतींत पडलो होतो. मी द्विधा मनस्थितींत असतांनाच एक सैनिकी परिपत्रक आलें. अधिक पैशांची सोय असलेल्या जागा 'फ्रंटियर स्काउटस्' 'बर्मा मिलिटरी पोलिस' व 'आर्मी सर्व्हिस कॉर्पस' या ठिकाणीं उपलब्ध होत्या. येथें जादा भत्ता मिळण्याची सोय होती. मी तिन्ही ठिकाणी अर्ज केला. यांपैकीं पहिल्या दोनच्या बाबतींत माझ्या निवडीची शक्यता नव्हती, कारण त्यासाठी हिंदी अधिकारी निवडलाच जात नसे. 'आर्मी सर्व्हिस कॉर्पस्' मधें मला प्रवेश मिळाला. यासाठीं अर्थातच मला 'राजपुताना रायफल्स' सोडावी लागणार होती. परिस्थितीपुढे इलाज नव्हता व मी इन्फंट्री बटालियन जड अंतःकरणानें सोडली. पुढे संधि येतांच व परवानगी मिळतांच मात्र मी परत याच बटालियनमध्यें आलो.

तीन महिन्यांच्या कोर्ससाठीं मी रावळपिंडीला गेलो. तिथेंच १९२६ च्या नोव्हेंबरांत माझा विवाह झाला. मी त्यावेळी साडे चोविस वर्षांचा होतो

आपल्याकडील लग्नांत नेहमी दिसतो, तसा भपका माझे लग्नांत मुळीच नव्हता. दोन्ही बाजूंनीं वायफळ खर्च न करण्याचें ठरलें होतें. माझ्या पत्नीचें नेहमीचें नांव होते धन्नो. मोठी सुस्वभावी, गोड व नाकीडोळी सुरेख होती. धार्मिक आचारांत तिला अगत्य होतें.

रावळपिंडीहून मी जबलपूरला गेलो. ब्रिगेडिअर लोकार्ट, हा या लष्करी ठाण्यावर कमांडिंग ऑफिसर होता; व मेजर मॅके हा ब्रिगेड मेजर होता.

लोकार्ट हा शीख रेजिमेंटमधून आलेला होता व मेजर मॅके हा पूर्वी 'राजपुताना रायफलस' मध्येंच होता. हे दोन्ही अधिकारी अतिशय उत्तम होते व त्यांच्या हाताखाली काम करायला उत्साह वाटे. लोकार्ट हा पुढे भारतीय सेनादलाचा कमांडर-इन्-चीफ झाला व मॅके हा मेजर जनरल म्हणून निवृत्त झाला.

मी आतां पंचविशींत होतो. माझ्या वयाच्या तरुण माणसाला असें वाटतेंच, की जरा व्यवस्थित राहावे. कांहीं आराम असावा. शक्य तो एखादी मोटार असावी, रेडिओ घरांत असावा, रेफ्रिजरेटर असावा; अधून मधून सिनेमा पाहता यावा, दुसऱ्याच्या निमंत्रणाची परतभेट करतां यावी, कांहीं हौस मौज करावी, थोडी रजा घ्यावी, एखाद्या सायंकाळीं मद्य घेतां यावे. मी निर्व्यसनी असल्यानें मद्यासंबंधीं माझ्या पुढें प्रश्न नव्हता. माझ्या वडिलांच्या निधनापासून गेलीं सात वर्षे, मी या साध्या अपेक्षा व जीवनांतलीं इतर सुखें याकडे पाठ फिरविली होती. कारण त्याशिवाय माझ्या आईचा प्रतिपाल मला करतां आला नसता. माझेपाशीं रेफ्रिजरेटर नव्हता, रेडिओ नव्हता की गाडी नव्हती. मी कुणाला मेजवानीला बोलावूं शकत नसे. प्रत्येक गोष्टीला कांहीं हद्द असते. यामुळें अगदी उद्वेगानें, मी एके दिवशीं स्वस्त अशी दुसऱ्या विक्रीची मोटारगाडी खरेदी करण्याचें ठरविलें. मी सरळ 'बॉम्बे गॅरेज' मध्यें गेलो व हॉर्नेट गाडी नऊशें रुपयाला खरेदी करून टाकली. अर्थात पैसे नंतरच देणार होतो. मोटारगाडी कशी चालवायाची याबद्दल मला जवळजवळ माहिती नव्हतीच. तरीसुद्धां मी जणूं अतिशय कुशल रीतीनें मोटार चालवूं शकतो, अशा थाटांत मी मोटारींत बसलो. दुकानदारांकडून स्टार्टर आदि गोष्टींची माहिती करून घेतली आणि हिसके खात गाडी सुरू केली. इंजिनांतून आवाज निघाले. माझे हात थरथरायला लागून, स्टिअरिंग चाकावरचा माझा ताबा सुटला व गॅरेजमधून मोटार बाहेर पडण्यापूर्वी, मी लहानसा अपघातहि केला. दुसऱ्या दिवशीं मोटार दुरुस्त झाली आणि हळू हळू याच जुन्या कुचकामी मोटारीवर, मी ड्रायव्हिंग सुधारलें. मी ज्या पद्धतीनें पोहायला शिकलो किंवा घोड्यावर बसायला शिकलो, तसाच मोटार चालवायला शिकलो.

जबलपूरहून १९३८ मध्यें माझी नेमणूक ब्रिगेडिअर मॅकफर्सन यांचे अधिकाराखालील अहमदनगर येथील ब्रिगेड क्र. २ मध्यें झाली. मॅकफर्सन हा जाठ रेजिमेंटमधून आलेला होता व याच रेजिमेंटचा मी पुढे कर्नल कमांडर झालो. अहमदनगरच्या किल्ल्यांत आमच्या ब्रिगेडचें मुख्य ठाणें होतें. याच किल्ल्यांत आपल्या राष्ट्रीय पुढाऱ्यांना युद्धकालांत कैदेंत ठेवण्यांत आलेलें होतें. मी नगरला असतांनाच, शक्य झालें तेव्हां तेव्हां, मी सुट्टीच्या दिवशी शिवाजीनें लढाया दिलेलीं पुष्कळ ठिकाणें पाहिलीं. तीनशें वर्षांपूर्वी या वीर पुरुषानें अनेक लढाया खेळून, आपलें नांव अजरामर करून ठेवलेलें आहे.

१९३९ सालीं सेनेचें यांत्रिकीकरण सुरू झालें. जनावरांऐवजी यंत्रें आलीं. घोड्यांची जागा टँकनें घेतली. खेचरांऐवजी लॉऱ्या धांवूं लागल्या.

माझी बहीण काश्मिरमध्यें अतिशय आजारी झाल्याचें कानीं आलें. मी धांवतच श्रीनगरला गेलो. तेराशें मैलांचा प्रवास होता. तिथें जाऊन पाहातो तों काय ! नानीला हाडांतील क्षयरोग जडलेला. तिच्या डाव्या पायाच्या अंगठ्यांतील एका हाडाला क्षय जडला होता. अंगठा सुजलेला होता. फार दुखत होता. श्रीनगरचे डॉक्टर सांगत होते, कीं नानीला तेथेंच अुपचार करून ती बरी होईल. परंतु श्रीनगरमध्यें बरीच धावपळ केल्यावर कुणाचेंहि न ऐकतां मी नानीला लाहोरला नेण्याचें ठरविलें. कारण तेथें औषधोपचाराच्या अधिक चांगल्या सोयी अुपलब्ध होत्या शिवाय मी असा विचार केला की, चमत्कारिक परिस्थितींत, हें करूं की तें करूं असे म्हणत बसण्यापेक्षां, वेळ न दवडतां नानीला ताबडतोब तज्ज्ञांना दाखवावी व जास्तीत जास्त चांगले अुपचार करावे. म्हणून मी तिला माझ्या मोटारींत घातली व श्रीनगर सोडलें. मोटारीनें मोठा जिकिरीचा प्रवास करून मी तिला लाहोरला आणलें. डॉक्टरांनीं ठरवलें, की ताबडतोब शस्त्रक्रिया करावी लागेल. डॉक्टर पॅसरीच यांनी कुशल शस्त्रक्रिया करून, तिचा पाय वांचवला. परंतु क्षय लागलेल्या अंगठ्यांतला कांहीं भाग कापून काढावा लागला.

शस्त्रक्रियेनंतरचे सुमारे दहा दिवस, मी बहिणीबरोबर राहिलो. तिला ठेवली होती, त्याच लहानशा वॉर्डमध्यें, विशेष परवानगी काढून मी

रात्रीहि तिच्या कॉटजवळ जमिनीवर झोपत होतो. परंतु कापून काढलेला अंगठा समाधानकारक रीतीनें भरून आला नाही व मला तिला दुसऱ्या शस्त्रक्रिया तज्ज्ञाच्या शोधांत दिल्लीला न्यावे लागलें. बऱ्याच कालावधीच्या अुपचारानंतर ती पूर्ण बरी झाली. मला हा सर्व उपचारांचा खर्च झेपण्यांतला नव्हता, परंतु लिला यांतून वांचवायचेंच असा माझा निश्चय झाला होता.

अधून मधून चेष्टा करण्याची मला लहर येअी. त्या वेळच्या दोन गंमती सांगतो. लेफ्टनंट महंमद मुसा-पुढे हा पाकिस्तानच्या सेनेचा कमांडर-इन चीफ् झाला—हा ‘ फ्रांटिअर फोर्स रायफल्स ’ मध्यें कनिष्ठ अधिकारी होता. हा माणूस अुत्तम सैनिक होताच व फार धार्मिक वृत्तीचा होता. रोज सकाळीं, कामाला लागण्यापूर्वीं पठाणी पद्धतीनुसार हा नमाज पढत असे. अेक दिवशी आम्ही दोघा-तिघांनी मिळून मुसाची गंमत करायची ठरवली. अटल, शॉकत व मी तिघे लेफ्टनंटच होतो. आम्ही आमचीं घड्याळें चांगलीं पांच तास पुढें केली व मध्यरात्रीं मुसाला झोपेंतून अुठवलें.

‘ किती वाजले ?’ डोळे चोळीत मुसानें विचारलें.

‘ पहांटेचे पांच झाले मुसा—’ आम्ही तिघांनी दडपून सांगितलें. ‘ नमाजाची वेळ झाली रे——’

मुसानें आपलें घड्याळ पाहिलें, तो मध्यरात्रीची वेळ झालेली. त्याला संशय आला परंतु आम्ही आमचीं घड्याळें दाखविलीं. पांच मिनिटांच्या फरकाने आमची तिन्ही घड्याळे पहांटेचे पांच वाजले म्हणत होती. मुसा ताडकन् अंथरुणांतून बाहेर आला. त्याला वाटलें आपलें घड्याळ बिघडलें असावें. नमाजासाठीं तो गेला. आम्ही व्हरांड्यांतच तिघे शांतपणे थांबून राहिलो. नमाज संपवून मुसा आसपास पहातो, तों सगळीकडे काळाकुट्ट अंधार ! घड्याळाप्रमाणें अेव्हांना अुजाडायला हवे होते. मुसाला पुनः संशय आला.

‘ अरे वाजले तरी किती लेकांनो ?’ मुसानें ओरडून विचारलें व पायांतला चढाव त्याने काहीशा गमंतीने आमच्याकडे भिरकावला. आम्ही कुणी काहीच बोलत नव्हतो.

‘अरे आतां वाजलेत तरी किती ?’ त्यानें पुन्हां चौकशी केली.

‘साडेबारा होतांहेत मुसा !’ आम्ही वस्तुस्थिति सांगून टाकली.

दुसऱ्या वेळीं मी हैदराबादहून दिल्लीला निघालो होतो. रुसी बिलिमोरिया म्हणून माझा सह अधिकारी होता. त्याला आम्ही बिली म्हणत असूं. आम्ही रजेवर सुटलो होतो. मला हैदराबाद स्टेशनपर्यंत बिलीने आपल्या मोटारीतून आणलें होतें. मला गाडींत बसवून तो मोटारनें पुढें जाणार होता. आम्हांला स्टेशनवर पोहचायला थोडा अुशीर झाला व आम्ही स्टेशनांत शिरलो तो गाडी हलली. डोळ्यादेखत गाडी चुकलेली पाहून मी फार अस्वस्थ झालो पण बिली मात्र शांत हाता. आम्ही गाडीजवळ गेलो. गाडीचा गार्ड, हललेल्या गाडींत अुडी मारण्याच्या तयारींत हिरवा दिवा हलवीत होता. बिली आणि मी धांवत गेलो व गार्डला दोन्ही हातांनी मागें ओढलें. त्याच्या कानांत एकीकडे कुजबुजलो– ‘आम्हांला घेतल्याशिवाय तुला जाता येणार नाहीं–बाबा !’ मग बिलीनें त्याला मागून खाकेंतून हात घालून घट्ट पकडून ठेवला. गार्डची अवस्था मोठी कठीण झाली. त्याने झटकन् तांबडा दिवा दाखवला. गाडी थांबली. भोवताली ही गर्दी जमली. गोंधळ माजला. आम्ही अडचणींत सांपडलो; पण अखेर गाडी तर पकडलीच. आम्ही रजेवरून परत आलो तेव्हां मात्र आम्हाला ब्रिगेड कमांडरपुढे जाब द्यावा लागला. आम्ही गंभीर शिस्तभंग केलेला होता. ब्रिगेडिअरनें प्रथम आमची खूप हजामत केली परंतु शेवटीं कांहीं झालें नाहीं. हकिगत कळतांच तो देखील हसूं लागला.

# २

# संक्रमण

## २ : संक्रमण

**३ सप्टेंबर** १९३९ या दिवशी, मी पुण्याला पत्नीसह एक इंग्रजी चित्रपट पहात असतांना, एकदम सिनेमांत खंड पडला व गंभीर घोषणा झाली–

'बंधू भगिनींनो, कळवण्यास दुःख होते कीं आजपासून इंग्लंड व जर्मनी यांच्यांत युद्ध जाहीर झाले आहे.'

शेवटीं दुसरें महायुद्ध पेटलेंच. सिनेमागृहांत क्षणभर स्तब्धता पसरली व मग सगळीकडे संभाषणाचे आवाज सुरू झाले. काय घडणार होते हें कुणालाच माहीत नव्हते. सर्वत्र गोंधळ मात्र झाला होता. युद्धपरिस्थितींत नेहमीच निरनिराळ्या अफवांचें पीक येते तसेच आतांही आलें. मी लगोलग माझ्या कमांडिंग ऑफिसरकडे रुजू झालो व मला सिकंदराबाद येथें डिव्हिजन क्र. ५ या फलटणीचे यंत्रसज्ज सेनेंत रुपांतर करण्याची कामगिरी देण्यांत आली. सर्व साधारणपणें मेजरकडे ही कामगिरी दिली जाते परंतु मी ज्येष्ठ अधिकारी होतो. अर्थातच हा माझा सन्मान म्हणता आला, तरी युद्धकाळांत अधिकाऱ्यांचा तुटवडा असला कीं वरच्या जागेवरचें काम करणें ही नित्याचीच गोष्ट असते. या कामगिरीवर असतांना माझा मेजर जनरल पिशी हीथ यांचेशी घनिष्ठ संबंध आला. क्रमांक पांच डिव्हिजनचा हा कमांडर होता. याचप्रमाणें ब्रिगेडिअर मायने, कर्नल फ्रँक मेसव्हीं, कर्नल सॅव्होरी या अधिकाऱ्यांच्या सहवासांतही मी बराच आलो. माझे तेथील काम संपल्यावर या दोन्ही कर्नलनी मला माझ्यासाठीं कांही करण्यासारखे असल्यास सांगण्यास सांगितलें. मध्यपूर्वेकडील रणक्षेत्रावर जाण्याची इच्छा प्रदर्शित करतांच, त्यांनी प्रयत्न केला. परतु आर्मी हेडक्वार्टर्समधील मिलिटरी सेक्रेटरीने खो घातला. हें जमलें नाहीं म्हणून मी 'फ्रंटिअर फोर्स रायफलस' या फलटणींत नेमणूक होण्यासाठीं प्रयत्न करण्यास सांगितलें परंतु हेंही वरच्या अधिकाऱ्यांनी मान्य केलें नाहीं; व इन्फंट्रीत शिरण्याचें माझे प्रयत्न निष्फळ ठरले. अर्थात मी प्रयत्न सोडले नाहींत.

येथून मी मार्च १९४० मध्यें अॅडज्युटंट म्हणून देवळाली येथें गेलो. तेथें लष्करी शिक्षण केंद्र होते व मोटारसज्ज तुकडीचें शिक्षण तेथें होत असे. लेफ्ट० कर्नल शीहन या आयरिश अधिकाऱ्याच्या हाताखालीं हें केंद्र होतें. हा माणूस चोपून काम करून घेणारा होता.

कमिशन न मिळालेल्या अधिकाऱ्यांच्या सागर येथील विद्यालयांत कांही दिवस सूचक म्हणून काम केल्यानंतर, युद्धासाठीं सुरू झालेल्या अभ्यास-क्रमासाठीं माझी क्वेट्टा येथें १९४२ च्या सुरुवातीला रवानगी झाली.

अकबरखान व मी सँडर्स येथें साहाध्यायी होतोच. आतां आमची क्वेट्टचाला पुनः गांठ पडली. आम्ही दोघे व्यक्ति म्हणून प्रत्येक इंग्लिश माणसाशी स्नेहपूर्ण संबंध ठेवीत असलो, तरी इंग्लीशांच्या भारतांतील साम्राज्याबाबत आम्ही अनुकुल होतो असें नाहीं. आमचाच आणखी एक साहाध्यायी, हा इंग्लंडच्या राजापेक्षांहि इंग्लिशांबाबत अधिक इमानी असल्यानें, त्यानें आमच्या दोघांच्या राजकीय विचारसरणीविरुद्ध बलुचिस्तानच्या 'इंटेलि-जन्स ब्युरो'कडे तक्रार केली. याच ब्युरोच्या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या हाता-खाली काम करणारा एक गृहस्थ, हा अकबरखानचा मित्र होता, त्याचें-मार्फत ही हकिगत आमचे कानीं आली. अकबरखाननें त्याच रात्रीं आमच्या-सारख्या स्वकीयांच्या विरुद्ध ब्रिटिशांजवळ चुगल्या करणाऱ्या या माणसाची गांठ घेऊन, त्याची चांगली तासडपट्टी केली.

१९४२ च्या फेब्रुवारींत 'प्रिन्स ऑफ वेल्स' व 'रिप्‌ल्स' ही ब्रिटिशांची आरमारी जहाजें जपान्यांनी बुडवलीं. पाठोपाठ सिंगापूर पडलें. भारतांतील ब्रिटिशांच्या इभ्रतीला हा मोठाच धक्का होता, कारण लोकांनीं हें पाहिलें की आशियांतील माणसे 'साहेबा'चा पराभव करूं शकतात. भारतीय म्हणून आम्हांला जर्मनी व जपान विरुद्धचे हें युद्ध जिंकण्याची जशी उत्सुकता होती, तशीच उत्सुकता ब्रिटिशांनी भारतांतून लवकर पाय काढावा याबद्दल होती. आमचा देश यामुळें स्वतंत्र होणार होता. यामुळें आम्ही असेच म्हणत होतो, की ब्रिटिश हे राजकीय दृष्टचा व लष्करी दृष्टचा जेवढे कमजोर होत जातील, तेवढ्या लवकर ते भारतांतून बाहेर जातील. अंती हेंच खरें ठरलें

मलायांत व आफ्रिकेंत ब्रिटिशांच्या पराभवाच्या बातम्या कानावर आल्या-वर अकबरखान यानें पांच निवडक ब्रिटिश व हिन्दी अधिकाऱ्यांची, यासंबंधीं

बोलण्यासाठीं एक वर्तुळ चर्चा घडवून आणली. विषय होता, 'ब्रिटिशांनीं भारत कां सोडूं नये ?' दोन्ही पक्षांत भरपूर वादंग माजले व उत्तररात्रीं बैठक आटोपली. जातांना मात्र प्रत्येकजण मित्रभावनेनेंच गेला.

क्वेट्टयाहून मी कराचीला गेलो. तेथील 'इंटेलिजन्स स्कूल' मध्यें मला शिकवण्याचें काम मिळालें. येथील 'स्टाफ कॉलेजांत' व 'इंटेलिजन्स स्कूल' मध्यें असतांना, आमच्यापैकीं कांहीं जणांना सैन्याच्या एका विवक्षित अंगा-विषयी अभ्यासपूर्ण लेख लिहिण्यास सांगण्यांत आलें. या लेखनांतील माझा दृष्टीकोन, वरच्या कांहीं अधिकाऱ्यांना आवडला नाहीं व 'आर्मी हेड-क्वार्टर्स दिल्ली' येथून मला सूचना मिळाली कीं जपून वागावें. याच बरोबर मी ब्रिटिशांच्या प्रसिद्धी विभागाबद्दल दोष दर्शन या लेखनांतून केलें असल्यानें, माझी नेमणूक जनता संपर्क खात्याचे 'आर्मी हेडक्वार्टर्स दिल्ली' येथील प्रमुख ब्रिगेडिअर आयव्हॉर जेहू यांचे हाताखालीं करण्यांत आली. मला सांगण्यांत आले की काय सुधारणा हवी आहे ती आतां करा!

१९४२ची 'चलेजाव' ही चळवळ या वेळी जोरांत होती. मुंबईचे गव्हर्नर सर रॉजर लमली यांच्या संघांतून क्रिकेट खेळण्यांसाठी मी मुंबईला आलो होतो. याच वेळी वलसा मथाई या मुलीची गांठ घेण्याचेंही मी ठरवलें. ही एकोणीस वर्षांची मुलगी क्रांतिकारकांपैकी एक पुढारी होती. आमच्या दोघांच्या एका समान मित्रामार्फत ही गांठ झाली. पहिल्याच भेटींत तिनें माझ्या देशभक्ती-बद्दल शंका व्यक्त केली. याचें कारण मी सैन्यांत होतो व सैन्य ब्रिटिश सत्तेचें होतें. मला तिच्या या मताचा राग आला. मी तिला सांगितलें, कीं देशभक्ति ही कांहीं तिची एकटीची मिरास नाहीं. माझेहि देशावर तितकेंच प्रेम आहे. तिनें मला आवाहन केलें कीं विद्यार्थ्यांचा एक सरकारविरोधी मेळावा भरणार आहे, तिथें मी बोलावें. मी तिथें गेलो व बोललोही. मी भाषणांत सांगितलें, कीं तरुणांनी पुढें येऊन युद्धप्रयत्नांत सहभागी व्हावे. स्वतंत्र भारताच्या दृष्टीनें, याला असलेले महत्त्व मी विशद केलें. या जाहीर भाषणांत मी बरेच राष्ट्रीय विचार मांडले. ब्रिटिशांच्या दृष्टीनें हा देश-द्रोहच होता. गव्हर्नर साहेबांना माझा क्रिकेटचा खेळ आवडला. तरी, माझ्या या भाषणाला त्यांचा आक्षेप होता व ते बरेच अस्वस्थ झाले, असें माझ्या कानावर आलें. या भाषणाचा गोपवारा त्यांच्याच हाताखालीं काम कर-

णाऱ्या लोकांमार्फत, जनरल सर नोएल्ड नेरेसफोर्ड पिर्स यांना कळवण्यांत आला. सदर्न कमांड बंगलोर येथें पिर्स हे जनरल ऑफिसर कमांडिंग-इन्-चीफ होते. पिर्स यांनींहि माझ्या या तारतम्यरहीत कृत्याबद्दल, माझी कान-उघाडणी केली.

वलसा मात्र माझ्या या भाषणावर खूप झाली. मी त्यानंतर निर्माण झालेल्या वादळांत डगमगलो नाहीं, हें देखील तिनें पाहिलें. निदान तिच्या कार्याबाबत तरी मी कांही विरोधी करणार नाहीं अशी तिची खात्री पटली. एक दिवशी रात्रीं खूप उशीरा ती माझेकडे आली. गुप्त-रीतीनें काम करणारा एक वायरलेस ट्रॅन्समिटर दुरुस्त करून देण्याची विनंती तिनें केली. तिनें सांगितलें, की पोलिस तिच्या मागावर आहेत. ब्रिटिशांविरुद्ध बातम्या ध्वनिक्षेपित करणाऱ्या वायरलेस स्टेशनचा ते कसून शोध करीत होते. सेनादलांतील एक हिंदी मेकॅनिक माझ्या माहितीचा होता. त्याने गुपचूप ही देशसेवा केली व ट्रॅन्समिटर दुरुस्त करून दिला. वलसाबरोबर इतर काहीं भूमिगत चळवळीतील उद्योगांत मी भाग घेतला. अशा रीतीने या अनुभवांची गोडीही मला घेतां आली.

एक दिवशीं माझ्या मुंबईंतील एका मित्राकरवी मी ऐकलें, कीं भूमिगत झालेले प्रख्यात क्रांतिकारक नेते, अच्युत पटवर्धन हे 'टाअिम्स ऑफ इंडिया' चे वार्ताहर फरॅंक मोराअीस याना भेटण्यास येणार आहेत. या गुप्त भेटीच्या वेळीं त्या रात्रीं मी हजर राहण्यांत यश मिळविलें. अच्युतरावांचें अल्पकाळ दर्शन मला झालें. या माणसासाठीं ब्रिटिशांनीं मोठे इनाम जाहीर केलेलें होतें. कदाचित् यावेळी पोलिस तेथें छापा घालण्याची शक्यता निर्माण झाल्याचें कानावर आल्यानें, एका मोटारींतून अच्युतराव अज्ञात ठिकाणीं रवाना झाले व आम्ही आपआपल्या घरीं गेलो.

जनरल सर नोएल पिर्स हे या देशांत तसे नवीनच होते. भारत व हिंदी जनता यांचेविरुद्ध त्यांच्याजवळ आकस नव्हता. १९४२ च्या उत्तरार्धांत मला लेफ्टनंट कर्नल म्हणून तात्पुरती बढती मिळाली व माझी नेमणूक जनरल पिर्स यांच्या हाताखाली जनता संपर्क खात्यात झाली.

माझ्या व्यतिरिक्त हा हुद्दा धारण करणारे त्यावेळचे दुसरे हिंदी अधिकारी म्हणजे करिअप्पा हे होत. माझ्यापेक्षां नोकरीने व वयानें तेरा वर्षांनी ते मोठे होते. या दृष्टीनें माझ्या या बढतीनें मला मोठा आनंद झाला यात नवल नाहीं. करिअप्पा हे पुढे भारताचे पहिले 'कमांडर–इन्–चीफ' झाले. अनेक बाबतींत हा पहिलेपणाचा मान त्यांना लाभला. करिअप्पा हे उत्तम भारतीय नागरिक होते. त्यांनी चारित्र्याचा मोठा आदर्श निर्माण केला. राजकारणाची गुंतागुंत मात्र त्यांना समजत नसे. त्यांनीं सुरवातीलाच 'हें करा' 'हें करूं नका' अशा पद्धतीनें कांहीं ढोबळ नियम रूढ केले व हिंदी सैन्याला पुरेसा अनुभव येईपर्यंत यामुळें चांगले मार्गदर्शन झालें. सर्व सेनेवर त्यांची उत्तम छाप होती.

जनरल पीर्स हे आपल्या आकांक्षाविषयी अतिशय सहानुभूति असणारे होते, असें मला आढळून आलें. त्यांनी जेव्हां विषय काढला, तेव्हां मी त्यांना सांगितलें कीं भारतांतील ब्रिटिश सत्तेचे हें अस्तित्व यथायोग्य ठरवणें अशक्य आहे. दैनंदिन व्यवहारांत ब्रिटिश, हिंदी लोकांशी वागतांना जो भेदभाव करतात, तो कसा असह्य होतो याचीं उदाहरणें मी त्यांना दिली. मद्रास क्लबमध्यें हिंदी लोकांना प्रवेश दिला जात नाहीं हें मी त्यांच्या निदर्शनास आणलें. ही गोष्ट ऐकतांच त्यांनी या बाबतींत लक्ष घातलें. दुसऱ्या दिवशीं मला घेऊन ते मद्रासला गेले व या क्लबमध्यें मला मुद्दामच त्यांनीं जेवणाचें निमंत्रण दिलें. नियम–परीक्षा करावी यासाठींच हें त्यांनीं केलेलें होतें. मद्रासमधील गोऱ्या लोकांत यामुळें चलबिचल उडाली. जनरल पीर्स यांनी स्वकीयांशी मुकाबला चालू केला. परिणामी हें प्रकरण विरोधकांनीं मद्रासचे गव्हर्नर सर स्टॅन्ले जॅकसन यांचेपर्यन्त नेलें. गव्हर्नर साहेबांच्या जेव्हां हें लक्षांत आलें, कीं जनरल साहेब हें ऐकण्याच्या मनस्थितीत नाहींत, तेव्हां त्यांनी व्हॉईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांच्याकडे तक्रार केली. वेव्हेल यांनीं जनरल पीर्स यांना दोष दिला. ब्रिटिश राज्ययंत्रणेच्या गाड्यांत खीळ घालण्याचें हें कृत्य करून, सत्ताधाऱ्यांची अडवणूक करण्याबद्दल जनरल पीर्स यांचे कान उपटले गेलें. अशा रीतीनं

येथें कांहीं चांगलें करण्याच्या प्रयत्नांतील पहिल्या फेरींत जनरल पीर्स यांना अपयशच आलें.

दुसरें एक उदाहरण मी जनरल पीर्स यांना सांगितलें–

एकदा मी व माझा एक इंग्लिश सहअधिकारी गाडींतून प्रवास करीत होतो. एका अशाच खेडवळ लहान स्टेशनांत गाडी थांबली. तेथें जवळच एक भिकारी उभा होता. त्याच्या अंगावर जवळजवळ कपडे नव्हतेच व तो पार खंगलेला असा हाडांचा सांपळा दिसत होता. माझा सहप्रवासी म्हणाला–

'आम्ही जर तुम्हा 'वॉगस्' लोकांच्या सांगण्याप्रमाणें भारत सोडला व तुमच्या हवालीं हा देश केला तर प्रत्येक जण लवकरच असा भुकेकंगाल होईल.'

मी भिकाऱ्याकडे बोट करून उलट टोमणा दिला–

'दोनशें वर्षांच्या गुलामीनंतर, ब्रिटिश सत्तेनेंच आमची ही परिस्थिति करून टाकली आहे.'

मिकीव्ह या सोविएट लेखकानें पुष्कळ वर्षांपूर्वी भारतांतील प्रवास वर्णनांत जें म्हटले आहे ते मी अधृत केलें. तो आपल्या– 'आम्ही भारत पाहिला' या प्रवास वर्णनांत लिहितो–

'भुकेल्या लोकांची हृदयद्रावक जी दृष्यें आम्ही पाहिली ती आमच्या स्मरणांत जन्मभर राहतील. त्यांची आंत गेलेली छाती आणि पोटें, काड्यांसारखे पाय, कातडींतून बाहेर डोकावणाऱ्या बरगड्या, रोग-जर्जरता–'

बेरेसफोर्ड पिर्स यांना या हकिगती ऐकून फार दु:ख झालें. भारतानें स्वतंत्र व्हावें अशीच त्यांची इच्छा होती; परंतु त्यांच्या वरिष्ठांनीं त्यांचा आवाज बाहेर येऊं दिला नाहीं.

बंगलोर येथें आम्ही मृणालिनी व विक्रम साराभाई यांच्या शेजारीच राहात होतो. मृणालिनी ही कुशल नर्तिका; तर विक्रम हा मोठा शास्त्रज्ञ होता. दोघे प्रखर राष्ट्रीय वृत्तीची होती. माझ्या असे कानीं आले कीं, आतां स्वतंत्र पक्षांत गेलेले मीनू मसानी, हे त्या वेळीं

भूमिगत असतांना त्यांच्याकडेच लपून होते. सर्वच साराभाई कुटुंब देशसेवा करीत होते.

याच वेळेस केव्हांतरी मी, टॉम ट्रेनॉर या युद्धवार्ताहराबरोबर त्रिवेंद्रम व केरळांत केप कॅमोरीन येथें सफरीला गेलो असतांना, सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांचा पाहुणचार घेतला. सी. पी. या त्रोटक नांवानें ओळखले जाणारे– संस्थानचे हे दिवाण, कोटीबाजपणा व चतुर विनोदी संभाषण यासाठीं प्रसिद्ध आहेत.

टॉमनें त्यांना प्रश्न केला कीं, त्रावणकोर संस्थानांत साक्षरतेचे एवढें मोठें प्रमाण कसे होऊं शकले. सर सी. पी. नीं झटका दिला––

'तुम्हांला साक्षरता व शिक्षण यांतला फरक ठाऊक आहे कां ?'

'नाही बुवा !' टॉम मुद्दामच खोटें बोलला.

'मी हा फरक कसा आहे तो सांगतो–' सी. पी. सांगू लागले.

'माझ्या आईला पोथ्या-स्तोत्रें पाठ म्हणतां येतात; पण तिला लिहितां वाचतां येत नाही. कुठलीच भाषा तिला येत नाही. मी तिला संपूर्ण निरक्षर असून, मोठी ज्ञानी समजतो. मी काय सांगतोय, कळतंय ना ?'

'नाहीं लक्षांत येत !' टॉमनें कबुली दिली.

'माझ्या दोस्ता, मेकॉले साहेबानें लावलेला निरक्षरतेचा अर्थ मला अभिप्रेत असलेल्या अर्थाहून वेगळा होता.' सी. पी. नीं पुढे खुलासा केला.

यापुढें मात्र टॉमनें एकहि प्रश्न विचारला नाहीं.

यानंतर कांही महिन्यांतच, 'लॉस एंजल्स टाईम्स' या वृत्तपत्रासाठीं मध्यपूर्वेतील दोस्तांच्या हालचालीचे वृत्त, वृत्तपत्रकार म्हणून, गोळा करण्याच्या कामगिरीवर असतांना टॉम मारला गेला. 'लॉस एंजल्स' येथें त्याच्या घरीं त्याला भेटण्याचें मी कबूल केलें होतें, आणि हें काय झाले टॉम मारला गेला–कायमचा गेला !

या वेळीं मला १९४५ मध्यें घडलेल्या आणखी एका प्रसंगाची आठवण येते. माझा मित्र विंग कमांडर 'जंबो' मुजुमदार याला एका विमान अपघातांत वीर मरण आलें लढाईंत त्यानें उल्लेखनीय कामगिरी केलेली असल्यानें, आम्हांला असें वाटले कीं, ब्रिटिश सत्ताधारी, मुजुमदार यानें किती उत्तम-

रीतीनें देशाची सेवा केली, या संबंधीच्या माहितीला विशेषत्वानें प्रसिद्धि देतील; पण माझी निराशा झाली. त्याचा मृत्यू हा अनुल्लेखितच राहाणार असें दिसू लागलें. मला वाटलें हें योग्य नाहीं व आकाशवाणीवर त्याच्यासंबंधी शोक व्यक्त करण्याचें मी ठरवलें. जाहीर रीतीनें कांहीं बोलावयाचे तर त्याला खात्याची परवानगी असणें भाग होते; परंतु मला ती मिळण्याची खात्री नसल्यानें मी परवानगी वाचूनच आकाशवाणीवर बोलायचें ठरवलें. अखिल भारतीय आकावाणीचे डायरेक्टर झेड्. ए. बुखारी यांनीं, मला मोठ्या खिलाडूपणानें यासाठीं परवानगी दिली. अपेक्षा होती त्याप्रमाणें, मी परवानगीवाचून भाषण ध्वनिक्षेपित केलें व त्यांत एका हिंदी माणसाचा गौरव केला; ही गोष्ट दिल्लीच्या सूचना विभागाच्या लक्षांत आली. हा हिंदी माणूस त्यांच्यासारखा नीलनेत्री तरुण थोडाच होता ! मला व बुखारी यांना खुलासे करण्याची पाळी आलीच.

१९४२ च्या अखेरीस मेजर जनरल रीझ यांना मी पुन: भेटलो. मध्यपूर्वेतून जे त्या वेळीं परतले होते, त्यांच्या सांगण्याप्रमाणें आफ्रिकेंत सोलेम जवळ एका इंफंट्री डिव्हिजनचे नेतृत्व ते करीत असतांना, त्यांना पुरेशा रसदीची तरतूद नसतांनाच ते जिथें होते, ती जागा लढवण्याचा आदेश देण्यांत आला. रीझ यांनीं आपल्याला हें जमणार नाहीं असें सांगताच, कॉर्पस् कमांडरनें उद्वेगजनक अवस्थेंत रीझ यांचेकडून सूत्रें काढून घेतली. रीझ यांनी या प्रसंगीं जी भूमिका पत्करली, त्याचा वैयर्थ पुढे जी परिस्थिति निर्माण झाली तिने पुरेसा सिद्ध केलाच. एखाद्या शूर लष्करी नेत्याला अन्यायकारक रीतीनें शिक्षा मिळवण्याचा, हा कांहीं युद्धांतील पहिला प्रसंग मात्र नव्हता. रीझ यांना ब्रिगेडिअर पदावरून खालीं ढकलण्यांत येऊन त्यांची नेमणूक आर्मी हेडक्वार्टर्स, दिल्ली येथें 'आर्मी एस्टॅब्लिशमेंट कमिटी' चे अध्यक्ष म्हणून झाली. कांही काल ते बाजूला पडले. १९४३ मध्यें प्रथम बेरेसफोर्ड पिर्स यांचे ब्रिगेडियर म्हणून १९ व्या फलटणीचे नेतृत्व पुन: त्यांना मिळालें. मद्रासला एका लष्करी चांचणीच्या वेळीं एका मेजर जनरलची हांकलपट्टी होऊन ही जागा रिकामी झाली होती. या फलटणीनें पुढे मंडालें जपान्यांकडून पुन: जिंकून घेतलें, तेव्हां रीझ हे अगदी आघाडीवर होते. या वेळीं त्यांचे शौर्य व नेतृत्व हे गुण सर्वांच्या निदर्शनास आले.

रीझ ब्रह्मदेशांत जाण्यापूर्वी त्यांच्या माझ्या पुन: गांठीभेटी झाल्या. सायंकाळ उलटल्यानंतर झालेल्या या बैठकांतून, आमच्या पेशासंबंधी महत्त्वाच्या गोष्टींची चर्चा ते करीत असत. प्रत्येक रात्रीं ते मला एखाद्या गाजलेल्या लष्करी कथा सांगत. तीन साम्राज्यें जिंकून ५० राष्ट्रांना एकाच अंमलाखालीं गोंवणाऱ्या अशिक्षित चेंगिजखानाची माहितीहि त्यांनीं यांत सांगितली. त्यांतल्या त्यांत अरेबियाच्या लॉरेन्सची कथा जेव्हां ते सांगू लागले, तेव्हां तर मी भारून गेलो.

त्यांनीं सांगितलें कीं, लॉरेन्स यानें आपलें जीवन आपल्या इच्छेनुसार घडवलें. आपल्या सद्सविवेक बुद्धिशीं त्याच्या इतके इमान कुणाला साधलें नसेल. असें सांगतात कीं, युद्धानंतर 'कमांडर ऑफ दी बाथ' या मानचिन्हानें त्याचा गौरव करायचा ठरलें, तेव्हां त्यानें नकार दिला, हा मान ब्रिटिश राजाकडून मिळणार होता आणि लॉरेन्स यानें इंग्लंडच्या राजाच्या वतीनें शूर अरबांना जीं अभिवचनें दिलीं होतीं, त्यांनाच हरताळ फांसण्याची एकिकडे ब्रिटन तयारी करीत असल्यामुळें, हा मान घेण्यास त्यानें नकार दिला. लॉरेन्स हा मोठा विद्वान होता. 'सेव्हन पिलर्स ऑफ विझ्डम्,' हें त्याचें पुस्तक, इंग्लिश भाषेंतील महान पुस्तकांतील एक आहे. अतुल त्यागाची त्याची सिद्धता असे. निधडी छाती, अमाप धैर्य यामुळें मृत्यूला त्यानें अनेक वेळा हुलकावणी दिली. दु:खाचे वार सहज झेलले. त्याचें नांव हें इतिहसांत कायम झालेलें आहे.

रीझ यांचा यावर विश्वास होता कीं, बाकीचें कांहींहि असलें, तरी लढायांत नशिबाचा भाग कांहीं कमी नसतो. त्यांनीं सांगितलें-नेपोलियनबद्दल असें म्हणतात, कीं एखाद्या सेनानीला वरची जागा देतांना तो विचारीत असे— 'हा नशिबवान आहे कां ?' रीझ सांगत की, युद्ध म्हणजे आडाख्यांचीं अनुमानें असतात. त्यांनीं सांगितलें कीं, सेनानीवर नेहमीं आरोप केला जातो तो असा, कीं त्यांची लष्करी तयारी ही मागल्या युद्धांत उपयोगी पडणारी अशी नेहमीं असते. पुढें होणाऱ्या युद्धांत त्याचा उपयोग नसतो ! हाच युक्तिवाद उलटवायचा तर म्हणतां येईल कीं, राजकारणी हे कसल्याच युद्धाची कधीं तयारी करीत नाहीत ! रीझ सांगत, कीं लष्करी पेशाचा त्यांना अभिमान वाटतो, कारण देशाच्या रक्षणासाठींच यांतलें जगणें मरणें घडतें.

१९४३ मध्यें मला ब्रह्मदेशांत आराकान येथें, प्रत्यक्ष रणक्षेत्रावर जाण्याची आज्ञा झाली. या वेळीं—माझीं मुलं अनुक्रमे तीन व एक वर्षें वयाचीं होतीं. पत्नीचा व मुलांचा निरोप घेऊन, घाईघाईनें हातीं येतील, त्या आवश्यक वाटणाऱ्या वस्तु बॅगेंत भरून, मी लगेंच निघालो. कलकत्त्याहून मी चित्तगाँगला जाण्यासाठीं बोट पकडली. बोटीवरील प्रत्येकजण चिडलेला व त्रासलेला दिसत होता. सारख्या फेऱ्या मारून कांहींजण या अस्वस्थतेचें प्रदर्शनच करीत होते. आम्ही सर्वजण हें जाणून होतो कीं, आम्ही कांहीं सहलीला निघालेलो नव्हतो. अफवा अशा पसरल्या होत्या कीं, जपानी पाणबुड्यानीं आमच्या बऱ्याच बोटी बुडवल्या होत्या. म्हणून प्रत्येक वेळेला समुद्रांत एखादी कृष्णाकृती दिसली, कीं आम्हांला ती शत्रूची पाणबुडी तर नाहीं ना असें वाटें.

लेफ्ट. कर्नल ब्रम्हकपूर हा माझा जुना दोस्तहि याच बोटीवर होता. एकदां सकाळींच, मी व तो वरच्या डेकवर उभे राहून, समोरच्या अथांग समुद्राकडे पाहात असतांनाच धोक्याचा इशारा झाला. जो तो आपल्या नियोजित जागेकडे धांवला. शत्रूची एक पाणबुडी आमचा पाठलाग करीत होती हें—कळतांच, बोटीवर भीषण शांतता पसरली. आमच्या बोटी बरोबरची संरक्षक जहाजें लगेंच कामगिरीवर गेली व आम्हांला पुन: कांही ती पाणबुडी आढळली नाहीं.

मी चित्तगाँगला उतरलो व एका मोटार ट्रॅन्स्पोर्ट रेजिमेंटचीं सूत्रें हातीं घेतलीं. माझा अॅडज्युटंट टॉमी, हा फ्रेंच-कॅनेडियन होता. हा मोठा तरतरीत हुशार व कुणालाहि आवडावा असा होता. या व्यतिरिक्त पुष्कळ ब्रिटिश अधिकारी माझ्या हाताखाली होते. यापैकीं कुणीच कांहीं त्रास दिला नाहीं. एक दक्षिण आफ्रिकन मेजर मात्र याला अपवाद निघाला. माझा अधिक्षेप करून, त्यानें वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्याकडे याचना केली कीं, एका हिंदी माणसाच्या हाताखालीं त्याला काम करण्यास सांगू नये, या गैरशिस्त वागणुकीबद्दल त्याला शिक्षा करण्याचें सोडून वरिष्ठांनीं त्याचें म्हणणें उलट मान्य करून, त्याची बदली इतरत्र एका ब्रिटिश अधिकाऱ्याच्या हाताखालीं केली. युद्धांत देखील हिंदी माणसांविरुद्ध होणारा असा हा पक्षपात कांहीं नवीन नव्हता.

माझ्या कामगिरीचा भाग म्हणूनच मला अधुनमधून बुथीडांग, मुंग डॉ आदि प्रत्यक्ष लढाई व्याप्त क्षेत्रांत जावें लागें. एक दिवशीं मी जीपमधून बुथीडांगला जात असतांना, डोक्यावर विमानाचा घरघराट ऐकूं आला. रस्त्यावर मी एक वळण घेत असतांना वर पाहिलें, तों एक जपानी 'झीरो' फायटर विमान, माझ्या जीपवर झेप घेण्याच्या तयारींत दिसलें. मी हिसक्यासरशीं जीप थांबवली व जवळच्या झुडुपाआड उडी मारली. फायटरनें एक दोनदां, पक्षानें भक्ष्यावर झडप घालावी तशा प्रकारें जीपवर झेपा घेतल्या व बंदुकीनें वेड्यावाकड्या गोळ्या झाडल्या. आपल्या गोळ्यांनीं काम केलें या समजुतीनें तें विमान दुसऱ्या लक्ष्याच्या शोधांत लगेंच निघून गेलें.

याच विभागांत कांहीं दिवसांनंतर मी एका खडबडीत मार्गानें जात होतो. या मार्गावर नुकत्याच तिथें झालेल्या लढाईंत मोडतोड झालेल्या युद्धसाहित्याचें तुकडे पसरलेले होते. सायंकाळीं सूर्यास्तानंतर अर्धा तास झालेला असावा; आणि एकाएकी या मार्गापासून अगदीं नजिकच जपान्यांनीं अचानक हल्ला चढवला. या भूप्रदेशाची मला फारशी माहिती नसल्यानें, या भागांतून काळ्याकुट्ट अंधारांतून निसटतांना मला कठीण गेलें.

मी मुंगडॉला गेलो. तिथें जपान्यांशी आमची घनघोर लढाई सुरूं होती. तिथेंच मेजर (पुढे हे जनरल झाले.) के. एस्. थिमय्या यांची गांठ पडली. २५ व्या इन्फंट्री डिव्हिजनमध्यें ते अधिकारी होते.

प्राण नारंग व मी कॉलेजांत एकाच वेळीं होतो. आराकानमध्यें 'टेकडी ५५५' या ठिकाणापासून थोड्याच अंतरावर असलेल्या 'फ्रंटियर फोर्स बटालियन'मध्यें प्राण हा कंपनी कमांडर होता. लढाईला तोंड लागण्यापूर्वींच मी त्याला भेटलो. आम्हीं खूप गप्पा मारल्या. युद्धासंबंधीं, युद्धाचा आमच्या जीवनांवर होणाऱ्या परिणामासंबंधी, शौर्याबद्दल देण्यांत येणाऱ्या पदकांत होणाऱ्या भेदभावासंबंधी, अशा अनेक विषयांवर आम्हीं बोललो. आमचें याबद्दल एकमत झालें कीं, या सर्व दैवाच्या गोष्टी आहेत. प्रत्येकाला मरणाची भीति ही वाटतेच. आपलें अवयव निकामी होतील, यातना होतील याचीहि भीति वाटते. देह हा विनाशीच आहे ही शिकवण व लष्करी पेशाचा परंपराजन्य अभिमान या दोन गोष्टींमुळें, या भीतीवर मात करता

येते ही गोष्ट खरी असली, तरी ज कुणी असें सांगतात कीं, त्यांना भीति वाटतच नाहीं, ते थापा मारतात.

मी त्याचा निरोप घेण्यापूर्वी, तो म्हणाला कीं, पुढच्या कांही दिवसांतच तो रजेवर जाणार आहे. या हाणामारीपासून दूर आपल्या पत्नीच्या सहवासांत सुखानें कांही काळ घालवायचा, असें तो म्हणत होता; परंतु शैले या आंग्लं कवीनें म्हटल्याप्रमाणें--

Our sincerest laughter.
With pain is fraught.
(हळूं हंसतां पंचप्राण। दुःखाचें निधान। तेथ होई ॥)

या भेटीनंतर चोवीस तास झाले नसतील, तोंच 'टेकडी ५५५' या ठिकाणाजवळ झालेल्या लढाईंत प्राण मारला गेला. आतां लढाया संपल्या आणि आतां तो रजेवरहि जाणार नव्हता ! सुभेदार अमीरचंद यानें त्याला कान्यूदन जवळ अत्यंसंस्कार केला. मी या जागीं नंतर जाऊन आलो.

आराकानमधील या कामगिरीवर असतांना, सर्वसाधारणपणें युद्धव्याप्त प्रदेशांत वावरतांना ज्या खडतर- प्रसंगांतून व अडचणींतून जावें लागतें त्यांतून मलाहि जावें लागलें.

आराकान येथून कांहीं थोडा काल कलकत्याला आलो. तेथून १९४५ मध्यें माझी सिमला येथें 'आर्मी हेडक्वार्टर्सला' जनरल सर रेजिनाल्ड सॅव्हॉरी याचे हाताखालीं 'असिस्टंट अॅडज्युटंट जनरल' म्हणून नेमणूक झाली. यावेळीं स्वातंत्र्य येत आहे याची चाहूल सुरू झाली होती. नेहरूंची बऱ्याच तुरुंगवासानंतर सुटका झाली होती व व्हॉईसरॉय यांचेशीं बोलणी करण्यांसाठीं, ते सिमल्याला येणार होते ही बातमी वणव्यासारखी सर्वत्र पसरली. नेहरू आले तेव्हां त्यांच्या दर्शनासाठीं मी पत्नीसह गेलो. आम्हीं त्यांच्या निवासापाशी कसेबसे पोंचलो. त्यांच्या निवासाच्या सर्व प्रवेशद्वारावर जनसागर लोटला होता. प्रवेश मिळणें कठीण झालें होतें. त्यांनीं आनंदभरानें आमचें स्वागत अल्पकाळ स्विकारलें; कारण आमच्याप्रमाणें असंख्य जण त्यांच्या दर्शनासाठीं अुत्सुक होते. दुसऱ्या दिवशीं मी त्यांना भेटलो, तेव्हां त्यांनीं ब्रह्मदेशांतील युद्धासंबंधी पुष्कळ प्रश्न विचारले. मी तेथें युद्धांत लढलो होतो हें त्यांना ठाअूक होते. बोस यांच्या आझाद हिंद सेने—

बद्दल मला कांही माहिती आहे कां असे त्यांनीं विचारले. मी सांगितले की, दुर्दैवानें आराकान मध्यें त्यांच्या विरुद्ध जें सैन्य उभे ठाकलें होतें, त्यांतच मी होतो. १९४४ ची ही गोष्ट होती. कांही ठिकाणीं याच भागांत हिंदी सैनिकांना हिंदी सैनिकांशीच निरनिराळ्या ध्वजाखालीं येथें लढावें लागलें. मला असें वाटत होतें, की जरी बरेचजण देशभक्तीनें प्रेरीत होऊन आझाद-हिंद सेनेंत दाखल झाले असले तरी याला देखील अपवाद होतेच. त्या सैनिकांना जें भोगावें लागलें, त्याचा वृत्तांत मी पंडीतजींना सांगितला. जपान्यांनी त्यांना पुरेशी सामग्री किंवा पुरेशी शस्त्रास्त्रें पुरवली नसतांनाहि, मलायापासून लढत लढत ही सेना आसामपर्यंत येऊन पोचलीच. जरी अंती, त्यांचा ब्रिटीश व भारतीय सेनेनें पराभव केला, तरी कोहिना या भारतीय भूमीवरील ठिकाणापर्यंत त्यांनीं मजल मारून बोस यांना दिलेले वचन पुरे केले. मेजर शहानवाजखान यांनीं सांगितलेली, एका हिंदी हवालदाराची स्फूर्तिदायक कहाणी मी पंडितजींना सांगितली. सिंगापूरहून निघण्यापूर्वी, या हवालदारानें बोस यांना प्रतिज्ञापूर्वक सांगितलें होतें कीं, भारतीय भूमीवर, मुक्ती सैन्यासह पाय ठेवल्याखेरीज तो राहणार नाहीं. मग या प्रयत्नांत प्राणांची कुर्वंडी झाली तरी चालेल. ब्रह्मदेशांतील मोहि-मेंत लढत लढत तो कोहिमा शहराच्या सीमेवर येऊन पोचलाहि आणि तिथेंच दुर्दैवानें तोफगोळ्याच्या कवचांनीं त्याच्या शरीराच्या चिंधड्या उडाल्या. रक्ताच्या थारोळ्यांत छिन्नविच्छिन्न अवस्थेंत तो पडलेला असतां मेजर जनरल शहानवाज तेथें पोचले--

'सर...' आपला सेनानी जवळ आलेला पाहतांच तो वेदनायुक्त स्वरांत सांगूं लागला—

'तुम्ही नेताजी सुभाषचंद्र बोसांना जाऊन सांगा कीं, माझें वचन मी पाळले आहे.' इतके म्हणून भारतीय भूमीचे चुंबन घेऊन, तो हा इहलोक सोडून गेला. मी नेहरूंनाहि सांगितलें की, एकमेकांना भेटल्यानंतर 'जय-हिंद' म्हणण्याची आझाद हिंदच्या सेनाधिकाऱ्यांची पद्धत होती. त्यांचें जीवनसूत्र हें होतें की– 'जीना है तो मरना सीखो!'

हें सर्व ऐकतांना नेहरूंना गहिंवरून आले.

१९४६ मध्यें दिल्लीच्या इतिहासप्रसिद्ध लाल किल्ल्यांत, ब्रिटिशांनीं

आझाद हिंद सेनेचे अधिकारी, शहानवाझ, सेहगल व धीलाँ यांचेवरील लष्करी खटला सुरू केला. फितुरीचा, राजाविरुद्ध युद्ध केल्याचा आरोप, एक मुसलमान, एक हिंदू व एक शीख अशा या तिघांवर ठेवण्यांत आला.

आझाद हिंद सेना, ही सुभाषचंद्रांनीं युद्ध कैद्यांतून उभारली होती. यापैकीं बऱ्याच युद्ध कैद्यांवर त्यापूर्वी जपान्यांनी पुष्कळ अत्याचार करून त्यांना त्रास दिलेला होता. जेव्हां १९४३ सालीं सुभाषचंद्रांनीं मलायांत स्वतंत्र भारताचे तात्पुरते सरकार स्थापन केलें, तेव्हां सर्व हिंदी माणसांनीं त्यांना सुयशच चिंतलें होतें. (आजहि हिंदी सेनेंत हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, यांचा स्वयंपाक संपूर्णपणें एकत्र होत नाही. ही गोष्ट आझाद हिंद सेनेंत प्रत्यक्षांत घडून आलेली होती. तें एक मित्रकुटुंबच होतें.)

बोस व त्यांचे अनुयायी यांचे असें म्हणणें होतें कीं, पुष्कळ ब्रिटिश सेनाधिकाऱ्यांनीं मलायांत जें हिंदी सैन्य वाऱ्यावर सोडून पळ काढला, त्या युद्ध कैदी झालेल्या सैनिकांतूनच आझाद हिंद सेना निर्माण झालेली होती. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं ही सेना मदत करणार होती. यामुळें हिंदी सैन्याचें सत्वहरण झालें, शिस्त मोडली किंवा निष्ठा व कर्तव्याची जाणीव ठेवली नाहीं असें म्हणता येत नाहीं. जनरल थिमय्यांचा भाऊ व आमचे पुष्कळ मित्र आझाद हिंद सेनेंत होते. वस्तुतः हिंदी सैन्यांतील अनेकांची मतें या घटनेनें ढवळून गेलीं होतीं.

रणांगणावर, भारतांतील सेनेच्या कांही भागावर सत्ता स्थापन करणारे, सुभाषचंद्र बोस हे पहिलेच नेते होते. अति चमत्कारिक परिस्थितींत ही गोष्ट त्यांनीं केली. हिंदी लोकांची ब्रिटिश राजमुकुटासंबंधीच्या निष्ठेसंबंधी बोलायचें, तर जेवढी समजली जात असे तेवढी ही निष्ठा अभंग नाहीं, ही गोष्ट त्यांनीं सिद्ध केली. भारतांतील ब्रिटिश सत्तेचा एक मोठा आधार त्यांनीं नाहींसा केला. (१९४६ झालेलें नाविक बंड व हवाई दलाचें बंड यांनीं तर ब्रिटिशांची मृत्युघंटाच वाजवली. हिंदी खलाशी, वैमानिक किंवा सैनिक यांच्या मदतीनें भारतीयांना काबूंत ठेवणें यापुढें शक्य नाहीं ही गोष्ट त्यांनीं ओळखली.)

चर्चिल म्हणत असें कीं, 'जर माझ्या देशाचें संरक्षण होत असेल तर मी एखाद्या पापात्म्याचा मदतीचा हातहि झिडकारणार नाहीं.' रंगून येथून

ध्वनिक्षेपित केलेल्या आपल्या भाषणांत हीच गोष्ट निराळ्या शब्दांत बोस यांनीं सांगितली.–

'जर बलाढ्य साम्राज्य असलेल्या इंग्लिश राष्ट्राला, हातांत कटोरे घेऊन जगांत मदतीची याचना करण्यांत कांहीं लाज वाटत नाहीं, तर आमच्यासारख्या गुलाम झालेल्या निःशस्त्र लोकांना, परकियांची मदत कर्ज म्हणून घेण्यास कसला प्रत्यवाय आहे ?'

बंड हा शब्द कांहींसा 'कुरूप' वाटत असला, तरी पुष्कळ देश बंड करूनच स्वतंत्र झालेले आहेत. बोअर युद्ध हें बंडच होतें. जनरल स्मटस् हा बंडखोरच होता. डी. व्हॅलेरा आणि वॉशिंग्टन हे देखील बंडखोरच होते.

आझाद हिंद सेनेच्या अभियोगामुळें सगळ्या भारतांत मोठें औत्सुक्य निर्माण झालें. जणूं प्रत्येक हिंदी माणूसच आरोपीच्या पिंजऱ्यांत उभा होता. ब्रिटिशांना वाटत होतें, की या अभियोगाचा योग्य तो परिणाम सर्व हिंदी जमातीवर होईल. प्रत्यक्षांत त्याचा हिशोब चुकला. त्याऐवजी देशांत देशप्रेमाचीच 'न भूतो' अशी लाट उसळली. आरोप असा होता कीं आरोपींनीं सैनिकी प्रतिज्ञेचा भंग केलेला आहे. खरें पाहतां, त्यांनीं देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याची, जी दुसरी शपथ घेतली होती, त्यामुळें पहिल्या प्रतिज्ञेंतून ते आपोआप मुक्त झाले होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढणें याला, जीवनांतील इतर कुठल्याहि गोष्टीपेक्षां श्रेष्ठ स्थानच आहे. दुसरा आरोप असा होता, कीं त्यांनीं राजाविरुद्ध युद्ध केलें. आतां हा जो परकीय ब्रिटिश राजा, कीं ज्यानें त्यांच्या देशाला गुलामींत अडकवलें तोच त्यांचा राजा कसा काय ? खरें पाहतां हें आझाद हिंद सैनिकाधिकारी, युरोपांत स्वातंत्र्यासाठीं बंडाचें नेतृत्व करणाऱ्या डी-गॉल्ड सारखेच स्वातंत्र्यभक्त होते.

या आरोपितांची वकिली करण्याकरितां, सर तेज बहादुर सप्रू, सर बी. एन्. राव, भुलाभाई देसाई यांच्यासारखे नाणावलेले कायदेपंडीत पुढे आले होते. यांना जवाहरलाल नेहरू आणि असफअल्ली हे मदत करीत होते. हा अभियोग सुरू असतांना, मला भुलाभाईकडून एक निरोप आला. ब्रिटिश इंटेलिजन्स अधिकाऱ्यांच्या ताब्यांत असलेला एक महत्त्वाचा दस्तऐवज प्रयत्न करून मिळवायला हवा होता. या लोकांच्या बचावाच्या दृष्टीनें हा दस्तऐवज फार महत्त्वाचा ठरणारा होता. कर्नल रुद्र हे त्या वेळी आर्मी हेडक्वार्टर्स

मध्यें वरिष्ठ अधिकारावर होते. त्यांची मदत मिळाल्यानेंच, हा कागद-वाचनाकरतां कांहीं तास बाहेर नेणें शक्य झालें. अशा रीतीनें त्या दस्त-ऐवजांत काय आहे याचा तर्जुमा भुलाभाई देसाईंना कबुल केल्याप्रमाणें कळवणें मला शक्य झालें.

खटला पाहण्यासाठीं लाल किल्ल्यांत खूप मोठी गर्दी होत असे. मी एक दिवशी तिथें गेलो, म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं नंतर मी तेथें कां गेलो याचा खुलासा विचारला. मी सांगितलें, की हें 'कोर्टमार्शल' पाहण्यासाठीं जाऊं नये अशी आज्ञा निघालेली नाहीं व मी तेथें जाण्यांत कांहींहि वावगें नाही. हा विषय त्यांनी तेथेंच जरी संपवला, तरी मी त्यांच्या रोषाला यामुळें कारण झालो आहे हें माझ्या ध्यानांत आलें.

आतां तात्पुरतें राष्ट्रीय सरकार स्थापन झालेलें होतें. आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांना मुक्त करावें अशी मागणी देशांत जोरानें पुढें आली होती. ऑचिनलेक यांनीं नेहरूंना सांगितलें कीं असें जर केलें तर त्याचा शिस्तीवर वाईट परिणाम होईल व सैन्यांत बेदिली माजेल. कांहीं वरिष्ठ हिंदी लष्करी अधिकाऱ्यांचें मतहि असेंच होतें व तें त्यांनीं नेहरूंना कळवलें. जेव्हा नेहरूंनी या बाबतीत माझा विचार मागितला तेव्हां मी सांगितलें, कीं ब्रिटिशांना जी भीति वाटते त्यांत तथ्य नाहीं. जर हिंदी ध्वजाखालीं लढलेल्या या आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांना मुक्त केलें तर उलट या गोष्टीचें स्वागतच होईल. जे हिंदी लोकच ब्रिटिशांच्या या बाबतींतील भावनेशीं समरस झाले आहेत, ते केवळ धन्याचा आवाज करीत आहेत व त्यांच्याकडे लक्षच देऊं नये. नेहरूंचें हें खरोखरच शहाणपण म्हटलें पाहिजे, कीं त्यांनीं अखेर आझाद हिंद अधिकाऱ्यांना मुक्त करण्यासाठीं सर्वांचें मन वळवलें.

कर्नल एम्. एस्. हिंमतसिंहजी हा ब्रिटिश राज्यनिष्ट माणूस याच वेळीं ब्रिटिशविरोधी झाला, त्याची हकिगत ऐकण्यासारखी आहे. संस्थानी घराण्यांत नातें असलेला हा माणूस, ऑचिन लेक यांचा जुना मित्र होता. त्याच्या नोकरीची नोंद उत्तम असूनहि, आर्मी हेडक्वार्टर्सनें जेव्हां त्याला निरुपद्रवी अशा कर्नलच्या जागेवर नेमणूक केली; तेव्हां तो चांगलाच चिडला. त्यानें जेव्हां मला विचारलें, कीं

याबाबत त्यानें काय करावें, तेव्हां मी त्याला सांगितलें त्यानें झालेल्या अन्यायाविरुद्ध लेखी दाद मागितली पाहिजे. या उपर जर अन्याय दूर झाला नाहीं, तर त्यानें नोकरीचा राजीनामा द्यावा. यानंतर त्यानें ही गोष्ट ऑचिनलेक याचे नजरेस आणली व जेव्हां यानेंहि कांहीं वळेना, तेव्हां त्यानें राजीनामा पाठवून दिला. हा उपाय फारच कडक होता व असें कांहीं यापूर्वीं त्यानें कधींच केलेलें नव्हतें. कांहीं दिवसानंतर सेनादलाचा प्रतिनिधि म्हणून त्याची लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत नियुक्ति झाली. ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांना वाटत होतें, कीं असेंब्लींत तरी हा आतां त्यांच्याच तालावर नाचत राहील. त्यांच्याकडे पाहण्याचा, हिंमतसिंहजीचा दृष्टीकोन आतां बदलला आहे हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. जेव्हां आझाद हिंद सेनेचा प्रश्न चर्चेला आला तेव्हां मी हिम्मतला सल्ला दिला, कीं या चर्चेच्या वेळीं त्यानें राष्ट्रीय उद्दिष्टांसाठीं उपयुक्त, अशा रीतीनें बोलले पाहिजे. थोडी चर्चा केल्यानंतर त्यानें हें मान्य केलें. परंतु मलाच त्यानें भाषण लिहून देण्याची विनंती केली. मी हें आनंदानें केलें. इतकेंच नव्हे तर हें भाषण त्याचेकडून पुनः पुनः म्हणवून पाठच करवून घेतलें. ठरलेल्या तारखेला मोठा हिय्या करून त्यानें हें भाषण ठोकलें. यामुळें ब्रिटिशांची मोठी पंचाईत झाली व हिंदी राजकीय पुढाऱ्यांना व बहुतेक असेंब्ली सभासदांना मात्र हा गोड धक्का ठरला. काँग्रेस जनांनीं हिंमतचें अभिनंदन केलें व तो एकदम प्रकाशांत आला. पुढें हिमाचल प्रदेशाचा गव्हर्नर म्हणून नेमणूक झाल्यावर त्यानें मला पत्र लिहून, मी त्याला जो योग्य सल्ला दिला व ज्यामुळें त्याला पुष्कळ उल्लेखनीय सन्मान लाभले, त्याबद्दल आठवणीनें माझे आभार मानण्याचा चांगुलपणा दाखवला.

सर स्टॅफर्ड क्रिप्स हे दिल्लींत आलेले होते. भारताच्या स्वातंत्र्याचा हा मोठा पुरस्कर्ता होता. एका सायंकाळीं मला नेहरूंचें बोलावणें आलें. त्यांनीं भेटींत विचारलें, कीं क्रिप्स यांच्याशीं भेटीच्या वेळीं चर्चा करण्याजोगे कांहीं विशेष महत्त्वाचे मुद्दे आहेत काय ? ( नेहरूंनीं अशा रीतीनें अनेकांशीं सल्लामसलत केली असावी.) मी सांगितलें, कीं एकच मुद्दा मला सुचवावासा वाटतो– जेव्हां ब्रिटिश सत्ता भारतांतून काढून घेण्यांत येईल, त्याच वेळीं हिंदी सैन्याचें संपूर्ण राष्ट्रीयीकरण झालें पाहिजें. कांहींनीं सुचवल्याप्रमाणें नंतर केव्हां तरी तें करावयाचें म्हणून ठेवूं नये.

हंगामी भारत सरकारचे पंतप्रधान झाल्यावर, सप्टेंबर १९४६ मध्यें; १७ यॉर्क रोड नवी दिल्ली या निवासांत, नेहरू राहण्यास गेले. ७ सप्टेंबर १९४६ ला आकाशवाणीवर केलेल्या भाषणांत त्यांनीं भारताचें अंतर्गत व परराष्ट्रीय धोरणाची रूपरेखा सांगितली. सामान्य माणसाचें जीवनमान उंच करणें, जातीय सलोखा राखणें, अस्पृश्यतेविरुद्ध लढा देणें, कुठल्याही सत्तागटांत सामील न होणें, वसाहतवादानें ग्रासलेल्या व परावलंबी लोकांची दास्यांतून मुक्तता करणें, इंग्लंड व कॉमनवेल्थशीं देवाणघेवाणीचें नातें ठेवणें, अमेरिका व सोविएट रशिया या दोघांशीं मैत्री ठेवणें, आफ्रिका व आशिया खंडांतील देशांविषयीं विशेष जवळचे संबंध निर्माण करणें व सर्व जगाचें एक कॉमनवेल्थ करण्याचें उद्दिष्ट डोळ्यापुढें ठेवणें अशी ही रूपरेखा होती.

कांहीं कांहीं प्रश्नांबद्दल या दिवसांत नेहरू माझ्याशीं कधीं कधीं सल्ला-मसलत करीत असत. एकदा आपल्या नव्या जबाबदारीच्या सर्व कक्षा त्यांच्या ध्यानांत आल्यानंतर मात्र, असें प्रसंग क्वचितच् येऊं लागले. मी हें पाहिलें, कीं स्वातंत्र्यपूर्व काळांत नेहरू जसें व्यक्तिगत संबंधांत व इतर बाबतींत ठामपणें वागत असत, तसें तें आतां राहिलेलें नव्हतें. कदाचित असेंही असेल कीं जबाबदारीच्या ओझ्यामुळें हा बदल त्यांच्यांत झाला.

कर्नल पिगॉट हा माझा लगतचा वरिष्ठ होता. हा मोठा प्रामाणिक व सत्य सांगण्यास न कचरणारा होता. या सद्गुणांनीं त्यांचें अजिबात भलें झालें नाहीं. या गुणांमुळेंच हळूहळू त्याला, मेजर जनरल या अधिकारावरून कर्नलच्या जागेवर खालीं ढकलण्यांत आलें. यासाठीं नाना कारणें देण्यांत आलीं. आपल्या पेशाशीं समरस होऊन, आपल्या देशाची व सेनेची रक्त, घाम गाळून सेवा करणाऱ्या माणसाचे हें जिवंत उदाहरण होतें. याच्यापासून मी पुष्कळच चांगल्या गोष्टी शिकलों

प्राध्यापक अमरनाथ झा हें माझ्या चांगल्या ओळखीचे होते. रशियन सैन्यावर मीं लिहिलेला एक प्रबंध त्यांच्या एकदां पाहण्यांत आला. या प्रबंधांत मीं रशियन सेनेच्या उभारणीचें व त्यांनीं जर्मनाविरुद्ध दिलेल्या यशस्वी लढ्याचें वर्णन दिलेलें होतें. झा यांनीं ऑचिनलेक यांना हा निबंध दाखवला. ऑचिनलेक यावेळीं भारताचे सरसेनापति—'कमांडर-इन-चीफ' झालेले होते. झा यांचे ते चांगले मित्र होते. ऑक–याच त्रोटक नांवानें ते

सर्वत्र ओळखले जात. त्यांनीं मला अल्पोपहाराला बोलावलें. मोठ्या स्नेहपूर्ण रीतीनें यावेळीं ते वागले व मी जें लिहिलें आहे तें त्यांना आवडल्याचें त्यांनीं मला सांगितलें. पुढें माझ्या या वरिष्ठानें जेव्हां माझें लेखन मिलिटरी इंटेलिजन्सच्या डायरेक्टरांना दाखवलें, तेव्हां या डायरेक्टरांनीं त्या कागदांवर कांहीं बोचक टीकात्मक शेरे लिहिले. मीं जें लिहिलें होतें, त्यांत वस्तुतः कांहींहि राजकारण नव्हतें. परंतु नेहरूंशीं व इतर कांहीं राष्ट्रीय पुढाऱ्यांशीं माझा परिचय असल्यामुळें, मीं जें जें कांहीं करीन, त्या सर्व गोष्टींकडे कांहीं जणांनीं दूषित दृष्टीनें राजकारण म्हणून पाहण्यास आतां सुरुवात केलेली होती. कांहीं आठवड्यानंतर ऑक यांनीं मला 'जनरल स्टाफ' खात्यांत पहिल्या दर्जाची जागा देऊं केली परंतु हें घडण्यापूर्वीच, त्यांच्याच खटपटीनें—लष्कराचें राष्ट्रीयीकरण करण्यासाठीं नेमलेल्या समितीचा चिटणीस म्हणून माझी नेमणूक झाली. संरक्षणमंत्री बलदेवसिंग यांचा 'लायसन ऑफिसर'-संपर्काधिकारी म्हणून माझी शिफारस त्यांनीं खालील शब्दांत पाठविली होती—

नवी दिल्ली
४ ऑक्टोबर, १९४६

मत्प्रिय संरक्षणमंत्री,

सेनाप्रमुख व संरक्षणमंत्री त्यांच्यांतील संपर्काधिकारी म्हणून भरावयाच्या जागेसाठीं, मी आपल्याला लेफ्ट. कर्नल बी. एम्. कौल यांचें नांव सुचवतों. श्री. कौल हें सध्या जनरल हेडक्वार्टर्सला ॲसिस्टंट ॲडज्युटंट जनरल म्हणून काम करीत आहेत. हे स्टाफ कॉलेजांत शिकलेले असून, अतिशय हुषार आहेत व पुष्कळ अनुभवी आहेत. माझ्या मतें हे अतिशय चांगले अधिकारी असून त्यांचा भविष्यकाळ मोठा आहे. माझ्यासाठीं लागणारा, आपला संपर्काधिकारी म्हणून त्यांना नेमल्यास मला अतिशय आनंद होईल ... ...

आपला विश्वासू
ऑचिनलेक
फील्ड मार्शल

मला वाटतें ऑक हे हिंदी लष्कराचे मित्रच होते परंतु त्यांना नीट समजून घेण्यांत आलें नाहीं.

# ३

# इतस्ततः

## ३ : इतस्ततः

**१९४६ च्या** डिसेंबरांत, सेवादल राष्ट्रीयीकरण समितीचे अध्यक्ष सर गोपालस्वामी अय्यंगार यांचा चिटणीस म्हणून मी काम पाहण्यास सुरुवात केली. संरक्षण विषयांतील तज्ज्ञ कुंझरू व मेजर जनरल के. एस्. थिमय्या हे या समितीचे सभासद होते. आमचें काम हें होतें, कीं लवकरांत लवकर हिंदी सेनेंतील ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या जागी हिंदी अधिकारी कसे नेमता येतील याचा विचार करणें. १ जुन १९४८ पूर्वी हें हिंदीकरण करावें असें पुढें ठरविण्यांत आलें.

महत्त्वाच्या जागेवर काम करण्याची माझी ही पहिलीच वेळ होती. नजिकच्या भविष्यांत हिंदी सैन्य हें संपूर्णपणें आपल्याच लोकांच्या अधिकाराखालीं येणार या विचारानें मी उत्साहीत झालो होतो. मी माझ्या कामाला सुरुवात करण्यापूर्वी अगोदर कांहीं दिवस नेहरूंचें मला बोलावणें आलें. त्यांनीं विचारलें, की हिंदी सैन्याचें राष्ट्रीयीकरण लवकरांत लवकर कसें पुरें होईल? पूर्वी सांगितलें तेंच मी सांगितलें, की जरी लष्करी दृष्टचा आपण अननुभवी असलो तरी राजकीय दृष्टचा ताबडतोब राष्ट्रीयीकरण होणें अवश्य होतें. म्हणजे आपले स्वातंत्र्य कसल्याहि प्रकारे श्रृंखलाबद्ध राहणार नाहीं. नेहरूंचे मनांत अनेकांनी हें भरविलें होतें, कीं हिंदी सैन्यांतच ब्रिटिशांना आणखी कांहीं वर्षें ठेवण्यांत यावें, कारण या पेशाचा पुरेसा अनुभव आपल्याला नाहीं. मी जोर देऊन सांगितलें, कीं स्वतंत्र राष्ट्राचें संरक्षण परकीय अधिकाराधीन ठेवणें ही गोष्ट योग्य नाहीं.

पुष्कळ ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं आमच्या मंडळापुढें साक्ष देतांना सर्वसाधारणपणें सांगितलें, कीं आणखी पुष्कळ वर्षे तरी हिंदी लोक आपल्या सेनादलांचा ताबा घेण्यास पात्र ठरणार नाहींत. कांहीं अपवाद सोडतां बहुतेक हिंदी लोकांनीहि आपल्या साक्षींत, ब्रिटिश येथून लवकरच जातात कीं नाहीं कुणास ठाऊक या आशंकेनं निःसंदिग्धपणें कांहीं सांगितलें नाहीं.

त्यानी कातडी बचाऊ मधला मार्ग पत्करला. फक्त कांहीं हिंदी अधिकाऱ्यांनीं ताबडतोब राष्ट्रीयीकरण शक्य असल्याचें सांगितलें. यांत आतां लेफ्ट जन० झालेले परंतु तेव्हांचे मेजर जे. एस्. धीलाँ व पुढे पाकिस्तानचे मेजर जनरल झालेले अकबरखान हे प्रमुख होत. यांनीं धीट, तर्कशुद्ध व देशप्रेमाला साजेशी भूमिका मांडली.

गुरखा पलटणीचा अधिकार हिंदी अधिकाऱ्यांकडे न सोंपवण्याचे ब्रिटिशांचें धोरण असें. ऑचिनलेक यांनीं मंडळाला सांगितलें, कीं नेपाळचे राजेसाहेब व गुरखा सैनिक यांचें असें आग्रहपूर्वक म्हणणें आहे, कीं त्यांच्यावर फक्त ब्रिटिश अधिकारीच पुढेंही नेमण्यांत यावें. मी हें नेहरूंच्या नजरेस आणले व याबद्दल नेपाळ नरेशांना विचारण्यांत यावें अशी सूचना मी त्यांना केली. ही गोष्ट कळतांच नेहरू अतिशय अस्वस्थ झाले व त्यांनीं ताबडतोब सर गिरजा शंकर बाजपेयी यांना यासाठीं खाटमांडूला पाठविलें. बाजपेयी हे त्या वेळीं परराष्ट्र खात्याचे चिटणीस होते. दोन तीन दिवसांनीं बाजपेयी परतले. त्यांनीं सांगितलें, नेपाळ नरेशांचें असें कांहींहीं म्हणणें नाहीं. उलट गुरखा पलटणी या हिंदी अधिकाऱ्यांच्या हाताखालीं आल्या, तर आनंदच होईल असें ते म्हणाले. कदाचित् ऑचिनलेक यांचा या बाबतीत प्रामाणिक चुकीचा समज झालेला असावा.

गोपालस्वामी अय्यंगार, कुंझरु, थिमय्या व मुसा हे मंडळाचे आधारस्तंभ होते. मुसा यांना मी मंडळावर माझे नं. २ चे सहकारी म्हणून मुद्दाम मागून घेतलें होतें.

हिंदी सैन्याची प्रचंड शासन यंत्रणा, ही हळूहळू परंतु ठामपणें ब्रिटिशांकडून काढून घेण्यांत येऊं लागली व तीन स्वतंत्र कमांडर–इन्–चीफ–यांच्या आधिपत्याखालीं हिंदी भूदल, नौदल व वायुदल यांची यंत्रणा उभी झाली.

स्वातंत्र्य लढ्यांत सरदार वल्लभभाई पटेल यांनीं जो महत्त्वाचा वांटा उचलला होता, त्यामुळें मला त्यांचेविषयीं अतिशय आदर होता. त्यांनींहि कधीं कधीं, काश्मीर आदि कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांबाबत मला पूर्ण विश्वासांत घेतलें होतें. ते सकाळीं फिरायला जात व या वेळीं ते इतरांशीं बातचीत करीत. अशाच एका संभाषणांत त्यांनीं १९४७ च्या सुरुवातीलाच

मेला असें सांगितलें, कीं महाराजा हरिसिंग यांचा भारतासंबंधीचा दृष्टीकोन पुरेसा स्पष्ट नाहीं. त्यांनीं सुचवलें, की युवराज असतांपासून मी महाराजांना ओळखत असल्यानें व मलाहि काश्मीर संबंधांत रस असल्यानें, मी महाराजांना भेटून, भारताशीं खेळत न राहतां त्यांनीं काय तें एकदां निश्चित ठरवावें अशी सूचना त्यांना द्यावी. मी हरिसिंगाशीं लगेच संपर्क साधला परंतु त्यांच्याकडून निश्चित उत्तर पटेल यांना मिळालें नाहीं. पुढे परिस्थिति चिघळली व काश्मीरचें भारतांत सामिलीकरण होऊन, हा प्रश्न निर्णायक रीतीनें सुटला. या घटनेनंतर लगेचच मी फार आजारी झालो. पटेल हे स्वत: जातीनें माझ्या बिछान्यापर्यंत आले व त्यांनीं माझ्या प्रकृतीची चौकशी केली. मी या वेळी लेफ्ट. कर्नल होतो.

सरदार पटेल व नेहरू यांचे अनेक महत्त्वाच्या प्रश्नांबाबत एकमत नव्हते. यावर त्यांचे प्रक्षोभक मतभेद उडत. पटेल हे व्यवहारी होते तर नेहरू हे ध्येयवादी होते. दोघांच्या मागें अनुयायांची मोठी संख्या होती व महत्त्वाच्या प्रसंगीं दोघांनी सारख्याच तोलाची कामगिरी केली. भारताला दोघांचीहि नितांत गरज होती. नाजुक प्रश्न हाताळण्यांत पटेल यांचा हातखंडा होता. भारतांतील संस्थानांचें विलिनीकरण त्यांनी शांतपणें व लीलया घडवून आणलें; त्यांतून एकसंघ भारत निर्माण केला. त्यांच्या व्यवहारी परतु कठोर डावपेंचांनाच याचें श्रेय दिलें पाहिजे. हें राजकीय अद्‌भूत घडवतांना त्यांना तीन हुषार सनदी नोकरांनीं विशेष साहाय्य केले. व्ही. पी. मेनन्, विश्वनाथन् व व्ही. शंकर हे ते तिघेजण होत यांच्याप्रमाणेच एच्. एम्. पटेल व एच्. व्ही. आर्. अय्यंगार या सनदी नोकरांनींहि ब्रिटिश सत्ता भारतीयांकडे सोंपवतांना कांहीं कमी महत्त्वाची कामगिरी केलेली नाहीं.

१९४८ च्या सप्टेंबरांत हैद्राबाद संस्थान विरुद्ध सरदार पटेलांनींच पोलिसी कारवाई पार पाडली. जनरल बुचर यांनीं धोक्याचे इशारे दिल्यानें नेहरूंचें याबाबत ठामपणें कांहींहि ठरत नव्हतें. पाकिस्तानबाबत कडक धोरणाचा पाठपुरावा पटेल करीत, तर नेहरू हे सबुरीचें धोरण ठेवीत असत. आपल्या नेत्यांपैकीं अनेक जणांना सरदार पटेलांविषयीं अत्यंत आदर वाटे-धाकहि वाटे. कारण पटेल हे थोर शासकहि होते. उलट नेहरूंविषयी त्यांना फक्त आदरच वाटे.



*राजपुताना रायफलसमध्यें १९३९ साली सेकंड लेफ्टनंट असतांना लेखक.*

दोन महत्त्वाच्या घटना २३ मार्च १९४७ या दिवशीं घडल्या. एक म्हणजे पहिली आशियाई संबधांची परिषद या दिवशीं सुरू झाली. आशियांत नव्यानें उदयास येणाऱ्या आशा आकांक्षेचें प्रतीक असा हा मोठा मेळावा होता. आंतरराष्ट्रीय राजकीय रंगमंचावर नेहरूंनीं या परिषदेंत पहिला पदक्षेप केला. दुसरी घटना म्हणजे रिअर ॲडमिरल व्हायकाउंट माउंटबॅटन यांनीं वॅव्हेलची जागा घेतली. दुसऱ्या महायुद्धांत 'साउथ ईस्ट एशिया कमांड' या लष्कर विभागाचे ते सुप्रीम कमांडर होते. चर्चिल यांचेशीं त्यांचें

खूपच सख्य होतें व ब्रिटिश राजघराण्यांशीं त्यांचें नातें असल्यानें, त्यांचा राजकीय प्रभावहि चांगलाच होता. भारताचे व्हॉईसरॉय म्हणून ॲटली यांनीं त्यांची नेमणूक केलेली होती. वयानें ते अजून पन्नाशीच्या आंतच होते. ३० जून १९४८ रोजीं भारत-पाकिस्तान या उपखंडांतील राज्यसत्ता सोडण्याची ऐतिहासिक घोषणा ब्रिटिश सरकारनें जाहीर केली, त्याच्या दुसऱ्याच दिवशी ही नेमणूक जाहीर झाली.

माउंटबॅटन् यांनीं त्यांच्यावर सोंपविलेली कठीण कामगिरी मोठ्या कौशल्यानें, उत्साहपूर्वक, गोड शब्दांनीं व मोहकतेनं पार पाडली. एखादा तास राजकीय चर्चा झाली, कीं पुढचा कुणी भेटीस येण्यापूर्वीं, ते झालेल्या चर्चेचा वृत्तांत तोंडीं सांगून लिहवून घेत असत व यासाठीं ते पंधरा मिनिटें मुद्दाम राखून ठेवीत असत. यामुळें या चर्चांचा संपूर्ण व अधिकृत असा वृतांत त्यांचेपाशीं नेहमी तयार राहात असे. आपल्यावर सोंपवलेल्या कामाविषयीं ते अतिशय तत्परता राखून होते. उदाहरणार्थ त्यांनीं आपल्या दिल्ली येथील विविध कार्यालयांतून, एक दिनदर्शक लटकवलें होतें. सत्तांतराला किती दिवस उरले हें ठळक अक्षरांत यांत दाखवलेलें असें. त्यांना स्वत:ला व यासाठीं काम करणाऱ्या सर्वांना या सत्तांतराच्या महत्त्वाच्या दिवसाची सतत आठवण राहावी, यासाठीं त्यांनीं हा उपाय केलेला होता. अशा रीतीनें ब्रिटिश सत्तेचे सत्तांतराचें नाजूक काम त्यांनीं लक्षणीय अशा जलद गतीनें व पुष्कळ खडाजंगी होणारे प्रसंग टाळून हळूवारपणें पार पाडलें.

माउंटबॅटन हे यामुळें लोकांचे अतिशय लाडके झाले. इतके कीं, १९४७ सालच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनीं लोकांनीं 'माउंटबॅटनकी जय' अशा घोषणांनी त्यांचें स्वागत केलें.

असेही प्रसंग आले की नेहरूंच्या हिंदी राजकीय सहकाऱ्यांनी त्यांना एक विवक्षित कृति सुचवली तर माउंटबॅटन यांनीं त्यांना त्या विरोधी सल्ला दिला. अशा वेळीं रस्सीखेच होई व कांहीं काळ अनावस्थ प्रसंग निर्माण होई. माउंटबॅटन हे नेहरुंचे सदुपदेशक झाले व त्यांना अनेक बाबतींत नेहरूंचें मत फिरवणें शक्य झालें. यामुळें हिंदी शासन जसें काहीसें सुलभ झालें तसेंच तें कांहींसें दुर्गमहि झालें.

१९४५–४६ सालांत माऊंटबॅटन व नेहरू यांची पहिली भेट झाली व या पहिल्याच भेटींत दोघांची एकमेकांवर मोठीच वैयक्तिक छाप पडली. माऊंटबॅटन यांचें व्यक्तिमत्व अतिशय लाघवी होतें व हिंदी राजकीय मंत्र्यांशीं जुळवून घेण्यांतही ते यशस्वी झाले. नेहरू हे मनोवृत्तीनें पुष्कळसे आंग्लच असल्यानें, एखादे घर अग्निने झपाझप वेढले जावें, तशी या दोघांची मैत्री दृढ होत गेली. उभयतांच्या कुटुंबांत तर मोठाच जिव्हाळा निर्माण झाला. दोन्ही कुटुंबांत बऱ्याच गोष्टी समान होत्या. दोन्ही कुटुंबें देखणी, खानदानी व कुशाग्र होतीं माउंटबॅटन व नेहरू यांची मैत्री जुळली कारण दोघांची मनःप्रकृति एकसारखीच होती. लेडी माउंटबॅटन व नेहरू यांच्यांत जवळीक निर्माण झाली, कारण नेहरूंच्या एकाकी जीवनांतील एक पोकळी लेडी माउंटबॅटन यांनीं भरून काढली.

त्यांना निरोप देतांना नेहरू यांनी माउंटबॅटन दांपत्याचा कळकळीच्या शब्दांत गौरव केला. माउंटबॅटनकडे वळून नेहरू म्हणाले—

'आपण इथें आलांत ते मोठी कीर्ति संपादन करूनच, परंतु असे पुष्कळ कीर्तिमान या भारतांत आपली कीर्ति गमावून गेले. तुम्ही इथें अशा कालखंडांत आलांत कीं इथें अनंत अडचणी होत्या, आणीबाणीची वेळ होती आणि तरीहि तुमची कीर्ति त्यांतून तावून-सुलाखून निघाली. हें मोठेंच असें आपलें यश आहे...'

लेडी माउंटबॅटन यांना नेहरूंनीं म्हटलें—

'परमेश्वरानें म्हणा किंवा अप्सरांनी म्हणा, तुम्हाला देहसौंदर्य व उच्च दर्जाची बुद्धि दिली आहे; मोहकता दिली आहे, उत्साही वृत्ती दिली आहे. फार मोलाच्या या देणग्या आहेत. ज्या कुणा स्त्रीपाशीं या गोष्टी असतील ती स्त्री कुठेंहि गेली तरी मोठीच ठरेल. परंतु या सर्वांपेक्षां दुर्मिळ असणारी अशी आणखी एक गोष्ट आपल्यापाशी आहे आणि ती म्हणजे ऋजुता. मानवतेचें प्रेम, दुःखितांसाठीं हीनांसाठीं वाटणारी सक्रीय सहानुभूति या सर्व गुणांच्या दुर्मिळ समुच्चयानें आपलें व्यक्तिमत्व हें तेजस्वी व दयास्पर्शी झालेलें आहे. जिथें जिथें तुम्ही गेलांत तिथें तिथें तुमच्या रुपाने समाधान अवतरलें—

'हिंदी जनतेनें तुमच्यावर प्रेम केलें, आपल्या तीलच एक मानले आणि

आज तुमच्या वियोगाची वेळ आली असतांना या सर्वांना अतिशय दुःख होत आहे यांत आश्चर्य आहे काय ? माउंटबॅटन दांपत्याशीं आम्ही ज्या धाग्यांनीं बद्ध झालों आहोंत ते धागे तुटणारे नाहींत. आणि आम्हांला आशा आहे कीं इथें किंवा कुठेंतरी आपण प्रसंगाप्रसंगानें भेटत राहूं... '

माउंटबॅटन दांपत्यानें ब्रिटनची व भारताची उत्तम सेवा बजावली.

नेहरू व माउंटबॅटन कुटुंबाचें प्रेम पुढें वर्षानुवर्षें, अधुनमधून त्यांच्या होणाऱ्या गाठीभेटींनीं टिकून राहिलें. जेव्हां जेव्हां नेहरू व त्यांची कन्या इंदिरा ही इंग्लंडला जात, तेव्हां तेव्हां, किंवा माउंटबॅटन दंपती पूर्वेच्या बाजूला आली, तर एकमेकांच्या सहवासांत–आठवणीनें कांहीं काळ तरी ते घालवीत असत. एकदां लेडी माउंटबॅटन या नेहरूंच्याकड उतरलेल्या असतांना मला त्यांच्याबरोबर भोजनासाठीं निमंत्रण मिळालें. या वेळीं जेवतांना गंभीर विषयावर असें फारच थोडें बोलणें झालें. नेहरू हे अगदीं विलक्षण मोकळेपणानें वागत होते. माझ्याकडून त्यांनीं पूर्वीं ऐकलेलें कांहीं विनोदी किस्से, मी पुनः सांगावे असें त्यांनीं सांगितलें. मी त्यानंतर कांहीं गंमतीदार विनोदी किस्से त्या दोघांना ऐकवलें. '

ज्या इन्फन्ट्री विभागांत मी माझ्या लष्करी पेशाची सुरुवात केली, त्या-विभागाकडे माझी बदली करावी अशी वारंवार विनंती मी करीत होतो. परंतु लष्कराच्या हिंदीकरणासाठीं नेमलेल्या कमिटीचें काम संपतांच मला वॉशिंग्टन येथें तेथील वकिलातीचा लष्करी सल्लागार Military Attache) म्हणून जावें लागेल, असें मला कळवण्यांत आलें.

जून १९४७ मध्यें मी वॉशिंग्टनला निघण्यापूर्वी नेहरूंचा निरोप घ्याव-यास गेलो. नेहरू म्हणाले, कीं मी अमेरिकेंत जातो आहे याचा त्यांना फार आनंद वाटतो. आपल्या स्वातंत्र्य लढ्याच्या वेळीं अमेरिका ही भारताची मित्र होती व यामुळें स्वतंत्र भारतानें अमेरिकेशीं मोठे प्रेमाचे संबंध निर्माण करावे यासाठीं ते फार उत्सुक होते. त्यांची स्वाक्षरी असलेल्या एका कार्डावर चार शब्द लिहून त्यांनी मला सुयश चिंतिलें. अजून माझ्याजवळ हें त्यांचें कार्ड आहे.

माझी पत्नी व दोन्ही मुली यांचेसह 'क्वीन मेरी' या बोटीनें मी १९४७ च्या जुलै महिन्यांत न्यूयॉर्कला पोंचलों. तेथून पुढें वॉशिंग्टनला गेलों

मी तिकडे अमेरिकेंत माझें बस्तान बसवण्याच्या उद्योगांत असतांना, भारतांत परिस्थिति झपाटयानें स्फोटक होत गेली. इथें निर्माण होणाऱ्या गोंधळांतून सहिसलामत इथून निसटण्याची ब्रिटिशांना घाई झाली होती. नेहरूंच्या पुढें, पुष्कळच पेचांत टाकणारे प्रसंग निर्माण झाले होते. मोठया निरिच्छेनें त्यांनीं मुस्लीम लीगच्या पाकिस्तानच्या मागणीला कबुली दिली होती. ज्या भूभागांना पाकिस्तानांत जावयाचें नसेल, त्यांना होणाऱ्या पाकिस्तानांतून वगळण्यांत येईल या अटीवर नेहरूंनी ही मान्यता दिली होती.या निर्णयामुळें व उडालेल्या धार्मिक कत्तलींमुळें, पंजाव, बंगाल व सिंध येथील असंख्य जनता आपल्या प्रांतांतून उखडली गेली. निर्वासितांचा लोंढा सुरू झाल्यावर जातीय द्वेष व भावना सर्वत्र जागृत झाली व परिणामीं अभूतपूर्व अशी प्राणहानि आणि दुःख सर्वांना पाहावें लागलें. या सर्वांत अतिशय क्लेशकारक गोष्ट कोणची असेल तर ती ही, कीं या सर्व झगडयांत व हत्याकांडांत आपली आंतरीक शक्तीच नष्ट होत आहे याची सतत जाणीव होत होती. स्वातंत्र्यासाठीं झगडतांना जीं मूल्यें आपण शीरोधार्य मानलीं, आणि गांधीजींनीं जें जें कांहीं शिकवलें तें तें सर्व लोक जणूं अचानक विसरले होते. यावेळीं झालेल्या प्राणहानीचा व वित्तहानीचा हिशोब करणेंच अशक्य आहे. या भूमीला एक मोठें फेफरें आलें व या तडाख्यांत इथें हजारों प्रेतांचा खच पडला. यानंतर वर्षभरानें नेहरूंनीं सांगितलें–

'आम्ही फाळणी पत्करली ती या हिशोबानें कीं मोठी किंमत देऊन का होईना आम्ही त्या बदल्यांत शांतता व सदिच्छा मिळवूं शकूं...'

अखेर १५ ऑगस्ट १९४७ हा स्वातंत्र्य दिवस उजाडला. ब्रिटिशांचें निशाण खालीं आलें व तिरंगा वर गेला. दीडशें वर्षांची गुलामी संपली. देशाला उद्देशून केलेल्या आकाशवाणीवरील भाषणांत नेहरूंनीं सद्‌गदीत आवाजांत सांगितलें—

'ठरलेला दिवस अखेर उगवला. प्रारब्धानें हा दिवस ठरला होता. भारत पुनः उभा राहिला आहे. एका मोठया झोपेंतून– झगडयांतून आतां तो पूर्ण जागा झाला आहे. आतां तो युयुत्सु आहे; स्वतंत्र आहे. कांहीं प्रमाणांत आपण भूतकाळाशीं जखडलेलेंच राहणार आहोंत. आपण आतांपर्यंत जें जें करण्यासाठीं वचनबद्ध आहोंत, तें तें प्रत्यक्षांत उतरवीपर्यंत आपल्याला बरेंच

कांहीं करावें लागणार आहे. परंतु क्रांतिरेषा आपण आतां ओलंडली आहे. आपला इतिहास पुन: सुरू होत आहे. या पुढच्या इतिहासांत आपण जें जगूं, करूं, त्या संबधी इतरजण लिहिणार आहेत...या दिवशीं आपले विचार कुणाकडे वळत असतील तर ते स्वातंत्र्याच्या विधात्याकडे, राष्ट्र-पित्याकडे. भारताच्या आत्मिक शक्तीचा हा मूर्तिमंत अविष्कार आहे. त्यांनीं भारताची स्वातंत्र्यज्योत उंच हातीं धरली आणि आपल्या भोंवतीं पसरलेला अंधार अुजळून निघाला—'

याच दिवशीं वॉशिंग्टन येथील आपल्या वकिलातींत तिरंगा फडकवण्याचा व त्याला वंदन करण्याचा मान मला लाभला. जेव्हा आपल्या राष्ट्रगीतांचे सूर वाजवण्यांत आले, तेव्हा अंगभर हर्षाचे रोमांच मी अनुभवले. अभिमानानें मी फुलून गेलों. आशा वाटली कीं शतकांची सुस्तता व निष्क्रियता आतां संपेल आणि आतां स्वतंत्र झाल्याने नवा शक्तीशाली भारत आतां उदय पावेल.

इतिहासांत अगदीं प्रथमच हिमालयापासून तो कन्याकुमारीपर्यंत पसरलेला हा देश एका केंद्रसत्तेखालीं दाखल झाला होता. ही केंद्रसत्ता, लोकशाहीधिष्ठीत अशा निधर्मी आणि स्वायत्त अशा घटनेवर आधारलेली होती. या घटनेंत खालील मानवी हक्कांना स्थान होतें.

अ) आपलें मत मांडण्याचा संपूर्ण अधिकार. अधिकारावरील सत्तेवर टीका करण्याचा हक्कहि यांत अंतर्भूत होता.

ब) न्यायालयाचे अधिकार हे सर्वश्रेष्ठ. शासनाचा न्यायालयावर अधिकार नाहीं. कुठल्याही राजकीय पक्षाशीं या न्यायालयांना बांधिलकी नाहीं. गरिबांना आणि श्रीमंतांना समान न्याय.

क) सामान्य शेतकरी व कामगार यांना रोज श्रम करून आपलें वेतन मिळवण्याचा मुक्त अधिकार. कसल्याही पिळवणुकीची इथें भीति नाहीं.

ब्रिटिश व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन म्हणाला होता—

'भारतांतील आमची सत्ता आपण होऊन सोडण्याचा आमचा यत्किंचितहि विचार नाहीं. आमच्या पुढील पिढ्यांपैकीं कुणाच्या मनांत असा कांहीं विचार कधीं येईल अशीहि सुतराम शक्यता नाहीं.'

परंतु अखेर ब्रिटिशांना जावें लागलें. तलवारीच्या बळावर त्यांनीं जिंक-

लेला भारत देश, लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी सोडून १९४७ सालीं गोरा साहेब इथून गेला.

माझ्या मनांत आणि एकंदरीत सर्वच हिंदी माणसाच्या मनांत ब्रिटिश विरोधी भावना आतां या वेळीं जवळजवळ उरलीच नव्हती. गांधीजी व नेहरू यांनी ब्रिटिशांबाबत जें उदार धोरण पत्करलें, झालें गेलें विसरूं याही वृत्ती पत्करली, त्याचा हा विजय होता. १५० वर्षांच्या कालखंडांत ब्रिटिशांनीं व कांहीं प्रमाणांत युरोपियन लोकांनीं आपल्या उत्कर्षासाठीं जें कांहीं केलें त्यालाहि याचें श्रेय आहे. आपली पुरातन संस्कृती संशोधनांत त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. १७८४ सालीं सर विल्यम जोन्स यांनी बंगालची 'एशियाटिक सोसायटी' स्थापन केली. कालिदासाचें व भगवद्गीतेचें इंग्रजी भाषांतर यानेंच केलें. प्रिन्सेप या साहेबानें ब्राह्मी लिपीचा १८३७ सालीं प्रथम अर्थ लावला. अशोककालीन शीलालेख यामुळें आपण वाचूं शकलों. या कालखंडांतील दोन शीलालेख असलेले स्तंभ, त्यावर काय लिहिलें आहे तें वाचण्यासाठीं महंमद तघलकानें दिल्लीला आणलेले होते; परंतु तेव्हांपासून ती भाषा वाचण्याचे प्रयत्न फोलच ठरलेले होते. 'मोहेनजोदारो' येथील शिलालेख तर अजून आपल्याला अज्ञातच आहेत.

लॉर्ड कर्झन यानेंहि शिल्पशास्त्राच्या अभ्यासासाठीं बरेंच कांहीं केलें ब्रिटिशांनीं इथें उद्योगधंदे निर्माण केले, धरणें बांधलीं, कालवे बांधले, दळणवळणाचीं साधनें निर्माण केली व निःपक्षपाती न्यायदानाची परंपराहि त्यांनींच निर्माण केली.

एकाच केंद्रीय सत्तेशीं निष्ठा असलेलें अद्यावत् सैन्य, राज्यकारभाराची पोलादी चौकट, शिस्तीनें व संथवृत्तीनें काम करण्याची शिकवण ही सर्व ब्रिटिश राज्यसत्तेचींच देणीं आहेत.

चर्चिल यांनीं बऱ्याच वर्षांपूर्वी म्हटलेलें आहे—

'जर आपला भूतकाल व वर्तमान यांत आपण विकल्प निर्माण केला तर भविष्यच नाहींसें होण्याचा धोका संभवतो.' आपण ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें राहण्याचें ठरवलें याचा इतर अनेक भारतीयांप्रमाणेंच म्हणूनच मलाही आनंद झाला. ज्या नेहरूंना ब्रिटिश सरकारनें तेरा वेळा तुरुंगवास घडवला व ३२६२ दिवस गजाआड ठेवलें, त्या नेहरूंना राष्ट्रकुलाचें सभासदत्व

म्हणजे समान नात्यानें वागवण्याची हमी होती. तिथें राहून शांततेसाठीं व जगांतील ताण कमी करण्यासाठीं झटण्याची संधि त्यांना यामध्यें दिसत होती. ब्रिटिश राजमुकुटाला निष्ठा व्यक्त करण्याला मात्र त्यांचा विरोध होता. १९५० सालीं यांतून त्यांनीं मार्ग काढला व राष्ट्रकुलांतर्गत भारताचें स्वतंत्र गणराज्य त्यांनीं स्वीकारलें.

मायदेशांत खळबळजनक गोष्टी घडत असतांना, मी देशाबाहेर असावें हें दुर्दैव होतें. परंतु मी हळूहळू माझ्या नव्या कामगिरीची माहिती करून घेऊं लागलो. वॉशिंग्टन येथील आंतरदेशीय मंडळींत मी ओळखी करून घेऊं लागलों. राहावयाच्या जागेचा प्रश्न, मुलींच्या शाळेचा प्रश्न हे मी सोडवले. मी माझ्या दोन्ही मुलींना ' मॅरेट स्कूल ' या फ्रेंच संस्थेच्या शाळेंत दाखल केलें. वकिलांतीतील बहुतेक मंडळींचीं मुलें वॉशिंग्टनला याच शाळेंत शिकत होतीं. कांहीं महिन्यानंतर मी माझ्या थोरल्या मुलीच्या–अनुराधेच्या अभ्यासाची चौकशी करण्यासाठीं या शाळेच्या मुख्याध्यापिकेला भेटावयास गेलों तेव्हां मला गोड धक्का बसला. मला सांगण्यांत आलें कीं तिची हुषारी पाहून तिला एकदम दोन यत्ता वर घेण्यांत आलें आहे.

मी कांहीं दिवस अमेरिकन मिलिटरी अॅकॅडमी–वेस्ट पॉइंट येथें काढले. या प्रख्यात संस्थेची रचना व परंपरा यांचा थोडा अभ्यास केला. यावेळीं या संस्थेचीं सूत्रें जनरल मॅक्सवेल टेलर यांचेकडे होतीं.

सर्वसाधारण अमेरिकन माणूस हा गंमत्या असतो, असा मला अनुभव आला. एकदां मी एक टॅक्सी बोलावली व ड्रायव्हरला ' स्टेट डिपार्टमेंट ' कडे चल म्हणून सांगितलें. यावर त्यानें विचारलें—

' स्टेट डिपार्टमेंट ?'

मी पुनः सांगितलें– ' हो !'

यावर टॅक्सी सुरू करीत, तोंडांतला चिरुट चावीत तो उपहासानें म्हणाला—

' आमच्या देशांत पाहुणे,— स्टेट डिपार्टमेंट नाहीं ! तें तिकडे लंडनला आहे. आमचें परराष्ट्र धोरण तिथें ठरतें ! !'

नेहरूंची बहीण विजयालक्ष्मी पंडित यांना निरनिराळ्या परराष्ट्रीय परिषदांत भारताचें प्रतिनिधित्व करावें लागत असें. या वर्षी ' युनायटेड



*अमेरिकेंतील भारतीय दूत व लेखक.*

*[ १५ ऑगस्ट १९४७ रोजी वॉशिंग्टन येथें ध्वजारोपण करतांना ]*

नेशन्स ' मध्यें भारतीय तुकडीचें नेतृत्व करण्यासाठीं त्या आलेल्या होत्या. टी. एन्. कौल हे त्यांचे खासगी चिटणीस होते. मोठा आब राखून व्यासपीठापर्यंत त्या चालत गेल्या व भारताच्या वतीनें व इतर अप्रगत आशियाई देशांच्या वतीनें त्यांनीं भाषण केलें. सर्व सभागृहानें दीर्घकाल टाळ्या वाजवून त्यांच्या भाषणाचें कौतुक केलें. जगांतल्या सर्व निवडक हुषार अशा या श्रोतृवृंदापुढें, तर्कशुद्ध व मोहिनी टाकणारें भाषण करून त्यांनीं अविश्वसनीय वाटणाऱ्या सभागृहाचें मत हां हां म्हणतां फिरवून टाकलें. कुणालाहि अभिमान वाटावा असेंच या चिमुरड्या बाईचें हें कर्तृत्व होतें. कांहीं दिवसांनंतर जो प्रसंग घडला, त्यामुळें म्हणूनच मला आश्चर्याचा धक्का बसला.

एक दिवशीं सकाळींच वॉशिंग्टनला मला विजयालक्ष्मींचा फोन आला. मला व माझ्या बायकोला न्युयार्कला रात्री जेवणासाठीं त्यांनीं आग्रहाचें निमत्रण दिलें. निदान बोलण्यावरून मला तरी तें आग्रहाचें वाटलें. त्यांनी फोनवर सांगितलें कीं यु. नो. मधील कांहीं विशेष व्यक्तींना रात्रीं खान्यासाठीं बोलावलेलें आहे. या निमंत्रणाप्रमाणें मी बायकोसह न्यू-यॉर्कला या समारंभासाठीं गेलों. टी. एन्. कौल यांच्या खोलींत आम्ही बसलो असतांना, जेवण सुरूं होण्यापूर्वीं कांहीं मिनिटेंच मला विजयालक्ष्मींचा निरोप आला कीं मी व माझ्या पत्नीनें रात्रीचें जेवण इतरत्र कुठेंतरी घ्यावें. कारण आयत्या वेळीं आणखी एक जोडपें बोलवावें लागलें व त्यामुळें आम्हां दोघांना वगळणें भाग झालें होतें. मी उलट निरोप धाडला कीं अशा तऱ्हेनें तोंडावर अपमान करणें त्यांना शोभत नाहीं. वॉशिंग्टनपासून आग्रह कर करून आम्हांला जेवायला बोलावलेलें आहे, आणि इतरत्र जेवण घेणें मला शक्य होणार नाहीं. थोडीं मिनिटें गेलीं आणि प्रत्यक्ष बाईच खालीं धांवत आल्या नेहमीप्रमाणें टवटवीत दिसणाऱ्या विजयालक्ष्मींनी आमचें हार्दिक स्वागत केलें जणूं त्यांनीं आम्हांला थोड्या वेळापूर्वीं कांहीं अपमानकारक निरोप पाठवलाच नव्हता ! त्यांनीं जेवणासाठीं चलण्याची पुनः विनंती केली. आम्ही दोघे त्यांचें नाटक पाहून सर्द झालों. या घटनेला टी. एन्. कौल हे प्रत्यक्ष साक्षी आहेत. खरोखरच बाई दीर्घानुभवी मुत्सद्दी आहे यांत मुळींच शंका नाहीं !

पठाण टोळीवाल्यांनी २१ ऑक्टोबर १९४७ रोजीं काश्मिरवर आक्रमण केल्याचें वृत्त मी जेव्हां वॉशिंग्टनला ऐकलें, तेव्हां माझ्या मनांत पहिला विचार आला असेल तर तो हा कीं, आतां परदेशांत न राहतां तडक काश्मिरांत जावें; व प्रतिकारांत आपला वांटा उचलावा. मी म्हणूनच लगेंच भारतांत वरिष्ठांकडे तशी विनंती पाठविली. कांहीं दिवसानंतर मला नेहरूंकडून उत्तर आलें, कीं मी भारतांत परतावें.

मी दिल्लीला पोहोंचतांच नेहरूनीं मला सांगितलें, कीं दुसऱ्याच दिवशीं ते पूंच येथें जात आहेत व मी त्यांच्याबरोबर यावें. पूंच येथील ठाणें धोक्यांत आलेलें होतें. काश्मिरचें युद्ध चांगलें भडकलें होतें व पूंच हें अगदीं युद्ध भागांतच होतें

दुसऱ्या दिवशीं सकाळीं पंतप्रधान व पंतप्रधानांच्या बरोबरची मंडळी घेऊन विमानानें दिल्लीहून उड्डाण केलें. विमानांत सर गोपालस्वामी अय्यंगार, शेख अब्दुल्ला, ब्रिटिश सल्लागार जनरल रसेल, जनरल करिअप्पा व एन् व्ही. आर. अय्यंगार अशी इतर मंडळी होती. जम्मूला विमान उतरतांच लेफ्ट. जनरल कुलवंतसिंग यांनीं आमची भेट घेतली व रणक्षेत्रासंबंधी बोलणीं झालीं.

जे अनेक प्रश्न चर्चेला आले त्यांत डोमेल येथील पूल उडवून, टोळीवाल्यांची रसद रेषा उध्वस्त करणें शक्य होईल कां हा एक प्रश्न होता. मी ही कामगिरी अंगावर घेण्याची तयारी दर्शविली. नेहरू आमची चर्चा लक्षपूर्वक ऐकत होते. बरीच भवतिनभवति होऊन अखेर असें ठरलें कीं तूर्त या सूचनेचा अधिक विचार करूं नये.

आम्ही जेव्हां पूंचला पोहोंचलो तेव्हां लष्करी अधिकाऱ्यांनीं असें सांगितलें कीं हें ठाणें उपयुक्त ठाणें म्हणून लढवणें कठीण आहे. तें खालीं करावें. नेहरूंचा पारा एकदम चढला. त्यांनीं सांगितलें कीं पूंच लढवूं असें भारतानें वचन दिलेलें आहे. जोंपर्यंत पूंचचे नागरिक आपआपल्या जागीं ठाम आहेत, तोंपर्यंत पूंच लढवलें पाहिजे. म्हणूनच निःसंदिग्ध शब्दांत नेहरूंनीं आज्ञा दिली, की काय वाटेल ती किंमत पडली तरी पूंच लढवलें गेलें पाहिजे. अशा एखाद्या बाणेदार प्रसंगी नेहरूंना पाहणें हें फारच सुखदायक असें.

यानंतर थोड्याच दिवसांनीं मी जालंदरला गेलों व तिथून लेफ्ट. कर्नल मुसा यांना मी फोन केला. मुसा हे यावेळीं पाकिस्तान सेनेंत लाहोर येथें होते. मी त्यांना फोनवर सांगितलें कीं मला त्यांना भेटावयाचें आहे व भारत-पाक सीमा ओलांडून देण्याची परवानगी देण्याची व्यवस्था त्यांनीं करावी. त्यांनीं सांगितलें कीं आपण दोघे आतां निरनिराळ्या सेनांत आहोंत आणि या दोहोंत सध्यां वांकडें आलेलें असल्यानें सीमा ओलांडण्याचा प्रयत्न मी करू नये. त्यांच्या सांगण्याकडे लक्ष न देतां मी अत्तारी या सीमेवरील चेकपोस्टपर्यन्त मोटारीनें गेलों. तेथील पाक रक्षकानें माझ्याकडे त्यांच्या हद्दींत येण्याचा परवाना मागितला. मी त्याला, माझेकडे परवाना कां नाहीं याची कारणें काय द्यावी याचा विचार करीत असतांना या रक्षकाचा

कमिशण्ड अधिकारी तिथें दाखल झाला व त्यानें मला ओळखणारें रुंद हास्य केलें. दोघांनाही आठवलें कीं कांहीं वर्षांपूर्वी आम्ही दोघे एकाच ठिकाणीं काम करीत होतो. फारसा घोळ न घालतां त्यानें मला सीमेच्या आंत येऊं दिलें; कारण मी लेफ्ट. कर्नल मुसा यांनाच भेटायला निघालो होतो, हें मी त्याला सांगितलें. मी व मुसा दोघे मित्र आहोंत हें त्याला ठाऊक होतें. भारतीय पाकिस्तानी सैनिकाचा गणवेष त्यावेळेपर्यंत एक सारखाच होता. तासाभरानें मी आत्मविश्वासपूर्वक लाहोरच्या आर्मी हेड-क्वार्टर्स मध्यें पाऊल टाकतांच, तिथल्या पाकिस्तानी रक्षकाला मी भारतीय असेन असा संशय देखील आला नाहीं. त्यानें मला चटकन् सलाम ठोकला. कारण त्याला मी पकिस्तानी सेनाधिकारीच वाटलों. मला घेऊन तो तडक मुसा यांचेकडेच गेला. मलाही नीट समजण्यापूर्वी मी मुसा यांचेपुढें हजरहि झालों. मेजर जनरल महंमद इफ्तिकारखान हे त्या क्षेत्राचे कमांडर होते व पलिकडच्या खोलींतच ते बसलेले होते. मुसा मोठ्या पंचायतींत पडलेले दिसले. त्यांनीं मी येऊं नये म्हणून सांगून पाहिलें होतें परंतु मी लाहोरमध्यें त्यांच्या कचेरींत त्यांच्या समोरच प्रत्यक्ष दाखल झालों होतों. त्यांनीं मला निश्चयपूर्वक सांगितलें, कीं अनुज्ञा नसतांना पाकिस्तानांत येण्याचें मला कारण नव्हतें व मी भारतांत आल्या पावलीं परतलें पाहिजे. खरें पाहिलें तर मला तिथल्या तिथें अटक करणें त्यांना शक्य होतें. त्याऐवजीं त्यांनीं मला एका जीपमध्यें घातलें व बरोबर संरक्षक सोबत देऊन मला अत्तारीकडे न जातां फेरोजपूरकडे लवकरांत लवकर निघून जाण्यास सांगितलें त्यांच्याशी वाद घालण्यांत अर्थ नव्हता. मी सहिसलामत भारतांत परतलों तो केवळ नशिबानें.

एका आठवड्यानेंच संरक्षणमंत्री बलदेवसिंग यांनीं पंजाबच्या सरहद्दीवर दहा हजार गनिमी सैन्य स्थानिक गांवकऱ्यांतून निर्माण करण्याचें काम मला दिलें. पाकिस्तानकडून धोका असल्यानें हें करावें लागत होतें. मी ही कामगिरी तत्परतेनें हातीं घेतली. या कामीं आझाद हिंद सेनेचे जनरल मोहनसिंग, यांनीं मला चांगलें साहाय्य दिलें. परंतु या लोकांना शस्त्रास्त्रें पुरवण्यास वरिष्ठांकडून नकार आला. उलट शस्त्रास्त्रें नसलेलें सैन्य उभें करण्यांत कांहींच अर्थ नाहीं, असें माझें मत झालें होतें. मी याची तड लावून घेण्याच्या विचारांत असतानांच मला दिल्लीहून नेहरूंचें बोलावणें आलें.

मला दोन दिवसांत 'लेक सक्सेस' येथें सर गोपाळस्वामी अय्यंगार यांचा लष्करी सल्लागार म्हणून जाण्यास सांगण्यांत आलें. सुरक्षा समितीपुढें, काश्मिर प्रश्न आलेला होता; व तेथील भारतीय तुकडीचे नेते म्हणून सर गोपाळस्वामी अय्यंगार यांची नेमणूक झालेली होती. नेहरूंनी मला सांगितलें कीं काश्मीरमध्यें प्रत्यक्ष लढाईंत भाग घेऊन मी जी देशसेवा करूं शकतो, त्यापेक्षां अधिक देशसेवा मी युनायटेड नेशन्समध्यें गेलेल्या आपल्या शिष्टमंडळाचा सल्लागार म्हणून काम करून करूं शकतो. अनिच्छेनें मी जानेवारी १९४८ मध्यें विमानानें पुन: अमेरिकेंत दाखल झालों.

वॉशिंग्टनला जाण्यासाठीं दिल्ली सोडण्यापूर्वी कांहीं दिवस, एका सायंकाळीं नेहरूंनी एअर व्हाईस मार्शल मुखर्जी व मला आपल्या निवासस्थानीं बोलावून घेतलें. मुखर्जी व ते यांच्यांत पूर्वी केव्हांतरी झालेल्या चर्चेचा संदर्भ देऊन नेहरूंनीं मला, अमेरिकेंत 'मिचेल ब्रॉम्बर' विमानें खरेदी करण्याची कितपत शक्यता आहे हें पाहाण्यास सांगितलें. वस्तुत: वॉशिंग्टन येथें असलेलें भारताचे वकील असफअल्ली, यांना या नाजूक बाबतींत कांहींही न सांगता नेहरूंनी त्यांना डावलून ही कामगिरी मला कां सांगावी, याचीं कारणें मला शोधतां आलेली नाहींत.

अमेरिकेंत परतल्यावर अधिकृतरीत्या कांहींही करण्यापूर्वी, मी लुईस जॉन्सन यांची भेट घेतली. १९४२ सालीं अध्यक्ष रुझव्हेल्ट यांचे खास प्रतिनिधी म्हणून त्यांनीं भारताला भेट दिलेली होती व भारताच्या स्वातंत्र्याची मागणीहि उचलून धरली होती. आपलें वजन खर्च करून जॉन्सन यांनीं युद्धकालीन साहित्यांतील जें शिल्लक साहित्य, आतां व्यापारी पद्धतीनें विकाऊ झालेलें होते, त्यांतून ही बॉम्बर्स भारताला देण्याची सर्व वाटाघाट पुरी केली. परंतु ही वार्ता कशी कुणास ठाऊक, बाहेर फुटली व स्टेट डिपार्टमेंट व ब्रिटिश यांना या गोष्टीचा सुगावा लागला. परिणामीं अमेरिकन शिष्ट मंडळाचे नेते वॉरन ऑस्टिन व ब्रिटिश शिष्ट मंडळाचे लष्करी सल्लागार लॉर्ड इस्मे यांनीं या बाबतीत मला प्रश्न केले. लॉर्ड इस्मे यांचें म्हणणें होतें कीं दोन्ही देशांचे पूर्वीचे संबंध लक्षांत घेतां, भारतानें ही लष्करी साहाय्याची मागणी ब्रिटनकडे केली असती, तर ते अधिक उचित झालें असतें. वॉरन ऑस्टिन

यांनीं उलट विचारलें, की या बाबतीत मी अथवा असफअल्ली यांनीं स्टेट डिपार्टमेंटकडे चौकशी केली नाहीं, याला कांहीं खास कारण आहे काय? मी सांगितलें कीं, सरकारी चक्रें क्वचितच् द्रुतगतीनें फिरतात व आम्हांला तर फार घाई असल्याने अशा परिस्थतींत इतर जे करतात तेंच मी केलें. ऑस्टिन यांनी खेदपूर्वक सांगितलें, कीं अमेरिकन सरकार हा व्यवहार होऊं देणार नाहीं. कारण भारत व पाकिस्तान यांत भेदभाव करतां येणार नाहीं! मी वाद घातला, कीं आमचा देश पाकिस्तानशीं जवळजवळ युद्ध स्थितींतच आहे व पाकिस्ताननें आमच्या प्रदेशावर आक्रमण केलेलें आहे या संकटापासून बचावण्यासाठीं आम्हांला शक्य असेल तें सर्व करण्याचा अधिकार आहे. वॉरन ऑस्टिन यांचा निर्णय मी बदलूं शकलो नाहीं व या व्यवहारातून भारताला बॉम्बर्स मिळूं शकलीं नाहींत.

अय्यंगार यांच्या सुरक्षा समितीमधील सुरुवातीच्या भाषणासाठीं, मुद्दे तयार करण्यांत मी व परराष्ट्र खात्यांतील श्री. हकसर यांनीं रात्र जागून काढली परंतु अय्यंगार यांनीं हातीं असलेला पुरावा, अगदीं मवाळ पद्धतीनें भाषणांत मांडला. फार तर असें म्हणतां येईल, कीं अगदी सभ्य माणसासारखे ते बोलले. परंतु त्याचा या आंतरराष्ट्रीय, निष्ठूर अशा न्यायासनावर फारसा परिणाम होऊं शकला नाहीं. पाकिस्तानी शिष्ट मंडळाचे नेते सर महंमद झाफरुल्लाखान, यांनीं या उलट परिणामकारक प्रतिहल्ला चढवला. आम्ही अय्यंगार यांना सांगितलें, की झाफरुल्लाखान यांच्या भाषणांत पुष्कळ चुकीवर आधारलेले आरोप आहेत व याचा त्यांनीं जोरदार प्रतिकार करावा. सर अय्यंगार म्हणालें, की पाकिस्ताननें कांहीही केलें तरी चिखल उडवण्यास त्यांची तयारी नाहीं. भारताची प्रतिष्ठा संभाळली पाहिजे! झाफरुल्लाखान यांच्या पोकळ वक्तृत्वाची आपण उपेक्षाच केली पाहिजे. १९६५ साली पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री भुत्तो यांनीं सुरक्षा समितीमध्यें आपल्याला अशीच शिवीगाळ केली, तेव्हांही आपण सभागृहांतून फक्त चालते झालो, परंतु तिथल्या तिथें त्यांना परिणामकारक उत्तर दिले नाहीं.

मध्यंतरीच्या काळांत शेख अब्दुल्ला हे आमच्या शिष्टमडळांत दाखल झाले होते. ते त्या वेळीं आपले समर्थक होते. मी माझ्याच विनंतीनुसार

रशियाचे सुरक्षा समितीमधील प्रमुख प्रवक्ते ग्रोमिको यांच्या घरीं जेवणा-साठीं गेलो होतो. अगदी निघायच्या वेळेला, शेख अब्दुल्ला हे माझ्याबरोबर आपण होऊन ग्रोमिको यांचेकडे जेवणासाठीं आले. मी ग्रोमिको यांना प्रश्न केला, की रशियाच्या वतीनें काश्मीर प्रश्नाबाबत ते भारताच्या बाजूला पाठिंबा देतील काय. तेव्हां त्यांनीं मोठें गूढ उत्तर दिलें. ते म्हणाले, जवळजवळ दोनशें वर्षे भारतांत राज्य केल्यानंतरहि जर ब्रिटिशांना तेथील प्रश्न नीट न समजतांच भारत सोडावा लागला, तर आमच्या अडचणीची कुठें तोंडओळख झालेल्या त्यांच्या देशानें, या बाबतींत ब्रिटिशांइतकें तरी ज्ञान कुठून आणावें ? घाईनें या काश्मीर प्रश्नाबाबत ठाम भूमिका घेणें रशियाला शक्य होणार नाहीं ! खूप वेळ आम्ही बोलत होतो. या सर्व संभाषणांत ग्रोमिको अत्यंत सावधपणें बोलत होते. त्यांनीं सांगितलें, कीं रशियन शिष्टमंडळ विरोध करणार नाहीं वा पाठिंबाहि देणार नाहीं व काश्मीर प्रश्नाबाबत सुरक्षा समितीमध्यें मत न देतां ते तटस्थ राहतील.

काश्मीर प्रश्नाबाबत सुरक्षा समितीमध्यें बोलण्याचा शेख अब्दुल्ला यांनीं अनेक वेळां प्रयत्न केला, परंतु अय्यंगारांनीं त्याला संमति दिली नाही. अर्थात 'शेरे-ई-काश्मीर' याला काबूत ठेवणें कठीण होतें. त्यांना गुदमरल्यासारखे फार काळ राहणें शक्यच नव्हतें. ते संधीची वाट पहात होते. फेब्रुवारींत शेख अब्दुल्ला यांनीं पूर्व तयारी न करतां भाषण करून आम्हांला चकित केलें. काश्मीर प्रश्नाबाबतचें हें चौफेर व ओजस्वी कथन होतें. पाकिस्तानला उद्देशून त्यांनीं विचारलें—

'आमच्या स्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते आपण याच वेळीं कसें काय झालांत ? मला ठाऊक आहे कीं १९४६ मध्यें मी जेव्हां 'छोडो काश्मीर' ही आरोळी ठोकली, तेव्हां पाकिस्तानचे थोर नेते महंमद अली जिना यांनीं माझ्या चळवळीला विरोध केला व जाहीर केलें, कीं मूठभर संधिसाधूंची ही चळवळ आहे आणि त्यांना या चळवळीशीं कांहींहि कर्तव्य नाहीं...'

नेहरूंचा उल्लेख करून शेख अब्दुल्लांनीं सांगितलें, कीं अशा थोर माणसानें त्यांना आपला मित्र मानावें हा त्यांचा सन्मान आहे; नेहरू हे काश्मीरी आहेत आणि रक्ताचें नातें हेंच अखेर श्रेष्ठ ठरतें.

काश्मीर प्रश्न रेंगाळत राहिला. सर्व बाजूंनीं अनेक भाषणें झालीं. चार

महिनें आम्ही सुरक्षा समितीमध्यें घालवले. दोन्हीकडून पुष्कळ जण बोलत होते. सगळा सत्तास्पर्धेचा खेळ होता. अखेर झालें काय तर काश्मीर मधला जो आक्रमक पाकिस्तान त्याला बळकावलेला प्रदेश खाली करण्यास सांगण्यांत आलेंच नाहीं !

३० जानेवारी १९४८ रोजीं पहांटे न्युयॉर्क येथील हॉटेलांत माझा फोन घणघणला व मी जागा झालो. युनायटेड प्रेस ऑफ अमेरिका या वृतसंस्थे-च्या निवेदकानें सांगितलें, कीं दिल्लींत आतांच गांधीजींचा वध झाला आहे. शांततेचा अग्रदूत, ख्रिस्तानंतर झालेला सर्वांत थोर पुरुष, आपल्या देशाचा स्वातंत्र्य निर्माता व राष्ट्रपिता, एका देशबांधवाकडून मारला गेला होता. सुरक्षा समितीनें दोन मिनिटें शांतता पाळून गांधींविषयी आदर व्यक्त केला. इतका असंख्य देशांच्या प्रतिनिधींना गांधीजींच्या निधनानें पोरकेपणा वाटावा, हें दृश्य मोठेंच मनांत भरणारें होतें. भारतांत अश्रुपूर्ण नेत्रांनीं व सद्‌गदित आवाजांत नेहरूंनीं उद्‌गार काढले—

'माझ्या मित्रांनो, सहकाऱ्यांनो; आपल्या जीवनांतील ज्योत आतां विझली आहे. सर्वत्र अंधार अंधार झाला आहे. तुम्हांला मी काय सांगावें, कसें सांगावें...आपला लाडका नेता आतां सोडून गेला आहे .. ... '

मी लगेंचच भारतांत परतण्यासाठीं गडबड सुरू केली. अय्यंगार यांनीं अखेर संमती दिली; व 'नवीन एलिझाबेथ' बोटीनें मी घरीं यायला निघालो. तेवढ्यांत नेहरूंचे प्रमुख खासगी चिटणीस एच्. व्ही. आर. अय्यंगार यांची तार आली, की नेहरूंची इच्छा आहे. मी अधिक काळ शिष्टमंडळा-बरोबरच राहावें. दुसरा आतां पर्यायच नव्हता. मी बोटीवरून खालीं उत-रलो. सतत प्रयत्न केल्यानंतर बरेच दिवसानंतर अखेर काश्मिरमध्यें जाण्या-साठीं मला दिल्लीला येण्याची परवानगी मिळाली.

याच ठिकाणीं मला थोडेंसें काश्मिरचें वर्णन दिलें पाहिजें व तेथील घडलेल्या कांहीं घटनांचा तपशील सांगितला पाहिजे. काश्मीरचें क्षेत्रफळ ८५,००० चौरस मैल आहे. लोकसंख्या चार दशलक्षाहून अधिक आहे यातले तीन दशलक्ष मुसलमान आहेत व उरलेले हिंदू आहेत. दोन शं चाळीस मोठीं गांवें व ९००० खेडीं इथें आहेत. खनिज संपत्ती इथें खल नुसार आहे; व लोकांचा मुख्य व्यवसाय शेतीचा आहे.



*सर गोपालस्वामी अय्यंगार, अेम्. सी. सेटलवाड व लेखक*
*[ सुरक्षा समितींत १९४८ सालीं काश्मीर प्रश्न गेला तेव्हां ]*

भारतांतून ब्रिटिश निघून गेल्यानंतर येथील ५६५ संस्थानांना, भारत किंवा पाकिस्तानांत सामील होण्याचा निर्णय घ्यावयाचा होता. घटनेप्रमाणें जीं संस्थानें भारतांत विलीन होतील, तीं भारताचा अविभाज्य घटक होणार होतीं. जम्मु व काश्मीर संस्थानानें आपला निर्णय लांबणीवर टाकला व १२ ऑगस्ट १९४७ रोजीं भारत 'जैसे थे' परिस्थितींत राहण्याचा इरादा जाहीर केला. पाकिस्तानला याचा राग येऊन त्यांनीं काश्मिरमध्यें जाणारा तेल, साखर, केरोसीन, मीठ, धान्य इ माल पाठविण्याचें बंद करण्याचा प्रयत्न केला. काश्मीरला पाकिस्तानांत विलीन होण्यास भाग पाडण्यासाठीं हें करण्यांत आलें. हा प्रयत्न फसला तेव्हां, पाकिस्ताननें दुसरा डाव टाकला. आपल्या सैन्यांतील पुष्कळ सैनिकांना पाकिस्ताननें रजेवर

पाठविलें व त्यांच्याकरवी वायव्य सरहद्दीवरील पठाणी टोळयांना चिथावणी देऊन, त्यांना त्यांनीं आधुनिक शस्त्रास्त्रें पुरवलीं. मंकीच्या पीराच्या नेतृत्वाखालीं व पाकिस्तानी सेनेंतील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखालीं या टोळीवाल्यांनीं काश्मीरवर आक्रमण केलें. टोळीवाल्यांशी पाकिस्तानीं लष्कराचें संधान होतें ही गोष्ट, १९४८ मध्यें काश्मिरांत पाकिस्तानचें सैन्य आहे असें सांगून पाकिस्ताननें कबूलच केली. उरीच्या लढाईंत मे १९४८ मध्यें मी स्वतः होतो व पहिला पाकिस्तानी सैनिक इथें आपल्या हातीं पडला. ही सर्व एकत्रित फौज ब्रिगेडिअर अकबरखान यांच्या हुकमतीखालीं देण्यांत आली. त्यांनीं ‘जनरल तारिक’ हें टोपण नांव स्वीकारलें होतें. २१ ऑक्टोबरला मुझफराबाद या मोठ्या गांवांत टोळीवालें शिरलें व तेथें त्यांनीं अनन्वित हत्या व लूटमार केली. संस्थानचे सैन्य या अचानक हल्ल्यानें बावरलें. त्याची वासलात लावण्यांत आली ! २३ ऑक्टोबरला टोळीवाले चिनारी येथें घुसले व २४ ऑक्टोबरला त्यांनीं उरी गांठली २७ ऑक्टोबरला रामपूर व बारामुल्ला येथवर ते आले. बारामुल्ला येथें महंमद मक्बुल शेरवानी या तरुणाला त्यांनीं सुळावर चढवलें. इतर अनेकांची हत्या केली. शेरवानीसाठीं उभारलेलें स्मारक अजूनहि या हत्याकांडाची साक्ष देत आहे. तेथील कॅथड्रेल मध्यें घुसून त्यांनीं लुटालूट केली. सेंट जोसेफ कॉन्व्हेंट मधील जोगिणींवर बलात्कार करून त्यांना ठार मारलें, कर्नल डाओक्स कुटुंब सुटी घालवण्यासाठीं काश्मीरांत आलें होतें. या सर्वांना कंठस्नान घालण्यांत आलें. बारामुल्लाहून हे टोळीवाले गुलमर्ग व श्रीनगरकडे चालले होतें. हत्या, दंगेधोपे, लूटमार...चालूच होती. स्त्रिया, कोवळीं मुलें, वृद्ध, अपंग यांत रतिमात्र सापत्नभाव न करतां सर्वांची त्यांनीं कत्तल उडविली. या कृत्यामुळें काश्मीरची जनता पाकिस्तानविरुद्ध खवळली. मी स्वतः काश्मिरी होतो व माझीहि हीच स्थिति झाली. काश्मिर नॅशनल कॉन्फरन्सचे नेते शेख अब्दुल्ला यांनीं महाराज हरिसिंग, यांचें मन वळवून त्यांच्या करवीं भारताकडे २७ ऑक्टोबर १९४७ ला मदतीची याचना केली की, आक्रमकांना पिटाळण्यासाठीं मदत द्या व आमचे भारतांत सामिलीकरण स्वीकारा. भारताच्या गव्हर्नर जनरलनीं ही विनंती स्वीकारली व अशा

रीतीनें काश्मीर भारतांत सामील झालें. त्या दिवसापासून भारताचे ते अविभाज्य राज्य झालें. परंतु काश्मीरला आम्ही कळवलें,कीं असें जरी असलें तरी याबाबत काश्मीरच्या जनतेला विचारावें अशी आमची इच्छा आहे. काश्मीरांतील आक्रमकांना काश्मीरच्या भूमीवरून पिटाळून लावल्यानंतर व तेथें कायदा व शांततेचें राज्य प्रस्थापित झाल्यानंतर लवकरांत लवकर आम्ही हें करूं. ( या दोन्ही पूर्व अटी काश्मिरांत अजून साध्य झालेल्या नाहींत. ) यानंतर भारतानें आकाश मार्गानें आपलें सैन्य काश्मिरांत वेगानें धाडलें व श्रीनगर वरील व तेथील विमान तळावरील टोळीवाल्यांची येणारी धाड थोपवून धरली. ८ नोव्हेंबरला बारामुल्ला व ११ नोव्हेंबरला उरीचा पुनः कबजा करण्यांत आला.

या प्रकारात आपला काही भाग असल्याचें पाकिस्ताननें स्वच्छ नाकारलें. सुरक्षा समितीनें एक निरुपद्रवी ठराव पास केला—कीं दोन्ही बाजूंनीं परिस्थिति सुधारण्यासाठीं योग्य तीं पाऊलें टाकण्यांत यावींत ! एक काश्मीर कमिशन धाडण्यांत आलें. जुलै १९४८ मध्यें कमिशन काश्मिरांत आलें. त्यांना हें कळतांच म्हणें आश्चर्य वाटलें, कीं पाकिस्तानचें सैन्य जम्मु काश्मीरमध्यें मागील मेपासून लढलें होतें ! वस्तुतः याही पूर्वी हें सैन्य तिथें आलेलें होतें. युनोचे प्रतिनिधी सर ओवेन डिक्सन यांनीं कबुली दिली—

‘२० ऑक्टोबरला आक्रमक घूसखोरांनी जम्मू काश्मिरची सरहद्द ओलांडली ही गोष्ट आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग करणारी होती. नंतर या पाठोपाठ पाकिस्तानीं सैन्याचें जथेहि जम्मू काश्मिरांत घुसले ही गोष्ट आंतरराष्ट्रीय कायद्याला हरताळ फांसणारी आहे.’

भारताचा दावा आहे, कीं जम्मू-काश्मीरमध्यें पाकिस्तान हा आक्रमक आहे व त्यांनीं तेथून चालते झाले पाहिजे. बाकीचे मुद्दे निरर्थक आहेत.

१९४८ च्या एप्रिलमध्यें मी अमेरिकेंतून परतलो व आर्मी हेडक्वार्टर्सचे लष्करी चिटणीस मेजर जनरल थापर यांना भेटलो. जम्मु-काश्मिरमध्यें लढणाऱ्या एका इन्फंट्री बटालियनचीं सूत्रें माझेकडे देण्याचें ठरलें आहे असें त्यांनीं सांगितलें. दोन-तीन दिवसांनी थापर यांनीं सांगितलें, कीं जम्मू-काश्मीर सरकारनें त्यांच्या लष्कराचे अधिकार हातीं घेण्यासाठीं नांवानें माझीच मागणी केली आहे. पंतप्रधान व संरक्षणमंत्री यांनींहि ही सूचना

स्वीकारली आहे. मी अखेरच्या क्षणीं या नेमणूकींतून निसटण्याचा प्रयत्न केला. मी नेहरूंना त्यांच्या निवासस्थानींच भेटलो. लष्करी पेशा पत्करलेल्या सैनिकाला इन्फंट्री बटालियनचा अधिकारी म्हणून काम करणें, कसें अगत्याचें आहे हें मी त्यांना सांगितलें. दिवसभराच्या श्रमानें नेहरू त्या दिवशी थकलेले होते व त्यांनीं मला थोड्या करडेपणानें सांगितलें, कीं तें कांहींहि असलें तरी देशाचा विचार करतां; माझी काश्मीर लष्कराला अधिकारी म्हणून करण्यांत येणारी नेमणूक हीच योग्य आहे. मी पुष्कळ सांगून पाहिलें, परंतु उपयोग झाला नाहीं. तें तेवढेंच राहिलें.

एकाच वर्षांत दुसऱ्यांदा इन्फंट्री बटालियनचें नेतृत्व करण्याची आलेली संधि देशहिताच्या सबबीवर मला नाकारण्यांत आली.

२५ एप्रिलला मी विमानानें दिल्लीहून काश्मीरला जाण्यास निघालो. मेजर जनरल के. एस्. थिमय्या हे माझ्याच विमानांत होते. जम्मु-काश्मीर मधील भारतीय सेनेचे अधिकारग्रहण करण्यासाठीं ते निघाले होते. दोन दिवसांनी थिमय्यांबरोबर मी पूंचला गेलो.

थिमय्यांच्या कानावर असें आलें होतें, कीं पूंचपासून जवळच टोळी-वाल्या पठाणांचा एक जिरगा भरणार होता व तिथें पुष्कळ पठाण टोळीवाले जमणार होते. ही महत्त्वाची बातमी त्यांनीं दिल्लीला लष्करी व हवाई हेडक्वार्टर्सला कळवली व या जिरग्यावर विमानहल्ला करण्याची परवानगी मागितली. जनरल बुचर व जनरल ग्रेसी हे अनुक्रमे भारत व पाक सेनेचे प्रमुख त्या वेळीं होते. या दोघांनीं संपर्क साधला, काय बोलणें झालें कुणास ठाऊक? पण बोलणें संपल्यावर जनरल बुचर यांनीं आपल्या सरकारला इशारा दिला, कीं जर या पठाणांवर भारतानें बॉम्ब हल्ला केला, तर पाकिस्तानला हा सूड सहन होणार नाहीं व मग ते कदाचित भारताविरुद्ध युद्धच घोषित करतील. (जणूं तूर्त आम्ही पाकिस्तान-बरोबर पत्तेच खेळत होतो!) आणि म्हणून आम्ही या पठाणांना तसेच मोकळे सोडलें. त्यांनीं त्यांच्या सोईनुसार आमच्यावर हल्ला करावा अशी मुभा त्यांना दिली. यासाठीं सल्ला मानला तो एका परकीय सेनानीचा! जनरल करिअप्पा किंवा थिमय्या यांचा विचारच घेतला नाहीं!!

याच सुमारास नेहरूंशीं झालेल्या एका चर्चेत मी नेहरूंना, पाकिस्तानच्या

ज्या ठाण्यामधून हल्लेखोरांना शस्त्रास्त्रें व रसद पोचते तीं ठाणींच उध्वस्त करण्याचा सल्ला दिला. नेहरू म्हणाले, कीं युद्धव्याप्ति वाढविण्याची त्यांची इच्छा नाहीं. त्यांच्या सल्लागारांनी म्हणें त्यांना असें सांगितलें होते, कीं लढाईला तोंड लागलें तर कांहीं महिन्यांतच आर्थिक दृष्ट्या पाकिस्तान कोलमडून पडेल. मला त्यांना असें सांगितल्याचें आठवतें, कीं जगांतलीं जीं प्रमुख सत्ताधारी गट राष्ट्रें आहेत, तीं पाकिस्तानला पैशासाठीं नकाशांतून नामशेष होऊं देणार नाहींत. पुढील घटनांवरून हें सिद्ध झालें, कीं जसजसे दिवस गेले तसतसे पाकिस्तान अधिक अधिक मुजोर होत गेलें व आपण मात्र दुबळे होत गेलो.

जीपनें थिमय्यांना घेऊन मी उरीला जात होतो. जीप मीच चालवीत होतो. हवेंत बोचरेंपणा होता; व पाईनचा सुवास सर्वत्र आसपास भरलेला होता. आम्ही महुरा येथें पोहोंचलों तेव्हां तिथल्या लष्करी अधिकाऱ्यानें सांगितलें, कीं आम्ही निघालो होतो तें ठिकाण व महुरा यांचेमध्यें, शत्रू नदीपलीकडून रस्ता कापीत होता. अशा परिस्थितींत पोलादी पत्र्याच्या झाकलेल्या गाडींतून उच्च लष्करी अधिकाऱ्यानें जाण्याची पूर्वप्रथा होती. थिमय्या यांचें असें म्हणणें होतें, कीं सेनानीनें लढाईंत आपल्या सैनिकांच्या नजरेस पडेल अशा तऱ्हेनेंच वावरलें पाहिजें. म्हणून आम्ही जीपनेंच पुढचा प्रवास सुरू केला. मीच जीप चालवीत राहिलो. एका वळणावर टेकडीचा चढ चढत असतांना एक दक्षिण भारतीय जवान धांवत समोरून आला व त्यानें आमचा रस्ता अडवला. त्याचें डोक्यावर हॅट नव्हती व केस अस्ताव्यस्त होते. मद्रास बटालियनचा तो सैनिक होता तिथून जवळच त्याच्या तुकडीचा मुक्काम होता. त्यानें सांगितलें कीं, त्यांचा कमांडिंग ऑफिसर लेफ्ट. कर्नल मेनन याला शत्रूनें रानांत नेऊन ठार केलें आहे. त्या दिवशीं अगदीं सकाळींच एक बाकरवाल (त्या भागांतील फिरत्या जमातींपैकी) मेनन यांचेकडे आला. वस्तुतः हा शत्रूचा हस्तक होता. त्यानें मेननना उठवलें व सांगितलें, कीं बटालियनच्या ठाण्याच्या जवळच एका ठिकाणीं रात्रीं पाकिस्तान्यांनीं चंचू प्रवेश केलेला आहे व वाटल्यास ती जागा तो दाखवण्यास तयार आहे. कर्नल मोठा शूर, साहसी होता. आलेल्या खबऱ्याबरोबर तो

९६०१८

ताबडतोब शत्रूचा मुकाबला करण्यासाठीं बाहेर पडला. जमतेम शंभर यार्ड ते चालून गेले असतील, तोंच तो बाकरवाल एका शिळेमागें दडून बसला व त्यानें मेननलाच पुढें होण्यास सांगितलें. बिचाऱ्या मेननला कावा उमगला नाहीं व तो सरळ चालत जाऊन शत्रूच्या जाळ्यांत अडकला. बरोबरच्या कांहीं सैनिकांसह त्या सर्वांना गोळ्या घालण्यांत आल्या ! यांत एकच सैनिक जो वांचला तोच सैनिक आम्हांला ही हकीगत सांगत होता.

जनरल थिमय्या व मी जीपमधून खाली उड्या मारल्या व धांवतच त्या घटना स्थळाकडे गेलो. असें करणें हें खरोखरच शहाणपणाचें नव्हतें; कारण कदाचित आम्हीहि मारले गेलो असतो परंतु युद्धांतली प्रत्येक कृति तर्कशास्त्राला धरून होतेच असें नाहीं. आपल्या हाताखालील एक अधिकारी कुठें मारला गेला हें पाहण्याची उत्सुकता थिमय्यांना होती.

मी प्रथमच श्रीनगरला पोंचलो तेव्हां शेख अब्दुल्ला यांनीं जम्मूकाश्मीर सैनिकांचा एक मोठा मेळावा तिथें आयोजित केला होता. याच सैन्याची सूत्रें मी हातीं घेणार होतो. स्वतः शेख अब्दुल्ला तिथें होते व त्यांनींच माझी सैनिकांना ओळख करून दिली. मला असें आढळलें, कीं या सैनिकांना थोडे शिस्तीचे धडे देण्याची आवश्यकता आहे. त्यांना डावपेचांची व गोळी चालविण्याची तालीमहि द्यायला हवी आहे. या सैन्याचे लष्करी मोल वाढावें यासाठीं मी ताबडतोब पावलें उचललीं.

आर्मी हायकमांडरनें असें ठरविलें, कीं शत्रूवर दोन बगलांनीं हल्ला करावा. एक उरीच्या बाजूनें व दुसरीकडून हंडवाराच्या बाजूनें. दोन्ही बगलांची डोमेल मुझफराबाद येथें हात मिळवणी व्हावी. या हालचालीसाठीं माझ्या हाताखालील सैन्यापैकीं दोन इन्फंट्री बटालियन्स पाठविण्यास मला सांगण्यांत आलें. आमची तयारी साधारणच होती. तरी प्रत्यक्ष लढाईंत भाग घेण्यास केव्हां तरी सुरुवात करणें भाग होतेंच. मी एक एक बटालियन दोन्ही बगलांवर उभी केली. उरी भागांत भारताची ब्रिगेड १६१ व हंडवारा भागांत ब्रिगेड १६३ हल्ला चढवण्याच्या तयारींत सज्ज झाल्या.

हंडवारा विभागांतील चढाई १६ मे या दिवशीं सुरू झाली. ब्रिग्रेड कमांडर हरबक्षसिंग यांनीं ब्रिग्रेड १६३ सह नेटानें हल्ला चढवला व शत्रूला

ताबडतोब शत्रूचा मुकाबला करण्यासाठीं बाहेर पडला. जमतेम शंभर यार्ड ते चालून गेले असतील, तोंच तो बाकरवाल एका शिळेमागें दडून बसला व त्यानें मेननलाच पुढें होण्यास सांगितलें. बिचाऱ्या मेननला कावा उमगला नाहीं व तो सरळ चालत जाऊन शत्रूच्या जाळ्यांत अडकला. बरोबरच्या कांहीं सैनिकांसह त्या सर्वांना गोळ्या घालण्यांत आल्या ! यांत एकच सैनिक जो वांचला तोच सैनिक आम्हांला ही हकीगत सांगत होता.

जनरल थिमय्या व मी जीपमधून खाली उड्या मारल्या व धांवतच त्या घटना स्थळाकडे गेलो. असें करणें हें खरोखरच शहाणपणाचें नव्हतें; कारण कदाचित आम्हीहि मारले गेलो असतो परंतु युद्धांतली प्रत्येक कृति तर्कशास्त्राला धरून होतेच असें नाहीं. आपल्या हाताखालील एक अधिकारी कुठें मारला गेला हें पाहण्याची उत्सुकता थिमय्यांना होती.

मी प्रथमच श्रीनगरला पोंचलो तेव्हां शेख अब्दुल्ला यांनीं जम्मूकाश्मीर सैनिकांचा एक मोठा मेळावा तिथें आयोजित केला होता. याच सैन्याची सूत्रें मी हातीं घेणार होतो. स्वत: शेख अब्दुल्ला तिथें होते व त्यांनींच माझी सैनिकांना ओळख करून दिली. मला असें आढळलें, कीं या सैनिकांना थोडे शिस्तीचे धडे देण्याची आवश्यकता आहे. त्यांना डावपेचांची व गोळी चालविण्याची तालीमहि द्यायला हवी आहे. या सैन्याचे लष्करी मोल वाढावें यासाठीं मी ताबडतोब पावलें उचललीं.

आर्मी हायकमांडरनें असें ठरविलें, कीं शत्रूवर दोन बगलांनीं हल्ला करावा. एक उरीच्या बाजूनें व दुसरीकडून हंडवाराच्या बाजूनें. दोन्ही बगलांची डोमेल मुझफराबाद येथें हात मिळवणी व्हावी. या हालचालीसाठीं माझ्या हाताखालील सैन्यापैकीं दोन इन्फंट्री बटालियन्स पाठविण्यास मला सांगण्यांत आलें. आमची तयारी साधारणच होती. तरी प्रत्यक्ष लढाईंत भाग घेण्यास केव्हां तरी सुरुवात करणें भाग होतेंच. मी एक एक बटालियन दोन्ही बगलांवर उभी केली. उरी भागांत भारताची ब्रिगेड १६१ व हंडवारा भागांत ब्रिगेड १६३ हल्ला चढवण्याच्या तयारींत सज्ज झाल्या.

हंडवारा विभागांतील चढाई १६ मे या दिवशीं सुरू झाली. ब्रिग्रेड कमांडर हरबक्षसिंग यांनीं ब्रिग्रेड १६३ सह नेटानें हल्ला चढवला व शत्रूला

टिटवालपर्यंत मागें रेटलें. मी दिनांक १६ व १७ या दोन्ही दिवशीं त्यांचे-बरोबर होतो.

१८ मे रोजीं मी उरीला आलो. योजना अशी होती, कीं ब्रिग्रेड १६१ ने इस्लामाबादचा उरी समोरील भागाचा कबजा करावा व तेथून पुढें डोमेलकडे जावें. असें खात्रीपूर्वक कळलेलें होतें, कीं शत्रू हा इस्लामबादची समोर दिसणारीं शिखरें जवळ जवळ मोकळीं करून, पलिकडच्या बाजूला कमी उंचावरील कांहींशा उबदार भागांत रात्री घालवतो. म्हणूनच रात्रीच्या वेळीं अचानक छापा घालून उरी समोरील भागाचा कबजा करण्याची योजना होती. डोग्रा फलटणीकडे ही कामगिरी दिलेली होती. ठरलेल्या दिवशीं उरीच्या पुलाजवळ डोग्रा जमा झाले. श्वास रोखून मनगटावरच्या घड्याळाकडे पाहात ते दहावर कांटा कधी सरकतो याची वाट पहात होते. दहावर कांटे येतांच चवड्यांवर चालत त्यांनीं इस्लाम-बादचा प्रचंड गड चढण्यास सुरुवात केली. पहांट फुटण्यापूर्वीं वर पोहोंचून शत्रूवर छापा मारावा असें ठरलें होतें. परंतु कांहीं तरी झालें व सैन्याला वर पोचायला फारच वेळ लागूं लागला. मध्यंतरी शत्रूला या हालचालींची बातमी लागली व त्यांनीं आमच्यावर मात करून डोंगरापलीकडून इस्लामाबादचा माथा गांठला. वरच्या अंगानें आमचेवर जबर मारा सुरू झाला. डोग्रांना वर चढणें शक्य न होता उलट अचानक युद्धाला तोंड लागलें. ब्रिग्रेड कमांडरनें परिस्थितीवर मात करण्यासाठीं राजपुताना रायफल्स ही तुकडी कुमकेला पाठविली. इस्लामाबादचा समोरील हा भाग घेण्यांत हा जो विलंब झाला, तो झाला नसता, तर शत्रूला पिटाळून तसाच डोमेलचा कबजाही झाला असता. आता शत्रूला आमच्या हालचालीचा सुगावा लागला व त्यानें आमचा पुढला बेत उध्वस्त केला.

आदल्या रात्रीं, राजपुताना रायफल्सनें बाजू सांवरण्यापूर्वीं जेव्हां डोग्रा फलटण इस्लामाबादचा चढ चढत होती, तेव्हां मी व ब्रिगेड कमांडर आघाडीवरील एका ठिकाणीं बसलो होतो. थंडी कडाक्याची होती व हल्ला कसा काय पार पडतो हा विचार आम्ही करत होतो. त्या रात्रीं एजी पीरच्या दिशेनें असंख्य दिव्यांची रांग चढतांना आम्ही पाहिली. आम्ही पुरते घोटाळ्यांत पडलो. शत्रू बगल देऊन किंवा पिछाडीकडून

आमच्यावर हल्ला करणार आहे कीं काय? का तो विवक्षित ठिकाणापर्यंत मार्गे जात आहे? पुढें आमच्या लक्षांत आलें, की आम्हांला चकवण्यासाठींच त्यानें ही चलाखी केलेली होती.

उरी–डोमेल मार्गावर आतां शत्रूनें जबरदस्त फळी उभी केली होती. ब्रिगेडला अधिक प्रगति अशक्य झाली व चढाई थंडावली. थोडा अधिक काळ निरर्थक चढाई केल्यानंतर आगेकूच संपलीच. उरी–डोमेल रस्त्यावर अठ्ठावन्नाव्या मैलापाशीच या बगलेवरील चढाई थांबली थिमय्या यांनीं डोमेल घेण्याचा केलेला धाडशी प्रयत्न असा फसळा.

ऑगस्ट उजाडला, लेह येथील कमांडर लेफ्ट. कर्नल प्रिथीचंद यांचेकडून संदेश आला, की माणसांचा, दारुगोळ्याचा, अन्नाचा, कपड्याचा तुटवडा पडला आहे व अशा स्थितींत इच्छा असूनहि लेह फार काळ ताब्यांत ठेवणें शक्य होणार नाहीं. मी या वेळीं थिमय्यांना इतर कांहीं कामासाठीं भेटायला गेलो होतो. त्यांना थोड्याच वेळापूर्वी हा संदेश मिळालेला होता. त्यांनीं मला तो वाचून दाखवतांच मी लेहला जाऊन तिथली परिस्थिति प्रत्यक्ष पाहून अहवाल देण्याची तयारी दाखवली. माझी विनंती थिमय्यांनीं मान्य केली व दुसऱ्याच दिवशीं सकाळीं मी विमानानें लेहला निघालो. लडाखला जाणारा विमानमार्ग झोझीलावरून जातो. झोझीला ही खिंड अजून शत्रूच्याच ताब्यांत होती. आमचे जेकोटा विमान जेव्हां या खिंडीवरून जाऊं लागले तेव्हां शत्रूनें मिशिनगनचा मारा सुरू केला. विमानाच्या एका पंख्यावर गोळ्या लागल्या परंतु त्या हिंमती वैमानिकानें; कांहीं मिनिटांतच विमान लेह येथें सुखरूप उतरवलें.

लेह हें ११,५०० फूट उंचीवर आहे. १६००० फूट उंचीचीं शिखरें आसपास आहेत. त्या दिवसांत लेहला उतरणारीं आपलीं विमानें इंजिनें बंदच करीत नसत! इंजिनें थंडावली तर करतां काय? पंधरा मिनिटांत विमानें श्रीनगरला परतत असत.

लडाखच्या या राजधानींत येतांच मी लेफ्ट. कर्नल प्रिथीचंद यांना भेटलो. सुमारें चारशें सैनिक त्यांच्या दिमतीला होते, तर शत्रू सैन्य १३०० होते. गुरखा फलटणी व कारागीलमधून मागें घेतलेलें जम्मू काश्मिरचें थोडें सैन्य, एवढीच काय ती सेना होती. या ठिकाणीं अन्नधान्याची व कपड्याची



*ग्रोमिको शेख अब्दुल्ला व लेखक*
*[ सुरक्षा समितींत १९४८ सालीं काश्मीर प्रश्न चर्चेला आला तेव्हां ]*

फारच टंचाई झाली होती. इतक्या उंचीवर पाणी तापवणें व उकळणें हा मोठाच प्रश्न होता. सैनिकांना त्यांच्या घरच्या कुटुंबियांची काळजी लागलेली होती. कारण कित्येक महिन्यांत त्यांना टपालच मिळालेलें नव्हतें. कांहींच्या जखमा पुवळल्या होत्या कारण पुरेशी वैद्यकीय मदतहि नव्हती. अशाहि परिस्थितींत ते सर्व शौर्यानें झुंझत होते.

लेह येथें कांहीं दिवस राहून, तेथील गंभीर परिस्थितीचा अंदाज घेऊन व तशाहि स्थितींत सैन्य धीरानें लढत होतें, हें सर्व पाहून मी विमानानें हेडक्वार्टरला परत आलो. मेजर जनरल थिमय्या यांना मी जें पाहिलें त्याचा अहवाल सादर केला.

रामबान जवळच्या शुंबल खेड्यांतून सीता व सुखन् या नांवांच्या दोन

तरुण डोग्रा मुलींचें अपहरण झालें होतें. कांहीं बाकरवालांचें हें काम होतें. मुलीच्या वडिलांनीं लेफ्ट. कर्नल रणवीरसिंग यांचेकडे दाद मागितली. रणवीरसिंग हे नानिहाल जवळच्या रजपुत बटालियनचे कमांडिंग ऑफिसर होते. मुलींच्या शोधांत असतांना कांहीं सशस्त्र बाकरवालांशी, रणवीरसिंगांनीं शोधार्थ धाडलेल्या सैनिकांची चकमक उडाली. मुलींचा शोध लागला नाहींच उलट या सैनिकांचीच चौकशी सुरू झाली. दिल्लीहून या प्रकरणांत चौकशीचें फर्मान आलें व मला चौकशी समितीचा अध्यक्ष नेमण्यांत आलें. आमच्या या न्यायदानाशीं अब्दुल्ला यांनीं अनेक प्रकारानें असहकार केला. साक्षीदारहि मिळेनात. अब्दुल्ला यांनीं या प्रकरणांत राजकारण घुसडलें; राजीनाम्याची धमकी त्यांनीं दिली. नेहरूंना त्यांनीं कळवलें, कीं या सैनिकांच्या गटाविरुद्ध कडक उपाय योजना केली गेली नाहीं, तर काश्मीरच्या जनतेंत त्याचे विपरीत प्रतिसाद उठतील. परंतु भारत सरकारनें चौकशीचें काम चालूंच ठेवलें.

खेड्यांतून पळवण्यांत आलेल्या या दोन मुलींना पीर पांचाल या डोंगराळ भागांत ठिकठिकाणीं नाचविण्यांत आलें, त्यांची अनेक बाकरवाल्यांशीं आळीपाळीनें लग्नें लावण्यांत आलीं. माझ्या असेंहि कानीं आलें, कीं कुणी शंभूनाथ नांवाच्या माणसाला खोट्या आरोपाखालीं अब्दुल्लानें अटक केलेली असून त्याला श्रीनगर येथें पकडून ठेवण्यांत आलेलें आहे.

त्या काळांत जीं माणसें अब्दुल्लांना नको होती त्यांच्यावर इतर कुठला खोटानाटा आरोप करणें अशक्य झालें, तर अब्दुल्ला त्यांच्यावर रा. स्व. संघाचा कार्यकर्ता असा शिक्का मारत असे. 'निधर्मी' तत्त्वानुसार मग त्यांना शिक्षा करणें शक्य होत असे. आम्ही शंभूनाथ याला साक्षीसाठीं बोलावलें. त्याची हृदयद्रावक हकिगत ऐकली.

वेरीनाग येथील नॅशनल कॉन्फरन्सचा शंभूनाथ अध्यक्ष होता. नुकत्याच तिथें उडालेल्या चकमकींत त्याने हिंदी सैनिकांना मार्गदर्शन केलें, हाच त्याचा गुन्हा होता. हा हा म्हणता त्याचें महत्त्व संपलें व तो रा. स्व संघाचा कार्यकर्ता ठरून, त्याला तुरुंगांत डांबण्यांत आलें. हातकड्या घालून अनवाणी त्याची फरफट करण्यांत आली, सर्व अंगभर माराच्या

खुणा त्यानें मला दाखवल्या. जे गुन्हे त्यानें केलेच नव्हते त्या काल्पनिक गुन्ह्यांची कबुली त्यानें द्यावी याकरतां हा छळ करण्यांत आलेला होता.

मी अनधिकृतरीत्या ही हकिगत सरदार पटेलांच्या कानावर घातली. अखेर शेवटीं जेव्हां शंभूनाथची सुटका झाली तेव्हां काश्मीरांत राहण्यांत जीवाला धोका आहे असें त्याला वाटूं लागलें. मी दिल्लीजवळील एका कारखान्यांत त्याला नोकरी मिळवून दिली व एका लष्करी लॉरींतून त्याला काश्मीरबाहेर आणला.

या प्रकरणावर मी एक सडेतोड अहवाल लिहिला व तो सरकारी चक्रांतून सरकारपर्यंत पोहोंचला. माझ्या असें कानीं आलें, कीं अबदुल्ला यांनीं जनरल बुचरकडे मदतीची याचना केली. बुचर यांनीं माझा अहवाल दुर्लक्षिला व उलट रजपुत सैनिकांविरूद्धच अनेक आरोपांवर खटला लावला. पुराव्या अभावी हे सर्वजण सुटले. अब्दुल्लांना खुश करण्यासाठीं बुचर यांनीं लेफ्ट. कर्नल रणबीरसिंग व ब्रिगेडियर विक्रमसिंग यांच्यावरहि दुगाण्या झाडल्या होत्या.

मी एका परिषदेसाठीं काश्मिरहून दिल्लीला आलों असतांना, नेहरूंकडे फराळासाठीं गेलो होतो. नेहमीचा थोडया फार गप्पा होतांच, मी नम्रतापूर्वक एका नाजुक विषयाबाबत नेहरूंशीं सूतोवाच केलें. बुचर भारताचे सरसेनानी असतांना पाकिस्तानच्या सरसेनापतीशीं त्यांनीं लष्करी हालचालीबाबत फोनवरून कानगोष्ट करावी ही गोष्ट दोन्ही देश युद्धांत गुंतले असतांना कशी काय योग्य ठरते ? असा प्रश्न मी मांडला. विरोधी सेनानी एकमेकांच्या सल्लामसलतीनें युद्ध खेळतात ही लढाई आहे की थट्टा ? पूंच विभागांत जमलेल्या पठाणांच्या मोठ्या मेळाव्यावर बॉंब हल्ला करू देण्यास बुचर यांनीं विरोध केला हें कसें काय ? हे टोळीवाले सशस्त्र पठाणच उद्यां आपल्या देशाला धोका देणार होते ना ? मी अखेरीस असेंहि सांगितलें, कीं यांचेबद्दल भारतीय सेनेंत फारसा आदर नाहींच व ब्रिटिशांच्या युद्ध खात्यांतहि त्यांचा मुळीच प्रभाव नाहीं. अशा या माणसाचें जीवनांतलें काम तरी काय आहे ? मी असेंहि म्हणालो कीं बुचर आतां लंडनला लष्करी साहित्य मिळवण्यासाठीं मिशन घेऊन जात आहेत, असें मला कळतें, माझी खात्री

आहे, कीं ब्रिटीश सरकारकडे बुचर यांचें अजिबात वजन नसल्यानें आपल्याला जरूर असलेलें कांहींहि ते तिथून आणूं शकणार नाहींत.

बुचर यांचें विरुद्धचें माझें हें गालिप्रदान ऐकतांना नेहरूंनीं वाईट चेहरा केला व मला अधिक संभाषणाची संधि त्यांनीं दिली नाहीं. एखाद्या अप्रिय गोष्टीबाबत चर्चा करण्याची इच्छा नसली, कीं नेहरू असें नेहमींच करीत असत.

पुढें बुचर हे इंग्लंडला गेलेच व तिथून रिकाम्या हातानें परत आले. मी जेव्हां नेहरूंना विचारलें, कीं बुचर यांची लंडन वारी कशी काय सफल झाली, तेव्हां नेहरूंनी कबुली दिली, कीं त्यांनीं फारसें कांहींच साधलें नाहीं.

थोड्याच महिन्यानंतर बुचर गेले व करिअप्पा हे भारताचे पहिले कमांडर-इन्-चीफ झाले. भारतीय सेनेंत या बदलानें मोठेंच समाधान पसरलें.

माझ्या अधिकाराखालील सेनेंत, अब्दुल्ला जेव्हां ढवळाढवळ करूं लागले, तेव्हां माझें त्यांचें बिनसलें. सेनेंतील शिस्तपालन व बदल्या या संबंधांत त्यांनीं दडपण आणण्यास सुरुवात केली. मला अशा तऱ्हेची लुडबुड पसंत नसल्यानें मी अब्दुल्लांना नकोसा झालो.

ऐन उन्हाळ्यांत एकदा शेख अब्दुल्लांनीं मला बोलावणें धाडलें व ते मला म्हणाले, कीं किस्तवार मध्यें जातीय भावना दुखावून तंग वातावरण झालें आहे याकरतां जम्मू-काश्मीरचे लष्कराची तुकडी घेऊन मी तेथें जाऊन शांतता प्रस्थापित करावी व स्थानिक लोकांत विश्वास निर्माण करावा. मात्र ही सर्व तुकडी, एका विवक्षित जमातीचीच असावी असा त्यांनीं आग्रह धरला. मी त्यांना सांगितलें कीं भारतीय सेनेंत, अशा तऱ्हेनें जातवार लष्करी तुकड्यांना कामगिरी देण्याची प्रथा नाहीं. अतएव ज्या तुकड्या हाताशीं असतील, त्यांतून मी तुकडी निवडीन. मला वाटतें, अब्दुल्लांनीं या बाबतींत वरच्या लष्करी अधिकाऱ्याकडे तक्रार नोंदविली. जणूं माझेंच कांहीं चुकत होतें अशा पद्धतीनें माझ्याकडून खुलासा मागवण्यांत आला. परंतु जेव्हां त्यांना हें कळलें, कीं एका साधासुध्या गोष्टीला जातीय रंग देण्यांत येत होता, तेव्हां वरच्या अधिकाऱ्यांनीं तपास बंद केला.

जम्मू-काश्मिर लष्करांतील पूर्वाश्रमीचा एक अदालतखान नांवाचा लेफ्ट. कर्नल पाकिस्तानांत निघून गेला होता. त्याला शेख अब्दुल्लांनीं परत बोलाविलें व त्याला किस्तवारचा प्रशासक म्हणून नेमलें होतें नेहरूंच्या निवासस्थानीं राहणाऱ्या सौ. कृष्णा मेहता यांचे वडील, किस्तवार येथें रहात होते, त्यांनीं मला किस्तवारविषयीं अब्दुल्लांनीं सांगितलें त्यापेक्षां खूपच निराळें सांगितलें.

पंजाब छत्रीधारी तुकडींतील सुमारे शंभर जवान बरोबर घेऊन, मुसळधार पावसांत ६५ मैल रस्ता कापीत, मी किस्तवार येथें आलों पोहोंचायला आम्हांला अडिच दिवस लागले लेफ्ट. कर्नल यादव हे तेथें बटालियनचे अधिकारी होते. मला किस्तवार येथें अत्यंत असंतोष आढळला परंतु हा असंतोष अब्दुल्लांनीं रंगवला त्या स्वरुपाचा नव्हता. चित्र उलटेंच होतें. अदालतखान हे कांही मोठे कार्यक्षम प्रशासन करीत नव्हते.

यादव यांचेमार्फत लोकांत विश्वास निर्माण करील, अशा कांहीं प्राथमिक गोष्टी मी केल्या व पीर-पांचाळ मार्गें मी श्रीनगरला परतलो. मला काश्मीर राजधानींत या मार्गें पोहोंचायला तीन चार दिवस लागले. या मुदतीत अदालतखान यांनीं शेख अब्दुल्लांना एक अहवाल धाडला व त्यांत माझ्या किस्तवार भेटीविरुद्ध व मी तेथें जी ' दादागिरी ' केली त्याविरुद्ध तक्रारी होत्या. अदालतखान यांचा गैरकारभार आतां प्रथमच उजेडांत येणार असल्यानें, त्यांनीं ही चोराची उलटी बोंब मारली होती. मला जेव्हां शेख अब्दुल्लांनीं यासंबंधीं विचारलें तेव्हां मी उत्तर दिलें, कीं सर्व आरोप निराधार आहेत व अयोग्य असें मी कांहींहि केलेलें नाहीं, तरीहि त्यांनीं नेहरूकडे यासंबंधीं अवास्तव भाषेंत लेखी तक्रार केली. त्यांत धमकी दिली, कीं जर अशा तऱ्हेचे प्रकार होणार असतील, तर यापुढें काश्मीरचा भारताला राजकीय पाठिंबा मिळेलच असें आश्वासन देतां येत नाहीं. या प्रश्नावर कांहीं मंत्री राजीनामे देण्याच्या विचारांत आहेत, असेंहि शेख साहेबांनीं नेहरूंना कळवलें. अर्थातच नेहरू भडकले. त्यांना खरी वस्तुस्थिति माहीत नव्हती—त्यांनीं मला लगोलग दिल्लीला बोलावलें व माझी बाजू ऐकून न घेतां ते रागारागानें म्हणाले—

' तुम्ही किस्तवारमध्यें नुकतेंच काय केलेंत, तें थोडक्यांत शेख अब्दुल्लांनीं

मला कळवलें आहे. मला कांहीं समजत नाहीं! तुम्हीं स्वतःला कोण समजतां? तुम्ही असेंच वागत राहिलांत तर एक दिवशीं काश्मिर तुमच्या-मुळें भारताच्या हातून जाईल...'

'पण तुम्हांला खऱ्या गोष्टी कळल्या आहेत कां?'—मी विचारलें.

'तुमचें व शेख अब्दुल्लांचें जमत नाहीं एवढें कळलें तेंच पुरेसें आहे... अधिक कळण्याची गरजच नाहीं. त्यांच्याशीं तंटा करून आपलें निभणार नाहीं आहे! मला वाटतं निदान तुम्हांला तरी ही गोष्ट समजत असेल!' रागानें लाल झालेले नेहरू मोठ्या आवाजांत बोलत राहिले.

मी गप्प राहाण्याचें ठरवलें. मी विचार केला कीं जर सत्यें हीं महत्वाचीं नसतील व राजकारणांत सद्सद्विवेक बुद्धिलाच थारा नसेल तर कांहीं बोलूं नये.

'बोलत कां नाहीं कांहीं?' नेहरूंनींच विचारलें.

मी फुरगटलो होतो. मी सांगितलें—

'सर तुम्हांला जर सत्य जाणून घेण्याचीच इच्छा नसेल व माझ्या किस्तवार येथील कार्याबाबत तें गैर आहे, असा निर्णय देण्याचें जर माझें न ऐकतां तुम्ही मनोमन ठरविलेंच असेल, तर मी कांहीं सांगण्यांत मुळीच इंशील नाहीं.'

कांहीं तरी बोलावें असें नेहरूंना वाटत असावें; परंतु एकाएकी रागारागानें ते खोलींतून निघून गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नेहरूंनीं मला पुन: बोलावलें. या वेळीं त्यांनीं माझें प्रेमानें स्वागत केलें व किस्तवार येथें मी काय पाहिलें तें सर्व सविस्तर सांगण्यांस त्यांनीं सांगितलें. हे जगूं दुसरेच नेहरू वाटत होते? मध्यंतरीच्या वेळांत त्यांना कुणी कांहीं सांगितलें, कीं काय कोण जाणें. कांहीं का असेना मी किस्तवारसंबंधीं सांगूं लागलो. अगदी एकीकडच्या या किस्तवार जिल्ह्यांत गैरकारभार माजलेला होता. सैनिकांच्या बंदुका, पुष्कळ अनधि-कृत लोकांच्या हातीं गेलेल्या होत्या व हे लोक या व इतर शस्त्रांच्या धाकावर, पुंडाई करीत होते. अनेक तरुण मुलींना पळवण्यांत आलें होतें व बळजबरीनें त्यांचीं लग्नें हलकट लोकांशीं लावण्यांत आलीं होतीं. अशाच

प्रकारचे इतर भयानक प्रकार तिथें घडत होते. शेवटी मी हेंहि सांगितलें कीं हे व इतर असे हे प्रकार, मी सरकारच्या नजरेस अशासाठीं आणीत आहे, कीं याविरुद्ध कडक उपाययोजना व्हावी. नाहीं तर अब्दुल्लांच्या राज्यांतील या गोष्टी अशाच चालू राहिल्या, तर त्या एक दिवशी आपल्या-वरच उलटतील. मी नेहरूंना याची आठवण दिली, कीं १९३७ पर्यंत हे शेख अब्दुल्ला काश्मीर मधल्या जातीय गटांचे पुढारी होते. जेव्हां त्यांच्या लक्षांत आलें, की लवकरच भारतांत काँग्रेसची सत्ता सुरू होणार आहे, तेव्हां रातोरात एकाएकी १९३८ सालीं ज्या वेळीं काँग्रेसनें आपली मंत्रि-मंडळें बनवलीं, तेव्हां ते ‘ राष्ट्रीय ’ झाले !

काश्मीरमध्यें अबदुल्ला राजवटींत इतर जे गैरप्रकार सुरू होते, त्यासंबंधींहि नेहरूंना ऐकवण्याची ही संधि मी घेतली. नेहरूंनीं शांतपणें सर्व ऐकून घेतलें. कांहीं काळ स्तब्धतेंत घालवल्यावर, त्यांनीं काश्मीरच्या राजकारणांतील गुंतागुंतीचे धागे मला सांगितलें व शेख अब्दुल्लांशीं स्नेह ठेवणें ही ‘ आपली ’ गरज आहे असें ते म्हणाले. जें त्यांनीं ऐकलें त्यामुळें त्यांना दुःख झालें, हें त्यांनीं कबूल केलें, परंतु पुष्कळशा व्यावहारिक दृष्टीनं, ते यांत कांहींही करूं शकणार नाहींत हें त्यांनीं स्पष्ट केलें. नंतर ते म्हणाले, कीं या सर्वांचा परिणाम म्हणून अब्दुल्लांनीं काश्मीरमधून मला काढून घेण्याची मागणी केली आहे. त्यांच्या कार्यांत माझ्यामुळें अडथळा येतो आहे असें त्याचें म्हणणें होतें. नेहरू म्हणाले, अब्दुल्लांची ही विनंती नाकारणें, आपल्याला कठीण आहे, कारण कांहीं झालें तरी काश्मिरचे पंतप्रधान आहेत व माझें त्यांच्याशीं पटत नव्हतें. ते म्हणाले, अब्दुल्लांना दूर करण्यापेक्षां माझ्यासारख्या व्यक्तीला दूर करणें, हें त्यांना अधिक सोपें होतें. नेहरूंनीं मला आठवण दिली, कीं जर एखादी व्यक्ति ही राज्याच्या प्रमुखांशीं वाकड्यांत शिरली, तर सर्वसाधारणपणें त्या व्यक्तीलाच जावें लागतें. काश्मीरपासून दूर आतां माझी पुढील नेमणूक करावी लागणार आहे हें देखील नेहरूंनीं सांगितलें व शक्य तितक्या जवळ नेमणूक होईल असेंहि सांगितलें. यानंतर त्यांनीं सेना प्रमुखांना हाच निर्णय कायम करणारें पत्र लिहिलें व त्याची एक प्रत मला धाडली. मी ऑक्टोबर १९४८ मध्यें काश्मिर सोडलें.

पुढें पांच वर्षांनीं परिस्थितीच अशी निर्माण झाली, कीं शेख अब्दुल्लाची उचलबांगडी करावीच लागली. मला हेंहि नमूद केलें पाहिजे, की काश्मीरमध्यें १९४८ मध्यें जें घडलें, त्याला बक्षी गुलाम महंमदपेक्षां शेख अबदुल्ला हेच जबाबदार आहेत. प्रत्यक्षांत जसा काळ लोटला तसें बक्षीचें व शेख साहेबांचें फाटलें व फाटतच गेलें.

मी काश्मिरमधील युद्धांत बरेंच कांहीं शिकलो. तिथल्या राजकारणांत लंबकाप्रमाणें हेलकावे खाणारे काश्मीरमधील जें युद्ध पाहिलें, तशी परिस्थिति इतरत्र कुठेंहि असूं शकणार नाहीं.

काश्मीरमधून परततांच मला ११ इन्फंट्री ब्रिगेडचा अधिकारी म्हणून जालंधर येथें, ऑक्टोबर १९४८ मध्यें जावें लागलें. माझ्या हाताखालीं २ मराठा, १ डोग्रा, २ गरवाल फलटणी मिळून एकंदर ४००० सैनिक होते. भारत-पाक सरहद्दीवरील फेरोजपुर-पठाणकोट भागांतील कांहीं सरहद्दीचें रक्षण ही माझी जबाबदारी होती. या जागेवर रुजू होतांच, प्रथमच माझ्या वाहनांवर एक तारा असलेलें निशाण फडकू लागलें.

मी यानंतर पहिली गोष्ट कांहीं केली असेल, तर माझ्या या नव्या जबाबदारीची पूर्ण माहिती करून घेण्यास सुरुवात केली. याकरिता भारत-पाक सरहद्दीवर मी अनेक वेळां चकरा टाकल्या व त्यांच्या उगतच्या मुलखाची पाहणी केली. माझ्या हाताखालील कमांडिंग ऑफिसर्सनाहि मी हें करायला लावलें. हळूंहळू वाढत्या श्रेणीनें मी त्यांना लांबलांब रुटमार्चसाठीं घेऊन जाऊं लागलो. दिवसाला ५६ मैल कांटण्याची तयारी मी करून घेतली. जालंदर ते बिआस व परत मागें, असा हा प्रवास! मधे फक्त छोटी छोटी विश्रांती. निशाणबाजीवर मग मी लक्ष केंद्रित केलें. लढाईच्या दृष्टीनें आवश्यक अशा सर्व पावित्र्यांचा अभ्यास मी करवून घेऊं लागलो.

हें सर्व करण्यांत गुंतलो असतांना ३१ डिसेंबर १९४८ रोजीं काश्मीरांत युद्धबंदी झाली आंतरराष्ट्रीय जगांत आपली वाहवा व्हावी, म्हणूनच ही युद्धबंदी आपण स्वीकारली असें मला वाटतें! प्रत्यक्षांत काश्मिरचें रणक्षेत्र धुमसतच राहिलें. अखेर जगाला खूश करण्याऐवजी आपण जगाच्या रोपाचेच धनी मात्र झालो.



*जनरल मॅक्स्वेल टेलर व लेखक ( कोरियांत १९५२ मध्यें )*

देशाची जी फाळणी आपण पत्करली, त्यांत मोठ्या संख्येनें हत्या झाली. असंख्य लोक बेघर झाले व मोठीच उध्वस्तता झाली. जरी सेनेंतील अधिकाऱ्यांना राहण्यासाठीं जागा देण्यांत येत असली, तरी बहुतेक सैनिकांना शांतता विभागांत असतांनाहि एकटेंच राहावें लागे. कारण त्यांना बिऱ्हाड करायला जागांची टंचाई असे. माझे अधिकारी व सैनिक यांच्यांत असलेली ही विषमता मला दुःख देई. एक दिवशीं सायंकाळीं मी पत्नीबरोबर व दोन्ही मुलींबरोबर फिरायला बाहेर पडलों असतांना, एका जवळून जाणाऱ्या सैनिकानें मला सलाम ठोकला. मी थांबलों व गप्पा मारूं लागलों. गप्पांच्या ओघांत मी त्याला विचारलें, कीं त्याचें कुटुंब कुठे असतें. त्यानें सांगितलें त्याला बायको आहे, मूलहि आहे परंतु तीं दोघें खेड्याकडे असतात. सुटीचे दिवस सोडले तर गेल्या सात वर्षांत तो त्यांच्याबरोबर राहिला असा नव्हताच. १९४० सालांत तो दुसऱ्या महायुद्धांत प्रत्यक्ष आघाडीवर गेला व १९४७ साली परत आला होता.

आपल्या कुटुंबाबरोबर मी आनंदांत राहावें व माझ्या सैनिकांनीं मात्र

आपल्या कुटुंबियांपासून दूर राहावें, याची मला शरम वाटली. कारण असें एकटें राहाणें म्हणजे काय याचा मला अनुभव होता. यानंतर कांहीं दिवसानंतर रात्रीं मी अॅलन रँड यांचें ' फाउंटन हेड ' हें पुस्तक वाचीत होतो. एका शिल्पशास्त्रज्ञानें जी धडपड केली त्याची कथा यांत आहे यावरून मला कल्पना सुचली, कीं माझ्या सैनिकांसाठीं जिथें त्यांना आपल्या कुटुंबासह राहातां येईल, असें एक छोटेंसें नगर कां निर्माण करता येऊं नये. मला स्वत:ला इमारत बांधणीचें फारच अल्प ज्ञान होतें. तरी माझ्या फावल्या वेळांत मला यासाठीं निश्चित प्रयत्न करणें शक्य होतें. परंतु मी जेव्हां प्रत्यक्ष कागदावर तपशील मांडला, तेव्हां मला असें वाटूं लागलें, कीं नाहीं पैसा, नाहीं जमीन, नाहीं इतर कांहीं साधन, अशा परिस्थितींत माझी कल्पना मूर्त स्वरूप कसें घेऊं शकेल ? या विचारानें मला रात्रभर झोप आली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी माझ्या कमांडिग ऑफिसर्सना एकत्र केलें, माझी कल्पना त्यांचेपुढें मांडली. सर्वांनीं असें कांहीं करावें याला संमति दिली. आमच्या हेडक्वार्टर लगतची एक सरकारी जमीन आम्ही कबजांत घेतली. कारण ही जमीन तशीच पडलेली होती. नंतर आम्ही हें केलें, कीं आवश्यक तें सिमेंट, विटा, खडी, वाळू, लांकूड, कांचा आदि सामान पैदा केलें. कमांडिग ऑफिसर्स मधून मी एक कार्यकारी मंडळ निर्माण केलें. या लोकांच्या पुढाकारानें व हिकमतीमुळेंच मला हें कार्य तडीस नेतां आलें.

मी या वसाहतीला नांव दिलें–' जवान बाद ' कारण ही वसाहत सामान्य सैनिकांसाठींच होती. या वसाहतींत एक हॉस्पिटल, पोहण्याचा तलाव, उघडें नाट्यगृह या सर्व सुविधा निर्माण केलेल्या होत्या.

हें सर्व करायला पुष्कळ पैसा लागला व तो मलाच उभाहि करावा लागला. यासाठीं सर्व मार्गांनीं मी प्रयत्न केले. नाटकें लिहिली, बसवलीं व खूप प्रयत्नानंतर जवानबाद ही वसाहत कर्जमुक्त करून टाकली.

नेहरुंच्या कानावर जवानबादसंबंधी हकिगत गेली. विशेषत: आम्ही या वसाहतींत सर्व धर्मियांसाठीं जें एकच प्रार्थनादालन बांधलें होतें, त्याची हकिगत ऐकून नेहरूंना अतिशय आनंद झाला. नेहरूंनीं मला जेवायला बोलावलें व इतर गोष्टी बोलतांना मुसलमानांचें प्रेम संपादन करणें किती महत्त्वाचें आहे हें त्यांनीं मला सांगितलें ते म्हणाले, ' भारताप्रमाणेंच रशिया

चीन, मध्यपूर्व, अफगाणिस्तान, इंडोनेशिया व पाकिस्तान येथेंहि त्यांची मोठी संख्या आहे व या जमातीची आपण उपेक्षा करूं शकत नाहीं

जालंदर येथील पाकिस्तानचे डेप्युटी हाय कमिशनर मेजर जनरल अब्दुल रहमान हे माझे जुने स्नेही होते. माझ्या हाताखालील एका सैनिकाची तरुण बायको पाकिस्तानांतच अडकली होती व तिच्यासाठीं तो झुरत होता. सरकारी पातळीवरचे तिला परत आणण्याचे सर्व प्रयत्न फसले होते. मी अब्दुल रहमान यांना विचारलें कीं, या बाबतींत खासगीरीत्या ते त्यांच्या अधिकाराचा उपयोग करून कांहीं मदत करूं शकतील काय? त्यांनीं सांगितलें, कीं शक्य असेल तेवढे ते करतील परंतु सहजासहजीं जमूं शकणारी ही गोष्ट नाहीं. मी मग मेजर जनरल अकबरखान यांना देण्यासाठीं त्याचे-जवळ पत्र दिलें. अकबरखान या वेळीं पाकिस्तानी सेनेचे चीफ ऑफ जनरल स्टाफ होते. या पत्रांत मी लिहिलें होतें कीं अब्दुल रहमान प्रत्यक्ष भेटींत तोंडीं जें कांहीं सांगतील त्या बाबतींत त्यांना मदत करावी.

अब्दुल रहमान लाहोरला गेले. माझें पत्र त्यांचेबरोबर होतें. परंतु अकबरखान यांची गाठ ते घेऊं शकले नाहींत. कारण आदल्याच दिवशीं, पाकिस्तानांत राजकीय सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न केला या आरोपा-वरून त्यांना अटक झाली. परत आल्यावर अकबरखान यांनीं सांगितलें कीं, माझें पत्र त्यांनीं ताबडतोब नाहींसें केलें होतें. या बाबतींत अर्थातच अब्दुल रहमान यांनीं अधिक कांहीं करावें असा आग्रह मी त्यांना करूं शकलों नाहीं.

भारत व पाकिस्तान यांच्यांतील संबंध काश्मीर प्रश्नावरून हळूहळू बिघडण्यास सुरुवात झाली होती. सरहद्दीवरील एकादा लहानसा बाचा-बाचीचा प्रसंग झाला तर त्यांतून मोठीच चकमक निर्माण होई. आपल्या धरसोड वृत्तीमुळेंच गोष्टी या थराला आल्या होत्या. बहुतेक देश हे आपल्या देशांतर्गत कलागती यु. नो पुढें आणित नसतांना, आम्ही मात्र यु. नो. कडे धांव घेतली. या आंतरराष्ट्रीय न्यायालयानें पाकिस्तान आक्र-मक आहे हा मुख्य मुद्दाच डावलला व भारत पाकिस्तान या दोघांना एकाच मापानें या भांडणाचे भागीदार ठरवलें. यामुळे आमचे संबंध तर अधिकच कटु झाले.

१९५१ सालीं पंजाबच्या सरहद्दीवर पाकिस्ताननें सैन्याची मोठी जमवा-जमव चालवल्याचा पुरावा आपलेपाशीं होता. काश्मीरप्रमाणेंच या भागांतहि ते चिथावणी देणाऱ्या हालचाली करीत होते. युद्ध पेटवावें किंवा घबराट निर्माण करावी हा त्यांचा मुख्य हेतु दिसत होता. जर पाकिस्ताननें यावेळीं पुढाकार घेतला असता तर सुरुवातीला कांहीं विजय मिळवून, त्यांचें सैन्य अमृतसरपर्यंत पोचूं शकलें असतें. जर आपण पाकिस्तानविरुद्ध आधीं हात उचलला असता तर यावेळीं पंजाबांत आपण त्यांच्या प्रदेशाचा कबजा करून बसलों असतो. परंतु आपण नेहमी संरक्षक भूमिका घेतली व आपले सैन्य फेरोजपूर ते पठाणकोट या भागांत विखरून ठेवलें. आपण आधीं हल्ला केला असता– आणि यासाठीं पाकिस्ताननें पुष्कळ कारणें उपलब्ध केलेलीं होतीं— तर आपण लाहोर बहुधा घेऊ शकलो असतो. लाहोर हें भारत-पाक सीमेपासून फक्त १६ मैलांवर आहे. अमृतसर असेंच पाक सरहद्दीजवळ आहे. जर युद्ध पेटलेंच तर पहिले हल्ले याच दिशेनें होणार हें उघड होतें. कारण हीं शहरें एकमेकांच्या पंजाखालीं आहेत.

वर वर्णन केलेल्या परिस्थितींत आम्हांला कदाचित इचिगोल कालवा ओलांडावा लागणार होता. वाघा हें आपलें उत्तरेकडचे ठिकाण व लाहोर यांच्यामध्यें हा कालवा आहे. इचिगोल कालवा हाच काय तो महत्त्वाचा अडथळा असल्यानें मला असें वाटलें, कीं या कालव्याची सर्व बारीक-सारीक माहिती मिळवून त्याचा अभ्यास केला पाहिजे. या कालव्याचीं अनेक वर्णनें उपलब्ध होतीं. मी म्हणूनच आपल्या सरहद्दीच्या आंत परंतु कालव्याला जास्तीत जास्त नजीक असलेल्या रानियन (Ranian) या खेड्यांत गेलों. मी तेथून कांहीं माणसें, या कालव्याची रुंदी, खोली, प्रवाहाचा वेग, उताराची कल्पना, दोन्ही बाजू कांक्रिटनें बांधून काढलेल्या आहेत किंवा काय इ. माहिती गोळा करण्यासाठीं धाडलीं. या कालव्याच्या दोन्हीं अंगांना काय काय आहे, हें देखील पहाणी करून येण्यास मी त्यांना सांगितलें अशा तऱ्हेनें मिळवलेली माहिती व एका पाश्चात्य नियतकालीकानें दिलेली या कालव्याची माहिती, यावरून हा कालवा ११० ते १२० फूट रुंद व पधरा फूट खोल असून कालव्याच्या दोन्हीं बाजू कॉंक्रिटनें बांधलेल्या आहेत असें कळलें. पाणी सोडण्याकरतां केलेल्या झडपा, या

कांहीं विवक्षित ठिकाणीं, डायनामाईटनें उडवण्याची व्यवस्था केली असल्या-चेंहि कळून आलें. मी या माहितीच्या आधारें या कालव्याच्या उभ्या छेदाची एक संपूर्ण प्रतिकृति, आमच्या क्षेत्रानजिकच खोदली. शेजारच्या कालव्यां-तील पाण्यानें हा तयार केलेला कालवा, आम्ही भरून टाकला. प्रत्यक्ष कालवा ओलांडताना काय अडचणी येऊ शकतील याची योग्य कल्पना आपल्या सैनिकांना यावी, यासाठीं हा कालवा ओलांडण्याचीं प्रात्यक्षिकें मी घेतलीं. यामुळें कदाचित पुढें मागें कराव्या लागणाऱ्या या कामगिरी-बद्दल आमचा आत्मविश्वास वाढला. हें सर्व पंधरा वर्षांपूर्वी केलेलें मी सांगतो आहे.

१९५२ मध्यें भारत व पाकिस्तान यांच्यांतील तंग वातावरण थोडेंसें निवळलें. सरहद्दीपासून आपलें सैन्य मागें घेण्यांत आलें व सरहद्दीवर पुन: शांतता प्रस्थापित झाली. माझा ब्रिगेड कासुली या हिल स्टेशनवर हलवण्यांत आला व माझी नेमणूक पाठोपाठ पुन: दिल्ली येथील 'आर्मी हेडक्वार्टर्स' मध्यें करण्यांत आली.

मी आर्मी हेडक्वार्टर्स दिल्ली येथें आलों, तो 'डायरेक्टर ऑफ ऑर्गनाय-झेशन' म्हणून. कांहीं महिन्यांनंतर मी मेजर जनरल जे. एन्. चौधरी यांचे जागीं अल्पकाळापुरता ॲडज्युटंट जनरल म्हणून काम करीत असतांना, सेना-प्रमुख जनरल करिअप्पा यांनी मला सांगितलें, कीं त्यांनीं दिल्लींतील एका साप्ताहिकाला एक पत्र लिहिलें असून त्यांत त्यांनीं असें कळवलें आहे कीं काँग्रेससंबंधीं त्यांनीं आपल्या अलिकडच्या एका भाषणांत जें सांगि-तलें त्याचा विपर्यस्त वृत्तांत त्या साप्ताहिकानें दिला आहे. तेव्हां त्यांनीं त्वरीत प्रतिखुलासा छापावा. पुढें करिअप्पांनीं सांगितलें कीं, त्यांनीं हें पत्र पाठवावयास नको होतें; कारण सरकारची अशी इच्छा आहे. कीं त्यांनीं या साप्ताहिकाला कोर्टात खेचावें. प्रश्न असा होता, कीं हें पत्र परत मिळवतां येईल काय. म्हणजे त्यांना खटला भरतां येईल. मला असें वाटलें कीं मी प्रयत्न करून कांहींही करून तें पत्र परत मिळवावें. पंडित देवीदत्त व कॅप्टन वारिऑर यांच्यासह मी या साप्ताहिकाच्या कचेरींत गेलो. संपादक बाहेर गेलेले होते व दुसरेच कुणी त्यांच्या जागीं बसलेले होते. त्यांनीं कांहींच आढेवेढे न घेतां तें करिअप्पांचें पत्र आमच्या हवालीं केलें. यानंतर

त्या साप्ताहिकाच्या संपादकावर खटला भरण्यांत आला व पुष्कळ सुनावण्या होऊन अखेर संपादकांनी दिलगिरी व्यक्त करून ते यांतून सुटले.

(हें साप्ताहिक म्हणजे दिल्लीहून प्रसिद्ध होणारें ' ऑर्गनायझर ' हें होय. या साप्ताहिकानें नुकतेंच असें जाहीर केलें आहे, कीं करिअप्पांच्या पत्राच्या ' फोटोस्टॅट ' प्रती त्यांनीं काढून घेतल्यानंतरच हें पत्र परत करण्यांत आलें आहे – अनुवादक.)

दिल्लींतील कुशक रोडवरील माझे शेजारी ब्रिगेडिअर आर्. बी चोप्रा हे १९५२ मध्यें अतिशय आजारी झाले. मी जेव्हां त्यांना भेटायला गेलों, तेव्हां त्यांची पत्नी अश्रु ढाळीत होती. डॉक्टरांनीं त्यांच्या रोगग्रस्त फुफ्फुसाच्या कांहीं भागाची शस्त्रक्रिया करण्यासाठीं त्यांना पुण्याजवळ औंध येथील रुग्णालयांत न्यायचें ठरवलें होतें. त्यांची स्थिति इतकी गंभीर होती, कीं विमानांतून प्रवास शक्य नव्हता. मुंबईमार्गें दिल्लीहून गाडीनेच ते पुण्याला जाणार होते. पण गाड्यांच्या वेळा अशा चमत्कारिक होत्या, कीं फ्रांटीयर मेल मुंबईला पोचण्यापूर्वीं कांहीं मिनिटेंच पुण्याची गाडी सुटत होती व बराच वेळ मुंबईलाच फुकट जाणार होता. मी ब्रिगेडियर चोप्रा यांना घेऊन स्वतःच दिल्ली स्टेशनवर गेलों व अखेरचा म्हणून प्रयत्न केला. मी फ्रांटियर मेलच्या इंजिन ड्रायव्हरलाच भेटलों, त्याला ही सर्व हकीगत सांगितली, त्याच्या मदतीची अगाऊ कदर म्हणून त्याला एक व्हिस्कीची बाटली दिली व विचारलें कीं, गाडीचा इगतपुरी ते मुंबई हा शेवटचा टप्पा वाटेत न थांबता असल्यानें, या टप्प्यांत त्यानें गाडी अधिक वेगानें हाणून फ्रांटीयर नियोजित वेळेपेक्षां अर्धा तास अगोदर मुंबईस नतां येईल काय. त्यानें खिलाडूपणानें हें मान्य केलें व प्रयत्न करून पाहतो असें सांगितलें. दिलेल्या शब्दाप्रमाणें त्यानें गाडी तीस मिनिटें आधींच मुंबईला नेली. तिथें मेजर जनरल दौलतसिंग यांच्याकरवी मी चोप्रा यांना उतरवून घेऊन, पुण्याच्या गाडींत बसवण्याची व्यवस्था केलेली होती. चोप्रा पुण्याला व तेथून औंधला वेळेवर पोंचले व कर्नल चाक यांनी त्यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया केल्यानंतर त्यांची प्रकृति झपाट्यानें सुधारली

मी ॲड्ज्युटंट जनरल असतांनाच संरक्षण मंत्रालयांतून एका विविक्षित लष्करी अधिकाऱ्याची बदली एका खात्यांतून दुसऱ्या खात्यांत करण्याची

सूचना आली. अशा तऱ्हेच्या बदल्या या अॅड्ज्युटंट जनरल करीत असे. मी कळविलें कीं हें शक्य नाहीं, कारण या अधिकाऱ्याचें रेकॉर्ड (गुप्त नोंद) तितकेसें चांगलें नाहीं. राजेंद्रसिंहजी यांनी मला दुसऱ्या दिवशीं बोलावून सांगितलें, कीं याच संबंधांत त्यांनाही मंत्रालयाकडून सूचना आली आहे. मी या बाबतींत कांहीं करणार आहे काय असें त्यांनीं विचारतांच मी यांतली अडचण त्यांना सांगितली व त्यांनीं मग आग्रह सोडला. परंतु जेव्हां चौधरी पुनः रुजू झाले व मंत्रालयाकडून त्यांना पुनः सूचना आली तेव्हां त्यांनीं परत मलाच या बाबतींत कांहींतरी करण्यास सांगितलें. लष्करी वर्तुळांत चौधरी नेहमीं असें सांगतांना मी ऐकलें होतें, कीं देशाच्या हिताची नाहीं अशी कांहींही सूचना सरकारनें केली, तरी त्या दडपणाला ते मान तुकवत नाहींत. मी त्यांना याची आठवण दिली व या बाबतींत मी दडपण मानणार नाहीं असें सांगितलें. चौधरी म्हणाले, कीं अॅड्ज्युटंट जनरल ही आतां त्यांची जबाबदारी आहे व मी त्यांच्या आज्ञे-प्रमाणें करावें. मी उत्तर दिलें, कीं मी देखील विवक्षित जबाबदारीच्याच जागेवर आहे. केवळ 'जी हुजुरी' मला जमणार नाहीं व त्यांची आज्ञा ही आपल्या लष्करी पेशाच्या हिताची नसल्यानें, मी ती मानूं शकत नाहीं. यावर मग चौधरी गप्प बसले.

कांहीं काळानंतर चौधरी यांनीं चीफ ऑफ जनरल स्टाफ या नात्यानें सरकारकडे एक प्रस्ताव केला. भारताकडे दोन चिलखती ब्रिगेड होती. (Armoured Brigades) यांतील एक कमी करावें अशी सूचना या प्रस्तावांत होती. यामुळें कांहीं बचत होईल असें कारण देण्यांत आलें होतें. बचत करणारी कसलीहि सूचना ही या वेळीं सरकारांत सर्वप्रिय होत असे. परिस्थिती अशी होती कीं चिलखती दलांत कपात करून बचतीचा फायदा सरकारला दाखवण्यापेक्षां, या दलांत वाढ करण्याची मागणी करावयास हवी होती. (याच दलांनी १९६५ च्या भारत-पाक युद्धांत मोठीच कामगिरी केली.)

याच सुमारास सरक्षण मंत्रालय व अर्थ मत्रालय यांचेकडून, लष्कराला मिळणाऱ्या धान्याच्या रेशनमध्यें कपात करण्यांत आली. कारण काय तर या अन्नांत म्हणे आवश्यकतेपेक्षा अधिक ओज होते. सेनेंत यामुळें असंतोष

झाला. या कपातीला लष्करी हाय कमांडने मान्यता द्यावयास नको होती कांहीं वर्षांतच ही आज्ञा मागें घेऊन पूर्वीप्रमाणें रेशन सुरू करावें लागलें.

प्रेम भाटीया हे त्यावेळीं 'स्टेटस्मन' पत्राच्या नोकरींत होते. त्यांनीं १९५३ मध्यें केव्हां तरी सांगितलें कीं चौधरी हे या पत्राचे लष्करी पत्रकार आहेत. मी जेव्हां चौधरी यांना विचारलें, कीं कानावर आलें तें खरें काय. तेव्हां त्यांना दचकल्यासारखे झालें व ते म्हणाले, हें कुणी सांगितलें. मी जेव्हां प्रेम भाटीया यांचा उल्लेख केला तेव्हां चौधरींनी उद्गार काढले—

'भाटीया यांना हें तुम्हांला सांगण्याचा उपद्व्याप करण्याची गरज नव्हती !'

या वरून हें स्पष्ट दिसतें कीं,१९५२-५४ या कालांतहि असे कांहीं सेनानी होते, कीं जे राजकीय व इतर पुढाऱ्यांची खुषामत करून अशा कांहीं गोष्टी करीत होते कीं ज्या लष्कराच्या परंपरेत व या नोकरीच्या संदर्भात चालण्यासारख्या नव्हत्या.

असफअली हे भारताचे एक परदेशांतील वकील जेव्हां निधन पावले, तेव्हां त्यांच्या अंत्ययात्रेच्या व्यवस्थेंत दिल्लीच्या चीफ कमिशनरला मदत करावी असें नेहरूंनीं मला सांगितलें. कारण वॉशिंग्टन येथें त्यांच्या कार्यालयांत मी काम केलेलें होतें व माझा त्यांचा जुना परिचय होता. एका विशिष्ट स्थानापासून मी सर्व वाहनांचा व्यवहार बंद केला होता. कारण त्याशिवाय प्रचंड गर्दी आवरणें शक्य झालें नसतें. एका महत्त्वाच्या राजकीय पुढाऱ्याची गाडी, व्यवस्थेंत असतांना, या ठिकाणीं मी अडवून धरली. मी सर्वांना सूचना दिलेली होती कीं कुणाचाहि अपवाद न करतां, सर्व वाहनें रोखा. जेव्हां त्यांची गाडी माझी माणसें पुढें जाऊं देईनात, तेव्हां या सद्गृहस्थांनीं मोटार तिथेंच ठेवली व ते गर्दीतून वाट काढीत माझ्या पर्यंत आले. त्यांनीं चढेलपणें सांगितलें कीं, त्यांची मोटार जाऊं देण्यांत यावी. कारण ते महत्त्वाच्या कामांत आहेत. मी सांगितलें, कीं असे अपवाद केले तर सगळा गोंधळ माजेल व हें शक्य नाहीं. आपल्या देशांत अशी कांहीं माणसें आहेत कीं ज्यांच्यापाशीं शिस्तपालनाच्या दोन फुटपट्ट्या आहेत. एक इतरांसाठीं व दुसरी खास त्यांच्यासाठीं. त्यांना वाटतें, कीं त्यांचें स्थान लक्षांत घेऊन त्यांना या जीवनांत कुठेंहि आडकाठी असूंच नये.



*रोहटंग खिंडीजवळ १९५५ साली एका सहाय्यक कामगिरीवर असतांना लेखक.*

नेहरूंच्या कानावर जेव्हां हा प्रसंग गेला, तेव्हां त्यांनीं सांगितलें, कीं हीं माणसें आपल्या देशाच्या आजच्या स्थितीचीच निदर्शक आहेत. काय करणार— यांना देशाबाहेर हाकून देता येणार नाहीं व लायक माणसें बाहेरून आणतांहि येणार नाहींत. शक्य तेवढें यांच्याशींच जमवून घेतलें पाहिजे.

पाकिस्तानचे पंतप्रधान जनाब महंमद अली व त्यांची पत्नी हीं दोघें सन १९५३ मध्यें नेहरूंच्या निमंत्रणावरून दिल्लीला येणार होतीं. नेहरूंनीं ही

गोष्ट जाहीर केलेली असल्यानें, विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठीं खूप गर्दी उसळणार अशी अपेक्षा होतीच. प्रेक्षकांच्या बेशिस्तीमुळें अशा प्रसंगीं सर्व व्यवस्था कोसळते, असा आतांपर्यंतचा अनुभव होता. या वेळीं नेहरू म्हणाले, कीं लोकांना कसें वागावें याचा आदर्श या वेळीं आपण दाखवूं व त्यांनीं मला पालम येथील हवाई अड्डयावरच्या व्यवस्थेचा आराखडा तयार करण्यास सांगितलें. नेहरूंनीं हें मान्य केलें, कीं महंमद अलींचें विमान येण्याच्या वेळेपूर्वीं दहा मिनिटें अति महत्त्वाच्या व्यक्तींसह (V. I. P.) सर्वांनीं पालमवर हजर झालें पाहिजे. त्यांनीं हेंहि कबूल केलें, कीं या नियमाची कांटेकोर अंमलबजावणी करण्याची मुभा मला राहील. मी याप्रमाणें सैनिकांना व हवाईदलांतील लोकांना अशी सूचना दिली कीं पाकिस्तानच्या पंतप्रधानांचें विमान उतरण्याची जी ठरलेली वेळ होती, त्यापूर्वीं दहा मिनिटें त्यांनीं विमानअड्डयावरील सर्व प्रवेश बंद करावा. कुणालाहि आंत सोडूं नये. मंत्रिमंडळाच्या दोन श्रेष्ठ सदस्यांना अशा प्रसगीं नेहमीं उशीरा येण्याची संवय होती. या वेळींहि हे दोघे दहा मिनिटें आधीं न येतां, जेव्हां विमान जमिनीला स्पर्श करीत होतें तेव्हां ते दाखल झाले. त्यांना प्रवेशद्वाराशींच अडवण्यांत आलें. या दोघांना अडवलें आहे हें नेहरूंच्या कानीं जातांच, त्यांनी आज्ञा केली कीं या दोघांना लगेच आंत येऊं देण्यांत यावें. या दोघांना आंत सोडतांच जे हजारो लोक आंत घुसण्याची वाट पाहात होते ते एकदम एखाद्या प्रचंड लाटेसारखे पुढे घुसले व त्यांना रोखणें कुणालाच शक्य झालें नाहीं. सर्वत्र एकच गोंधळ माजला व सर्वांनाच याचा त्रास झाला

हिंदुस्थानांत लोकांना गर्दी करण्याची हौसच आहे. पुष्कळ वेळां आपण कशाकरतां गर्दी करीत आहोंत, हें देखील त्यांना ठाऊक नसतें महंमद अल्ली विमानांतून उतरतांच खूपच चेंगराचेंगरी झाली बहुतेकजण ‘ महंमद अली झिंदाबाद ’ असे ओरडत असले तरी कांहींजण ‘ लियाकत अली झिंदाबाद ’ असे ओरडत होते ! लियाकत अली हे महंमदअली पूर्वींचे पाकिस्तानचे पंतप्रधान व त्यांचा कांहीं दिवसांपूर्वींच खून झालेला होता.

क्रुश्चेव्ह हे जेव्हां दिल्लीला १९६० मध्यें आले, तेव्हां इतर सर्व थोर पुरुषाप्रमाणेंच त्यांचेंहि स्वागत झालें. वास्तविक ज्या ज्या वेळीं कुणी

अध्यक्ष वा पंतप्रधान भारतांत येतो. तेव्हां त्याचें तितक्याच उत्साहानें आपण स्वागत करतो. हजारों माणसें पालम ते कॅनॉट प्लेस पर्यंत दुतर्फा उभी राहतात पाहुण्याला मात्र वाटतें, कीं केवढा हा आपला सन्मान व तो अभिमानानें फुलतो ! त्याच्या हें लक्षांत येत नाहीं कीं इथें कसल्याहि प्रकारच्या प्रसंगांना गर्दी ही होतेच. १९६१ सालीं जॅक्वेलिन केनेडी आल्या. पालमवर आलेल्या एका खेडुताला मी विचारलें, कीं कुणाला पाहण्यासाठीं तो आला आहे. तो भोळेपणानें म्हणाला, कीं नक्की कांहीं ठाऊक नाहीं, परंतु परदेशची कुणी सुंदर राणी आलेली आहे ! चौ एन्. लाय, आयसेन हॉवर, राणी एलिझाबेथ यांच्या वेळींहि अशीच गर्दी उसळली होती. क्रुश्चेव्हच्या वेळीं कांहीं हें नवीन घडलें नाहीं. आपल्या लोकांच्या बेचव आयुष्यांत असा एखादा प्रसंग, हा हमखास एकसारखा येणारा एक तमाशाच असतो.

१९५३ साल पुढें सरकूं लागलें व शेख अब्दुल्लांनीं खासगी निवेदनें करण्यास सुरुवात केली. या निवेदनांतून ते सांगू लागले, कीं काश्मीरचा प्रश्न अशा रीतीनें सुटला पाहिजे, कीं ज्यामुळें भारत-पाकिस्तान व काश्मीर या सर्वांचें समाधान होईल. याच वेळीं प्रथमच त्यांनीं पाकिस्तानची संमती काश्मीर प्रश्नाच्या सोडवणुकींत आवश्यक आहे, हें सांगण्यास सुरुवात केली. त्यांच्या या उद्‌गारांचा वास्तविक अर्थ हाच होता, कीं काश्मीरला स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा मिळायला हवा. अब्दुल्ला यांनीं भारतावर निरनिराळ्या प्रकारचे काल्पनिक आरोप करण्यास सुरुवात केली व एकंदरीत त्यांचा पवित्रा हा भांडखोरपणाचा दिसूं लागला. या सर्व बोलण्याचें, नेहरूंना अतिशय दुःख झालें व त्यांनीं या संबंधी शेख अब्दुल्लांना आपली नाराजी पत्रानें कळवली. परंतु शेख अब्दुल्लांनीं आपण जें म्हटलें तेंच योग्य आहे असा खुलासा केला. नेहरूंनीं मौलाना आझादांना काश्मिरला पाठवलें. ईदच्या दिवशीं आझाद श्रीनगरला पोंहोंचले.आझादांना आशा वाटत होती, कीं रास्त धोरण स्वीकारण्यास आपण अब्दुल्लांचे मन वळवूं शकूं. त्या दिवशीं श्रीनगरला शेख अब्दुल्लांनीं जें लोकांच्या भावना भडकवणारें असें उद्दाम भारतद्रोही भाषण केलें, तें ऐकून आझाद दिल्लीला परतले, ते याची खात्री पटून,कीं कुठलीहि तर्कशुद्ध गोष्ट अब्दुल्लांना आतां पटणार नाहीं

जुलैच्या मध्याला डी. पी. धार यांनीं दिल्लीला नेहरूंची भेट घेतली व

त्यांना काश्मीरांतील त्या वेळीं गढूळ होत चाललेल्या परिस्थितीची कल्पना दिली. नेहरूंनी मंत्री रफी अहमद किडवाई यांना फोन केला. किडवाई हे मंत्रिमंडळांतील एक महत्त्वपूर्ण सभासद होते. डी. पी. धार यांची भेट घेण्यास नेहरूंनी किडवाई यांना सांगितलें. किडवाई व डी. पी. धार यांची दुसऱ्या दिवशीं जेव्हां भेट झाली तेव्हां किडवाई यांनीं दोन निष्कर्ष काढले.

अ) काश्मीर हे सरहद्दीवरील महत्त्वाचें राज्य असल्यानें, तेथें सत्ता एका माणसाच्या वा गटाच्या हातांत तें जातां कामा नये. कारण तिथें जें कांहीं घडेल त्याचें मोठे पडसाद देशभर उठणार होते.

ब) शेख अब्दुल्ला यांना दूर करण्याची वेळ आतां आलेली आहे.

किडवाई यांनी धार यांना विचारलें कीं, भेटण्याची विनंती किडवाई यांनीं केली तर अब्दुल्लांची काय प्रतिक्रिया होईल. अब्दुल्ला हे किती हलक्या मनाचे झाले आहेत, हें ठाऊक असल्यानें धार यांनीं सांगितलें, कीं काय प्रतिक्रिया होईल हें सांगतां येत नाहीं, परतु अब्दुल्लांना भेटीसाठीं न बोलावतां किडवाई यांनींच श्रीनगरला भेटीसाठीं जावें किडवाई यांनीं अब्दुल्ला यांना लिहिलें. उत्तर आलें, कीं किडवाई यांना भेटून कांहींहि उपयोग होण्यासारखा नाहीं व उलट जर किडवाई यांनीं या बाबतींत तड-जोडीचे प्रयत्न केले तर त्यांचीच काश्मीरांतील पत जाईल! किडवाई यांनीं अब्दुल्लांना फोन करून सांगितलें, कीं त्यांच्या लौकिकाचें काय होईल याची काळजी शेख साहेबांनी करूं नये, परंतु दोघांनी एकत्र भेटून या प्रश्नाचा निकाल लावण्याचा प्रयत्न करण्याची संधि मिळाली पाहिजे. अब्दुल्ला हे ताठच राहिले. भेटीला त्यांनीं नकार दिला. या अब्दुल्लांच्या आत्मघातकी धोरणामुळें साहजिकच किडवाई खवळले व त्यांनीं २५ जुलैच्या सुमारास डी. पी. धार यांची दिल्लींत पुनः भेट घेतली. धार यांनीं पुन्हां एकदां काश्मीरी नेत्यांत जें तंग वातावरण झालें आहे व काश्मीरची परिस्थिति कशी असमाधानकारक होत चालली आहे याबद्दल किडवाईंना माहिती दिली. नंतर धार यांनीं किडवाई व नेहरू यांची एकत्र भेट घेतली. नेहरूंनीं विचारलें कीं यावर आतां उपाय काय? किडवाई कांहीं बोलले नाहींत परंतु धार यांनीं सुचवलें कीं कडक उपाय योजले

तरच परिस्थिती काबूत येईल. नेहरूंनीं नंतर त्यांना आलेलें अब्दुल्लांचें पत्र दाखवलें. त्यांत अब्दुल्लांनीं खालील मुद्दे मुख्यत: उपस्थित केलेले होते.

अ) स्वयंपूर्ण काश्मीर ही जी भूमिका आहे यावर भारत हळूहळू तडे मारीत आहे आणि यामुळें काश्मीरी जनतेंत अत्यंत असमाधान पसरलें आहे.

ब) काश्मीरच्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठीं दिल्लीला यायला अब्दुल्ला यांना वेळ नव्हता. (नेहरूंनीं ही सूचना केली होती.)

क) जरी नेहरूंविषयीं व्यक्तीश: त्यांना आदर असला तरी मानवी व्यवहारांत असे कांहीं प्रसंग येतात, कीं देशाच्या हिताला, वैयक्तिक संबंधाहून अग्रहक्क द्यावा लागतो.

धार यांनीं हें पत्र वाचलें व ते स्तब्ध राहिले, तेव्हां नेहरूंनी ते किडवाईना वाचायला दिलें. किडवाईंचे मत विचारतां किडवाईनीं नेहरूंना सांगितलें आपण अब्दुल्ला सांगतात त्याच तत्वानुसार वागलें पाहिजे. राष्ट्राचें हित हेंच सर्वश्रेष्ठ समजून आपण व्यक्तीची पर्वा करतां कामा नये. ( किडवाई यांनीं हें सुचविलें, कीं नेहरूंनीं अब्दुल्लांची गय करूं नये. ]

धार यांनी प्रथम किडवाईना व नंतर नेहरूंना अशी सूचना केली, कीं मला काश्मीरांत धाडण्यांत यावें. धार यांना तेथील परिस्थितींत माझी मदत हवी होती. माझें नांव ऐकतांच नेहरूंच्या मनांत भीतीनें ठाण मांडलें, कीं धार व मी हे मिळून स्वेच्छेप्रमाणें व एकाच बाजूचा विचार करून असें कांहीं काश्मीरांत करूं, कीं जें त्यांना पसंत पडणार नाहीं. यासाठीं माझ्याबद्दल त्यांनीं आढेवेढे घेतले, परंतु आग्रह होतांच मला काश्मीरला पाठवण्यास ते तयार झाले. फक्त मी अनधिकृतपणें जायचें होतें. एवढी व्यवस्था करून धार श्रीनगरला परतले; व यानंतर त्यांनीं प्रत्येक गोष्टींत किडवाईशी संपर्क ठेवला.

मी जेव्हां नेहरूंच्या निमंत्रणावरून त्यांना परराष्ट्र कचेरींत भेटायला गेलों, तेव्हां त्यांनीं खुलासा केला, कीं खाजगी भेटीसाठीं त्यांनीं मला बोलावलेलें आहे व ते जें सांगतील तें सर्व तोंडीच रहावयाचें आहे. त्यांनीं मला

विचारलें, कीं काश्मीरांत आतां नेमकें काय घडत आहे हें मला ठाऊक आहे काय. मी उत्तर दिलें, कीं वृत्तपत्रांत जें वाचलें तेवढेंच मला ठाऊक आहे; व त्यावरून तेथील परिस्थिती गोंधळाची दिसते. नेहरू म्हणाले, कीं हें खरें आहे. मुख्य प्रश्न हा आहे कीं काश्मीर हें अंतर्गतरित्या बलशाली होऊन स्थिरावलें पाहिजे. हें जर घडलें तर बाहेरून कितीहि दडपण आलें तरी भारताची काश्मीरवरील पकड ढिली होणार होणार नाहीं.

नेहरूंनी नंतर काश्मीरांत एकंदर परिस्थिती किती बिकट झाली आहे, याचें वर्णन केलें. ते म्हणाले, युवराज व शेख अब्दुल्ला, शेख अब्दुल्ला व बक्षी गुलाम महंमद, यांच्यातच गभीर तंटे माजले आहेत. शेख अब्दुल्लांनीं भारताबाबतची आपली भूमिका अचानक ताठर केली आहे. अशा तऱ्हेचा उद्धटपणा त्यांनीं पूर्वी कधीं केला नव्हता. नेहरूंनीं सांगितलें, कीं नेहमींच्या पद्धतीनें निरनिराळ्या मुलकी खात्याकडून तिथें काय काय घडतें याचा वृत्तांत त्यांना मिळतच असतो, परंतु तरीहि मी कांहीं दिवस रजेवर म्हणून काश्मीरला जावें, त्यांच्या वतीनें मी तेथें निरीक्षण करावें, काय वारे वाहात आहेत तें पहावें व त्यांना ही माहिती कळवीत जावी.

याच सुमारास कांहीं दिवसांपूर्वीं नेहरूनीं म्हटलें होतें– 'काश्मीर बाबतचें आमचें धोरण पूर्णपणें स्पष्ट केलेलें आहे व त्यापासून आम्ही रेसभरहि ढळणार नाहीं ज्यांना ज्यांना या प्रश्नांत रस असेल त्या सर्वांनीं हें पक्कें ध्यानांत घ्यावें, कीं याबाबत धमक्यांना आम्ही नमणार नाहीं.

कृष्ण मेनन यांनीं सांगितलें–' जर काश्मीर बाबतची आमची भूमिका समजत नसेल तर आमच्या सांगण्याच्या यंत्रांतच कांहीं दोष आहे असें समजण्यांत अर्थ नाहीं. ऐकणाऱ्यांच्या श्रवणेंद्रियांतच कांहींतरी बिघाड असला पाहिजे !'

मी दहा दिवसांची रजा काढली व श्रीनगरला विमानांतून उतरलों. नेहरूंनी सर्व आवश्यक त्या लोकांना मी येत असल्याचें फोननें कळवलें होतेंच. कसलीहि अधिकृत कामगिरी करण्यासाठीं मी काश्मीरांत आलेलों नव्हतो व म्हणून मी श्रीनगरला मेजर जनरल हिरालाल अटल यांचेकडे उतरलो. आल्या आल्या मी शेख यांची औपचारिकरीत्या स्नेहभेट घेतली. माझ्याशीं बोलतांना त्यांनीं भारताविरुद्ध नाना कागाळ्या सांगितल्या व ते

म्हणाले, कीं काश्मीरचें भवितव्य काश्मीरी जनता ठरवील. कदाचित जनतेला भारत किंवा पाकिस्तानांत सामील न होता स्वतंत्र राहावेंसें हि वाटत असेल. मी शेख यांना विचारलें, कीं काश्मीर स्वतंत्र झाला, तर भारतांतील चार कोटी मुसलमानांचें काय होईल, याचा विचार त्यांनी केला आहे काय. तेव्हां ते म्हणाले, कीं हा त्यांचा प्रश्न नाहीं! त्यांनीं इशारा दिला, कीं जर भारतानें काश्मीरच्या प्रश्नांत ढवळाढवळ बंद केली नाहीं, तर त्यांना इतर उपाय योजावे लागतील. बोलणें संपवताना ते म्हणाले, कीं भारतानें हें लक्षात ठेवलें पाहिजे कीं त्यांना 'काश्मीरचे सिंह' म्हणण्यांत येतें तें कांहीं उगीचच नाहीं!'

यावरून माझी खात्री झाली, कीं मी ज्या अब्दुल्लांशीं बोलत होतो तो बंडखोर अब्दुल्ला होता. एके काळीं ते जनतेचे अतिशय प्रिय नेते होते. परंतु हळू हळू राज्यकारभारांतील त्यांची दडपशाही, तारतम्य सोडून केलेलें अन्याय व वशिलेबाजी यांतून एक निराळीच प्रतिमा निर्माण झाली. निष्ठुर आणि ताठर बनलेल्या अशा या माणसावरचा लोकांचा विश्वास आतां नाहींसा होत होता.

जनतेंत जें असीम दारिद्र्य व दुःख पसरलेलें होतें, त्यांतून लोकांची मुक्तता करण्याची इच्छा किंवा त्या दृष्टीनें केलेली उपाययोजना याचा मागमूस अब्दुल्लांपाशीं उरला नव्हता.

लोकांचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठीं अब्दुल्ला यांनी, नवे राजकीय प्रश्न निर्माण केले होते व भारतांतील सामिलीकरण 'आत्मघातक' असल्याचें ते आतां सांगत होते. वस्तुतः सामिलीकरणाचे तेच आद्य पुरस्कर्ते होते. अब्दुल्ला यांच्या हातीं जनतेनें राज्य दिलें होतें. जनतेची अपेक्षा होती कीं कांहीं सुधारणा होतील, दिलेलीं आश्वासनें पाळली जातील. हें सर्व करण्याची जबाबदारी मुख्यतः पंतप्रधानाचीच असते, कारण सरकारप्रमुख म्हणून याबाबतचा पुढाकार त्यानेंच घ्यावयाचा असतो. अंतर्गत बाबींत लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्याऐवजी अब्दुल्ला यांनीं ती अधिकच बिकट केली होती. लांचलुचपत, भ्रष्टाचार हीं नाहींशीं न होतां, त्यांनी या राज्यांत चांगलींच मुळें धरलीं. जमिनीबाबत त्यांनीं सुधारणा केल्या नाहींत कीं शेतकऱ्याचें दारिद्र्य कमी केलें नाहीं.

जनतेची शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनाची पातळी सुधारण्यासाठीं अब्दुल्ला यांनीं कांहींहि केलें नाहीं. जनता अशिक्षित व अज्ञानीच राहिली होती. जणूं जनतेचें राज्य सुरूच झालें नव्हतें ! या निराशाजनक व ठपका आलेल्या राज्यकारभाराच्या पार्श्वभूमीवर अब्दुल्ला हे आतां आपल्या स्वतःच्या राजकीय वचनांनाहि हरताळ फासणार, अशी निश्चित लक्षणें दिसूं लागली होतीं.

अशा तऱ्हेचा गैरकारभार फार काळ चालू ठेवतां येत नाहीं. असल्या परिस्थितींत अशा नेत्याला पदच्युत करण्यावांचून गत्यंतर नसतें. ही घटना लोकशाहीकरणांतीलच एक अटळ टप्पा होय. जेव्हां लोकशाहीप्रधान राजवटींत असें लक्षांत येतें, कीं ठरवलेलें जीवनाचें चित्र आकारास येऊं शकत नाहीं; तेव्हां जें सडलेलें आहे, जनतेच्या हिताला बाधक आहे, तें उपटूनच काढलें पाहिजे. काश्मीरमध्यें नेमकें हेंच घडलें. अब्दुल्लांवर टीका होत होती ती हीच कीं आपल्या लोकांना समाधान देणारें जीवन निर्माण करण्यांत ते नालायक ठरले, ज्या सरंजामशाहीनें जनतेची मान आवळली होती ती सरंजामशाही नाहींशी करणें त्यांना जमलें नाहीं, देशांतील निरक्षरता व दारिद्र्य यांचाहि मुकाबला त्यांना करता आला नाहीं. थोडक्यांत सामान्य माणसाचें जीवनमान सुधारणें हें जें प्राथमिक कर्तव्य तें देखील पार पाडण्यांत ते नालायक ठरले.

भारतांतील जनतेंतहि कश्मीर धोरणाला विरोध वाढत होता. अब्दुल्ला म्हणतील ते विशेषाधिकार, इतर राज्यांना न मिळणारे असे फक्त काश्मीरलाच कां देण्यांत यावेत ? एवढा गैरकारभार करून व केंद्र सरकारला धाब्यावर बसवूनहि, शेख अब्दुल्लांचे लाड सरकारनें कां करावे, असे प्रश्न विचारण्यांत येऊं लागले.

बक्षी, धार व काश्मीरचे तरुण हुषार राजे युवराज करणसिंग यांच्याबरोबर मी प्रदीर्घ चर्चा केल्या. या सर्वांनीं शेख हे व्यवहाराला अलिकडे अलिकडे वागणुकींत फारच कठीण होत चालले आहेत याला पुष्टी दिली. कांहीं चर्चेनंतर आम्ही हा निष्कर्ष काढला, कीं शेख यांच्या मनांत कांहीं निराळेंच आहे. त्यांच्या हालचाली पुढील तीन दिवसांत तर गूढ होऊं लागल्या होत्या. धार व बक्षी यांनीं सांगितलें कीं त्यांच्या असें कानीं आलें



*१९५८ मध्यें एका 'फायटर' विमानांतून उड्डाण संपवून उतरताना लेखक*

आहे कीं, शेख अब्दुल्ला हे कांहीं दिवसांतच गुलमर्गला जाणार आहेत. तिथें सात मैलांवर असलेल्या सरहद्दीपलीकडे त्यांचे कांहीं मित्र आहेत त्यांना ते भेटणार आहेत. या मित्रांशी कांहीं बाबतींत खुलासे करून बक्षी व धार यांना अटक करण्याचा त्यांचा विचार आहे. यासाठीं आरोप तयार आहेत. बक्षी व धार यांचे जागीं मग आपले भगतगण भरून मंत्रिमंडळांत आपली बाजू भक्कम करण्याचा शेख यांचा विचार आहे. एवढें झालें, कीं एक वृत्तपत्रकारांची बैठक घेऊन काश्मीर हें स्वतंत्र झाल्याची घोषणा करावयाची व भारताला आपलें सैन्य तेथून काढून घेण्यास सांगावयाचें असा डाव शेख अब्दुल्ला टाकीत होते. यामुळें त्यांना अभिप्रेत आहे त्याप्रमाणें काश्मीर प्रश्न सुटणार होता.

युवराज, बक्षी, धार व मी काश्मीरमधील या गंभीर व स्फोटक परिस्थितीचा रात्र रात्र विचार करीत होतो. आम्ही शेवटीं या निर्णयाला पोंहोंचलों कीं अब्दुल्लाविरुद्ध कडक उपाय योजण्याची वेळ आलेली आहे. जर त्यांना स्वतंत्र काश्मीर जाहीर करण्याची संधी दिली

गेली तर बाहेरील एखादी शक्ति सरहद्द ओलांडून निर्माण होणाऱ्या पोकळींत ठाण मांडून बसणार नाहीं याची निश्चिती देता येण्यासारखी नव्हती. १९४७ सालीं हें घडलें. १९६५ सालींहि हेंच घडलें.

आणखी कांहीं ठरवण्यापूर्वी आहे ही परिस्थिती नेहरूंच्या कानावर घालणें आवश्यक होतें. टेलीफोनवरून अशा नाजूक विषयाची चर्चा करणें शक्य नसल्यामुळें, असें ठरलें, कीं मी लगेंच दिल्लीला चक्कर घालावी.

२ ऑगस्ट १९५३ ला मी विमानानें दिल्लीला जाण्यास निघालों. अंधार पडला होता व बनिहाल खिंडीवर हवा वादळी होती. विमानानें जाण्यासारखी ही खासच हवा नव्हती. फ्लाईट लेफ्टनंट गामा यांनी मला या धोक्याची कल्पनाहि दिली. परंतु मी त्या सायंकाळींच निघण्याचा आग्रह धरल्यावर मला नेण्याचें त्यांनीं कबूल केलें. आम्ही जेव्हां बनिहाल खिंडीवर आलो, तेव्हां ढगांच्या हालचाली जोरांत सुरू होत्या व वादळी हवेशीं व मुसळधार पावसाशीं झगडल्यानंतर आम्ही त्या दिवशीं रात्रीं कसेबसे दिल्लीला उतरलो.

मी तेथून तडक नेहरूंच्या निवासस्थानीं गेलों. वेळ न गमवतां काश्मीर मधली परिस्थिती मी त्यांना निवेदन केली. माझें ऐकून घेतल्यावर नेहरू म्हणाले युवराज, बक्षी व धार यांनी अब्दुल्लांबाबत कांहींही ठरवलें असलें, तरी अब्दुल्लांना कसल्याहि परिस्थितींत अटक होता कामा नये. कारण जगाला आपल्या या कृतीचें समाधानकारक उत्तर आपल्याला कधींहि देतां येणार नाहीं मी त्यांचें या गोष्टीकडे लक्ष वेधलें, कीं जर अब्दुल्लांना आपण असेंच मोकळें सोडलें, व त्यांनीं बक्षी, धार व इतर कांहीं मंत्र्यांनाच अटकेंत टाकलें, तर भारताच्या तेथील अस्तित्वालाच धोका पोहोंचेल. परंतु नेहरू आपल्याच भूमिकेला चिकटून राहिले. मी त्यांना त्यांचें म्हणणें काश्मीरमध्यें संबंधितांना कळविण्याचें मान्य केलें.

दुसऱ्या दिवशीं मी श्रीनगरला परत आलों व नेहरूंचे विचार, मी युवराज, बक्षी व धार यांना सांगितले. त्यांच्या निरनिराळ्या प्रतिक्रिया झाल्या. आम्ही एका दुष्टचक्रांत सापडलों होतो. जर नेहरूंना आम्ही

आगाऊच हें सांगितलें, कीं अब्दुल्लांना अटक करीत आहोंत, तर आमची खात्री होती, कीं नेहरू हें करूं देणार नाहींत. परंतु अब्दुल्लांना मोकळें सोडणें म्हणजे काश्मीरच्या लोकशाहीला धोका होता व आपल्या राष्ट्राचें हितहि त्यांत नव्हतें. कांहीं गरम चर्चेनंतर आमचें एकमत झालें, कीं जर अब्दुल्ला आपल्या हेतूपूर्तीसाठीं पुढें पाऊलें टाकूं लागले, तर त्यांना अटक केली पाहिजे. नेहरूंना न कळवतांहि ! (युवराज यांचें मात्र सतत सांगणें होतें कीं प्रथम नेहरूंना कळविलें पाहिजे.)

गुलमर्गला जातांना शेख अब्दुल्लांनी मुद्दाम उतरून युवराजांची भेट घेतली. बराच काळ त्यांना शेख भेटलेले नव्हते. या तरुण राजानें, ही संधि साधून, कारभारांतील गैरप्रकार अब्दुल्लांच्या नजरेस आणले व सावधानतेनें पावलें उचलण्यास सांगितलें.

शेख यांनी आरोपांचा इन्कार केला व अशा तऱ्हेचे आरोप झाल्याबद्दल दुःख झालें असें दाखविलें. परंतु युवराजांनीं आपलें म्हणणें सोडलें नाहीं. शेख नंतर गुलामर्गला गेले. घटना समितीच्या पुष्कळ सभासदांनीं त्यांच्याकडे त्यांच्या राज्यकारभारांतील 'हम करोसो' वृत्तीचा लेखीं निषेध पाठविलेला होता.

त्या दिवशीं दुपारीं आम्हांला विश्वसनीय रीत्या कळलें कीं यापूर्वी वर्णन केलेली कटाची योजना दोन दिवसांनीं शेख अब्दुल्ला हे कार्यान्वित करणार आहेत. बक्षी व मी धार यांच्या निवासस्थानीं जमलो व तिथून युवराजांकडे गेलो. परिस्थितीचा साधक बाधक विचार करून आम्ही असें ठरवलें कीं देशाच्या कायदा व सुव्यवस्था यांना अब्दुल्ला हे आतां धोकादायक ठरलेले असल्यानें ८ ऑगस्टला रात्रीं त्यांना अटक करावयाची. इथें किती गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती याची दिल्लीला खरोखरच कल्पना नव्हती !

या अटकेनंतर जी प्रतिक्रिया होईल ती लक्षांत घेऊन पुष्कळ प्रतिबंधक उपाय आम्ही योजले. महुरा येथील वीजोत्पादक केंद्र व श्रीनगर येथील टेलीफोन एक्स्चेंज हीं ठिकाणें व शहराच्या जवळपासचीं मोक्याचीं ठिकाणें सुरक्षित करण्यांत आलीं.

सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस एल्. डी. ठाकूर व डेप्युटी सुपरिंटेंडेंट शेख गुलाम कादीर यांना अब्दुल्लांना पकडण्यासाठीं गुलमर्गाला रवाना करण्यांत आलें. त्यांना बडतर्फ केल्याची आज्ञा त्यांच्यावर बजावण्याचें काम जम्मू काश्मीर संस्थानच्या लष्करांतील लेफ्ट. कर्नल बलदेवसिंग यांच्याकडे देण्यांत आलें होतें.

शेख यांच्या हातांत बडतर्फीची आज्ञा ठेवतांच ते प्रथम खवळले. ओरडा करीत म्हणाले कीं मला बडतर्फ करण्याची कुणाची आज्ञा आहे. परंतु हळू-हळू त्यांनीं अटक करूं देण्यास संमती दिली. नमाज पडल्यानंतर व आकाशवाणीवरील बातम्या ऐकून झाल्यानंतर, त्यांना पकडावयास गेलेल्यांबरोबर ते उधमपूरला आले. जिथें त्यांना अडकवून ठेवलें गेलें. ही ९ ऑगस्टची सकाळ झाली होती. गाडींत हा महत्त्वाचा कैदी घालून मोटार ठरलेल्या दिशेनें निघाली ती गुप्तपणें. पण अब्दुल्लांच्या अटकेची बातमी अखेर बाहेर फुटलीच. मी श्रीनगरच्या बाहेर पांच मैलांवर गुल-मर्गच्या दिशेकडे उभा होतो. माझ्या अंगावरून अब्दुल्लांना घेऊन ही व्हॅन निघून गेली. जम्मु काश्मीरचे नवे पंतप्रधान म्हणून बक्षी गुलाम महंमद यांचा शपथविधी झाला, तेव्हां त्या समारंभाला मी हजर होतो.

अब्दुल्लांना अटक होतांच तुरळक भागांत उत्स्फूर्त दंगली झाल्या. यु. नो. नें देखरेखीसाठीं नेमलेलीं माणसें गटागटानें पांढऱ्या जीपमधून श्रीनगरमध्यें फिरूं लागलीं. परंतु बक्षी व धार यांनी या दंगलखोरांचा कठोरपणें बंदोबस्त केला. मी स्वत: डोळ्यांनीं हें सर्व पाहिलें व श्रीनगर व काश्मीर खोऱ्यांत शांतता व ऐक्य नांदण्यासाठीं माझ्यावर जें काम सोपविलें तें मी पार पाडलें.

९ ऑगस्टला सकाळीं नेहरूंनी युवराज करणसिंगांना फोन केला व अब्दुल्लांना अटक करूं दिल्याबद्दल त्यांना फैलावर घेण्यास सुरुवात केली. युवराजांनी सुरुवातीचा थोडा गडगडाट ऐकतांच, नेहरूंच्या ओरडण्यानें घाबरून फोन ए. पी. जैन यांचे हातीं दिला. जैन हे तोंपर्यंत श्रीनगरला पोचलेले होते. नेहरूचें सर्व रागाचें बोलणें ऐकत रहाणे, जैन यांना जेव्हां अशक्य झालें तेव्हां त्यांनीं फोन डी. पी. धार यांचें हातीं दिला. आतां फक्त आरडाओरडा उरला होता व होणारें होऊन गेलें होतें.

दोन दिवसांनीं मी नेहरूंना दिल्ली येथें भेटलों, तेव्हां ते मला म्हणाले कीं, अब्दुल्ला यांना अटक करूं नका असें बजावलें असतांना, जी अटक झाली यामुळें त्यांना अतिशय मनस्ताप झाला आहे. परंतु जसजसे दिवस गेले व काश्मीरमध्यें स्फोटक परिस्थितींत 'नेहरुंनी' अवलंबिलेल्या या कडक उपायाची सर्वत्र वाहवा होऊं लागली, तेव्हां नेहरूंनी झाल्या गोष्टीशी जमवून घेतलें व मिळालेले हे व्याजोक्त धन्यवादहि स्वीकारले.

कोरिया हा देश १९०५ मध्यें रुसो-जपानी युद्धानंतर जपानच्या अंमलाखालीं गेला. १९४३ सालीं कैरो येथें अमेरिका, चीन व ब्रिटन यांनीं असें घोषित केलें कीं दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस कोरिया स्वतंत्र करण्यांत येईल. १९४५ सालीं पोस्टडॅम येथें या निर्णयावर पुन: शिक्कामोर्तब झालें. तेव्हां असें ठरलें कीं, रशियानें ३८° अक्षांशाच्या उत्तरेकडे जपानी सेनेची शरणागती स्वीकारावी व अमेरिकेनें ३८° अक्षांशाच्या दक्षिणेकडे. रशिया, ब्रिटन, अमेरिका यांनीं डिसेंबर १९४५ मध्यें असें एकमतानें ठरवलें कीं संपूर्ण कोरियाला लोकशाही अधिष्ठित असें तात्पुरतें सरकार असावें. अमेरिका व रशिया यांच्यांत कोरियांत या सरकार निर्मितीसाठीं जें कमिशन नेमावयाचें, त्याबाबतींत मतभेद झाल्यानें हा प्रश्न यु. नो. कडे १९४७ सालीं नेण्यांत आला. संयुक्त राष्ट्र संघानें अशी शिफारस केली कीं मार्च ४८ पूर्वी राष्ट्रीय सरकारसाठीं तिथें निवडणुका व्हाव्या व अमेरिकेचें व रशियाचें सैन्य या सरकार-स्थापनेपासून नव्वद दिवसांत काढून घेण्यांत यावें. जनरल असेंब्लीनें ठराव केला कीं कोरियांतील परिस्थितीची पहाणी करून सर्व कोरियाकरतां राष्ट्रीय सरकार कसें स्थापन करतां येईल याचा विचार करण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत यावें. रशियन सभासदानें यावर मतदान केलें नाहीं, कारण कमिशनचा शिरकाव उत्तर कोरियांत होऊं देण्यास त्यांचा विरोध होता. अर्थात् कमिशनची व्याप्ती दक्षिण कोरियापुरतीच मर्यादित झाली. दक्षिण कोरियाचें प्रजासत्ताक स्थापन होऊन डॉ. सिगमन् ऱ्ही हे अध्यक्ष निवडण्यांत आले. रशियनांनीं ३८ अंश अक्षांशाच्या उत्तरेस ऑगस्ट १९४८ मध्यें निवडणुका घेऊन सर्व कोरियावर अधिकार सांगणारे प्रजासत्ताक उत्तर कोरियांत निर्माण केलें कोरियाची अशा रितीनें दोन परस्पर विरोधी

ध्येयवाद बाळगणाऱ्या दोन सरकारांत फाळणी झाली. अमेरिकन फौजा दक्षिण कोरियांतून १९४८ च्या डिसेंबरांत व रशियन फौजा उत्तर कोरियांतून जून १९४९ मध्यें काढून घेण्यांत आल्या.

सिगमन ऱ्ही यानें उत्तर कोरियावर चाल करून जाण्याची धमकी दिलेली होती. उत्तर कोरियन सैन्यानें याला पायबंद घालण्यासाठीं २८ जून १९५० रोजीं ३८° अक्षांश ही रेषा ओलांडली व कोरियाच्या या दोन भागांत युद्ध पेटलें. अमेरिका व ब्रिटन यांनी दक्षिण कोरियाच्या मदतीला सैन्य धाडलें. ६ नोव्हेंबर १९५० रोजीं जनरल मॅकआर्थरच्या हाताखालीं लढणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या सैन्यानें कोरियन आघाडीवर, चिनी सैनिक लढत असल्याचें जाहीर केलें. उत्तर कोरियन व चिनी कम्युनिस्ट एका बाजूला व संयुक्त राष्ट्रांच्या अधिपत्याखालीं दक्षिण कोरिया व इतर १६ राष्ट्रांची सैन्यें एका बाजूला, अशी लढाई सुरू झाली. चार देशांनी फक्त वैद्यकीय पथकें धाडली. भारत, इटली, नॉर्वे व स्वीडन हे ते चार देश होत.

२७ जुलै १९५३ ला अखेर शस्त्रसंधि झाला. लढाई संपली ३८° अक्षांशावर ही युद्धबंदी रेषा ठरली. तीन वर्षे हें युद्ध चाललें व पुष्कळच मनुष्यहानी झाली. संयुक्त राष्ट्रांच्या सेनानीच्या ताब्यांत चिनी व उत्तर कोरियन मिळून ५८००० कैदी होते व उलटपक्षीं फारच थोडे अमेरिकन व ब्रिटीश कैदी उत्तर कोरियाच्या ताब्यांत होते. पश्चिमी राष्ट्रांचें म्हणणें होतें कीं कम्युनिस्ट राजवटींत त्यांच्या घरादारांची परिस्थिती असह्य असल्यानें पकडलेल्या पैकीं बहुतेक कैद्यांची परत जाण्याची इच्छा नव्हती. **तटस्थ** राष्ट्रांचें एक कमिशन यासाठीं संयुक्त राष्ट्रसंघानें नेमलें. प्रत्येक कैद्याला त्याला परत जावयाचें आहे काय हें विचारून त्याप्रमाणें त्यांना उत्तर कोरियांत किंवा इतरत्र पाठवावें, हें कमिशननें ठरवावयाचें होतें. परंतु हें कमिशन एकत्र जमा होण्यापूर्वीच ५८००० पैकीं ३५००० कैदी सामुदायिक रित्या कैदेंतून निसटले. मागें प्रश्न फक्त २३००० लोकांचा उरला. पुष्कळांना शंका आली कीं या ३५००० सैनिकांना पळून जाण्यामागें सिगमन् ऱ्हीं होता.

या तटस्थ राष्ट्रांच्या कमिशनचे अध्यक्ष म्हणून लेफ्ट. जनरल थिमय्या यांना भारतानें निवडलें. थिमय्या यांचे बरोबर हकसर व बहादुरसिंग हे

सल्लागार म्हणून होते. कैदी पकडून ठेवणाऱ्या हिंदी सैनिकांचे कमांडर म्हणून लेफ्ट. जनरल एस. पी. पी. थोरात हे होते. थिमय्यांनी आपला चीफ ऑफ स्टाफ म्हणून मला निवडलें.

मी कोरियाला जावयास निघण्यापूर्वी नेहरूंनी मला बोलावून घेतलें. कोरियांतील युद्धकैद्यांच्या प्रश्नाची विविध अंगे त्यांनी मला समजावून सांगितली. नेहरू म्हणाले आपण या बाबतींत नुसते संपूर्ण निःपक्षपाती राहून चालणार नाहीं तर आपण पक्षपात करीत नाहीं असें दाखवण्यांतहि आपल्याला यश यायला हवें. कोरियन भाषा आपण शिकण्याचा प्रयत्न करा, म्हणजे आपल्याला या प्रश्नांत अगत्य आहे हें त्यांच्या लक्षांत येईल नेहरूंना असें वाटत होतें कीं बहुतेक कोरियन युद्धकैदी हे साधेसुधे शेतकरी होते. राजकारणापासून दूर होते व अर्थातच त्यांची घरीं परतण्याची इच्छा असली पाहिजे. त्यांच्याशी आपण सहानुभूतीनें वागलें पाहिजे शेवटीं नेहरू म्हणाले कीं जर कांहीं पेचप्रसंग निर्माण झाला तर तो अनौपचारिक रित्या सोडवण्याचा प्रयत्न व्हायला हवा. चीनबद्दल त्यांनीं सांगितलें कीं त्या देशाशीं आपलें सख्य आहे. जसें इतरांशींहि आहे. त्यांची आपली सरहद्द लागून आहे. यामुळें उगाच आपल्या शेजाऱ्याला दुखवणें हें शहाणपणाचें होणार नाहीं. कांहीं झालें तरी आपण कुणा एकाची बाजू न घेतां आपली राजकीय धोरणें सतत मनांत ठेवली पाहिजेत.

जेव्हां तटस्थ राष्ट्रांच्या कमिशननें कोरियन व चिनी युद्धकैद्यांचा संयुक्त राष्ट्रांच्या कमांडरकडून भारतीय सैनिकांकरवीं ताबा घेतला, तेव्हां कैद्यांनीं फारच दंगा केला. यामुळें आपल्या सैनिकांना अति त्रास झाला, तरी ते शांत राहिले लेफ्ट. जनरल थोरात यांची त्यांना आज्ञा होती कीं बदला घेऊं नका. या कैद्यांचा शस्त्रें बाजूला ठेऊन ताबा घ्या.

मला पेकिंग भेटीसाठीं अधिकृत निमंत्रण आलें. थिमय्या व नेहरू यांची परवानगी यासाठीं मी मागितली. दोघांनी नकार दिला. काइसाँग या पॅन मुन जॉंग पासून जवळच असलेल्या ठिकाणाहून खास गाडीनें मला उत्तर कोरियामार्गे व मांचुरियांतील मुकडेन मार्गे चीनला नेण्यांत आलें माझ्या बरोबर परराष्ट्र खात्यांतील बहादुरसिंग, मेजर एच्. एस्. सांडू, माझे स्टाफ अधिकारी व जी. के. रेड्डी, पी. अब्राहम व मलकानी असे तिघे

पत्रकार होते बहादुर हे चीनमध्यें पूर्वी गेलेले असल्यानें त्यांना चीनची चांगली माहिती होती व त्यांनी मला बहुमोल सूचना दिल्या. पुष्कळ चिनी नेत्यांशीं त्यांची व्यक्तीशः ओळख होती. आमच्याबरोबर एक चिनी राजकीय **कमिसार** होता. तो नेहमी आमच्याशी दुभाष्यामार्फत बोलत असे व आम्ही जेव्हां हिंदींत आपापसांत काय वाटेल तें बोलत असू तेव्हां तो मख्ख चेहरा करून असे. सर्व प्रवासभर हें चाललें होतें आम्हांला असा संशय देखील आला नाहीं कीं याला चांगलें हिंदी येत असून आमचें बोलणें त्याला समजत होतें ! १५ डिसेंबर १९५३ ला आम्ही पेकिंगला पोंचलो. भारतीय वकिलातींतील व चिनी परराष्ट्र खात्यांतील अधिकाऱ्यांनी आमचें स्वागत केलें.

पेकिंगमध्यें लोकांमधील शिस्त व वक्तशीरपणा याचा माझ्यावर फार परिणाम झाला. शैक्षणिक, वैद्यकीय बाबतींतील त्यांची धडाडी व ज्या उत्साहानें ते औद्योगिक व शेतकी क्षेत्रांतील प्रश्न हाताळीत होते, तें पाहू-नही मी थक्क झालों. परंतु या उलट मला असें दिसून आलें कीं त्यांना भाषणाचें व कृतीचें स्वातंत्र्य फारच थोडें आहे. एखाद्या गोष्टींत पुढाकार घेणें त्यांना शक्य नसे. प्रत्येक वेळीं काय करायचें हें वरच्या अधिकाऱ्यांना विचारण्यांत येत असे व त्यांच्या जीवनाचे असे जे भाग होते, कीं जे त्यांना फारसे श्रेय देणारे नव्हते, ते आम्हांला दाखवण्यास ते राजी नव्हते.

चीनच्या प्रोटोकॉल चीफने (परराष्ट संबंधाचा अधिकारी) जेव्हां मला विचारलें कीं पेकिंगमध्यें मला कुणाला भेटण्याची इच्छा आहे, तेव्हां मी सांगितलें अमुकच एकाला भेटण्याचा माझा आग्रह नाहीं. तेव्हां त्यानें उपपरराष्ट्र मंत्री जनरल ली का नाँग व पंतप्रधान चौ एन् लाय यांच्याशीं भेटी ठरवल्या. मी चिनी पंतप्रधानाला अनेक वेळा भेटलों. यापैकीं एक भेट ही चीन मधील भारताचे वकील राघवन् यांच्या समक्ष २२ डिसेंबर १९५३ ला झाली. चौ एन् लाय यांनीं आग्रहपूर्वक सांगितलें कीं मी खालील गोष्टी नेहरूंना कळवाव्या.

अ) अमेरिकेला दक्षिणपूर्व आशियांत तंग परिस्थिती पुढील कारणां-साठीं हवी आहे.



उजवीकडून डावीकडे – एअर मार्शल मुखर्जी, लेखक व सारीन (१९५९)

१) जपानला शस्त्रसज्ज करण्यास व या भागांत त्यांचे पुष्कळ सैन्य ठेवण्यास त्यांना कारण मिळावें.

२) पूर्वेकडे कम्युनिस्टांचा धोका आहे, या सबबीखालीं पाकिस्तानला लष्करी साहित्याची मदत त्यांना करता यावी

ब) अमेरिका रशियाकडे अशी मागणी करीत होता कीं रशियानें राजकीय परिषदेंत भाग घ्यावा व अशियांत शांततेची हमी द्यावी. जणूं रशियाच इथें गडबड करीत होता व अशी हमी चीनचे लोकसत्ताक राज्य देऊंच शकत नव्हतें ! याचा अर्थ स्पष्ट होता कीं अमेरिकेला राजकीय परिषद भरविण्याची इच्छा नव्हती.

क) जर अमेरिकेनें चीन विरूद्ध युद्ध सुरू करण्याची चूक केलीच तर चीन तयार आहे. या उपद्व्यापांत अमेरिकेला डोकें पिचून रक्तबंबाळ व्हावें लागेल.

चौ एन् लाय यांनीं सांगितलें कीं ज्या पद्धतीनें तटस्थ राष्ट्रांचें

कमिशन कोरियांत काम करीत आहे, त्यामुळें त्यांची निराशा झाली आहे. कारण कमिशन खरी वस्तुस्थिती पहाण्यास असमर्थ ठरलें आहे.

मी आपले दूत राघवन यांना या मुलाखतीनंतर सुचवलें, कीं पंतप्रधान नेहरुंना चौ एन् लायनी जें मला सांगितलें, त्याचा सारांश कळवण्यांत यावा. राघवन् यांनीं हें मान्य केलें.

दुसऱ्या एका प्रसंगीं भेट झाली असतां चौ एन् लाय म्हणाले कीं जगाच्या २४०० कोटी पैकीं चीनची लोकसंख्या ६० कोटी आहे. तिसऱ्या महायुद्धाची आम्हांला भिती वाटत नाहीं. कारण या युद्धानें जगांतल्या समाजवादी शक्तीचा विजय निश्चित होईल, असें सांगून चौनीं पुढें म्हटलें, जर इंग्लंडसारख्या देशावर कांहीं अणू बॉम्ब पडले, तर सगळें इंग्लंडच नाश पावेल. उलट एवढ्या बॉम्बनी, फक्त चीनचा कांहीं भागच नाश होऊन, इंग्लंडपेक्षां कांहीं पटीनें जास्त चिनी भूभाग शिल्लक राहीलच. मी त्यांना विचारलें कीं चिनी क्रांतीसाठी रशियानें स्फूर्ति दिली काय, त्यावेळीं एकदम खवळून ते म्हणाले कीं खरीखुरी क्रान्ति ही कधीं बाहेरून दत्तक घेतां येत नाहीं व म्हणून चिनी क्रांति ही सपूर्णपणें चिनीच आहे. कांहींना वाटतें तशी ती रशियाकडून उचलेलली नाहीं. ६० कोटी चिनी जनतेला २० कोटी रशियनांनीं स्फूर्ति दिलेली नाहीं.

चौ एन् लायनीं सांगितलें, कीं पाहुण्यांकडून टीका त्यांना हवी असते, आणि मला जर चिनी भेटीनंतर कांहीं म्हणावयाचें असेल, तर तें ऐकण्यास ते उत्सुक आहेत. मी सांगितलें कीं मी इथें जें पाहिलें, त्यांतील पुष्कळ गोष्टींनीं माझ्या मनावर खोल परिणाम केला असला, तरी कांहीं गोष्टी त्यांच्या नजरेस आणण्याची माझी इच्छा आहे. उदाहरणार्थ माझ्या बरोबर जेवणासाठीं मी जेव्हां कांहीं चिनी अधिकाऱ्यांना निमत्रण दिलें, तेव्हां शेवटपर्यंत ते जेवायला येत आहेत कीं नाहीं, हेंच त्यांनी सांगितलें नाहीं मी जेव्हां पेकींगचें आकाशवाणी केंद्र पाहाण्याची इच्छा प्रदर्शित केली, तेव्हां मला शहर दाखविणाऱ्या अधिकाऱ्यानें, मला केंद्र पहातां येईल किंवा नाहीं याविषयीं कांहींच निश्चित न सांगता, मला मात्र बुचकळ्यांत टाकून ठेवलें मी जेव्हां पेकींगच्या गलिच्छ वस्त्या पहाण्यासाठीं चलण्यास सांगितलें, तेव्हां त्यानें कबुल केलें परंतु प्रत्यक्षांत

दाखवल्या मात्र नाहींत. मी चौ अेन् लाय यांना विचारलें कीं या लोकांना प्रत्येक बाबतींत वरिष्ठांना विचारावें लागतें कीं काय.

चौ एन लाय म्हणाले, कीं मला असा अनुभव यावा याबद्दल ते दिलगीर आहेत परंतु हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं अजून हें चिनी राष्ट्र वयानें लहान आहे. मुलासारखे अपरिपक्व आहे. यासाठीं त्याच्यावर कांहीं बंधनें घातली आहेत. या देशाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांना हें पाहिलें पाहिजे कीं यौवनकालांत कांहीं विपरीत बोलणें वा कृति, त्याच्या हातून होत नाहीं ना. उद्यां हें मोठें झालें, कीं हीं बंधनें काढून घेण्यांत येतील. जरी माझे प्रश्नाला हें समाधानकारक उत्तर आहे असें मला वाटलें नाहीं, तरी मी याबाबतींत अधिक प्रश्न केले नाहींत. हे 'किरची' ला धरून झालें नसतें. किरची म्हणजे चिनी भाषेंत सभ्यता (Courtesy).

चौ एन् लाय यांनीं मला व बहादुरसिंग यांना, एकदां अल्पोपहाराला बोलावलें. ते चिनी भाषेंत बोलत होते व दुभाष्या तें आम्हांला सांगत होता. परंतु मध्येंच त्यांच्या तोंडात एखादा इंग्रजी शब्द येई. मद्यपान सुरू झालें. माओ–त्से–तुंग व नेहरू यांचे आयुरारोग्य चिंतण्यांत आलें. भारत-चीन यांचेहि अभिष्ट चिंतण्यांत आलें. चौ एन् लाय मला आग्रह करूं लागले कीं 'माओताई' (तांदुळाचे मद्य) पिण्याची चढाओढ लावूं या. मी त्यांना सांगितलें कीं बहादुरसिंग हे माझे या बाबतींत चांगलें प्रतिनिधित्व करतील पाठोपाठ पंधरा चषक रिते केल्यानंतर, चौ एन् लाय यांचे पायांना कैफ जाणवूं लागला. परंतु बहादुरसिंग एकाद्या खडकासारखे स्थिर होते. त्यामुळें चौ एन् लाय यांचा आत्मविश्वास डळमळूं लागला. बहादुरकडे रोखून पहात त्यांनी आश्चर्यानें विचारलें.

'आपण एवढे प्यायला शिकलांत तरी कुठें ?'

बहादुर ताठ उभा राहिला व त्यानें मिस्किलपणें उत्तर दिलें—

'महाराज, आमचे रजपुतांचे घराणे गेल्या सात-आठ पिढ्या भरपूर पीत आलेलें आहे. पिणें हें माझ्या रक्तांतच आहे.'

चौ एन् लाय यांनीं मग पिण्याचा कार्यक्रम संपवला व अधिक कांहीं आन्हिकें न करतां, त्यांनी खाणें सुरूं करण्यास सांगितलें.

या मनोरंजक चिनी भेटीनंतर मी पॅन–मुन–जाँग येथें परत आलों.

कोरियांत संयुक्त राष्ट्रसंघाला चिनी अधिकाऱ्यांनी फारच त्रास दिला. प्रत्येक वेळीं कांहीं चर्चेसाठीं टेबलासमोर बसल्यावर, मतभेद झाला किंवा पत्रव्यवहारांत मतभेद झाला तर संयुक्त राष्ट्रसंघाला ते धमक्या देत, परिणाम गंभीर होतील असें बजावीत. राष्ट्रसंघाच्या कमांडचें नेहमीचें सांगणें एकच असें, कीं आमच्या ताब्यांतील कैद्यांना कम्युनिझमबद्दल तिरस्कार वाटतो व घरीं परतण्याची त्यांची सुतराम् इच्छा नाहीं.

कैद्यांचें मन जाणून घेण्यासाठीं, आम्ही कांहीं पद्धत घालून नियम तयार केले होते. परंतु याचें पालन करण्यांत आलें नाहीं हें दुर्दैव होय. हे कैदी आम्हाला शिव्या देत, खोटेनाटे आरोप करीत, आमच्या जाणाऱ्या-येणाऱ्या मोटारगाड्यांवर दगड मारीत व इतर अनेक हिंसक प्रकार करीत आम्ही त्यांच्याशी मृदुपणें परंतु ठामपणें वागत राहिलों

ज्या ठिकाणीं त्यांची जबानी घेण्यांत येई तिथल्या तंबूकडे नेतांना ते आरडाओरडा करीत, रक्षकांवर हात टाकीत. कांहीं मुळीं यायचेच नाकारीत. जबानी दिल्यावर ज्यांनीं घरीं परतण्याची इच्छा दाखवली, असे फारच थोडे होते.

या कैद्यांत, त्यांनी परत जाऊं नये या साठीं प्रयत्न करणारीं माणसें, पेरण्यांत आलीं होतीं. या टोळीच्या नेत्यांना वेगळें काढणें आम्हांला जमेना. हे लोक कैद्यांना धमक्या देत, खूनहि पाडीत. याबद्दल त्यांना शिक्षा न होतां उलट आमच्याशी बरोबरीनें बोलण्याची संधि त्यांना दिली जाई.

एकदां या कैद्यांतील कांहींनीं, एक खून पाडला. गुन्हेगारांना शोधण्यासाठीं ओळख परेड घेण्यास आमच्या सैन्याला त्यांनीं अडथळा सुरू केला. मी हे संशयित शोधून काढण्याची कामगिरी आपणहून पत्करली. थिमय्या यांनी मला परवानगी दिली. मी या कैद्यांच्या विवक्षित छावणींत गेलों व दूरध्वनिक्षेपकांतून जाहीर केलें– ' मला सगळे कैदी माझ्या समोरून रांगेने जायला हवे आहेत. जर मुकाट्यानें हें घडलें नाहीं तर बळाचा वापर केला जाईल.'

पहिल्या प्रथम त्या आडदांड लोकांनीं माझ्या म्हणण्याकडे लक्षच दिलें नाहीं. त्यांना वाटलें माझी धमकी पोकळ आहे. त्यांनी आरडाओरडा करून

दंगा सुरू केला व बाहेर पळून जाण्यासाठीं सामुदायिक हल्ला सुरू केला. मी लगेच आमच्या सेनेला गोळ्या झाडण्याचा हुकुम सोडला. एक दोन कैदी मरून पडले. या कडक कृतीचा चांगलाच उपयोग झाला. त्यांची बाहेर पळून जाण्याची दगल थंडावली. यावरून हें सिद्ध झालें कीं जरा बळाचें प्रदर्शन करतांच, त्यांना हें समजलें कीं आम्ही असे त्यांना ऐकणार नाहीं. पण आम्ही हें न करतां, त्यांचे लाडच करीत राहिलो व कैद्यांचे कैदी होऊन बसलों.

अशा या कठीण परिस्थितींतहि आम्ही जें चांगलें काम केलें, त्याचें श्रेय लेफ्ट. जनरल थिमय्या व मेजर जनरल थोरात यांना दिलें पाहिजें. त्यांनी नाजुक परिस्थिती मोठ्या चलाखीनें व नेटानें हाताळली.

माझ्या कोरियांतील सहा महिन्यांच्या वास्तव्यांत, मी अनेक सेनांच्या सेनानींना भेटलों व ५०–५३ या तीन वर्षांत निरनिराळ्या लढाया ते कसे लढले याचा अभ्यास केला.

नेहरू नेहमीं म्हणत कीं लोकशाहीचे, निदान आशियांतील भवितव्य, लोकशाहीधिष्ठित भारत व एकपक्षीय चिनी राजवट यांच्यापैकीं कोण जलद गतीनें व चांगली भरभराट साधतो यावर अवलंबून आहे. म्हणूनच कोरियांतून परतल्यावर मी जेव्हा नेहरूंना दिल्लींत भेटलों, तेव्हां ते म्हणाले कीं, मी चीनमधून पुष्कळच गोष्टींनीं भारून जाऊन परत आलों आहे, हें खरे काय. तसें असेल तर या कोणत्या गोष्टी. मी सांगितलें कीं मी जो थोडा फार चीन पाहिला, त्यावरून मला वाटतें कीं चीन बळकट सरकार मिळाल्यानें झपाट्यानें प्रगती करीत आहे. भारतांतील इतर कांहीं मोठ्या लोकांनीही, याविषयीं माझ्याशी चर्चा केली. या पैकीं बहुतेकांना चीनचा राजकीय ध्येयवाद पसंत नसला, तरी अनेक क्षेत्रांत चीननें केलेल्या प्रगतीची नोंद त्यांनीं केली होती.

जनरल जे. एन्. चौधरी हे जेव्हां चीनला भेट देऊन आले, तेव्हां त्यांनीं मला १ नोव्हें. १९५६ रोजीं पत्रांत लिहिलें.

'मी तुम्हांला सांगतो कीं मी त्या मोठ्या देशांत जें घडत आहे, त्याचा माझ्यावर खूपच परिणाम झाला आहे...'

परंतु असेंहि कांहीं होतें कीं चीन जेवढें सांगतो, तेवढी प्रगती त्यांनी केलेली नाहीं, असें त्यांना वाटे. माझेंच सांगायचें तर मला असें वाटे कीं

एखाद्या देशाच्या शक्तीची उगाच अतिशयोक्तीपूर्ण स्तुती आपण करूं नये. परंतु मुद्दाम त्यांच्याविषयीं कमी अंदाज बांधणेंहि आपल्या हिताचें नाहीं.

कोरियांत आलेला शीण घालविण्यासाठीं मी दीर्घ मुदतीच्या रजेचा अर्ज केला. माझा अर्ज फेटाळण्यांत आला व परराष्ट्र मंत्रालयांत माझी नियुक्ती झाली. कांहीं महिने विशेष अशी ही नेमणूक केलेली होती. या काळांत एकदां मला नेहरूंनीं विचारलें कीं मी पेकिंगमध्ये असतांना चौ एन् लाय यांना भेटलों कीं नाहीं. मी उलट चौकशी केली कीं पेकिंग येथील आपल्या वकीलानें, माझा चौ यांच्याशी झालेल्या एका भेटीचा वृत्तांत धाडला होता तो मिळाला कीं नाहीं. जव्हां नेहरूंनी अशा तऱ्हेचा वृत्तांत न पाहिल्याचें सांगितलें, तेव्हां या भेटीच्या वृत्तांताची माझी टिपणें मी नेहरूंना दाखवली

नॉर्थ इस्टर्न फ्रॉंटियर एजन्सी, म्हणजेच नेफा १९५४ च्या सुरुवातीलाच, जेव्हां कांहीं दिवसांपूर्वींच तिथें एका हिंदी जथ्याची वासलात लावली गेली, त्याची हकिगत जेव्हां मला कळली तेव्हां माझें त्या भागासंबंधीचें कुतुहल चाळवलें गेलें. आसाम रायफल्स या फळटणींतील एक तुकडी, सुबनसिरी नदीच्या पूर्व किनाऱ्यानें दापोरिजो पलिकडील अज्ञात प्रदेशांत, एक मुलकी ठाणें बसवण्याकरिता गेली होती. या भयंकर मुलखांतून कांहीं मैल गेल्यावर ते आशिमोरी या स्थळाजवळ येत होते. रात्र तिथें काढायची होती.

तुमसा दुसक नांवाच्या स्थानिक थागिन टोळी-प्रमुखाचे लक्ष, दूर अंतरावरून या सैनिकी जथ्याकडे गेलें. हें कोण असावें हें त्याला कळेना. कांहीं तरी वाईट हेतू मनांत धरून ही मंडळी आपल्या मुलुखांत घुसली आहेत, असें वाटून त्यानें आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय केला. कुणालाच कांहीं सांगता येईना. पुरेशी माणसें हाताशीं असल्यानें, त्यांनीं या आगंतुक मंडळींचा युक्तीनें निकाल लावण्याचें ठरविलें. हा जथा त्यांच्या प्रदेशाच्या जवळ आला, तेव्हां या थागिन लोकांनीं त्यांचें जमातीच्या रितीप्रमाणें स्वागत केलें. रात्रीं हा जथा जिथें झोपणार म्हणत होता, ती जागा त्यांनी साफ करून दिली. या स्वागतांतील प्रेम पाहून, आपले सैनिक खूप झाले व या अज्ञात प्रदेशांत त्यांनी चांगली छाप टाकली आहे, असा स्वतःचा समज करून, स्वतःला धन्य समजूं लागले. एकच रक्षक जागा ठेऊन सर्वजण गाढ झोपच्या आधीन झाले. दिवसभराच्या वाटचालीच्या थकव्याने

त्यांना गाढ झोप लागली. लुच्चा थागिन टोळीनें, आपल्या प्रमुखाच्या नेतृत्वाखालीं त्या रात्रीं, मीठ मागण्याच्या निमित्तानें कॅंपमध्यें प्रवेश केला व निद्रितावस्थेंतील भारतीयांवर ते तुटून पडले. ७५ सैनिकांपैकीं ७३ व कांहीं मुलकी लोक यांना जागच्याजागीं निर्घृणपणें ठार करण्यांत आलें. कमांडर रिपुदमनसिंग व कांहीं जण दोन दिवस दडून बसले, त्यांना शोधून काढण्यांत येऊन त्यांच्या शरीराची खांडोळी उडवण्यांत आली.

या भयंकर अत्याचाराची बातमी जो एकजण वांचला त्याच्याकडून कळली व शिलाँगमार्गें दिल्लीला पोंचली. आपल्या सरकारच्या मनांत प्रश्न आला, कीं ज्यानीं हा अत्याचार केला त्यांच्याशीं कसें वागायचें. सद्हेतूनें नव्या अज्ञात प्रदेशांत सरकार पाऊल टाकूं पहात होतें, आणि पहिल्याच फटक्यांत थागिन जमातीनें इतकी आपली माणसें क्रूरपणें मारली होती.

अखेर असें ठरलें कीं तीन लष्करी तुकड्या ज्यांत सुमारे हजार सैनिक असतील यांनी दापोरिजो, अलाँग व माचुका या तीन दिशांनी सुबनसिरी नदीच्या कडेनें आशिमोरीवर जावें व गुन्हेगारांना अटक करावी. थागिन प्रमुखानें जेव्हां पाहिलें कीं फारच मोठे सैन्य त्याच्या ' राज्या ' वर चालून आलें आहे, तेव्हां तो खरोखर घाबरला पूर्वी आलेल्या सैनिकांचा वध केल्याचें मान्य करून, तो या सेनेच्या पाया पडला व दयेची याचना करूं लागला.

आपल्या सरकारनें याला धोरणीपणानें सोडून दिलें व हा पुढें सुबनसिरी जिल्ह्यांत आपला प्रमुख आधारस्तंभ झाला.

१५ जानेवारी १९५६ रोजीं मला मेजर जनरल म्हणून बढती मिळाली व उत्तर प्रदेश विभागाचा कमांडर म्हणून कांहीं महिन्यांपुरती माझी नेमणूक झाली. माझे हाताखालीं खूपच शैक्षणिक खातीं होतीं त्यांतल्या पॅराशुट ब्रिगेडचे कमांडर ब्रिगेडियर पी. पी. कुमारमंगलम् हे होते. हे सध्याचे सेनाप्रमुख आहेत.

या अधिकारावर असतांना मला एकदां बरेली येथील तुरुंगाला भेट देण्याचा योग आला. मी तुरुंगांत फेरी मारत असतांना, एका तरुण मुलाला एका म्हाताऱ्या कैद्याचा डबडबलेल्या डोळ्यांनी निरोप घेतांना

पाहिलें. मी त्याच्याजवळ थांबलों. व कुतुहलानें तुरुंगाधिकाऱ्यांना विचारलें, कीं या दोघांची काय हकीगत आहे. त्यांनी सांगितलें, कीं त्या वृद्धानें आपण एक खून केल्याची कबूली अधिकाऱ्यांकडे दिली आहे व त्यानुसार त्याला फांशीची शिक्षा झालेली आहे. मात्र वस्तुत: हा खून त्याच्या मुलानें केलेला आहे व तो आतां आपल्या दुर्दैवी बापाला भेटण्यासाठीं आलेला आहे. एका निरपराध माणसाला कांहीं तासांतच फांशी दिलें जाणार, ही गोष्ट माझ्या मनाला पटेना. मी म्हणून लगेच माझा पुतण्या एम् जी. कौल, आय्. सी एस्. याला फोन केला. लखनौ येथें तो गृहखात्याचा चिटणीस होता मी त्याला या वृद्धाची दुसऱ्या दिवशींची फांशी स्थगित करण्याची आज्ञा काढण्याची गळ घातली. कौल यानें यांत लक्ष घातलें व तांतडीनें अशी आज्ञा फारसा वेळ न दवडतां काढली. फांशी स्थगित झाली व केंद्रीय गृहमंत्री पंडित पंत यांच्याकडे, त्याच्याबद्दल शेवटच्या क्षणीं रदबदली करण्याची संधि मला लाभली. दुर्दैव असें कीं तो वृद्ध आपली कबुली बदलायला तयार होईना व अधिकाऱ्यांना कांहीं आठवड्यांनंतर त्याला फांशी द्यावें लागलेंच.

लेफ्ट. जनरल संतसिंग हे माझे आर्मी कमांडर होते. त्यांनीं १९५६ च्या उन्हाळ्यांत मला सांगितलें कीं कोहिमाजवळ एका दुर्दैवी घटनेंत शिख फलटणींतील सैनिकांनी चुकून एक प्रमुख नागा नागरिक, डॉ. हारलू यांना ठार केलें आहे. डॉ. हारलू हे आपल्या सरकारचे इमानी समर्थक होते व त्यांचें वय ७५ वर्षांचें होतें त्यांचें असें झालें.

कोहिमावर नागांनीं कांहीं दिवसांपूर्वीच हल्ला केलेला असल्यानें, भारतीय सेनेला हा पाठींत खुपसलेला खंजीर मनांत सलत होता. डोळ्यांत तेल घालून अधिकच सावधानतेनें ते सर्वत्र लक्ष ठेवीत होते. एक दिवशीं सकाळीं शिख फलटणीच्या रक्षकांना कांहीं अंतरावर डॉक्टर हारलू यांची आकृती दिसली. सकाळच्या फेरफटक्यासाठी डॉक्टर बाहेर पडले होते व आपल्या खेडवळ पोषाखांत ते थरथरत कोहिमाच्या दिशेनें चालत होते. त्यांना बंडखोर नागा समजून, शीख रक्षकांनी गोळ्या घातल्या. जेव्हां मारली गेलेली व्यक्ति ही डॉक्टर हारलू आहेत असें सिद्ध झालें, तेव्हां एकच गहजब झाला. भारतीय सेनेवर क्रूरपणाचा व कपटाचा आरोप

करण्यांत आला. डॉ. हारलू यांची मुलगी, परराष्ट्रीय मंत्रालय कचेरींत, नेहरूंच्या हाताखालीं दिल्लीस नोकरीस होती. तिला व नेहरूंना ही बातमी एकाच वेळीं कळली. या प्रकरणांत चौकशी करण्यासाठीं चौकशीमंडळ नेमण्यांत आलें. या घटनेचे राजकीय प्रतिध्वनी फार जोराचे होतील, या भितीनें लष्करी अधिकारी—यांत लेफ्ट. कर्नल गुरुबक्षसिंग हे देखील होते—हे ज्या त्यांच्या सैनिकांनी डॉ. हारलू यांना ठार केलें होतें, त्यांना वाचवण्यासाठीं धडपडत होते. पहिल्या चौकशींत आरोपींना शिक्षा झाली नाहीं. ही चौकशी नि:पक्षपाती झाली नाहीं, असें ठरल्यानें, पुन: चौकशी करण्याची आज्ञा झाली. या चौकशीचे न्यायाधिश होते ॲडव्होकेट जनरल ब्रिगडियर डी. एम्. सेन. यांनी आरोपींना दोषी ठरवले व कडक शिक्षा ठोठावल्या. निराधार असे गर्भित आरोप कांहीं अधिकाऱ्यांवर या प्रकरणांत करण्यांत आले. यांतच लेफ्ट. जन. संतसिंग यांना निवृत्ती वयापूर्वी पांच महिने निवृत्त करण्यांत आले. ब्रिगेड व बटालियनचे कमांडर यांच्या संशयास्पद वातावरणांत बदल्या करण्यांत आल्या. परिस्थितीचे हे सर्व बळी ठरले.

# ४

# सिद्धता

# चार : सिद्धता

**मला** १९५६ च्या उन्हाळयांत चौथ्या पायदळ (इन्फंट्री) डिव्हीजनचा कमांडर म्हणून नेमण्यांत आलें. या तुकडीनें मागच्या युद्धांत जागतिक कीर्ति संपादन केलेली होती. माझ्या जागेवरचे पूर्वीचे अधिकारी मेजर जनरल बहादुरसिंग यांनी ही तुकडी सुस्थितींत ठेवलेली होती. माझ्या हाताखालीं ३ ब्रिगेडस् होत्या. क्रमांक पांच, सात व अकरा. यांतच कांहीं उत्कृष्ट सेनाही होती. मी वरिष्ठांकडे, नागालँड मधून काढून घेतलेली, शीख फलटण मागितली. डॉ. हारलू यांच्या प्रकरणांत या फलटणीला त्यांची चूक नसतांना चांगलाच हिसका बसला होता. मला त्यांची गेलेली पत परत मिळवून द्यायची होती. मी त्यांच्यासंबंधी स्तुतीपर बोलून, त्यांचें मनोधैर्य पुन: प्रस्थापित केलें. लवकरच त्यांनीं हें सिद्ध केलें कीं खेळांत, कवायतींत, निशाणबाजींत किंवा शिक्षणांत ते मुळींच कमी नव्हते.

माझे कोअर कमांडर होते लेफ्ट. जनरल थोरात व नंतर लेफ्ट. जनरल जे. एन्. चौधरी. या पैकीं थोरातांबरोबर काम करणें मला आवडलें, परंतु चौधरी हे अतिशय अहंमन्य होते, फार बडबडे होते व वरिष्ठांच्या हो ला हो करण्यासाठीं अति उत्सुक होते.

या तुकडीचे कमांडरपद स्वीकारल्यावर, मी प्रथम कुठली गोष्ट केली असेल, तर या तुकडीचे पूर्वी नेतृत्व केलेल्या मेजर जनरल रीझ यांना मी पत्र लिहीलें. मला ते अतिशय आवडत असत. इंग्लंडमध्यें सेवानिवृत्त जीवन ते कंठीत होते. फुरसतीच्या वेळांत ते एक नवी वसाहत बांधीत होते. ही न्यूपोर्टच्या उत्तरेस पांच मैलांवर व कार्डिफपासून अठरा मैलांवर होती. मी त्यांना लिहिलें कीं सुप्रसिद्ध अशा या चार क्रमांकाच्या तुकडीचे अधिकारपदावर माझी नेमणूक झालेली आहे व ही जबाबदारी मी विनय-पूर्वक स्वीकारलेली आहे. मला याचा अभिमान आहे कीं एकदां तुमच्या सारख्यांकडे याच तुकडीचें नेतृत्व होतें. मला ते पूर्वीप्रमाणेंच मार्गदर्शन

करतील अशी आशा मी व्यक्त केली होती. त्यांच्याकडून अतिशय प्रेमळ पत्र आलें. त्यांनीं लिहिलें कीं माझें पत्र पाहून त्यांचें मन अतिशय हेलावून गेलें व या तुकडीशी माझ्या मार्फत संबंध ठेवण्यांत असलेला आनंद इतर कशानेंहि त्यांना मिळणार नाहीं. (मी त्यांना या माझ्या तुकडीची हालहवाल मधून मधून कळवत असे. एक दिवशीं कांहीं वर्षांनंतर रीज हे निधन पावल्याचें कळलें. त्यांच्या निधनानें माझा एक मूल्यवान मित्र व थोर वरिष्ठ यांना मी मुकलों.)

जवळ जवळ २०,००० सैनिक असलेली सैनिकी तुकडी म्हणा किंवा असा मोठा गट म्हणा हा संभाळणें ही एक गुंतागुंतीचीच गोष्ट होती. इतकी माणसें व त्यांचे व्यवहार संभाळावयाचे तर तुम्हांला त्यांना समजून घ्यावें लागतें, त्यांची पूर्वपीठिका संपूर्ण रितीनें माहीत असावी लागते व त्यांच्याशीं कौशल्यानें वागावें लागतें. मेजर जनरलचा हुद्दा व सत्ता एवढ्यानेंच केवळ हें साधत नाहीं. अशा मोठ्या व्यवहारांत अनेक प्रकारच्या प्रसगांना तोंड द्यावें लागतें. यांत बेईमानी, कृतघ्नपणा, खोटी स्तुती, भीरुता, क्षुद्रता, असत्य व इतर मानवी स्वभावदोषांशी गांठ पडते व हे सर्व व्यवहाराचा भाग म्हणूनच स्वीकारावें लागतें. समाधान एवढेंच असतें, कीं अशा तऱ्हेचे कटु अनुभव जसे येतात, तशीच लोकोत्तर उदाहरणेंहि आढळतात. त्यागाची, धैर्याची, मैत्रीची. म्हणूनच अशा तऱ्हेच्या सर्व गोष्टींची अपेक्षा मी ठेवली होती व त्यांच्याशी मुकाबला करण्याची तयारी केलेली होती.

या तुकडीच्या शिक्षणाची लष्करी ज्ञानाची बाजू हाताळण्यापूर्वी, मी नेतृत्वगुणासंबंधी व मानवी व्यवहारासंबंधीं जें वाचलेलें होतें, त्याला मनांत उजाळा आणला. लढाईंत सर्व शस्त्रांचा काय काय उपयोग होत असतो त्याचा व लढाईंत उपयोगी असणाऱ्या सर्व दलांचा, सर्व तुकडीच्या दृष्टीकोनांतून मी अभ्यास केला. नंतर जमिनीवरील लढाईतील निरनिराळ्या कृतीची तालीम चढत्या श्रेणीनें मी घेऊं लागलों.

अशाच एका लढाईच्या सैनिकी सरावांत आम्हाला सतलज नदी ओलांडावयाची होती. हल्ला करण्याची सामग्री आमच्याजवळ नसल्यानें, मी ही नदी ओलांडण्यासाठीं पुढें फक्त एकच ब्रिगेड पाठवण्याचा आराखडा आंखला. तोफखाना दल व इंजिनिअर दल यांच्या सहाय्यानेंच मला नदी पार करून

द्यावयाची होती. चढाई करण्याची नियोजित वेळ होण्यापूर्वी ३६ तास, मी काय काय कृति करावयाच्या हे तपासून पहात होतों. इतक्यांत जीप मधून लेफ्टनंट जनरल जे.एन्.चौधरी तिथे आले व माझ्या ब्रिगेड कमांडरना ऐकू जाईल इतक्या मोठ्यानें सांगू लागले, कीं सेनादल प्रमुख जनरल थिमय्या यांच्या सांगण्याप्रमाणें, नदी ओलांडतांना पुढे दोन ब्रिगेड धाडले पाहिजेत. मी सांगितलें कीं चढाईच्या साधनांची कमतरता आहे, म्हणून थिमय्यांचें कांहींही म्हणणें असलें तरी आतां अखेरच्या क्षणीं, माझी आज्ञा बदलणें केवळ अशक्य आहे. यानंतर जेव्हां चौधरी कुजबुजतच राहिले, कीं या चांचणी पद्धतीनें सेनादल प्रमुख हे रागावतील, तेव्हां मी ताडकन् विचारलें कीं ही चांचणी लढाईच्या सरावासाठीं चालली आहे, कीं प्रमुखांना खूष करण्यासाठीं ? चौधरी चडफडत म्हणाले, कीं मी, मला काय वाटेल तें बोलू शकतो, परंतु चढाई करतांना दोन ब्रिगेडस्च वापरल्या गेल्या पाहिजेत. ग्रँट ट्रंक रोडवर एक ब्रिगेड उभी होती व ती या चांचणींत निकामी झालेली आहे असें गृहीत धरावयाचें होतें. परंतु चौधरी हे समजून घेण्याच्या स्थितींत नसल्यानें, मी अनिच्छेनें असें ठरवलें कीं ती ब्रिगेड निकामी झालेली नाहीं, असें समजावें व नदी बोटीनें ओलांडण्याऐवजीं ट्रकमध्यें बसून पुलावरून ही ब्रिगेड पलीकडे जाईल. हा पूल उध्वस्त झालेला आहे असा या सरावांतील गृहीत भाग होता ! जेव्हां जनरल थिमय्या यांनीं, ब्रिगेडियर भगवतीसिंग यानें आपली ब्रिगेड 'उध्वस्त' पुलावरून पलीकडे नेलेली पाहिली, तेव्हां भगवतसिंगांना त्यांनी दोष दिला. चौधरी यांनी प्रत्यक्ष अडचणी लक्षांत न घेऊन, आमच्या ब्रिगडेला हा नदी ओलांडण्याचा फार्स करायला लावावा याबद्दल त्यांनी आश्चर्य प्रदर्शित केलें.

आपल्या वरिष्ठांना खूष करण्यासाठीं चौधरी कसे धडपडत असत, याचें हें एक उदाहरण दिलें. लेफ्ट जन. कुलवंतसिंग या लगतच्या वरिष्ठांशी ते कसे वागत हें खरोखर पहाण्यासारखे असे. ते आपला बराच वेळ हाता-खालच्या अधिकाऱ्यांना स्वतःचे 'पराक्रम' सांगण्यांत घालवीत असत. माझें मत सांगायचें (व मला ठाऊक आहे असे इतर अनेकांचेहि मत आहे)— तर योग्य त्या वर्तुळांत स्वतःची छाप पडावी, यासाठीं ते अति उत्सुक असत. याकरतां कधीं कधीं हाताखालच्या अधिकाऱ्यांचाहि, ते साधन

म्हणून वापर करीत. आपल्या विषयीं, आपल्या कृतिविषयीं, लोक काय म्हणतात हें कळण्यासाठीं, ते सदा तळमळत असत. लोकांनीं म्हणावें, 'काय छान माणूस आहे' अशी त्यांची अपेक्षा असे.

जनरल थिमय्या यांनी, एक चिनी लष्करी शिष्टमंडळ माझ्या तुकडीला भेट देण्यासाठीं फेब्रुवारी १९५८ मध्यें धाडलें. या शिष्टमंडळाचे नेते होते, मार्शल ये चियांग थिंग. मला त्यांच्यासाठीं गोळाबारीचें एक प्रात्यक्षिक करण्यास सांगण्यांत आलें. हल्ला चढवण्यापूर्वीची बॉम्बफेक व तोफांची सरबत्ती या वेळीं मी दाखवली.

या प्रात्यक्षिकाच्या वेळीं संरक्षणमंत्री कृष्ण मेनन, सेनादल प्रमुख थिमय्या, हवाईदल प्रमुख मुखर्जी, स्टाफ कॉलेजचे विद्यार्थी व त्यांचे कमांडर मेजर जनरल ग्यानी हे हजर होते.

पाहुण्यांचें स्वागत करतांना मी पाठ केलेलें चिनी भाषेंतील भाषण केलें. सर्वांनाच मौज वाटली. यावेळीं चिनी व आम्ही यांत जी हार्दिकता होती, ती आपल्या सरकारच्या त्यावेळच्या धोरणानुसार होती.

मार्शल झुकोव्ह यायचे ठरले, तेव्हांहि प्रात्यक्षिकासाठीं माझीच तुकडी निवडण्यांत आली. सर्व तयारी केली होती, परंतु आयत्या वेळीं त्यांची भेट रद्द झाली.

मी चौधरी यांचे बरोबर १९५८ मध्यें जालंदरला राहात असतांनची गोष्ट. चौधरी म्हणाले कीं त्यांचें भविष्य होशियारपूरच्या एका प्रख्यात भृगू (संहितावाला) कडून वाचून घ्यायचें आहे. जालंदरहून हा एका तासाचा रस्ता होता मी व आणखी एक अधिकारी, चौधरींबरोबर या भृगू पंडिताकडे गेलों. या पंडितानें जेव्हां सांगितलें, कीं चौधरी हे एक दिवस भारताचे सेना प्रमुख होतील, तेव्हां चौधरींचा आनंद गगनांत मावेना. माझ्या आयुष्यांतील कांहीं घटनाहि त्यानें बरोबर वर्तवल्या.

प्रेम भाटीया हे सुप्रसिद्ध पत्रकार, त्यावेळीं अंबाल्याहून निघणाऱ्या 'ट्रिब्यून' पत्राचे संपादक होते. ते व मी कॉलेजांत एकत्र होतो. एप्रिल १९५९ मध्यें त्यांनीं मला, एलिसवर्थ बंकर या भारतांतील अमेरिकन वकिलांच्या सत्कार समारंभासाठीं बोलावलें. मी एका बाजूला बसून हा

समारंभ पहात असतांना, प्रेम भाटीया यांनीं एकदम जाहीर केलें, कीं मी पाहुण्यांच्या संबंधी चार शब्द सांगावे. मी असें कांहीं अपेक्षिलेलें नसल्यानें, चार मित्रत्वाच्या भावनेचे शब्द मी बडबडलो. नंतर त्यांच्याशी माझें कळकळीचें कांहीं बोलणेंहि झालें. ते जेव्हां दिल्लीला परतले, तेव्हां त्यांचें मला खालील पत्र आलें.

नवी दिल्ली
२१ एप्रिल १९५९

प्रिय जनरल कौल,

इतकी चांगली प्रथमच ओळख व संभापण मी यापूर्वीं कधीं अनुभवलें तें आठवत नाहीं. पहिल्याच भेटींत इतकी सहानुभूतीची भावना व विचारांची एकवाक्यता, क्वचितच निर्माण होते. त्या दिवशीं रात्रीच्या आपल्या भेटींत हें निर्माण झालें.

आपला प्रामाणिक मित्र
एलिस्वर्थ बंकर,

(याच काळांत आश्चर्य म्हणजे, मी अमेरिकाविरोधी आहे असा प्रचार माझे हितशत्रू करीत होते.)

मेजर रंगभाष्यम हे माझ्याच स्टाफवर होते. अतिशय कार्यक्षम अधिकारी. कामाव्यतिरिक्त आम्ही इतर विषयांवरहि बोलत असू. त्यांचे विचार प्रगल्भ होते. त्यांनी मला विचारलें कीं भारतांतील निरनिराळ्या राज्यांतील संस्कृतीविषयीं मला काय वाटतें. मी हें कबूल केलें, कीं दक्षिण भारतीय व बंगाली या जीवनपद्धती मला आवडतात. या दोन ठिकाणचे लोक अकृत्रिम जीवन जगतात इडली डोसा, मासे खातात. निदान घरीं तरी परपरागत पद्धतीचा वेष करतात तामीळ, तेलगू किंवा बंगाली जी त्याची भाषा असेल, ती कसल्याहि न्यूनगंडाशिवाय वापरतात. त्यांचें असें जें संगीत आहे तेंच त्यांना आवडते. आपले उत्सव ते पाळतात व एकंदरीत आपली सर्व विशेपता ते संभाळून आहेत. कांहीं हिंदी लोकांना मात्र जें वाटतें कीं भारतीय राहाण्यांत कमीपणा आहे, तसें त्यांना वाटत नाही.

अंबाला येथील दक्षिण भारतीयांच्या ' आराधना ' या संगीत महोत्सवाला मी अध्यक्ष म्हणून याच सुमारास गेलों. श्री. त्यागराज या वाद्यप्रवीण

साधु पुरुषाचा हा उत्सव होता. मला या संताविषयीं फारच थोडी माहिती होती, परंतु समारंभांत माझें हसें होऊं नये, म्हणून मी त्याच्या जीवनाचा कांहीं प्रमाणांत अभ्यास केला. ' संगति ' हें त्याचें खास वैशिष्ठ्य जाणवलें. त्याच्या साधनेसाठीं अचूक शब्दांची निवड त्यानें केलेली आहे.

मिसेस जायसी नागले या वीस वर्षांच्या अँग्लो इंडियन बाईकडून, मला एकदां एक पत्र आलें. तें अजून माझ्या संग्रही आहे. एका रुग्णालयांत त्या मरणकाळ समीप आलेल्या अवस्थेंत पडलेल्या होत्या. पत्र असें होतें–

' प्रिय जनरल,

एका महत्वाच्या विषयाबाबत, जो प्रश्न मला जीवनमरणाचा वाटतो, मी तुम्हांला दहा मिनिटें ताबडतोब भेटूं इच्छिते. तुम्ही याल काय ?

परमेश्वरानें तुम्हांला येण्याची बुद्धी द्यावी.

आपली नम्र,
जायसी नागले '

मी धांवतच रुग्णालयांत गेलों तिला श्वासोच्छवास करणें कठीण जात होतें. मला शेजारी जवळ बसण्याची तिने विनती केली. आम्ही दोघे एकटेच असतांना, ती हळू आवाजांत मला म्हणाली कीं नकळत तोंडावाटे गेलेल्या कांहीं शब्दामुळें कांहीं वर्तुळांत माझ्याविषयीं चांगलें बोललें जात नाहीं. माझ्याविषयीं तिच्या कानांवर जें आलें, त्यावर तिचा विश्वास नाहीं तिला हें मनापासून वाटतें हें मला कळावें, असें तिला वाटत होतें. तिनें नंतर आपला छोटासा हात माझ्या हातांत ठेवला व ती रडूं लागली कांहीं दिवसांतच ती गेली. या प्रसगाने मी किती हेलावून गेलो तें शब्दांत सांगता येणार नाही.

माझ्या हाताखालीं गुरखा रायफल्स ' मध्यें असलेल्या कॅप्टन नागले यांची ही पत्नी होती

१९५८ च्या मार्चमध्ये, मेनन यांनी माझ्या तुकडीला अचानक भेट दिली यापूर्वी मी फक्त त्यांना एकदांच भेटलों होतों, दहा वर्षांपूर्वी नेहरूंच्या निवासांत. सेनेंतील एक अधिकारी या भूमिकेंत, त्यांच्याशी झालेली ही पहिलीच भेट होय. त्यांची वागण्याची पद्धत तुटक होती. ते सतत घाईत असल्यासारखे

दिसत. मी त्यांना सांगितलें, कीं कांहीं वर्षापूर्वी झालेल्या फाळणीमुळें फक्त $\frac{1}{3}$ सेना पाकिस्तानकडे गेली असली, तरी जवळ जवळ $\frac{2}{3}$ एवढी सेनेसाठी असलेली राहाण्याची जागा ही पाकिस्तानी प्रदेशांत गेलेली आहे, ही गोष्ट बहुधा माहीत असेलच. यामुळें आम्हांला राहात्या जागेचा अतिशय तुटवडा भासत होता. माझ्या पदावरील पूर्वीच्या अधिकाऱ्यांनी या बाबतींत वरिष्ठांकडे बरीच आवेदनें पाठविली तरी त्याचा उपयोग झालेला नव्हता. सेनादलें कुठें कुठें ठेवावींत, याचा निर्णय झालेला नसल्यानें, सरकारला बहुधा या बाबतींत कांहीं करणें शक्य झालेलें नव्हतें. सैनिकांच्या कुटुंबाला जागा नसल्यानें सेनादलाचें नैतिक धैर्य मात्र खचत चाललें होतें.

मेनन म्हणाले, की सध्यांच्या वेगानें शासकीय अडथळे व दप्तर दिरंगाई वगैरे लक्षांत घेऊन, हा प्रश्न सुटायला तीस वर्षे तरी लागतील व इतकी वर्षे थांबणें कुणालाच शक्य नाहीं. त्यांनीं विचारलें कीं जर सरकारनें पैसा उपलब्ध केला तर सैनिक हे आपल्या कुटुंबासाठीं जागा बांधण्यास तयार होतील काय ? मला प्रथम वाटलें कीं मेनन गंभीरपणें बोलत नाहीं आहेत. पूर्वीच्या संरक्षण मंत्र्यांनीही अशीच चर्चा याबद्दल केलेली होती. परतु मेनन हे मनापासून खरोखरच बोलत होते व कांहींतरी प्रत्यक्ष करणार असें वाटलें. कांहीं काळ या त्यांच्या कल्पनेवर मी विचार केला. माझ्या लष्करी वरिष्ठांना या बाबतींत विचारणें आवश्यक होतें. मी सांगितलें, कीं माझे लष्करी वरिष्ठ लेफ्ट. जनरल जे. एन् चौधरी, लेफ्ट. जन. कुलवंतसिग व जनरल थिमय्या यांची हरकत नसेल व हा प्रश्न सोडवण्याचा इतर कांहीं मार्ग नसेलच, तर माझी याला तयारी आहे. आपल्या स्वतःच्या कुटुंबाकरतां हें काम हातीं घेण्यांत, सैनिकांच्या पेशाला कमीपणा आणणारें कांहीं यांत आहे असें मला वाटत नाहीं, हें मी त्यांना सांगितलें. लष्करी पेशाच्या बाबतींतील कांहीं गोष्टी, यामुळें ते विसरतील, किंवा त्यांच्या शिक्षणावर गज चढल, असें मला वाटत नव्हतें. लष्करी शिक्षणांत थोडा खंड पडेल, परतु ही हानी नंतर भरून काढतां येईल.

या कामाकरितां किती पैसा हवा व हें काम बांधून कधीं पुरे होईल, हें मेनन यांनी विचारलें. सहा ते सात महिन्यांत, सुमारे एक कोटी रुपयात, हें काम पुरें होऊं शकेल, असें मी साधारण हिशोब करून

सांगितलें. माझ्या सैनिकांच्या कार्यक्षमतेवर, सचोटीवर व धैर्यावर माझा विश्वास होता व म्हणूनच मी हें सांगू शकलों.

मेनन यांनीं मला त्यांच्या बरोबर, त्याच रात्रीं विमानानें दिल्लीस येण्यास सांगितलें. तिथें या योजनेवर अधिक तपशिलांत विचार करावा, असें ते म्हणाले लष्करी वरिष्ठांच्या परवानगीशिवाय मला सेवेचें ठिकाण सोडता येणार नाहीं असें मी सांगितलें. मेननना ही सबब लंगडी वाटली व कांहींशा गुश्यात ते निघून गेले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मला जन. थिमय्यांकडून व इतर वरिष्ठांकडून अनुज्ञा आली व मी लगेच दिल्लीला गेलों. मी योजनापूर्तीसाठीं कांहीं खास अधिकारांची मागणी केली. थिमय्या म्हणाले, कीं या योजनेवर त्यांची देखिल पहिली प्रतिक्रिया अनुकूल झाली नाहीं, पण अधिक विचार करतां त्यांनी समती दिली होती.

सर्व श्रेणीच्या सैनिकांसाठीं एक कोटीहून थोड्या अधिक रकमेंत, सुमारे सात महिन्यांत, १४५० घरें मला बांधावयाची होती. गणिती हिशोबाने एक घर बांधायला फक्त साडेतीन तास मिळणार होते. मी प्रथम माझ्या कमांडरना एकत्र बोलवून, हें प्रचंड काम त्यांच्या वतीनें मी स्वीकारल्याचें सांगितलें. संपूर्ण सहकार्य त्यांनीं देऊं केलें.

मेनन त्यांच्या हस्तें मी या योजनेची पायाभरणी उरकली व १६ जून १९५८ ला प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. कर्नल समशेरसिंग हे या प्रकल्पाचे मुख्य इंजिनियर होते. अत्यंत सभ्य, प्रामाणिक व कर्तबगार असा हा अभियंता वागणुकीला फारच सुस्वभावी होता. लेफ्ट. कर्नल लबा, हे या प्रकल्पाचा शासकीय भाग पाहू लागले व त्यांची मदत ही अमोल ठरली

१४५० घरें बांधण्याव्यतिरिक्त इतर कामें खूपच होतीं. ६००,००० गॅलन पाण्याचा पुरवठा करण्यासाठीं १६ मैल लांबीच्या नलिका टाकण्याचें काम होतें, भाक्रा ग्रिड स्टेशनमधून वीज आणायची होती. आठ मैलांचे अंतर्गत रस्ते करावयाचे होते. प्रकल्पासाठीं चार कोटी विटा, दहा हजार टन सिमेंट, आठ हजार टन कोळसा आणि १५०० टन पोलाद लागणार होतें.

आयातीवर बंधनें असल्यानें या गोष्टी मिळवणें कठीण जात होतें. आसपास १४ विटांच्या भट्ट्या होत्या. पण त्यांच्या मालकांनी असहकार केला.



जनरल के. एस्. थिमय्या यांचेबरोबर बातचीत करतांना लेखक. ( मागील बाजूस फरटोपी घातलेले बक्षी गुलाम महमंद )

मी या भट्ट्या स्थानिक कमिशनर मार्फत ताब्यांत घेतल्या व शक्य तेवढ्या विटा मी पैसे देऊन पैदा केल्या. घगार नदीच्या काठीं जवळच वाळू होती. मला वाटलें नदीकांठची वाळू, कुणालाहि नेता येतें, परंतु ही सरकारी वाळू असते व त्यासाठीं पैसे द्यावे लागतात, हें पाहून आश्चर्य वाटलें. पावसाळ्यांत वाळू वाहून गेली कीं तुटवडा भासे.

शक्यतों खासगी भाड्याची वाहनें आम्ही वापरली. मग पावसाळा लागला व पायभरणींत व्यत्यय आला. विटांच्या भट्ट्या बंद पडल्या. अनेक क्षेत्रांत मला शासकीय कारभारांतील दप्तर दिरंगाईचा त्रास झाला. उत्तर प्रदेशांतून पंजाबमध्यें विटा न्यायलाहि बंदी ! उत्तर प्रदेशाच्या व केंद्रांतील मंत्र्यांना अनेक वेळां भेटलों, तेव्हां बंदीतून सुट मिळाली रेल्वे बोर्डानें रेल्वेचे मालडबे दिले व वहातुकीची अडचण दूर झाली.

जसजसें काम प्रत्यक्ष दिसूं लागलें, तसतसा सैनिकांवर त्याचा सत्परिणाम दिसूं लागला. आपल्या निर्मितीकडे ते अभिमानानें पाहूं लागले. दरवाजे, खिडक्या व तावदानें मिळून २०,००० लाकडी चौकटी हव्या होत्या. काश्मीर व दिल्ली येथें या वस्तु मिळत होत्या. बक्षी गुलाम महंमद यानी धाडस करून, मला या गोष्टी विकत घेण्यास मदत केली.

हिवाळा आतां सुरू झाला. आमचे श्रम आतां अगदीं शिगेला पोचले होते. मी सैनिकांसाठीं रोज ते श्रमत असतांना, संगीत, विनामूल्य शीत पेयें व चहा यांची सोय केली होती प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणीं मी राहुट्या उभारून माझें कार्यालय उघडलें होतें. कुणाला कांहीं माझी जरूर लागली, तर मी प्रत्यक्ष कामावरच भेटूं शकत असे.

माझा हा ‘अमर’ प्रकल्प–हें या प्रकल्पाचें नांव होतें--बांधून होत असतांनाच मेनन यांनी दिल्ली येथें होणाऱ्या, भारत प्रदर्शनांतील, संरक्षक लष्करी साहित्याच्या विभागासाठीं बांधण्यांत येणाऱ्या, मोठ्या तंबूची उभारणी करण्याचें प्रचंड काम माझेवर सोपवले. अंबाला ते दिल्ली या बाऱ्या यावेळीं मी जेटनें व इतर विमानानें केल्या. जेट पंधरा मिनिटांत मला अंबाल्यापासून दिल्लीला नेत असे. या नव्या उभारणी योजनेचें नांव होते ‘विजय’. १९ ऑगस्ट १९५८ ला या कामाला मी सुरुवात केली. या

योजनेचे प्रमुख अभियंता होते कर्नल बी. एन्. दास. ज्यानें प्रत्यक्ष बांधणी केली त्यांचें नांव होतें लाला तिर्थराम. अनुभवी असा माणूस होता.

हें काम पुरें करण्यासाठीं तज्ज्ञांनी सहा महिने मागितले होते व मला फक्त ६ आठवड्यांत हें काम पुरें करायचें होतें. अर्थातच एकीकडे या योजनेचा आराखडा तयार होत असतांनाच, दुसरीकडे काम सुरूंही करावें लागलें. पाऊस तर जोरांत लागला होता. पोलाद, सिमेंट बंगालमधून झपाट्यानें आणवलें. विटा, दगड, रेती, या गोष्टी वेगानें कामावर हजर झाल्या. अहोरात्र काम चालूं ठेवलें होतें. मेनन यांनी बांधकामांत अधिक अधिक वाढ करण्यास सुरुवात केली. काम अर्थातच लांबूं लागलें. या पॅव्हिलियन बरोबरच एक आधुनिक असें नाट्यगृह व रेस्टोरॉं मला बांधावयाचें होतें. मूळची योजना दुपटीनें मोठी झाली.

तरीहि ही सर्व बांधणी दिलेल्या मुदतीपूर्वी पूर्ण झाली व नेहरूंनी त्याचें उद्घाटन केलें.

मी आतां पुन: ‘अमर’ प्रकल्पाकडे वळलों. रस्ते, गटार योजना, वीज व पाणी पुरवठा यावरील काम हिवाळा सुरूं होतांच सुरूं करण्यांत आलें. ताशीं १५००० गॅलन पाणी मिळेल एवढ्या ट्यूब विहिरी ‘नलिकाकूप’ खोदले होते. स्विचगिअर सारखे वीज पुरवठ्यासाठीं लागणारे भाग, परदेशांतून आयात करावे लागले. यांतच परकीय चलनाची अडचण उद्भवली.

आम्ही कामावर कांहीं मुलकी मजूर नेमला होता. त्यांच्या संघटना त्यांना चिथावणी देण्याचा प्रयत्न करीत, परंतु त्यांच्या सर्व सुखसोयी आम्ही पहात असल्यानें हा त्यांचा प्रयत्न फुकट गेला. आयत्या वेळीं, अगदीं काम संपता संपता, खिडक्यांची कांचेची तावदानें पुरवणाऱ्या कंत्राटदारानें दगा दिला. इमारतीवरील पाण्याच्या टाक्या याहि वेळेवर आल्या नाहीत. डिसेंबर अखेर सर्व माल आम्ही मिळवला व १० जानेवारी १९५९ पर्यंत आमची योजना एकदांची तडीस गेली. खूप मोठा श्रम-प्रवास संपला होता. माझे इंजिनिअर, सैनिक व त्यांचे अधिकारी यांनी घाम व रक्त गाळून हा मोठाच विजय मिळवला होता. अशा प्रकारचा हा पहिलाच प्रकल्प होता व कठीण परिस्थितींत व हवामानांत तो पुरा केलेला होता.

१६ जानेवारी रोजीं मेननसह नेहरू, अनेक केंद्रीय मंत्रीमंडळाचे सदस्य, बक्षी गुलाम महंमद, सरदार प्रतापसिंग कैरों, तिन्ही सेनादल प्रमुख व अनेक थोर मंडळी विमानानें या जागीं आली व पायीं फिरून त्यांनी सर्व बांधकाम पाहिलें. नंतर सुमारे २०,००० सैनिक, त्यांची कुटुं-बीय मंडळी व इतर १०,००० अशा प्रेक्षकांसमक्ष नेहरूंनी 'अमर' चें उद्घाटन केलें.

जमादार काश्मिरी यांनी लिहिलेलें एक हिंदी संघगीत, मी माझ्या २०,००० सैनिकांना शिकवलें होतें. या गीतामुळें माझ्या सर्व सेना विभा-गांत, ऐक्याचें व देशभक्तीचें वारें खेळत असे. नेहरूंनी जेव्हां हें स्फूर्तीगीत ऐकलें, तेव्हां ते थरारून गेले. थिमय्या यांनी यापूर्वीच याबद्दल मला कौतुकानें लिहिलें होतें.

नेहरूंनी आपल्या भाषणांत सर्व श्रेणीच्या सैनिकांचे या कामगिरीबद्दल अभिनंदन केलें. त्यांनीं सांगितलें कीं चांगलें उदाहरण यामुळें घातलें गेलें आहे व याबद्दल देशबांधवाच्या स्तुतीलाहि ते पात्र ठरत आहेत. लढाईंतला एखादा विजय साजरा करण्यासाठीं ते यावेळीं जमलेले नसून, हा विजय निराळ्या प्रकारचा आहे. चौथ्या पायदळ विभागानें ज्या गतीनें व सफाईनें हें काम केलें, त्याचें त्यांनी कौतुक केलें. सैनिकांच्या देशभक्तीचें व शिस्त-बद्ध माणसें काय करूं शकतात याचें हा प्रकल्प उदाहरण आहे असें नेहरूंनी वर्णन केलें. २०,००० लोकांना उघड्यावर अल्पोपहाराची व्यवस्था या उद्घाटन प्रसंगाच्या शेवटीं मी केली होती. सैनिकांबरोबर जेवावयाचा योग आल्यानें, नेहरू अतिशय आनंदांत होते. ते मोकळेपणानें त्यांच्यात मिसळले. सर्व अल्पोपहार--टेबल मांडण्यापासून तो टेबलावरची फडकी काढण्यापर्यंत—फक्त वीस मिनिटांत आटोपला. या गोष्टीची तर पंतप्रधानांवर खूपच छाप पडली.

आपल्या सैन्याला स्वत:ची राहातीं घरें बांधण्याच्या कामाला जुंपावें कीं नाहीं, याविषयीं आपल्या देशांत बराच खल निर्माण झाला. सामान्यत: ती गोष्ट करायला माझाहि विरोध आहे. कारण यामुळें त्यांच्या लष्करी कर्तव्यांत बाध येतो. देशाच्या संरक्षणासाठीं करावयाच्या युद्धासाठीं, शिकून तयार राहाणें हें त्यांचें काम. परंतु विशेष परिस्थितींत, मला वाटते अशा

तऱ्हेची कामें त्यांनीं करावयास हरकत नाहीं. अशा तऱ्हेची म्हणजे स्वतः-साठीं घरें बांधणी, पूर आला तर मदत करणें अशी. बहुतेक देश जेव्हां इतर मार्ग नसेल तेव्हां आपल्या सैन्याला बिनलष्करी कामासाठीं वापरतातच मोडलेले पूल दुरुस्त करणें, रेल्वे अपघातांत जखमींना सहाय्य करणें, भूकंप झाला तर मदत देणें, हीं कामें त्यांच्या लष्करी कर्तव्यांत खंड पाडणारीं असतातच.

आपल्या सैनिकांना पुरेसें अन्न-वस्त्र देणें व त्यांना चांगली हत्यारें व लढाईची सामुग्री लढाईसाठीं उपलब्ध करणें हें महत्वाचें आहे. त्यांना व बायकामुलांना रहावयासाठीं घरें देणें हें तितकेंच महत्वाचें आहे. तरच ते समाधानी राहूं शकतील. 'सैनिकांचें काम घरें बांधणें नाहीं' अशा तऱ्हेचा नुसता कोरडा उपदेश करण्यांत काय अर्थ आहे? या विषयावर सैन्यांत व जनतेंत बराच गदारोळ ऐकूं येतो फारच थोडे या विषयाचा योग्य दृष्टीकोनांतून विचार करतात.

मी माझ्या सैनिकांकरवीं त्यांच्या कुटुंबासाठीं स्वावलंबनानें घरें बांधली याबद्दल माझ्यावर टीका झाली. परतु वर्षानुवर्षे भारतीय सेना व सेनेची मुल्यवान सामुग्री कुंभमेळ्यासारख्या मुलकी कामासाठीं वापरण्यांत येत आलेली आहे. त्याला कुणी आक्षेप घेतलेला नाहीं. फाळणी झाल्यापासून झालेल्या प्रत्येक संरक्षण मंत्र्यांना, आम्ही हें सांगत आलों आहोंत, कीं मुलकी व्यवस्थेला आणीबाणीच्या काळांत आम्ही अवश्य मदत करूं, पण ही आतां नित्याचीच बाब असल्यानें, सरकारनें या कामासाठीं निराळी तरतुद करावी व सैन्याचे अत्यंत आवश्यक परंतु जुनें होऊन निकामीं होऊं लागलेलें साहित्य, अशा कामाला वापरून तें नाहींसें करण्यापेक्षां तें अधिक कसें टिकेल हें पाहावें. प्रत्येक संरक्षण मंत्र्यानें 'जनतेची मागणी' कशी नाकारावी या सबबीखालीं आपली या बाबतींतील असमर्थता व्यक्त केली. पंतप्रधानांकडे जेव्हां जेव्हां ही बाब गेली तेव्हां अशीच प्रतिक्रिया झाली. फक्त शब्द थोडे निराळे!

माझ्या हितशत्रूंनीं 'बंधकाम्या' या तुच्छतादर्शक शब्दानें माझा उल्लेख करण्यास सुरुवात केली. अगदीं गोबेल्सच्या प्रचारासारखा, हा शब्द पुनः पुनः मला लावण्यांत येऊं लागला. जणूं आयुष्यांत मी दुसरें

कांहीं केलेंच नव्हतें. एकंदर २६ वर्षांच्या नोकरींत व या सेना विभागाचा कमांडर म्हणून त्यांतील तीन वर्षे असतांना, मी फक्त ७ महिनेच येथील बांधकामांत व कांहीं महिने इतरत्र अशाच उद्योगांत चालवले होते.

जो काळ मी यांत गमावला, त्याची भरपाई करण्यासाठीं, मी फेब्रुवारी ते मे १९५० या कालांत, पुष्कळच शिक्षण सुरू केलें. लवकरच माझा नासे विभाग हा पुन: अगदीं लढाईला सज्ज असा झाला.

मला असें दिसून आलें, कीं जेव्हां जेव्हां नेहरूंची जाहीर शाबासकी मी मिळवली, तेव्हां तेव्हां कांहीं जिभा सैल सुटल्या. अशाच रीतीनें 'अमर' या योजनेला जेव्हां नेहरूंचा आशीर्वाद लाभला तेव्हां मी उभ्या केलेल्या इमारतींत अनेक तांत्रिक दोष आहेत, अशी कुजबुज जोरांत सुरू झाली. या माझ्या उद्योगामुळें माझ्या सेना विभागावर दुष्परिणाम झाला आहे, असेंहि सांगण्यांत येऊं लागलें. सत्याचा हा विपर्यास होता.

'स्टेटस्मन्' या कलकत्त्याच्या इंग्रजी दैनिकानें १८ जाने. १९५९ च्या अंकांत लिहिलें, कीं १६ जाने. १९५९ रोजीं नव्या वसाहतीला भेट दिल्या-नंतर, नेहरूनीं केलेली चौथ्या पायदळ सेनाविभागाची प्रशंसा, ही सर्वथा योग्य अशीच आहे.

लेफ्ट. जनरल जे. एन्. चौधरी यांनीं मला लिहिलें, कीं पुढल्या काळांत लोक 'अमर' पासून चुकीचा निष्कर्ष काढतील, कीं सैन्य काय करूं शकतें हें यामुळें दिसून आलें. यापासून योग्य बोध कुठला असेल, तर तो हा कीं एक डिव्हिजनल कमांडर असा निघाला, कीं ज्यानें धैर्यानें ही कामगिरी स्वीकारली. कांहीं दिवसांनीं त्यांनींच लिहिलें, कीं माझ्यासारखे लोकच पुढें येणाऱ्या खळबळजनक कालांत पुष्कळच महत्त्वाची कामगिरी करूं शकतील.

मे १९५९ मध्यें, लेफ्ट. जनरल या श्रेणीला बढती देणारी आज्ञा मला मिळाली; व माझी नेमणूक आर्मी हेडक्वार्टर्स, दिल्ली येथें 'क्वार्टर मास्टर जनरल' म्हणून झाली. चौथ्या पायदळ सेनाविभागाचा मी जवळ जवळ तीन वर्षें कमांडर होतों. ११ क्रमांकाच्या पायदळ ब्रिगेडवर मी साडेतीन वर्षें होतो. इतकें असूनहि मला या अधिकारपदाचा पुरेसा अनुभव नाहीं असा आरोप माझ्यावर केला गेलाच.

चौधरी यांनीं मला लिहिलें, कीं 'क्वार्टर मास्टर जनरल' म्हणून माझी झालेली बढती, ही अति उत्तम वार्ता होती. मी आतांपर्यंत जें कांहीं केलें, त्यासाठीं मिळालेली ही योग्य बक्षिसी होती. मी माझ्या हिंमतीवर व नेतृत्व-गुणानें, सैन्याची शासकीय व डावपेंचाच्या क्षेत्रांत मोठीच प्रगति साधूं शकेन, असा विश्वास त्यांनीं व्यक्त केला होता. पत्राच्या शेवटीं, ते माझे एक मोठेच चहाते असल्याचें त्यांनीं नमूद केलें होतें !

जून १९५९ मध्यें 'क्वार्टर मास्टर जनरल' म्हणून मी आर्मी हेडक्वार्टसला आलो व 'यार्क रोड' येथें मी प्रशस्त बंगल्यांत राहूं लागलों. या बंगल्याभोंवती खूपच पसरलेली बाग होती. सरकारची प्रचंड यंत्रणा व लष्करी पेशाची ही 'मक्का' यांच्याशीं वरिष्ठ अधिकारी म्हणून, ही माझी पहिलीच सलामी होती. येथील व्यवस्था-पद्धति म्हणजे कांटेकोर दप्तरबाजीचा समुद्र होता. खरें म्हणजे जिथें धोरणें ठरवलीं जातात, असें हें उत्साहाचें कारंजें असावयास हवें होतें. येथील खातीं जणू एकमेकांशीं संबंध नसल्यासारखी वागत. बंद-पेटचां-सारखी निमूर, अशी ही घोटाळ्याची व हृदयशून्य संघटना होती. उत्साह नव्हता कीं परस्पर सहकार्य नव्हतें. प्रत्यक्षांत बहुतेक अधिकारी धीटपणें निर्णय घेण्यास कां कूं करीत असत. ही मंडळी कांहीं अपवाद वगळतां, मानवीस्पर्श नसलेल्या यंत्रासारखी वागत असत.

लेफ्ट. जनरल दौलतसिंग याचेकडून मी खात्याचें काम स्वीकारलें. मेजर जनरल नेहरा, हे माझे विश्वासू उप-अधिकारी होते.

माझी कामें मुख्यत: अशीं होतीं. सेनेचें संचलन ठरवणें, सैन्याला लाग-णारी जागा बांधणें, वाहतुक व्यवस्था ठेवणें, पुरवठा साहित्य व त्याची वाहतुक करणें, धान्याची तरतूद करणें वगैरे. मी याबद्दल उत्सुक होतों, कीं पुरेशी जागा लवकरांत लवकर बांधली गेली पाहिजे व वाहतूक ही योजनाबद्ध व जलदगतीनें व्हावी. या क्षेत्रांत चाकोरी बाहेरच्या कांहीं पद्धति वापरून, मी सुधारणा करण्यास सुरुवात केली व यांत कृष्ण मेनन यांनीं मला चांगला पाठिंबा दिला. या उद्योगांत अर्थात बऱ्याच लोकांच्या ठराविक हितसंबंधाच्या मी आड आलो.

वाहतुक ही सर्व लष्करी हालचालींची गुरुकिल्ली होय. जर रेल्वेशीं अधिक संपर्क राखला व कांहीं कल्पनाशक्ति वापरली, तर या बाबतींत पुष्कळच सुधारणा करणें शक्य होतें.

कित्येक वर्षांपासून मी पाहात होतों, कीं रणगाडा-पथकें आरमर्ड डिव्हिजन्स असलेल्या ठिकाणांपासून, भारत-पाक सीमेवर आणीबाणीच्या वेळीं एकवटायचीं झालीं, तर उगाचच भलता वेळ लागत असे. थोडा प्रयत्न केला तर हा वेळ खूपच कमी करता येईल, अशी माझी खात्री होती. रणगाड्यांना नेण्यासाठीं लागणाऱ्या डब्यांचा तुटवडा असल्यानें, हें असेंच सर्व विलंबानें व्हावयाचें, असें रणगाडा पथकांतील कमांडरनीं ठरवूनच टाकलें होतें. त्यांनीं या दृष्टीनें कांहीं प्रयत्नच केला नव्हता. रेल्वेला विश्वासांत घेतलें नव्हतें. मी माथुर व कर्नाइलसिंग, या रेल्वे बोर्डाच्या अध्यक्षपदावर पाठोपाठ आलेल्या दोघां हिमती अधिकाऱ्यांशीं, विचारविनिमय केला. भारताच्या संरक्षणासाठीं या पथकांची वाहतुक त्वरीत होणें किती आवश्यक आहे, हें त्यांना समजावून दिलें त्यांनीं संपूर्ण सहकार्य देऊन ही वाहतुक जलद करण्याच्या दृष्टीनें सर्व कांहीं केलें.

या पथकाच्या चढउतारासाठीं, मी नवी रेल्वे सायडिंग बांधवलीं. नवे रेल्वे डबे बांधून घेतले. होते ते उघडे डबे लाइनीवर आणले. मुलकी उपयोगाकरतां वापरावयाचे जे रेलडबे टँककरतां वगैरे उपयोगी ठरण्यासारखे होते, ते देखील या रणगाडापथकांच्या वहातुकीसाठीं मी वापरण्यास सुरुवात केली. कांहीं रेल्वे मार्ग जादा वेगानें गाडी नेण्यास निरुपयोगी होते, ते मार्ग मी पुनः नव्यानें बांधवून घेतले, इंजिनें भराभर जोडलीं जातील अशी व्यवस्था केली अशा कांहीं चाकोरीबाहेरच्या प्रयत्नांनीं व संबंधितांत जलद वहातुकीचें महत्त्व प्रस्थापित करून, मी या पथकांची हालचाल अपेक्षेपेक्षां कितीतरी पटीनें जलद करून टाकली. सुरक्षिततेच्या दृष्टीनें, यासंबंधीं मी प्रत्यक्ष आंकडेवारी देऊं शकत नाहीं.

१९४८ सालापासून मी ऐकत होतों, कीं काश्मीर मधील झोझिला खिंड ही प्रतिवर्षी फक्त जुलै ते नोव्हेंबर याच कालांत वहातुकीला मोकळी असे. ही खिंड ११,००० फूट उंचीवर होती. वर्षाचे उरलेले आठ महिने ती बर्फानें बुजलेली असे. मला हें पटत नव्हतें, कीं आधुनिक युगांत, असें


एखादें ठिकाण लष्करी वहातुकीसाठीं वर्षाचा एवढा मोठा काळ बंद असावें. बर्फ हलवतां येत नाहीं, हें मला पटत नव्हतें. नव्या आधुनिक यांत्रिकी साधनांनीं हें शक्य व्हायला हवें होतें. हा विषय १९५९ मध्यें जेव्हां प्रथमच माझ्या कक्षेंत आला, तेव्हां ही गैरसमजूत दूर करण्याचें मी ठरवलें. मी ले. मेजर जनरल डुबे यांच्या नेतृत्वाखालीं काम करणाऱ्या माझ्या इंजिनिअरांना यासाठीं लागणारी विशेष यंत्रसामुग्री, परदेशांतून मागवण्यास सांगितली. यासाठीं सरकारची परवानगी घ्यावी लागली. सतत प्रयत्नानें व लक्षपूर्वक नजर ठेवून या यंत्रानिशीं, आम्ही पिढयानपिढया चालत आलेलें या खिंडींतील वहातुकीचें टाईम टेबल उलटें केलें. खिंड आतां आठ महिने खुली राहूं लागली. पुष्कळ कट्टर विरोधकांनीं, भविष्य केलें होतें, कीं या प्रयत्नांत आम्हांला अपयश येणार. अशा लोकांना समाजांत कधींच तोटा नसतो.

बीजू पटनाईक यांना मी पुष्कळ वर्षे ओळखीत होतो जेव्हां ते ओरिसाचे मुख्यमंत्री झालेले नव्हते, तेव्हां एकदा माझ्या कार्यालयांत ते मला भेटायला आले. पटनाईक हे एका वेळीं पट्टीचे वैमानिक होते व इंडोनेशियांत त्या देशाचा स्वातंत्र्यलढा चालू असतांना, त्यांनीं साहसीपणानें, त्या देशाच्या लोकप्रिय पुढाऱ्यांच्या सुटकेच्या प्रयत्नांत भाग घेऊन, पुढाऱ्यांची सुटका केली होती. त्यांनीं मला अगोदरच कळलेली एक गोष्ट सांगितली. ती म्हणजे, भारतीय हवाई दलाची शक्ति कमी पडत असल्यानें, परराष्ट्र खात्याच्या मंत्रालयानें, नेफामधील अति दूर प्रदेशांतील आसाम रायफलसचीं लष्करीं ठाणीं आकाशांतून रसद पोंचवून कार्यक्षम ठेवण्यासाठीं 'कलिंग एअरवेज' या पटनाईकांच्या खासगी विमान कंपनीचें साहाय्य घतलेलें होतें. परकीय चलनाच्या तुटवडयानें विमानांचा तुटवडा असल्यानें 'कलिंग एअरवेज' या कंपनीलाहि ही कामगिरी संपूर्णतया पार पाडतां येत नसे. या करतां पटनाईकांनीं, या बाबतींत संरक्षण मंत्री कृष्ण मेनन यांचें मन वळवून, आवश्यक तें परकी चलन मिळवण्यासाठीं मदत करण्याची विनंती केली. यामुळें आणखी विमानें त्यांना खरेदी करतां येणार होतीं. मला हा प्रस्ताव योग्य वाटला व मी कृष्ण मेनन यांचेकडे या बाबतींत बोलणें काढलें. मला याची काय कल्पना,

कीं यामुळें मी कृष्णमेनन यांच्या जबाबदारींत ढवळाढवळ करीत आहे. कृष्णमेनन यांनीं सांगितलें, कीं काय वाटेल तें झालें तरी 'कलिंग एअरवेज' या कंपनीला या बाबतींत मदत करण्याची त्यांची तयारी नाहीं. कारण याचा अर्थ असा होईल, कीं जीं संरक्षणदलें त्यांचें हाताखालीं होतीं,त्यापैकीं विमान-दल हें, ही कामगिरी पार पाडण्यास असमर्थ होतें. मी वाद घातला, कीं अशा बाबतींत कुणीहि खोटया प्रतिष्ठेवर अडून बसूं नये, कारण देशाच्या संरक्षणाचा हा प्रश्न होता. कितीहि सांगून पाहिलें तरी त्याचा उपयोग झाला नाहीं. परिणाम असा झाला, कीं 'आसाम रायफल्स' चीं जीं लष्करी ठाणीं होतीं, त्यांना पुरेशी रसद मिळूं शकली नाहीं व प्रत्यक्षांत रसदीअभावीं दूर ठिकाणीं नवीं ठाणीं बसवणें त्यांना शक्य झालें नाहीं.

मंजुर झालेल्या पैशांतच इमारत बांधणी पुरी व्हावी, यासाठीं मेनन हे स्वस्त बांधणी करण्याचा आग्रह धरीत व यासाठीं इमारतीचा जो तपशील-दार आराखडा असे, त्यांत कपात करण्यास सांगत. यामुळें माझे त्यांच्याशीं तीव्र स्वरूपाचे खटके उडत.' इंजिनिअरना असें वाटतें, कीं इमारत बांधणींत कामाचा वेग, कामाची प्रत व खर्च या तिन्ही गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या आहेत व यापैकीं कुठल्याहि एका गोष्टीला विनाकारण प्राधान्य देऊं नयेच. याच मताचा मी होतो. (आतां लाचलुचपत व दप्तरी क्लिष्टता यामुळें पुष्कळ वेळा कामाचा वेग नाहींसा होतो व भरमसाट खर्चहि वाढतो.) मेनन यांना मात्र इंजिनिअरांचे हें म्हणणें पटलें नाहीं व त्यांनीं कामाचा वेग व खर्चाची बचत यांनाच अधिक प्राधान्य दिलें.

मेनन यांनीं जुलै १९५९ मध्यें श्रीनगरला भेट दिली या वेळीं लेफ्ट. जन. एस्. डी. वर्मा यांनीं अशी शिफारस केली, कीं जम्मू-काश्मिरमध्यें राहण्याच्या जागेची तीव्र टंचाई असल्यानें, सैन्याला आपल्या तळावर आपलीं घरें बांधण्याची परवानगी मिळावी. जम्मूत मेजर जनरल माणिकशा यांनीं अशा तऱ्हेची योजना सुरूहि केलेली होती. खासगी लष्करी पेशाच्या मंडळींत बोलतांना माणिकशा हे या प्रकारच्या कामाची हेटाळणी करीत, परंतु त्यांनींहि प्रत्यक्ष हें काम सुरू केलें होतें.कारण आतां प्रत्येकजणच हें करूं लागला होता व आपण यांत मागें आहोंत असें वाटूं नये, यासाठीं ते हें करीत होते 'अमर' या प्रकल्पाला नुकतीच जी प्रसिद्धि लाभली, त्याच्या कांहीं अंशानें



पंडित नेहरू, कृष्ण मेनन व लेखक १९५०

तरी आपल्या योजनेला प्रसिद्धि लाभावी, अशी माणिकशा यांना आशा होती. म्हणूनच या विषयाची त्यांची नावड बाजूस सारून, त्यांनीं हें काम पत्करलें होतें. फेरोजपूर येथें मेजर जनरल हरबक्षसिंग अशाच तऱ्हेच्या प्रकल्पांत मग्न होते. तेव्हां आतां या घरबांधणी क्षेत्रांत माझ्याशिवाय इतरहि पुष्कळजण होते. सैनिकांना अशा तऱ्हेचें काम द्यावें हा निर्णय अर्थांत सेनादलप्रमुख थिमय्या यांचा होता व त्यांच्या अनुज्ञेनेंच हीं सर्व कामें प्रगति करीत होतीं.

जनरल वर्मा यांचेकडून अशा तऱ्हेची विनंती येतांच, मेनन यांनीं मला विचारलें, कीं काश्मीरमध्यें इतर तळांच्या ठिकणीं मी हें काम हातीं घेऊं शकेन काय ? मी सांगितलें कीं मी कांहीं महिन्यांत हें करूं शकेन; परंतु ताबडतोब शक्य नाहीं. कारण माझ्या हातांत पुष्कळ योजना आधींच होत्या व सर्वच सामग्री मर्यादीत असल्यानें नवीन काम अंगावर घेणें मला हातां-तील कामें पुरीं झाल्याशिवाय शक्य नव्हतें. मेनन यांनीं एका फाईलवर लिहिलें, कीं माझी वृत्ति 'ही कांहींशी निराशाजनक आहे व शासकीय जबाबदारी नैराश्य व अधिकाराच्या खुर्चीचीं बंधनें यामुळें माझा उत्साह व जोम यावर विरजण पडलें नाहीं तर ती मोठीच आनंददायक गोष्ट होईल. त्यांनीं असें गर्भितपणें सुचवलें, कीं माझ्यावर 'अतिकामाचा ताण जाणवूं लागलेला आहे.' मी यावर थिमय्या यांचेमार्फत उलट लिहिलें, कीं मेनन यांनीं माझ्याविषयी व्यक्त केलेल्या पुष्कळ आशंका व भीति यांची नोंद मी घेतली आहे व मी कळवूं इच्छितों कीं माझ्यावर अतिकामाचा ताणहि आलेला नाहीं, नैराश्य पसरलेलें नाही, किंवा माझा उत्साह व जोम कशानेंहि सर्दावलेला नाहीं, परंतु पेलणें शक्य आहे त्यापेक्षां अधिक जबाब-दारी स्वीकारून, कृष्ण मेनन वा सेनाप्रमुख यांचे चारचौघांत हंसें करण्याची माझी इच्छा नाहीं. थिमय्या यांना माझें उत्तर योग्य वाटलें. मेनन यांनीं मग हा लेखी व्यवहार वाढवला नाहीं.

पुष्कळ खात्यांतून उत्साह खेळवण्याचा मेनन प्रयत्न करीत होते. या दृष्टीनें त्यांनीं रिअर ॲडमिरल शंकर यांना आपला उत्पादनप्रमुख म्हणून निवडलें. शंकर यांना बदलीमुळें कलकत्त्याहून दिल्लीला यावें लागणार होतें. बदलून आलेल्या अधिकाऱ्यांना दिल्लींत सरकारी राहतें घर मिळा-

यला खूपच वेळ लागत असे. यासाठीं तयार करण्यांत आलेल्या अग्रक्रम यादींत दोघा जनरलचीं नांवें शंकर यांच्या आधीं होतीं. हे जनरल म्हणजे जनरल मोतीसागर व जनरल डुबे हे होत. मेनन यांनीं आज्ञा दिली. कीं या दोघांना डावलून प्रथम शंकर यांना बंगला मिळावा. ही आज्ञा अयोग्य असल्यानें मी ती पाळण्यास नकार दिला. मी या बाबतींत ताठ आहे हें पहातांच, मेनन यांनी याबद्दल आग्रह सोडला; आपला पूर्वीचा हुकूम फिरवला व शंकर यांच्या राहण्याची इतरत्र सोय झाली.

जेव्हां कृष्ण मेनन यांना संरक्षणमंत्री नेमण्यांत आलें, तेव्हां त्यांना तें मोठेंच आव्हान होतें. दुर्लक्ष केलेलें सैन्यदल त्यांचेकडे वारसानें आलें होतें. अहिंसा धर्मावर आपल्या नेत्यांची जी श्रद्धा होती, त्यामुळें आपल्या पुढाऱ्यांना अनेक वर्षे सतत असेंच वाटत होतें, कीं अद्यावत अर्थानें अशा संरक्षण व्यवस्थेची देशाला गरजच नाहीं. भारतीय विचारसरणींत लढाईला स्थानच नव्हतें व यामुळें निश्चित असें संरक्षणाचें धोरणच आपल्यापाशीं नव्हतें. याचा परिणाम म्हणून १९४७ ते १९५७ या दहा वर्षांत, पुरेशी अशी संरक्षण योजनाच आंखण्यांत आली नाहीं. जनरलच्या पदावरचे सेनानी व आरमार व हवाई दलांतील त्यांच्या श्रेणीचे अधिकारी, यांना त्यांच्या बुद्धीप्रमाणें काय करायचें तें करायला, स्वातंत्र्यप्राप्तीपासून मोकळीक दिलेली होती. आतां या लोकांची अशी अपेक्षा होती, कीं मेननसारखा विशेष योग्यतेचा माणूस सरकारला त्यांच्याकडे आवश्यक तें लक्ष देण्यास भाग पाडील व त्यांचे निकडीचे प्रश्न सुटूं शकतील.

केस पिंजारलेली मेननची मूर्ती ही ठळकपणें नजरेंत भरणारी होती. त्यांच्या तीक्ष्ण नजरेंतून कांहींहि सुटत नसें. सर्व कांहीं त्यांच्या कानावर येत असे. त्यांच्या भावना चेहऱ्यावर व्यक्त होत असत व त्यांच्या आवडी निवडी लपवणें त्यांना जमत नसें. एकतर त्यांचा द्वेष होई किंवा त्यांच्यावर प्रेम केलें जाई, पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करणें कुणाला शक्य नसें. मुर्खांशीं जमवून घेणें त्यांना अशक्यच होतें. त्यांची गांठ कुणालाहि सहजासहजी मिळूं शकत असे मग तो राजपुत्र असो वा भिकारी असो. आयुष्यांत ज्यांच्या वाट्याला उपेक्षा आली आहे, अशांच्या वतीनें झगडण्यांत त्यांना धन्यता वाटे त्यांच्याजवळ बोचरी अशी विनोदीबुद्धि होती.

मार्मिक प्रत्युत्तरें ते चटकन् देत असत. परंतु टीकेचे त्यांना वावडे असे. त्यांच्या विनोदाची कांहीं विवक्षित उदाहरणें अशा तऱ्हेच्या वाक्यांतून मिळतात.

'मासा तुम्ही शुद्ध लोण्यांत तळलांत कीं कृत्रिम लोण्यांत तळलांत याचें त्याला काय होय !' किंवा 'मी अजूनपर्यंत शाकाहारी वाघ पाहिलेला नाहीं.' संयुक्त राष्ट्र संघांत एका ब्रिटिश प्रतिनिधीला त्यांनीं चापले होते– 'मला इंग्रजी भाषेसंबंधी तुमच्याकडून मार्गदर्शन नको आहे. मी ती स्वतः शिकलो आहे व तुमच्याप्रमाणें नुसती ही भाषा मी उचललेली नाहीं.' सर पिअर्सन डिक्सन या ब्रिटिश शिष्टमंडळाच्या नेत्याला उद्देशून त्यांनीं सांगितलें होतें–'माझी आपणांस प्रार्थना आहे, कीं कॉमनवेल्थ मधल्या निरनिराळ्या सभासदांशीं वागतांना आपण कांहीं अंशानें निःपक्षपातीपणा दाखवावा. निदान चार चौघांत तरी !' लंडन मधील एका वृत्तपत्र परिषदेंत ते म्हणाले होते कीं, 'या कॉमनवेल्थ मध्यें कॉमन (समान) अशी कांहींहीं गोष्ट नाहीं. वेल्थ (संपत्ती) तर समान नाहींच नाहीं.'

मेनन हे उपहासात्मक बोलून व दुसऱ्याला लागणारे शेरे मारून, लोकांना दुखवीत असत व शत्रू निर्माण करीत असत. ते रागीट होते, आडमुठे होते व सतत कुणा ना कुणाशी ते भांडणांत गुंतलेले असत. आपल्या बरोबरीच्या माणसांकडे ढुंकून न पाहतां ते अंगावरून निघून जात व आपल्या अशा उद्धट वागणुकीनें त्यांनीं बरेच शत्रू निर्माण केलेले होते.

मेनन हे वृत्तीनें संशयी होते अत्यंत छंदी व लहरी असल्यानें पुष्कळ वेळां आपले मित्रच बेईमानी आहेत असा संशय कांहींहि कारण नसतांनाहि त्यांना येत असे. त्यांच्याबरोबर काम करणें ही सोपी गोष्ट नव्हती. फारच थोडे त्यांच्यापाशीं टिकूं शकले.

मी ज्या कालखंडाविषयीं सांगत आहे, त्या कालांत मेनन पोषाखांत अगदी कांटेकोर असत व वारंवार ते पोषाख बदलीत असत. त्यांच्या कपड्यांच्या कपाटात अनेक प्रकारचे भारतीय व पाश्चिमात्य कपड्यांची व निरनिराळ्या आकाराच्या हातांत धरायच्या छड्या, हॅटस्, पादत्राणें यांची रेलचेल होती. उत्तम पोषाक करणाऱ्या माणसांना हेवा वाटावा, असें

मेनन यावेळीं राहात होते. त्यांना वेगानें जाण्याचें वेडच होतें. मुद्दाम निवडून काढलेले शोफर त्यांच्या मोटारीवर असत व त्यांची मोटार या शोफरना सुसाट वेगानें न्यावी लागत असे.

भारतासाठीं मेनन यांनीं पुष्कळ चांगल्या गोष्टी केल्या. १९६१ मध्यें त्यांनीं सेनेसाठीं भारतीय बनावटीचा 'विकर्स' जातीचा रणगाडा तयार करण्याचें ठरवलें. हाच तो नंतर 'वैजयंता' नामकरण झालेला रणगाडा होय. अशा गोष्टींत मी मेनन यांना, मला शक्य होती ती सर्व मदत केली. त्यांनीं अहेतुकपणें असेल परंतु अशा कांहीं गोष्टी केल्या, कीं ज्या माझ्या मताप्रमाणें आपल्या हिताच्या नव्हत्या. अशा गोष्टींत मी त्यांना विरोध केला. लष्करी महत्त्वाच्या अशा कांहीं योजना कार्यवाहीत आणण्यासाठीं, सेनेची निकडीनें विवक्षित क्षेत्रांत वाहतुक करण्यासाठीं, सेनेला विमानांतून मदत देण्यासाठीं करण्यांत आलेल्या उपाय योजनांच्या बाबतींत, किंवा सेनेसाठीं निकडीनें जागा बांधण्याच्या बाबतींत, मी त्यांना सर्व प्रकारची मदत दिली; परतु कांहीं बाबतींत मी त्यांच्याशीं सहमत होऊं शकलों नाही. उदाहरणार्थ संरक्षण साहित्य मागवितांना, कांहीं विवक्षित देशांना प्राधान्य देऊन त्यांनीं कांहीं देशांना अजिबात वगळलें तेव्हां किंवा जेव्हां कांहीं विवक्षित लष्करी व तांत्रिक विषयांत व लष्करी हालचालींबाबत त्या प्रश्नांच्या चौफेर परिणामांची माहिती नसतांना जेव्हां हस्तक्षेप केला तेव्हां, किंवा स्वस्त सामान वापरून सेनेसाठीं राहती घरें बांधण्याचा त्यांनीं आग्रह धरला तेव्हां, किंवा लष्करी निवासांतून त्यांनीं आपल्या लहरीनुसार कॉफीची व थंडगार पाण्याची यंत्रें अशा अनावश्यक गोष्टी घुसविण्याचा प्रयत्न केला तेव्हां, किंवा सरक्षणासाठीं आवश्यक तें लष्करी साहित्य परदेशांतून आणण्यास त्यांनी विरोध दर्शवला तेव्हांहि मी सक्त विरोध केलेला आहे.

त्यांचें वाचन दांडगें होतें व पृथ्वीतलावरील सर्व विषयांचा ते एक कोशच होते. शास्त्र, तत्वज्ञान, वैद्यक, इंजिनिअरिंग, इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र, शेतीशास्त्र आणि पशुशास्त्र, या सर्वांची त्यांना माहिती असे. विमानांचीं इंजिनें, रणगाडे, पाणबुड्या, बिनतारी यंत्रें या सर्वांच्या किचकट भागांची त्यांना उत्तम माहिती होती.

त्यांच्या समोर तज्ज्ञहि घाबरून असत. या सर्व नानाविध अवधानांतच त्यांनी, मला वाटतें, लष्कराच्या हालचाली, गुप्तचर विभाग व सैनिकी शिक्षण या सारख्या महत्त्वाच्या विषयांबाबत अधिक आस्था दाखविली असती, तर बरें झालें असतें. या विषयांत कुणीं कांहीं आस्थापूर्वक बोलूं लागला, कीं मात्र त्यासाठीं मेनन यांना वेळ नसे.

त्यांचा मेंदू हा एखाद्या यंत्रासारखे काम करीत असे. बैठक चालू असतांनाच मध्येंच, संयुक्त राष्ट्रसंघांतील महत्त्वाचे ठराव, लोकसभेंत त्याच दिवशीं लगेंच करावयाचीं वक्तव्यें व परकीय वृत्तपत्रनिधींच्या प्रश्नांना उत्तरें हें सर्व एकाच वेळीं ओळीनें करतांना मी त्यांना पाहिलेलें आहे.

आपल्या हाताखालच्या कांही माणसांबद्दल ते कनवाळू असत, तर कांहींच्या बाबतींत कठोर वागून ते त्यांचा स्वाभिमान दुखावीत असत. याबद्दल लगेंच त्यांना वाईटही वाटत असे व ते लगेंच या गोष्टीची भरपाई करूं लागत.

एका साध्या बंगल्यांतील एका छोटया खोलींत, ते विरक्त वृत्तीनें राहात असत. एके काळीं नेहरूंचें निवासस्थान असलेल्या बंगल्याच्या समोरच संरक्षणमंत्री असतांना ते अशा रीतीनेंच राहात असत. घरांत सर्वत्र पुस्तकें, यंत्राचे सुटे सुटे भाग व कागद पसरलेले असत. या कालांत ज्या वेळीं ते आपल्या सत्तेच्या शिखरावर होते तेव्हां, सदासर्वकाळ त्यांना भेटायला येणाऱ्यांची रीघ असे. मंत्री, राजकीय पुढारी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी व आपल्या वैयक्तिक अडचणी घेऊन आलेले गरजू यांचा यांत भरणा असे.

दिवसाचे सगळे वेळापत्रक पुरे करण्यासाठीं ते रात्रीचे जागत असत. दिवसांतून अनेक वेळां कढत दूध व पुष्कळ चहाचे कप ते पीत असत. नानाप्रकारची उपशामक व इतर औषधे ते घेत असत, कारण विविध प्रकारचीं अनेक दुखणीं त्यांना होतीं. त्यांच्या घरांत स्वयपाक असा होत नसे व ते जेवणहि घेत नसत. सँडविचेस्, बिस्किटे काजू असा त्यांचा आहार असे. ते कधीं धूम्रपान करीत नसत, फळें खात नसत व मद्याचें व्यसनहि त्यांना नव्हतें. देशांतल्या सामाजिक व इतर वर्तुळांत त्यांच्याविषयी नेहमी बोललें जाई व ते सदा खदखदता विषय असत.

जगाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत, प्रवासांत असतांना ते साहसकथा वाचीत असत लष्करी विमानदलाच्या विमानांतून ते प्रवास करीत. दुसऱ्या दिवशीं सकाळीं लवकर ठरलेल्या ठिकाणीं पोहोंचता यावें म्हणून रात्रीं अवेळीं ते प्रवास सुरू करीत असत लहान मुलांची त्यांना फार आवड होती व मुलेंहि त्यांना बिलगत असत थोरा-मोठ्यांशीं आणि लहानांशीं हस्तांदोलनें करीत, मुलांच्या गालावर चापट्या मारून, त्यांचें हंसून कौतुक करीत, निरनिराळ्या वर्तुळांत ते लोकप्रियतेचा पाठपुरावा करीत असत.

एकदा मेनन यांनीं मला त्यांच्या कार्यालयांत बोलावलें होतें मी त्यांच्या समोरच्याच एका खुर्चीत बसलो होतो. या खुर्चीची पाठ फारच उंच होती. मी या खुर्चीत चुकीनें बसलों होतों, कारण त्या खुर्चीत फक्त सेनादल प्रमुख व त्या दर्जाचे लोकच बसत असत माझ्याशीं कामानें बोलणें सुरू करण्यापूर्वी ते छद्मीपणानें म्हणाले—

'जनरल ही दिल्ली आहे, अंबाला नाहीं !'

मी कांहीं न समजून म्हणलो— 'मला वाटतं मला भूगोल चांगला येतो.'

'आपण भलत्या खुर्चीवर बसला आहांत.' मेनन यांनीं असभ्यरीतीनं ही गोष्ट माझ्या नजरेस आणली असल्या क्षुद्र गोष्टीचा बाऊ त्यांनीं करायला नको होता असें मला वाटलें. खुर्च्या म्हणजे कांहीं अगदीं सिंहासनें नव्हतीं ! अपमान सहन न होऊन मी एकदम उठलों, चुकीची खुर्ची व ती खोली सोडून मी रागारागानें बाहेर पडलों. सचिवालयांतून बाहेर पडून मी मोटारींतून ग्रँड ट्रंक रोडनें दूर जाऊं लागलो मेनन यांची अपेक्षा नसावी कीं अशा तऱ्हेनें कुणी प्रतिक्रिया व्यक्त करील ! त्यांना प्रश्न पडला, कीं मी गेलों तरी कुठें ? त्यांनीं माझ्या घरीं व माझ्या कार्यालयांत फोन केला, परंतु माझा ठावठिकाणा त्यांना लागला नाहीं दोन तासांनीं मी परत आलों व कामासाठीं येतो. तों टेबलावर मेननचे बरेच निरोप आलेले होते कीं परतता क्षणींच त्यांना भेटावें मी अजूनहि अपमानाने चिडलेलाच असल्यानें मी उलट उत्तर धाडलें कीं माझे नजिकचे वरिष्ठ थिमय्या हे असल्यानें, यापुढें मेनन यांनीं मला बोलवायचे झालें तर थेट न बोलावतां थिमय्यांमार्फत बोलवावें. यानंतर मग

मेनन यांनी थिमय्या यांना मला घेऊन येण्यास सांगितलें. कांही शासकीय बाबतींत त्यांना चर्चा करावयाची होती व यांत माझा संबंध होता. थिमय्या व मी दोघे बरोबरच त्यांच्याकडे गेलो. आमचें कामाचें बोलणें संपल्यावर, त्यांनीं थिमय्यांना जाण्यास सांगितलें. आम्ही दोघेच उरलों तेव्हां त्यांनीं विचारलें, कीं एकाएकीं खोलीतून निघून जाऊन, त्या दिवशीं मी त्यांची प्रतिष्ठा कां कमी केली. मी त्यांना आठवण दिली प्रत्येकाला जीवनांत कांहीं प्रतिष्ठा असते व त्याची कदर व्हावी लागते. मलाहि विनोदबुद्धि आहे, परंतु माझें हसे करून घेण्यास मी तयार नाहीं. थोडा वेळ परस्पर दोपारोप झाल्यावर आम्ही हस्तांदोलन केलें व हें प्रकरण मिटलें मला वाटतें अशा तऱ्हेनें लोकांना डिवचणें हा मेननच्या विनोदाचाच एक प्रकार होता.

निरनिराळ्या मंत्रालयांतून त्या त्या खात्याचे महत्त्वाचे चिटणीस व सेनानी यांच्या सभा मेनन वारंवार घेत असत. या बैठकांना वजन यावें यासाठींच बहुधा सेनानींना बोलावलेलें असें. सेनादलाचे तिन्ही चीफ ऑफ स्टाफ, कॅबिनेट, परराष्ट्र खातें, गृहखातें व संरक्षण खातें यांचे सचीव, डायरेक्टर ऑफ इंटेलिजन्स ब्युरो व अशीच इतर महत्त्वाचीं माणसें यांना मेनन एकत्र करीत असत. जरी प्रत्येक वेळी सर्वजण आले नाहींत तरी यांतले कांहींजण येतच असत व सभाना यामुळें शोभा येत असे. कांही तरी महत्त्वाच्या विपयावर ताबडतोब विचारविनिमय करावयाचा आहे या सबबीखालीं त्यांना बोलावलेलें असे. सर्वजण जमा झाले, कीं मात्र मेनन, जणू आसपास कुणी बाजारबुणगे बसले आहेत असा त्रासल्यासारखा चेहरा करीत. क्वचित् चक्क डुलक्या घेत. अतिश्रमाचा किंवा त्यांनी घेतलेल्या उपशामक औपधाचा हा परिणाम असे. जर एखाद्याला लागेल असें काहीं ते बोलले व तो दुखावलेला माणूस दूरदर्शीपणानें स्वस्थ राहिला तर मेननना मोठी फुशारकी वाटे. जर तो उलटून बोलला तर मेनन एक किंवा दोनहि डोळे मिचकावून त्याच्याकडे हंसून पाहात व असें सुचवीत कीं ते नुसती गमत तर करीत होते.

अशा या बैठकांना कामकाज ठरलेलें नसे किंवा काय कामकाज झालें हें कुणी टिपीतहि नसे. या दोन्ही गोष्टींचा मेनन यांना तिटकारा होता या

बैठकीची सुरुवात शांतपणें होई व हळूहळू शाब्दिक चकमकी व अद्वातद्वा बोलण्यापर्यंत पाळी येई. बैठकीच्या शेवटीं मेनन नेहमीं कुणावर तरी खापर फोडीत व कुणाविषयीं चार चांगले शब्द मात्र कधींच बोलत नसत. तज्ञांचा सल्ला झिडकारला गेला, कीं वृत्ती तापत जात व गरम वादंग माजे एकदां एका विवक्षित बैठकींत मेनन हे सेनादल प्रमुखांबद्दल जे निंदावजा बोलले ते कुणीतरी टेपरेकॉर्ड केलें. याचें पुढें चांगलेंच प्रकरण झालें.

एखादा जनरल जर अशा सभेंत समजा म्हणाला– 'मला असा विचार...' तर लगेंच मेनन त्याला कटवीत, 'सैनिकांना कधीं विचार करतां येतो कां !' दुसऱ्या एखाद्या अशाच सभेंत एखादा ॲडमिरल सांगूं लागे— 'आपलें आरमार—' मेनन हें मध्येंच तोंड खुपसून उपरोधानें वाक्य पुरें करीत– 'समुद्राच्या तळाशीं असलेलें बरें !' अशा तऱ्हेनें थपडा खाल्लेलीं माणसें, मेनन यांच्या खोलींतून बाहेर पडल्यावर आपल्या मित्रांना मेनन यांचेबरोबर त्यांचा जो काल्पनिक असा जोराचा खटका उडाला तो तपशीलवार रंगवीत व फुशारकी मारीत. परंतु असा खटका प्रत्यक्षांत उडालेलाच नसे. जनरल थापर किंवा सारिन यांच्यासारखे फारच थोडे मेननच्या समोर आपली प्रतिक्रिया खाडकन् व्यक्त करीत. बाकी जवळजवळ सगळेच, वारा येईल तशी पाठ देणारे होते व एखाद्या अशा थपडेपेक्षा त्यांची 'करिअर'– कारकीर्द–त्यांना महत्त्वाची असे व अशा गोष्टी ते सोशिकपणें चालूं देत असत.

तुम्ही आगावू ठरल्याप्रमाणें मेनन यांना भेटण्यासाठीं त्यांच्या कार्यालयांत गेलांत, कीं त्यांच्या टेबलावर टेलिफोनची रांगच मांडलेली दिसत असे. सर्व टेलिफोन सर्व काळ वाजतच असत. मग मांजर उंदराशीं खेळावें तसे मेनन तुमच्याशीं खेळूं लागत. दुखवले न जातां तुम्ही क्वचितच बाहेर पडूं शकत असा.

जर ते काय म्हणतात हें तुम्हांला समजूंच नये असें त्यांना वाटलें तर ते तोंडांतल्या तोंडांत शब्द पुटपुटत. तुम्हांला अर्थात 'काय ? काय ?' असें विचारावें लागे व कान टवकारावे लागत. तुम्ही दूरदर्शीपणा दाखवला तरच निभाव लागत असे.

मेनन यांच्यापाशीं नव्या नव्या कल्पना थैमान घालीत असत व कल्पक

योजनांचा त्यांच्यापाशी तुटवडाच नसे संरक्षण साहित्याच्या निर्मितींत वाढ प्रथम कुणी केली असेल तर ती मेनन यांनीच. त्यांच्या अंवती भोवतीं नेहमीं खूप गडबड चालूं असे, तज्ञांचा सल्ला घेणें, आज्ञा देणें, भेटायला आलेल्यांना तिन्ही त्रिकाळ भेटी घेऊं देणें असें चालूं असे. वादंग माजलें कीं त्यांना त्यांत मौज वाटे. परंतु लोकसभेंत वा पक्षाच्या सभेंत त्यांच्यावर झोड उठलेली असली, कीं कार्यालयांत ते धुमसत असत, सर्वांनाच शिव्याशाप घालीत असत.

जेव्हां जेव्हां 'पालम' येथून ते भारताबाहेर जायला निघत तेव्हां मोठाच समारंभ होत असे. मुलकी व लष्करी खात्यांतील वरिष्ठ, वृत्तपत्रांचे छायाचित्रकार, मित्र, असे सगळे जमत. ते घाईघाईनें आपल्या खास विश्वासू लोकांच्या कानांत सगळयांच्या देखत कांहीं तरी अतिमहत्त्वाचें वा गुप्त गोष्ट सांगत, (याचा बघणाऱ्यांवर चांगला परिणाम होत असे) व आलेल्यांच्यावर पोहोंचवायला आल्याचा त्रास घेतल्याबद्दल ते लटके रागावत असत.

राज्यांचे सर्व वजनदार मुख्यमंत्री यांच्याशीं चांगलें संभाळून घेतलें पाहिजे एवढें तारतम्य त्यांना होतें व बक्षी गुलाम महंमद, कैरों, पटनाईक, कामराज, बी. सी. रॉय, यांच्यासारख्या मुख्यमंत्र्यांसाठीं आडवाट पत्करूनहि जें कांहीं करणें शक्य असेल तें सर्व करीत असत. नेहरूंचें त्यांच्याविषयीं चांगलें मत होतें व बहुधा तोच त्यांचा एकमेव आधार होता. असें असल्यानें त्यांना हें ठाऊक होतें, कीं नेहरूंच्या मनाविरुद्ध कांहींहि करतां कामा नये. केंद्रिय मंत्रिमंडळांत मेनन यांना आझाद, पंत व इतर कांहीं थोडेजण यांच्याविषयींच काय तो निरोगी असा आदर होता. परतु बाकी बहुतेक सहकाऱ्यांना ते पायपुसणीं समजत असत. ते व मोरारजी देसाई यांच्यांत खूपच वितुष्ट होतें.

भारतीय राजकारणांतील अत्युच्च पद व त्यांच्यांत दुसरा उभा आहे अशी परस्परांची खात्री होती. या त्यांच्या वितुष्टामुळें आपल्या राजकीय हिताची पुष्कळ वेळा हानी होत असे. कृष्णम्माचारी व अशोक सेन हे एके-काळीं त्यांचे अगदी आवडते होते; परंतु त्यांच्याशीं दोघांचें पटेनासें झालें. मालवीय हे तर त्यांचे अति लाडके होते.

मेनन यांचे अध्यक्ष राधाकृष्णन यांचेशीं असलेले संबंध यथातथाच होते. यामुळें व त्यांच्या पुढच्या इतर राजकीय अडचणीमुळें, मेनन यांना आपल्या विविध उद्योगांत अगदीं दोरीवरून चालल्यासारखें सावधपणें वागणें भाग पडत असे.

मेनन हे नेहरूंचे उजवे हात झालेले होते व तेच नेहरूंचे प्रज्ञा मित्रहि होते नेहरूंजवळ मेनन यांचा जो वरचष्मा होता, त्याचें कारण, नेहरू असें समजत असत, कीं त्यांची नीतितत्त्वें, ध्येयवाद आणि धोरणें याचा योग्य अर्थ विश्वसनीयरीत्या मेननखेरीज कुणाला लावतां येत नाहीं. भारताच्या स्वातंत्र्याची मागणी इंग्लंडमध्यें १९२४ पासून सतत २३ वर्षे ज्या चिकाटीनें मेनन यांनी मांडली, त्याची आठवण नेहरूंना होती. यासाठीं कष्टमय व तपस्व्याचें जीवन ते जगले होते. नेहरूंना याचीहि जाण होती कीं १९३५ मध्यें नेहरूंच्या साहित्याचा प्रतिनिधि या नात्यानें, मेनन यांनीं नेहरूंची निरनिराळीं पुस्तकें प्रसिद्ध करण्यासाठीं सर्व कांहीं केलें होतें. मेनन हे लंडनच्या प्रकाशन क्षेत्रांत सर्वांना माहित असलेले होते व नेहरूंचे आत्मचरित्र बॉड्ली हेड ( Bodley Head ) याच्या वतीने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था मेनन यांनीच केलेली होती. कारण या प्रकाशन संस्थे-करितां संपादकीय सल्लागार म्हणून मेनन काम पाहात असत. नेहरूंच्या 'ग्लिम्पसेस् ऑफ वर्ल्ड हिस्टरी' या पुस्तकांतील कांहीं भागाचें पुनर्लेखन त्यांनींच सुचवलेलें होतें. नेहरू व मेनन यांच्यांत समान आवडी पुष्कळ होत्या व दोघांची बुद्धि ही परस्परांची प्रतिबिंबें असावीत तशी होती. मात्र व्यक्तिगत वागणुकींत व दोघांच्या प्रयत्नदिशांत दोन ध्रुवांचें अंतर होतें.

त्यांचे नेहरूंपाशी जें वजन होतें व आंतराष्ट्रीय व्यवहारांत त्यांना जें स्थान प्राप्त झालें होतें, त्यामुळें त्यांना परराष्ट्र खात्यांत प्रतिष्ठा निर्माण झाली होती. जें जें होई त्याच्यांत त्यांचा मोठाच हात असे. यामुळें परराष्ट्र खात्यांतील ज्येष्ठ अधिकारी प्रत्येक प्रसंगीं त्यांना मोठ्याच इतमामानें वागवीत व परराष्ट्रखात्यांत कुठलेंहि अधिकारपद त्यांच्याकडे नसतांनाहि, त्यांना ही ज्येष्ठ मंडळी आपला अनभिषिक्त राजा मानीत असत. काश्मीरमध्यें त्यांना खास सरकारी स्वागताचा मान मिळत असे. जेव्हां जेव्हां ते या सुंदर

प्रदेशांत येत असत त्या त्या वेळीं काश्मीरचे सर्व मंत्रिमंडळच त्यांच्या स्वागताला जाण्याची प्रथाच पडली होती. नेहरूंजवळ त्यांना असलेला मान, व वर्षानुवर्षे आंतरराष्ट्रीय वर्तुळांत काश्मीर समस्येचें त्यांनीं फेकलेलें अतिसुंदर मानचित्र याचा हा परिणाम होता. त्यांना मिळणारे हे सन्मान ते आपली हक्काची मिळकतच समजत असत. मेनन हे नेहरूंचे लाडके असल्यामुळें बहुतेक राजकारणी व वरिष्ठ अधिकारी त्यांच्या मनाप्रमाणें वागत, परंतु तसें मान्य मात्र करीत नसत. आपली जी मूळ धोरणें होतीं त्यावर परिणाम करण्याची शक्ती मेननपाशीं आल्यानें, कांहींजणांना अस्वस्थता आली होती व हताशपणें ते मेननवर टीका करीत असत.

नेहरूंच्या हजेरींत मेनन हे घाबरून वागत असत. काय होत असें कळत नाहीं परंतु नेहरू हे मेननची अशी दांडी उडवीत असत खरी ! जर मेनन एखादें चांगलें भाषण करीत असतांना, नेहरू हे अचानक तिथें आले तर मेनन हे एकदम गडबडून जात व त्यांची विचारांची सुसंगती नाहींशी होत असे. नेहरू नेहमींच मेननचा सूर चमत्कारीक करून टाकीत. आजारपणांत त्या अवस्थेंत नेहरूंनीं आपल्याला भेटावें यासाठीं मेनन अगदी जीव टाकीत असत. नेहरू बहुधा त्यांना उपकृत करीत असत.

मुरलेले समाजवादी म्हणून भारतांतील डाव्यांच्या आघाडीचा विचार करतां, मेनन यांचें स्थान नेहमींच महत्वाचें राहील. हे हितसंबंध गुंतलेले लोक त्यांच्या संबंधी नेहमींच निरनिराळ्या पुष्कळ अफवा तयार करीत असतात, कारण मेननच्या रुपानें त्याच्या अस्तित्वालाच धोका निर्माण करणारा शत्रू वावरत आहे हें त्यांनीं ओळखलेलें आहे. त्यांच्यावर हल्ला करतांना वृत्तपत्रें अधिकाधिक प्रखर होतात हीं वृत्तपत्रें शक्तिमान अशा उद्योगपतींच्या हातांत आहेत. उजवे गट हे त्यांना शाप मानतात; कारण देशाच्या आर्थिक प्रगतीआड मेनन येत आहेत असें त्यांना वाटते. भारतांतील युवक वर्गांत मेनन लोकप्रिय झाले, ते त्यांनी संयुक्त राष्ट्संघांत काश्मीर प्रश्न खंबीरपणें लढवला यामुळें.

पश्चिमी राष्ट्रांनीं, मेनन याचेवर जो पुन: पुन: आरोप केला, कीं मेनन हे भारताच्या हिताविरुद्ध काम करीत असतात, त्यामुळें मेनन रागानें

काळेनिळे होत असत व परिणामीं या राष्ट्राबाबत, आंतराष्ट्रीय व्यवहारांत घ्यावयाच्या त्यांच्या भूमिकेवर परिणाम झाला. यामुळें अशी परिस्थिती निर्माण झाली कीं, ज्या वर्तुळांत आपण प्रिय रहावें म्हणून मेनन उत्सुक होते, त्याच वर्तुळांत ते नावडते झाले. कारण मेनन यांना हें सर्व त्यांच्या तंत्रानें हवें होतें.

मी वर दिलेल्या कारणांमुळें कदाचित असेल, परंतु मेनन यांच्या मनांत अमेरिकेविषयीं कायमची अढी निर्माण झाली. अमेरिका म्हणजे मेनन यांना बैलापुढें धरलेल्या तांबडया फडक्यासारखी वाटे. जर अमेरिकेचें त्यांच्या-पाशीं कुणी समर्थन करूं लागला, तर ते त्याच्यावर आग पाखडीत तुटून पडत. देशांत व परदेशांत त्यांनी अमेरिकेला धारेवर धरलें. मेनन यांना न रुचणारे प्रश्न अमेरिकन वृत्तपत्रकारांनीं विचारल्यानें, त्यांनीं त्यांना दटावलें व अमेरिकेनें केलेल्या प्रत्येक कृतीबद्दल संशय व्यक्त केला. अमेरिकन जीवनपद्धतीचा त्यांनी उपहास केला व भारतानें अमेरिकेशीं कसलेहि संबंध ठेऊ नयेत, असेंहि मत सांगितलें. यामुळें त्या देशांत मेनन यांचा तिरस्कार सुरूं झाला यांत नवल नाहीं.

अमेरिकन लोक मेनन यांना एक खलपुरुष, चिडका व स्वतःची टिमकी वाजवणारा गृहस्थ म्हणूं लागले. सोव्हिएट रशियाबद्दल मात्र मेनन हे नेहमीं भक्तिभावानें बोलत व यामुळें त्या देशांत मेनन हे मोठे लोकप्रिय झाले. कम्युनिस्ट देशाचें त्यांच्यावरील प्रेम, हें कुणाहि भारतीयापेक्षां कांकणभर अधिकच होतें. परंतु मेनन यांनीं त्या देशांना भेट मात्र कधी दिली नाहीं. पश्चिमात्य जगांत ते कमीअधिक प्रमाणांत अप्रिय होते कुटल्याहि गटा-पासून अलिप्त असलेल्या देशांत, मेनन यांनीं त्यांची तरफदारी केल्यामुळें, फारसें वाईट मत नव्हतें. परंतु विवक्षित देशाचा पाठपुरावा करण्याचें त्यांनाहि मान्य नव्हतें.

मेनन विषयीं अमेरिकेंत निरनिराळ्या प्रतिक्रिया उत्पन्न होत. न्युयॉर्क येथें एकदां एक टॅक्सीवाला मला म्हणाला—

'त्या मेननला बेटयाला आमच्यासाठीं मुळींच वेळ नाहीं हें मला ठाऊक आहे. पण त्याचे डोकें चांगलें आहे. तो जर आमचा 'सेक्रेटरी ऑफ स्टेट' झाला ना तर रशियन असुरांच्या आधीं आम्ही चंद्रावर उतरूं !'

एका पेशानें वकील असलेल्या अमेरिकन माणसाचा हा अनुभव पहा. या वकिलाला न्यूयॉर्कहून शिकागोला विमानानें जात असतांना, आपल्या शेजारीं मेनन आहेत याची कल्पना नव्हती. जेव्हां विमान आकाशांत उडालें तेव्हां शेजारीं बसलेल्या या 'परदेशीय' माणसाशीं चार शब्द बोलून त्याला दिलासा द्यावा या हेतूनें त्यानें मेननना विचारलें.

'अमेरिकेंत येऊन आपल्याला किती दिवस झाले ?'

'दहा.' मेनन यांनीं कोरडेपणानें सांगितलें.

'काय करतां आपण ?' अमेरिकन माणसाचे प्रश्न चालू राहिले.

'कामासाठीं आलोय.' मेनननीं गुरगुरल्यासारखें सांगितलें.

'कसलें काम ?' माणसानें चिकाटीनें विचारलें.

'संयुक्त राष्ट्रसंघाचें.' मेनन यांनीं अति थोडक्यांत उत्तर दिलें.

कसल्या शिष्टमंडळाचे सभासद आहांत कीं काय ?' अमेरिकन विचारीत राहिला.

'नाहीं. भारतीय शिष्टमंडळाचा मी नेता आहे.' एवढें सांगून मेनन यांनीं फटकन् विचारलें–

'आणखी कांहीं प्रश्न आहेत का ?' तो अमेरिकन माणूस या धक्क्यानें अर्धमेलाच झाला परकीय माणसाशीं चार गप्पा मारण्याचा प्रयत्न तो करीत होता व या प्रयत्नांत त्याची अशा एका माणसाशीं टक्कर झाली होती कीं जो अमेरिकेच्या मित्रवर्गांत निश्चित मोडत नव्हता.

मंत्रिमंडळांतील आपल्या बहुतेक सहकाऱ्यांविषयीं, मेनन यांना अनादर-युक्त तिरस्कार वाटे. मेनन यांचे मत होतें कीं या मंडळींना कशातलें फारसें कळत नाहीं.ही मंडळी उलट मेनन यांच्या मिजासीपणाचा राग करीत व त्यांची प्रतिमा मलीन करण्यासाठीं ही मंडळी झटत असत. नेहरूंच्या नंतर त्यांच्या सत्तेचा वारसा आपल्याकडे यावा, असें ज्यांना वाटत असे त्यांना मेनन हेच त्या आड येत आहेत असें वाटत असे. एवढ्या मोठ्या स्थानासाठीं डोळे लावून बसलेल्या या लोकांची मेनन टर उडवीत असत, कारण ती त्यांची नक्कीच लायकी नाहीं असें त्यांना वाटत असे. अनेक कारणांनीं त्यांच्या सहकाऱ्यांना, त्यांच्या संबंधी न्यूनगंड वाटे. त्याला अनेक कारणें होतीं.

यापैकीं कांहींजण चुरगळलेले कपडे घालून व कधीं कधीं दाढचा देखील न करतां राष्ट्रपतीभवनांतल्या उत्सवी समारंभांना जात असत. हे म्हणजे बाकिंगहॅम राजवाडयांत किंवा व्हाईट हाऊसमध्यें घाणेरडया कपडयांनी जाण्यासारखेंच होतें. यांच्यांतले हे दोष मेनन यांच्या ध्यानांत येत व ते कधीं कधीं चेष्टेनें म्हणत कीं सुतकीपणा यांचेपासून शिकावा !

ते म्हणत कीं आपले पुष्कळसे मंत्रिमंडळांतील सहकारी हे नादिष्ट आहेत. डामडौल असलेल्या बंगल्यांतून हे राहतात परंतु वृत्ती कंजूप. कधीं कुणाचें आदरतिथ्य नाहीं, कांहीं नाहीं ! कांहीं जणांच्या खाण्याच्या एक-एक तऱ्हा होत्या. यामुळें यजमानाची ते पंचाईत करीत मोठमोठ्या गप्पा ते मारीत, परंतु त्यांच्या कृति क्षूद्र असत व आळसावल्यासारखी ते कामें करीत. देशांत कांहींही परिस्थिती असली तरी यांना शांत झोप लागत असे. चेहऱ्यावर गबाळें हास्य पसरून. दोन्ही हात जोडून हे सर्वत्र फिरत व खालच्या आवाजांत पण मिजासीनें बोलत असत. नेहरूंची तोंडा-वर लोकांदेखत स्तुती करायची व पाठीमागें त्यांची निंदा करायची. आपला विरोधक हा अप्रिय होऊन जायच्या वाटेवर आहे व लोकमत आपल्या बाजूला आहे अशी खात्री झाली व आतां आपण सुरक्षित आहोंत असें कळलें कीं मग हीं माणसें एकदम शूर होत व जाहीररित्या बोलूं लागत .. मोठ्यानें घोषणा करण्याची व वेडेवाकडें साहित्यिक शब्दप्रयोग करण्याची त्यांना भारी हौस. लबाडीनें ते बऱ्याच गोष्टी करीत.

जर तुमचें मेनन यांचेशीं कडाक्याचें वादंग झालें तर ते फुरंगटतील अशी तुमची अपेक्षा असते. कांहीं वेळेला ते रुसून बसतहि असत; परंतु इतर वेळीं मात्र ते तुम्हांला एखादी महागडी चॉकलेटची पेटी भेट म्हणून पाठवीत. हें खिळाडूपणाचें निदर्शक असे किंवा तुमची मनधारणी असे.

त्यांचा दिनक्रम गडबडीचा असे. रात्री फारच कमी झोप झाल्यानें दिवसभर निरनिराळ्या ठरलेल्या कार्यक्रमाच्या वेळीं त्यांना डुलक्या येत, व रात्री झोप झाली नाहीं त्याची थोडी भरपाई होत असे. त्यांचा जोम व अुत्साह अति दांडगा होता. झंझावातासारखे ते सर्वत्र, अनेक समारंभांतून फिरत असत. अुद्घाटन समारंभांना तर भारतांत कधींच तुटवडा नसतो.

कुणाशीं परराष्ट्र धोरण विषयक चर्चा कर, कुणा वकिलाची परराष्ट्रनीति त्यांना पसंत नसली तर त्याची कानउघाडणी कर, कारण असो वा नसो लोकांवर खेंकस, अशी त्यांची सतत गडबड चालू असे. डोळ्यांतून आग पडत आहे, घाईतून इकडे तिकडे करतांना खोलींतल्या लांकडी सामानावर ते आदळत आहेत व त्याबद्दल इतरांनाच दोष देत आहेत, असा त्यांचा सारखा धडपडाट असे.

कांहीं विवक्षित प्रसंगीं एखादी गोष्ट माहीत असूनहि ते अज्ञान पांघरीत. नेहरूंना सांगून त्यांच्याकडून न्याय मिळविण्याची धमकी ते देत. परंतु तसा त्यांचा प्रत्यक्षांत विचारहि नसे. केवळ धमकी म्हणूनच हें केलेलें असें. कधीं कधीं त्यांना घेरी येई, परंतु निमिषार्धांत ते शुद्धीवर येत. अशा वेळीं चटकन् ताळ्यावर येण्याची त्यांची शक्ति दिसून येई. अनेक दुःखदायी व्याधींतून ते मोठ्या कष्टानें बाहेर पडत व आजारपणांतहि आपली खात्यावरची मांड सोडत नसत. अशक्य गोष्टी करायला ते लोकांना सांगत. संबंधित खात्यांत ते स्वतःच विवक्षित माहिती पाठवित व नंतर त्याविषयीं संपूर्ण अज्ञान दाखवित. ज्येष्ठ जनरलना किंवा मुलकी अधिकाऱ्यांना रविवारीं दुपारीं व इतर दिवशीं दिवसा व रात्रीं अवेळीं ते बोलावणें धाडीत. कांहीं महत्त्वाच्या विषयांवर चर्चेसाठीं हें बोलावणें असे प्रत्यक्षांत मात्र कांहीवेळां अगदींच क्षुल्लक काम असे. लोकांची विश्रांती व आराम यांत ते व्यत्यय आणीत व लोकांना याचा राग येई. याचें कारण त्यांना स्वतःला विश्रांति म्हणजे काय हेंच ठाऊक नव्हतें.

त्यांनी आपल्या खात्यांत बहुरंगी माणसें निवडलीं होतीं. यांतले कांहीं हुषार होते व बाकीच्यांत अर्थ नव्हता. मेननचे टीकाकार मात्र या सर्वांना एकाच माळेचे मणी समजत व त्यांच्याविरुद्ध बोलत.

एका पहाटे तीन वाजतांच माझा टेलिफोन वाजूं लागला व मी जागा झालों.

'मेनन बोलतो आहे' आवाज आला. 'तुम्ही कांहीं मिनिटांत आत्तांचे आतां माझेकडे येऊं शकाल काय?' कांहीं महत्त्वाचें काम आहे.'

'मी हा निघालोच ..' मी उत्तर दिलें.



पंडित नेहरू व सौ. कौल

माझ्या अंगांत त्यावेळीं १०२° ताप असल्यानें मी एक जाडजूड मफलर गळ्याभोंवतीं गुंडाळला व अंगावर भरपूर कपडे घालून, मोटारनें मेनन यांचेकडे गेलों. सरकारी फायलींच्या कोंडाळ्यांत मेनन बसलेले होते. रात्रभर काम करीत राहून दुसऱ्या दिवशीं पहाटे ते संयुक्त राष्ट्रसंघांत जाण्यासाठीं भारतांतून निघणार होते.

'या पोलिश घोड्यासंबंधीं नक्की परिस्थिती काय आहे ?' त्यांनीं विचारलें.

'पोलिश घोडें ?' मी कांहींशा आश्चर्यानें म्हटलें—'मला याची सुतराम् कल्पना नाहीं. घोड्यांचें हें प्रकरण माझेकडे नाहीं. हें काम जनरल कोचर यांचेकडे आहे.'

'अरेरे ! जनरल, मग मी तुम्हाला अशा वेळीं उगाच त्रास दिला.' मेनन यांनीं खेद व्यक्त केला. परतु बोलत असतांना त्यांनीं आपला हात मैत्रीच्या भावनेनें सहज असा माझे हातावर ठेवला. त्यांची ती संवय होती. माझा हात त्यांना नेहमींपेक्षां अर्थातच गरम लागला.

'तुमच्या अंगांत ताप आहे !' ते उद्गारले.

'आहे ना. ' मी कबुली दिली.

'बापरे ! मग इथें येण्यापूर्वींच तुम्ही मला तसें कां सांगितलें नाहीं ?' मेननीं विचारलें.

मी कांहींच बोललों नाहीं.

दुसऱ्या दिवशीं लंडनमार्गे मेनन न्युयॉर्कला रवाना झाले. एअर इंडियाच्या स्थानिक कार्यालयांतून मला एक जाड पार्सल आलें. लंडनहून मेनन यांनी शुभेच्छापूर्वक दोन संपूर्ण लोकरीचें ' पुलओव्हर्स ' मला पाठवले होते. माझ्या आवडत्या रंगाचे ते होते. मला अंगात ताप असतांना त्यांनी अपरात्री जो त्रास दिला त्याबद्दल त्यांना वाईट वाटलें होतें याचें हें निदर्शक होतें. अधुनमधून जनरल थापर, सारिन यांनाहि शुभेच्छा निदर्शक अशा प्रकारच्या भेटी मेनन देत असत

मेनन हे सरकारी फायलींवर कडवट शेरे लिहीत असत. अशाच तऱ्हेचा एक शेरा मला लिहिला असतांना माझा उत्तराचा सूर हा त्याच वळणाचा होता. मी अशा तऱ्हेचें उत्तर कां दिलें असें मेनन यांनीं मला विचारल्यावर

देखील, जेव्हां मला याबद्दल पश्चात्ताप झाल्याचें चिन्ह दिसेना तेव्हां त्यांनीं हातांतली फाईल माझेकडे फेकली. मला अशा तऱ्हेनें माझेकडे कांहीं वस्तु फेकणें आवडलें नाहीं व याला मी आक्षेप घेऊन, ती फाईल मी खोलीबाहेर फेकून दिली. मेनन यांना माझें हें धारिष्टच पाहून खाऊं कीं गिळूं असें झालें.

मेनन हे सैन्यांतील सर्व श्रेणीशीं मृदुपणें वागते तर त्यांना सर्वांचाच संपूर्ण विश्वास लाभला असता. ते जेव्हां अधिकारावर आले तेव्हां सेना-दलांत सर्वत्र ते प्रिय होते असेंच म्हटलें पाहिजे परंतु बेपर्वाईच्या वागणु-कीनें त्यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली. हळूहळू गोष्टी अशा थराला आल्या, कीं जरी मेनन यांना कांहीं समर्थक लाभले असले तरी बाकीचे त्यांचा द्वेष करूं लागले राजकीय कारस्थान्यांनी या परिस्थितीचा फायदा घेतला. मेनन यांनी उत्तम सार्वजनिक संबंध राखले असते तर इतरांनीं केलें त्याप्रमाणें त्यांनाहि ही गोष्ट घडूं न देण्यांत यश आलें असतें.

निरनिराळ्या वर्तुळांत माझ्या कानावर अशा वदंता येऊं लागल्या, कीं थिमय्यांच्या इच्छेविरुद्ध मेनन यांनीं मला बढती दिलेली आहे मी विचार केला कीं असें जर असेल तर मी थिमय्यांच्याच हाताखालीं काम करणें, म्हणजे त्यांची परिस्थिती चमत्कारीक करण्यासारखें आहे. मी म्हणूनच थिमय्यांना त्यांच्या कार्यालयांत भेटलों व माझ्या कानांवर जें आलें, त्यामुळें मला काय वाटलें हें मी त्यांना सांगितलें. त्यांनी मला सांगितलें कीं लेफ्ट-नंट जनरल या पदाच्या दोन जागा खाली होत्या. त्यासाठीं त्यानी तीन नांवांची एक यादी शिफारस करून धाडली होती. मेजर जनरल ग्यानी, कुमारमंगलम् व मी असे हे तिघे होतो. ही यादी ज्येष्ठत्वाच्या अनुक्रमानें धाडली गेली होती. परंतु कुमारमंगलम् व मी यांचे ज्येष्ठत्व अगदीं समान होतें मेनन यांनीं मुद्दा काढला, कीं बढती देण्यासाठीं जी फुटपट्टी वापरण्यांत येते त्यानुसार या पदावर जाण्यासाठीं अधिकाऱ्यानें एका डिव्हिजनवर कमांडर म्हणून काम केलेलें असावें, असा नियम असे परतु ग्यानी यांनीं असें काम केलेलें नसल्यानें त्यांना कशी काय बढती देता येणार ? म्हणून मेनन व थिमय्या यांनी दोघांनी असें ठरविलें कीं कुमार-मंगलम् व मी अशा दोघांना बढती द्यावी. (कांहीं महिने डिव्हीजनचे

कमांडर म्हणून काम केल्यानंतर त्यानी यांनाहि ही बढती मिळाली.) थिमय्या यांनीं सांगितलें कीं, माझी बढती ही त्यांच्या संमतीनें झालेली आहे व त्यांच्या मनाविरुद्ध मुळींच झालेली नाहीं व मला याबद्दल कांहीं वाटायला नको.'

कुमारमंगलम व मी जवळजवळ डझनभर अधिकाऱ्यांना डावलून वरची बढती मिळवली होती. तरीसुद्धा माझेंच नांव वेगळें काढून एक मोहीमच माझ्या विरुद्ध सुरूं झाली. जणूं गुणवत्ता नसतांना कांहींतरी दोऱ्या ओढूनच मी हें केलें होतें. माझ्याच बरोबर कुमारमंगलम यांनींही त्याच अधिकाऱ्यांना डावललें असूनहि, त्यांच्या विरुद्ध मात्र एकहि वोट उचललें गेलें नाहीं. कुमारमंगलम व मी दोघांनीं एकाच दिवशीं कमिशन घेतलें व आमचें जेष्ठत्व समान होतें. तें बुलविच् येथून कमिशन घेऊन बाहेर पडले व मी सँडर्स येथून. कांहीं जणांना वाटत होतें त्याप्रमाणें ते मला मुळींच ज्येष्ठ नव्हते. त्यांचे नांव आर्मीलिस्ट मध्यें माझ्या अगोदर लिहिलें गेलें. कारण ते आर्टिलरी (तोफखाना) विभागांत होतें व मी इन्फंट्रीत (पायदलांत) होतों. दप्तरनोंदणींत आर्टिलरी विभाग प्रथम असे इतकेंच.

मला वाटतें लोकांना ही गोष्ट माहीत नव्हती कीं मला बढत्या भराभर मिळत गेल्या व माझ्या नोकरीची नोंद उत्तम असल्यानें मी अनेकांना डावलून वर गेलों होतों. यावेळीं मेनन हे या खात्यांत आलेलेहि नव्हते. केवळ साडेनऊ वर्षे नोकरी झाली असतांना, १९४२ मध्यें मी विसाव्या वर्षींच लेफ्टनंट कर्नल झालों. छत्तीसाव्या वर्षी मी ब्रिगेडिअर झालों. त्रेचाळीसाव्या वर्षी १९५६ मध्यें मेजर जनरल झालों. या प्रत्येक वेळीं मी अनेक अधिकाऱ्यांना बाजूला सारून बढती घेतली होती. परंतु १९५९ मध्यें सव्वीस वर्षांच्या नोकरीनंतर, मी आणखी कांहीं अधिकाऱ्यांना डावलून कुमारमंगलम यांचे बरोबर लेफ्टनंट जनरल होतांच मात्र, माझ्या विरुद्ध आरडाओरडा सुरूं झाली माझ्याच कांहीं सहकारी अधिकाऱ्यांनींच याला चिथावणी दिलेली होती. त्यांना असें भासवायचें होतें कीं मी 'सामान्य' अधिकारी असतांना मेनन यांच्या राजकीय ढवळाढवळीनें एकदम महत्त्व पावलों होतों.

असें सांगण्यांत येत होतें, कीं माझ्यापेक्षां अधिक चांगली नोकरीची नोंद

असलेल्यांना, मी मागें सारलें होतें. हे 'अधिक चांगले' लोक कोण होते, व त्यांची एकंदर सेवा-नोंद माझ्यापेक्षां अधिक चांगली म्हणजे कशी होती? (कुणी माझी पूर्वपीठिका तपासून पाहाण्याची तसदी घेतली होती कां?) जर मद्यपान करणें व अशाच तऱ्हेच्या षौकांत मग्न राहाणें, ह्याच गोष्टी वरच्या जागेसाठीं बढती देण्यासाठीं आवश्यक असतील, तर यांतले पुष्कळजण प्रवीण होते व त्यांना अधिक गतीनें बढती मिळायला हवी होती.

वृत्तपत्रांत व लोकसभेंत कांहीं महत्त्वाच्या सेनानींच्या बढतीबाबत व कांहींना डावलण्यांत आल्याबद्दल जोराची टीका झाली. मेनन हे संरक्षणमंत्री झाल्यापासून सैन्यांत असंतोष वाढत असल्याची तक्रार कांहींनीं केली. असंतोष फार पूर्वीपासून डोकें वर काढीत होता व याला कांहीं ज्येष्ठ सेनानींना बढतीबाबत डावलण्यांत आलें हें कारण नव्हतें सरकार जेव्हां अधिकाऱ्यांची सेनेंतील सर्वोच्च श्रेणीसाठीं निवड करते, तेव्हां त्यांना गुणवत्ता, श्रेष्ठत्व व इतर बाबी विचारांत घ्याव्या लागतात. मला वाटतं ज्या अधिकाऱ्यांना याची झळ पोंचली होती, व ज्यांची तक्रार होती तेच अधिकारी सेनेंत एकंदरीत असंतोष पसरल्याचा आभास निर्माण करीत होते.

खरी स्थिती अशी आहे कीं अनेक वर्षांपासून मेनन हे संरक्षणमंत्री होण्यापूर्वीं व झाल्यानंतरहि एका पाठोपाठ झालेल्या 'चीफ ऑफ स्टाफ' यांच्या कारकीर्दींत–लेफ्टनंट कर्नल या श्रेणींतील अधिकाऱ्यांवर अन्याय झालेला होता. या अधिकाऱ्यांतून निवड करण्यासाठीं जी निवड समिती होती ते प्रत्येक अधिकाऱ्याचा विचार करण्यासाठीं फक्त दहा ते पंधरा मिनिटें वेळ देत असत. (आजही बहुधा हेंच चालू आहे) सतरा अठरा वर्षे नोकरी केलेल्या अधिकाऱ्याची गुणवत्ता इतक्या घाईघाईनें ही समिती कशी काय ठरवूं शकत असे? अशा तऱ्हेच्या चुकीच्या कार्यपद्धतीनें सेनेंतील अधिकाऱ्यांत असंतोष माजलेला होता १९६३ ते १९६६ या काळांत सेनेंतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बढत्यांबाबत निरनिराळीं मापें लावण्यांत आल्यानें गंभीर असंतोष पसरलेला आहे. परंतु सेनेबाहेरील कुणीहि याबद्दल सार्वजनिक ठिकाणीं आवाज उठवलेला नाहीं. १९५९–६२ या काळांत मात्र हें वारंवार घडत होतें.)

माझें या बाबतींत थिमय्यांशीं जें बोलणें झालें, त्यानंतर दहा आठ-वड्यांनीं १ सप्टेंबरच्या 'स्टेटस्मन' पत्राच्या अंकांत मी जेव्हां मथळा पाहिला ! —'अलिकडील बढत्यांमुळें थिमय्यांचा राजिनामा'— तेव्हां मी आश्चर्यचकीत झालों. त्यांत दिलेल्या खळबळजनक हकिगतीप्रमाणें, मेनन यांनीं अलिकडेच सेनेंत देण्यांत आलेल्या बढतीबाबत जो अनावश्यक हस्तक्षेप केला, त्याच्या निषेधार्थ थिमय्या हे राजिनामा देणार आहेत थिमय्यांनीं मला जें सांगितलें त्याच्याशीं हें जुळणारे नव्हतें. माझ्या हेंहि लक्षांत येईना, कीं हें एवढें कडक पाऊल उचलण्यासाठीं थिमय्या यांनीं इतके आठवडे कां वाट पाहिली जर मेनन यांचेशीं त्यांचे मतभेद झाले असतील तर त्यांनी लगेचच कां कृति केली नाहीं ? कदाचित त्यांना हें करण्यासाठीं या मानसिक अवस्थेंत हितसंबंधी लोकांनी भरीस पाडलें असेल. परंतु मला वाटलें कीं, या बाबतींत त्यांच्याशींच बोलणें चांगलें मी त्यांच्या घरीं गेलों, तेव्हां ते अथरुणांतच होते मी त्यांना 'स्टेटस्मन' पत्राचा अक दाखवला. मी विचारलें कीं, कांहीं आठवड्यांपूर्वीं त्यांनीच, मेनन यांच्याशीं त्यांचे माझ्या बढती विषयीं मतभेद असल्याचा इन्कार केलेला असतांना, आतां 'स्टेटस्मन' म्हणतो त्याप्रमाणें ते माझ्या बढतीच्या प्रश्नावरून राजिनामा देत आहेत हें कसें ? मेनन यांच्याशी बढत्या देण्याच्या प्रश्नावर मतभेद झाल्यानें आपण राजिनामा देत आहोंत, असें आपण कुणालाहि सांगितलेलें नाहीं असें ते म्हणाले. 'स्टेटस्मन' पत्रानेंहि अशी हकिगत कां प्रसिद्ध करावी हें त्यांना समजेना. त्यांनीं हें मान्य केलें कीं नेहरूंना त्यानीं असें सांगितलें होतें कीं मेनन यांचेबरोबर जुळवून घेणें त्यांना स्वभावदृष्टया जमत नव्हतें. शिवाय वेळीं अवेळीं मेनन काम करीत. ज्यांना मुळींच महत्त्व नाहीं अशा प्रश्नासंबधी सल्लामसलतीसाठीं, आराम करीत असतांना ते बोलावून घेत व अशा तऱ्हेच्या परिस्थितींत अधिक काळ राहाण्याची त्यांची तयारी नव्हती मी मग थिमय्यांना माझा राजिनामा लिहून दिला व विनति केली, कीं जर त्यांचा राजिनामा स्वीकारला गेला तर माझाही स्वीकारण्यांत यावा. मी सांगितलें कीं मी जर हें केलें नाहीं तर लोकांना हें समजणार नाहीं, कीं माझ्या वरिष्ठाला माझ्यामुळें राजिनामा द्यावा लागला असतांना मी नोकरीत कसा राहूं शकतो.

त्यांना सत्य कधींच कळणार नाहीं. अशा परिस्थितींत हेंच योग्य होतें कीं जायचें असेल तर दोघांनीं नोकरींतून गेलें पाहिजे. थिमय्या म्हणाले कीं माझें म्हणणें त्यांना पटलें. प्रेम भाटीया यांनी ' टाईम्स ऑफ इंडिया ' मध्यें माझ्या राजिनाम्याची हकिगत जवळजवळ मी सांगितल्याप्रमाणेंच प्रसिद्ध केली व थिमय्यांनीं त्याचा इन्कार केला नाहीं.

मी त्याच दिवशीं दुसऱ्या कांहीं संबंधांत नेहरूंना भेटायला गेलों होतो. यावेळीं झालेल्या संभाषणांत नेहरूंनी मला सांगितलें कीं थिमय्या यांनीं, त्यांना भेटून मेनन यांच्याशी स्वभावभिन्नतेमुळें त्यांचें जमत नाहीं असें सांगितलें होतें. नेहरूंनी मला विचारलें कीं मेनन व थिमय्या यांच्यांत वितुष्ट यायला याखेरीज अन्य कांहीं कारणें असल्यास, तीं मला माहीत आहेत काय. परंतु मी या बाबतींत कांहींच प्रकाश टाकूं शकलों नाहीं नेहरू यांनीं मेननजवळ हा विषय काढला. मेनन यांनीं त्यांच्या परवानगी-वांचून नेहरूंना भेटल्याबद्दल, थिमय्यांना दोष दिला. थिमय्या यांनीं यानंतर लगेचच आपला राजिनामा यावेळीं लेखी स्वरुपांत मेननना डावलून नेहरूंकडे दिला. नेहरूंनी थिमय्यांना बोलावून घेतलें व राजिनामा देण्यांत त्यांनीं जें अनौचित्य दाखवलें होतें, त्याकडे त्यांचें लक्ष वेधलें. भारताला चीन व पाकिस्तानकडून धोका निर्माण झालेला असतांना, क्षुल्लक कारणावरून दिलेला राजिनामा त्यांनीं परत घ्यावा असें त्यांना सांगितलें व थिमय्यांनी राजिनामा परत घेतला. नंतर नेहरूंनीं लोकसभेंत थिमय्यांच्या या कृतीची निंदा केली व सेनानींनी अशा रितीनें मुलकी सत्तेला आव्हान देण्याबद्दल नापसंती व्यक्त केली. ते म्हणाले कीं लोकशाहींत मुलकी सत्ता हीच सर्वश्रेष्ठ राहिली पाहिजे. थिमय्या यांनी आधीं राजिनामा देऊन मग जो परत घेतला त्यामुळें त्यांची लोकप्रियता मुळींच अधिक वाढली नाहीं.

मी आतां माझ्या शत्रूंना चाळवलें होतें व ते माझ्यावर विरोधी प्रचारासाठीं लक्ष ठेवून होते. माझ्या विरुद्ध प्रचार करणाऱ्यांतील एक म्हणजे मुंबईहून प्रसिद्ध होणारे ' करंट ' हें इंग्रजी पत्र होय. त्यांनें माझ्या विरुद्ध सत्यापलाप करून हकिगती छापण्यास सुरुवात केली. सेनें-तील किंवा बाहेरील माझ्या विरोधकांपैकीं कुणीतरी यामागें होतें. मला जेव्हां

माझ्या मित्रानें विचारलें कीं 'करंट' पत्राचे संपादक डी. एफ्. कराका हे इतके हात धुवून माझ्यामागें कां लागले आहेत, तेव्हां मला एक गोष्ट आठवली. जेव्हां ईश्वरचंद्र विद्यासागर यांना कुणी सांगितलें कीं अमुक अमुक व्यक्ती ही सतत त्यांची निंदा करीत असते, तेव्हां त्यांनीं आश्चर्य प्रगट केलें व ते उद्गारले—'माझ्या विरुद्ध त्यांने असें कां करावें कळत नाहीं ? मी तर त्याच्या बाबतींत कांहींहि चांगलें केलेलें नाहीं !'

मी, थिमय्या, मेनन व नेहरू यांचेकडे निवेदन धाडलें कीं मी अथवा सरकारने 'करंट' वर माझ्याबद्दल खोटयानाटया गोष्टी छापल्याबद्दल फिर्याद करावी. नेहरू म्हणाले कीं, मी कोर्टकचेऱ्या करण्याचा प्रश्नच नाहीं व पुढें योग्य संधि येतांच ते स्वत: जाहीर रितीनें माझी बाजू मांडतील व बचाव करतील. मध्यंतरीच्या काळांत माझ्यावर हल्ले चालूच होते.

२६ ऑगस्ट १९५९ च्या अंकांत 'करंट' पत्रानें माझ्यावर खूपच दोषारोप केले. यांत ज्या अनेक गोष्टी लिहिल्या होत्या त्यांत असेंहि म्हटलें होतें कीं १९४८ मध्यें मला वॉशिंग्टनहून सरकारनें परत बोलावलें. हें असें नव्हतेंच. मी माझ्याच विनंतीवरून, नेहरूंच्या अनुज्ञेनें भारतांत परत आलों होतों; कारण मला काश्मीरच्या युद्धांत भाग घ्यावयाचा होता. या सर्व लिहिण्याचा भावार्थ असा होता कीं, मला छोटया पायदळी दलाचा कमांडर म्हणून मुळींच अनुभव नसतांना, मी एकदम ब्रिगेडचा कमांडर झालों होतों. खरें पहातां मी इन्फंट्री प्लॅटून व कंपनी यांवर कमांडर होतो व बटालियनचा कमांडर होण्याची संधि मात्र मला मिळालेली नव्हती. याला कारण सरकारी हुकुमच माझ्या आड आले होते. मला ही संधि मिळण्यापूर्वींच स्वतंत्र भारताचा पहिला लष्करी सल्लागार म्हणून वॉशिंग्टनच्या वकिलातींत कर्नल पदावर मला धाडण्यांत आलें. दुसऱ्या वेळीं मला जम्मू-काश्मीरच्या सेनेचा ताबा घेण्यासाठीं धाडण्यात आलें.

असेंहि म्हटलेलें होतें कीं मला जवळ जवळ प्रत्यक्ष युद्ध आघाडीचा कांहींच अनुभव नाहीं. हें खरें नव्हतें. सध्यांची जी पिढी भारतीय सेनेंत आहे, त्यांना युद्ध प्रत्यक्ष पहाण्याचे तीनच प्रसंग आले. वायव्य सरहद्द प्रांतांत उडलेल्या चकमकी, दुसऱ्या महायुद्धांतील लढाया व तिसरें काश्मीर मधील युद्ध. या तिन्हीं ठिकाणीं युद्धांत मी होतोंच.

लेखांत असें सांगण्यांत आलें होतें कीं मी पायदळ तुकडीचा कमांडर असा फक्त दोनच वर्षें होतों व हीं दोन्हीं वर्षें मी घरें बांधण्यांत खर्च केली होती. खरें पाहातां मी पायदळ डिव्हिजनचा चौतीस महिने कमांडर होतो व यातलें फक्त सातच महिने मी माझ्या सैनिकांची घरें बांधण्यांत खर्च केले होते. उरलेले सत्तावीस महिने मी नेहमींची लष्करी कर्तव्येंच करीत होतो व महत्त्वाच्या लष्करी शिक्षणांतच गुंतलेला होतो.

'करंट' पत्रानें असें लिहिलें होतें कीं माझी लेफ्टनंट जनरल म्हणून नुकतीच झालेली बढती ही जवळ जवळ बारा जनरलना डावलून झालेली होती. या सर्वांची नोकरींतील गुप्त नोंद व योग्यता माझ्यापेक्षां अधिक चांगली होती, हेंहि खोटें होतें. मी बरोबर परिस्थिती काय होती तें पूर्वीं तपशीलवार सादर केले आहे. या लेखांत चुकीची विधानें अनेक होतीं. मी 'पे-कमिशन'वर होतों असें म्हटलें होतें, परतु मी अशा कमिशनवर कधींच नव्हतो. अशी ही सर्व विधानें संपूर्णतया चुकीची होतीं.

थिमय्या यांनीं मेनन यांना एक टिपण धाडलें—याची प्रत अजून माझेपाशीं आहे—यांत त्यांनी लिहिलें होतें कीं 'करंट' मधील लेखांत सत्याचा पुष्कळच विपर्यास करण्यांत आलेला आहे व यापुढें माझी प्रतिष्ठा धोक्यांत आलेली आहे. थिमय्या यांनीं असें सुचवलें होतें कीं 'करंट'च्या संपादका-विरुद्ध योग्य ती कारवाई करण्याचा विचार सरकारनें करावा; कारण अशा-रितीनें ज्येष्ठ लष्करी अधिकाऱ्याची नालस्ती जर चालूं दिली तर त्यामुळें सेनादलाच्या लोकांवर व जनतेवरहि परिणाम होऊन सैनिकांचे नीतिधैर्यंच खचेल. त्यांनीं माझी बाजू मांडण्यासाठीं वृत्तपत्रांत निवेदन पाठविण्याची परवानगी मागितली होती. ही परवानगी कधींच मिळाली नाहीं. कारण नेहरूंनी सांगितलें कीं त्यांच्या एखाद्या मासिक वृत्तपत्र बैठकींत या मुद्यां-वर ते स्वतः माझा बचाव करतील.

हें वाचतांना वाचकांना मोठी गंमत वाटेल कीं 'करंट'चे संपादक कराका—ज्यांनी माझ्याविरुद्ध अनेक लेख आपल्या पत्रांत प्रसिद्ध केले होते,—त्यांनीच १३ फेब्रुवारी १९६० रोजीं मला पत्रानें कळविलें.—

'मला कालच आर्मी हेडक्वार्टर्सशी संबंधित असलेल्या एका ठिकाणाहून असें कळलें कीं, आम्ही 'करंट'च्या ३० डिसेंबर १९५९ च्या अंकांत

प्रसिद्ध केलेल्या 'ॲसिस फॉर दी आर्मी' या लेखांतील हकिगत ही चुकीची होती. विशेषत: तुमच्या संबंधी जो भाग होता तो चुकीचा होता... म्हणूनच तुम्हाला व्यक्तिश: लिहिण्याची संधि मी साधीत आहे. मी तुम्हांला असें कळवूं इच्छितो कीं झालेली चुक सुधारण्यासाठीं व होणाऱ्या चुकांची भरपाई करण्यासाठीं आम्ही सदव तयार आहोंत. नेमकी चूक कुठें कुठें झाली, हें आपण आमच्या निदर्शनास आणून द्याल तर मी आपला फार आभारी होईन... जर आमच्या वार्ताहराच्या अतिउत्साहामुळें आमच्या हातून चूक झाली तर संपादक या नात्यानें अशा चुकांचें परिमार्जन करणें हें माझें कर्तव्य आहे.

'माझ्या प्रामाणिकपणाविषयीं आपण आपले प्रमुख जनरल थिमय्या यांचेकडे वाटल्यास चौकशी करूं शकता. त्यांना मी या पत्राची एक प्रत पाठविण्याची मुभा घेत आहे'

(थिमय्या यांनी २४ फेब्रुवारी १९६० रोजीं मला अधिकृतरित्या कळवलें कीं कराकांच्या प्रामाणिकपणाची खात्री ते देऊं शकत नाहींत. कराका यांना नेमकें काय म्हणायचें होतें हेंच त्यांना समजलेलें नव्हतें.)

कराका यांनीं हें पत्र मला लिहिण्यापूर्वीं २६ ऑगस्ट, १८ नोव्हेंबर व ३० डिसेंबर १९५९ या 'करंट' साप्ताहिकाच्या ३ अंकांत माझेविरुद्ध वाटेल तसे आरोप करणारे लेख प्रसिद्ध झालेले होते.

'विज्ञान भवनांत' नवी दिल्ली येथें १४ फेब्रुवारी १९६० रोजीं वृत्तपत्रकारांच्या बैठकींत नेहरूंनी सांगितलें—

'कांहीं दिवसांपूर्वी माझें लक्ष 'करंट' पत्रांत आपले एक जेष्ठ जनरल लेफ्ट. जनरल बी. एम्. कौल यांचेवर हल्ला करणारे जे तीन लेखांक प्रसिद्ध झाले आहेत त्याकडे वेधण्यांत आलें. अशा तऱ्हेच्या व्यक्तिविरुद्ध निंदात्मक आरोप करणें हें अत्यंत अपायकारक व आक्षेपार्ह आहे. जेव्हां चुकीच्या घटना सांगून हें केलें जातें, तेव्हां तर तें अत्यंत वाईट होय. जनरल कौल हे आपले एक अत्यंत कार्यक्षम व अतिशय उत्साही असे सेनानी आहेत. आपल्या संरक्षण दलाविरुद्ध शक्यतों कुणी राजकीय विधानें करूं नयेत, आरोप प्रत्यारोप करूं नयेत, अशी माझी इच्छा आहे. त्यांना मिळालेली बढती ही दुसऱ्यांवर

अन्याय करणारी आहे, त्यांना प्रत्यक्ष युद्धावरील कामगिरीचा अनुभव नाहीं, असा आरोप करण्यांत आला आहे. माझें लक्ष याकडे वेधण्यांत आलें, तेव्हां मी चकीत झालों. हा माणूस असा आहे कीं त्यांना प्रत्यक्ष लढाईचा भरपूर अनुभव आहे. ब्रह्मदेशांतच केवळ नव्हे, तर गेल्या महायुद्धांतहि, पूर्वीच्या वायव्य सरहद्द प्रांतांत व नंतर काश्मीरच्या लढाईत, वॉशिंग्टन येथें कौल हेच आपले लष्करी सल्लागार होते. काश्मीरमध्यें जेव्हां गडबड उडाली, तेव्हां ऐषआरामाची कामगिरी सोडून त्यांनी आघाडीवर जाण्यासाठीं प्रयत्न केला व आम्ही जेव्हां त्यांना परवानगी दिली, तेव्हां ते परत आले व त्यांनीं कमांडर म्हणून काम केलें नाहीं असा आरोप करण्यांत आला आहे. त्यांनीं कमांडर म्हणून काम केलेलें आहे–प्लॅटून, कंपनी, ब्रिगेड आणि नंतर डिव्हिजनचे कमांडर म्हणून. ज्याला प्रत्यक्षांत कांहींही आधार नाहीं अशी विधानें करण्यांत आलेलीं आहेत...'

जेव्हां नेहरूंना एका वृत्तप्रतिनिधीनें या बैठकींत विचारलें कीं मला इतरांवर अन्याय करून बढती देण्यांत आली हें खरें काय, तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं त्यांनी पार्लमेंटमध्यें सांगितलेंच आहे कीं सैन्यांत वरच्या श्रेणींतील बढत्या, या अनुक्रमानें मिळत नसतात. असें केलें तर सैन्य बिनडोक माणसांचेंच होईल. हुषार असो वा मूर्ख असो सर्वांनाच बढती दिली तर हें होईल, म्हणूनच असे करीत नाहींत. त्यांनी सांगितलें कीं गुणवत्तेवर भर दिला जातो. सैन्यांत बढती मिळते ती केवळ गुणवत्तेवर. जसजसा माणूस वर वर जातो तसतशा या कसोटया अधिकाधिक कडक होत जातात.

ब्रिटिश, अमेरिकन वा रशियन सैन्यांतही इतरांप्रमाणेंच उच्च पदावरील बढत्या या गुण पाहून दिल्या जातात. फक्त नोकरींतील जेष्ठता पाहात नाहींत. १९६४ मध्यें जनरल जॉन्सन (यांचा अध्यक्ष जॉन्सनशी कांहींही संबंध नाहीं) हे अमेरिकन सेनाप्रमुख झाले, तेव्हां चाळीस अधिकारी–यांत बारा जनरल होते–यांना मागें सारलें होतें. मॅक्स्वेल टेलर हे व्हिएतनाममध्यें अमेरिकेचे वकील म्हणून गेल्यावार, त्यांचे जागीं जनरल व्हीलर हे 'जॉईंट चीफस् ऑफ जनरल स्टॉफ'चे अध्यक्ष म्हणून आले ते डझनभराहून अधिक जनरलनां खालीं ढकलून. या दोन्ही प्रसंगी

कुणीहि आरडाओरडा केला नाहीं. कारण अशा तऱ्हेनें कांहींना डावलून बढत्या देणें ही गोष्ट अमेरिकेंत स्वीकारली गेलेली आहे. (ऑचिनलेक व माउंटबॅटन यांनीं अनेक जणांना खालीं ढकलून त्यांच्या काळांत बढत्या घेतलेल्या आहेत.) अशा बढत्यांनींच हुषार सैनिक हा वर वर चढत जातो. १९५९ ते ६२ या कालखंडांत ही गोष्ट भारतांत स्वीकारली गेलेली नव्हती. (यानंतर मात्र अशा तऱ्हेच्या बढत्या देणें, ही गोष्ट स्वाभाविक रीतीनेंच स्वीकारण्यांत आलेली आहे. कुठल्याहि प्रकारच्या राज्यसत्तेंत वरच्या श्रेणी या निवड करूनच भरण्यांत येतात व नोकरींतील जेष्ठत्वानें ही गोष्ट ठरत नाहीं.)

नेहरूंनीं पुढें सांगितलें कीं, माझी ही विवक्षित नेमणूक, ही सेना-प्रमुखांनीं शिफारस केलेल्या तीन मेजर जनरल मधून केलेली आहे. यापैकीं दोघांना निवडण्यांत आलें व त्यांतले एक कौल होते. आतां तिसऱ्यांनाहि (थ्यानी) बढती देऊन गाझा येथील आपल्या तुकडीचे कमांडर म्हणून धाडण्यांत येत आहे. (बढतीसाठीं थ्यानी हें कां योग्य नव्हतें हें मी इतरत्र स्पष्ट केलेलें आहेंच.) नेहरू अखेरीस म्हणाले–

'कौल यांना एक नवीनच काम देण्यांत आलें होतें. आपल्या सैनिकांना राहण्यासाठीं घरें उपलब्ध करून देण्याचें हें काम होतें. ज्या बिचाऱ्यांनीं काश्मीर किंवा नागा टेकडया येथें खूप वर्षें काढली, त्यांना राहाण्यासाठीं घरें नव्हतीं व यामुळें त्यांना कौटुंबिक जीवनहि मिळत नव्हतें... म्हणून असें ठरविण्यांत आलें कीं... सैनिकांनाच त्यांचीं घरें बांधण्यास सांगावें. जनरल कौल यांना या कामगिरीवर नेमण्यांत आलें. सैनिकांना यासाठीं मुळीच सक्ति करण्यांत आली नाहीं. स्वच्छेनें करावयाचें हें काम होतें... फार उत्तम काम होतें! आतां असा प्रचार करण्यांत येतो आहे, कीं ही बांधलेलीं घरें गळतात व तीं चांगलीहि नाहींत. हा सर्व मूर्खपणा आहे. मी स्वतः हीं घरें पाहिलीं आहेत... असें सांगितलें जातें कीं यामुळें सैनिकांच्या शिक्षणाची आबाळ झाली. हें देखील साफ चूक आहे... आपल्याच माणसांना सतत खालीं ओढण्याची जी संवय आपल्या देशांत लोकांना लागली आहे ती पाहून मी खरोखरच सर्द होतो. परंतु हें करण्यांतच आपल्याला धन्यता वाटते.'

तिबेट जिकल्यानंतर चिन्यांनीं जेव्हां तेथल्या जनतेला नवी दिक्षा देण्याचें ठरवलें, तेव्हां त्यांच्या प्रयत्नांना प्रखर विरोध सुरू झाला. चिन्यांना वाटलें, कीं दलाई लामांना ल्हासा येथून पेकिंगला हलवलें, तर आपली साम्यवादी धर्मसत्यें तिबेटांत रुजवण्याच्या उद्योगांत सुकरता येईल. तिबेटच्या वरिष्ठांना त्यांनीं त्याप्रमाणें सूचित करण्यास सुरुवात केली. दलाई लामांच्या अनुयायांना अशी भीति वाटूं लागली, कीं जर दलाई लामा असेच ल्हासांत राहिले तर त्यांच्या जिवाला धोका संभवतो.

हल्लीचे दलाई लामा हे ओळीनें चौदावे लामा होत. त्यांचा जन्म ६ जून १९३५ रोजीं झाला. चिन्यांनीं तिबेट गिळंकृत करण्यापूर्वी, त्यांची स... ११० प्रदेशावर होती. त्यांचें संपूर्ण नांव आहे–जेत्सुम जामपल न्वांग लोब्संग य्हिश्ची तेन्झिग गियस्तो सिसु नवांगुर त्स्यंप गेल्सन भापल धेपल सँगो.

मे १९५१ मध्यें ज्या पद्धतीनें चीननें तिबेटचा कबजा केला व दलाई लामांवर करार करण्यासाठीं दडपण आणलें, त्याबद्दल नेहरूंना वाईट वाटलें होतें. परंतु त्यावेळीं त्यांच्या हातीं करण्यासारखें कांहीहि नव्हतें. म्हणून त्यांनीं त्याच्या खालोखालचा त्यांतल्या त्यांत उत्तम मार्ग पत्कारला. चीननें तिबेटला स्वायत्त प्रदेशाचा दर्जा द्यावा, यासाठीं त्यांनीं चीनचें मन वळवण्याचा प्रयत्न सुरू केला. १९५४ मध्यें चौ हे दिल्लींत त्यांना भेटले. चौ यांनीं नेहरूंना सांगितलें, कीं तिबेट हा कांहीं चीनचा प्रांत नाहीं. तो स्वायत्त प्रदेश आहे व चीनची त्या प्रदेशांत तांतडीनें सुधारणा घडवण्याची वा त्यांच्या धर्मांत व जीवन पद्धतींत हस्तक्षेप करण्याची इच्छा नाहीं. चौ यांनीं पुढें असे सांगितलें, कीं तिबेटांत समाजवाद रुजायला पन्नास वर्षें लागतील !

मध्यंतरी चीनच्या ल्हासा येथील लष्करी कमांडरनें, दलाई लामा व त्यांचे अंतेवासीयांना खान्याचें निमंत्रण दिलें व बरोबर रक्षक न आणतां यावें असें सांगितलें. जेव्हां दलाई लामांच्या मित्रांना हें कळलें, तेव्हां त्यांना भीति वाटली, कीं दलाई लामांना पेकिंगला पळविण्याचा हा डाव दिसतो. त्यांनी गुप्त बैठकींत असें ठरवलें, कीं दलाई लामा यांनीं वेळ न गमावतां ल्हासा सोडावें व भारतांत आश्रयाला जावें. हें प्रत्यक्षांत उतरवणें

सोपें नव्हतें. ही गोष्ट अत्यंत गुप्त राहणें प्रथम आवश्यक होते. दुसरी गोष्ट म्हणजे जेव्हां दलाई लामा व त्यांचा परिवार हा आपापलें सामान-सुमान घेऊन ल्हासांतून निघेल तेव्हां त्यांचा हा तांडा सरहद्दीवर पहारा करणाऱ्या चिन्यांना लांबूनहि दिसण्याची शक्यता होती आणि मुख्य म्हणजे हा प्रवास म्हणजे एक मोठेंच शारीरिक श्रमांचें काम होतें.

सुमारे शंभर सशस्त्र घोडेस्वार घेऊन, दलाई लामा यांनीं आपल्या कुटुंबियांसह १९५९ मध्यें एका पहाटें ल्हासा सोडलें. पाठलाग करूं पाहणाऱ्या चिन्यांचा मुकाबला करण्यासाठीं त्यांनीं मागेंहि सशस्त्रदल ठेवलें होतें. या दलावर चिन्यांनीं हल्ला केला. परंतु दलाई लामा पुरेसे दूर जाईपर्यंत, त्यांना या दलानें रोखून धरलें. (दलाई लामा निसटले तेव्हां तिबेटमध्यें ५०,००० चिनी होते.) चिन्यांची शिकार, त्यांच्या हाताच्या बोटांतून अशा रीतीनें निसटली. दलाई लामा चोटांग मो या नेफांतील गांवामार्गें भारतांत मार्च १९५९ मध्यें दाखल झाले. चिनी संतापले. दलाई लामा निघून गेलेले असल्यानें, आतां त्यांनीं पद्धतशीरपणें त्याची जनमानसांतील प्रतिमा नष्ट करण्यास सुरुवात केली. चिन्यांनीं तिबेटांत उघडलेल्या शाळांतून त्यांनीं मुलांना लामाचे अधिकार कसे पायदळीं घालावें हें शिकवण्यास सुरुवात केली. आणिबाणीच्या वेळीं तिबेटी लोकांना वाऱ्यावर सोडून दलाई लामा निघून गेले, असा आरोप करून चिनी सांगूं लागले कीं, जर दलाई लामा हे परमेश्वराचे अंश आहेत, तर त्यांनीं कुणाला घाबरून पळून कां जावें ? सर्वांना समान संधि देणारा चीन हा एक महान् देश आहे, ही गोष्ट तिबेटी लोकांच्या मनावर बिंबवण्यास त्यांनीं सुरुवात केली. अशा या महान् चीनशीं एकरूप व्हा असें सांगण्यांत येऊं लागलें. तिबेटी जनतेला आतां फक्त 'चीनचें प्रजासत्ताक' हेंच एक आशास्थान आहे व दलाई लामांना आतां विसरणें चांगलें, अशी लोकांची खात्री पटवण्याचा प्रयत्न चिन्यांनीं सुरूं केला.

चिन्यांनीं त्यांना माहीत असलेल्या सर्व खिंडी, रक्षकांकरवी रोखलेल्या होत्या. हजारों तिबेटी लोक भारताकडे आश्रयासाठीं आले व त्यांनीं चिन्यांना चुकवण्यासाठीं कठीणांतल्या कठीण खिंडींतून मार्ग पत्करले. रात्रीच बहुधा ते पुढें सरकत असत व अंधारांत भूप्रदेशाच्या खुणा त्यांना

ओळखूंहि येत नसत. त्यांच्याजवळ नकाशे नव्हतें. ओढ्यांच्या मार्गाचाच मार्गदर्शनासाठीं त्यांनीं उपयोग केला. अनेक वादळांना तोंड देत, कमरेपर्यंत बर्फांतून वाट तुडवीत व असंख्य शारीरिक यातना व हवामानामुळें निर्माण झालेले कष्ट सोशीत, ऐन हिवाळ्यांत ही तिबेटी जनता 'नेफा' मध्यें अनेक ठिकाणांहून भारतांत येऊं लागली. चिन्यांनीं आपल्याला इशारा दिला कीं जे तिबेटी निर्वासीत लोंगजू जवळ व इतरत्र आपल्या प्रदेशांत आले आहेत, त्यांना परत तिबेटांत धाडण्यांत यावें. चिन्यांचें म्हणणें होतें, कीं ही सर्व बहुसंख्य खंपा जमात आहे. आपण उत्तर दिलें कीं त्यांनीं या देशांत आश्रय मागितलेला आहे यांना परत पाठवण्याचा प्रश्नच निर्माण होत नाहीं.

पाठोपाठ लवकरच चिन्यांनीं नेफा सरहद्दीवरून लोंगजू नजिक भारतांत घुसणें सुरू केलें. नेहरूंना लोकसभेंत व अन्यत्र यासंबंधीं प्रश्न विचारण्यांत आले. या काळांत नेहरूंनीं मला लोंगजू संबंधांत कांहीं प्रश्न विचारले. मला व्यक्तिशः यासंबंधी कांहींहि माहिती नसल्यानें मी कांहीं प्रकाश टाकूं शकलों नाहीं. परंतु मी तेथें जाऊन संपूर्ण माहिती आणण्याची सिद्धता दाखवली. नेहरू म्हणाले कीं, मी हें केलें तर त्यांना आनंदच होईल. त्यांनीं पुढें सांगितलें कीं, ज्या तिबेटी लोकांनीं भारताकडे संरक्षणासाठीं धांव घेतली आहे, त्यांचें भवितव्य निश्चित नाहीं. त्यांच्यासंबंधीं नेहरूंना कळवळा होता. म्हणूनच त्यांनीं मला सांगितलें, कीं लोंगजू भागांत जाऊन याच; परंतु येतांना वाटेंत मिसामारी येथें निर्वासितांची छावणी पडली आहे, तिला भेट देऊन त्यांचें पुनर्वसन कसें करतां येईल हेंहि पाहून या.

मी दुसऱ्याच दिवशीं नेफा, लोंगजू व नागालँड विभागांत जाण्यासाठीं थिमय्यांची परवानगी मागितली. मी 'क्वार्टर मास्टर जनरल' या नात्यानें ही पाहणी करणार होतो.

मी दिल्लीहून विमानानें निघालों व मिसामारी येथील तिबेटी छावणीला भेट दिली. तिथें १४० स्त्रिया व ३००० पुरुष होते व यांतच तिबेटी मंत्रिमंडळाचे एक मंत्रि–काशग सामील होते. मला तिथें अशी माहिती मिळाली, कीं या लोकांनीं प्रथम चिन्यांनीं दिलेलीं कामें करण्याचें नाकारलें. कारण त्यांना तें कमी दर्जाचें वाटलें. परंतु नंतर त्यांनीं तेंहि पत्करलें. हे चांगले आडदांड पुरुष होते. मनानें साधे होते. विनयशील होते. हातांनीं

नमस्कार करायच्या ऐवजी ते जिभा बाहेर काढून, स्वागत करीत. दिवसभरांत किती चालून झालें यावरून ते अंतर मोजीत असत व सूर्याच्या सावलीवरून दिशा ठरवीत असत. १२,००० तिबेटी लोकांनीं आपलें घरदार सोडलें होतें व ते भारतांत येत होते. कारण एकतर त्यांचा चिनी राजवटीवर विश्वास नव्हता व दुसरी गोष्ट म्हणजे चिन्यांनी त्यांच्यावर बरेच अत्याचार केले होते. तिबेटांतून बाहेर पडण्याचे मार्ग चिन्यांनीं रोखलेले असल्यानें, जर पुरेशीं शस्त्रास्त्रें व दारुगोळा मिळाला, तर आणखीहि पुष्कळजण तिबेटांतून बाहेर पडण्याची शक्यता होती.

मिसामारीहून मी नागालँडमध्यें गेलों. या प्रदेशाची लोकसंख्या ४,५०,००० आहे व क्षेत्रफळ ६,६०० चौरस मैल आहे. तीन जिल्हे आहेत. कोहिमा, मोकॉकचाँग व च्युसंग जमाती खूप आहेत. यापैकीं प्रमुख म्हणजे एओ, अंगामि, लोथा, कोन्थक व सेमा. मुख्य धंदा शेती असून, त्यांचे स्वतःचे कायदेकानू आहेत. ऋतुमानाचे उत्सव ते साजरे करतात. बहुसंख्य जमाती या भुताखेतांवर विश्वास ठेवणाऱ्या असून ते आपल्या वंशजांची पूजा करतात. कोहिमा व मोकॉकचाँग जिल्ह्यांत तीस टक्के जनता बाटून ख्रिश्चन झालेली आहे.

नागा लोक हे कुणाच्या शासकीय अधिकाराखालीं काटेकोर अर्थानें कधींच नव्हते. फाळणीनंतर म्हणूनच आपण जेव्हां त्यांना भारताचे नागरिक समजूं लागलों, तेव्हां याचा त्यांना राग येत असे. आपण तिथें त्यांच्या प्रगतीसाठीं जे प्रकल्प सुरूं केले, त्यामुळें संशय बळावलेले हे लोक प्रतिकूल झाले व त्याचें पर्यवसान सशस्त्र बंडांत झालें. त्यांची घोषणा होती स्वतंत्र नागालँड ! सुशिक्षित असे नागा स्वातंत्र्यासाठीं खूप दिवसांपासून प्रयत्न करीत होतेच १९२९ सालीं सर जॉन सायमन यांचेपुढें, ही स्वातंत्र्याची मागणी त्यांनी केली होती. या संबंधांत गांधीजींनाहि ते भेटले होते.

आपल्या विरुद्ध त्यांनीं केलेल्या बंडाचा नेता फिझो होता. दुसऱ्या महायुद्धांतील आझाद हिंद सेनेंत, हा सुभेदार होता. गनिमी काव्यानें लढून प्रदेश स्वतंत्र करण्याचें तंत्र त्याला अवगत होतें. १९५५ मध्यें त्यांनीं भारताविरुद्ध द्वेषाची मोहीमच उघडली व च्युंसग जिल्ह्यांत गडबड सुरूं झाली. १९५५ सालीं समजावणीचे प्रयत्न फसल्यावर त्यांच्याविरुद्ध

लष्करी कारवाई करावी लागली. आपल्याला हें ठाऊक होतें, कीं काटेकोर अशा रुढ अर्थानें ते आपले शत्रू नाहींत तर वाट चुकलेले आपलेच देश-बांधव ते आहेत व त्यांची मनें जिंकून त्यांना परत आपल्यांत आणण्याची आपली इच्छा आहे.

१९५७ मध्यें जेव्हां सर्व जमातींच्या प्रतिनिधींची पहिली नागा परिषद भरली, तेव्हां बहुमतानें भारतांतच राहाण्याचें त्यांनीं मतदानानें ठरवलें. २२ ऑक्टोबर १९५९ ला दुसरी नागा परिषद झाली व एकमतानें भारतांतच रहाण्याचें ठरविण्यांत आलें. ही दुसरी नागा परिषद झाल्यानंतर मी लगेंचच कोहियांत गेलो होतो. तिथें मी मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांना भेटलों व तेथील संरक्षण व्यवस्था सर्वत्र फिरून पाहिली. दुसऱ्या महायुद्धांत या शहराचा जपान्यांपासून बचाव करतांना ज्यांनीं आपले प्राण गमावले, त्यांच्या दफनभूमीला भेट देऊन मी त्यांच्या कबरीवरील हलवून सोडणारे स्मरणलेख वाचले. मणिपूरची राजधानी इम्फालाला मी भेट दिली. या सुंदर राजधानींत संगीत व नृत्य हीच लोकांच्या जीवनाची प्रमुख जीवन-प्रयोजनें दिसली. सुरम्य टेकड्या व सरोवरें या निसर्गानें पुरवलेल्या पार्श्व-भूमीवर, आकर्षक चेहऱ्याच्या, रंगीबेरंगी वेषांतील मुलींची जी मनोहर नृत्यें इथें पाहावयास मिळतात, तीं कितीहि पाहिली तरी समाधान होऊं नये अशी असतात. मी मोकॉकचाँग व च्युंसंग येथेंहि गेलों. मोकॉकचाँग हें एका टेकडीच्या माथ्यावर वसलेलें आहे. ढगांनीं हा माथा झांकून गेलेला असल्यानें माझें हेलिकॅप्टर उतरण्याची जागा नीट हेरूं शकलें नाहीं व जवळच्या नाल्यांत आम्हांला जवळ जवळ सक्तीनें उतरावें लागलें. मी घांसपाणी हे खेडे व किडीमो व चाकबामा ही आपल्याशीं मैत्री न बाळग-णारी खेडींहि पाहून आलों.

नागालँड मधून फिरल्यानंतर तेथील राजकीय प्रश्न लष्करी उपायांनीं सुटेल कीं नाहीं, या विषयीं मी साशंक झालों. आपलें नागालँड संबंधीचें धोरण प्रशंसापूर्ण आहे; परंतु ज्याच्यावर हें कार्यान्वित करण्याची जबाब-दारी आहे, त्यांनीं तें काम इमानेंइतबारें केलें पाहिजे आपण जर नागांना, त्यांची उपासमार करून, किंवा त्यांची कोंडी करून, किंवा खेड्यांना गराडा देऊन, त्यांची शेतें नाहींशी करून अशा रितीनें त्यांना धडा

शिकवण्याचें धोरण अवलंबिलें, तर त्यांच्या मनांत आपल्याविषयीं असलेलें शत्रुत्व वाढेल. कमी होणार नाहीं. आपण सरहद्दीवरील या स्वाभिमानी व शूर जमातींना ताब्यांत घेण्याचा प्रयत्न केला तर या भागांत, जे आपले भावी शत्रू आहेत, त्यांना सतत मदत करणारे लोक आपण इथें निर्माण करूं व सरहद्दीवर मोठाच प्रश्न निर्माण होईल. वाटाघाटी करणें व त्यांचें मन वळविणें हाच एक परिस्थिति सुधारण्याचा उपाय आहे. बळाच्या उपयोगानें देशभक्त नागरिक निर्माण करण्याचा प्रयत्न कुठेंच कधीं सफल होत नाहीं.

नागालॅंड मधून मी नेफाला गेलों. भूतान, तिबेट व ब्रह्मदेश यांनीं हा भाग वेढलेला आहे. क्षेत्रफळ २५,००० चौरस मैल आहे व लोकसंख्या ५,००,००० आहे. नागालँडशीं या भागाचें बऱ्याच बाबतींत साम्य आहे. नेफांत ५ जिल्हे आहेत. कामेंग, सुबनसिरी, सिआंग, लोहित व तिरप. खेड्यावर अधिकारी असतो त्याला गाम म्हणतात. (गाम म्हणजे खेड्यांतला वयोवृद्ध माणूस. हे कांहीं सरकारी नोकर नसतात.) या गाम मंडळींना सरकारनें एक शिफारसपत्र व लाल रंगाचा कोट दिला आहे. त्यांना सरकारी मान्यता व अधिकार असल्याचीं हीं निदर्शकें आहेत. मोठी सुखी, स्वातंत्र्यप्रेमी व जमातीचीं अभिमानी अशी हीं माणसें आहेत. साधी, सरळ, प्रामाणिक, बोललेल्या शब्दाला जागणारी अशी ही मंडळी आहेत. त्यांच्या जमिनींत वा स्त्रियांच्या बाबतींत कुणी हस्तक्षेप केला, तर जोराचा प्रतिकार हे करतात. यांचे मुख्य अन्न भात होय. भाताबरोबर तिखट व मीठ, कधींकधीं भाजलेले मासे व कंदमुळें आणि बांबूचे कोवळे कोंब जेवणांत असतात. मांस व दूध हीं दुर्मिळ. अंडीं व कोंबड्याहि मिळत नाहींत, कारण हीं बहुधा धार्मिक कृत्यांना वापरतात. तांदुळापासून किंवा ज्वारी-नाचणी पासून तयार केलेली दारू ते पितात. जयाती नृत्याचें वेळीं स्त्री-पुरुष फेर धरून गाणीं गातात. जंगलें, नद्या हीं आपल्या मालकीचीं आहेत, असा वन्य जमातीचा आग्रह यांच्या ठिकाणीं आढळतो. सूर्य-चंद्राची (दोनी पल्लो) ते उपासना करतात व यांनाच ते सर्व शक्तिमान् समजतात.

मी येथून बलाँग येथें गेलों. मला याची मुळींच कल्पनाहि नव्हती, कीं

जवळ जवळ दोन वर्षांतच मी इथें धोक्याच्या परिस्थितींत पुनः येणार आहे. तिथें पोहोंचतांच नेफांतील पद्धतीनुसार मला एक स्कार्फ देण्यांत आला. येथून मी दिग्बोई, टुटिंग व माकहुका येथे गेलों. अलाँग येथें मला तेथले राजकीय अधिकारी हळदीपूर भेटले. त्यांनीं आमच्या विमानांत आवश्यक तें जळण मोठ्या हिकमतीनें भरलें ..कारण इथें जळण भरण्याची कांहींच सोय नव्हती. या भागांत सूर्य लवकर मावळतो व यावेळीं दुपार उतरलेली होती, म्हणून आमचा वैमानिक फ्लाईट लेफ्टनंट जग-जीतसिंग यानें सुचवलें कीं आम्ही लगेच पुढला प्रवास सुरू करून झेरो या ठिकाणीं जावें. आम्ही जेव्हां तेथून उडालों तेव्हां वैमानिकाच्या लक्षांत आलें. कीं सूर्याच्या दिशेनें आम्ही जात असल्यानें डोळे दिपून, त्याला समोरचें दिसत नव्हतें त्याच्या बरोबरचे नकाशे हे देखील चुकीचें असल्यानें थोड्या वेळानें त्याला वाटलें कीं मार्ग चुकतच आहे. तो मार्गाची शोधाशोध करीत असतांनाच सूर्य मावळला. आतां जर झेरो हें ठिकाण सांपडलें नाहीं व गडद अंधार पडल्यावर आम्ही उतरण्याचा प्रयत्न केला, तर आंधळ्या वटवाघळासारखे आम्हीं सर्व कोसळून पडूं, हें आम्हांला सर्वांना माहीत होतें. अॅलाँगला परतण्यासाठीं पुरेसे जळण नव्हतें, कीं वेळ नव्हता. अंधार पडलेल्या अवस्थेंत आम्ही धडपडत असतांना, दाट जंगलांत आम्हांला थोडी सपाट भूमी आढळली. आम्ही डोळे मिटून त्या जागेवर उतरलो व तेंच हें गांव निघालें !

माजा ते लोंगजू हा माझा प्रवास सांगण्यापूर्वी, आम्ही लोंगजू येथील ठाणें त्या वर्षाच्या सुरवातीलाच कसें बसवले व तें सोडून माजापर्यंत मागें कसे आलों हें मला सांगितलें पाहिजे.

कॅप्टन अधिकारी यांच्या नेतृत्वाखालीं आसाम रायफल्सची एक छोटी तुकडी आपण लोंगजू भागांत पाठवून, त्यांना लोंगजू येथें आपलें लष्करी ठाणें स्थापण्यास सांगितलें. लोंगजू हा आपला प्रदेश असतांना चिनी तो त्यांचा सांगत होते. अधिकारी यांचेबरोबर एक लाल कोट देण्यांत आला होता. लोंगजू येथील जो आदरणीय गांवकरी असेल त्याची 'गाँव बरा' (गांव प्रमुख) म्हणून नेमणूक करा असें अधिकारी यांना सांगण्यांत आलें होतें. लोंगजूवर आपला अधिकार आहे हें सिद्ध करण्यासाठीं हें

सिद्धता : २०१



पंडित नेहरू व कौल यांच्या दोन्ही कन्या

करावयाचें होतें. कॅप्टन अधिकारी यांनीं आपली कामगिरी केली व आपले कांहीं रक्षक आसपासच्या प्रदेशाची टेहळणी करण्यासाठीं पाठवले. चिन्यांच्या जेव्हां हें कानावर गेलें कीं लोंगजू येथें आपण 'गाँव बरा' नेमला आहे, व जेव्हां त्यांच्या टेहळयांनीं मिगिथून या लोंगजू जवळच्या खेडयांतून आपले टेहळे पाहिले, तेव्हां त्यांचा सशय अकारण बळावला. त्यांनीं लोंगजू भागांत आपला सैनिकी पहारा वाढवला त्यांनीं हें करतांच आपणहि तेंच केलें. नंतर एकाएकीं लोंगजू येथील आपल्या ठाण्यांवर चिन्यांनीं हल्ला केला व त्याचा कबजा केला. ऑगस्ट १९५९ मधली ही घटना आहे.

जेव्हां अधिकारी यांना अपेंडिसायटीस आजारामुळें तेथून काढून घेण्यांत आलें व त्यांची जागा कॅप्टन मित्रा यांनीं घेतली, तेव्हां त्यांना लोंगजू परत घेण्यासाठीं पाठवण्यांत आलें. पुरेशी सामुग्री नसतांना हें करणें शक्य नव्हतें. या शूर अधिकाऱ्यानें अशाहि स्थितींत लोंगजू पासून दक्षिणेकडे ६ मैलांवर माजा या ठिणाणीं आपलें ठाणें निर्माण केलें. (माजा तें लोंगजू हें अंतर आकाशक्षेपेनें केवळ ३ मैलच होतें.)

झेरी येथून मी लिमेकिंग येथें गेलों. दोन उंच पर्वत रांगांत सुबनसिरी नदीच्या कांठावर हें लिमेकिंग आहे. अगदीं सर्व बाजूंनीं मैलोगणतीं वेगळा पडलेला असा हा भाग आहे.

या ठिकाणापासून पुढें जायला कोणतेंच वाहन नव्हतें. पायींच जाणें भाग होतें. आमचें सर्व हमाल हे थागिन होतें. वाटाडयाचें नांव होतें तायो व तोही थागिन होता. फटीसारखे डोळे, साधा, प्रामाणिक व आनंदी. थागिनांचा देवांवर विश्वास नसला तरी ते अंधश्रद्धाळू होते. चेटूक काढणाऱ्या वैदुवर त्यांचा विश्वास होता. सापांना ते कधीं मारीत नसत. किंवा साप चावला तर त्यावर औषधोपचार करीत नसत. तायो हा देखणा, काटक, चपळ व प्रदेश फिरलेला होता त्याला हिंदुस्तानी चांगलें येत होतें व नेफाचा कानाकोपरा त्याला मुखोद्गत होता. तो अवघड मार्गानेंहि झपाटयानें चाले. डोंगर चढतांना, या पठाराकडून आलेल्या माणसांना धाप कां लागते हें त्याला कळत नसे.

लिमेकिंग येथें थोडा वेळ थांबून आम्ही दुपारीं पुढें निघालों. रस्ता घातुक होता. बरोबर ब्रिगेडियर गुराया व कॅप्टन मित्रा होते. लोंगजू

भागांत यापूर्वीं कुणीहि ज्येष्ठ अधिकारी आलेला नव्हता. आम्ही एका अरुंद रस्त्यानें खालीं उतरून नदीवरील झुलत्या पुलापाशीं आलों. हा पूल ओंडक्यांनीं तयार केलेला होता. तीन तास खडतर वाटचाल केल्यानंतर व दाट जंगलें तुडवल्यानंतर, अंधार पडल्यावर, आम्ही पहिल्या मुक्कामावर आलों. आमचें अंग चांगलेंच ठणकत होतें व घशाला कोरड पडली होती. रात्रभर विश्रांती घेऊन सकाळीं आम्हीं पुढें चालूं लागलों. पुढचा रस्ता तर अधिकाधिकच बिकट दिसूं लागला. शुष्क नदीच्या पात्रांतून दगडगोटयांवरून व प्रचंड शीळा ओलांडीत सारखे चालणें मोठें जिकीरीचे होतें. पुढची जंगलेंहि अधिक दाट होतीं. या मार्गावर कठीण चढ होते व यांतले कांहीं तर प्रचंड दगडावर होतें. त्यावर शिडया सोडलेल्या होत्या. या शिडयांवरून चढणें हें एक दिव्य होतें. कारण या शिडया नुसत्या लोंबकळत ठेवलेल्या होत्या व सतत वापरानें त्या कशा तरी जीव धरून होत्या. आमचा वायरलेस सेट घेऊन चढणारा हमाल अशा एका शिडीवरून चढतांना, पन्नास फूट खालीं नदीच्या पात्रांत पडला. नशिबानें तो वाळूचा जो एकुलता एक पट्टा होता त्यावर पडला व थोडेंफार खरचटण्यावर निभावलें.

जेव्हां नेफांत प्रथमच आम्ही लोंबत्या पुलावरून जाऊं लागलों तेव्हां आमच्या पोटांत धडकी भरली. कारण हे पूल बांबूचे असून, ते झोका घेतांना आम्हांला पायाखालचा आधार काढून फेकणार अशी प्रथम भीति वाटते. असे बरेच पूल ओलांडल्यानंतर आम्हांला त्यावरून चालणें जमूं लागले. निसटत्या सांकवावरून जाणें हें तर मोठेंच चतुराईचें काम असें. जरा पाय सटकला कीं आयुष्याला रामरामच ! आम्ही या प्रवासांत तिबेटांतून येणारी शरिचू नदी व सुबनसिरी नदी यांचा संगम पाहिला.

आमचा रोजचा कार्यक्रम असा होता: सकाळीं पांचला उठणें व चहा वगैरे घेऊन सहा वाजतां चालूं लागणें. दोन अडीच तास चालल्यानंतर न्याहारीकरतां थांबत असूं. नंतर पुन: तीन तास चाल व मग तासभर जेवणासाठीं विश्रांति. जेवण झाल्यावर पुन: वाटचाल. सूर्यास्त होण्यापूर्वी म्हणजे ४–३० वाजतां आम्ही मुक्कामाला थांबत असूं. सात वाजतां सायंकाळचें जेवण झालें कीं, गवत पसरून मऊ केलेल्या अंथरुणावर आम्ही

पडत असूं. दुसऱ्या दिवशींच्या सूचना देऊन व गप्पा मारून आम्ही दिवा विझवीत असूं. जवळून वाहणाऱ्या पूर आलेल्या नदीच्या पाण्याचा खळ-खळाट, मला रात्रभर नीटशी झोप लागूं देत नसे. कानांत बोळे घालून आणि इतर अनेक उपायांनी मी थोडीफार झोप मिळवीत असे. आम्ही जसजसे बर्फमय प्रदेशाच्या जवळ जाऊं लागलों, तसतशा रात्री थंडगार होऊं लागल्या.

ज्या प्रदेशांतून आम्ही जात होतो, त्यांत सर्वत्र जळवा, गांधील माशा, मधमाश्या व साप होते. कांहीं वेळा शरीराच्या एखाद्या भागाला जळू लागे व त्याच्यावर मीठ टाकून वा आगपेटीनें चटका देऊन तिला सोडवे-पर्यंत ती आमचें पुष्कळसें रक्त पीत असे. झाडाच्या फांद्यांवरून लोंबणारे व झुडुपांवर लटकलेले साप यांच्यापासून आम्ही पुष्कळ वेळां बचावलो. मार्गांत अनेक घनदाट जंगलांतून आम्ही गेलों

आम्ही नेमके कुठें आहोंत हें वरच्या लष्करी मुख्य ठाण्यावर आम्ही वायरलेसनें कळवीत होतो. मी एकदां ब्रिगेडियर गुराया यांचेशीं एक रुपयाची पैज मारली कीं जरी ४८ तास आपण लष्करी ठाण्यावर बिन-तारीनें कांहींहि संपर्क साधला नाहीं, तरी आपल्याकडून कांहींहि कळलेलें नाहीं ही गोष्ट तिथें कुणाच्या ध्यानांतहि येणार नाहीं. मग आम्ही कदाचित कांहीं संकटांत असूं म्हणून शोध वगैरे करणें लांबच राहिलें. गुराया यांना हें खरें वाटत नव्हतें. मग आम्ही वायरलेस ४८ तास बंद ठेवला...कुणी कांहींहि हालचाल केली नाहीं !

साप–शिडीच्या खेळाप्रमाणें आम्ही मध्येंच वर चढत होतों व पुन: खालीं उतरत होतों या प्रकारच्या प्रवासी आयुष्यक्रमांत खळबळ अशी कांहींहि नव्हती. वृत्तपत्रें नव्हतीं, पत्रें नव्हतीं, फोन नव्हते, कुणी भेटत नव्हते, कसलीहि समस्या नव्हती. पुष्कळशा मोठमोठ्या गोष्टी या विवक्षित पार्श्व-भूमीवर फारच लहान वाटत होत्या व दोरी, काठ्या, पाणी अशा लहान सहान गोष्टींनाच असाधारण महत्त्व आलेलें होतें. कसलेंहि अन्न गोड लागत होतें. रात्रीच्या शांत वेळीं अनेक आठवणींचें काहूर माझ्या मनांत माजत असे.

आम्हांला डॉक्टर उपलब्ध नसल्यानें जीं कांहीं औषधें आम्ही आमच्या बरोबर घेतलेली होती, तीं सर्वच रोगांवर रामबाण वाटत होतीं.

अशा या खडतर परिस्थितींतहि केवळ आमच्या हट्टानें आम्ही पुढेंपुढें जात होतों. आम्हांला हें ठाऊक होतें कीं आमच्या सैनिकांचें आमच्यावर लक्ष होतें व त्यांना एक आदर्श घालून द्यावा म्हणून आम्ही, जरी आमचें मन खचलें होतें तरी चेहऱ्यावर दाखवित नव्हतो व हा प्रवासाचा ताण सोशीत होतों.

चौथ्या दिवशीं दुपारीं एक वाजतां आम्ही माजा येथें पोहोंचलों. सर्व बाजूंनीं उंच डोंगरांच्या मध्यभागीं एखाद्या भांड्यांत असावें तसें हें गांव होतें. येथील आपल्या ठाण्यावरील मुख्य तुकडी नदीच्या कांठीं छावणी टाकून होती व तिथेंच कमांडरहि होता. हा अधिकारी धडधाकट नव्हता व आसपास काय चाललें आहे याची त्याला फारशी कल्पनाहि नव्हती. मला असें आढळलें, कीं येथील परिस्थितिसंबंधी, त्यानें जे अहवाल वरच्या अधिकाऱ्यांना धाडले होते ते संपूर्ण बरोबर नव्हते व दिशाभूल करणारे होते. तो काय कळवतो हें पडताळून पाहणें कुणाला शक्य नव्हतें, कारण महत्त्वाच्या अशा कुणीहि जेष्ठ अधिकाऱ्यानें माजाला यापूर्वी भेटच दिलेली नव्हती. या अधिकाऱ्याच्या संवयीहि नेमस्त नव्हत्या.

रसद व पत्रें हीं आकाशमार्गें, जेव्हां हवा चांगली असेल, त्याच वेळीं वरून टाकण्यांत येत. हा योग क्वचितच येई. आपल्या सैनिकांचें येथील आयुष्य हें एक मोठेंच दिव्य होतें. पुन: पुन: विचारलें तेव्हां त्यांनीं तक्रार केली कीं त्यांच्यापैकी कांहींना पुष्कळ दिवसांत रजाच मिळालेली नव्हती; व एकदोघांच्या पगाराची थकबाकी चुकती झालेली नव्हती. मी माझ्या जवळचे पैसे काढले व त्यांची बाकी तिथल्या तिथें चुकती केली. ज्या दोन माणसांना रजा हवी होती त्यांनीं माझ्याबरोबर दुसऱ्या दिवशीं निघावें, अशी आज्ञा मी दिली. या दोन गोष्टी केल्याबरोबर त्या लोकांच्या मानसिक धैर्यांत मला फरक जाणवला.

मनाला थोडा वेळ विश्रांती घेऊन मी वर एका उंच ठिकाणीं चढून गेलों जियून आसपासचा भूप्रदेश दृष्टीपथांत येत होता. माजा येथून लोंगजू दिसत नाहीं. कारण एक पर्वताची रांग मध्यें येते. मला असें समजलें, कीं

या ठाण्यापासून अगदीं नजिकच्या ठिकाणापर्यंत चिन्यांनी एक मोटार जाईल एवढा रस्ता बांधला आहे. मिगिथून यालाच थागिन होलू म्हणतात. हें ठिकाण लोंगजू जवळच होतें व तेथून पुढचीं पांच ठिकाणें म्हणजे, चिकचर, तोमेझ, सुटला, लाडो व नामडोंग.

माजा येथील कमांडिंग ऑफिसरची मी ताबडतोब बदली करवली, कारण त्याच्यावर टाकलेली जबाबदारी त्याला पेलणारी नव्हती.

माजा येथें आम्ही आलों होतों याची खूण म्हणून तेथील एका झाडाच्या बुंध्यावर, ११ नोव्हेंबर १९५९ या तारखेसह मजकूर कोरला व मी लिमेकिंग व मिसामारी येथें परतलों. बोमडिलाला जाऊन चेरापुंजी-शिलाँग मार्गें मी विमानानें दिल्लीला परतलों. मी नागालँड व नेफामध्यें जें पाहिलें त्याचा वृत्तांत थिमय्या व नेहरू यांना दिला. या सर्व प्रवासाला मला जवळ जवळ तीन आठवडे लागले.

फील्ड मार्शल माँटगोमोरी यांनीं जानेवारी १९६० मध्यें दिल्लीला भेट दिली. 'दिल्ली गॅरिसन'च्या सर्व अधिकाऱ्यांपुढें बोलतांना त्यांनीं इतर अनेक मनोरंजक गोष्टींबरोबरच असें सांगितलें– 'मी लवकरच चीनला भेट देऊं शकेन अशी मला आशा आहे. मी माओना यासंबंधीं लिहिलें आहे. मला शुक्रवारपर्यंत उत्तर यावें, असें मी त्यांना कळवलें आहे.' (जणूं माओ हा यांच्या हाताखालचा कमांडरच होता!) आपल्या भाषणांत माँटगोमोरी असेंहि म्हणाले, कीं राजकारणांत मतांनी विजय मिळतो व सैनिकाला विजय मिळवून दाखवावा लागतो. जर मतें किती मिळालीं यावर, त्याचे कर्तृत्व मोजायचें ठरलें असतें, तर त्यांची केव्हांच हकालपट्टी झाली असती.

पाकिस्तानचे कमांडर इन् चीफ, जनरल महंमद मुसा यांना दिल्ली येथें मार्च १९६० मध्यें भरलेल्या वार्षिक 'हॉर्स शो' साठीं भारतीय सेनादलानें निमंत्रण दिलें होतें. मी पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, मी जेव्हां १९४६–४७ मध्यें लेफ्टनंट कर्नल होतो तेव्हां मुसा हे माझ्या हाताखालीं मेजर होते. बराच काळ त्यानंतर गला होता व आमची परस्पर स्थानें आतां उलट सुलट झालीं होतीं. ते आतां जनरलच्या श्रेणीला गेले होते व मी त्यांच्या मागें एक पायरी होतो मुसा इथें आले त्या दिवशीं त्यांनीं मला भोजनाला बोलावलें. आमचें त्यांच्या खोलींत खूपच प्रदीर्घ व मनोरंजक बोलणें झालें. आमचे

व्यक्तिगत संबंध पूर्वीप्रमाणेंच जिव्हाळ्याचे राहिले असले, तरी आमचे संबंधित देश हे कांहीं मित्रत्वाचे नातें ठेवून होतें असें म्हणतां येणार नाहीं. नशिबाचा हा विपरीत खेळ होता. आमचें दोघांचें असेंच मत झालें, कीं जर सध्याची भारतांतील व पाकिस्तानांतील पिढी यांच्यांत सलोख्याचे संबंध निर्माण होऊं शकले नाहींत, तर आपल्यानंतरच्या पिढयांत हें घडणें अशक्य आहे. कारण सध्यांच्या पिढींतलीं अनेक माणसें एकमेकांना ओळखतात व पूर्वीं हीं माणसें एकत्र राहिलेलीं आहेत. पुढील पिढयांच्या बाबतींत हें संभवत नाहीं. शिवाय काश्मीरसारखे प्रश्न जर सुटले नाहींत, तर जसजसा काळ जाईल तसतशी परस्परांतील कटुता वाढतच जाईल. दुर्दैवानें भारत व पाकिस्तानांतील झगडा हा राजकीय होता व सैनिकांना त्यांत कांहीं करतां येण्यासारखें नव्हतें.

मी जेव्हां नेहरूंना मुसा हे इथें आल्याचें कळवलें, तेव्हां प्रेमानें त्यांनीं त्यांची भेट घेतली व त्यांना दोघा मुलांसह त्यांनीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपल्या घरीं फराळाला बोलावलें. अध्यक्ष आयुब यांचा मुलगाहि, मुसा यांचेबरोबर आलेला होता व त्यालाहि नेहरूंनीं निमंत्रण दिलें होतें.

माझी कचेरी नेहरूंच्या कचेरीपासून फारशी दूर नव्हती. एकदां सकाळींच मी मोटार कडेला लावीत असतांना मला एक विशीचा तरुण नेहरूंच्या मोटारीपाशीं दिसला. बंगालच्या एक खेडयांतून तो आलेला होता. त्याची आई वेडी झाली होती व बहिण अपंग होती. वडील बऱ्याच दिवसांपूर्वी वारलेले होते. नेहेरूंना भेटल्यास आपली सर्व अडचण दूर होईल म्हणून तो इतक्या लांब आला होता. त्याला नेहरूंची भेट मिळत नव्हती. मी त्याला माझ्या कचेरींत आणला; भरपूर जेवूं घातलें. त्याच्या जखमा झालेल्या पायाला बँडेज बांधून दिलें व थोडया वेळानें मी नेहरूंना भेटून आलों असें सांगून, त्याला दोनशें रुपये दिले. परंतु मी त्याला ते तसेच न देता चांभार काम शिकवण्याची व्यवस्था केली.

एकदां मी कचेरींत जात असतां माझ्या मोटारीसमोर एक पादचारी बेशुद्ध होऊन पडला. शुद्धीवर आल्यावर त्यानें सांगितलें कीं तो पंजाबमधला निर्वासीत होता व पहाडगंज येथें तो फळें विकत असे. क्षयानें त्याला गांठल्यानें औषधोपचारासाठी त्यानें दुकान विकलें. सध्यां तो भुकेकंगाल

होता. अनेक अधिकाऱ्यांना त्यानें पत्रें लिहिलीं होती; परंतु त्याला कुणीच मदत दिली नव्हती. मी त्याला घरीं आणला. गरम कपडे दिले. त्याच्यासाठीं मी मित्रांकडूनहि पैसे जमवले. सहा महिने त्याला औषधोपचार होऊन व योग्य ती काळजी घेतली जातांच तो बरा झाला. मी माझें वजन खर्च करून त्यानें विकलेलें दुकान नव्या मालकाला थोडे अधिक पैसे देऊन परत मिळवून दिलें. आयुष्यांत तो पुन: रमला.

ब्रिगेडियर बादशहा यांचेकडून १९६० मध्यें मला समजलें, कीं लेफ्टनंट कर्नल प्रिन्स हा अँग्लो इंडियन अधिकारी एका जीप आपघातांत ठार झाला. त्याच्या मागें विधवा बायको व दोन मुलें होतीं. श्रीमती प्रिन्स यांना पैशाची अडचण निर्माण झाली होती. राहायला पुरेशी जागा नव्हती व एक अपंग मूल होतें. मी त्यांना शक्य तेवढी पैशाची मदत केली व त्यांच्या इतरहि अडचणी सोडवल्या.

डॉ. बी. सी. रॉय हे बंगालच्या राज्यकारभारांत कुणाला हात घालूं देत नसत व एखाद्या दयार्द्र हुकुमशहाप्रमाणें आपल्या प्रांतावर राज्य करीत. लोक त्यांना मोठा मान देत, कारण त्यांचे एक तर बंगालवर फार प्रेम होतें व दुसरी गोष्ट ते गांधींचे डॉक्टर होते. कृष्ण मेनन यांना कलकत्त्यांत व बंगालमध्यें इतरत्र, सैनिकांना घरें बांधण्यासाठीं जमीन हवी होती. बी. सी. रॉय हे याला कबूल होत नव्हते. मेनन व मी यासाठीं कलकत्त्याला प्रत्यक्ष बोलणीं करण्यासाठीं गेलों व हात हालवीत उदास होऊन परतलो. मेनन यांनीं मला रॉय यांचें मन वळवण्यासाठीं पुन: कलकत्त्याला धाडलें. मी जेव्हां रॉय यांची गांठ घेतली, तेव्हां रॉय म्हणाले, कीं मला एक असें कारण सांगा कीं ज्याकरतां बंगालला स्वत:लाच जमिनीची अत्यंत निकड असतांना, मी इतरांना जमीन द्यावी. मला या प्रश्नाला समाधान करील असे गंभीरपणें काय उत्तर द्यावें हें सुचेना. म्हणून मी हंसत म्हटलें––

'दोन कारणें आहेत कीं ज्या करता ही जमीन तुम्ही द्यायला हवी. कालच तुमचा वाढदिवस झाला, त्याप्रित्यर्थ तुम्हांला कांहीं तरी दान करायचें असेलच आणि दुसरें कारण म्हणजे तुम्ही नुकतेच भारतरत्न झालात हा सर्वोच्च सन्मान झाल्याबद्दल खुषी म्हणून तुम्ही कांहीं द्यायला हवेंच.'

बी. सी. रॉय यांना हें अजब तर्कशास्त्र ऐकून हंसू आलें व अधिक थोडी चर्चा झाल्यानंतर त्यांचें समाधान झालें व ज्या मुद्दांवर पूर्वी त्यांनीं एक रेसभरहि मागें होण्यास नकार दिला होता, ते जवळ जवळ सर्व मुद्दे त्यांनी मान्य केले.

चंदिगडला सेनेला एक कँटोनमेंट (लष्करी छावणी) बांधावयाचं होतें. कैरॉं यांना वाटत होतें कीं कँटोनमेंटमुळें पंजाबच्या राजधानीला आर्थिक फायदा होईल व मेनन यांची दृष्टी होती कीं पंजाबच्या राजधानींत कँटोनमेंट असणें, ही गोष्ट नैतिक दृष्टचा आवश्यक होती. ' क्वार्टर मास्टर जनरल ' या नात्यानें हें काम त्वरीत करणें ही माझी जबाबदारी होती.

जमीन खरेदीचें पंजाब सरकारचें अंदाजपत्रक सत्तर लाखांचे होतें. मी जेव्हां अनौपचरिकरित्या अर्थमंत्र्यांच्या कचेरींत चौकशी केली, तेव्हां मला कळलें कीं जमीन खरेदीसाठीं फक्त चाळीस लाख रुपयेच देणें शक्य होणार आहे. मी विमानानें चंदीगडला गेलो व कैरॉं यांना जमिनीची किंमत तीस लाखानें कमी करण्यास सांगितली. नाहींतर या योजनेला आर्थिक मंजुरीच मिळणार नाहीं असें सांगितले. कैरॉं यांनी यांत लक्ष घातलें. शासनांतील दिरंगाई डावलून, त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून अंदाजपत्रकांत तीस लाखांची कपात करण्यास सांगितलें. दिवस संपण्यापूर्वी त्यांनी तीस लाखांची कपात स्वीकारून अंदाजी रक्कम कमी करून दिली. कांहीं तासांत हें घडवून आणणें कैरॉंप्रमाणें भारतांतल्या किती जणांना शक्य झालें असतें हें मला ठाऊक नाहीं

चीफ ऑफ दि जनरल स्टाफ, ॲड्जूटंट जनरल, क्वार्टर मास्टर जनरल व मास्टर ऑफ दि ऑर्डनन्स, या आर्मी हेडक्वार्टर्स दिल्ली येथील चार जागांवरील अधिकाऱ्यांना ' प्रिन्सिपल स्टाफ ऑफिसर्स ' असें म्हणतात. या पदावरील अधिकारी हे लेफ्टनंट जनरल या हुद्याचे असून त्यांचा पगार प्रतिमासीं ४,००० रु. १९४७ पूर्वी होता. फाळणीनंतर हिंदी अधिकाऱ्यांनी जेव्हां ब्रिटिशांच्या जागा घेतल्या, तेव्हां हिंदी अधिकाऱ्यांना असलेला कमी अनुभव व कमी नोकरी लक्षांत घेऊन, या पदांवर मेजर जनरल पदाचे अधिकारी चालू शकतील असें ठरवण्यांत आलें. म्हणजे या पदांचे कांहीं प्रमाणांत अवमूल्यन झालें. बारा वर्षांनंतर जेव्हां आम्हांला जास्त अनुभव

प्राप्त झाला, तेव्हां आम्ही याबाबत आमचें म्हणणें मांडल्यानंतर या पदांच्या नेमणुका पुनश्च लेफ्ट. जनरल या पदाधिकाऱ्यांतून करण्यास सुरुवात झाली; परंतु पगार मात्र रु. ४००० ऐवजीं रु. ३५०० ठरवण्यांत आला. आमच्याच योग्यतेचे इतर खात्यांतील लोकांना, अशा तऱ्हेनें कपात लावलेली नसतांना आमच्याच बाबतींत लावलेली ही पगार-कपात अन्याय्य व लहरी स्वरूपाची होती. थिमय्या यांनीं ही बाब सुधारण्याचा प्रयत्न केला. मेनन व नेहरू हे दोघे कबुल झाले; परंतु अर्थमंत्री मोरारजी देसाई यांनी नकार दिला. त्यांची कैफियत अशी होती कीं काटकसरीचे दिवस असतांना, सर्वांत जास्त असलेला पगार हा अधिक वाढवूं नये. खरें पहाता ही बाब पगार वाढवण्याची नव्हती, तर ठरला असलेला पगार देण्याची होती. जेव्हां गोष्ट अशा थराला गेली कीं पेचप्रसंग निर्माण झाला, तेव्हां माझ्या कांहीं सहकाऱ्यांनीं मला ही गोष्ट नेहरूंच्या नजरेस अनौपचारिकरित्या आणण्यास सांगितलें. मी थिमय्या यांच्या परवानगीनें व त्यांना सांगून जेव्हां हें केलें तेव्हां नेहरू म्हणाले कीं, या बाबतींत मंत्रि-मंडळाच्या संरक्षण विषयक समितीनें (डिफेन्स कमिटी) निर्णय घ्यावयाचा आहे. पंडित पंत व मोरारजी देसाई यांची पूर्वसंमति नेहरूंना हवी होती. दोघांना नेहरूंच्या वतीनें मी भेटावें असें नेहरूंनीं सुचवलें. मी जेव्हां पंतांना भेटलों तेव्हां ही सर्व बाब समजावून सांगितली. ते कबूल झाले. नेहरूंनी मोरारजींना फोन करून मला त्यांच्याकडे पाठवित असल्याचें सांगितल्यानंतर मोरारजी देसाई यांचेकडे गेलो. त्यांनी सांगितलें कीं त्यांनी हें सर्व प्रकरण पूर्वीं पाहिलेलें आहे व प्रिन्सिपल स्टाफ ऑफिसरांचा पगार पूर्ववत कर-ण्यास ते संमती देऊं शकत नाहींत. संरक्षण समितीपुढें हा प्रश्न आला तेव्हां मी तिथें हजर होतो. जेव्हां नेहरूंनी सांगितलें कीं पगार पूर्ववत् करायला त्यांची तयारी आहे, तेव्हां मोरारजी देसाईंसह सर्व मंत्र्यांनीं एक आवाजांत तसेंच सांगितलें. मोरारजी देसाई यांनीं आपलें मत कां बदललें हें मला शोधतां आलेलें नाहीं.

उन्हाळ्यांत सचिवालयांतील अॅडिशनल सेक्रेटरीपासून वरच्या अधि-काऱ्यांना, कचेऱ्या वातानुकुलीत करण्याचा हक्क होता. लेफ्टनंट जनरल याची श्रेणी ही अॅडिशनल सेक्रेटरीपेक्षा वरची असूनहि लेफ्टनंट जनरलना

हा खास अधिकार नाकारण्यांत आला होता. मी खटपट करून, आमच्या कचेऱ्याहि वातानुकुल करण्यासाठीं सरकारी अनुज्ञा मिळवली. या फायली-वर कृष्ण मेनन यांनीं लिहिलें— 'आतां तरी कांहीं पी. एस्. ओंची (प्रिन्सिपल स्टाफ ऑफिसर) डोकीं थंड राहतील. (हा मला टोमणा होता) व इतरांचे पाय लटलटणार नाहींत अशी आशा आहे.'

या सर्व गोष्टी घडल्यानंतर कुजबुज सुरू झाली, कीं माझा निरनिराळ्या वरच्या वर्तुळांत वाजवीपेक्षां जास्त प्रभाव आहे. हें पुन:पुन्हा होत असे. प्रथम माझेच सहकारी म्हणा किंवा वरिष्ठ म्हणा मला एखादी विविक्षित गोष्ट करण्यास सांगत. ( हें काम बहुधा वरच्या अधिकाऱ्याकडे असे ) कारण तें काम पुढें ढकलणें त्याच्याच्यानें होत नसे. मग मी तें काम सेना-दलाच्या हिताच्या दृष्टीनें केलें, म्हणजे मात्र हींच माणसें आरोप करीत कीं माझा राजकीय प्रभाव वरच्या थरांत आहे !

भारताच्या संरक्षणासाठीं आवश्यक असे रस्ते बांधायचें काम सेना कांहीं वर्षें करीत होती. परंतु ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणें काम होत नव्हतें, याला कारणें अनेक होती. आर्थिक अडचण होती, दप्तर दिरंगाईंत पुष्कळ वेळ जात होता, हवी ती यंत्रसामुग्री नव्हती व देखरेख करणारा सेवकवर्ग पुरेसा नव्हता. देशांत फारच थोड्यांना महत्त्वाचे रस्ते बांधण्यांतील निकड समजू शकत होती. सरकारच्या खातीं, आणखी कांहीं रस्ते बांधले जात आहेत इतकेंच समजलें जात होतें.

१९६० मध्यें आपल्या प्रदेशांतील चिन्यांचा चंचुप्रवेश वाढला होता. सरकारनें या गोष्टीकडे आता गंभीरपणें पहाण्यास सुरुवात केली होती. याचमुळें 'बॉर्डर रोडस् डेव्हलपमेंट बोर्ड' ( सरहद्दींवरील रस्तेबांधणी खातें ) निर्माण झालें होतें. नेहरू या बोर्डाचे अध्यक्ष होते व मेनन उपाध्यक्ष होते. मेजर जनरल के. एन् डुबे हे या बोर्डाचे डायरेक्टर जनरल होते. व्यक्तिगतरित्या, मला या बोर्डाच्या विविध कृतींचा मेळ घालण्यासाठीं, या बोर्डावर नेमण्यांत आलें होतें.

या बोर्डाची पहिली सभा २९ मार्च १९६० रोजीं नेहरूंच्या निवासस्थानीं झाली. नेहरूंनीं सुरुवातीलाच सांगितलें, कीं काम झपाट्यानें होणें महत्त्वाचें आहे. यासाठीं अग्रक्रम ठरवला पाहिजे व आवश्यक रस्त्यांच्या बांधणीस

लगेंच सुरुवात केली पाहिजे. लडाख व नेफा याकडे प्रथम लक्ष द्यावें, असें त्यांनी सांगितलें.

मेजर जनरल डुबे व मी दोघानीं अंदाजपत्रक तयार केलें. त्यानुसार या कामाला दोन ते तीन वर्षे लागून, दोनशें कोटी रुपये खर्च होणार होता. यात जुने रस्ते, ज्यांची लांबी ४,००० मैल होती, त्यांची दुरुस्तीहि अंतर्भूत होती. आमचें अंदाजपत्रक जसेंच्या तसें मंजूर झालें.

सरहद्दीवरील रस्त्यांच्या बांधणीच्या संबंधात, मी नेहरूंशी चर्चा करण्याचा प्रसंग वारंवार येई. विशेषत: जेव्हां राज्यांचे मुख्यमंत्री वा केंद्रिय मंत्री, ज्यांच्याकडून सहकार्य घेण्याचा प्रश्न असे, तेव्हां मला नेहरूंची मदत घ्यावी लागे. नेहरू हे सहानुभूतीने विचार करणारे असले, तरी नेहमीच खंबीर नसत. माझा पंताशीहि पुष्कळ वेळा संबंध आला व मला त्यांनीं अतिशय मदत केली.

पंत हे मोठे धूर्त प्रशासक होते. आपल्या काळांत त्यानीं भारताची अमोल अशी सेवा केली. ते व्यवहारचतुर असूनहि, आवश्यक तेव्हां ते खंबीर होत असत. त्यांची बुद्धि तीक्ष्ण होती व माणसाची त्यांना पारख होती. नेहरू हे पंतांवर पुष्कळच विसंबून असत. पंत ६ मार्च १९६१ रोजीं निधन पावले. जुन्या नेत्यांपैकीं ते शेवटचे नेते होते व त्याच्या निधनानें नेहरूंचा एक खंदा पुरस्कर्ता नाहींसा झाला. पुष्कळ नाजूक विषयांत नेहरू पंतांना विश्वासांत घेत व पंत हे नहरूंना मोठा आधार वाटत असत. पंताच्या निधनानंतर नेहरू हे राजकीय गोटांत अशा वेळीं एकाकी झाले, कीं जेव्हां त्यांच्या विरुद्ध शत्रुत्व हळूहळू वाढू लागलें होतें.

कृष्ण मेनन यांनीं सरहद्दीवरील रस्ते बांधणी बोर्डाला अशी आज्ञा सोडली होती, कीं जरी वाहनांचा तुटवडा असला तरी ‘ मर्सिडीज बेंझ ’ लॉऱ्या खरेदी करावयाच्या नाहींत. जपानी लॉऱ्या किंवा देशांत तयार झालेल्या लॉऱ्याच लागल्यास विकत घ्याव्या. या दोन्ही प्रकारच्या लॉऱ्या मिळत नव्हत्या व जम्मू काश्मीर सरकारजवळ ‘ मर्सिडीझ बेंझ ’ गाड्या मात्र देण्यासारख्या होत्या. इकडे सोनगड–लेह रस्त्याचें काम अडून पडलें होतें. काश्मीर सरकारला या रस्त्याची निकड असल्यानें त्यांनीं ‘ मर्सिडिझ बेंझ ’ गाड्या देऊं केल्या व मी कृष्ण मेनन यांची आज्ञा धाब्यावर बसवून

बोर्डाच्या डायरेक्टर जनरलना या 'मर्सिडीझ बेंझ' गाड्या काश्मीर सरकारकडून खरेदी करण्यास सांगितलें. कृष्णमेनन यांनी जेव्हां मला नंतर विचारलें, कीं मी त्यांच्या हुकुमाबाहेर कां गेलों, तेव्हां मी सांगितलें, कीं आपल्या सरहद्दीवरील महत्त्वाच्या रस्त्याचें काम अडलें असतांना, या गाड्या कां खरेदी करूं नयेत याला मला तरी कांहीं सबळ कारण दिसत नाहीं.

भूतानचें क्षेत्रफळ १८,००० चौरस मैल आहे व लोकसंख्या ६,००,०० आहे भारत व तिबेट यांच्यामध्यें वसलेलें हें स्वतंत्र राज्य, सर्व बाजूंनी भूवेष्टित आहे. भूतानचे राजे पारो या राजधानीमधून राज्य करतात. या लोकसंख्येंतील २५ टक्के लोक हे नेपाळी वंशाचे आहेत. रैतक, संकोप व मानस या तीन नद्या या राज्यांतून वाहतात. पर्वताची एक रांग या राज्यामधून जाते. भारत सरहद्दीवरील या पर्वतराजींची उंची ५००० फूट आहे व उत्तरेकडील सर्वांत उंच टोक 'जूला कांगरी' हे २४०० फूट उंचीवर आहे येथें पाऊस भरपूर पडतो व जंगलें दाट आहेत. १९४९ सालीं भूताननें भारताशी तह केला व त्याअन्वयें १९४७ पूर्वी जी परिस्थिती होती, तीच कायम झाली. भूतानचा परराष्ट्र व्यवहार फक्त दिल्लीमार्फत चालण्याचें ठरलें.

भूतानचें वार्षिक उत्पन्न तीस लाख आहे. परंतु यांतला बराच पैसा राजासाठीं व धर्मपीठासाठी खर्च होतो. यामुळें भूतानला परकीय मदत घ्यावीच लागते.

आपण भूतानच्या अंतर्गत व्यवहारात ढवळाढवळ करायची नाहीं, असें नेहरूंचें सांगणें असे. नेहरूंनी मला एकदां असेंहि सांगितलें, कीं भूतानशी मैत्रि वाढविणें भारताला आवश्यक आहे ते असेंहि म्हणाले, कीं भूतान-सारख्या लहान राष्ट्राशी वागतांना, त्यांना आपण असें कधींही वाटूं देता कामा नये, कीं त्यांना आपण सुधारीत आहोंत.

फेब्रुवारी १९६१ मध्यें भूतानचे राजे पंतप्रधान जिगमे दोरजी यांच्यासह आले. आपल्या देशाच्या वाढीसाठीं त्यांनीं भारताची मदत मागितली. जिगमे दोरजी हे जेव्हां मेनन यांना या संबंधांत भेटायला गेले, तेव्हां तेथें मेजर जनरल डुबे हजर होते. दोरजी यांनीं मेननना सांगितलें कीं भूतानची संरक्षण

व्यवस्था तर बळकट करायलाच हवी आहे, परंतु त्यांची वहातूक सुधारायलाहि आम्ही त्यांना मदत द्यावी त्यांनीं विचारलें कीं भारताचे सरहद्दीवरील रस्ता बांधणी बोर्ड भारताच्या सरहद्दीपासून तों पूर्व भूतान मधील ताशी गाँग डांगपर्यंत रस्ता करून देईल काय ?' डुबे यांच्याशीं विचार विनीमय करून, मी यासाठीं दोन वर्षें लागतील असें सागितलें. यावर दोरजी म्हणाले—

'पैज मारून सांगतो, कीं हें शक्य नाहीं.'

मी यावर ताडकन् विचारलें—

'याहून अधिक विश्वसनीय अंदाज घेण्यासाठीं, तुम्हाला इतर कुठें दुसऱ्या कोणाला विचारावयाचें आहे काय ?'

माझ्या या स्फोटाने टांचणी पडली तर ऐकूं जाईल अशी शांतता पसरली. उगाच माझ्या देशाविरुद्ध अवहेलनेनें बोललेलें मला सहन करणें शक्य नव्हतें.

'तुम्ही यासाठीं प्राथमिक काम केव्हां सुरू करता ?' जिगमे यांनीं विचारलें.

'उद्यां' मी उत्तर दिलें.

'छे...छे. उद्यां नको ! आम्हांला सर्व संबंधितांना, तुम्ही येत आहात हें कळवायला तरी वेळ हवा !' दोरजी.

'मला वाटतें, कीं घाई तुम्हालाच आहे.' मी टोमणा दिला.

या रस्त्याचें काम सुरूं झाल्यावर जिगमे दोरजी आमचे चागले दोस्त झाले. अप्पा पंत हे तिथले भारताचे राजदूत अतिशय कार्यक्षम व उत्साही होते. त्यानीं आमची दोस्ती घडवण्यांत महत्त्वाची मदत केली. भूतानी सरकारनेंहि या कामाला, राष्ट्राचें काम म्हणून अभिमानपूर्वक सर्व प्रकारची मदत दिली लागणारे मजूर त्यांनींच आणले व त्यांना प्रोत्साहन दिलें.

१९६१–६२ या काळांत माझा जिगमे दोरजी यांच्याशी घनिष्ठ संबंध होता. ते खेळीमेळीने वागणारे व प्रगतीशील असले, तरी रुढीबद्ध होते. आपल्या स्वतःच्या स्थानाविषयीं ते नेहमी फिकीरीत असत. चीननें कांहींहि पाताळयंत्रीपणा केला, तरी भारत व भूतान हळूंहळू आधिकाधिक जवळ

येणार, असे ते म्हणत. १९६४ मध्यें त्यांच्या एका देशबांधवानें त्यांचा खून केला.

काश्मीरपासून नेफापर्यंत, सरहद्दीवरील रस्ता बांधणी बोर्डाचे कामाचा समन्वय साधण्याचें काम, हें एक भारून टाकणारें काम होतें, असा मला अनुभव आला. रस्ते बांधणी १९६२ पर्यंन्त व त्यानंतर ठरलेल्या वेळा॰ पत्रकाप्रमाणें प्रगती करीत होती.

सिक्किम–ड्रेस मॉ जोंग–भाताची दरी–हे भारताचेच एक मांडलीक राज्य आहे. या राज्याचे परराष्ट्र व्यवहार, संरक्षण व वहातुक या गोष्टी १९४९ च्या करारानुसार भारताकडे सोंपवलेल्या आहेत. लोकसंख्या १,५०,००० आहे व क्षेत्रफळ ३००० चौरस मैल आहे. लोकसंख्येपैकीं दोन तृतियांश लोक, हे नेपाळी वंशाचे आहेत व बहुतेक लोक बौद्धधर्मीय आहेत. येथील मुख्य जाती तीन. लेपचा, भुतिया व नेपाळी. यांतले भुतिया हे तिबे-टांतून आलेले आहेत. राजधानी आहे गंगटोक. पुरातन काळीं नेपाळ व भुतानने या प्रदेशावर स्वाऱ्या केलेल्या आहेत. या दोन देशांतच हा चिमुकला देश कोंबलेला आहे.

सिक्कीमचे सध्याचे महाराज आहेत चोग्यल पालडेन थोडूप नामगेल. हे लेपचा आहेत. हे महाराज हुषार व बहुश्रुत आहेत. त्यांना भीति वाटते, कीं नेपाळी हे बहुसंख्य होऊन एक दिवशीं लेपचा जातीला नामशेष करून टाकतील. सिक्कीमचें स्वतंत्र अस्तित्व राहावें यासाठीं ते जागरुक आहेत. काळ जाईल तसतसे महाराज आपल्या राज्यांत लोकशाही पद्धतीनें हळू हळू सुधारणा घडवतील अशी माझी अपेक्षा आहे.

भूतान व सिक्कीम येथील लोकांविषयीं नेहरूंना मोठें प्रेम होतें. व्यक्तिगत संबंधांनीं त्यांनीं तें वाढवलें होतें.

चीन हा, भूतान व सिक्किम या राज्यांची, त्यांना आपल्या कक्षेखालीं आणण्यासाठीं आळवणी करीत होता. त्यामुळें या दोन्ही राज्यांशीं जिव्हाळा ठेवून त्यांच्या प्रदेशावर किंवा जीवनपद्धतीवर आम्ही आघात करूं इच्छित नाहीं अशी खात्री पटवणें, आपल्या दृष्टीनें शहाणपणाचें होतें.

१९६० मध्यें थिमय्यांची परवानगी घेऊन मी सिक्कीमला गेलों. वाटेंत

मी दार्जिलिंगला भेट दिली व तेथील ‘टायगर हिल’ वरून कांचनगंगा या प्रचंड शिखराचें मनोहारी दृश्य पाहिलें. तेथूनच दुरवर ‘माउंट एव्हरेस्ट’ हि दिसतो. कधींहि विसरणें शक्य नाहीं असा तो सौंदर्यपूर्ण देखावा होता. पहांट फुटण्यापूर्वींच्या संधिप्रकाशांत हें दृश्य पाहिलें तर तें गूढ अस्पष्ट दिसत असतें हळूहळू रंग पालटूं लागतो व सूर्यबिंबाबर येतांच एकदम लखलखाट होतो. याचें वर्णन करणें शक्य नाहीं. तें प्रत्यक्षच पाहायला हवें.

गंगटोकला जातांना कांहीं कामाकरतां मला कालिपाँगला एक रात्र काढावी लागली. दार्जिलिंग जवळचें हें सुंदर थंड हवेचें ठिकाण आहे. तिथल्या स्थानिक कमांडरनें माझी राहण्याची व्यवस्था ताशी दोरजी (जिगमे दोरजी यांची पत्नी) यांच्या घरीं केली होती. (१९६५ च्या फेब्रुवारींत त्या भूतानमधून निघाल्या व नपाळमध्यें त्यांनीं आश्रय घेतला) घर चांगलें प्रशस्त होतें. रात्रीचें जेवण झाल्यावर माझ्याशीं बोलतांना त्यांनीं सांगितलें कीं भुतानला चीन व भारत दोघांची भीति वाटते भारताविषयीं तिचें चांगलें मत दिसलें नाहीं. मी तिला सांगितलें, कीं भारताशीं इतकी वर्षे सख्य असतांना, भुतानच्या मनांत कसलीहि पापशंका असण्याचें कारण नाहीं. नेहरूंच्या मनांत या देशाविषयीं सदिच्छेखेरीज कांहीं नाहीं. मी तिला हें सांगत होतो परंतु मनांतली अढी कायम ठेवून ती ऐकत होती असें मला भासलें.

मी दुसऱ्या दिवशीं गंगटोकाला पोहोंचलों. महाराजांची, युवराजांची व त्यांच्या दोन्ही मुलींची भेट मला घेतां आली. मी मग तेथून ‘कोंग्राला’ भागांत आलों. ही खिंड १६००० फूट उंचीवर याच ठिकाणीं आहे. तेथें चढून जाण्याचा स्मृतींत पक्का राहणारा अनुभव मिळावा, म्हणून मी माझ्या दोन्ही मुलींना बरोबर आणलेलें होतें. ब्रिगेडियर भगवतिसिंग, लेफ्ट. कर्नल ब्राय, मेजर अमरसिंग व नाईक प्रेमसिंग हे या भागांतील लष्करी अधिकारी, तसेंच कॅप्टन गांधी हे डॉक्टर आमच्याबरोबर होते.

पहिल्या तीन टप्प्यांत आम्ही चढण चांगली चढलों. मात्र भोंवतालच्या पर्वतांची उंची जसजशी अधिक अधिक वाढूं लागली, तसतशी थंडी कडा-क्यानें वाजूं लागली.



*१९५९ सालीं लोंगजू येथें जात असतांना*
*दोन थागिन गिरिजनांसह लेखक*

शेवटचा चढ चढण्यापूर्वी आमची छावणी पडली होती, तें ठिकाण १५,६०० फूट उंचीवर होतें. इतक्या उंचीवर श्वासोच्छ्वास करणें कठीण जात असल्यानें, आम्हांला झोप लागत नव्हती. मध्यरात्रीच्या सुमारास माझ्या दोन्ही मुलींची तक्रार सुरू झाली, कीं त्यांचीं डोकीं अतिशय दुखूं लागलीं आहेत. त्यांना बरें वाटत नाहींसें झालें डॉक्टर गांधींनीं उपचार केले. रात्री बरें वाटत नसूनहि सकाळी मुलींनीं वरपर्यंत येण्याची तयारी दाखवली. आम्ही सकाळीं वर चढण्यास सुरुवात केली. बिकट चढ पार केल्यानंतर, आम्ही कांग्राला खिंडीपाशीं पोहोंचलो. या वेळीं दुपार झाली होती

तरीहि आसपासचीं शिखरें २२००० फूट उंचीचीं असल्यानें थंडीनें आम्ही कांकडून गेलो होतो. तेथून आम्ही पुन: झपाट्यानें खालच्या तळावर आलों व तिथें ती रात्र काढली.

पर (Purr) येथें नागालँड मधील मुख्य छावणीपासून दूर असलेली एक लष्करी चौकी होती. तेथें नव्वद सैनिक ठेवण्यांत आलेले होते. या ठाण्यावर २६ ऑगस्ट १९६० रोजीं पांचशें सशस्त्र नागांनीं हल्ला चढवला. यापूर्वी त्यांनीं एक डोंगरी ओढ्यावरून जाणारा लांकडी पूल उध्वस्त करून हा भाग वेगळा पाडला होता. त्यांचा आठ मैलांवरील मुख्य ठाण्याशीं संबंध तुटलेला होता. नागांनीं हल्ला केल्यावर पहिल्या कांहीं वेळांतच पर ठाण्यांतील दारूगोळा, जरा जास्त प्रमाणांतच वापरला गेला. मदतीसाठीं तांतडीनें रेडिओ संदेश देण्यांत आला होता. भारतीय हवाई दलाचीं दोन विमानें या कामगिरीवर निघालीं. यांतलें एक अगदीं उतरत असतांना नागांनी जमिनीवरून गोळ्या मारून जायबंदी केलें व तें विमान तेझू नदी जवळच्या एका भातशेतांत उतरवणें भाग पडलें. या विमानांतील सर्वांना नागांनीं पकडलें. दुसरें विमान रागरंग ओळखून कॅप्टननें परत तळावर मागें आणलें.

पर येथील ठाण्याच्या मदतीसाठीं निघालेली सैन्यतुकडी, पूल उध्वस्त झाल्यानें अलिकडेच अडकून पडली होती. २६ ऑगस्टला नागांनी परवर निकराचा हल्ला चढवून, तेथला कबजा न करण्यांत चूक केली. त्यांना एक तर तें ठाणें आतां केव्हांहि घेऊं असा फाजील आत्मविश्वास असावा, किंवा तेथें किती सैनिक आहेत याचा अंदाज त्यांना नसावा.

इकडे दिल्लींत एअर व्हाईस मार्शल के. एल्. सोंधी यांनीं नागांवर बॉम्ब हल्ला करण्यासाठीं मागितलेल्या परवानगीवर निश्चित निर्णय होत नव्हता. वेळ तर फार थोडा होता व पर येथील ठाणें धोक्यांत होतें. अखेर सोंधी २७ ऑगस्टला जोरहाट येथील हवाईतळावर गेले व तेथून रसद पुरवणारें विमान घेऊन ते स्वत:च परवर विमान फिरवून, ही पुरवठा करण्याची कामगिरी करून आले.

दिल्लीला नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं विशेष बैठक भरली होती. त्यांत या परिस्थितीला कसें तोंड द्यावें व आपले पकडलेले विमानदलांतील लोक परत सोडवून कसे आणावे, याचा विचार झाला. थिमय्या यांनीं सूचना

केली, कीं नागांविरुद्ध आपण गनिमी काव्यानें लढले पाहिजे. नेहरू एकदम उसळले व म्हणाले, कीं सैन्य हें केव्हांपासून म्हणतांना मी ऐकलें आहे, परंतु बडबडण्याखेरीज या बाबतींत प्रत्यक्षांत सैन्यानें कांहींहि पाऊल टाकलेलें नाहीं. कृतिपेक्षां आपण फार बडबड करतो, असें नेहरूंनीं उद्‌गार काढले.

मेनन व नेहरू या दोघांनी अशी सूचना केली, कीं मी पर येथें जावें व तेथील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून यावें. मला विशेषत: भौगोलिक दृष्टया दळणवळणाच्या शक्यतेची पाहाणी करावयाची होती. याप्रमाणें मी दिल्लीहून विमानानें निघालों व डमडमला अगदीं वाईट हवेंत उतरलों. तेथें मला उतरतांच एअर कामांडर मालशे भेटले. त्यांनीं मला तेथून विमानानें पुढें नेलें. पाऊस मुसळधार पडत होता व आमचें विमान आगबोटीसारखे हेलकांडे खात होतें. मालशे यांनीं पाऊस व वादळी ढग यांच्याशीं सामना देत धैर्यानें व कौशल्यानें विमान जोरहाट पर्यंत नेलें. तेथून हेलिकॉप्टरनें मी पर या ठाण्यावर गेलो. तेथें उतरणें अशक्य झालें, कारण तेथें प्रचंड ढग पसरले होते. परपासून कांहीं मैलांवरील फेक या ठिकाणीं उतरणार, तोंच आम्हांला रेडिओ संदेश आला, कीं आम्ही तेथें उतरूं नये. तरीहि वैमानिकाला मी तिथेंच उतरण्याची आज्ञा दिली. कोहिमापासून तीस मैलांवर चाकबंग भागांत हें फेक ठिकाण होतें. येथें उतरल्यावर मी जवळच्या एका टेकडीवर गेलो व तेथून मला आसपासचा प्रदेश पहातां आला.

नागा बंडखोर, आपल्या विमानदलांतील चार पकडलेल्या लोकांसह आम्हांला हुलकावणी देत राहिले. यांतच फ्लाईट लेफ्टनंट सिहा हे होते. त्यांची सुटका करण्यासाठीं आम्ही पुष्कळ हल्ले चढवून पाहिले परंतु नागा बंडखोर मध्येंच भारत-ब्रह्मदेश सीमा ओलांडून ब्रह्मदेशांत घुसत. त्यांना माहीत होतें, कीं ब्रह्मदेशाची सरहद्द कांहीं आम्ही ओलांडणार नाहीं. आम्ही ब्रह्मदेश सरकारची परवानगी काढली व या नागांचा ते जातील तेथें जोराचा पाठलाग करण्याचें ठरवलें. आमचा हा विचार त्यांच्या ध्यानांत येतांच, त्यांची घाबरगुंडी उडाली व त्यांनीं पकडलेल्यांना सोडून दिलें. आपलीं माणसें ताब्यांत मिळतांच आम्ही परत आपल्या हद्दींत आलो.

जेव्हां चिन्यांनीं अक्साई चीनचें पठार व्यापलें व लडाखमध्यें व इतरत्र आपला प्रदेश कुरतडण्यास सुरुवात केली, तेव्हां आपल्याला नवीं नवीं लष्करीं ठाणीं संरक्षणासाठीं निर्माण करणें आवश्यक झालें. चांगलीं दणकट अशीं पुष्कळ हेलिकॉप्टर विमानें कुठें मिळतील कां या शोधांत आम्ही होतो. डोंगराळ मुलुखांत जिथें कसलेंहि वाहन पोंहोचूं शकत नाहीं अशा ठिकाणीं अपघातांत वगैरे जखमी झालेल्यांना हलवण्यासाठीं, हीं हवीं होतीं. शिवाय आवश्यक ती रसद, दारुगोळा, वैद्यकीय वस्तू याची वाहतूक करण्यासाठीं याचा उपयोग होता. टेहळणीसाठीं हेलिकॉप्टर विमानें आवश्यक होतीं.

१९६० सालीं हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनीं जो आढावा घेतला, त्यानुसार अमेरिका, रशिया व फ्रान्सजवळ यासाठीं योग्य अशीं हेलिकॉप्टरें होतीं. रशियाजवळ दोन प्रकारचीं हेलिकॉप्टरे होतीं. एक जरा जास्त आधुनिक होतें. परंतु अत्याधुनिक प्रकारचीं हेलिकॉप्टरें त्यांच्यापाशीं देण्यासाठीं नव्हतीं. दुसऱ्या प्रकारचीं हवीं तेवढीं मिळणार होतीं. या रशियन हेलिकॉप्टरची किंमतही कमी होती व मुख्य म्हणजे भारतीय चलनांत यांची किंमत द्यावयाची होती.

संरक्षण मंत्री कृष्ण मेनन यांनी स्वत: या प्रत्येक प्रकारच्या हेलिकॉप्टरची तपशीलवार छाननी केली होती. यासाठीं त्यांनीं शास्त्रीय व इतर सल्लागारांचा सल्ला घेतला होता. थोडीशीं अमेरिकन व फ्रेंच हेलिकॉप्टर विमानें चांचणीसाठीं नमुना म्हणून खरेदी केली होती परंतु घाऊक खरेदीसाठीं रशियन विमानें निवडलीं होतीं व त्यांतलें फक्त नमुना म्हणून एकच खरेदी केलेलें होतें. या रशियन हेलिकॉप्टरची चांचणी फक्त दिल्लीच्या आसपासच करण्यांत आली होती व आमच्यापैकीं अनेकांना दिल्ली भोंवतालची हवेची परिस्थिती ही चांचणीसाठीं विसंबून राहण्यांतली वाटत नव्हती. इतर विमानांच्या मात्र पुष्कळच चांचण्या घेण्यांत आल्या. आमची इच्छा होती या रशियन हेलिकॉप्टरची चांचणी, अधिक उंचीवर करण्यांत यावी; कारण शेवटीं हीं विमानें अशाच कामगिरीवर जाणार होतीं. परंतु मेनन यांनीं ठरवलें, कीं दिल्लीच्या प्रदेशाभोंवती चांचणी झाली तीच पुरेशी आहे व रशियनांना त्यांनीं हेलिकॉप्टर त्यांचेकडून खरेदी करण्याचें ठरवल्याचें कळवूनहि टाकलें.

हवाई दलांतील तज्ञांना असें वाटत होतें, कीं फ्रेंच बनावटीच्या हेलिकॉप्टरनें अधिक चांगलें काम दिलें असतें. सरहद्दीवरील रस्ते बांधणी चालू असतांना आम्हांला असा अनुभव आला होता, कीं रशियनांकडून नेहमीं नाना कारणांनीं माल उशीरा येतो. मला म्हणूनच अशी साशंकता वाटत होती, कीं हेलिकॉप्टर विमानें पुरवण्यास देखील विलंब लागणार. याच सुमारास मेनन यांना आपले राष्ट्रसंघांतील प्रतिनिधी या नात्यानें न्यूयॉर्कला जावें लागलें.

मी कांहीं हेलिकॉप्टर-तज्ञ नव्हतों परंतु योग्य ती चांचणी न घेतां नवीं यंत्रें खरेदी केलीं जात आहेत, या गोष्टीमुळें मी अस्वस्थ होतो. हीं विमानें घेऊन सरहद्दीवर खूप उंचीवरून तीं चालवणें, हें आपल्या वैमानिकांना कठीण जाणार होतें. एअर व्हाईस मार्शल पिंटो व इतर कांहीं हवाई दलांतील अधिकाऱ्यांचें असेंच मत होतें.

आमची कांहीं जणांची इकडे आड तिकडे विहीर अशी परिस्थिति झाली होती सरकार जें कांहीं ठरवील, तें आमच्या मनांत संशय असतांना, त्याचा स्वीकार करावा काय ? कीं हा प्रश्न धसास लावावा ? मला एक गोष्ट समजत होती, आपल्या वैमानिकांचे प्राण कारण नसतांना धोक्यांत घालणें योग्य नाहीं. मी म्हणूनच हवाई दलांत नसूनहि हा प्रश्न धसाला लावण्याचें ठरविलें. मी यासंबंधी एअर व्हाईस मार्शल पिंटो यांचेजवळ बोललों व विचारलें, कीं नुकतेंच खरेदी केलेलें हेलिकॉप्टर लडाख भागांत चांचणी करण्यासाठीं मला मिळू शकेल काय ? पिंटो यांनीं सांगितलें, कीं कृष्ण मेनन हे न्यूयॉर्कला जाण्यापूर्वी निश्चित स्वरूपाच्या सूचना देऊन गेलेले आहेत, कीं या विमानांची आतां अधिक चांचणी करावयाची नाहीं. पिंटो म्हणाले, कीं वर्षांतील या विवक्षित कालांत लडाखमध्यें इतक्या उंचीवर विमानानें उड्डाण करणें हें फारच खडतर होतें. मी म्हटलें, कीं चांचणी ही नेहमी कठीणांतल्या कठीण परिस्थितींतच घ्यायची असते. पिंटो यांना हें लगेच पटलें व ते स्वत: माझ्याबरोबर या कामगिरीवर येण्यास तयार झाले. डिसेंबर १९६० मधली ही गोष्ट आहे.

पिंटो व मी डाकोटा विमानानें दिल्लीहून जम्मूला गेलो. रशियन हेलिकॉप्टरला लेह येथें दुसऱ्या दिवशीं येण्याची त्यांनीं आज्ञा सोडली

होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पिंटो मला म्हणाले, कीं रशियन वैमानिकांचा श्रीनगरहून संदेश आला आहे, कीं उष्णतामान नेहमीपेक्षां खूपच खालीं गेलें असल्यानें, मशिनमधील तेल गोठलें आहे व तो श्रीनगरच्या पुढें लेहला येऊं शकत नाहीं. तेल गोठलें तर तें या शास्त्रीय युगांत पातळ करायला किती उशीर ! मीं व पिंटो यांनीं ताबडतोब उलट निरोप दिला, कीं जी कांहीं अडचण आली असेल ती बाजूस करून, त्यानें ताबडतोब लेहला आलें पाहिजे. आम्ही लेहला पोहोंचलो तेव्हां हवा उबदार व स्वच्छ होती. हवेंत वारा नव्हताच. रशियन हेलिकॉप्टरहि तेल वितळवून तेथें दाखल झालें. पिंटो व मी असे दोघे, या पहिल्याच उड्डाणासाठीं जोडीनें जाण्याचें ठरलें होतें. परंतु रशियन वैमानिकानें निक्षून सांगितलें कीं, फक्त एकालाच तो नेऊं शकेल.

मी हा प्रवास करण्यास उत्सुक असल्यानें, पिंटो हे आपण होऊन मागें राहिले. मी, एक उतारू, याशिवाय एक रशियन व दोन भारतीय वैमानिक या उड्डाणांत विमानांत होते. आम्ही लेह येथून उडालों व काराकोरम खिंडीच्या दिशेनें निघालों. आमच्या एका अंगाला जगांतलीं सर्वोच्च बर्फाच्छादित पर्वत शिखरें होतीं. या वेळीं दिसलेलें दृश्य पाहून डोळे निवले. मी रशियन वैमानिकाला काराकोरम खिंडीपासून जवळच आपली एक लष्करी चौक होती, तिथें उतरण्यास सांगितलें. त्यानें इकडे तिकडे पाहिलें, जवळचा नकाशा पाहिला व तो म्हणाला, कीं इथें तो उतरूं शकत नाहीं, कारण हें ठिकाण चिनी सरहद्दीच्या अगदीं जवळ होतें व तिथें सोईस्कर अशी उतरण्यासाठीं भूपट्टीहि त्याला दिसत नव्हती.

मी त्याला म्हटलें, कीं चीनची सरहद्द जवळ आहे कीं लांब, हा त्याचा प्रश्न नव्हता. तें आम्ही काय तें पाहूं. भूपट्टीविषयी बोलायचें तर जी पट्टी दिसत होती, ती चांगली उतरण्यासारखी दिसत होती. त्याचें म्हणणें होते, कीं ही भूपट्टी तिरपी होती व तिथें उतरण्यासारखें नव्हतें. मी पुन: सांगितलें, कीं मला तिथेंच उतरायचें आहे व जर हेलिकॉप्टर तिथें उतरूं शकत नसेल, तर चांचणींत तें उणें ठरलें, असें मी समजेन. हें ऐकतांच तो हादरला, कारण झालेला राजकीय स्वरूपाचा व्यवहार होऊं शकला नाहीं, याला तो कारण झाला, हा आरोप त्याला नको होता. मी

त्याला हंसत म्हटलें कीं जर रशियन आतां चंद्रावर उतरूं म्हणत आहेत, तर तो इथें अुतरूं शकत नाहीं म्हणजे काय ? मला कळण्यापूर्वीच तो उतरण्यासाठीं खालीं येऊं लागला होता. कांहींहि अपघात न करतां, त्यानें मला हवें होतें त्या ठिकाणीं हेलिकॉप्टर खालीं आणलें.

मी बरोबर आणलेल्या कॅमेरानें कांही छायाचित्रें घेत होतो व आस-पासचा प्रदेश न्याहाळीत होतो, तितक्यांत रशियन वैमानिकानें मला हाका मारण्यास सुरुवात केली. इंजिन पुन: गारठण्यापूर्वी त्याला परत फिरायचें होतें. एक दोनदां हिसके घेऊन हेलिकॉप्टर पुन: लेहकडे निघालें.

आम्ही २१,००० फूट उंचीवर पोहोंचलो व मला पेंग आली. आपल्या पैकीं एका वैमानिकानें मला जागे करीत म्हटलें, की 'लेहपासून आपण कांहीं मिनिटांच्या अंतरावर आहोंत, परंतु आपलें जळण व ऑक्सिजन वायु संपत आला आहे. इंजिन बरोबर काम देत नाहींसें झालें आहे. आपल्याला कदाचित् कोणत्याहि मिनिटाला, जमेल तिथें खालीं उतरावें लागेल. आशा एकच आहे, कीं ज्या पर्वताच्या शिखरावरून आपण आतां जात आहोंत. ती पर्वत रांग ओलांडून आपण पलिकडल्या दरींत उतरूं शकूं.'

आम्ही झपाट्यानें खाली येऊं लागलो. आमचें नशीब म्हणून (एखाद्या शिखरावर न धडकतां ) आम्ही पलीकडे गेलो; व 'थोईसें' या ठिकाणीं आमचें लष्करीं ठाणें होतें, त्याच्या जवळच उतरलो. खालीं उतरलो आणि आम्हांला धडकीच भरली. जळणांत मिश्रणाचें जें प्रमाण होतें, त्याचें नियंत्रण करणाऱ्या यंत्रणेंत बिघाड झाला होता. थोड्या खटपटीनंतर लक्षांत आलें कीं हेलिकॉप्टर पुन: उडण्यास व पुढच्या प्रवासास आतां योग्य नाहीं. तेथून आम्ही लेह येथें पिंटो यांना बिनतारी संदेश दिला. तासाभरानें वर आकाशांत विमानाची घरघर ऐकूं येऊं लागली व कांहीं वेळांतच डाकोटा विमानांतून पिंटो खाली उतरले. नदीकांठच्या या भागांत पिंटो यांनीं कसें तरी विमान उतरवण्यांत यश मिळवलें होतें.

एम्. आय्. ४ हेलिकॉप्टर, मागें तसेंच ठेवून रशियन वैमानिकासह, आम्ही सर्व डाकोटा विमानानें परत जाण्यासाठीं विमानांत चढलो. विमा-नाचें एक चाक उतरतांना खराब झालें होतें. घाईनें तें दुरुस्त केलेलें

असलें, तरी उड्डाण घेतांना त्यामुळें त्रास होणार नाहीं अशी आमची अपेक्षा होती.

विमान सुरू झालें. ब्रेक सुटले. इंजिनानें वेग घेतला. भू-पट्टीवरून डाकोटा जोरांत धावूं लागलें आणि भूपट्टी संपली. त्याच क्षणीं तें वर उडालें !

या चांचणीसाठीं निघण्यापूर्वी अनेक दिवस, हें रशियन हेलिकॉप्टर पालम विमानतळावर पडून होतें. या विमानांत उड्डाणासाठीं भरावयाचें वायु जळण न भरतां, कुणीतरी भारतीय कनिष्ठ सेवकानें, त्यांत केरोसीन भरलें होतें. ही मोठीच चूक झालेली होती व याबद्दल त्याला पुढें शिक्षाहि झाली. हेलिकॉप्टरची यानंतर संपूर्ण दुरुस्ती करण्यांत आली व तें शेंकडों मैल उड्डाण करून सुखरूप परत आलें लेह जवळ हें हेलिकॉप्टर खालीं उतरावें लागलें, याला कारण त्यांत केरोसीन भरण्यांत आलें, असें रशियनांनीं सांगण्याचा प्रयत्न केला.

परंतु असें जर होतें तर अशा प्रकारचें दुसरें हेलिकॉप्टर त्यांनीं लडाख-मध्यें चांचणीसाठीं कां उपलब्ध केलें नाहीं, हें कळत नाहीं. दुसरें हेलिकॉप्टर तिथें होतेंच. या हेलिकॉप्टरला नांवें ठेवून तें निरुपयोगी ठरवण्याचा आमचा हेतू नव्हता. आम्हांला फक्त चांचणी हवी होती, आर्मी हेडक्वार्टर्सला परततांच, मीं एका फायलीवर अशी शिफारस केली, कीं या रशियन यंत्राची योग्य योग्यता ठरवण्यासाठीं अधिक परीक्षा घेणें आवश्यक आहे. तें अतिशय उंचीवर नेऊन, डोंगराळ प्रदेशांत त्याची, खरेदी करण्यापूर्वी चांचणी व्हावी.

कृष्ण मेनन हे अमेरिकेहून कांहीं दिवसांनीं परतले. त्यांच्या कानावर जेव्हां ही घटना गेली तेव्हां त्यांनीं मला बोलावून चांचणी घेतल्याबद्दल ते मला बोलले. ते म्हणाले, कीं हेलिकॉप्टर बंद पडलें, हा एक अपघात होता व यानें कांहींहि सिद्ध होत नाहीं. तुम्ही हें करून निष्कारण गांधीलमाशा उठवल्या आहेत. (क्रोध ओढवून घेतला आहे.) ते शेवटीं म्हणाले, कीं जनरलनी लष्करी साहित्य मिळवण्याच्या बाबतींत हस्तक्षेप करूं नये. सरकारचें हें काम आहे. मी त्यांना विचारलें, कीं सरकार हें, राजकारणी माणसांचें व सैनिकांचे दोघांचें असतें कीं नाहीं. आपल्या सैनिकांच्या जिवाला

ज्यांत धोका संभवतो, अशा तऱ्हेचीं यंत्रें, चांचणी न घेतां खरेदी करायला मी पाठिंबा द्यावा कीं काय !

या संबंधांत लोकसभेंतहि कांहीं दिवसांनीं चर्चा झाली. विरोधी पक्षानें विचारलें, कीं मी रशियन वैमानिकाबरोबर लडाखला कां गेलों होतों. सरकारनें माझा बचाव करून सांगितलें, कीं सदर हेलिकॉप्टर हें चांचणीसाठीं गेलें होतें. लोकांच्या मनांत माझ्याविषयीं यामुळें वाईट मत पुन: निर्माण झालें.

२६ जाने. १९६१ ला मला ' विशिष्ट सेवा पदक १ ला वर्ग ' हें देण्यांत आलें. याच दिवशीं, माझी थोरली मुलगी अनुराधा हिचा विवाह झाला. मला मिळालेल्या या पदकाची किंमत कमी करण्यासाठीं कांहींनीं असें पसरवलें, कीं मला हें पदक राहती घरें बांधण्याबद्दल मिळालें. परंतु पदक देतांना जें सांगितलें गेलें, त्यावरून हें पदक मला कां दिलें गेलें हें स्पष्ट होईल (यांत, कौल यांनीं ज्या ज्या निरनिराळ्या पदांवर कामें केलीं त्यांचा उल्लेख असून या सर्व पदांवर त्यांनीं नेत्रदीपक कार्यक्षमतेनें, पुढाकार घेऊन जोमदार रीतीनें आपलें काम बजावलें असें म्हटलेलें आहे.)

लेफ्ट. जनरल जे. एन. चौधरी यांनीं, या प्रसंगाबद्दल मला लिहिलें, कीं आतां मिळालेलें बक्षिस हें यापुढें देशाच्या सेवेंत माझ्या वाट्याला जीं आणखी बक्षिसें आहेत, त्याची केवळ नांदी होय. ( परंतु मी सेवानिवृत्त होतांना, चौधरी यांनीं नेहरूंना जें गोपनीय टिपण माझे बाबतींत पाठवलें, त्यांत मात्र या भावनेच्या विरोधी मतेंच प्रगट झालेलीं आहेत. )

वर्षभरानें राष्ट्राध्यक्षांनी सन्मान पदकें देण्याचा समारंभ केला व प्रतिष्ठित लोकांच्या उपस्थितींत हें पदक माझ्या छातीवर लावलें. या गौरवाच्या क्षणीं, मुंबईच्या ' करंट ' साप्ताहिकानें, हा प्रसंग ठळक मथळ्यांत देऊन खंवचटपणें लिहिलें, कीं मला हें पदक ' अेस्प्रेसो ' कॉफी यंत्रें तयार करण्याबद्दल मिळालें कीं काय ? हा अत्यंत निराधार आरोप होता. कारण संरक्षण खात्याच्या निर्मिती खात्याशीं माझा कांहींहि संबध नव्हता. आतांपर्यंत ' करंट ' पत्रानें माझ्याविरुद्ध इतके खोटे आरोप केलेले होते, कीं या पत्राविरुद्ध कायदेशीर उपाय योजना करण्याचा

विचार मी केला. परंतु नेहरूंनीं दोन कारणास्तव मला यापासून परावृत्त केलें.

अ) अशा तऱ्हेच्या खटल्यांत सेनेच्या जनरलनें गुंतावें अशी त्यांची इच्छा नव्हती.

ब) दुसऱ्या कुणी तरी जाहीर रीतीने माझ्यावरील आरोपांना उत्तर दिलें, तर तें चांगलें, असें त्यांचें मत होतें.

थिमय्या हे सेनाप्रमुख या पदावरून मार्च १९६१ मध्यें जेव्हां निवृत्त व्हावयाचें ठरलें, तेव्हां त्यांच्या जागीं कोण येणार हा प्रश्न निर्माण झाला. थिमय्या हे यावेळीं निवृत्तीपूर्व रजेवर जाणार होते. परंतु कांहींनीं अशी कंडी पिकवली, कीं मेनन यांनीं थिमय्या व थोरात यांना निवृत्ती वयापूर्वींच निवृत्त केलें आहे. वस्तुतः दोघेहि सामान्य नियमांप्रमाणें संपूर्ण सेवा करूनच निवृत्त झाले.

सेनाप्रमुख पदासाठीं थिमय्यानंतर दोघांत चुरस होती. थापर आणि थोरात. दोघांचाहि सेवावृत्तांत उत्तम होता. परंतु थापर हे ज्येष्ठ होते व थोरातांइतकेच गुणवत्त होते. थापर यांची जेव्हां या पदासाठीं निवड झाली, तेव्हां ते माझ्या घरीं आले व त्यांनीं सांगितलें, कीं मी त्यांचा 'चीफ ऑफ जनरल स्टॉफ' झाल्यास त्यांना आवडेल. मला हा मोठाच सन्मान वाटला. कारण पेशा म्हणून सैनिक झालेल्या प्रत्येकाला, एक दिवस 'चीफ ऑफ जनरल स्टाफ' होण्याची इच्छा असतेच. देशाच्या युद्धशक्तींचा समन्वय साधणें हें काम या पदाची जबाबदारी असते.

जेव्हां मार्च १९६१ मध्यें मी 'चीफ ऑफ जनरल स्टाफ' या पदावर नेमला गेलों तेव्हां थिमय्याच सेनाप्रमुख होते. थिमय्या निवृत्तिपूर्व रजेवर गेल्यानंतर, थापर त्या पदाचीं सूत्रें घेणार होते. सेनेंतील माझ्या समकालीन सहकाऱ्यांनीं, मी नव्या पदावर स्थिर होऊ पाहात असतांनाच, एकच ओरडा केला कीं, 'योग्य ती गुणवत्ता' नसतांना, मला या पदावर नेमण्यांत आलेलें आहे. चांगल्या लायक लोकांना डावलून, नेहरू, मेनन यांनीं मला वर ढकललें आहे. हा सत्याचा मुद्दाम अपलाप केलेला होता.

११ एप्रिलला माझ्या कांहीं सहकारी अधिकाऱ्यांसह, मी लोकसभेंत गेलों. त्या दिवशीं संरक्षण खात्यावर चर्चा होती. सभागृह खच्चून भरलें होतें; व वाता-

वरण तंग होतें. पाहुण्यांच्या गच्चींत फक्त उभे राहायला जागा होती. कृपलानी यांनीं नेहरू, मेनन व मी यांचेवर कडाडून हल्ला चढवला. भारताचें संरक्षण अकार्यक्षम माणसांच्या हातीं आहे, असा त्यांचा हल्ला होता. मेनन यांचेवर त्यांनीं पांच आरोप केले. सैन्यांत त्यांनीं गटबाजी निर्माण केली, सैन्याचे नीति-धैर्य त्यांनीं खालीं आणलें, देशाचा पैसा उधळला, भारताच्या संरक्षणाची आबाळ केली व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत हुकुमशाही राजवटींना पाठिंबा दिला. या गैरकारभाराची, लोकसभेनें एक समिती नेमून, किंवा राष्ट्राध्यक्षांनीं कमिशन नेमून चौकशी करावी अशी मागणी त्यांनीं केली.

कृपलानी उपरोधानें म्हणाले, कीं मेनन यांनी देशाच्या संरक्षण व्यवस्थेचें जें चित्र रंगवले, त्याप्रमाणें त्यांच्या नेतृत्वाखालील सैन्याची शक्ति ही वर्धिष्णू असून या सामर्थ्यामुळेंच, १२००० चौरस मैलांचा प्रदेश एकाहि प्रहराशिवाय आपल्याला गमवावा लागला ! यानंतर कृपलानींनीं रशियन वैमानिकांनी, आपल्या लडाखमधील लष्करी महत्त्वाचा ठाण्यावरून विमानोड्डाण करावें या गोष्टीला हरकत घेतली. चिन्यांना हवी असलेली माहिती हे वैमानिक गोळा करतील, अशी शक्यता त्यांनीं व्यक्त केली. मला वाटलें माझी व कृपलानींची ओळख असती तर बरें झालें असतें म्हणजे मी खऱ्या गोष्टी त्यांच्यापुढें ठेवल्या असत्या. देशभक्त म्हणून मला त्यांचेविषयीं मोठा आदर आहे. मी त्यांना हें सांगू शकलों असतों, कीं विरोध होण्याची भीतीच नाही, अशा कांहीं व्यक्तींवर त्यांना झोड उठवणें शक्य होतें. गालिबचा एक शेर मला यावेळीं आठवला.

हम आह भी भरते हैं
तो हो जाते बदनाम ।
वो कातल भी करते हैं
तो चर्चा नहीं होता ।

( मी नुसता श्वास सोडला तरी बदनाम होतो. इतरांनीं खून केला तरी त्याची चर्चाहि होत नाहीं.)

कृपलानी यांनीं माझा निर्देश करून म्हटलें, कीं सध्याच्या 'चीफ ऑफ जनरल स्टाफ' ची नेमणूक करतांना, सरकारनें अधिक लायक अधिकाऱ्यांवर

अन्याय केलेला आहे. नामोल्लेख न करतां ते लेप्ट. जनरल वर्मा यांच्यासंबंधीं बोलत होते. वर्मा यांचावरच्या पदावरील बढतीचा हक्क डावलण्यांत आला होता व लेप्ट. जनरल दौलतसिंग व सेन यांनीं त्यांना खालीं ढकललें होतें. याचा निषेध म्हणून डावलण्यांत आलेल्या अधिकाऱ्यानें (वर्मा) यामुळें निवृत्तीवयापूर्वींच निवृत्ति मागितली आहे असे त्यांचे आरोप होते. कृपलानी यांनी भाषणाच्या अखेरीस मेननवर हल्ला चढवून म्हटलें— 'मला आनंद आहे, कीं संरक्षणमंत्री इथेंच आहेत. मला आशा आहे, कीं देशाचें संरक्षण त्यांनीं ज्या प्रकारानें केलें त्यापेक्षां स्वत:चें संरक्षण ते जरा बरें करतील !'

उत्तरादाखल बोलतांना मेनन यांनीं सांगितलें, कीं आपल्या प्रदेशाच्या सरहद्दीचा अनेक वेळा भंग झाल्यानें आपलें सैन्य अशा रीतीनें विखुरण्यांत आलें आहे, कीं चिन्यांना चंचुप्रवेश करणें अशक्य व्हावें. यामुळें आपल्या सैन्यावर बराच ताण पडला आहे. चीनप्रमाणें खूप सैन्य उभारणें भारताला शक्य नाहीं; किंवा, त्यांच्यासारखी अस्त्रेंही आपल्यापाशीं नाहींत. आपण कुठल्याहि लष्करी दोस्ती करारांत सामील नसल्यानें आपल्याला स्वत:वरच अवलंबून राहावें लागतें. मेनन यांनीं पुढें सांगितलें कीं जर चिनी आपल्या सरहद्दींत आंतवर आलेच, तर त्यांच्या सेनेला रसद पुरविणें दूर अंतरामुळें कठीण जाईल व आपल्या प्रशिक्षित सैन्याशीं त्यांची गांठ पडेल.

आपल्या सैन्याचें नीतिधैर्य पूर्वीं कधींहि नव्हतें एवढें वाढलेलें आहे असें मेनन यांनीं सांगितलें. सेनेंतील बढत्यासंबंधी मेनन म्हणाले, कीं लेफ्ट० कर्नलच्या पदानंतरची बढती ही निवड करून केली जाते व वरच्या पदावर कुणालाहि अग्रहक्क सांगतां येत नाहीं. यांत कुणाला डावलण्याचा प्रश्नच नाहीं. यांत ज्येष्ठत्व ही फक्त विचारांत घेण्यांत येणारी एक बाब आहे.

मेनन म्हणाले, 'कृपलानी यांना सेनेची कांहींहि माहिती नाहीं व ते कधीं या विषयाच्या जवळपासहि आलेले नाहींत. अर्थात त्यांना कुणी येऊंही देणार नाहीं.'

मेनन यांनीं पुढें सांगितलें, कीं कांहीं सेनाधिकाऱ्याना, लोकसभेच्या सभासदांना भेटून त्यांच्याशीं विचारविनिमय करण्याचा खास अधिकार

प्राप्त झालेला दिसतो ! नंतर मेनन यांनीं माझ्या लेफ्ट. जनरल या पदावरील बढतीचें समर्थन केलें.

दुपारच्या जेवणासाठीं जेव्हां लोकसभा तहकूब झाली, तेव्हां नेहरू यांनीं मला लोकसभेंतील त्यांच्या कचेरींत बोलावून घेतलें. माझ्या सैनिकी सेवेचा थोडक्यांत आढावा त्यांनीं मजजवळ मागितला. मी ही माहिती एका कागदाच्या चिटोऱ्यावर लिहून नेहरूंकडे दिली, परंतु सांगितलें, कीं ही माहिती योग्य ठिकाणीं तपासून घ्यावी.

नेहरू आपल्या भाषणांत म्हणाले, कीं आचार्य कृपलानी यांचे निष्कर्ष चुकले तर तें एक समजूं शकते परंतु त्यांनीं ज्या गोष्टींवर हे निष्कर्ष काढले त्या गोष्टीच चुकीच्या आहेत, त्याला काय करावें ? माझ्याविषयीं नेहरू म्हणाले—

'लेफ्टनंट जनरल कौल हे आपले एक अतिशय हुषार व उत्तम असे सेनाधिकारी आहेत. मी पूर्ण जबाबदारीने व विश्वासानें हें सांगतो आहे. माझी खात्री आहे, कीं जर कृपलानी त्यांना ओळखत असते, तर त्यांचेहि हेंच मत झालें असतें. अशा सुरांत सैन्याविषयीं लोकांनीं बोलावें यांचें मला दु:ख होतें. आपलें सैन्य उत्तम आहे, अधिकारीहि चांगले आहेत.'

या गरमागरम चर्चेनंतर मेनन व कृपालानी यांनीं हस्तांदोलन केलें व दोघांनी परस्परांच्या मनांत कांहीं नाहीं असें म्हणत चहा घेतला.

२३ एप्रिल १९६१च्या अंकात 'टाईम्स ऑफ इंडिया' नें माझा बचाव करतांना लिहिलें—

'सोविएट हेलिकॉप्टर हें आग्नेय सरहद्दीवर वापरण्यास योग्य आहे कीं नाहीं, हें पाहण्याची कौल यांना उत्सुकता होती. या प्रयत्नांत त्यांनीं आपला जीव धोक्यांत घातला व बराच त्रास घेतला. परंतु हा तर कौल यांचा बाणाच आहे. ते अतिशय काटक व दणकट आहेत. सामान्यत: ते मोठे गोड गृहस्थ आहेत, परंतु मूर्ख माणसांशीं त्यांना जमवून घेतां येत नाहीं, असा त्यांचा लौकिक आहे. मुख्य म्हणजे ते काम पुढें रेटणारे गृहस्थ आहेत. स्वत: अतिशय कष्टाळू असल्यानें त्यांना इतरांचा कामचुकारपणा सहन होत नाहीं श्री. कौल यांचा स्वभाव इतका आकृष्ट करणारा आहे, कीं आसपासच्या माणसांनाहि ते उत्साहानें भारून टाकतात.

जीवनांत कांहींतरी प्रयोजन सांपडलेला हा माणूस आहे व हें प्रयोजन दैनंदिन लहानसहान कामांना व्यापूनहि उरणारें आहे. चटकन् निर्णय घेऊन अतिशय झपाटयानें ते कामाला अशी गति देतात कीं, ती इतरांना पेलणें कठीण जाते ...'

जरी मधुनमधून अशा प्रकारची स्तुति माझ्या वाटयाला येत होती, तरी आतांपर्यंत माझ्यावर उठली नव्हती अशी झोड आतां उठूं लागली होती. याचें कारण बहुधा माझा मेननशीं असलेला संबंध हें असावें. मेनन हे संरक्षण मंत्री झाले, याचा कांहींना संताप आलेला होता. पण ते त्या जागीं निवडले गेले, याला कांहीं मी जबाबदार नव्हतो. जर त्यांना असें वाटत असेल कीं, त्यांनीं लष्करी हिताला बाधक असें जें जें पाऊल उचललें, त्याला मी साथ दिली, तर मी, कुणी याला आक्षेप वगैरे घेईल असें भय न बाळगतां सांगतो, कीं मी अशी गोष्ट केलेली नाहीं व वाचकाला हें पुस्तक वाचल्या-नंतर, ही गोष्ट समजून येईल. मेननच्या अधिकारपदाचा वरच्या जागीं जाण्यासाठीं मला उपयोग झालेला नाहीं व माझ्या वरिष्ठांनीं शिफारस केली, तेव्हांच मी वरच्या जागीं गेलेलो आहे. मेनन यांच्या संबंधांत माझी वास्तविक भूमिका जी सांगितली गेली तशी नाहीं. मी या गुंतागुंतीच्या स्वभावाच्या माणसाशीं खंबीरपणानें वागलों व लष्करी पेशाला हितकारक अशाच रीतीनें त्यांच्याबरोबर काम केलें.

कांहीं दिवसांपूर्वींच, विश्वसनीय ठिकाणाहून माझ्या असें कानीं आलें, कीं चिन्यांचा बारहोटी येथें ठाणें प्रस्थापित करण्याचा इरादा आहे. बर्फ वितळ-ल्यावर या वर्षी ते ही गोष्ट करणार होते. मी थिमय्यांना ही गोष्ट सांगितली. त्यांनीं हें मान्य केलें कीं चिन्यांना आपण यापासून रोखलें पाहिजे.

मी कॅप्टन कुमार यांच्या हाताखालीं कांहीं सैन्य तुकडया दिल्या व त्यांनीं १५,००० फूट उंचीवरील बारहोटी या ठिकाणीं भारतीय निशाण रोवलें. विमानमार्गे या ठिकाणीं, सामुग्री व रसद धाडून मी हें ठाणें मोठया हिकमतीनें सुस्थितींत ठेवलें.

थापर यांनीं सेनाप्रमुख म्हणून एप्रिल १९६१ मध्यें अधिकार स्वीकार केला. थापर हे अत्यंत प्रामाणिक, निःपक्षपाती व कार्यक्षम होते. आपलीं मतें आपल्या वरिष्ठांच्या हजेरींतहि निर्भिडपणें मांडण्यास ते कचरत नसत.

माझा दिल्लीला ज्यांच्याशीं विशेष संबंध येत असे, ते अधिकारी म्हणजे लेफ्ट. जनरल वडालिया; डेप्युटी चीफ ऑफ स्टॉफ, जनरल पी. पी. कुमारमंगलम्, ॲडज्युटंट जनरल; लेफ्ट जनरल आर. के. कोचर क्वार्टर मास्टर जनरल; व बढत्या व नेमणुका करण्याची लष्करी चिटणीसाची जागा संभाळणारे मेजर जनरल मोतीसागर.

मी सकाळीं लवकर उठत असे व तेथपासून रात्रीं उशीरा अंथरुणावर पडेपर्यंत, सारखा काम करीत असे. मला खास संवयी अशा कांहीं नव्हत्या. अंथरुणांतच चहा घेण्याचा षोक मी क्वचितच केला. दूध व व फळें हा माझा सकाळचा आहार असे. सायंकाळपर्यंत न विश्रांती घेतां मी काम करीत असे. दिवसाचे सर्वसाधारणपणें अठरा तास मी काम करीत असे व मध्यरात्र उलटल्यावर झोपायला जात असे. मी दुसऱ्या दिवसावर कसलेंच काम ढकलीत नसे. मी लिफ्ट क्वचितच् वापरीत असे व जवळ जवळ धांवतच जिना चढून कचेरींत शिरत असे. सुदैवानें माझी शरीरप्रकृती उत्तम होती व शारीरिक व मानसिक ताण सहन करणें मला शक्य होत असे.

'चीफ ऑफ दी जनरल स्टाफ' या जागेवर रुजूं झाल्याबरोबर, माझ्या हें ध्यानांत आलें, कीं आपल्या प्रचंड सरहद्दीवर शत्रू पाय रोवून उभा आहे. लडाख पासून नेफापर्यंत, पाकिस्तान व चीन यांनीं भेडसावण्यास सुरुवात केली होती. नागांचा प्रश्न होता. गोव्यांत पोर्तुगीजांचा प्रश्न होता. सर्वांत संकट होतें, तें पाकिस्तान व चीन यांच्या पाप-युतीच्या शक्यतेचें. या दोघांचा, सरहद्दीवर सैन्याच्या सतत हालचाली करून आपल्यावर कायमचें दडपण ठेवण्याचा हेतू स्पष्ट दिसत होता. नेहरू व त्यांचे सहकारी यांना मात्र वाटत होतें, कीं या देशांबरोबरचे आपले प्रश्न शांततेनें सुटूं शकतील.

भारताच्या संरक्षण योजनेंतील लष्करी हालचाली, शस्त्रास्त्रें व सामुग्री या सर्व बाबतींत महत्त्वाच्या असलेल्या अशा जागेवर काम करण्याची माझी ही पहिलीच वेळ होती. आतांपर्यंत या गोष्टींशीं माझा थेट संबंध नव्हता व यापेक्षां खालच्या पातळीवरून मी या गोष्टींकडे पाहात असे. आतां मी चीफ ऑफ जनरल स्टाफ होतांच, भारतीय सेना ही आहे त्या स्थितींत, या संकटांना

तोंड देण्याच्या पात्रतेची आहे कीं नाहीं याचा आढावा मी घेऊं लागलो. जर नसेल तर कमतरता काय आहे व परिस्थिति सुधारण्यासाठीं काय पावलें टाकलीं पाहिजेत, हें मला पाहावें लागणार होतें. या वेळीं मला पार्श्वभूमीची नीट कल्पना असावी म्हणून, आघाडीवरील ज्या उंच उंच ठिकाणीं आपल्याला संरक्षणाची योजना करायची होती, त्या जागा प्रत्यक्ष पाहण्याची गरज वाटूं लागली. लडाख ते नेफा व नागालँड, या २५०० मैल सरहद्दीवरील महत्त्वाचीं ठाणीं व ठिकाणें यांना मी अनेक वेळां भेटी देऊन आलों. नकाशांत एखादें ठिकाण पाहणें किंवा त्यासंबंधीं फायलींतून वाचणें यापेक्षां प्रत्यक्ष पाहाणें याला फार महत्त्व असतें. आपला ज्येष्ठ अधिकारी कठीण अशा विभागांत आपल्यांत आलेला पाहून, सैन्यालाहि मोठा आनंद होतो. यासाठीं माझे पुष्कळ महिने खर्ची पडले.

अधिक मनुष्यबळाची व अधिक सामुग्रीची आपल्याला किती गरज आहे, ही गोष्ट या प्रत्यक्ष पाहणीनंतर माझ्या ध्यानांत आली.

लष्करी बातम्या मिळवण्यासंबंधीं मला असें आढळून आलें, कीं पर-देशांच्या सैन्यासंबंधी माहिती जमवण्याचें काम गृहखात्याच्या 'इंटेलिजन्स ब्युरो' कडे होते. अपुऱ्या साधनांनिशीं हें काम ते करीत असल्यानें, त्यांनीं काढलेले निष्कर्ष हे जेवढे बिनचूक असावयास हवेत तेवढे ते नसत व ते जितक्या जलद गतीनें आघाडीवरील सेनापथकाला पोहोंचायला हवेत तितक्या जलद गतीनें ते पोहोंचतहि नसत.

आपल्या सैन्याच्या शिक्षणाच्या बाबतींत सांगायचें तर वैयक्तिक व सामुदायिक चांचण्या खूपच घेतल्या जात असल्या, तरी या सर्व जुनाट व अपुऱ्या साधनांनिशीं घेतल्या जात असत. कारण आधुनिक शस्त्रास्त्रें पुरेशा संख्येनें उपलब्धच करण्यांत आलेलीं नव्हतीं. आपलीं शिक्षण केंद्रें हीं संख्येनें कमी होतीं व दूरवर पसरलेलीं होतीं. पुनः पुनः विनंती करूनहि सरकारनें हव्या त्या गोष्टी, हव्या त्या ठिकाणीं पुरवलेल्या नव्हत्या. कदाचित त्या त्या भागांतील कारखानदारी व शेती यांच्या वाढीमुळें हें शक्य झालें नसेल. परंतु हा महत्त्वाचा प्रश्न कांहींहि करून सोडवायला हवा होता.

डावपेचांचा विचार केला, तर चिन्यांच्या लढाईच्या तंत्रावर अधिक सरावानें व अभ्यासानें आपण प्रतिकाराचा उपाय शोधून काढूं शकलों



*लडाख मध्यें १९६० सालीं ॲेअर व्हाईस मार्शल पिंटो व लेखक [ हिंवाळी कपडे घातलेले ]*

असतो, याचा दोष सरकारवर जात नाहीं. निरनिराळ्या पातळीवरील ज्येष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनीं आपल्या पेशांत केलेला हा हलगर्जीपणा होता सर्वच जनरल स्टाफ व इतर आर्मी व डिव्हिजनल कमांडर यांनीं या गोष्टीकडे अधिक लक्ष द्यावयास हवें होतें. त्यांना जर यांत कांहीं अडचण येती, तर त्यांनीं ती वरिष्ठांच्या नजरेस आणायला हवी होती. आमच्या-पैकीं कुणीहि हें होते आहे कीं नाहीं हें पाहिलें नाहीं. गनिमी काव्याच्या लढाईचें खास शिक्षण, किंवा आहे त्या साधनांनीं लढायचें कसें याचें शिक्षण दिलें गेलें असतें, तरी मनुष्यबळ व साधनसामुग्री यांचा जो तुटवडा होता त्याची झळ कमी झाली असती. भारतीय सेनेंतील सर्व जनरलची ही जबाबदारी होती. १९६१-६२ या काळांत ' चीफ ऑफ जनरल स्टाफ ' या नात्यानें या हलगर्जीपणांतील माझा वाटा स्वीकारण्यास माझी तयारी आहे.

भारत व चीन यांचें संबंध हळूहळू बिघडत चाललेले होते. आपल्या

सरहद्दीचा चिन्यांकडून भंग होण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत होतें. भारतानें चीनकडे पुनः पुनः निषेध नोंदवला होता, परंतु त्याचा कांहींच उपयोग होत नव्हता. लडाख भागांत जिथें आपलीं ठाणीं बांधलेलीं नव्हतीं वा चौक्या नव्हत्या अशा भागांत आपल्या प्रदेशांत पुढें घुसून आपली लष्करी ठाणीं निर्माण करण्याचा डाव चिनी खेळत होते. नंतर नंतर ते अधिक अधिक चढाईखोर होत गेले. कांहीं ज्येष्ठ सेनाधिकाऱ्यांनीं लोकांच्या भावनांचा उदो उदो करून, या परिस्थितींत आपल्यावरील दोष टाळण्यासाठीं राजकीय वर्तुळांतून अशी समजूत पसरविण्यास सुरुवात केली, कीं चिन्यांचें आपल्या प्रदेशांतील आक्रमण थोपवण्याची त्यांची तयारी असतांना, नेहरू व मेनन हे त्यांच्या आड येत आहेत. हें फुकट बोलणें होतें. प्रत्यक्षांत परराष्ट्र खात्यांतील एका तज्ज्ञानें अनेक वर्षांपूर्वीं जेव्हां असा प्रस्ताव केला, कीं आपण आपल्या प्रदेशांत आपला अधिकार प्रस्थापित करण्यासाठीं चीन करीत आहे त्याचप्रमाणें, लडाख ते नेफा या संपूर्ण सरहद्दीवर निदर्शक लष्करी ठाणीं व चौक्या निर्माण कराव्या, तेव्हां लष्करी वरिष्ठांनीं, हा प्रस्ताव स्वीकारण्यास असमर्थता प्रगट केली. कारणें दिलीं, कीं अनेक प्रकारची कमतरता आहे व अशा तऱ्हेची लहान लहान ठाणीं निर्माण करणें हें त्यांच्या दृष्टीनें लष्करीदृष्टया सदोष आहे. मध्यंतरीच्या काळांत आपल्या सरकारनेंहि सेनेला ज्या गोष्टीची कमतरता होती, त्या गोष्टी पुरवण्यासाठीं आवश्यक ती उपाययोजना केली नाहीं. परिणाम असा झाला, कीं चीननें आपला प्रदेश मनांत येईल तसा व्यापण्यास सुरुवात केली. ही गोष्ट पुनः पुनः घडूं लागतांच, देशांतील अनेक भागांतून चीनविरुद्ध कडक उपाय योजण्यासाठीं जोराची मागणी सुरूं झाली.

या कालखंडांत नेहरूंनीं मला अनेक वेळां भेटीस बोलावलें. यावेळीं सरहद्दीच्या संरक्षणाचा प्रश्न चर्चिला जात असे. मी सांगितलें, कीं सशस्त्र दलें हीं प्रमुख लष्करी कचेरीकडून पुनः पुनः निवेदनें आलीं असतांनाहि, बळकट करण्यांत सरकारनें वर्षानुवर्षे कसूर केली आणि म्हणून आतां चीनशीं परिणामकारक मुकाबला करण्याच्या स्थितींत आपण नाहीं. नेहरूंना माझें हें बोलणें आवडत नसे.

परराष्ट्र खात्याच्या कचेरींत विरोधी नेत्यांनीं नेहरूंशीं एक गुप्त भेट घेतली. संरक्षण मंत्री, सेनाप्रमुख व मी हे या बैठकीला हजर होतो. नेहरूंनीं आपल्या सरहद्दीवरील लष्करी परिस्थितीचा आढावा त्यांचेपुढें घेतला. नेहरूंनीं केलेला खुलासा ऐकून घेण्याच्या मनस्थितींत हे पुढारी नव्हते. एका विरोधी नेत्यानें नेहरूंना सुनावलें—

'इन्सान को दो चीझ प्यारी होती हैं। जमीन और स्त्री। आपने चिनीं-ओंको १२००० स्केअर मील जमीन तो दे दी, क्या अब हमारी स्त्रीयों भी उनको देनेका इरादा है ?'

हें ऐकून नेहरूंचा चेहरा तांबडा लाल झाला, परंतु ते अक्षरहि बोलले नाहींत.

या विषयासंबंधीं लोकांत टीकेचा जोर वाढत आहे, याची नेहरूंना कल्पना होती. पण आपल्या सेनेच्या मार्गांत ज्या अडचणी होत्या, त्याहि त्यांना ठाऊक होत्या. कांहीं तरी मधला मार्ग काढावा, युद्ध तर सुरू होणार नाहीं परंतु चिन्यांना पायबंद तर बसेल, असें कांहीं लोकांच्या समाधानासाठीं करावें यासाठीं नेहरू उत्सुक होते. या दृष्टीनें १९६१ च्या शरद ऋतुंत नेहरूंनीं आपल्या खोलींत एक बैठक बोलावली. कृष्ण मेनन, जनरल थापर व मी हजर होतो. प्रथम एका लष्करी नकाशावर नेहरूंनीं चीननें आपल्या प्रदेशांत आक्रमण केलेल्या सर्व जागा पाहिल्या. ते म्हणाले कीं, जो कोणी लष्करी ठाणें विवक्षित प्रदेशांत निर्माण करील, तोच त्या प्रदेशावर हक्क सांगणार. कारण कायद्यांत प्रत्यक्ष ताबा असणें हा नऊ दशांश अधिकार समजला जातो. जर चिनी लष्करी चौक्या उभ्या करूं शकतात तर आपण कां करूं नयेत ? त्यांना सांगण्यांत आलें, कीं संख्याबलाची व दळणवळणाची अडचण असल्यानें, या बाबतींत आपण चिन्यांची बरोबरी करूं शकत नाहीं. जरी प्रतिचढाईचा भाग म्हणून आपण अधिक ठाणीं निर्माण केलीं तरी तीं संभाळणें भौगोलिक अडचणीमुळें दळण-वळणाभावीं शक्य होणार नाहीं. शिवाय चीन जवळ सैन्यबळ अधिक व उत्तम प्रकारचें असल्यानें, लष्करी हालचाली करून ते आपली ठाणीं टिकूं देणार नाहींत. तरीसुद्धां आपण कांहीं नांवापुरतीं ठाणीं बांधलीं आहेत व तीं आपण प्रयत्नांनीं टिकवलीं आहेत.

यानंतर चर्चा झाली. याचा मतितार्थ मला समजला तो असा, कीं ठाणीं प्रस्थापित करण्याच्या बाबतींत आपण चीनप्रमाणेंच त्यादी पुढेंमागें करण्याचा डाव खेळावा. ते जर एका ठिकाणीं पुढें आले, तर दुसऱ्या ठिकाणीं आपणहि पुढें जावें. थोडक्यांत शक्यतों जो आपला प्रदेश आहे असें आपण म्हणतो, त्या प्रदेशांत लाक्षणीक अशीं कांहीं ठाणीं आपण संभाळावी व चीनला तोंड देत राहावें. या आपल्या संरक्षणात्मक पवित्र्यानें, चीनला फारतर चीड येईल, पण यापेक्षां अधिक कांहीं होणार नाहीं. मला वाटते अशा रीतीनेंच सरहद्दीवरच्या आपल्या नव्या धोरणाची सुरुवात झाली. (यालाच कुणी 'आगेकूच' धोरण म्हणत असत.) वर्ष अखेरीस आपण अशी पन्नास ठाणीं लडाख व नेफा भागांत उभी केली व २००० चौरस मैलांच्या भारतीय प्रदेशावरील आपला हक्क प्रस्थापित केला.

राज्य शासनाच्या दृष्टीनें हीं ठाणीं प्रस्थापित केलेलीं नव्हतीं, कारण त्या ठिकाणीं लोकवस्तीच नव्हती. परंतु चीननें अक्साई चीनमध्यें जें केलें त्याची पुनरावृत्ति त्यांनीं नेफामध्यें व लडाखमध्येंहि करूं नय, यासाठीं हें केलेलें होतें.

मला वाटतें नेहरूंनीं हें जें धोरण आंखलें, ते मुख्यत: लोकसभेंत व जनतेला कांहीं तरी सांगण्यासाठीं आंखलेलें होतें. कदाचित चिन्यांशीं त्यांचाच डाव खेळण्यासाठींहि हें धोरण अंगिकारलें असेल. टीकाकारांना यामुळें उत्तर देतां येईल असें त्यांना वाटत होते. विरोधी पक्षांनीं नेहरु ज्या पद्धतीनें सरहद्दीवरचा प्रश्न हाताळीत होते, त्याबद्दल सतत व वस्तुस्थितीचा विचार न करतां जी टीका लोकसभेंत चालविली होती, त्यामुळें नेहरू या परिस्थितींत येऊन पोंचले होते. (या नंतर परिस्थिति अशा रीतीनें चिघळत गेली कीं त्यांतून चिनी व आपण यांच्यांत १९६२ मध्यें संघर्ष उडाला व भारतांतील प्रत्येकाला हा एक मोठाच धक्का बसला.)

१९६१ मध्यें एकदां बी. के. नेहरू यांनीं जयप्रकाश नारायण यांचे बरोबर जेवण्यासाठीं मलाहि बोलावलें. जयप्रकाश यावेळीं ६४ वर्षांचे होते. ते अतिशय निगर्वी व उदार आहेत व प्रकाशांत वावरण्याची धडपड न करतां ते साधेंसुधें जीवन जगतात. जयप्रकाश यांचेविषयीं माझ्या मनांत नितांत आदर आहे व एके काळीं नेहरूंचें वारस म्हणून मी त्यांचेकडे पाहात होतो.

त्यांची सचोटी व राष्ट्रभक्ति थोर आहे. भ्रमनिरास झालेला असला तरी त्यांनीं सार्वजनिक जीवनांतून संन्यास मात्र घ्यावयास नको होता. त्यांनीं अधिकार न स्वीकारतांहि आपली खूप सेवा केलेली आहे. मनाची स्थिरता, व्यावहारीक दृष्टी व समतोलपणा त्यांचेपाशी आहे. परिस्थितीची विपरीतता मात्र अशी, कीं ते जेव्हां जेव्हां भारत–काश्मीर, भारत–नागा किंवा भारत–पाक संबंधांविषयीं बोलतात, तेव्हां त्यांची निष्ठा ही संशयास्पद म्हटली जाते. त्यांच्या शहाणपणाची तेच लोक कदर करीत नाहींत, कीं ज्यांची त्यांनीं फार सेवा केलेली आहे. कांहीं दिवसानंतर इतरांकडून जेव्हां तशाच तडजोडी सुचवल्या जातात, तेव्हां त्या इतरांची मात्र वाहवा होते !

मेजर जनरल हरिचंद बख्वार यांची व माझी १९४६ सालापासून ओळख होती. दुसऱ्या महायुद्धांत ते जपानच्या कैदेंत होते व त्या काळांत त्यांचे जपान्यांनीं पुष्कळ हाल केले, तरी त्यांची निष्ठा डळमळली नाहीं. १९६१ मध्यें त्यांना लंग्ज कॅन्सर झाल्याचें लक्षांत आलें. आतां फक्त कांहीं काळ ते जिवंत राहणार होते. ते मुंबईला होते. तिथें जाऊन मी त्यांना ताबडतोब भेटलो. त्यांच्या बोलण्यांत आलें, कीं अमेरिकेंतील थोर कॅन्सर तज्ञ डॉ. पेक् यांचे उपचार करून घेण्याची त्यांची इच्छा होती.

दिल्लीला येतांच हरिचंद यांना अमेरिकेंत धाडण्यासाठीं पैसे जमवण्याचा मी प्रयत्न केला. मी प्रथम मला शक्य होते ते पैसे या फंडाला दिले व इतरांना विनंती केली. आपल्या सहकाऱ्यांविषयीं लांबलांब बाता ठोकणाऱ्यांनीं, या फंडाला दिडकीची मदत दिली नाहीं. मी निराश झालों. मात्र मध्यंतरी भारतांतील अमेरिकेचे वकील गॅलब्रेथ यांचेकडून हरिचंद यांना आशादायक उत्तर आलें व त्यांनीं मदत देण्याचें अभिवचन दिलें.

अशा परिस्थितीत परकीय सरकारनें मदतीला येण्यापेक्षां, आपलें सरकार मदतीला धांवले तर तें अधिक योग्य व सन्माननीय होईल, म्हणून मी मेनन व नेहरू यांच्याकडे अनौपचारिकपणें यासंबंधीं बोललों. त्यांनीं मला सांगितलें, कीं त्यांना असा सल्ला मिळाला, कीं सरकारला अशा बाबतींत आर्थिक मदत करणें शक्य नाहीं, कारण यामुळें चमत्कारिक पायंडा पडेल. एक चांगला माणूस मरणाच्या दारांत होता व केवळ नवा पायंडा पडेल म्हणून मदत मिळूं शकत नव्हती ! नेहरूंनी मोठ्या अनिच्छेनें या बाबतींत

अमेरिकन वकिलातीची मदत घेण्याची परवानगी दिली. योगायोग असा, कीं चेस्टर बौल्स हे दुसऱ्याच दिवशीं दिल्लीला आले. मी गॅलब्रेथ यांचेमार्फत बौल्स यांची त्यांच्या निवासांत भेट घेतली. मी विनंती केली, कीं हरिचंद व त्यांची पत्नी यांना बौल्स यांनीं, आपल्या खासगी विमानांतून अमेरिकेला न्यावें, कारण तीन दिवसांत ते अमेरिकेला परतणार होते. बौल्स यांनीं हें तात्काळ आनंदानें मान्य केलें.

बौल्स यांनीं हरिचंद यांना केवळ अमेरिकेंत नेलें नाहीं, तर अमेरिकन सरकारच्या खास परवानगीनें त्यांना मोफत रुग्णालयांत ठेवण्याची परवानगी दिली. बौल्स यांनीं अध्यक्ष केनेडी यांना भेटून ही गोष्ट व इतर सवलती मिळवून दिल्या. असा माझा समज आहे. कांहीं महिन्यांच्या औषधोपचारानंतर, हरिचंद नोव्हेंबर ६१ मध्यें भारतांत परतले. परंतु कांहीं दिवसांतच त्यांना सर्दी झाली व आश्चर्य असें, कीं कॅन्सरचा हा रोगी गेला तो 'ब्रॅंककायटीस्'नें.

माझी मुलगी अनुराधा व तिचा नवरा अजय सप्रू अशीं दोघें कलकत्त्याला मधुचंद्रासाठीं गेलीं होतीं. तीं दोघें आठवडाभर तिथें असतील नसतील तोंच नागालॅंडमध्यें गडबडीला सुरुवात झाली. अजय सप्रू यांचें लढाऊ विमानांचें पथक नेफामध्यें होतें. अजयनें ताबडतोब नागालॅंड मधील कामगिरीवर जाण्याची तयारी दाखविली व त्याला पूर्व सरहद्दीवर कुठें तरी धाडण्यांत आलें. नवीनच लग्न झालेल्या अनुला हा मोठाच धक्का बसला. कांही दिवसांनीं ती आमच्याजवळ राहावयास आली. तिला बरें वाटत नव्हतें, म्हणून वैद्यकीय तपासणी करविली तों तिच्या शरीरांत दोन मोठाले मांसाचे गोळे तयार झाल्याचे दिसून आले. ताबडतोब तिला शस्त्रक्रियेसाठीं मुंबईला नेलें. अनु बरी होऊं लागली, तोंच अजयचें उजवें फुपफुस काम करत नाहींसें झाल्याचें वृत्त आलें. मी त्याला औंध येथील रुग्णालयांत तांतडीनें नेलें व तिथें कर्नल चाक यांनीं त्याच्यावर मोठी शस्त्रक्रिया केली. अजयच्या या आजारानें अनुच्या मनावर परिणाम झाला. ती तासन्तास एकटीच विचार करीत बसूं लागली. कृश होत चाललेली अनु एक दिवशीं कोसळलीच व डॉक्टरांनीं तिला मानसिक दुर्बलता आल्याचें सांगितलें. हा अखेरचा आघात होता. तिला या अवस्थेंत पाहतांना हृदय फाटून जात असे.

दुर्दैवानें माझ्या विरुद्ध कट केल्यासारखें दिसत होतें. मला सर्वकाळ एकटें एकटें वाटूं लागलें.

कांहीं वर्तुळांत तर आतां असा सूर निघूं लागला होता, कीं मी नेहरूंचीच जागा घेणार. ७ ऑक्टोबर १९६१ च्या 'करट'च्या अंकांत कराकानीं लिहिलें—

'कौल हे सहसा तोंड उघडत नाहींत व जें उघडतात तें फक्त आज्ञा देण्यासाठींच. आज्ञा देण्याच्या स्थितींत असल्याखेरीज ते आज्ञाहि देत नाहींत. स्वस्थ राहतात. कौल यांचेवर लक्ष ठेवलें पाहिजे. ते पुढें नुसते 'चीफ ऑफ आर्मी स्टाफ' होणार नाहींत तर एखादे दिवशीं ते भारताचे पंतप्रधानहि होतील...'

कांहीं राजकारणी माणसें व सेनाधिकारी यांना हें कधींच घडावयास नको होतें, तेव्हां त्यांनीं असूयेनें माझी जनमानसांतील प्रतिमा खलास करण्यासाठीं पावलें टाकलीं. शक्य त्या मार्गांनीं व साधनांनीं त्यांनीं हें केलें.

ऑगस्ट १९६१ मध्यें थापर यांचे बरोबर मी इंग्लंडला गेलो. तेथें लॉर्ड माऊंटबॅटन यांनी एक मोठी नाविक-प्रदर्शनी चांचणी आंखली होती. तिला हजर राहण्यासाठीं आम्ही गेलो होतो. अनुच्या आजारपणामुळें मी हा प्रवास टाळण्याचा प्रयत्न केला; परंतु माझी पत्नी धन्नो हिनें अनुकडे पाहिलें व मी माझ्या कर्तव्यांत व्यत्यय आणूं नये, असें आग्रहपूर्वक सांगितल्यानें, मी निघालो होतो.

इंग्लंडला अठ्ठावीस वर्षांनंतर मी पुन: जात होतो. तिथें माऊंटबॅटन यांच्या आग्रहावरून मी 'वॉर ऑफिस'च्या अधिकाऱ्यांपुढें भारतीय सेनेपुढल्या कांहीं प्रश्नांवर भाषण केलें.

लंडन मधील 'टाईम्स ऑफ इंडियाचे वार्ताहर, जी. के. रेड्डी व त्यांची पत्नी कांता, तसेंच लंडनमध्यें निवृत्त जीवन घालवणारें मेजर जनरल पी. एन्. चौधरी व त्यांची पत्नी त्रिपत यांचा पाहुणचार घेऊन, मी पॅरिसमार्गे बर्लिनला, दोन दिवसांच्या रजेवर, विमानानें गेलो.

हिटलरच्या राजवटींत, मी बर्लिनला मागल्या वेळीं आलेलो होतो. त्या

वेळेनंतर बर्लिननें दुर्दैवाचे दशावतार पाहिले व केवळ दुर्दम्य अशा इच्छा-शक्तीच्या बळावर तें शहर अजून तग धरून उभें होतें. आपल्या माय-देशाला पुन्हां एकदां वैभवाप्रत नेण्यासाठीं जर्मनांनी अपार कष्ट केले होते. सर्वांनीं हें मान्य केलें होतें, कीं अत्यंत वेगानें जर्मनांनीं पुन: आपलें पुनर्वसन घडवलें होतें.

महिनाभरापूर्वीच तिथें पूर्व व पश्चिम बर्लिन यामध्यें उभारलेल्या 'भिंती' संबंधी मी अनेक जर्मनांजवळ बोललो. जर्मन राजधानीचे चार विभाग करण्यांत आले आहेत. या संबंधींहि मी विषय काढला. मला असें आढळून आलें, कीं बर्लिनची फाळणी करणारी 'भिंत' ही सर्व-साधारणपणें अप्रिय आहे. कांहीं जर्मनांनी याविषयीं कांहीहि मतप्रदर्शन करण्याचें नाकारलें. कांहींजण मात्र मोकळेपणानें बोलले. ही भिंत उभी केल्याबद्दल व बर्लिनचा कबजा चालू ठेवल्याबद्दल त्यांनीं नापसंती व्यक्त केली. त्यांना या गोष्टी देशाचा उघड उघड अपमान करणाऱ्या वाटतात.

रात्रीं मी हॉटेलांत माझ्या खोलींत एकटा होतो. दिल्लीला माझ्या मुलीचें कसें असेल ही काळजी मला लागलेली होती. मी परदेशांत आलो हें योग्य केलें नाहीं, मला तिच्याजवळच शुश्रुषेसाठीं राहायला हवें होतें असें माझ्या मनानें घेतलें. इतक्या दूर इथें मी अगतिकपणें बसून होतो आणि कदाचित् तिला तिकडे माझी आवश्यकता वाटत असेल. गेल्या कांहीं वर्षांत माझ्या समकालिनांनीं व इतर शत्रूंनीं, माझ्या उत्कर्षाची असूया वाटून मला खालीं ओढण्याचें व माझी जनप्रतिमा डागळण्याचें काय काय यत्न केले, या विचारां-नींहि मी हैराण झालो होतो.माझी देशभक्ति व स्वाभिमानाची भावना यावर प्रहार करण्यांत आले होते. असे एकहि व्यासपीठ मला उपलब्ध नव्हतें, कीं जेथून मी माझी बाजू मांडून सत्य प्रकाशात आणू शकलो असतो आधींच कठीण जबाबदाऱ्या अंगावर पडलेल्या असतांना, माझ्यावर होणारी चिखल-फेकें पाहून माझ्या मनावर अतिशय ताण पडत गेला व मला हें सगळें जग दुष्ट माणसांनीं भरलेलें दिसू लागलें. मी आतांपर्यंत हें पुष्कळ काळ सहन केलें होतें, पण आतां मात्र मी अगदीं सहनशक्तीच्या कडेवर आलो होतो. मला हें समजत होतें, कीं माणसानें संकटाला धीरानें तोंड दिलें पाहिजे व हातपाय गाळून उपयोगी नाहीं. परंतु असा कुणी मनुष्य असेल का, कीं

जो स्वत: म्हणूं शकेल, कीं मनानें अगदीं मोडून जावें अशी मनस्थिति त्याच्या आयुष्यांत, विवक्षित परिस्थितीच्या रेट्यामध्यें सांपडल्यानंतर त्यानें कधीं अनुभवलीच नाहीं? खरें सांगायचें तर बहुतेक जण कितीहि मनोधैर्य जवळ असूनहि, केव्हांना केव्हां ही स्थिति अनुभवतातच. मात्र ही गोष्ट मान्य करणें त्यांना कमीपणाचें वाटतें. माझ्यापुरतें सांगायचें तर मी अशा स्थितीला पोहोंचलो होतो, कीं मला सर्व गोष्टींचा उबग आला होता व मला कशाविषयीं आतां कांहींहि वाटत नाहींसें झालें होतें.

सूर्य आतां मावळला होता. मी खोलींत एकटाच होतो. दूर कुठें तरी मला खिन्न सूर ऐकूं येत होते. माझा घसा दाटला होता व मी तहानेनें व्याकूळ झालो होतो. माझ्या कपाळाच्या शिरा थडाथडा उडत होत्या. नाडी जलद धांवत होती व हृदयाचे ठोके वाढले होते. मला अतिशय उदास वाटत होतें— अस्वस्थ वाटत होतें. या खिन्नावस्थेंत मी अंथरुणावर पडून विचार करीत होतो, कीं माझें दुर्दैव संपणार आहे कीं नाहीं--हें दु:खानें भरलेलें जीवन किती निरर्थक आहे. याच वेळीं मी स्वत:ला याची आठवण करून दिली, कीं झगडत हें राहिलेंच पाहिजे. कितीहि संकटें आलीं तरी मर्दपणानें दुर्दैवांचा चिकाटीनें मुकाबला केला पाहिजे. मग मोठ्या प्रयत्नानें मी सांवरलो.

मी दिल्लीला परतलो. माझ्या मुलीची व जावयाची प्रकृती अजुनहि सुधारलेली नव्हती. दोघांच्याबद्दल माझें मन तुटत होतें.

*   *   *

गोव्याचें जें उपाख्यान आतां मी वर्णन करणार आहे यांत, माझा हें सांगण्याचा उद्देश नाहीं, कीं हा एक आपला मोठा लष्करी विजय होता. उलट ही गोष्ट किती मामुली होती याची मला योग्य कल्पना आहे. मी हा प्रसंग सांगणार आहे तो एवढ्याचसाठीं, कीं स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आम्ही आपल्या लोकांना परकीयांच्या ताब्यांतील हा भारतीय प्रदेश मुक्त करण्याचें जें वचन दिलें होतें, त्याची पूर्ति आम्ही कशी केली हें कळावें.

दीव, दमण व गोवा यांचा पोर्तुगिजांनीं चारशें वर्षांपूर्वीं कबजा केला. १९४७ सालीं आम्ही स्वतंत्र होतांच या देशांतून फ्रेंच व पोर्तुगिजांनाहि

हाकलण्यास आम्ही उत्सुक होतो. फ्रेंच हे ब्रिटिशांप्रमाणें शांततेनें गेले पण पोर्तुगिजांचा इथेंच राहण्याचा विचार दिसूं लागला. पुन: पुन: प्रयत्न करूनहि पोर्तुगालनें हा प्रश्न मिटवण्याचे प्रयत्न फोल ठरवले.

आपल्या नेत्यांत या प्रश्नावर मतभेद होता. नेहरू आदि कांहीं जणांना असें वाटत होतें, कीं गोवा पोर्तुगीजांपासून मुक्त करणें आवश्यक आहे, कारण परकीय जोखड फेकून देऊन मुक्त होण्याचा आपल्याला जन्मसिद्ध हक्कच आहे. कांहींची अट होती कीं हा प्रश्न शांततेनेंच सोडविला पाहिजे. मोरारजी देसाई हे त्यांतलेच एक होते. १९५६ मध्यें ते मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री असतांना गोव्यांत जाणाऱ्या सत्याग्रहींना अडविण्यासाठीं, त्यांनीं गोवा हद्दीवर पोलीस ठेवले होते.

१९६०–६१ मध्यें गोव्याच्या राष्ट्रीय नेत्यांनीं पोर्तुगीजांविरुद्ध कडक व अर्थपूर्ण उपाय योजण्यासाठीं सरकारवरील दडपण वाढवलें.

गोपी हंडू हे दहा वर्षें सुरक्षा प्रमुख (Security Chief) होते. नोव्हेंबर १९६० मध्यें नेहरूंनीं त्यांची नेमणूक 'इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस' म्हणून गोवा सरहद्दीवरील भागांत मुंबईला केली. पुढच्या सहा एक महिन्यांत हंडू यांनीं गोव्यांत महत्त्वाचीं संधानें बांधलीं व तेथली महत्त्वाची माहिती गोळा केली. लवकरच ते गोवा प्रश्नावरील एक अधिकारी व्यक्ति म्हणून ओळखले जाऊं लागले. १९६१ साल जसें पुढें जाऊं लागले, तसतशी पोर्तुगीजांनीं, गोव्यांतील राष्ट्रीय पुढाऱ्यांवर दडपशाही सुरू केली.

२३ ऑक्टोबर १९६१ च्या सुमारास केव्हां तरी नेहरू ब्रिटन व अमेरिकेला निघालेले असतां, त्यांनीं मुंबईला भाषण केलें. त्यांत त्यांनीं सांगितलें–

'पोर्तुगीजांना गोव्याबाबत शांततेनें वाटाघाटी करण्याविषयीं पुष्कळ वेळा सांगूनहि, त्यांनीं प्रत्येक वेळीं आमचा अपमान केला आहे. जर आमचा प्रदेश खालीं करून पोर्तुगीज निघून गेले नाहींत, तर गोव्याच्या बाबतींत कारवाई करण्याचा आम्हांला अधिकार आहे.'

२८ ऑक्टोबर १९६१ रोजीं मी, लेफ्टनंट जनरल जे. एन्. चौधरी यांचे बरोबर 'चिलखती दलांच्या' संबंधांतील, नगर येथील बैठक आटपून, पुण्याला परतत असतांना, चौधरी यांनीं मला सांगितलें, कीं जर गोव्याविरुद्ध

कारवाई करायची ठरली तर मी योग्य त्या ठिकाणीं शब्द टाकून याची संपूर्ण जबाबदारी त्यांचेकडे द्यावी. (यांत त्यांना भागीदार नको होता.) मी जेव्हां हें संभाषण दिल्लीला गेल्यावर थापर यांना सांगितलें, तेव्हां त्यांना मोठी मौज वाटली.

२४ नोव्हेंबरला संरक्षण मंत्र्यांनीं त्यांच्या खोलींत भरलेल्या बैठकीसाठीं मला बोलावलें तिथें तिन्ही सेनाप्रमुख व हंडू हे हजर होते. मेनन यांनीं आम्हांला सांगितलें, कीं खालील माहिती हातीं आली आहे.

अ) अरेबी समुद्रांत १८ ते २५ नोव्हेंबर या कालांत मार्मागोवा बंदरापासून दीडशें मैल अंतरावर 'सीटो' करारांतील भागीदारांची एक नाविक चांचणी होणार आहे. पाकिस्तानी, ब्रिटिश, अमेरिकन, तुर्की व इराणी जहाजें त्यांत भाग घेणार आहेत. सालाझार यांचा विचार होता कीं ही चांचणी चालू असतांना, भारताशीं कुरापत काढली तर अमेरिका, ब्रिटन व पाकिस्तान यांची काय प्रतिक्रिया होते ती पहातां येईल. अंजदीव बेटावरून १८ नोव्हेंबरला, मुंबईहून कोचीनकडे चाललेल्या 'साबरमती' या व्यापारी जहाजावर, पोर्तुगीजांनी विनाकारण गोळीबार केला. 'साबरमती' जहाज अंजदीव बेटें व कारवार यांचे मधील खाडींतून जात असतांना हा प्रकार घडला होता.

(ब) या कुरापतीनेंहि भारतानें कांहींच प्रतिक्रिया दाखविली नाहीं, हें पाहून पोर्तुगीजांनीं राजाराम नांवाच्या भारतीय कोळचाला २१ नोव्हेंबर १९६१ ला पकडून ठार केलें. याच खाडींत तो मासे धरीत होता.

पोर्तुगालचा पंतप्रधान सालाझार याला अशी आशा वाटत होती कीं, अमेरिकेचे अध्यक्ष केनेडी हे रोमन कॅथॉलिक आहेत व मॅकमिलन साहेबांच्या नेतृत्वाखालचे इंग्लंड आपले मित्र आहे, तेव्हां जर गोवा व भारत यांच्यांत संघर्ष उडाला तर अमेरिका व ब्रिटन हे मदतीला येतील.

पोर्तुगीजांना आशा होती जरी भारतानें गोव्याविरूद्ध लष्करी कारवाई केलीच तरी हल्ला चढवायला व पुरा व्हायला कांहीं आठवडे लागतील. मध्यंतरी हा प्रश्न राष्ट्रसंघांत नेण्याचा पोर्तुगीजांचा विचार होता.

आमच्या बैठकींत असें सूचित करण्यांत आलें, कीं सूड म्हणून आपण

अंजदीव बेटें ताब्यांत घ्यावीत. हंडू यांनी इषारा दिला, कीं हेंच नेमकें पोर्तुगिजांना हवें आहे, कारण त्यांना राष्ट्रसंघाकडे जातां येईल. हंडू यांनीं सुचवलें, कीं ताब्यांतच कांहीं घ्यायचें असेल, तर सगळ्या वसाहतीचाच ताबा घ्या.

कांहीं चर्चेनंतर असें ठरलें, कीं तूर्त कांहीं न करतां कांहीं काळ थांबावें. फक्त भारतीय नौदलाला मुंबई ते कोचीन कारवारमार्ग, या क्षेत्रांत पहारा देण्यास सांगण्यांत आलें. कारवारच्या आसपासचे कोळी घाबरले होते व त्यांनीं मच्छीमारी बंद केली होती. त्यांना संरक्षणाचें आश्वासन मिळावें म्हणून ही योजना होती.

विमानदल प्रमुख एअर मार्शल इंजिनिअर यांनीं कळवलें, कीं जेव्हां आपलें एक कॅनबेरा विमान जवळजवळ ६०० मैल वेगानें कांहीं कामगिरीवर जात होतें, तेव्हां वैमानिकाला राडारच्या पडद्यावर असें आढळलें, कीं एक सुपरसॉनिक जेट विमान पाठलाग करीत आहे. 'कॅनबेरा' पेक्षां दुप्पट वेगानें हें विमान येत होतें; तेव्हां कॅनबेरा विमानानें ताबडतोब तळ गांठला. या वार्तेनें आम्हांला बुचकळ्यांत पाडलें. हें इतक्या वेगानें येणारें विमान कुणाचें असावें? पोर्तुगीजांजवळ अशीं विमानें गोव्यांत आहेत कीं काय? कीं पोर्तुगीजांचा एखादा मित्रदेश त्यांना विमानाची मदत देत आहे? असें असेल तर हा मित्र कोण? या प्रश्नांना उत्तरें मिळालीं नाहींत.

आम्हांला असेंहि कळलें, कीं पाकिस्तान या परिस्थितीचा फायदा घेऊं पाहात आहे. त्यांनीं पंजाब सीमेवर आपल्या फौजांची जमवाजमव करून भेडसावण्यास सुरुवात केली. त्यांच्या अधिकाऱ्यांची व इतर श्रेणींतील सैनिकांची बायकामुलें कांहीं भागांतून हलवण्यांत येऊं लागलीं होतीं. पोर्तुगाल व पाकिस्तान यांचें संगनमत झालेलें आहे अशी यावरून आमची खात्री पटली. मेनन यांनीं नेहरूंना या सर्व घटना सांगितल्या. नेहरू व मेनन या दोघांना गोव्याचा प्रश्न शांततेनें सोडविण्याची इच्छा होती. परंतु पोर्तुगीज त्यांना लष्करी कारवाईकडे ढकलीत होते.

गंभीर परिस्थिति निर्माण झाली आहे, असें ठरवून २८ नोव्हेंबर १९६१ रोजीं, नेहरूंच्या संमतीनें मेनन यांनीं तिन्ही सेनादल प्रमुखांची बैठक बोलावली व त्यांना पोर्तुगालच्या भारतांतील वसाहतीविरुद्ध लष्करी

कारवाई करण्यासाठीं योजना आंखण्यास सांगितलें. तिन्ही प्रमुखांनीं परिस्थितीचा सर्व अंगानें विचार करून चर्चा केली.

हंडू यांनीं सुचविलें होतें कीं, आम्ही कारवाई झपाट्यानें केली पाहिजे. कारण विलंब लागता तर पोर्तुगीजांना संयुक्त राष्ट्रसंघाकडे धांव घेऊन आपली सर्व चढाई थंड पाडतां येईल. गोव्यांतील सैन्यसंख्या सुमारें ४५०० (३५०० पोर्तुगीज व १००० गोवेकर) व दिव-दमण मधली सुमारें १५०० असल्याचें व त्यांच्यांजवळ चिलखती गाड्या, मशीनगन्स व कांहीं तोफखाना आहे, असें हंडू यांनीं कळवलें होतें. (या प्रदेशांत घुसल्यानंतर हा अंदाज जवळ जवळ खरा ठरला.)

आम्ही म्हणूनच असें ठरवलें कीं, पायदळाची दोन ब्रिग्रेड्स्, चिलखती दल कांहीं तोफखाना व इंजिनिअरांची पथकें बेळगांवजवळ व इतरत्र जमा करण्यांत यावीं. कांहीं काळानंतर आम्ही असें ठरवलें कीं, चिलखती दलें वायव्य सरहद्दीवर पाकिस्तानपासून आपलें संरक्षण करण्याकरतां एकवटण्यांत यावींत.

मी वरच्या गोटांत, सैन्यपथकें कोणत्या तारखेपर्यंत एकत्रित करावयाची असें विचारल्यानंतर थापर यांचेकडून कळवण्यांत आलें कीं, पंधरा दिवसांत हें करायचें आहे. मी या तारखेपूर्वी हें काम पुरें करण्याचें मान्य केलें. लेफ्टनंट जनरल चौधरी म्हणाले, कीं पधरा दिवसांत हें करणें कधींहि शक्य नाहीं.

डायरेक्टर ऑफ ऑपरेशन्स ब्रिगेडिअर पालिट व मी या गोव्याविरुद्ध करण्यांत येणाऱ्या लष्करी कारवाईचें नामकरण 'विजय' असें नक्की केलें. 'विजय' हें सांकेतिक नांव सेनाप्रमुखांनीं व सरकार यांनीं नक्की केल्यावर तें आम्ही चौधरी यांना कळवलें.

मेजर जनरल कँडेथ यांना डिव्हिजनल कमांडर नेमण्यांत आलें. अधिकारानुक्रमानें कँडेथ हे चौधरी यांच्या हाताखालीं होतें. कारण चौधरी या विभागांतील ज्येष्ठ कमांडर होते. चौधरी यांचेवर थापर हे सेनाप्रमुख होते. कुणाहि एका व्यक्तीला या लष्करी कारवाईचें श्रेय घेतां येणार नाहीं. सरकारला या कारवाईंत तिन्ही सेनादल प्रमुख साहाय्य करीत होते व त्यांच्यावरच सर्व जवाबदारी होती.

आम्हीं दिलेल्या सूचनांनुसार, चौधरी यांनीं कारवाईचा तपशीलवार आराखडा सादर केला. पालिट यांनी त्याच्यावर खूपच शेरे मारले. मी रण साहित्य व माणसें यांची जमवाजमव २ डिसेंबर पासून सुरू केली. या सर्व उभ्या-आडव्या हालचालींमध्यें सानुकुलता निर्माण करणें, हे गुंतागुंतीचें काम होतें. यांत पुष्कळ अडचणी येत होत्या व लांब लांब प्रवास करावे लागत होते. मेजर जनरल जे. एस्. धीलाँ यांना मी माझा उप-अधिकारी नेमले व मी दिलेल्या आज्ञा कार्यान्वित–– कांटेकोरपणें कार्यान्वित होतील– हें पाहण्याचें काम त्यांच्याकडे दिलें. त्यांनीं तें चोख केलें.

हंडू यांनीं इशारा दिला होता, कीं गोव्यांत पूल व रस्ते उध्वस्त केलेले आढळतील. यासाठींच मी जास्तींत जास्त इंजिनिअर-मदत भारतांतील सर्व भागांतून बेळगांव येथें एकत्रित केली होती.

हें सर्व चालू असतांना चौधरी हे मला भेटायला माझ्या कचेरींत आले. तिथें हंडू होतेच. चौधरी यांनीं विचारलें, कीं या कारवाईसाठीं डिव्हिजनल कमांडर कशासाठीं आम्ही नेमला आहे. हें काम करायला ते स्वत: एकटे पुरे होते, असें त्यांनीं सांगितलें. मी त्यांना कांहींशा थट्टेनें म्हणालों, कीं जो प्रत्यक्ष लढेल असा डिव्हिजनल कमांडर आवश्यक वाटतो. यानंतर त्यांनीं पूर्वीं सांगितलेलीच गोष्ट पुन्हां ठासून सांगितली, कीं त्यांना भीति वाटते, कीं ह्या कारवाईसाठीं करावयाची सर्व जमवाजमव ११ डिसेंबरपूर्वीं होऊं शकणार नाहीं. त्यांनी आतांपर्यंत पुष्कळ युद्ध पाहिलें होतें व अशा गोष्टींना वेळ लागतो, असें ते म्हणाले. मला हा उपदेश पोटांत घालणें कठीण झालें. मी सांगितलें, कीं जसें त्यांनीं युद्ध पाहिलें होतें तसें इतरांनाही युद्ध म्हणजे काय हें माहित होतें व त्यांना त्यांची कामें कशी करायचीं हें शिकवण्याची जरूरी नाहीं. मी त्यांना व सरकारला अभिवचन दिलें होतें, कीं सर्व लढाईसाठीं लागणारी यंत्रसामुग्री बेळगांवजवळ ११ डिसेंबरपर्यंत आणली जाईल. म्हणूनच मी त्यांना पुन: सांगितलें, कीं त्यांनीं मनांत असा संशयहि आणू नये, कीं हे माझ्या हातून कांहीं कारणानें होणार नाहीं. एवढें झाल्यावर घाईघाईनें चौधरी निघून गेले. हंडू यांनीं माझे हात दाबले.

रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष करनाइलसिंग यांच्या सहकार्यानें लष्कराच्या खास गाड्या वाटेंत कसलाहि अडथळा न येतां, अतिशय मोठ्या वेगानें थेट

८२०१० — परिग्र 
९३८८ — २०/१०/८०

बेळगांवपर्यंत गेल्या. बेळगांवकडे जाणारी मुख्य रेल्वेवरील इतर वाहतुक यामुळें बंद करण्यांत आली व यामुळें कांहीं महत्त्वाच्या मुलकी अधिकाऱ्यांना अडकून पडावें लागलें व त्यांनीं नेहरूंकडे ओरडा केला. मी नेहरूंना सांगितलें, कीं माझ्या आज्ञेनुसार रेल्वेनें ही गोष्ट केली होती. नेहरूंनीं विचारलें, कीं यासाठीं मी सरकारची पूर्व परवानगी घेतली होती काय ? मी ही घेतलेली नव्हती. नेहरू मिनिटभर फार संतापले व मग शांत झाले.

या मुलकी वाहतुक बंदीमुळें तर मला आपली सेना व आवश्यक तीं यंत्रसामुग्री व १०,००० टन वजनाचें सांठवण हें ठरलेल्या तारखेला एकत्रित करतां आलें.

या कामांत क्वार्टर मास्टर जनरल लेफ्टनंट जनरल कोचर; ब्रिगेडिअर सातारवाला; ब्रिगेडिअर पंचनद व शिवकिशोर या रेल्वेच्या संपर्क अधि-काऱ्यांनीं बहुमोल मदत केली.

माणसें व सामुग्री यांत पुष्कळच कमतरता होती. (पुढच्या वर्षी चिन्यांशीं लढतांना हेंच झालें.) कांहीं सामुग्री जाग्यावर खरेदी करण्यांत आली तरी इतर तुटवडा पडलाच. (नशिबानें यावेळीं आपल्या विरुद्ध कमकुवत शत्रू होता.) २००० बॅटऱ्या, १४,००० ड्रेसिंग, ९० वायरलेस सेटस्, १०० मैल लांबीची जोड तार, ४९० बंदुका, ४२० स्टेन-कारबाइन्स एवढी सामग्री, एका डिव्हिजनपेक्षां कमी संख्या असलेल्या सैन्यसंख्येमागें अपुरी होती. सुरुंग शोधून काढणारीं यंत्रें व खुणेचीं साधनें यांचा प्रमुख तुटवडा होताच. एका बटालियनला ४०० बुटांच्या जोड्या कमी होत्या. हें सैन्य कवायतीसाठीं असलेले बूट घालूनच लढलें !

आपल्या सरकारांत त्या वेळीं कांहीं 'क्विसलींग,' (फितूर) जरुर असले पाहिजेत. हे लोक पोर्तुगीजांना महत्त्वाच्या गुप्त गोष्टी कळवत होते. हल्ला करण्याची ठरलेली तारीख सालाझारला कळली होती. सालाझारनें गोव्याचे गव्हर्नर डी-सिल्व्हा यांना पाठवलेल्या अखेरच्या १३ डिसेंबरच्या तारेंत म्हटलेलें होतें, कीं भारत गोव्यावर १५ डिसेंबरला हल्ला करणार आहे. (१३ डिसेंबर पर्यंत हीच तारीख ठरलेली होती.) नंतर ही तारीख १८ डिसेंबर झाली ही बातमी दिल्ली येथील उच्च सरकारी स्थानांतूनच बाहेर फुटली असली पाहिजे. काही अधि-

कान्थांनीं व इतर श्रेणींतील सैनिकांनीं, ही तारीख आपल्या खासगी पत्रांतून लिहिलेली होती व यांतलीं कांहीं पत्रें आर्मी हेडक्वार्टरनें नियंत्रित (Censor) केली.

दक्षिण अमेरिकेच्या वकिलानें पोर्तुगालच्या वतीनें, आपल्या परराष्ट्र कचेरींत निषेध नोंदवला. अध्यक्ष केनेडी व ब्रिटिश पंतप्रधान यांचेकडून, त्यांच्या त्यांच्या वकीलांकरवीं नेहरूंना संदेश मिळाले व या दोघांनीं त्यांच्या सरकारांना वाटणारी काळजी कळवली. संयुक्त राष्ट्रांचे सेक्रेटरी जनरल उ थांट यांचेकडूनहि असाच संदेश आला. या सर्व संदेशांचा सारांश होता, कीं जग नेहरूंकडे शांततेचा दूत म्हणून पाहात आहे व असें असतांना गोव्याविरुद्ध जर लष्करी कारवाई केली गेली, तर ते त्यांच्या ब्रीदाला सोडून होईल. सर्वांनीं नेहरूंना उपदेश केला होता, कीं संयम पाळा व बळाचा वापर न करतां हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करा. यापैकीं कुणीच अर्थात, यापूर्वी हा प्रश्न सन्मानकारक पद्धतीने सुटावा म्हणून कांहींहि केलेलें नव्हतें. इतकेंच नव्हे तर असल्या परिस्थितींत सांपडल्यावर, आपल्या उपदेशाप्रमाणे ते स्वतः वागणारहि नव्हते! तें कांहीं असलें तरी या सर्व पत्रव्यवहाराचा नेहरूंवर अतिशय परिणाम झाला. कारण नेहरू हे परकीय टीकेबाबत नेहमींच हळवे असत. उ थांट याच्या पत्राची नेहरूंवर जास्त छाप पडली होती. हें पत्र केवळ संयुक्त राष्ट्रांसारख्या जागतीक संघटनेच्या नेत्याचें नव्हतें तर एका आशियाअी माणसाचेंहि तें पत्र होतें. सर्व प्रश्नांचा पुनः विचार करावा यासाठीं नेहरूनीं हल्ल्याचा नियोजित दिवस दोन वेळां पुढें ढकलला.

या संमोहांत सांपडल्यानंतर, नेहरूंनीं कृष्ण मेनन, जनरल थापर किंवा अन्य कुणी यांना किती वेळा भेटीस बोलावलें हें मला माहीत नाहीं, परंतु त्यांनीं मला बोलावून या वेळीं सांगितलें, कीं गोव्याविरुद्ध कारवाई करण्याच्या त्यांनीं घेतलेल्या निर्णयाचें त्यांना मुळींच समाधान नाहीं. परदेशांतून आलेल्या या संबंधांतील आवेदनांचा उल्लेख त्यांनीं केला. त्यांनीं सांगितलें या बाबतींत व्यक्त झालेल्या जोरदार जागतिक मतांचा अवमान करणें त्यांना मोठें कठीण वाटत होतें. त्यांनीं मला विचारलें, कीं गोव्याविरुद्ध करावयाची कारवाई स्थगित केली, तर त्याचें काय परिणाम



*गाझा येथें १९६१ सालीं एका भारतीय कॉर्पोरलबरोबर लेखक*

होतील. मी उत्तर दिलें, कीं लाखों लोकांना अनेक वर्षें या बाबतींत आपण उत्सुक केलेलें आहे. त्यांच्या देशभक्तीला आवाहन केलें गेलें आहे. नेहरूंनीं जाहीर भाषणांतून लोकांना जें अभिवचन दिलेलें होतें त्याची पूर्तता करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. सेना दलें ही कामगिरी करतां यावी यासाठीं वाट पाहात आहेत आपण दोनदां हा दिवस पुढें ढकललेला आहे. आतां पुन: आपण तेंच केलें, किंवा ही आज्ञाच अजिबात रद्द केली, तर सेनेच्या मनोधैर्यावर वाईट परिणाम होईल. मी सांगितलें, कीं या पेक्षांहि, देशाला असें वाटेल, कीं त्याला प्रिय असलेल्या प्रश्नाच्या बाबतींत आपण विश्वासघात केला आहे.

कांहींहि असलें तरी हा घरगुती प्रश्न आहे व आपण कांहीं दुसऱ्या देशावर स्वारी करीत नाहीं. परकीयांना यांत लुडबुड करायचा अधिकारच नाहीं. आपण त्यांच्या अंतर्गत बाबतींत उपदेश केला, तर मात्र त्यांना अतिशय

राग येतो. म्हणून मी सुचवलें कीं, परदेशांनीं केलेल्या उपदेशाकडे आपण मुळींच लक्ष देऊं नये व आपला निर्णय पक्का ठेवावा.

नेहरू आपल्या खोलींत फेऱ्या मारीत होते. मध्येंच ते हातांतील सिगा-रेटचे कांहीं झुरके घेत. त्यांचा कांहींच निर्णय होत नव्हता. त्यांच्या देश-बांधवांची अपेक्षा होती, कीं त्यांनीं खंबीरपणें या बाबतींत कांहीं कृति करावी. परंतु जगांतल्या प्रमुख राष्ट्रांना त्यांचें हें पाऊल पसंत नव्हतें. शिवाय त्यांना स्वत:लाहि व्यक्तिश: कुठलाहि प्रश्न सोडवतांना बलाचा वापर पसंत नसे. ज्यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी असते, असे राष्ट्र-प्रमुख नेहमीं जशा कठीण परिस्थितींत सांपडतात, तसे ते सांपडले होते. कांहीं वेळ विचारांत घालवल्यानंतर, नेहरूंनीं, अनिच्छेनें, दिलेल्या आज्ञे-प्रमाणें कारवाई करण्यास संमति दिली. शेवटीं हा निर्णय त्यांना घ्यावा लागला, याचें कारण बहुधा हेंच असावें कीं, जनतेची, त्यांनीं गोवा मुक्त करावा ही अपेक्षा होती. त्यांना वाटलें. कीं जर या वेळीं ते कच खातील, तर सेनेचा व जनतेचा दोहोंचा विश्वास ते गमावतील.

मी अमेरिकेचे वकील गालब्रेथ व ब्रिटिश हायकमिशनर ब्रुथ यांना १८ तारखेला, माझें घरीं जेवायला बोलावलेलें होतें; परंतु वरील निर्णय होतांच मी हा कार्यक्रम घाईघाईनें आदल्या दिवशीं रद्द केला. अमेरिकेच्या व इंग्लंडच्या दूतांनीं बहुधा मी हें असें कां केलें, हें ओळखलें असावें.

देशांत अतिशय तंग वातावरण झालें होतें. मला स्वत:ला या कारवाईच्या योजनेंत भाग घेण्याचें भाग्य दिल्ली येथें लाभलें असल्यानें, मी या कार-वाईंत प्रत्यक्ष भाग घेण्यास उत्सुक होतो. थापर यांनीं याला संमती दिली. मी दि. १७ ला विमानानें बेळगांवला आलो. तिथें माझी लेफ्ट. जनरल चौधरी यांचेशीं गांठ पडली. त्यांच्या जेव्हां कानीं गेलें, कीं मी आघाडीच्या सैन्याबरोबर गोव्यांत जाऊं इच्छित आहे, तेव्हां त्यांनीं सांगितलें, कीं स्थानिक कमांडर म्हणून, त्यांना हें करणें आवश्यक वाटत नाहीं. मी त्यांना उदाहरणें दिलीं, कीं ज्येष्ठ सैनिकी अधिकारी इतर मोहीमांच्या वेळीं अशा प्रकारचें नेतृत्व करतात व हेंच मी करणार आहे. मी जेव्हां त्यांना म्हटलें, कीं तुम्ही या चढाईच्या

वेळीं चालत माझ्याबरोबर चला, तेव्हां ते म्हणाले, कीं एवढी पायीं फरफट करण्याची काय जरूर आहे. नंतर आपल्या उद्देशाप्रमाणें कबजा झाल्या-नंतर हेलिकॉप्टरनें अधिकारी जाऊं शकतात. हा संवाद झाला, तेव्हां जवळच हंडू हे बसलेले होते. मला वाटलें, यासंबंधीं अधिक बोलण्यांत अर्थ नाहीं. मग मी 'ऑटर' विमानांत उडी मारली व अनेक मैल पुढें असलेल्या मुख्य डिव्हिजनल हेडक्वार्टर्सजवळ मी अुतरलो.

गोव्यावर आम्हीं तीन दिशांनीं हल्ला चढवला. उत्तर, दक्षिण व पूर्वे-कडून. पश्चिमेच्या बाजूला आपल्या नाविक दलानें कारवाई केली. पूर्वेकडून चढाई करणाऱ्या प्रमुख सेनेबरोबर मी जाण्याचें ठरवलें. मी कँडेथ यांची भेट घेतली व जीपमधून ब्रिगेड हेडक्वार्टर्सला पोहोंचलो. तिथें ब्रिगेडिअर कलवंतसिंग भेटले. माझी त्यांची चांगली ओळख होती. वेळ न गमावतां मी व कलवंतसिंग, पुढें असलेल्या शीख बटालियनच्या हेडक्वार्टर्सला गेलो. मध्यरात्र आतां उलटून गेली होती व जेथून चढाई सुरू करावयाची, त्या रेषेवर सर्वजण तयार झाले होते. पहांटेपूर्वींच्या त्या काळोखांत, औत्सुक्य कोंडून राहिलें होतें व संपूर्ण शांतता पसरलेली होती. प्रत्येक जण फक्त दबलेली कुजबुज करीत होता, किंवा खास खुणांनीं काय तें सांगत होता...नाहीं तर आवाज ऐकूं जाण्याची भीति होती. हातांतल्या विजेऱ्या लपवून धरलेल्या होत्या. काळोखांत कमांडर कुठें आहेत तें दिसावें, म्हणून त्यांनीं दंडावर पांढरे पट्टे लावले होते. आम्ही घड्याळाकडे पाहात हल्ला करण्याच्या क्षणाची वाट पाहात होतो. मनांत विचार येत होता, कीं थोडी-फार ऌढाई होईल, कीं सरळ आंत चालत जाऊन कबजा करतां येईल. बिनीचे जथे लाटेलाटेसारखे पुढें घुसले. मी, ब्रिगेडिअर कलवंतसिंग, लेफ्टनंट कर्नल संजीवराव व मेजर मल्होत्रा, असे पुढें निघालों. हवा चिमटे काढीत होती. अगदी सकाळींच जलद फिरायला निघावें, तसें वाटत होतें. फक्त मृत्यू कुठल्या कोपऱ्यावर गांठील याचा नेम नव्हता.

बटालियन तर जवळ जवळ डबल कूच करीत पुढें गेली. वाटेंत आम्हांला पेरलेले सुरुंग, उध्वस्त केलेले पूल दिसले. रस्त्यावरील पाण्याच्या गटारांची नासधूस केलेली आढळली. आमचीं वाहनें व तोफगाड्या यामुळें अडल्या व हे अडथळे दूर करून, पूल व रस्ते दुरुस्त करीपर्यंत त्यापुढें जाणें शक्य

झालें नाहीं. आम्ही द्रुतगतीनें कूच करीत होतो. आवश्यक तो दारुगोळा प्रत्येक सैनिकाशीं होताच. सकाळीं दहा वाजतां आम्हीं 'मोलेम' येथें पोहोंचलो. गांव ओसाड झालें होतें. गांवकरी व तेथील गोव्याचें सैन्य घाबरगुंडी उडून घाईघाईनें तेथून पळालेलें दिसत होतें. चुलीवर पाणी अजून उकळत होतें; बॅगा अर्धवट उघडलेल्या तशाच पडलेल्या होत्या, चुरगळलेले रात्रीचे कपडे व सटरफटर जिनसा सगळीकडे पसरलेल्या होत्या. येथे सुरुंगाच्या दारूचा मोठा सांठा आमच्या हातीं पडला.

'कोलेम' हें दुसरें गांव, आम्हीं पाठोपाठ घेतलें. तेथील स्थानिक लोकांनीं स्वतंत्र होतांच आनंदोत्सव सुरू केला. तेथें राहणाऱ्या फर्नांडिस नांवाच्या श्रीमंत गोवेकरानें, आपली जीप व तीन लॉऱ्या आमच्या दिमतीला दिल्या व आम्हीं त्या आनंदानें स्वीकारल्या. मी व कलवंतसिंग, इतर लोकांसह या लॉऱ्यांतून वेगानें पुढें निघालो. शत्रू तर पळत सुटला होता.

ब्रिगेडिअर सगतसिंग, या छत्रीधारी सैनिकांच्या ब्रिगेड कमांडरनें, चौधरी यांना संदेश पाठविला होता, कीं ते १८ तारखेला सायंकाळींच बेनास्तारित्र व बेती येथें पोहोंचले आहेत पणजींत तुरळक गोळीबार सुरू असला, तरी लवकरच ते पणजी येथें जातील. यामुळें चौधरी यांना वाटलें, कीं लढाई जवळ जवळ संपलीच आहे. त्यांनीं जेव्हां पूर्वीं आर्मी हेडक्वार्टर्सकडे चौकशी केली होती, कीं पोर्तुगीजांची शरणांगती कुणी स्वीकारायची आहे तेव्हां थापर यांनी, सरकारच्या संमतीनें त्यांना कळवलें होते, कीं मेजर जनरल कॅंडेथ ज्यांनीं या कारवाईची मुख्य जबाबदारी घेतली होती, त्यांनींच हा मान घ्यावा.

चौधरी हे हेलिकॉप्टरने, घाईघाईनें बेनसस्तारिम येथें गेले. बरोबर त्यांनी बी. एन्. मुलीक व प्रमुख स्टाफ अधिकारी मेजर जनरल दन, यांना घेतलें होतें. हंडू यांना मात्र त्यांनीं बरोबर घेतलें नाहीं. हंडू तिथेंच होते व चौधरी यांनीं त्यांना बरोबर घेतले असतें, तर तें योग्य झालें असतें. चौधरी यांनी वरकरणी ही फेरी, विनीच्या फौजा कसें काय तोंड देत आहेत, हें पाहण्याकरितां केलेली असली, तरी त्यांचा आंतरिक हेतू दिल्लीहून दिलेली आज्ञा बाजूस सारून शरणांगती स्वतःच स्वीकारण्याचा होता. पणजीभोंवती अजून एखाद दुसरी गोळी सुटत होती, तेव्हां चौधरी थांबून

राहिले व पणजी पडल्यानंतरच त्यांनीं पणजींत प्रवेश केला; थापर व मेनन यांना बाजूस ठेवून, तेथून त्यांनीं नेहरूंना एक विजय चिन्ह पाठवलें. परंतु चौधरी यांना पणजीत जायला मात्र उशीर झाला होता. कारण पणजी येथील पोर्तुगीज गव्हर्नर डी. सिल्व्हा, जो शरणागती देऊं शकला असता, तो आदल्या रात्रीच वास्को-द-गामा येथून पळून गेला होता. त्यांना कळलें, कीं कोलँसो हा पोर्तुगीज सेक्रेटरी जनरल हा पणजीलाच होता. चौधरी त्यांचे बंगल्यावर गेले व त्यांनीं शरणागतीची मागणी केली. कोलँसो यांनीं बरोबर सांगितलें, कीं लष्करी शरणागती देण्याचा त्यांना अधिकार नाहीं. चौधरी वास्कोला न जातां बेळगांवला तळावर परतले, कारण वास्को जवळच लहानशी लढाई चालू असल्याचें त्यांना कळलें.

गंमत अशी कीं कांहीं तासानंतर ब्रिगेडियर कलवंतसिंग यांनीं, चौधरी यांना बिनतारी संदेश धाडला, कीं पोर्तुगीज गव्हर्नर जनरल डी सिल्व्हा यांनीं एका पांढरे निशाण लावलेल्या जीप मधून येऊन वास्को येथें शरणगति दिली. डी. सिल्व्हा व इतर पोर्तुगीज अधिकारी वास्को येथें एकत्र झाले होते. 'अलबुर्क' या त्यांच्या लढाऊ जहाजांतून पोर्तुगालला निसटण्याचा त्यांचा विचार होता. भारतीय आरमार हें जहाज निकामी करील अशी त्यांची अपेक्षा नव्हती.

हंडू यांनीं सल्ला दिला, कीं शरणागति ही संपूर्ण व विनाअट असावी. कलवंतसिंग यांनीं त्याप्रमाणें शरणागति घेतली.

हवाईदल व नाविकदलानें सर्व कारवाईत उत्तम साहाय्य दिलें. फक्त एकाच प्रसंगांत त्यांची ठिकाण पारखण्यांत चूक झाली, दुसऱ्या शीख पायदळ फलटणीला म्हापसा घेण्यांत मदत म्हणून विमानदलाला बॉम्बफेक करण्यास सांगितली गेली, तेव्हां त्यांनीं चुकीनें आपल्याच तोफांवर हल्ला केला. सुदैवानें फारसें नुकसान झालें नाही.

वृत्तपत्रवार्ताहरांना सरकारनें पुढें सरकणाऱ्या सेनेबरोबर गोव्यांत जाऊं दिलें नाहीं. ही एक चूक झाली. कारण त्यामुळें बेळगांवांत बसूनच त्यांनीं वार्तापत्रें लिहिलीं व कांहीं बाबतींत तीं बरोबर नव्हतीं. या लष्करी कारवाईंत तोफखाना अजिबात वापरण्यांत आला नसतांना, एका वार्ताहरानें कल्पनेची भरारी मारून लिहिलें 'तोफांचे आवाज ऐकूं येत होते. क्षितिजें उजळून

गेलीं होती...' मला असें कळलें, कीं कांहीं धाडसी पाश्चात्य वार्ताहर मात्र, आपली चढाई सुरू होण्यापूर्वींच दुसरीकडून (म्हणजे कुठून ?) आंत शिरलेले होते.

आपल्या सेनेंतील जे गोवेकर होते, त्यांनीं या लष्करी कारवाईत शौर्यानें महत्त्वाचा वांटा उचलला. उदाहरणार्थ एअर व्हाईस मार्शल पिंटो यांचे काका, डॉक्टर पिंटो, हे म्हापशाचे मेयर असतांना, एअर व्हाईस मार्शल पिंटो यांनीं शूरपणें गोव्यावरील पहिल्या विमान हल्ल्याचें नेतृत्व केलें व डामोलिम, येथील वायरलेस ट्रॅन्स्मिटर उध्वस्त केला. (कदाचित त्यांनीं या हल्ल्यांत आपले जवळचे नातेवाईकहि मारले असते.)

पोर्तुगीजांनीं लढण्याची इच्छाच दाखविली नाहीं. दीव दमण येथें त्यांनीं कांहीं थोडा फार प्रतिकार केला, परंतु एकंदरीत त्यांनीं लढाईंतून पळच काढला. स्थानिक जनतेनें आपल्या सेनेला मदत केली व त्यांचें स्वागत केलें. ४५१ वर्षांच्या पारतंत्र्यानंतर, छत्तीस तासांत आपल्या सेनेनें पोर्तुगीजांकडून आपला प्रदेश परत मिळविला.

सर्व पोर्तुगीज युद्धकैद्यांना (यांना आपण स्थानबद्ध कैदी म्हणत असूं) आम्ही अतिशय विचारपूर्वक वागवलें. त्यांचा गव्हर्नर जनरल व त्याची पत्नी यांची अगदीं आरामशीर राहण्याची सोय करण्यांत आली व त्यांच्या दर्जाला शोभतील अशा सर्व सुविधा, त्यांना देण्यांत आल्या. आपल्या सैनिकांच्या सोयीपेक्षां आम्ही त्यांच्या कैद्यांकडे जास्त लक्ष देऊन, त्यांची सर्व सोय पाहिली. त्यांना उत्तम अन्न दिलें, राहायला चांगली जागा दिली, सुखसोयी दिल्या. आपले सैनिक उघड्यावर झोपले परंतु त्यांना मात्र छपराखालीं झोपवलें. आपल्या उदारतेची ही परमावधि होती. आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संघटनेनें ही सर्व व्यवस्था पाहिली. मी पोर्तुगीज कैद्यांच्या मोठ्या जमावापुढें भाषण केलें व त्यांना विचारलें, कीं आणखी त्यांच्यासाठीं कांहीं करण्यासारखे आहे काय ? त्यांना पत्रें पाठविण्यासाठीं कांहीं सवलती हव्या होत्या त्या ताबडतोब देण्याचें आश्वासन मी दिलें.

कँडेथ यांची गोव्याचे पहिले लष्करी गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली. व हंडू हे त्यांना सल्लागार म्हणून नेमण्यांत आले. जिथें पोर्तुगीज गव्हर्नर

जनरल राहात असे तिथेंच आतां कॅंडेथ राहूं लागले फक्त या इमारतीवर आतां भारतीय तिरंगा फडकूं लागला होता

गोव्यामधील कारवाईची जगांत संमिश्र प्रतिक्रिया झाली. कांहींनीं असें सुचवलें, कीं ही लष्करी कारवाई करतां यावी, म्हणून पोर्तुगालमध्यें तत्पूर्वी मुद्दामच थोडी गडबड घडवून आणण्यांत आली. हें खरें नव्हतें. १८ व २१ नोव्हेंबरचे अत्याचार पोर्तुगालनेंच केले होते.

अनेकांनीं असें म्हटलें, कीं मेनन यांनीं मुंबईतील निवडणूकीवर नजर ठेवून ही लष्करी कारवाई केली. कारण लवकरच होणाऱ्या निवडणूकींत ते मुंबईहून एक जागा लढवणार होते. मी ठामपणें सांगतो, कीं हें खरें नाहीं. या प्रकरणांतील सर्व निर्णय हे त्यांनीं नेहरूंना सांगून, त्यांच्या संमतीनें घेतले होते व हे घेण्यास परिस्थितीचा रेटा कारणीभूत झाला.

गोव्याच्या बाबतींत खंबीर कृति करण्याबाबत, आपल्या सरकारनें बरीच धरसोड वृत्ति प्रगट केली. जेव्हां अतिशय दडपण आलें, तेव्हांच काय ती कृति केली. आपल्या सरकारचे सरहद्दीवरील प्रश्नांचें एकंदर धोरण, असें कांहीं ठरलेलेंच नाहीं. आतां काश्मीरचाच प्रश्न घ्या १९४७ सालापासून हा प्रश्न, प्रसंगीं आपली झोंप उडवतो. हा सरहद्दीवरील राज्याचा प्रश्न नाजूक आहे

आपण नुसतें असें म्हणून चालणार नाहीं, कीं (अ) काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून त्याबाबत वाटाघाटी होऊं शकत नाहीत. व (ब) काश्मीर प्रश्न असा नाहींच.

खरें सांगायचें तर काश्मीरमधील सत्य स्थितीला तोंड देण्यास आपण कचरत आहोंत. अनेक वर्षें या राज्यांत गैरकारभार चाललेला असूनहि, भारताच्या इतर भागांतून निष्ठावान, कार्यक्षम, प्रामाणिक असे शासक तिथें पाठवून आपण तेथील गोष्टी ठाकठीक करीत नाहीं. या धोरणामुळें कुणाचाच फायदा झालेला नाहीं. खंबीर धोरणाऐवजी आपलें तेथील धोरण घसरगुंडीचे आहे. काश्मीर हा भारत व पाकिस्तानमधील संघर्षाचा विषय असूनहि आपल्याला असें वाटतें कीं काश्मीर मधली परिस्थिती आपोआप हळूं हळूं सुधारेल. असे चमत्कार क्वचितच् घडतात.

शेख अब्दुल्लांची राजकीय पूर्वपीठिका ठाऊक असतांना, आपण त्यांना प्रथम सत्तेवर बसवलें, १९५३ सालीं पकडलें व अटकेंत टाकलें, १९५८ सालीं सोडले व पुन: कांहीं महिन्यांनीं पकडलें. १९६४ सालीं पुन: सोडलें व १९६५ सालीं पकडून तेव्हांपासून पुन: तुरुंगांत ठेवलें आहे ही धरसोड वृत्तीच होय.

आपण आपलीं धोरणें काश्मीरमध्यें कणखरपणें कार्यान्वित केलीं पाहिजेत. हें घडेपर्यंत तिथें सतत गडबड चालूंच राहील.

नेहरू यांच्याबरोबर इतक्या जवळ काम केल्यानंतर, मी आपल्या या पहिल्या पंतप्रधानांचें व लोकशाही प्रधान भारताच्या शिल्पकाराचें, या ठिकाणीं मूल्यमापन केलेंच पाहिजे. त्यांच्या इतका निडर व द्वेषापासून दूर असलेला दुसरा माणूस असणें कठीण. मी त्यांच्या अजोड देश भक्तीवर प्रेम केलें, अनेक राजकारण्यांनीं, विचारवंतांनीं व वृत्तपत्र-कारांनीं जगांत सर्वत्र त्यांचेविषयीं व त्यांच्या गुणांविषयी विपूल लिहिलेलें आहे म्हणूनच मी पुढल्या कांही पानांत, नेहरूंच्या स्वभावांत निर्माण झालेल्या दौर्बल्याविषयींच सारांश रुपानें सांगणार आहे. हें दौर्बल्य त्यांचें ठिकाणीं, ते सत्तेवर आल्यानंतर का निर्माण झालें, याची मला शक्य वाट-णारीं कारणेंहि मी यांत देईन.

जर नेहरू हे कधीं कधीं अहंमन्य व बढाईखोर वाटले असतील, तर याला कारण तारुण्याच्या सुरुवातीपासून त्यांच्या आयुष्यांत अशा गोष्टी घडत गेल्या, कीं त्यामुळें त्यांच्या ठिकाणच्या अहंपणाला खतपाणी लाभलें. अतिशय हुषार, श्रीमंत, लाड पुरवणाऱ्या आणि यशस्वी अशा पित्याचे-मोतीलाल नेहरूंचे-पंडितजी हे एकुलते एक चिरंजीव. पुरुषसिंह असणाऱ्या व उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या मोतीलालजींनीं, आपल्या मुलाच्या अनेक दोषां-कडे डोळेझांक केलेली होती. आपला मुलगा हा कधींहि चुकत नाहीं, अशी मोतीलालजींची समजूत होती. या लाडामुळें जवाहरलाल यांना आपण फार महत्त्वाचें आहोंत असें वाटूं लागलें. आपल्या वडिलांचें (आणि जे अनेक बाबतींत मुलाला मागें टाकणारे होते.) आपल्याविषयीं फार चांगलें मत आहे, या गोष्टीचा जवाहरलाल यांना रास्त अभिमान वाटत असे.

जवाहरलाल यांनीं जेव्हां काँग्रेसमध्यें प्रवेश केला, तेव्हां ते गांधीजींच्या

मोहिनी घालणाऱ्या प्रभावाखालीं आले व त्यांनीं देशाच्या सेवेंत अनेक प्रकारें भाग घेऊन त्याग करण्यास सुरुवात केली. जेव्हां मोतीलाल हे देखील कॉंग्रेसच्या गोटांत सामील झाले, तेव्हां मुलाचें निष्ठापूर्वक काम पाहून ते दिपून गेले. जवाहरलाल यांना हा आपला मोठाच व्यक्तिगत विजय वाटूं लागला. आपल्या अमिरी वृत्तीच्या व प्रसिद्धी पावलेल्या वडिलांना, बंधु-प्रेमाची शिकवण देण्यांत यशस्वी होणें, व नंतर गांधीजींनीं कॉंग्रेसच्या सिंहासनावर आपला वारस म्हणून त्यांना निवडणें, या गोष्टींमुळें नेहरूंची अहंमन्यता अधिकच वाढली.

१९४७ सालीं भारताला स्वातंत्र्यप्राप्ती झाली, त्या वेळेला नेहरू हे जनतेचे थोर व अद्वितीय असे नेते झालेले होते. त्यांचें स्थान फक्त गांधीजींच्या खालोखाल होतें. जनताजनार्दनाचें नेहरूंवर निरतिशय प्रेम होते व लोकांना नेहरू हे विलक्षण (Romantic) असे नेते वाटत. त्यागमूर्ति भासणारा हा पुरुष, दडपलेल्या लाखों लोकांचा प्रतिनिधि होता. या लोकप्रियतेंतून नेहरूंना मोठी शक्ति लाभलेली होती. या लोकप्रियतेच्या बळावर त्यांना साऱ्या जगाचें प्रेम लाभत होतें व कुणींहि या सर्व बाबतींत त्यांच्या आसपासहि येऊं शकत नसे.

एकदां एका कॉंग्रेस अधिवेशनांत, ध्वनिक्षेपकापुढें उभे राहून नेहरूंनीं हाता-बाहेर जाऊं पाहणाऱ्या लोकांच्या गर्दीला उद्देशून गर्जना केली, ' बेहनो और भाईओ, मी सांगतो त्याप्रमाणें तुम्हांला वागलें पाहिजे. मी तुमच्या रांगां-तून, व्यासपीठापासून टोकापर्यंत माणसें बसलीं आहेत तिथपर्यंत, चालत जाणार आहे व परत येणार आहे. मला जायला मार्ग द्या. हलूं नका. शांत राहा. जर कुणी हलला किंवा बोलला तर मी इथून निघून जाईन.' सर्वत्र टांचणी पडेल तर ऐकूं जावी अशी शांतता पसरली. कॉंग्रेसचे जे मोठमोठे नेते व्यासपीठावर होते, ते या पुढाऱ्याचें सामर्थ्य पाहून थक्क झाले. गर्दीतील समुदायावर आपला पक्का वचक आहे; त्यांना आवरणें ही आपल्या हातांतली गोष्ट आहे, त्यांना भारून टाकणें आपल्याला जमते, या गोष्टींचा नेहरूंना विल-क्षण असा आत्मविश्वास होता. त्यांच्या मित्रांना हें पाहून आनंद होत असे, तर विरोधक अस्वस्थ होत असत.

दुसऱ्या एका कॉंग्रेस अधिवेशनांत, रोज सकाळीं कार्यक्रमासाठीं बाहेर

पडतांना त्यांची मोटार, विविक्षित मार्गाने जात असे व त्यांच्या दर्शनासाठीं मार्गाच्या दुतर्फा लोक एकच गर्दी करत असत. एक दिवस अतोनात गर्दीमुळें हा रस्ता बंद झाला. पोलीसांनी नेहरुंची मोटार गर्दी नसलेल्या, उजाड मार्गाने नेण्यास सुरुवात केली. जेव्हां नेहरुंनीं हें पाहिले, कीं लोकांच्या गर्दीपासून दूर अशा दिशेनें मोटार निघाली आहे, तेव्हां तें त्यांचे प्रमुख सुरक्षाधिकारी गोपी हंडू जे मोटारीतच होते, त्यांना नेहरुंनी रागानें मोटार थांबवण्यास सांगितलें. खालीं उतरून ते जयजयकार करणाऱ्या, हात हलवणाऱ्या, दर्शनासाठीं आसुसलेल्या स्त्री पुरुषांच्या झुंबडीकडे पायीं चालत गेले. त्या दिवशीं रात्रीं स्नान केल्यावर, जेवायला बसण्यापूर्वी नेहरुंनीं गोपी हंडू यांना बजावले, कीं वाट पाहणाऱ्या लोकांच्या गर्दीला चुकवून त्यांना नेण्याचा प्रयत्न पुनः होतां कामा नये. गोपी हंडू म्हणाले, कीं ही गर्दी वगैरे ठीक आहे, परंतु सकाळीं या गर्दींत ते सांपडल्यानंतर त्यांच्या ( गोपी यांच्या ) खिशांतलें पाकिट कुणी तरी मारलें त्यांत त्यांच्या जवळचे सगळे पैसे गेलेच व त्यांचें परतीचें तिकिटहि गेले ! ही गोष्ट ऐकतांच नेहरू खदखदून हसू लागले.

नेहरू हे सार्वजनिक संबंधांची कधींहि उपेक्षा करत नसत. एकदां ते ज्या व्यासपीठावरून भाषण करणार होते, तें व्यासपीठ ते स्वत: नजरेखालून घालीत होते. त्यांनीं आसपासच्या लोकांना सूचना देऊन, त्याची उंची बदलायला सांगितली, दिव्याचा प्रकाश नीट पडेल अशी व्यवस्था करून घेतली. इतर कांहीं किरकोळ सूचना ते देत असतांनाच, हंडू म्हणालें कीं, वक्त्याचें व्यासपीठ हें लवकरच नाटकाच्या रंगभूमीसारखे होणार ! नेहरूंना राग आला व ते फटकन् म्हणाले — ‘ बरोबर आहे. नाटकाच्या रंगभूमीसारखेंच तें होणार आहे. मी या नाटकाचा नायक आहे आणि मला उद्यां दिवसभर या रंगमंचावर नाचायचें आहे...! ’

नेहरू हे कांहीं बाबतींत आंधळेपणानें वागत. त्यांनीं नाणवलेले शास्त्रज्ञ, कलावंत, खेळाडू यांना जसा त्यांचा आश्रय दिला, त्याचप्रमाणें त्यांच्या गोतावळ्यांत कांहीं सामान्य दर्जाची व दुय्यम दर्जाचीं माणसें होतीं. त्यांना कसलें व्यक्तिमत्व नव्हतें, चारित्र्य नव्हतें, कीं लायकी नव्हती. जरी एखादा सहकारी हा त्यांना अकार्यक्षम वाटला, तरी ते त्यास दूर करायला राजी

नसत. मी एकदां त्यांना या बाबतींत विचारलें, तेव्हां त्यांनीं कीटकाचें उदाहरण दिलें. ते म्हणाले, 'एखादे वेळेस एखादा कीटक तुमच्या पायावर चढूं लागतो. तुम्ही एक दोनदां पाय आपटतां, कीं तो खाली पडावा. थोड्या वेळानें लक्षांत येतें, कीं तो अजून पायावर वरवर चढतोंच आहे. कंटाळून तुम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष करतां, कारण तुम्ही स्वतःचा पाय किती वेळ आपटणार ?' जेव्हां कुणा महत्त्वाचा सार्वजनिक व्यक्तीविरुद्ध एखादा आरोप केला जाई, तेव्हां त्यांची पहिली प्रतिक्रिया ही असें, कीं त्यांचा यावर मुळी विश्वासच नाहीं. मग ते आश्चर्य व्यक्त करीत, कीं असा आरोप कसा केला जातो. मग अशा माणसांविरुद्ध कांहींहि कृति करण्यास देखिल ते तयार नसत. एका विवक्षित प्रसंगीं मी त्यांना विचारलें, कीं अप्रामाणिक व नालायक माणसें ते कशी काय चालवून घेतात व त्यांना गलिच्छ वस्त्या व शिकाऱ्यांचा प्रश्न सोडवण्याचा कंटाळा का आलेला आहे. या सर्व बाबतींत ते कांहीं तरी कडक धोरण कां पत्करीत नाहींत ? त्यांनीं जें उत्तर दिलें, तेंच पुढल्या परिच्छेदांत खालीं दिलें आहे.

नेहरूंनीं सांगितलें कीं, पंतप्रधान होण्यापूर्वीं त्यांना असें वाटत होतें, कीं वर उल्लेखलेल्या या प्रश्नांच्या बाबतींत ते कांहीं चमत्कार घडवूं शकतील; परंतु प्रत्यक्षांत या प्रश्नाला जेव्हां ते सामोरे गेले, तेव्हां त्यांच्या लक्षांत आलें, कीं हे प्रश्न अवाढव्य आहेत. यानंतर त्यांनीं आपली भूमिका बदलली. ते म्हणाले, कीं आपल्या लोकांच्या ठिकाणचे बरेचसे दोष हे परकीय अंमलाखालीं राहिल्यानें निर्माण झालेले आहेत. खूप वर्षें या गोष्टी आपल्यांत मुरलेल्या आहेत. आज कशाची गरज असेल तर ती याची आहे, कीं आपल्यांत जागृती झाली पाहिजे, जबाबदारीची जाणीव झाली पाहिजे. ध्येयाची एकवाक्यता झाली पाहिजे व आपापसांत आपली एकी व्हायला हवी आहे. या सर्वाला वेळ लागणार आहे. एखादा जवळचा रस्ता यासाठीं नाहीं. आपल्यांतले दोष कडक उपाय योजून नाहींसे करण्याचा प्रयत्न आपण करूं नये, कारण असे उपाय हे दोन्हीं बाजूंनीं धार असलेलीं हत्यारें असतात. सुरुवातीला यामुळें चांगला परिणाम होतो आहे असें वाटेल; परंतु बहुधा यामुळें असंतोष व फार फूट निर्माण होते; विशेषतः वर्धिष्णू राष्ट्रांत. शिवाय कडक उपाय हे हुकुमशाहीचे द्योतक असतात; व अशी

हुकुमशाही आपल्या साध्यासुध्या व लोकशाहीवादी लोकांत यशस्वी होणार नाहीं. आपण उच्च असें व्यक्तिगत उदाहरण घातलें, तर लोक त्याचें अनुकरण करतील व याच मार्गानें आपण लोकांना सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण कांहींहि करीत असतांना आपण आपल्या देशबांधवांना अतिशय हळूवारपणें वागवलें पाहिजें, जसें आपण लहान मुलांना वागवतो. तें सांगत कीं, प्रदीर्घ अशा झोपेंतून आपण जागे होत आहोंत व अशा वेळीं कुठल्याहि गोष्टीची बेताबेतानेंच घाई केली पाहिजे. (जरी नेहरूंचें म्हणणें खरें असलें, तरी त्यांनीं व्यवहारांत करारीपणानें कृति करायला हवी होती.)

लोकांना खडसवायला नेहरू तयार नसत. या गोष्टीचें विश्लेषण आणखी एका प्रकारें करता येईल. जेव्हां त्यांनीं १९४६ मध्यें तात्पुरतें सरकार बनवलें, तेव्हां त्यांची प्रतिष्ठा अगदी शिखरावर होती. त्यांच्या सहकाऱ्यांचा व इतरांचा त्यांना अतिशय मोठा पाठिंबा होता. यामुळें त्यांनीं आपल्या सत्तेचें कांहींसें वांटप केलें व आपलें लक्ष सर्वस्वी आन्तरराष्ट्रीय प्रश्नांकडे दिलें. या कालांत सरदार पटेल यांच्याशीं त्यांचें नेहमींच पटत नसूनहि—हे त्यांचे मोठे शक्तिकेंद्र होते. उपपंतप्रधान या नात्यानें सरदारांनीं संस्थानांचें विलीनीकरण इत्यादि महत्वाच्या प्रश्नांकडे समर्थपणें लक्ष दिलें. त्यांचा मृत्यु हा नेहरुंवर मोठाच आघात होता. नेहरुंनीं यानंतरहि, आपल्या सहकाऱ्यांना अधिकारांचें मुक्त स्वातंत्र्य दिलें; पण या पद्धतींत त्यांना असें आढळून आलें, कीं यातले बरेच सहकारी हे मनाचे क्षुद्र, अकार्यक्षम, जातीय, भ्रष्टाचारी असे होते. त्यांनीं हातांत आलेल्या सत्तेचा गैरवापर सुरू केला. यामुळें या मंडळींनीं नेहरूंची नाचक्की केली. जेव्हां नेहरूंनीं या गोष्टी सुधारण्यासाठीं कांहीं बाबतींत त्यांची सत्ता काढून घेऊन, ती आपल्याकडे पुन: घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हां या लोकांनीं कारवाया सुरू केल्या; व ते नेहरूंशीं बेईमानी करूं लागले. ज्या सहकारी मित्रांवर नेहरूंनीं विश्वास टाकला व ज्यांचेकडे ते आशेनें पाहात होते, त्या त्या बाबतींत नेहरूंचा भ्रमनिरास झाला. या लोकांनीं आपल्याला खालीं पाहायला लावलें, या विचारानें 'आपलें चुकत तर नाहीं ना' या अर्थानें ते संशयी झाले. प्रत्येक प्रश्नांत त्यांना अनेक विघ्नें दिसूं लागत. मग ते सर्व प्रकारच्या मतांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करू लागत. त्यांतच त्यांचेंहि मत असेंच. राज्य-

कारभार निर्विघ्नपणें चालावा, यासाठीं ते हें करीत. (हा हेतू क्वचितच साध्य होत असें.)

आझाद, किडवाई, बी. सी. रॉय, पंत व इतर कांहींजण, असें नेहरूंचे विश्वासू सहकारी निधन पावल्यानंतर, नेहरूंना सल्ला देऊं शकतील अशी फारच थोडीं माणसें उरलीं. कुणावर विश्वास टाकावा या संभ्रमांत, त्यांचा स्वतःवरचाच विश्वास उडत चालला. यामुळें सभोंवतालच्या लोकांना खूष ठेवणें, त्यांना आवश्यक वाटूं लागलें. विशिष्ट भूमिका घेऊन ठामपणें उभें राहणें त्यांना कठीण वाटूं लागलें. आपल्या कृतीचा कांहीं गटांवर व जमातीवर काय परिणाम होईल, याविषयीं ते अकारण अतिशय भयभीत राहूं लागले. कॉंग्रेस पक्षाला काय वाटेल, विरोधी पक्षाना काय वाटेल, इतरांना काय वाटेल, याबद्दल ते काळजी करूं लागले. या पद्धतीनें त्यांनीं केलेल्या लोक व्यवहारांत, उपऱ्या गोष्टी शिरूं लागल्या; धरसोड वृत्ती आली, हें करूं, कीं ते करूं, असें होऊं लागलें व याचा परिणाम असा झाला, कीं त्यांनीं पुष्कळ चुका केल्या.

जरी नेहरू हे तापट होते, तरी त्यांचा राग लगेंच शांत होत असे. त्यांच्या ठिकाणीं तीक्ष्ण अशी विनोद बुद्धि होती. एकदां त्यांना कुणी तरी विचारलें, कीं ते रोज शिर्षासन कां करतात. त्यांनीं उत्तर दिलें, कीं जग हें उलटें आहे, तें सुलट पाहण्यासाठीं हें करावें लागतें. ज्यांना तें चांगलें ओळखत असत, अशांशीं वाद करतांना ते चटकन् उलटा ग्रह करून घेत असत, किंवा चिडत असत; परंतु अनोळखी माणसांच्या बाबतींत असें होत नसें. जर बोलणाऱ्यानें माघार घेतली नाहीं, तर ते टिपण वगैरे करीत असत; परंतु बहुधा तो काय सांगतो याकडे ते लक्ष देत नसतच. कारण त्यांच्या बाबतींत अशा तऱ्हेनें वागून चालेल, असें त्यांना वाटत असें.

वैयक्तिक वर्तणुकीबाबत नेहरूनीं मोठेंच उदाहरण निर्माण केलें होतें व त्यांच्याबद्दल सर्वांना आदर व दराराहि वाटे त्यांच्या हातीं मोठी सत्ता असूनहि, त्यांनीं तिचा क्वचित उपयोग केला. त्यांचें सहकारी हें त्यांच्याकडेच मार्गदर्शनासाठीं पाहात व नंतर स्वतः तसें वागत असत. त्यांच्या उपस्थितींत सर्वजण जोमानें, निष्ठेनें व एक दिलानें काम करीत आहेत असें दिसें. वस्तुतः यांतील बहुतेक हे फाटाफुटीनें वागणारे होते. आपल्या

उद्दीष्टांबाबत संदिग्ध होते व विसंगत वागणूक असणारे होते. जसा पक्ष होता, देश होता, त्याचेंच प्रतिबिंब यांच्यांत होतें. कांहीं प्रासंगिक संकटें आलीं, कीं फक्त हे एकीनें वागत; परंतु नियम सांगायचा तर ते आपापसांत एकी असणारे असे मुळींच नव्हते. हीं माणसें जसा देश आहे त्याचीं नुसतीं प्रतिबिंबें न ठरतां, ते देशाचें कांहीं नेतृत्व करूं शकतील अशी धमक त्यांच्यांत नेहरूंना निर्माण करतां आली नाहीं. हुषार व ज्यांच्याकडून आशा बाळगावी, अशा तऱ्हेच्या माणसांचा एक संच नेहरूंनीं कधीं निर्माण केला नाहीं. यांतूनच त्यांचा वारसदार पुढें आला असता. दुसऱ्या शब्दांत सांगायचें तर नेतृत्वासाठीं, त्यांची जागा घेणारी दुसरी अशी एक नेतृत्व मालिका निर्माण करण्यांत, त्यांना अपयश आलें. ते नेहमी म्हणत, कीं नेते हे आगाऊ निवडतां येत नाहींत, तर ते आणीबाणीच्या काळांत आपोआप पुढें फेकले जातात. ही तर गोष्ट खरीच आहे, कीं लोकशाही पद्धतींत सरकार प्रमुखाच्या जागे-करतां वारस नेमतां येणार नाहीं, कारण ती कांहीं अनुवंशिक जागा नाहीं; परंतु म्हणून अशा बाबतींत केवळ नशिबावर हवाला ठेवूनहि चालणार नाहीं.

नेहरूंना जवळजवळ सर्व प्रश्नांचीं ग्रांथिक उत्तरें माहित होती. परंतु हीं प्रत्यक्षांत उतरविण्यासाठीं जी चिकाटी लागते, ती त्यांच्यापाशीं नव्हती. त्यांनीं पुष्कळ प्रश्नांच्या बाबतींत सूज्ञ धोरणें आखलीं; पण तीं तंतोतंत अंमलांत आणलीं जातात कीं नाहीं, हें पाहाणें त्यांना जमलें नाहीं. त्यांच्या प्रमुख सहकाऱ्यांनीं त्यांच्या ठिकाणच्या या दुर्बलतेचा गैरफायदा घेतला व अनेक क्षेत्रांत त्यांनीं जें करावयास सांगितलें होतें, तें त्यांनीं संपूर्णपणें अंमलांत आणलेंच नाहीं. जेव्हां जेव्हां हें लक्षांत आलें, तेव्हां त्यांनीं लंगड्या सबबी पुढें केल्या व शासन न होतांच ते सुटले. या वृत्ति अशाच वाढत गेल्या व आपले अति नुकसान होऊन, आपली पतहि कमी झाली. नेहरू हे थोर पुरुष होते; मात्र ते थोर शासक नव्हते.

महत्त्वाच्या अशा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांबाबत एखादें मत जाहीर रीतीनें व्यक्त करण्याची संवय, नेहरूंना लागलेली होती. यामुळें अनेकजणांना ते दुखवीत असत व कांहीं वर्तुळांत ते अप्रिय होत असत.

या पुन: पुन: केलेल्या जाहीर वक्तव्यांमुळें, त्यांच्या कांहीं कृति या त्या जाहीर मतांशीं मिळत्या जुळत्या नाहींत हें चटकन ध्यानांत येत असे. क्युबा, सुवेज, कांगो, व्हिएतनाममधील व अल्जिर्समधील फ्रेंचांचा कबजा आणि अमेरिका व ब्रिटिश यांचें आशियाबाबतचें धोरण, अशा महत्त्वाच्या समस्यांवर ते विरोधी टीकास्त्र सोडीत, तेव्हां कांहीं गोटांत याची चीड निर्माण होत असे. जर ते कांहींहि न बोलते, किंवा त्यांनीं थोडीशीं व्यवहार-चतुरता अंगिकारली असती, तर ही गोष्ट त्यांना टाळतां आली असती. नेहरूंनीं या बड्यांवर टीका केल्यामुळेंच, रास्तपणें त्या त्या राष्ट्रांनीं काश्मीर प्रश्न, चीनबरोबरचें आपलें पुर्वीचे संबंध, नागांबरोबरचा झगडा, या बाबतींत आपल्याला धारेवर धरलें. (जेव्हां एखादा प्रश्न वादग्रस्त होतो, तेव्हां जशास तसें हेंच धोरण पुढें येतें.)

नेहरू आपली बरीच शक्ति उपऱ्या गोष्टींवर खर्च करीत. अनेक लोक असे असत, कीं त्यांना भेटण्याची नेहरूंना मुळींच आवश्यकता नसे, तरी त्यांना ते भेटूं शकत असत. ज्या गोष्टी अतिशय किरकोळ असत व ज्यांच्याकडे त्यांनीं दुर्लक्ष करून चाललें असते, अशा गोष्टींत तें असंख्य कामांतून वेळ काढून लक्ष घालीत असत. यामुळें होत असें काय, कीं नेहरू हें संध्याकाळीं जेवणाच्या वेळेपर्यंत अगदीं मरगळून गेलेले असत. पुष्कळ वेळां ते सकाळच्या न्याहारीच्या वेळीं म्हणत, 'आतां एकदां या यंत्राला किल्ली दिली, कीं दिवसभर तें चालूं राहील.' यामुळें असे प्रसंग पुष्कळ वेळां येत, कीं दुपारचें जेवण झाल्यानंतर महत्त्वाचें बोलणें चालूं असलें, तरी मध्येंच नेहरूंना डुलकी लागे. मला असे पुष्कळ प्रसंग आठवतात. १९४६ सालीं सरकारांत आल्या आल्या त्यांनीं मला एकदां आपल्या निवासांत रात्रीं दहा वाजतां बोलावलें होतें. ते माझ्याशीं कांहीं तरी बिन लष्करी गोष्टीसंबंधीं चर्चा करीत होते. या संबंधांत त्यांनीं मला एक फाईल वाचायला दिली. मी इकडे फाईल वाचीत असतांना, नेहरू खुर्चीं-तल्या खुर्चींत जरा आडवारले व लवकर त्यांना अगदीं गाढ झोंप लागली. हें अतिश्रमानें होत असें.

पंतप्रधान होण्यापूर्वीं दहा वर्षें 'मॉडर्न रिव्ह्यू' या मासिकाच्या नोव्हेंबर १९३७ च्या अंकांत नेहरूंनीं 'राष्ट्रपति' या शीर्षकाखालीं

'चाणक्य' या टोपण नांवानें एक लेख लिहिला होता. त्यांत त्यांनीं केलेल्या आत्मपरिक्षणांतील कांहीं भाग मी इथें देतो.

'पुन: त्याच्याकडे पाहा. प्रचंड मिरवणूक निघालेली आहे. दशसहस्त्र लोकांनीं त्यांच्या मोटारीला गराडा घातला आहे. मुक्तकंठानें ते त्याचा जयजयकार करीत आहेत. तो आपल्या मोटारींतील स्थानावर तोल सावरून उभा आहे, अगदीं सरळ, उंच वाटतो आहे. देवासारखा तो गंभीर आहे. आणि आसपासच्या क्षुब्ध गर्दीचा त्याच्यावर कांहींच परिणाम दिसत नाहीं. मग एकदम ते स्मित पुन: उमटलें. तो चांगलाच हंसूं लागला. ताण संपल्यासारखा वाटतो.

भोंवतालची गर्दींतील माणसेंहि त्याच्याबरोबर हंसू लागतात. हें हंसूं कां येते आहे हें त्यांना कळत नाहीं. आतां तो देवसदृश वाटत नाहीं. आसपास जमलेल्या हजारों लोकांशीं समरस होऊं पाहणारा, त्यांच्या स्नेहासाठीं आतुर असलेला असा तो मानव वाटूं लागतो. जमलेल्या लोकांना अतिशय समाधान वाटतें, त्याच्याविषयीं ओढ वाटते व ते त्याला आपल्या हृदयांत स्थान देतात. अगदीं उत्तरेपासून तो कन्याकुमारीपर्यंत तो एखाद्या विजयी सीझर प्रमाणें संचार करीत जातो. मागें त्याच्या वैभवाची आठवण उरते. कौतुक उरतें. आपल्या आत्मवृत्तांत तो आपल्या ठिकाणीं असलेल्या ज्या अभिलाषेची कबुली देतो, ती सत्तालालसा, त्याला या गर्दीपासून दूर नेते व तो स्वत:शींच बोलूं लागतो.

'मी गर्दीच्या लाटा माझ्या तळहातावर झेलल्या व माझी आकांक्षा आकाशाच्या पटावर ताऱ्यांनीं लिहिली.'

'जवाहरलाल हे कांहीं वृत्तीनें किंवा विचारानें हुकुमशहा नाहींत. हुकुमशाहीचा बालीशपणा व ग्राम्यपणा पचनीं न पडूं शकणारे, असे ते एक अमीर आहेत. (१९३७ सालीं दिल्लीला सत्तेच्या शिखरावर असतांना नेहरू हे सांगत होते.)

'सार्वजनिक ठिकाणीं खासगी मुखवटे, हे खासगी ठिकाणीं असणाऱ्या सार्वजनिक मुखवट्यांपेक्षां, अधिक चांगले व सुंदर वाटतात.'

'त्याला हें पक्के समजलें पाहिजे, कीं ज्या मार्गानें तो निघाला आहे,

त्या मार्गावर विश्रांती नाहीं. इथें मिळणारे विजय अधिक जबाबदाऱ्या आणतात. जसे लॉरेन्स यानें अरबांना म्हटलें होतें—

‘बंड करून उठणाऱ्यांसाठीं विश्रामधामें नसतात. आनंदांत त्यांना वांटा ठेवलेला नसतो.’

‘त्याच्या वांट्याला आनंद नसेल; परंतु जर दैव अनुकुल असेल व नशिबाकडून हात मिळेल, तर या आनंदापेक्षां श्रेष्ठ असें कांहींतरी त्याला लाभेल-- तें म्हणजे जीवनाचें प्रयोजन पार पाडल्याचें समाधान! या क्रांतिकालांत सीझर निर्माण होण्याची दाट शक्यता असतेच, आणि जवाहरलाल यांनाच सीझर व्हावेसें वाटणें हीं गोष्ट शक्य नाहीं कां? परंतु यांतच जवाहरलाल यांना व भारताला धोका आहे; कारण सीझर निर्माण होऊन कांहीं भारताला स्वतंत्र होतां येणार नाहीं... कितीहि उमदेपणानें ते बोलत असले तरी जवाहरलाल हे आतां दमलेले आहेत, शिळवटले आहेत व जर ते काँग्रेसचे अध्यक्षच राहिले, तर ते हळू हळू बिघडत जाणार आहेत. त्यांना विश्रांति शक्यच नाहीं; कारण जो एकदां वाघाच्या पाठीवर स्वार झाला, त्याला खालीं उतरतां येत नाहीं! परंतु अतिशय मोठ्या ओझ्याखालीं व जबाबदाऱ्यांमुळें त्याची मानसिक अधोगति होऊं न देणें व त्यांना भरकटूं न देणें, हें आपल्या हातीं आहे. त्यांच्याकडून भविष्यांत आपल्याला चांगलें काम अपेक्षित आहे. त्यांची भरमसाट खुशामत व स्तुती करून आपण त्यांना बिघडवून या आशेवर पाणी पडूं देतां कामा नये. आधींच त्यांचा अहंभाव भीतिजनक आहे. त्याला पायबंद घातला पाहिजे. आपल्याला सीझर नको आहेत.’

वरील लेखाचा सारांश असा, कीं नेहरू हे भारतांत विलक्षण लोकप्रिय होते. त्यांच्यावर मोठाल्या जबाबदाऱ्या होत्या. ते थकले होते, शिळवटले होते व हळू हळू बिघडत चालले होते. फाजील स्तुतीने व खुशामतीनें त्यांना बिघडवणें योग्य नव्हतें. त्यांचा अहंपणा भीतिजनक होता व ते बहुधा सीझरच होते. या सर्व गोष्टी पुढें खऱ्या ठरल्या. फक्त फरक इतकाच, कीं नेहरू हे तरुण असतांनाच फक्त जोमदार होते. सीझर होते. परंतु गांधीजींच्या प्रभावाखालीं तें मृदु होत गेलें पंतप्रधान झाल्यावर ते सुरुवातीला या मोठ्या प्रतिष्ठेवर भरभराट पावले; पण जसजसा काळ गेला, तेव्हां

त्यांच्यापुढील प्रश्न हें संख्येनें वाढत गेलें व गुंतागुंतीचे झाले. नेहरू हे अधिकाधिक तडजोड प्रवृत्तीचे होत गेले, व हें करूं कीं तें करूं, अशी त्यांची अवस्था होत गेली. खंबीरपणें राज्यशासन चालविण्याची त्यांच्या ठिकाणची अनिच्छा ही त्यांचे इतर क्षेत्रांतील मोठेंपण हिरावून घेऊं शकत नाहीं. त्यांच्यावर अन्याय न करतां म्हणायचें तर, ते पंतप्रधान होण्यासाठीं धडपडले नाहींत, तर पंतप्रधानपद त्यांच्यावर लादलें गेलें होतें.

ते एक आदर्शवादी व थोर मनाचे गृहस्थ होते. भारताला त्यांनीं लोकशाहीवादी राष्ट्र बनवलें. आपल्या सरकारचे प्रमुख होण्याऐवजी, ते राष्ट्राचे प्रमुख म्हणून नियुक्त व्हायला हवे होते. सरकार प्रमुख या भूमिकेंत त्यांची फार ओढाताण झाली, परंतु राष्ट्रप्रमुख म्हणून ते अतिश्रेष्ठ ठरले असते. आपले राष्ट्राध्यक्ष व्हायला ते अगदीं आदर्श गृहस्थ होते व राष्ट्राध्यक्ष म्हणून त्यांनीं भारताची उत्तुंग प्रतिमा लोकांपुढें उभी केली असती. कारण भारतीयांत जें सर्वोत्तम आहे, तें सर्व नेहरूंच्या ठिकाणीं प्रतीत होत होतें. (प्रकृति ठीक नसतांनाहि पुढें कांहीं वर्षे नेहरू हे आपल्या पदावरच आरुढ होऊन बसले; कारण त्यांना असें वाटत होतें, कीं जनतेसाठीं त्यांना हें केलें पाहिजे. अशा स्थितींत ते काम करीत असतांना, ज्यांनीं आपलें आयुष्य लोकांकरतां खर्ची घातलेलें आहे अशा नेहरूंविषयीं, क्षमाशील वृत्ति न दाखवतां त्यांच्याच कांहीं देशबांधवांनीं त्यांनीं सत्तात्याग करावा असा अनुदार ओरडा सुरू केला. लेनिन, रुझवेल्ट, आयसेन हॉवर हीं माणसेंहि अशाच स्थितींत काम करीत होती; तेव्हां त्यांच्या देशांनीं त्यांना संभाळून घेतले. अशोक किंवा अकबर यांच्यानंतर, ज्यांनीं या देशासाठीं पुष्कळ कार्य केलें म्हणून ज्यांचें नांव घ्यावें, ज्यांच्या मार्गावर एका काळीं गुलाबाचीं फुलेंच फुलें उधळलीं जात होतीं, अशा नेहरूंच्या वांट्याला मात्र त्यांच्याच देशबांधवांची तुच्छता येत होती.)

आपल्या कांहीं ज्येष्ठ सेनाधिकाऱ्यांना, आपल्या राष्ट्रीय पुढाऱ्यांविरुद्ध, अविचारी स्वरुपाची आग्रही शेरेबाजी, उघडपणें करण्याची खोड होती. ते कधीं कधीं असें सुचवीत असत, कीं कांहीं तरी हुकुमशाहीसारखी सत्ता आल्याखेरीज, आपल्याकडील गोंधळाची परिस्थिति सुधारणार नाहीं. परकीय लोकांच्या देखत ते भारतासंबंधीं अवहेलनेनें बोलत असत. अशा वेळीं

महत्त्वाची गुप्त स्वरूपाची माहितीहि त्यांच्या तोंडून बाहेर पडत असें व अनिष्ट अशा अनधिकृत गटांना व व्यक्तींना ती पोहोंचत असे.

यापूर्वी वर्णन केलेलें 'आगे बढो' धोरण चीन बाबत आंखण्यांत आलें होते त्यानुसार लडाख व नेफामध्यें अनेक लष्करीं ठाणीं निर्माण करण्या-साठीं आम्ही आज्ञा सोडीत होतों. या कामांत गृहखात्याचें बी. एन्. मुलीक व अहूजा यांनीं बहुमोल माहिती दिली. फेब्रुवारी १९६२ मध्यें या कामासाठीं मी गोहत्तीला जाऊन आलों.

नेफा प्रदेश हा ३६०×९० एवढ्या चौरस मैलांचा प्रदेश असून, तो सर्व उंच-डोंगराळ आहे. विशेषत: भारत–तिबेट सरहद्दीवरील भाग तर खूपच उंच–डोंगराळ आहे. उन्हाळा सुरू होऊन बर्फ वितळपर्यंत, या भागांत वावरणें कठीण होतें. या भागांत आम्हीं अनेक लष्करीं ठाणीं भारत-तिबेट सरहद्दीवर बसवलीं. महावीरप्रसाद या शीख फलटणीच्या कॅप्टननें, नेफा-मध्यें धोला येथें लष्करीं ठाणें उभे केलें. चिन्यांना अशा रीतीनें पायबंद घातला, यामुळें ते निराश झाले व संतापले. यांतूनच ऑक्टोबर १९६२ मध्यें जी स्फोटक परिस्थिति निर्माण झाली, ती मी पुढें वर्णन करणार आहेच.

पंतप्रधान नेहरू यांना नोव्हेंबर १९६१ मध्यें अमेरिकेंतून भेटीचें निमं-त्रण आलें. वॉशिंग्टन येथील आपले वकील बी. के. नेहरू, यापूर्वी कांहीं दिवस दिल्लीला कांहीं विचारविनिमयासाठीं आलेले होते. बी. के. नेहरू हे स्वातंत्र्यानंतरचे अमेरिकेंतील आपले सर्वांत यशस्वी राजदूत होते. ते अति-शय व्यवहार–कुशल व हुषार असून, त्यांचें व्यक्तिमत्व हें दुसऱ्याला जिंकून घेणारें होतें. कितीहि कामाचीं दडपणें असलीं, तरी शांत राहून, गांगरून न जातां तें सकाळीं अंथरूणावर चहाचे घुटके घेत; व नंतर वृत्तपत्रें चाळीत असत. प्रतिष्ठा सांभाळून व स्वतंत्रपणें कसें राहावें, याचें बी. के. नेहरू हें उत्तम उदाहरण होतें. त्यांनीं कुणाची खुशामत कधीं केली नाहीं. जवाहर-लाल नेहरू यांचे ते पुतणे असूनहि या गोष्टीचा त्यांनीं फायदा घेतलेला नाहीं. आपल्या सेवेंत केवळ गुणांच्या जोरावर ते मोठे झाले.

बी. के. नेहरू यांनीं माझ्याकडे अशी तक्रार केली, कीं भारत व अमेरिका यांच्यांत चांगले संबंध निर्माण करण्यासाठीं ते आपल्याकडून शिकस्त करीत

असतांना, मेनन हे त्यांच्या कामावर पाणी ओतण्याची एकहि संधी दवडीत नव्हते. बी. के. नेहरू यांना असें वाटें, कीं मेनन यांना स्वतःला वाटेल त्याप्रमाणें संयुक्त राष्ट्रांत वावरण्याचा अधिकार असला, तरी बौद्धिक कसरती करून हल्ले चढवून व तिरस्कारार्ह वागून भारताची प्रतिमा विकृत करण्याचा त्यांना अधिकार नाहीं. त्यांनीं संयुक्त राष्ट्रांत कांहीं गोष्टी प्रतिपादल्या असतील, परंतु त्यांनीं अनेक राष्ट्रांची मैत्री व सदिच्छा हें करीत असतांना गमावली. हें करण्याचें त्यांना कांहींहि प्रयोजन नव्हतें.

मी व बी. के. नेहरू यांनीं त्यानंतर चालू घडामोडीची व विशेषत: भारताच्या संरक्षण व्यवस्थेची चर्चा केली. मी त्यांना सांगितलें, कीं आपल्या जवळ शस्त्रास्त्रांची व लष्करी युद्ध-साधनसामुग्रीची भयानक कमतरता आहे. आपलें सरकार लोकसभेंत व बाहेर सर्वत्र असें सांगत आहे, कीं कोणाहि आक्रमकाला आपल्या प्रदेशांतून हुसकण्याची ताकद आपल्या सेनादलांत आहे. मी सांगितलें, कीं मला वाटतें आपल्या अपुऱ्या व जुनाट शस्त्रास्त्रांचा विचार करतां, ही गोष्ट फक्त सरकारच्या कल्पनेंतच शक्य होती. वस्तुस्थिति तशी नव्हती.

भारतापुढें आणीबाणीची परिस्थिति निर्माण झालेली असतांना, आपल्याला उपलब्ध होऊं शकतील, त्या सर्व साधनांनिशीं आपली शक्ति वाढवणें, हा आपला प्रयत्न असावयास हवा होता. मग आपल्याला मदत करणारा देश कोण आहे, याला फारसें महत्त्व देण्यात अर्थ नव्हता. जगणें महत्त्वाचें होतें. मरण टाळायचें होतें. बी. के. नेहरू म्हणाले, कीं अमेरिका मदत करायला तयार आहे, तेव्हां मला वाटलें, कीं आपण आनंदानें हा मैत्रीचा हात हातीं घेतला पाहिजे.

मी व बी. के. नेहरू असे दोघे पंतप्रधानांना भेटलो. पंतप्रधानांनीं मेनन यांच्या सांगण्याचीच री ओढली, कीं आपण शस्त्रें व इतर सामुग्री आयात केली, तर आधीच कमी असलेले परकीय चलन त्यांत खर्ची पडेल व संरक्षणावरील या खर्चानें देशाची मोठीच आर्थिक पिछेहाट होईल. ते म्हणाले, कीं आपण आपल्या पायांवर उभें राहिलें पाहिजें; कारण परके देश आपली मदत केव्हांहि काढून घेतील, किंवा बंद करूं शकतील.

मी म्हटले, की असें स्वावलंबी होणें हीच या प्रश्नाची अंतिम सोडवणूक

असली, तरी देशाला आज चीन व पाकिस्तानकडून मोठाच धोका उत्पन्न झालेला असतांना, नजिकच्या भविष्यांत लागणारी साधनसामुग्री आपण आपल्याकडे ती तयार करीपर्यंत दुसरीकडून घेण्यास काय हरकत आहे? जर आक्रमकानें आपला रणांगणावर लष्करी पराभव केला, तर आपली सामाजिक व आर्थिक घडी विसकटणार आहेच. नेहरूंनीं हें ऐकून घेतलें; परंतु ते म्हणाले, कीं मी किंवा इतर जनरल यांना परिस्थितीचें योग्य ज्ञान नाहीं. नेहरूंचा असा विश्वास होता, कीं चीन व पाकिस्तानपुढें, त्यांचें प्रश्न असतांना, थोडा फार ताण निर्माण करण्यापलीकडे जाऊन आपल्याशीं युद्ध सुरू करणें दोघांनाहि परवडणारें नाहीं.

बी के. नेहरू अमेरिकेला परत गेले व दूरचित्रवाणीवर एका प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनीं सांगितलें, कीं मेनन हे अमेरिकेंत अप्रिय आहेत ही गोष्ट त्यांना माहीत आहे. या उत्तरानें कांहीं वर्तुळांत गडबड उडाली. नेहरूंनीं लोकसभेंत सांगितलें कीं, आपल्या वकिलांना आपलें उत्तर निराळ्या शब्दांत देतां आले असते. मेनन हे कांहीं आठवड्यांनंतर बी. के. नेहरूंना भेटले व दोघांत खटका उडाला. मेनन यांची अशी समजूत होती, कीं ते अमेरिकेंत लोकप्रिय आहेत. बी. के. नेहरूंनीं सांगितलें कीं, भारतीय राजदूत म्हणून अमेरिकेंत काय वातावरण आहे, यावर लक्ष ठेवणें हें त्यांचें काम आहे व मेनन हे अमेरिकेंत अप्रिय आहेत, ही गोष्ट फक्त आंधळा बहिराच नाकारू शकेल.

याच सुमारास 'एस्क्वॉयर Esquire या मासिकांत, मेनन यांचेवर 'दि मोस्ट हेटेड डिप्लोमॅट' (अत्यंत द्वेषाचा धनी झालेला राजकारणी) या शीर्षकाखालीं लेख प्रसिद्ध झाला. या लेखांत कॅबट–लॉज यांचें तोंडीं, मेननसंबंधीं कांहीं चांगल्या गोष्टी घालण्यांत आलेल्या होत्या. या लेखाची नेहरूंवर छाप पडली व मेनन फुगले!

अध्यक्ष केनेडी यांनीं संयुक्त राष्ट्रसंघात एक भाषण केलें. या भाषणाबद्दल त्यांचें अभिनंदन करीत असतांना मेनन यांना केनेडी सहज म्हणाले कीं, केव्हां तरी भेटा. मेनन यांनीं व्हाईट हाऊसमधील केनेडी यांच्या चिटणीसांशीं संपर्क साधला व पद्धतीप्रमाणें अमेरिकेंतील भारतीय वकिलातीमार्फत न जातां, केनेडी यांचेशीं त्यांनीं भेट मुक्रर केली. केनेडी

यांच्या सेवकांनीं बी. के. नहरू यांना विचारलें, कीं मेनन केनेडी यांचेशीं काय बोलूं इच्छितात, हें त्यांना माहीत आहे काय ? बी. के. नेहरूंनीं हाच प्रश्न मेननना विचारला. मेनननीं उत्तर दिलें, कीं विशेष असें कांहीं बोलावयाचें नाहीं. बी. के. नेहरू यांनीं हें उत्तर जेव्हां अध्यक्षीय कचेरींत कळवलें, तेव्हां त्यांनीं मेनन यांची भेट रद्द केली ! मेनन यांना ही गोष्ट कळली तेव्हां ते भडकलें. त्यांना तेव्हां कांहींच करतां मात्र आलें नाहीं.

नेहरू जेव्हां अमेरिकेला भेट देण्यासाठीं नोव्हेंबर १९६१ मध्यें अमेरिकेला पोहोंचलें, तेव्हां मेनन यांनीं तक्रार केली, कीं भारताच्या तेथील वकिलांनीं मुद्दामच त्यांचा अपमान केलेला होता. बी. के. नेहरू यांनीं जें घडलें, तें नेहरूंना सांगितलें. नेहरू जेव्हां केनेडी यांना भेटले, तेव्हां त्यांनीं असें सूचित केलें, कीं अध्यक्षांना वेळ होईल तेव्हां त्यांनीं मेननना भेट घेऊं द्यावी. या वेळीं आपले वकील बी. के. नेहरूहि हजर राहतील, असे नेहरुंनीं सुचवलें. मेनन यांची केनेडी यांना एकटयानेंच भेटण्याची इच्छा होती; परंतु परदेशीय व्यवहार पद्धतीनुसार बी. के. नेहरू हजर राहणें भाग होतें. मेनन यांना अखेर ही गोष्ट मान्य करावी लागली. ही भेट झाली; परंतु यामुळें केनेडी यांचें मेननविषयीं जें मत होतें, किंवा मेनन यांचा अमेरिकेविषयीं जो ग्रह होता, यांत बदल झाला नाहीं.

माझ्या धाकटया मुलीचें चित्रलेखेचें १९६२ च्या उन्हाळयांत विनय बक्षी यांचेंशीं लग्न झालें. या नंतर लगेंचच कानांवर बातमी आली कीं, चिन्यांनीं दौलतबेग ओल्डी या लडाखमधील गांवाच्या उत्तरेचें एक ठाणें वेढलें आहे. हें ठाणें १५००० फूट उंचीवर होतें. काय झालें आहे हें पाहण्यासाठीं मी थोईसे मार्गानें, या ठिकाणीं विमानानें गेलो. थोईसे येथें मी रात्रीं राहिलों. तेथून मला दौलत बेग ओल्डी या ठिकाणीं हेलिकॉप्टरनें नेण्याकरतां एअर व्हाईस मार्शल पिंटो हे आले होते. दौलत बेग ओल्डी येथें कांहीं जीपगाडया व इतर साधन-सामुग्री पॅरॅशूटनें कांहीं आठवडयांपूर्वीं उतरवली होती. तेथें कांहीं वेळ काढून आम्हीं काराकोरम खिडीकडे नियोजित ठाण्यावर उतरलों. हें अगदीं छोटें ठाणें होतें व १७००० फूट उंचीवर होतें. लोकवस्तीपासून लांब असें हें होतें. मी तेथील जम्मू–काश्मीर लष्करांतील कमांडरला विचारलें, कीं चिनी त्या दिवशीं कसे आले व कुठें गेले. त्यानें भोळेपणानें व मोठा

आव आणून सांगितलें, कीं ते जवळ येऊं लागतांच त्यानें त्यांना तांबडा रुमाल हलवून निघून जाण्यास सांगितलें व ते हें पाहतांच निघून गेले.

आर्मी हेडक्वार्टर्सला बातमी आली, कीं लडाखमधील गलवन या ठिकाणीं असलेलें गुरख्यांचें ठाणें १० जुलै १९६२ रोजीं चिन्यांनीं वेढलें. सेना-प्रमुखांनीं आपल्या निवासांत मला या बाबतींत काय करावें याचें बोलणें करण्यासाठीं बोलावून घेतलें.

आतांपर्यंत चिनी फक्त आपल्या प्रदेशांत गुपचूपपणें पुढें येत असत व ठाणें वसवीत असत. आतां अलिकडे ते अधिक धीट झाले व त्यांनीं कुरापती काढण्यांस सुरुवात केलेली होती. आतां तर त्यांनीं आपलीं ठाणीं घेरण्यास सुरुवात केली. आम्हीं पेंचांत होतों. या गोष्टीकडे दुर्लक्ष करावें तर चिनी अधिकच शेफारतील; कांहीं कृति करावी व जर त्यांतून कांहीं संघर्ष उडाला, तर त्यांना अडवणें हें आपल्या अपुऱ्या साधनांनीं शक्य नव्हतें. कांहीं तरी कृति करायला हवी होती; म्हणून आपल्या परराष्ट्र खात्यानें दिल्ली येथील चिनी वकिलातीकडे निषेध नोंदवला. जर लडाखमध्यें चिन्यांनीं हेंच धोरण ठेवलें, तर आम्हांला कडक उपाय योजावें लागतील असें त्यांना कळविलें.

या ठाण्यांतील (वेढा दिलेल्या) आपल्या सैनिकांना घाबरवण्याचा प्रयत्न चिन्यांनीं सुरू केला. नेपाळी दुभाष्यांमार्फत त्यांनीं गळवन येथील गुरखा सैनिकांना, दूरध्वनिक्षेपकांतून मोठ्या मोठ्यानें उपदेश केला, कीं भारतीय लोक हे कांहीं नेपाळचे मित्र नाहींत. मग त्यांचे मित्र असलेल्या चिन्यांशीं ते कां लढत आहेत, असा प्रश्न त्यांना टाकण्यांत येत असे. ते याशिवाय उपद्रवकारक हालचाली करीत व तेथील चाळीस सैनिकांच्या अगदीं जवळ सरकत. त्यांना वाटे, कीं त्यांची मोठी शक्ति पाहून आपले सैनिक शरण येतील; पण गुरखा तुकडीनें हें ठाणें पक्कें धरून ठेवलें. नंतर गलवन येथील या तुकडीच्या जागीं जाठ तुकडी आली. (गलवन ठाण्याभोंव-तालचा वेढा चिन्यांनीं कधीं उठवला नाहीं. ऑक्टोबर-नोव्हेंबर १९६२ मध्यें, लडाख नेफामधील इतर अनेक ठाणीं चिन्यांनीं सर केली; त्यांत गलबन हें ठाणेंहि होतें.)

अधिक संख्येनें अद्यावत शस्त्रें सैन्याला मिळावी यासाठीं तपशीलवार

मागणी मी सेनाप्रमुख जनरल थापर यांचेकडे केली होती. अधिक सैन्य तुकड्या तयार कराव्या, त्याशिवाय सध्यांच्या विस्तृत जबाबदाऱ्या पार पडणार नाहींत, असें मी कळविलें होतें. (याच माझ्या योजनेवर हात फिरवून जनरल जे. एन्. चौधरी यांनीं सेनादलांत वाढ करण्याची मागणी १९६३ साली केली व चव्हाण यांनी कसल्याहि प्रसंगाला तोंड देतां यावें, यासाठीं नव्या जोमाच्या नव्या लष्करी नेतृत्वानें केलेली ही मागणी स्वीकारल्याचें लोकसभेंत जाहीर केलें.)

नोव्हेंबर १९६१ ते जून ६२ या काळांत, मी व 'मास्टर जनरल ऑफ ऑर्डिनन्स' अशा दोघांनीं सेनादल प्रमुख थापर यांच्या सहीनें, ओळीनें आठ पत्रें, संरक्षण मंत्र्यांना धाडलीं व सेनेंतील साधनसामुग्रीची कमतरता त्यांच्या नजरेस आणली. या पत्रांत आम्हीं खर्चासाठीं अधिक पैशांची व अधिक परकीय चलनाची मागणी केली होती.

अधिक सैन्य उभारण्यासाठीं, अद्यावत शस्त्रास्त्र खरेदीसाठीं, आम्ही ४५९ कोटी रुपयांच्या खर्चाची मंजुरी हवी, असा अंदाज कळवला होता. यांत इतर अनेक गोष्टी व सामुग्री यांचा अंतर्भाव नव्हता असेंहि कळविलें होतें. यांत्रिकी सांठा व संदेश वाहतुकीसाठीं लागणारें साहित्य यांत जो तुटवडा होता, त्याचा तपशील आम्हीं तयार केलेला होता. वाहनें, बर्फमय प्रदेशांत लागणारे कपडे, सामुग्री विमानांतून खालीं टाकण्यासाठीं लागणारी साधनें, या सर्व गोष्टी यांत होत्या. आम्हीं आमच्या पत्रांत ही गोष्ट संरक्षण मंत्र्यांच्या नजरेस आणली होती, कीं १९५९ सालापासून आपल्या सेनेंत कल्पनातीत वाढ झालेली आहे; परंतु त्या प्रमाणांत शस्त्रास्त्रें व सामुग्री मात्र खरेदी केली गेलेली नव्हती. हें एक दुष्ट-चक्रच निर्माण झालेलें होतें. सैन्यवाढ तर बाबडतोब करायलाच हवी होती; परंतु शस्त्रास्त्रांचा, सामुग्रीचा, दारुगोळ्याचा तुटवडा इतका होता, कीं नवीन उभारलेल्या सेनेला या गोष्टी कशा पुरणार हा प्रश्न होता. आपल्या देशांत या गोष्टी तयार होतील, म्हणून थांबायचें म्हटलें, तर नवीन सैन्य उभारणें शक्य नव्हतें; कारण त्याचा उपयोग नव्हता. ही परिस्थिति अतिशय कठीण होती व याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता होती.

आमच्या पत्रांतून ज्या मागण्या केलेल्या होत्या, त्यांचें महत्त्व लक्षांत

घेतां, ह्या गोष्टी मंत्रिमंडळाच्या संरक्षण समितीपुढें ठेवाव्या असें आम्हीं सुचवलें होतें. या आठ पत्रांपैकीं एकाहि पत्राला मेनन यांचेकडून किंवा सरकारकडून लेखी उत्तर आलें नाहीं. मेनन यांचेंशीं पुष्कळ मुलाखती झाल्या; परंतु या पत्रांत आमची जी मागणी मांडलेली होती, याबद्दल बहुतांशीं कांहींहि केलें गेलें नाहीं.

दिल्लींतील या वेळचें चित्र हें उद्वेगजनक होतें. सरकारपुढें पुष्कळ गुंतागुंतीचे प्रश्न होते, परंतु मंत्रीजनांत असे फारच थोडे होते, कीं जे या बाबतींत कार्यक्षमतेनें या प्रश्नाचा मुकाबला करूं शकत होते. गेला तो दिवस आपला, या वृत्तीनें सर्व प्रश्नांची घाऊक पद्धतीनें सोडवणूक करण्याचा प्रयत्न ते करीत होते. प्रश्नांकडे शास्त्रशुद्ध रीतीनें पाहण्यांत येत नव्हतें. अग्रक्रमाचा विचारच नव्हता व ताबडतोब करण्याच्या गोष्टी केल्या जात नव्हत्या. मुत्सद्देगिरी, संरक्षण, आर्थिक बाबी या सर्वांचा मेळच घालण्यांत येत नव्हता.

संरक्षणापुरतें सांगायचें तर नेहरूंनीं किंवा त्यांच्या मंत्र्यांनीं, सर्वंकष असें संरक्षण धोरणच बांधत आणलेलें नव्हतें. आपले संभाव्य शत्रू कोण, आपल्याशीं तुलना करतां त्यांची शक्ति किती, त्यांना आपल्यावर मात करणें शक्य होऊं नयें म्हणून कोणतीं लष्करीं व कोणतीं मुत्सद्देगिरीचीं पावलें टाकायला हवींत, यापैकीं कशाचाच विचार झालेला नव्हता. जें युद्ध आपल्या दाराशीं आपल्यापुढें आक्राळविक्राळ रूपांत उभें होऊं पाहात होतें, त्याकडे कपाळाला हात लावून आपण फक्त पाहात बसलों होतों. कांहीं नवीन परिस्थिति निर्माण झाली कीं, त्यासाठीं आपली कांहींच तयारी नसे. मग दिल्लीला निरनिराळें ज्येष्ठ-कनिष्ठ अधिकारी गोलाकार पळूं लागत व अखेरच्या मिनिटाला यावर उपाय शोधूं लागत. या पद्धतिमुळें आपलें युद्धतंत्र हें आणीबाणीच्या प्रसंगी पुरेसें सुस्थितींत ठेवण्यांतहि आपल्याला अपयश आलें.

ज्या कुणी शक्ति त्यावेळीं असतील, त्यांना असें म्हणतां येणार नाहीं, कीं खरी परिस्थिति काय आहे हें त्यांना ठाऊक नव्हतें. खरी गोष्ट अशी आहे, कीं त्यांना प्रश्न ठाऊक होते; परंतु उत्तरें माहित नव्हतीं. मला असे कांहीं जनरल माहीत आहेत, कीं जे राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान व इतर

राजकारणी नेत्यांना अधुनमधून भेटून सैन्याची सर्व हालत सांगत होते. जर सरकारनें हा प्रश्न सोडवण्यासाठीं योग्य तीं पावलें टाकलीं नसतील, तर ज्या राजकारणी लोकांना सेनेंत काय चालू आहे, हें माहीत होतें, त्यांनीं सरकारला योग्य ती कारवाई करण्यास भाग पाडायला हवें होतें.

आतां मी अर्थ खातें व संरक्षण खातें यांच्या दरम्यान, या वर सांगितलेल्या गोष्टींबाबत काय काय घडत होतें याचें थोडेसें दिग्दर्शन करतो.

अर्थ खात्यांतील माणसें निरनिराळ्या पातळीवर आमच्या निकडीच्या मागण्यांबद्दल काथ्याकूट करीत असत. व जी एकंदर मागणी असेल, ती फक्त कांहीं अंशानें अखेर मान्य करीत. याला अपवाद क्वचितच. ज्यांत शेवटीं कांहींहि निर्णय घेतला जात नसे अशा बैठकांतून फाईलीवरील टिपणांद्वारें, ते पुस्तकी व वांझोटे वादविवाद खेळत असत. ते आमच्या प्रस्तावांची, वस्तुस्थिति लक्षांत न घेतां छाननी करीत व प्रत्येक वेळीं निराळे मुद्दे उपस्थित करीत. फाईली आपल्या मागेंपुढें होत राहात असत. यांत अव्वाच्या सव्वा वेळ जाई. तज्ञ वगैरे कांहीं नसतांना, हें अर्थ खात्यांतले पंडित तांत्रिक बाबतींत ढवळाढवळ करीत व प्रत्येक गोष्टीचा आर्थिक दृष्टीनें विचार करीत. परकीय चलन नाहीं या सबबीवर, आवश्यक ती सामुग्री विकत घ्यायला ते नकार देत. ज्यांत परकीय चलन लागत नसे, अशाहि गोष्टी फेटाळल्या जात. जेव्हां कांहीं व्यावहारिक कारणें आम्हीं सांगत असूं, तेव्हां हे तथाकथित तज्ज्ञ कांहींहि ऐकून घेत नसत व आमच्या प्रकरणाकडे शोचनीय अशा उदासीनतेनें पाहात असत.

भविष्यांत काय आहे, हें स्पष्टपणें दिसूं लागलें, तरी हे म्हणत, 'छे ऽ बुवा, आमचा यावर विश्वास नाहीं.' लंडनमध्यें एका बाईला तिच्या मित्रानें सांगितलें, कीं जिराफ या प्राण्याची मान एखाद्या झाडासारखी लांब असते. तिचा विश्वास बसेना. तो मित्र त्या बाईला प्राणीसंग्रहालयांत घेऊन गेला व त्यानें तिला जिराफ प्रत्यक्ष दाखवला. जिराफाची ती मान पाहून ती बाई थक्क झाली; परंतु म्हणाली, 'माझा माझ्या डोळ्यांवर मुळीं विश्वासच नाहीं !' या बाईसारखे हे 'तज्ज्ञ' वागत असत.

झारींतील शुक्राचार्यांप्रमाणें हीं माणसें वागत. अडून बसून इतका विलंब लावीत, कीं तीं प्रकरणें बाजूला फेकलीं जात. मी एक समर्पक उदाहरणच



*अमेरिकन दूत, सौ. केनेडी सौ. गालब्रेथ व लेखकाची कन्या.*
*( सौ. केनेडी यांच्या स्वागताच्या वेळीं दिल्लींत. )*

सांगतो. सेमी ॲटोमॅटिक बंदुका विकत घेऊन, पुराण्या झालेल्या ''३०३' या बंदुका बदलायला हव्या होत्या. यासाठीं १० कोटी रुपयांचा खर्चाचा अंदाज करण्यांत आला होता. अर्थखात्यानें ही रक्कम बऱ्याच घासाघिशी-नंतर नामंजुर केली. या निर्णयाचा प्रत्यक्ष लष्करी हालचालीवर काय परिणाम होईल, याचा विचारहि केला नाहीं. या अर्थखात्यांतील अधि-काऱ्यांनीं ही जी अविचारी दृष्टी अनेक वर्षें पत्करली, त्यामुळें भारतीय सेनेला चिन्यांशीं लडाख व नेफामध्यें १९६२ सालीं निकृष्ट शस्त्रास्त्रांनिशीं व पुष्कळ अडचणींनिशीं लढावें लागलें.

संरक्षणमंत्री मेनन व अर्थमंत्री मोरारजी देसाई यांची व्यक्तिमत्त्वें संवादी नव्हती, ही गोष्ट साधारणपणें सर्वांना माहित आहे. संरक्षण खात्यानें

राजकारणी नेत्यांना अधुनमधून भेटून सैन्याची सर्व हालत सांगत होतो. जर सरकारनें हा प्रश्न सोडवण्यासाठीं योग्य तीं पावलें टाकलीं नसतील, तर ज्या राजकारणी लोकांना सेनेंत काय चालू आहे, हें माहीत होतें, त्यांनी सरकारला योग्य ती कारवाई करण्यास भाग पाडायला हवें होतें.

आतां मी अर्थ खातें व संरक्षण खातें यांच्या दरम्यान, या वर सांगितलेल्या गोष्टींबाबत काय काय घडत होतें याचें थोडेसें दिग्दर्शन करतो.

अर्थ खात्यांतील माणसें निरनिराळ्या पातळीवर आमच्या निकडीच्या मागण्यांबद्दल काथ्याकूट करीत असत. व जी एकंदर मागणी असेल, ती फक्त कांहीं अंशानें अखेर मान्य करीत. याला अपवाद क्वचितच. ज्यांत शेवटीं कांहींहि निर्णय घेतला जात नसे अशा बैठकांतून फाईलीवरील टिपणांद्वारें ते पुस्तकी व वांझोटे वादविवाद खेळत असत. ते आमच्या प्रस्तावांची वस्तुस्थिति लक्षांत न घेतां छाननी करीत व प्रत्येक वेळीं निराळे मुद्दे उपस्थित करीत. फाईली आपल्या मागेंपुढें होत राहात असत. यांत अव्वाच्या सव्वा वेळ जाई. तज्ज्ञ वगैरे कांहीं नसतांना, हें अर्थ खात्यांतले पंडित तांत्रिक बाबतींत ढवळाढवळ करीत व प्रत्येक गोष्टीचा आर्थिक दृष्टीनें विचार करीत. परकीय चलन नाहीं या सबबीवर, आवश्यक ती सामुग्री विकत घ्यायला ते नकार देत. ज्यांत परकीय चलन लागत नसे, अशाहि गोष्टी फेटाळल्या जात. जेव्हां कांहीं व्यावहारिक कारणें आम्हीं सांगत असूं, तेव्हां हे तथाकथित तज्ज्ञ कांहींहि ऐकून घेत नसत व आमच्या प्रकरणाकडे शोचनीय अशा उदासीनतेनें पाहात असत.

भविष्यांत काय आहे, हें स्पष्टपणें दिसू लागलें, तरी हे म्हणत, ‘ छे बुवा, आमचा यावर विश्वास नाहीं. ’ लंडनमध्यें एका बाईला तिच्या मित्रानें सांगितलें, कीं जिराफ या प्राण्याची मान एखाद्या झाडासारखी लांब असते. तिचा विश्वास बसेना. तो मित्र त्या बाईला प्राणीसंग्रहालयांत घेऊन गेला व त्यानें तिला जिराफ प्रत्यक्ष दाखवला. जिराफाची ती मान पाहून ती बाई थक्क झाली; परंतु म्हणाली, ‘ माझा माझ्या डोळ्यांवर मुळीं विश्वासच नाहीं ! ’ या बाईसारखे हे ‘ तज्ज्ञ ’ वागत असत.

झारींतील शुक्राचार्यांप्रमाणें हीं माणसें वागत. अडून बसून इतका विलंब लावीत, कीं तीं प्रकरणें बाजूला फेंकलीं जात. मी एक समर्पक उदाहरणच



*अमेरिकन दूत, सौ. केनेडी सौ. गालब्रेथ व लेखकाची कन्या.*
*( सौ. केनेडी यांच्या स्वागताच्या वेळीं दिल्लींत. )*

सांगतो. सेमी ॲटोमॅटिक बंदुका विकत घेऊन, पुराण्या झालेल्या '·३०३' या बंदुका बदलायला हव्या होत्या. यासाठीं १० कोटी रुपयांचा खर्चाचा अंदाज करण्यांत आला होता. अर्थखात्यानें ही रक्कम बऱ्याच घासाघिशी-नंतर नामंजुर केली. या निर्णयाचा प्रत्यक्ष लष्करी हालचालीवर काय परिणाम होईल, याचा विचारहि केला नाही. या अर्थखात्यांतील अधि-काऱ्यांनीं ही जी अविचारी दृष्टी अनेक वर्षें पत्करली, त्यामुळें भारतीय सेनेला चिन्यांशीं लडाख व नेफामध्यें १९६२ सालीं निकृष्ट शस्त्रास्त्रांनिशीं व पुष्कळ अडचणींनिशीं लढावें लागलें.

संरक्षणमंत्री मेनन व अर्थमंत्री मोरारजी देसाई यांची व्यक्तिमत्त्वें संवादी नव्हती, ही गोष्ट साधारणपणें सर्वांना माहित आहे. संरक्षण खात्यानें

केलेल्या सूचनांबाबत, अर्थखात्याशीं जो सतत पेंच निर्माण केला जाई, तो या दोन मंत्र्यांमधील, या आणीबाणीच्या काळांतील संघर्षामुळें निर्माण होत असे. यासाठीं अर्थमंत्रालयानेंहि सेना युद्धसज्ज राहूं शकली नाहीं या दोषांतील वांटा घेतला पाहिजे. कृष्ण मेनन यांना जेव्हां कळून चुकलें, कीं त्यांच्या संरक्षणाबाबतच्या बहुतेक मागण्यांत अडसर घातला जात आहे, तेव्हां त्यांनीं तावडतोब अर्थमंत्र्यांशीं किंवा पंतप्रधानांशीं किंवा मंत्रिमंडळांत तरी या गोष्टीची तड लावावयास हवी होती. कारण याचें परिणाम महाभयंकर होणार होते. कृष्णमेनन यांनीं हें केलें नाहीं. कां केलें नाहीं याचीं कारणें त्यांची त्यांना माहित. (असें कांहीं त्यांनीं केलें असतें तर नेहरू किंवा त्यांचे इतर सहकारी हे अस्वस्थ होतील, अशी भीति त्यांना वाटत असावी.) हा सर्वच प्रकार विलक्षण होता.

यावेळीं मला असें वाटलें, कीं सेनेच्या बाबतींत जी गंभीर न्यूनें होतीं, तीं सनदी नोकरांच्या नजरेस आणावी. विश्वनाथ, एम्. जे. देसाई व भूतलिंगम् हे तिघे अनुक्रमें गृह, परराष्ट्र खातें व अर्थ खातें यांचे सचीव होते. मुलीक हे डायरेक्टर ऑफ इंटेलिजन्स होते.

भूतलिंगम म्हणाले, कीं भारताला जर मी वर्णन केला एवढा संरक्षणाचा कार्यक्रम आखायचा झाला, तर पुढल्या पंचवार्षिक योजनेंतील खर्चाला कात्री लावली पाहिजे. आपलें चालू परकीय चलन जेमतेम आपली अर्थव्यवस्था तगवून धरील इतकेंच आहे, असें ते म्हणाले. तरीहि त्यांनीं सूचना केली, कीं यासंबंधीं एक आराखडा तावडतोब सरकारला पाठविण्यांत यावा. मी सेनाप्रमुखाच्या सहीनें संरक्षण मंत्र्यांकडे असा खर्चाचा आराखडा तयार करून पाठवला. हा प्रस्ताव मंत्री मंडळाच्या संरक्षण समितीपुढे ठेवावा असें सुचवलें. मेनन यांना हें पत्र मिळालें; परंतु त्यांनीं तें संरक्षण समितीपुढें ठेवलें, कीं नाहीं हें त्यांनाच माहीत. या पत्राचें पुढें काय झालें मला माहित नाहीं.

कृष्ण मेननचे सोडा, मोरारजी देसाई यांना या परिस्थितीची कल्पना निदान दोन ठिकाणाहून मिळाली असलीच पाहिजे. एक म्हणजे त्यांचे आर्थिक सल्लागारांकडून व दुसरे भूतलिंगम–त्यांचें अर्थसचीव यांचेकडून. अर्थमंत्री म्हणून नाहीं; परंतु मध्यवर्ती सरकारचे जबाबदार मंत्री या

नात्यानें त्यांनीं ही गंभीर गोष्ट मंत्रीमंडळाच्या बैठकींत उपस्थित करायला हवी होतीं. कृष्ण मेनन यांनीं त्यांना नसेल माहिती दिली.

मंत्रीमंडळाचे सदस्य आपल्याला संरक्षण शक्तीची आंतील स्थिति माहित असल्याची बढाई मारीत असत. यांनीं मंत्रीमंडळांत टेबलावर मूठ कां आपटली नाहीं ? मला वाटतें मांजराच्या गळ्यांत घंटा बांधण्याची कुणाचीच तयारी नव्हती !

मला इथें आणखी एक गोष्ट नमूद केली पाहिजे, पुष्कळ जनरल अशी प्रौढी सांगतात, कीं वेळोवेळीं त्यांनीं सेनादलांतील हीं न्यूनें व आवश्यक गरजा त्यांच्या सर्व परिणामांसह सरकारच्या उच्च गोटांत नजरेस आणल्या होत्या. कुणीतरी लोकांना या बाबतींत अधिक माहिती दिली पाहिजे, कीं हे जनरल कोण होते ? (किंवा कोण सनदी नोकर होते ?) त्यांनीं सरकारला काय व कधीं सांगितलें ? त्यांनीं लेखी ही गोष्ट जोरदार भाषेंत पुनःपुन: मांडली काय ? जसें मी व थापर यांनीं केलें. यांनीं ही मांडली याला साक्ष कोण व पुरावा काय ?

इथें मला दोन चित्तवेधक हकिगती सांगितल्या पाहिजेत. अँडमिरल डी. शंकर हे जेव्हां १९५९ मध्यें जपानला गेले, तेव्हां त्यांच्या ओळखीच्या एका जपानी अधिकाऱ्याला ते भेटले. या अधिकाऱ्यानें चालू घडामोडीची चर्चा करतांना शंकर यांचे जवळ उद्‌गार काढले, कीं जपान व भारत यांची मैत्री असूनहि, दोघांच्यामध्यें मोकळेपणानें संवाद होऊं शकत नाहीं व यामुळें महत्त्वाची माहिती एकमेकांना कळूं शकत नाहीं यापूर्वीं तो म्हणाला, कीं मध्यपूर्व आशिया खंडांत तीनच देश महत्त्वाचें आहेत. चीन, भारत व जपान. फार्मोसा मधील चिन्यांकडून त्याला असें कळलें होतें, कीं रशिया-चीन कुरबुर वाढत असल्यानें लवकरच रशियाचें तेल चीनला बंद होईल. त्यांना मग ही आवश्यक गोष्ट इतरत्र मिळवावी लागेल. चीन यासाठीं लडाख व नेफा क्षेत्रांत आपला हक्क सांगू लागेल व संघर्ष उडाल्याखेरीज राहणार नाहीं. चिन्यांना या भागांतले तेलसाठे हवे असल्यानें, ते हा प्रदेश कुरतडत राहतील. अखेर ते यासाठीं लढाईदेखिल करतील. परंतु हा भाग पदरांत पाडल्याशिवाय ते राहणार नाहींत. चिन्यांना आसाम-मधील तेलहि हवें आहे व बंगालच्या उपसागरांत त्यांना प्रवेशहि हवा

आहे. हे प्रश्न आजच उकरले तर संघर्षाचें क्षेत्र खूप वाढेल, म्हणून चिनी स्वस्थ आहेत. पण ती थिमी जात आहे. पुढें केव्हां तरी हे प्रश्न ते हातीं घेतीलच.

रिअर ॲडमिरल शंकर यांनीं जपानमध्यें जें ऐकलें, तें सर्व त्यांनीं आपले वरिष्ठ, मेजर पी. नारायण यांना सांगितलें. नारायण हे त्या वेळीं ' कंट्रोलर जनरल ऑफ डिफेन्स प्रॉडक्शन ' होते.

शंकर यांनीं संरक्षण साहित्याची निर्मिती यावर एक प्रबंध लिहिला होता. त्यांत त्यांनीं म्हटलें होतें, कीं संरक्षण खातें, सेनादलांच्या गरजेपैकीं फक्त १५ टक्के उत्पादनच करत असते. भारताची जी सर्व औद्योगिक ताकद असेल, ती यासाठीं राबवली पाहिजे.

मेनन यांचा संरक्षणसाहित्याची निर्मिती खासगी धंदेविभागांत व्हावी, याला सक्त विरोध होता, या कल्पनेवर ते नेहमींच फुत्कारत असत.

१९६१ मध्यें ' चीफस् ऑफ् स्टाफ 'नीं सरकारकडे त्यांची लष्करी साहित्याची मागणी सादर केली. यांत बंदुकीच्या कारखान्याचें अद्यावतीकरणासाठीं रुपये एक कोटी होते. मेनन यांनी ही मागणी मोरारजी देसाई यांचेकडे धाडली; व आर्थिक कारणें देऊन मोरारजींनीं ती फेटाळली. पुढें १९६२ च्या पराभवानंतर, चव्हाणांनीं जेव्हां याच कामासाठीं दोन कोटी रुपयांचें परकीय चलन मागितलें, तेव्हां मोरारजी देसाई यांनीं बदलत्या परिस्थितींत एकच नव्हें तर अशा दोन कारखान्यांसाठीं पैसे देऊं केले. या संबंधांत त्यांनीं संयुक्त सचीव सारिन व मेजर जनरल इयाप्पा व रिअर ॲडमिरल शंकर यांना भेटावयास बोलावलें. या चर्चेच्या वेळीं मोरारजींनीं छद्मीपणानें विचारलें—

' तुमची होणार होणार म्हणून गाजलेली (म्हणजे मेनन यांची) लष्करी साहित्य निर्मितीची योजना कुठवर आली ?'

' सर, तुमच्या राजकारणांत त्याची वाट लागली.'

——शंकर बोलून गेले.

' काय म्हणालांत ?' मोरारजी गरजले.

' कांहीं नाहीं सर. ' शंकर तोंडातल्या तोंडांत पुटपुटले, ' कांहीं नाहीं...'

'पुन: बोला ना अॅडमिरल.' देसाई ओरडून म्हणाले.

'मी म्हटलें, कीं संरक्षण साहित्य निर्मिती प्रश्नावर खूप राजकारण खेळलें गेलें...' शंकर यांनीं थंडपणें सांगितलें.

मेनन यांचें अंगीं कार्यक्षमता होती यांत संशय नाहीं; परंतु सेनादल प्रमुखांनीं शिफारस केलेल्या गोष्टीवर त्यांनीं योग्य ती कारवाई केली नाहीं. मी त्यांना अनेक वेळा सेनादल अकार्यक्षम ठेवण्यांतले धोके दाखवले; परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. मेनन यांना वाटत असें, कीं युद्ध होण्याची नजिकच्या भविष्यांत शक्यता नाहीं. यामुळें त्यांनीं भारतांतच शस्त्रास्त्र-निर्मिती व्हावी, ती अधिक स्वस्त व चांगली होईल असा आग्रह धरला. दूरगामी धोरण म्हणून परकीय देशांवर या बाबतींत अवलंबून राहणें शहाणपणाचें नाहीं; कारण ऐन युद्धांत ती राष्ट्रें ही व्यवस्था बंद पाडूं शकतात, असें त्यांना वाटें. त्यांचें म्हणणें होतें, कीं केव्हांतरी ही गोष्ट सुरू करायलाच हवी आहे, मग आत्तांच कां नाहीं ?

नेमका याच मुद्यावर मेनन व सेनेंतील मी व ज्येष्ठ अधिकारी, यांचा मेननशीं महत्त्वाचा व मूलभूत मतभेद होता. आम्हांला हें पसंत नव्हतें, कीं सरहद्दी धोक्यांत असतांनाहि, आवश्यक साहित्य ताबडतोब बाहेरून कां आणूं नये ? बाहेरून शस्त्रास्त्रें व लष्करी साहित्य आणलेंच पाहिजे, मग त्याकरतां कितीही पैसा लागो, असा आमचा जोराचा आग्रह होता. या गोष्टी आपल्या देशांत वेळेवर तयार होणें शक्य नव्हतें.

मेनन यांनीं प्रतिवर्षी लोकसभेला आश्वासन दिलें होतें, कीं देशाची संरक्षण शक्ति सुदृढ असून आपल्या सरहद्दीवरील कसल्याहि परिस्थितीला आपण यशस्वीपणें तोंड देऊं. वस्तुस्थितीला हें धरून नव्हतें ! उलट सेनेनें पुन: पुन: मेनन यांना इषारा दिलेला होता, कीं आपलें सैन्य देशाचें नीट संरक्षण करण्याच्या स्थितींत नाहीं.

जनरल थापर हे अस्वस्थ झाले होते. मेनन यांचा या बाबतींतील पवित्रा पाहून, ही गंभीर परिस्थिति नेहरूंच्या नजरेस आणण्याचें त्यांनीं ठरवलें व या बाबतींत मला विचारलें. मी थापर यांना सांगितलें कीं खासगी रीतीनें अशा गोष्टींची चर्चा नेहरू यांचेशीं करण्याचा शिरस्ता त्यांनीं पाडलेला

आहे. हे प्रश्न आजच उकरले तर संघर्षाचें क्षेत्र खूप वाढेल, म्हणून चिनी स्वस्थ आहेत. पण ती धिमी जात आहे. पुढें केव्हां तरी हे प्रश्न ते हातीं घेतीलच.

रिअर ॲडमिरल शंकर यांनीं जपानमध्यें जें ऐकलें, तें सर्व त्यांनीं आपले वरिष्ठ, मेजर पी. नारायण यांना सांगितलें. नारायण हे त्या वेळीं 'कंट्रोलर जनरल ऑफ डिफेन्स प्रॉडक्शन' होते.

शंकर यांनीं संरक्षण साहित्याची निर्मिती यावर एक प्रबंध लिहिला होता. त्यांत त्यांनीं म्हटलें होतें, कीं संरक्षण खातें, सेनादलांच्या गरजेपैकीं फक्त १५ टक्के उत्पादनच करत असते. भारताची जी सर्व औद्योगिक ताकद असेल, ती यासाठीं राबवली पाहिजे.

मेनन यांचा संरक्षणसाहित्याची निर्मिती खासगी धंदेविभागांत व्हावी, याला सक्त विरोध होता, या कल्पनेवर ते नेहमींच फुत्कारत असत.

१९६१ मध्यें 'चीफस् ऑफ् स्टाफ'नीं सरकारकडे त्यांची लष्करी साहित्याची मागणी सादर केली. यांत बंदुकीच्या कारखान्याचें अद्यावतीकरणासाठीं रुपये एक कोटी होते. मेनन यांनी ही मागणी मोरारजी देसाई यांचेकडे धाडली; व आर्थिक कारणें देऊन मोरारजींनीं ती फेटाळली. पुढें १९६२ च्या पराभवानंतर, चव्हाणांनीं जेव्हां याच कामासाठीं दोन कोटी रुपयांचें परकीय चलन मागितलें, तेव्हां मोरारजी देसाई यांनीं बदलत्या परिस्थितींत एकच नव्हें तर अशा दोन कारखान्यांसाठीं पैसे देऊं केले. या संबंधांत त्यांनीं संयुक्त सचीव सारिन व मेजर जनरल इयाप्पा व रिअर ॲडमिरल शंकर यांना भेटावयास बोलावलें. या चर्चेच्या वेळीं मोरारजींनीं छद्मीपणानें विचारलें—

'तुमची होणार होणार म्हणून गाजलेली (म्हणजे मेनन यांची) लष्करी साहित्य निर्मितीची योजना कुठवर आली?'

'सर, तुमच्या राजकारणांत त्याची वाट लागली.'

—शंकर बोलून गेले.

'काय म्हणालांत?' मोरारजी गरजले.

'कांहीं नाहीं सर.' शंकर तोंडातल्या तोंडांत पुटपुटले, 'कांहीं नाहीं...'

'पुनः बोला ना अॅडमिरल.' देसाई ओरडून म्हणाले.

'मी म्हटलें, कीं संरक्षण साहित्य निर्मिती प्रश्नावर खूप राजकारण खेळलें गेलें...' शंकर यांनीं थंडपणें सांगितलें.

मेनन यांचें अंगीं कार्यक्षमता होती यांत संशय नाहीं; परंतु सेनादल प्रमुखांनीं शिफारस केलेल्या गोष्टीवर त्यांनीं योग्य ती कारवाई केली नाहीं. मी त्यांना अनेक वेळा सेनादल अकार्यक्षम ठेवण्यांतले धोके दाखवले; परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. मेनन यांना वाटत असें, कीं युद्ध होण्याची नजिकच्या भविष्यांत शक्यता नाहीं. यामुळें त्यांनीं भारतांतच शस्त्रास्त्र-निर्मिती व्हावी, ती अधिक स्वस्त व चांगली होईल असा आग्रह धरला. दूरगामी धोरण म्हणून परकीय देशांवर या बाबतींत अवलंबून राहणें शहाणपणाचें नाहीं; कारण ऐन युद्धांत ती राष्ट्रें ही व्यवस्था बंद पाडूं शकतात, असें त्यांना वाटें. त्यांचें म्हणणें होतें, कीं केव्हांतरी ही गोष्ट सुरू करायलाच हवी आहे, मग आत्तांच कां नाहीं ?

नेमका याच मुद्यावर मेनन व सेनेंतील मी व ज्येष्ठ अधिकारी, यांचा मेननशीं महत्त्वाचा व मूलभूत मतभेद होता. आम्हांला हें पसंत नव्हतें, कीं सरहद्दी धोक्यांत असतांनाहि, आवश्यक साहित्य ताबडतोब बाहेरून कां आणूं नये ? बाहेरून शस्त्रास्त्रें व लष्करी साहित्य आणलेंच पाहिजे, मग त्याकरतां कितीही पैसा लागो, असा आमचा जोराचा आग्रह होता. या गोष्टी आपल्या देशांत वेळेवर तयार होणें शक्य नव्हतें.

मेनन यांनीं प्रतिवर्षी लोकसभेला आश्वासन दिलें होतें, कीं देशाची संरक्षण शक्ति सुदृढ असून आपल्या सरहद्दीवरील कसल्याहि परिस्थितीला आपण यशस्वीपणें तोंड देऊं. वस्तुस्थितीला हें धरून नव्हतें ! उलट सेनेनें पुनः पुनः मेनन यांना इषारा दिलेला होता, कीं आपलें सैन्य देशाचें नीट संरक्षण करण्याच्या स्थितींत नाहीं.

जनरल थापर हे अस्वस्थ झाले होते. मेनन यांचा या बाबतींतील पवित्रा पाहून, ही गंभीर परिस्थिति नेहरूंच्या नजरेस आणण्याचें त्यांनीं ठरवलें व या बाबतींत मला विचारलें. मी थापर यांना सांगितलें कीं खासगी रीतीनें अशा गोष्टींची चर्चा नेहरू यांचेशीं करण्याचा शिरस्ता त्यांनीं पाडलेला

नसल्यानें व कृष्ण मेनन यांचेशीं त्यांचे संबंध ताणलेले असल्यानें, ते जर संरक्षण मंत्र्यांना डावलून पंतप्रधानांकडे गेले, तर गैरसमज वाढून ते पंचायतींत सांपडतील. मी त्यांना असेंहि म्हणालों, कीं नेहरू हे कृष्ण मेनन यांचेविरुद्ध कांहींहि ऐकून घ्यायला तयार नसतात. याच सुमारांस मेनन हे मुंबईतील त्यांच्या मतदार संघांतून दणदणीत मतांनीं निवडून आले होते व यामुळें त्यांचे टीकाकार थंड झाले होते. मेनन यांनीं हा विजय, जबर विरोधांवर मात करून मिळवलेला असल्यानें याचा नेहरूंवर खोल परिणाम झाला. यामुळें मेनन यांची शक्ति वाढली व नेहरू त्यांना सर्व बाबतींत मुक्त स्वातंत्र्य देऊं लागले. या कालखंडांत मेनन यांनीं कांहीं उल्लेखनीय गोष्टी घडवून आणल्या व कांहीं उल्लेखनीय चुकाहि केल्या.

अनेक दिवसांपासून नेहरूंशीं महत्त्वाच्या लष्करी प्रश्नांवर खाजगी रीतीनें चर्चा करण्याची मला परवानगी असल्यानें, नेहरूंच्या कानावर थापर यांचा विचार घालण्याची जबाबदारी मी पत्करली. मी याप्रमाणें नेहरूंना भेटून दोन गोष्टींचा पुरस्कार केला. (१) भारतांत तयार होणारें लष्करी साहित्य वेगानें निर्माण व्हावें म्हणून, सरकारी विभागाबरोबरच खासगी क्षेत्रांचाहि यासाठीं उपयोग करावा व (२) सेनेची जी शस्त्रांस्त्राबाबत तांतडीची गरज आहे, ती शस्त्रास्त्रें आयात करून गरज भागवण्यांत यावी.

मी त्यांच्या हें नजरेस आणलें, कीं या बाबतींत आर्मी हेडक्वार्टरनें मेनन-मार्फत सरकारकडे धाडलेल्या पत्रांना उत्तर आलेलें नाहीं.

नेहरूंनीं या कुठल्याच बाबतींत फारसें कांही केलें नाहीं. सेनेला अद्यावत् करण्यासाठीं व न्यून्यें नाहींशीं करण्यासाठीं, पुरेशी रक्कम मंजूर व्हावी, म्हणून केलेल्या मागण्यांबाबत, संशयानेंच पाहावें अशी नेहरूंची मनोभावना झाली. याची बहुतांशी जबाबदारी मेनन यांचें शिरावर आहे असें मला वाटतें. नेहरू यांनीं मेनन यांना मी वर सांगितलें आहे त्या पेक्षां कांहीं निराळ्या आज्ञा दिल्या असल्यास, सेनेला तरी याची माहिती नाहीं व मेनन यांनीं त्या कार्यान्वित केलेल्याहि आढळल्या नाहींत.

परदेशांतून आपल्या वकिलांनीं धाडलेलें वृत्तांत, परराष्ट्रखात्यानें काढलेले आडाखे, त्यांच्या विश्वासांतील माणसांनीं व राजकारण्यांनीं त्यांना दिलेला सल्ला, यावरून नेहरू यांचें असें मत बनलें, कीं चीन हें

प्रत्यक्षांत गाजावाजा केला जातो तेवढें शक्तिमान राष्ट्र नाहीं. त्यांना त्यांचें अंतर्गत प्रश्न पुष्कळ आहेत. तेथें अन्नाची टंचाई असल्यानें अंतर्गत असंतोष आहे. पूर येतात व अप्रिय झालेली हुकुमशाही राजवट तिथें आहे. तिबेटांत बंडें होत आहेत व एकंदरींत चिनी जनतेचें व सैन्याचें मनोधैर्य खचलेलें आहे आणि जर आपण त्यांच्याशीं नमून वागलों नाहीं तरी भागण्यासारखे आहे ! हा अंदाज सत्याला सोडून होता.

नेहरू व त्यांचे मंत्रिमंडळांतील सहकारी, यांना असेंच वाटत होतें, कीं चीनशीं युद्ध होणारच नाहीं; व या बाबतींत सेनेच्या प्रमुखांनीं चुकीची लष्करीं गणितें बसवलेलीं आहेत. मेनन यांचें हेंच मत होतें. सनदी नोकर जवळ जवळ हाच ताल धरून होते. जेव्हां मेनन, मोरारजी देसाई व नेहरू हे सेनाप्रमुखांचे मागण्यांबाबत योग्य ती प्रतिक्रिया व्यक्त करिनात, तेव्हां सेनाप्रमुखांनीं या प्रश्नाबावत त्यांना कांहीं तरी करण्यास भाग पाडायला हवें होतें.

१९६२ च्या सुरुवातीला नेहरूंच्या निवासांतून मला निरोप मिळाला, कीं रात्री दहा वाजतां येऊन भेटा. नेहरू हे ठरलेल्या भेटीबाबाबत कांटेकोर असत व म्हणून दहाच्या ठोक्याला त्यांच्या अभ्यासगृहांत मी दाखल झालों. त्यांनी विचारलें, कीं चेस्टर बौल्स यांचेशीं माझा कितपत परिचय आहे. मी सांगितलें, कीं माझी त्यांची चांगली ओळख आहे. कै. मेजर जनरल हरिचंद बढवार यांच्या मदतीला ते कसें धावून आले, त्याची आठवण सांगितली. नेहरू म्हणाले, की केनेडी यांचे खास प्रतिनिधी म्हणून चेस्टर बौल्स हे भारतभेटीसाठीं येत असल्याचें, त्यांना कळलें होतें. बौल्स हे त्यांच्या दिल्ली भेटींत मला भेटूं इच्छितात. मग क्षणभर विचार करून नेहरू म्हणाले, कीं या संबंधी मी मेनन यांनाहि भेटावें. मी जेव्हां दुसऱ्या दिवशीं सकाळीं मेननना यासंबंधी भेटलों तेव्हां ते मला झोंबेल अशा भाषेंत म्हणाले.—

'जनरल, आपण अमेरिकेचे नागरिकत्वच कां मागत नाहीं ? सर्व संबंधितांना तें सोयीचें होईल !'

कांहींहि न बोलतां मी मेनन यांचेकडे रागानें पाहिलें. ते नंतर म्हणाले, कीं चेस्टर बौल्स यांना आमच्या जनरलना भेटायची कांहींहि जरूर नव्हती व मीं त्यांना हें कळवावें.

'मी स्वत: होऊन चेस्टर बौल्स यांची भेट मागितलेली नाहीं. भेट त्यांनीं मागितली आहे. तें सुद्धां त्यांनी थेट मला कळवलेलें नाहीं–' मी म्हणालो. (भारतीय जनरलना भेटणारे हे कांहीं पहिलेच परकीय राजकारणी पुरुष नव्हते.) मी पुढें सांगितलें––

'ते कांहींहि असलें, तरी मला भेटण्याची विनंती, त्यांनीं सरकारमार्फत केलेली आहे, मग सरकारच एखादें सोयीस्कर कारण पुढें करून बौल्स यांना तसें कां कळवीत नाहीं ?'

'हें बोलायला सोपें आहे !' कृष्ण मेननर्नी उत्तर दिलें, 'चेस्टर बौल्स हे अध्यक्ष केनेडीचे खास प्रतिनिधी म्हणून येत आहेत व त्यांच्या विनंतीला मान न देणें हें विचारीपणाचें होणार नाहीं व सोपेंहि नाहीं.'

'मग संरक्षणमंत्री आपण त्यांना मला भेटूं द्यावें.' मी सांगितले.

'तुम्ही एक कठीण गृहस्थ आहांत.' मेनन फणकारलें.

'परंतु सर, अजून तुम्ही मला मी चेस्टर बौल्स यांना भेटूं, कीं नको हें सांगितलेलेंच नाहीं.' मी पृच्छा केली.

कृष्ण मेनन यांचा चेहरा आतां मात्र लाल झाला. त्यांनीं फक्त एकाक्षरानें अुत्तर दिलें– 'हो !'

आमची भेट ताबडतोब आटोपलीच !

चेस्टर बौल्स हें यानंतर कांहीं दिवसांनीं मला भेटायला आले. सुरुवातीलाच त्यांनीं स्पष्ट केलें, कीं एक जुना मित्र या नात्यानें ते बोलत आहेत. चीनचा भारताला जो धोका निर्माण झाला होता, त्यासंबंधीं त्यांनीं विचारलें, कीं माझ्या मतें, चीनचें भारताशीं असलेलें भांडण कितपत गंभीर आहे.

**मी उत्तर दिलें, मला पूर्वी असें वाटत होतें; कीं चीननें भारतीय सरहद्दीचा केलेला भंग याला फक्त राजकीय हेतू होता व चीनशीं आमचे संबंध वाटाघाटींनीं पूर्ववत करतां येतील. परंतु आतां माझी त्यांच्या वागण्याच्या पद्धतीवरून खात्री झाली आहे, कीं आमच्या कांहीं प्रदेशावर आवश्यक झाल्यास बळाचा वापर करून त्यांचा हक्क प्रस्थापित करण्याचा विचार आहे.**

बौल्स यांनी आणखी चौकशी केली, कीं यामुळें झगडा उडेल काय आणि जर झगडा उडणार असेल, तर आम्हीं या बाबतींत नेमकें काय व कधीं करण्याचें ठरवलें आहे. मी सांगितलें कीं, चिनी बहुधा १९६२ च्या उन्हाळ्यांत वा हिवाळ्यांत आमच्याशी संघर्ष पेटवतील व यामुळें आमच्यापुढें पुष्कळच समस्या निर्माण झालेल्या आहेत, माझी अपेक्षा होती, कीं इतर राष्ट्रांवर युद्धाचें संकट आलें, कीं तीं राष्ट्रें शत्रू शक्तिमान असेल तर ज्या गोष्टी करतात, त्या गोष्टी करील. पुढें येणाऱ्या संकटाचा विचार करून त्याला पायबंद घालण्यासाठीं, आधींच आपल्या मित्र राष्ट्रांबरोबर साहाय्याची योजना आखील, कारण काय होणार आहे, हें तर दिसतच होतें. (१९६३ मध्यें हा प्रसंग झाल्यानंतर अमेरिकेंतून लष्करी शस्त्रसामुग्री भारतानें मागितली व ती आपण घेतलीच ! )

थोडा वेळ अधिक उभयतांच्या देशासंबंधीं इतर कांहीं बोलणें झाल्यावर बौल्स गेले.

चेस्टर बौल्स यांनीं यानंतर मला लिहिलें, कीं अध्यक्ष केनेडी यांना आपल्या प्रश्नाबाबत संपूर्ण माहिती देण्याचा ते प्रयत्न करतील.

१९६३ मध्यें पुढें चेस्टर बौलसनीं मला पुन: लिहिलें—

'मार्च १९६२ मधें माझें तुमच्याशीं झालेलें संभाषण मला जसेंच्या तसें आठवतें. या वेळीं तुम्ही भविष्य केलें होतें, कीं चिनी हें त्या वर्षाच्या उन्हाळ्यांत किंवा हिवाळ्यांत हल्ला चढवतील. तुम्हीं सुचवल्याप्रमाणें त्याच वेळीं या परिस्थितीला तोंड देण्यासाठीं आपण जर सहकार्याची रूपरेखा आंखली असती, तर ऑक्टोबर–नोव्हेंबर १९६२ मध्यें जें घडलें त्याला वेगळीच कलाटणी मिळाली असती.'

मेनन यांनीं जेव्हां 'मिग २१' ही 'सुपर-सैनिक' विमानें आपल्या विमानदलासाठीं निवडलीं, तेव्हां मी केवळ लष्करी पेशांतील औत्सुक्य म्हणून विचारलें, कीं मिळू शकतात त्या विमानांत हींच विमानें सर्वोत्कृष्ट आहेत काय ? मला विमानदलांतील तज्ज्ञांकडून समजलें होतें कीं, अशी विमानें अनेक देश तयार करतात. अुदाहरणार्थ अमेरिकेची F १०४ किंवा स्वीडनची 'साब ड्रेकन' फ्रेंचाची 'मायरेज् III' किंवा ब्रिटिशांचे लाय-

टर्निंग.' मेनन म्हणाले, कीं संरक्षण खात्यानें याची खात्री करून घेतली होती. अनेक दृष्टीनें 'मिग' विमानांचा हा व्यवहारच आपल्याला उत्तम होता. रशियाकडूनच हीं विमानें घेणें चांगलें. (कारण त्यांना असें वाटें कीं, रशियन हे या बाबतींत अधिक सहकार्य देतात, रुपयाच्या किमतींत याचें मोल स्वीकारतात व याचें अुत्पादन भारतांत व्हावें यासाठींहि त्यांनीं सहकार्य देऊं केलें आहे.) रशियाकडून रणसाहित्य खरेदी करण्याच्या मी विरुद्ध नव्हतो; परंतु आपल्या दृष्टीनें हींच विमानें उत्तम आहेत कीं नाहीं याबद्दल माझ्या मनांत संशय होता.

भारतीय हवाई-दलांत 'मिग' विमानांचा वापर सुरू करण्याचा हा निर्णय अशासाठीं होता कीं, आमच्या शेजारच्या राष्ट्रांकडे आपल्या विमानापेक्षां दुप्पट वेगाची विमानें होतीं व यामुळें त्यांचें विमानदल थोडें वरचढ होतें. अमेरिका भारताला 'एफ. १०४' हीं विमानें विवक्षित संख्येनें देण्यास राजी नव्हती. ही गोष्ट लक्षांत घेतां हा निर्णय अत्यंत योग्य होता. सोविएट विमान दलांत ज्या प्रकारचीं विमानें आहेत, त्याच दर्जाचीं विमानें भारतीय विमानदलाला त्यांनीं देऊं केलीं व बाकीच्यांत त्यांनीं कांहीं तांत्रिक बदल करून तीं आपल्याला देण्याचें ठरलें होतें.

पाठोपाठ मास्को येथें एक करार भारतानें केला. यानुसार भारतांत मिग विमानांचा कारखाना देण्याचें सरकारनें ठरविलें. रशियन हें आपल्याला कारखाना अुभारण्यासाठीं व त्याचें बनावटीचें तंत्र शिकण्यासाठीं मदत देणार होते. भारत-चीन संबंध अतिशय बिघडलेले असतांना, आपल्या संरक्षण प्रकल्पांत सोविएटांचें सहकार्य घेण्याचा हा निर्णय, हा एक राजकीय निर्णयहि म्हणतां येईल. अतिशय प्रगत अशा वैमानिकी यंत्राच्या व अस्त्रांच्या उत्पादन क्षेत्रांत, ह्या प्रकल्पाची आर्थिक बाजू विचारांत न घेतां, शिरण्याचा हा एक गंभीर प्रयत्न असावा.

भारत-चीन संबंध बिघडल्यानंतरहि, रशियानें या प्रकल्पाला चिकटून राहावें, हा त्यांच्या कडूनच मदत घेण्याच्या धोरणाचा विजय वाटतो; परंतु भारतीय विमान दलाला, सुपरसॉनिक फायटर विमानें लगेच उपलब्ध न झाल्यानें, जमिनीवरील युद्धांत भाग घेणें विमान दलाला शक्य होणार नाहीं ही टीका बरोबरच होती. या प्रकल्पाची प्रचंड योजना पाहतां,

मिग विमानाचें उत्पादन हें अतिशय मंद गतीनें होणार हें दिसतच होतें. भारत सरकारनें तर्कशुद्ध धोरणानें रशियन बांधणीची मिग विमानें भरपूर संख्येनें विकत घेऊन, भारतांत त्यांचें उत्पादन होऊन, ती विमानें उपलब्ध होई पर्यंतचा काळ विमानें इतर ठिकाणाहून आयात करून काढायला हवा होता. परंतु हें सरकारनें केलें नाहीं.

मेनन यांनीं 'कंट्रोलर जनरल ऑफ डिफेन्स प्रॉडक्शन' अॅडमिरल शंकर यांना जेव्हां विचारलें, कीं मिग विमानांविषयीं त्यांना काय वाटतें, तेव्हां शंकर यांनीं सांगितलें कीं हीं विमानें भारतीय विमानदलांत आल्यामुळें आपली सर्व विद्युत्परमाणूची (Electronic System) पद्धति बदलून ती रशियन तऱ्हेची करावी लागणार आहे. यानें कांहीं किरकोळ प्रश्न निर्माण होतीलच; परंतु मुख्य म्हणजे याकरतां अवाढव्य खर्च होईल व तो आपण करू शकत नाहीं. जेव्हां विमानदल प्रमुख एअर मार्शल अिंजिनिअर यांना त्यांनीं मिग संबंधीं विचारलें, तेव्हां त्यांनींहि मिग विमानांमुळें उद्‌भवणाऱ्या कांहीं अडचणी दाखवल्या. यामुळें मात्र मेनन हें संतापले व त्यांनीं चर्चाच बंद केली. ते म्हणाले-----

'एअर मार्शल, तुमचें नांव इंजिनिअर असेल; परंतु तुम्हीं पेशानें इंजिनिअर नाहीं; आणि म्हणून तांत्रिक बाबतींत मत देण्याचा प्रयत्न करूं नका !'

मिग विमानांसंबंधीं बोलतांना, मी मेनन यांना भारतीय हवाई दलाच्या कांहीं चालू अडचणी दाखवल्या. मी सांगितलें कीं, या अडचणी निर्माण होतात त्याचें कारण, भारतीय हवाईदलाच्या तुकडींत सध्या वीस निरनिराळ्या जातीचीं विमानें आहेत. आधुनिक विमान दल म्हणून यांना चार पांच प्रकारचीं कामें करावीं लागत. हीं वेगवेगळ्या जातीचीं विमानें फ्रान्स, ब्रिटन, अमेरिका, रशिया व कॅनडा, या पांच देशांतून आलेलीं होतीं. यामुळें प्रमाणीकरण अजिबात न झालेल्या विमानदलाचें, भारतीय विमानदल हें उत्तम उदाहरण होतें. यामुळें वाढ होऊनहि भारतीय विमान-दलाला स्थिरावस्था आलेली होती. वैमानिक शक्तीचा जो एक अंगभूत महत्त्वाचा विशेष असतो, कीं तें संयोगक्षम असते, तोच विशेष भारतीय विमानदलांत नव्हता. यामुळें कमांडरना युद्धांत संरक्षणाच्या दृष्टीनें, विमानांच्या तुकड्या, हव्या तशा हलवून जी गतिक्षमता लाभते तीच उपलब्ध नव्हती.

विमानांची ये जा नीट राहण्याकरितां, त्यांची निगा राखण्याचें शिक्षण असावें लागतें. या बाबतींत दोन गोष्टींमुळें अनिष्ट परिणाम होत होता. अनेक उच्च शिक्षित अशा विमानदलांतील अिंजिनिअरना, अगदीं चुकीच्या कामाला जुंपण्यात आलेलें होतें. कांहीं वर्षांपूर्वी भारतीय विमानदलानें एका ब्रिटिश कारखान्याचा परवाना विकत घेऊन प्रॉपेलर जेट जातीची, मध्यम दर्जाचीं, वाहतुकीचीं विमानें तयार करण्याचें काम अंगिकारलें होते. भारतीय विमानदलांतील इंजिनिअर, हे विमानांची डागडुगी व दुरुस्ती या कामासाठींच अपुरे पडत असतांना, त्यांच्याच गळयांत हें काम देण्यांत आलें. एका अतिउत्साही कमांडरकडे, विमानांची दुरुस्ती व निगा हें जें काम त्याचें होतें, तें त्याच्याकडून काढून घेऊन त्याला या प्रकल्पाची जबाबदारी देण्यात आली. कांहीं ब्रिटिश तज्ञांच्या हाताखालीं अर्ध्या डझनाहून कमी असे विमानांचे सांगाडे, अनेक दिवसांच्या विलंबानंतर तयार करून एकत्र ठेवण्यांत आलें. याला एवढा विलंब का लागला व हें काम अर्धवटच कां झालें, त्याबद्दल कुणीहि खुलासा केलेला नाहीं.

यामुळें भारतीय विमानदलाचें फार नुकसान झालें या नुकसानीचा अंदाज केवळ पैशांत करून चालणार नाहीं. वैमानिक तुकडींतील व डेपोमधील विमानांची दुरुस्ती व निगा याची 'यत्ता' घसरली. तांत्रिक दोषामुळें जे अनेक अपघात झाले त्याचें कारण हेंच असूं शकेल.

मेनन यांना माझें विश्लेषण पटेना, तेव्हां मी त्यांना विमानाच्या दुरुस्ती-साठीं कानपुरला जो डेपो आहे, तेथील अशा प्रकारचें एक उदाहरण सांगितलें.

वैमानिक तंत्रज्ञांना निराळीं कामें दिल्यानें जे अपघात झाले, किंवा अपघाताचे प्रसंग आले त्यांची माहिती दूरदर्शीपणानें देण्यांत आली नाहीं. तरीसुद्धां विमानांची जी तंत्रज्ञ माणसें होतीं, त्यांच्या मनोधैर्यावर परिणाम झालाच. ही परिस्थिति आणखी वाईट झाली, ती आणखी एका कारणानें. डेपोचे जबाबदार कमांडर, हे विमान बांधणीचे खाजगी उद्योग करीत असत व त्याकडे दुर्लक्ष करण्यांत येत असे. जे खास तंत्रज्ज्ञ होते, त्यांनींच हें काम अंगावर घेण्याचा म्हणे सल्ला दिला होता! अशा तऱ्हेचा उपदेश नेहमींच विपूल मिळूं शकतो.

भारतीय विमानदलाच्या विमानांची दुरुस्ती व निगा, यांत विक्षेप आणणारी दुसरी गोष्ट मी मेनन यांच्या नजरेस आणली; ती म्हणजे दुरस्तीसाठीं लागणारे सुटे भाग, हे योग्य ठिकाणीं व वेळेवर मिळतील, अशा रीतीनें सांठा करून ठेवण्यांत आलेले नव्हते. कारण या सुटया भागांचें प्रमाणीकरण झालेलें नव्हतें. हे भाग जेथून येत असत, ते देश दूर असल्यानें यांचा ओघ टिकवला जात नसे, यामुळें हे सुटे भाग मिळवण्याच्या खटपटींत खूप वेळ जात असे. यासाठीं वाजवीपेक्षां जास्त माणसें भरती झालेलीं होतीं व अनावश्यक तपासण्या निरनिराळ्या पातळीवर केल्या जात असत.

माझा ज्या दलाशीं संबंध नव्हता, त्या संबंधीं इतक्या तपशीलानिशीं, मी मेनन यांचेशीं चर्चा केली. याला दोन कारणें होतीं. पहिलें म्हणजें कोणतेंहि नवीन विमान आपण खरेदी केलें तरी त्याची व आहेत त्या विमानांची दुरुस्ती व निगा राखण्याची पद्धत, याचा सैन्यावर व देशाच्या संरक्षणावर परिणाम होत असे. (विमानदल हें सैन्याच्याच मदतीसाठीं असते.) दुसरी गोष्ट ही कीं, कांहीं ज्येष्ठ विमादल अधिकाऱ्यांनीं, मला या व इतर कांहीं गोष्टींची संरक्षण मंत्र्यांशीं चर्चा करण्यास सांगितलें होतें. त्यांना आशा वाटत होती, कीं जें त्यांना जमलें नाहीं, तें कदाचित मला जमेल.

मला असें आढळून आलें, कीं सैन्याविषयी म्हणा, विमानदलाविषयी म्हणा, मी जो सल्ला वेळोवेळीं मेनन याना दिला, तो फुकट गेला. मेनन यांना माझा उपदेश आवडत नसें, कारण त्यांची अशी प्रामाणिक समजूत होती, कीं, त्यांनीं जीं कांहीं पावलें उचललीं होतीं, त्यापेक्षां इतर कांहीं करणें आवश्यक नव्हतें! आमच्यापैकीं पुष्कळांना देखील, आपल्या हाता-खालच्या माणसांकडून आपल्या विषयी सत्य असलेल्या गोष्टीहि ऐकण्याची इच्छा नसतें. मग त्या गोष्टी आपल्या फायद्याच्या असोत किंवा जे लोक धीर करून आपला दोष आपल्यापुढें मांडतात त्यांच्या फायद्याच्या असोत. 'किरातार्जुन' या ग्रंथांत भारवी म्हणतो, तें खरें आहे; 'धन्याला जे सांगायला पाहिजे, ते जो सांगत नाहीं, तो त्याचा सेवक कसला? जे त्यांच्या फायद्याकरतां सांगितलें असूनहि, तें जो ऐकत नाहीं, तो धनी

कसला ? ज्या देशांत धनी व सेवक यांच्यांत तादात्म्य असते, तो देश समृद्धि पावतो.' )

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या बहुतेक नेत्यांची अशी समजूत झालेली होती, कीं आपल्याला अहिंसेनें स्वातंत्र्य मिळालें. त्यांना वाटत असें कीं, जर ब्रिटिशांसारख्या सत्तेला शस्त्राचा उपयोग न करता अहिंसेनें आपण येथून घालवून दिलें, तर मग सेनादलांवर आवश्यक असला तरी एवढा खर्च करण्यांत काय अर्थ आहे ! याच कल्पनेचा त्यांच्या मनावर पगडा होता. सेनादलांचें महत्त्व यामुळें कमी लेखण्यात आलें व त्यांनीं केलेल्या मागण्या या चैनबाजीच्या गोष्टी आहेत, अशा रीतीनें त्याकडे पाहण्यांत येऊं लागले. आपल्या सरहद्दीवर १९५८ पासून चिन्यांनीं लष्करी मोर्चे बांधलें आहेत व त्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. ही गोष्ट लक्षांत येऊन देखील, आचार्य कृपलानी, रामसुभसिंग यांच्यासारख्या धूर्त राजकारणी लोकांनीं व यच्चयावत वृत्तपत्रांनीं अनेक धोक्याचे इषारे दिल्या नंतरहि, सरकारनें देशाच्या संरक्षणाच्या बाबतींत कांहीं निकड असल्याची बुद्धि दाखवली नाहीं; व आपली या बाबतींतली शोचनीय उदासीनता चालूंच ठेवली. परिणामी सेनादलांकडे पुरेसें आवश्यक लक्ष दिलें गेलें नाहीं, हीं दलें आकारानें व बांध्यानें खुरटलेलीं राहिलीं, भारताची सुरक्षितता किंवा भारताला मिळणाऱ्या धमक्या या गोष्टींचा मुकाबला करण्याच्या दृष्टीनें पुरी पडलीं नाहीत; व सरकारच्या या प्रश्नाकडे पाहण्याच्या मानसिक दृष्टीकोनामुळें, युद्धसज्ज होऊं शकली नाहींत. सरकारनें कधी आपली सेना, गरजेला पुरी पडेल, एवढी शक्तिशाली करण्याचा यत्नच केला नाहीं. दुबळी सेना म्हणजे दुबळा देश व अशा देशाचा प्रदेश हा आक्रमकांचें भक्ष्य ठरतो, ही गोष्ट यांना समजत होती कीं नाहीं कुणास ठाऊक ! त्यांनीं आपल्या जनतेला, राजकीय परिस्थितीचा निर्विकार बुद्धीनें अंदाज घेण्याचें शिक्षण देऊन, आपल्या सेनेची लष्करी प्रसंगांना तोंड देता येईल एवढी तयारी करायला हवी होती. त्यांनीं यातलें कांहींहि केलें नाहीं. त्यांनीं सतत भाषणें केलीं, पत्रकें काढलीं केवळ ज्यानें कांहींच भागणारें नव्हतें. मी संपूर्ण जबाबदारीनें व मनांत द्वेषबुद्धि न बाळगतां असें म्हणतो, कीं, मी आतांपर्यंत मागील पृष्ठांत वर्णन केलेल्या या शोचनीय परिस्थितीला, तीन

माणसांना जाब देण्यासाठी जबाबदार धरलें पाहिजे. नेहरू, कृष्ण मेनन व मोरारजी देसाई. नेहरूंना, त्यांनीं आपल्या नेतृत्वाखालीं हें घडूं दिलें म्हणून कृष्णमेनन यांना देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीनें कांहीं गंभीर बाबतींत व समर प्रसंगात, योग्य तीं पावलें, त्वरेनें न उचलल्या बद्दल व मोरारजी देसाई यांना संरक्षणविषयक गरजांसाठीं पुरेसा पैसा उपलब्ध न केल्याबद्दल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.......................... वि: ......................
क्रमांक .......................... नोंद दि ....................

कसला ? ज्या देशांत धनी व सेवक यांच्यांत तादात्म्य असते, तो देश समृद्धि पावतो.' )


स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या बहुतेक नेत्यांची अशी समजूत झालेली होती, कीं आपल्याला अहिंसेनें स्वातंत्र्य मिळालें. त्यांना वाटत असें कीं, जर ब्रिटिशांसारख्या सत्तेला शस्त्राचा उपयोग न करता अहिंसेनें आपण येथून घालवून दिलें, तर मग सेनादलांवर आवश्यक असला तरी एवढा खर्च करण्यांत काय अर्थ आहे ! याच कल्पनेचा त्यांच्या मनावर पगडा होता. सेनादलांचें महत्त्व यामुळें कमी लेखण्यात आलें व त्यांनीं केलेल्या मागण्या या चैनबाजीच्या गोष्टी आहेत, अशा रीतीनें त्याकडे पाहण्यांत येऊं लागले. आपल्या सरहद्दीवर १९५८ पासून चिन्यांनीं लष्करी मोर्चे बांधलें आहेत व त्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. ही गोष्ट लक्षांत येऊन देखील, आचार्य कृपलानी, रामसुभगसिंग यांच्यासारख्या धूर्त राजकारणी लोकांनीं व यच्चयावत वृत्तपत्रांनीं अनेक धोक्याचे इषारे दिल्या नंतरहि, सरकारनें देशाच्या संरक्षणाच्या बाबतींत कांहीं निकड असल्याची बुद्धि दाखवली नाहीं; व आपली या बाबतींतली शोचनीय उदासीनता चालूच ठेवली. परिणामी सेनादलांकडे पुरेसें आवश्यक लक्ष दिलें गेलें नाहीं, हीं दलें आकारानें व बांध्यानें खुरटलेलीं राहिलीं, भारताची सुरक्षितता किंवा भारताला मिळणाऱ्या धमक्या या गोष्टींचा मुकाबला करण्याच्या दृष्टीनें पुरी पडलीं नाहीत; व सरकारच्या या प्रश्नाकडे पाहण्याच्या मानसिक दृष्टीकोनामुळें, युद्धसज्ज होऊं शकली नाहींत. सरकारनें कधी आपली सेना, गरजेला पुरी पडेल, एवढी शक्तिशाली करण्याचा यत्नच केला नाहीं. दुबळी सेना म्हणजे दुबळा देश व अशा देशाचा प्रदेश हा आक्रमकांचें भक्ष्य ठरतो, ही गोष्ट यांना समजत होती कीं नाहीं कुणास ठाऊक ! त्यांनीं आपल्या जनतेला, राजकीय परिस्थितीचा निर्विकार बुद्धीनें अंदाज घेण्याचें शिक्षण देऊन, आपल्या सेनेची लष्करी प्रसंगांना तोंड देता येईल एवढी तयारी करायला हवी होती. त्यांनीं यातलें कांहींहि केलें नाहीं. त्यांनीं सतत भाषणें केलीं, पत्रकें काढलीं केवळ ज्यानें कांहींच भागणारें नव्हतें. मी संपूर्ण जबाबदारीनें व मनांत द्वेषबुद्धि न बाळगतां असें म्हणतो, कीं, मी आतांपर्यंत मागील पृष्ठांत वर्णन केलेल्या या शोचनीय परिस्थितीला, तीन

माणसांना जाब देण्यासाठी जबाबदार धरलें पाहिजे. नेहरू, कृष्ण मेनन व मोरारजी देसाई. नेहरूंना, त्यांनीं आपल्या नेतृत्वाखालीं हें घडूं दिलें म्हणून कृष्णमेनन यांना देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीनें कांहीं गंभीर बाबतींत व समर प्रसंगात, योग्य तीं पावलें, त्वरेनें न उचलल्या बद्दल व मोरारजी देसाई यांना संरक्षणविषयक गरजांसाठीं पुरेसा पैसा उपलब्ध न केल्याबद्दल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम........................ वि: ...................
क्रमांक ........................ नों. दि. ...................

५

# अनिर्णित युद्धांतील दैवगती




नेफा रणक्षेत्र : ऑक्टोबर १९६२

# ५ : अनिर्णित युद्धांतील दैवगती

अनेक वर्षांत मी रजा घेतलेली नव्हती व मला विश्रांतीची फार आवश्यकता होती. याशिवाय डॉक्टरांनी माझी मुलगी अनुराधा हिला दुसरीकडे कुठेंतरी कांहीं दिवस नेण्यास सांगितलें होतें. कांहीं दिवसांपूर्वीं हिलाच मानसिक धक्का बसलेला होता. मी म्हणूनच ३ सप्टेंबर १९६२ पासून दोन महिन्यांच्या रजेचा अर्ज केला. थापर हे रजा द्यायला कबूल झाले, परंतु कृष्ण मेनन यांनीं विरोध प्रगट केला. मला लागेल अशा तऱ्हेनें ते म्हणाले, कीं भारताला पाकिस्तान व चीन यांचेकडून धोका मोठा निर्माण झालेला असतांना, मी खुर्चीतून दूर जाण्याचा विचार करावा, हें मोठें आश्चर्यकारक होतें. हें बोलणें माझ्या दृष्टीनें अनावश्यक होतें. म्हणून मी उलट लिहीलें कीं, वर दिलेल्या कारणामुळें मला रजा हवी आहे. आतां याच वेळेला मी रजेवर निघालों, यासंबंधी सांगायचें तर मेनन स्वतः, नेहरू व मोरारजी हे याच गंभीर काळांत कांहीं आठवडे भारत सोडून जाणार होते असें माझ्या कानावर आलें होतें म्हणून मी लिहीलें कीं, माझ्या नसण्यानें फारसें बिघडणार नाहीं, कारण मी तर फक्त काश्मीरलाच जाणार होतो व जरूर लागली तर कांहीं तासांतच मला परत कामावर बोलवता येण्यासारखें आहे. यानंतर माझी रजा मंजूर झाली. मेजर जनरल जे एस्. धीलाँ हे माझ्या जागीं काम पाहाणार होते. मी जेव्हां ३ सप्टेंबरला काश्मीरला जाण्यासाठीं दिल्ली सोडली, तेव्हां मला याची कल्पनाहि नव्हती, कीं या जागेवर मी परत येणार नव्हतो. फक्त एकच दिवस येणार होतों व नेफामध्यें लवकरच गडबड सुरू होणार होती.

मी व माझी कुटुंबीय मंडळी गुलमर्ग, पहलगाम, कुकरनाग, अहरबल, या ठिकाणी थोडे थोडे दिवस राहिलों. इतकी चांगली रजा मी क्वचितच घालवली असेल. अर्धी रजा संपल्यावर, मी परत दिल्लीला एक दोन दिवस

जाण्याचें ठरवलें व उरलेली अर्धी रजा मी कुलू येथें घालवणार होतों. याप्रमाणें १ ऑक्टोबरला आम्हीं विमानानें दिल्लीला परत आलों.

नेहरू व मेनन हे तोंवर परदेशांतून परत आलेले होते व त्यांना नेफा-मधील परिस्थिती लक्षांत घेऊन मला रजेवरून तावडतोब परत बोलवावें असें वाटलें. थापर यांचा दोन तारखला सायंकाळीं मला तसा फोन आला व त्यांनीं मला दुसऱ्या दिवशीं सकाळीं कामावर रुजू होण्यास सांगितलें. जेव्हां ३ तारखेला मी कचेरींत गेलों, तेव्हां मेजर जनरल धीलाँ यांनीं माझ्या गैरहजेरींत, गेल्या कांहीं आठवड्यांत काय काय घटना घडल्या, तें मला सांगितलें. अधिकृत ठिकाणाहून माहिती गोळा करून, मी या घटनां-विषयीं संपूर्ण माहिती गोळा केली व त्यांचें महत्त्व लक्षांत घेऊन कांहींशा विस्तारानें मी त्या पुढें देत आहे. (नेफा युद्धाचे जे अभ्यासक असतील त्यांनीं त्या घटना काळजीपूर्वक वाचाव्या.)

## ८ सप्टेंबर

चिन्यांचा सरहद्दीवरील धोका लक्षांत घेऊन आतांपर्यंत दुर्लक्ष केलेल्या सरहद्दीवर, धोला येथें एक लष्करी ठाणें निर्माण केलें. भारत, भूतान व तिबेट या तीन देशांच्या तिकाठ्यावर नेफामध्यें, नामकाचू नदीच्या दक्षिणेला हें ठिकाण आहे. थाग–ला खिंडीच्याहि हें दक्षिणेस येतें. 'तोवांग-पर्यंत आपला रस्ता पोचूं शकत होता. तोवांगच्या पश्चिमेस धोला हें साठ मैलांवर आहे. चिनी हे मात्र रस्त्यानें ली या ठिकाणापर्यंत येऊं शकत होते व ली हें ठिकाण थाग–लाच्या उत्तरेस दहा मैलांवर होतें. चिन्यांना हा मोठाच फायदा होता.

सेनाप्रमुख याच्या हाताखालीं तीन प्रमुख सेना विभाग होते. ईस्टर्न कमांड, वेस्टर्न कमांड व सदर्न कमांड. धोला हे ईस्टर्न कमांड या विभागांत येत होते. हा विभाग लेफ्टनंट जनरल सेन यांच्याकडे १९६१ पासून होता.

(भारतीय सेनेच्या पायदळाची उभारणी स्वयंपूर्ण अशा बटालियनवर केलेली असते. बटालियनचा प्रमुख अधिकारी लेफ्टनंट कर्नल असतो. एका बटालियनमध्यें सुमारे १००० सैनिक असतात

बटालियनची विभागणी ६ कंपनीमध्यें केलेली असते. यांतल्या चार

पायदळाच्या असतात, एक कंपनी रणगाडाभेदी तोफांची व उखळी तोफांची असते व एक कंपनी हा मुख्यत: प्रशासकीय विभाग असतो. वाहतुक, वैद्यकीय व्यवस्था हीं याचीं कामें असतात. कंपनीचा प्रमुख अधिकारी मेजर असतो.

प्रत्येक कंपनींत ३ प्लाटून असतात व प्रत्येक प्लाटूनमध्यें सुमारें ४० सैनिक असतात.

प्रत्यक्ष रणक्षेत्रावर सैन्याची विभागणी आर्मी, डिव्हिजन व ब्रिगेड अशी करण्यांत येते.

कमांडचा अधिकारी हाच आर्मीचा अधिकारी असतो व तो लेफ्टनंट जनरल श्रेणीचा असतो. लेफ्ट. जनरल सेन हे आर्मी कमांडरहि होते.

तीन बटालियन मिळून एक ब्रिगेड होते. ' ब्रिगेडिअर ' हा ब्रिगेडचा प्रमुख अधिकारी असतो.

तीन ब्रिगेडची एक डिव्हिजन होते. डिव्हिजनचा प्रमुख ' मेजर जनरल ' असतो.

आर्मी कमांड व डिव्हिजन यांचें दरम्यान चांगलें नियंत्रण राहावें, म्हणून दोन किंवा तीन डिव्हिजनचे एक ' कोअर ' स्थापन करण्यांत येतें. कोअर कमांडर हा लेफ्ट. जनरल या श्रेणीचाच अधिकारी असतो.

लेफ्टनंट जनरल उमरावसिंग हे कोअर कमांडर होते. लेफ्टनंट जनरल कौल हे देखिल नेफांतील युद्धांत कोअर कमांडर होते. लेफ्ट. जनरल सेन हे त्याच्याच श्रेणीचे असले, तरी आर्मी कमांडर म्हणून ते वरिष्ठ होते.

—अनुवादक. )

थाग–ला च्या उत्तरेकडील प्रदेशहि धोलाच्या दक्षिणेकडील प्रदेशापेक्षां सपाट होता. थाग–ला विभागांत चिन्यांना पोचणें, हें आपण धोला येथें पोंचण्यापेक्षा सोपें होतें. थाग–ला पासून जवळच त्यांनीं पुष्कळ फौजा एकत्रित केलेल्या होत्या. उलट धोला येथें एकत्रित होणाऱ्या सैन्याला दूरवरून यावें लागत होतें.

लेफ्टनंट कर्नल मिश्रा, ऑफिसर कमांडर ९ पंजाब बटालियन, यांना दुपारी ४ वाजतां तोवांगच्या पश्चिमेस लुंपू या ठिकाणीं धोला येथील कमांडरचा संदेश आला, कीं धोला ठाणें कांहीं चिन्यांनी वेढलें आहे. त्याला

आज्ञा देण्यात आली, कीं कांहीं झालें तरी, वाटेल ती किंमत देऊन त्यानें धोला झुंजवावें व त्याला लवकरच अधिक मदत पाठवण्यांत येईल.

**९ सप्टेंबर**

धोलाच्या आसपास चिनी किती संख्येनें आलेले आहेत. हें पाहण्यासाठीं, ९ पंजाब बटालियननें टेहळे धाडले. ईस्टर्न कमांड हेड कमांडरनें ७ व्या ब्रिगेडला 'अठ्ठेचाळीस तासांच्या आंत धोला वेढून बसलेल्या चिन्यांचा मुकाबला करण्यासाठीं, पुढें सरकण्याच्या तयारींत राहावें ' असा हुकूम सोडला.

ईस्टर्न कमांडचे कमांडर लेफ्टनंट जनरल सेन यांचे हाताखालीं, ' ३३ कोअर ' व ' ४ थी डिव्हिजन ' हीं सैन्य-पथकें होतीं. यांतील ३३ कोअर यांना जेव्हां विचारण्यांत आलें, कीं गुरखा रायफलचे सैनिक धोला येथील कठीण परिस्थिति लक्षांत घेता तेथें पाठवणें शक्य होईल काय, तेव्हां ही विनंती नाकारण्यांत आली. ही गुरखा बटालियन, जर त्या दिवशींच हलवली तर त्यांच्या दसरा उत्सवांत विक्षेप येईल हें कारण देण्यांत आलें.•

**१० सप्टेंबर**

संरक्षण मंत्र्याच्या खोलींत एक बैठक घेण्यांत आली. कृष्णमेनन यांचेंच नेतृत्व या बैठकींत होतें. थाग-लाच्या दक्षिणेस धोला परिसरांत ८ सप्टें-बरला चिन्यांनीं जो चंचूप्रवेश केला, त्यासंबंधीं चर्चा करण्यांत आली. सेनाप्रमुखांनीं सांगितलें, कीं बटालियन पायदळ धोला ठाण्याकडे धाडण्यात आलें आहे.

**११ सप्टेंबर**

वर निर्देशलेली ९ पंजाब बटालियन, हिनें नामकाचू नदीच्या पूल क्र. १ येथून संदेश दिला, कीं चिनी हे नामकाचू नदीच्या आपल्या बाजूच्या प्रदेशांत पूल क. २ येथें आले आहेत व पूल नं. २ व ३ यांच्या दरम्यान ते धोलाच्या दिशेनें पुढें सरकत आहेत.

नामकाचू नदीवर एकंदर सात पूल होते. धोला हें तिसऱ्या पूलाजवळ होतें.

याच दिवशीं ७ ब्रिगेडनें, ९ पंजाब बटालियनला, आणखी टेहळे धोला भागांत पाठवण्याची आज्ञा दिली.

संरक्षण मंत्र्यांच्या झालेल्या बैठकींत लेफ्ट जनरल सेन (ईस्टर्न कमांडर) यांचे असें मत पडलें कीं, धोला भागांतील सुमारे ६०० चिन्यांना शह देण्यासाठीं, सुमारें ३००० सैनिकांच्या पायदळ तुकडीनिशीं, चढाई केली पाहिजे एवढें सैनिकांचे एकत्रीकरण व्हायला, दहा दिवस तरी लागणार होते. त्यांनीं सांगितलें या कामगिरीवर जाण्याची आज्ञा ब्रिगेडना दिलेली आहे.

हेडक्वार्टर्समधून ईस्टर्न कमांड यांना विचारणा करण्यांत आली कीं कांहीं अधिक मदतीची आवश्यकता आहे काय ? ईस्टर्न कमांडने अत्यंत आवश्यकता असताना ही मदत मागितली कीं नाहीं हें मला कळलेलें नाहीं.

## १२ सप्टेंबर

लेफ्टनंट जनरल सेन हेले फ्ट. जन. उमरावसिंग व मेजर जनरल निरंजन प्रसाद यांना तेजपूर येथें भेटले व त्यांनीं सांगितलें कीं थाग-लाच्या दक्षिणेकडील धोला भागांतील आपल्या प्रदेशांत शिरलेल्या चिन्यांना हुसकून लावा, अशी आज्ञा सरकारनें दिली आहें.

४ डिव्हीजननें याप्रमाणें ७ व्या ब्रिगेडला ९ पंजाब ही बटालियन लुंपू येथें एकत्रित करून, धोला ठाणें मुक्त करण्याच्या तयारींत रहा, असा आदेश दिला.

लेफ्टनंट जनरल उमरावसिंग (३३ कोअरचे कमांडर) व मेजर जनरल निरंजन प्रसाद (४थ्या डिव्हीजनचें कमांडर,यांनीं लेफ्ट जन. सेन यांना कळवलें कीं, चिन्यांना तेथून हुसकणें त्यांच्या सैन्याच्या शक्तीबाहेरचें आहे. आपल्या धोला भागांतील तयारीपेक्षां, तेथील चिन्यांचीं मोर्चेबंदी अधिक उत्तम होती. अधिक तयारी त्या भागांत करणें आपल्याला कठीण होतें, कारण सैन्य पुरेसें नव्हतें व रस्त्याची अडचण होती. आपल्या सैन्याला धान्याचें ठराविक प्रमाण ( रेशन ) मिळत होतें व धान्यसांठा असा नव्हता. तेथील कडाक्याच्या थडीला तोंड देणें अपुऱ्या प्रावरणांमुळें शक्य नव्हतें आपल्याकडे दारुगोळा पुरेसा नव्हता व संरक्षक साहित्याचा सांठाहि तेथें केलेला नव्हता. आपल्या सैन्याला तोफांची पुरेशी मदत नव्हती– ( मी जेव्हां या अडचणी नेहरू, मेनन व थापर यांचेपुढें दिल्ली येथें नेफा विभागांची सूत्रें घेतल्यानंतर

आठवडाभरानें मांडल्या तेव्हां उशीर झालेला होता; कारण नऊ दिवसांतच चीनचा हल्ला सुरू झाला.)

लेफ्टनंट जनरल उमरावसिंग यांनीं ईस्टर्न कमांडला कळवलें, कीं थाग-ला शिखराच्या दक्षिणेस असलेल्या चिन्यांना हुसकण्याचा प्रयत्न केला तर तें एक आंधळें साहस ठरेल. जी शक्ति यासाठीं आवश्यक आहे, त्याच्या कांहीं अंशानें जरी सैन्य-ताकद जमवायची म्हटली तर तोवांग उघडें पडेल व नागालँड मधूनहि सैन्य बोलवावें लागेल. त्यांनीं ही गोष्ट नजरेस आणून दिली, कीं तोवांग हें आपलें महत्त्वाचें ठिकाण होतें व हें जर चिन्यांच्या हातीं पडलें, तर त्याचे परिणाम धोला हातून गेल्या-पेक्षांहि भयंकर होतील. पुढें हेंच घडून आलें.

## १३ सप्टेंबर

जनरल थापर यांनी मेनन यांना बैठकींत सांगितलें कीं, धोला ठाण्याच्या परिसरांतील चिन्यांची संख्या नवीन हातीं आलेल्या बातमीनुसार फक्त ५०–६० आहे व लेफ्ट. जन. सेननीं दोन दिवसांपूर्वी कळविलें त्याप्रमाणें ६०० नाहीं. म्हणून त्यांनीं सेनाधिकाऱ्यांना असें कळवलें आहे कीं, सर्व ब्रिगेड जमेपर्यंत वाट न पाहतां, जेव्हां सोयीचें असेल तेव्हां ताबडतोब प्रतिहल्ला चढवण्यांत यावा.

९ पंजाब बटालियन लुंपू भागांत धोलाकडे जाण्यासाठीं एकत्रित झाली. लेफ्ट. कर्नल मिश्रा यांनीं ब्रिगेडला विचारलें कीं, जर धोलाकडे जातांना वाटेंतच चिनी भेटले तर काय करावयाचें. तेव्हां त्यांना सांगण्यांत आलें कीं त्यांनीं परत जावें म्हणून त्यांचें मन वळवावें व वेळच आली तर फक्त स्वसंरक्षणार्थच गोळीबार करावा, म्हणजे चिनी निदान पन्नास यार्डांच्या टप्प्यांत आले तरच ! सरकारनें जी आज्ञा दिलेली होती, त्यावर ब्रिगेडचे हें उत्तर तयार झालेलें होतें. मी प्रत्यक्ष रणक्षेत्रांत जाण्यापूर्वीचीच ही आज्ञा आहे व या आज्ञेशीं माझा किंवा थापर यांचा कांहींहीं संबंध नाहीं.

## १४ सप्टेंबर

सेनाप्रमुखांनी सरकारला हें स्पष्ट केलें, कीं सैन्याची प्रस्तुतची कमकुवत अवस्था लक्षांत घेतां, जर नेफांत त्यांनीं सर्रास कारवाई सुरू केली, तर

त्याचे पडसाद लडाखमध्यें उठतील व भारतीय सेनेला या परिस्थितीशीं टक्कर देणें जमणार नाहीं. खरें पाहता लेफ्टनंट जनरल दौलतसिंग, यांनीं एका बैठकींत मेनन व थापर यांच्या उपस्थितींत असें सांगितलें कीं, जर चिन्यांनीं लडाखमध्यें आपणांवर हल्ला चढवला, तर ते आपणाला तेथून नामशेष करतील. (ऑक्टोबर व नोव्हेंबर १९६२ मध्यें चिन्यांनीं हें खरो-खरच केलें.) लेफ्टनंट जनरल सेन यांनीं याच बैठकींत हें सांगण्याचें धाडस केलें कीं, नेफामध्यें जर चिनी जास्त संख्येनें आले तर त्यांना तेथेंहि अड-वणें, त्यांना शक्य होणार नाहीं. (जर मोठे शूर म्हणून गाजावाजा झालेल्या आपल्या एक दोन जनरल्सनीं, दौलतसिंग व सेन यांची हीं गैरसोईची सत्यें, ऐकली असती, तर 'पराभूत मनोवृत्तीचे' म्हणून त्या दोघांवर त्यांनी शिक्का मारला असता) सरकारला मात्र असें वाटत होतें कीं, परिणाम कांहीही होवोत, परंतु आपण एका ठिकाणीं तरी चिन्यांना हात दाखवला पाहिजे—निदान हात दाखवतो आहोंत असें वाटलें पाहिजे—अशी वेळ आतां आली आहे. (जनतेला खूष करण्यासाठीं ?) कारण त्यांची आपल्या प्रदेशांतील आक्रमणें सहन करणें, आतां अशक्य झालें होतें व कुठेंतरी रेषा ओढायला हवी होती.

ईस्टर्न कमांडच्या आज्ञेनुसार ९ पंजाब बटालियन, लुंपू येथून पहाटें ४ वाजतां धोलाकडे निघाली. वाटेंत मुसळधार पाऊस पडत होता व रात्री-पर्यंत ही बटालियन हाथुंग-ला या १५००० फूट उंचीवरील ठिकाणापर्यंतच पोचूं शकली.

(धोला येथून सतत ८ ते १४ तारखेपर्यंत संदेश येत होते कीं, शत्रूनें धोला घेरलें आहे.)

### १५ सप्टेंबर

संरक्षण मंत्र्यांच्या खोलींत एक बैठक झाली, तेथें असें ठरलें कीं, शक्य असल्यास थाग-ला जवळ, चिन्यांचा मुकाबला करायचा व शक्य अस-ल्यास कार्पो-ला आणि थाग-ला या ठिकाणीं ठाणीं प्रस्थापित करावयाची.

१५ तारखेला ८-३० वाजतां ९ पंजाब बटालियन पूल नं. २ येथें पोचली, नामकाचू नदीच्या दोन्हीं कांठावर चिनी हिंदी भाषेंत ओरडत होते—

'तुम चले जाव, यह हमारी जमीन है, हिंदी चिनी भाई भाई.

फक्त स्वसंरक्षणाकरतांच फैरी झाडायच्या, अशी मिश्रा यांची आज्ञा असल्यानें जेव्हां असें आढळलें कीं, चिन्यांनीं फक्त रस्ता अडवला आहे, परंतु ते गोळीबार करीत नाहींत तेव्हां पूल क्र २ पाशीं एक कंपनी ठेवून, मिश्रा यांनीं चिन्यांना वळसा घालून, झगडा न पेटवता पुढें जाण्यास सुरुवात केली. येथून ते रस्ता काटीत धोला येथें ( पूल क्रमांक ३ ) गेले. चिन्यांनीं त्यांच्या मागें जाण्याचा यत्न केला नाहीं. ते धोला येथें दुपारी १ वाजतां पोचलें. त्यांच्या असें ध्यानांत आलें कीं, नदीच्या दुसऱ्या कांठावर सुमारें ५०–६० चिनी होतें व त्यांनीं पूल क्र. ३ ची नासधूस केली होती. ही गोष्ट ८ सप्टेंबरलाच धोला येथील कमांडरनें कळवली होती. लेफ्टनंट कर्नल मिश्रा यांनीं ७ ब्रिगेडला ही हकीगत धोला येथून कळवली.

आर्मी हेडक्वार्टरनें, ईस्टर्न कमांडला आज्ञा दिली कीं, ९ पंजाब बटालियननें धोलाच्या उत्तरपूर्वेस एक हजार यार्डांवर असलेलें चिनी ठाणें काबीज करावें, व थाग-लाच्या दक्षिणेस त्यांना अडवून धरावें. ४ थ्या डिव्हिजननें ३३ कोअरला कळवलें कीं, चिन्यांची संख्या १३ सप्टेंबरला कळवल्याप्रमाणें ५०–६० समजली जात होती, ती आतां २ कंपनी एवढी वाढलेली आहे व म्हणून त्यांच्यावर एका बटालियननिशीं हल्ला करणें शक्य नाहीं.

## १७ सप्टेंबर

संरक्षण मंत्र्यांच्या खोलींत झालेल्या बैठकींत, लेफ्टनंट जनरल सेन यांनीं सांगितलें कीं, एका ब्रिगेडची जमवा जमव १० दिवसांत होऊं शकेल, हा पूर्वींचा अंदाज चुकीचा ठरला आहे. वेळ जास्त लागेल. असें ठरलें कीं संरक्षक पवित्राच ठेवावा व एखादें लहानसें चिनी ठाणें, थाग-लाच्या दक्षिणेस फक्त ताब्यात घ्यावें.

लेफ्टनंट कर्नल मिश्रा यांना आर्मी हेडक्वार्टर्समधून, थेट असा संदेश मिळाला कीं त्यांच्या बटालियननें थाग-ला, थाम-ला आणि कार्पो-ला हा प्रदेश १९ तारखेपर्यंत जिंकावा. मेजर जनरल निरंजन प्रसाद, यांनीं त्यांच्या हाताखालच्या बटालियनला दिल्लीहून थेट आज्ञा दिल्या जातात, यांविषयीं आपला विरोध प्रगट केला. मिश्रांच्या माणसांना एवढ्या उंची-

वरील ठिकाणीं, सहा दिवसांत पुरेसें जेवणहि मिळालेलें नव्हतें. दारूगोळाहि कमी होता. पुरेसे मजूर नव्हते, तट्टें नव्हती. त्याच रात्रीं मिश्रांना ब्रिगेडकडून आदेश आला, कीं त्यांनीं दिल्लीहून आर्मी हेडक्वार्टर्सकडून आलेली आज्ञा तूर्त स्थगित ठेवावी. यावेळीं देण्यांत आलेल्या आज्ञा–प्रति-आज्ञा या अशा घोटाळ्यांत पाडणाऱ्या होत्या.

## १८ सप्टेंबर

याच तारखेच्या आसपास संरक्षण मंत्री, अर्थमंत्री व पंतप्रधान हें निरनिराळ्या कामांसाठीं परदेशीं रवाना झाले. दिल्ली येथें वृत्तपत्र प्रतिनिधींच्या बैठकींत, एका ज्येष्ठ सनदी नोकरानें असें सांगितलें कीं नेफामध्यें जिथें आपल्या प्रदेशांत चिनी घुसलें आहेत तेथून त्यांना हुसकून लावण्याची आज्ञा आपल्या सैन्याला दिलेली आहे. (नेहरू यांनीं असेंच विधान सुमारें चार आठवड्यानंतर केलें, हीं विधानें काय फक्त जनतेच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठींच केलीं होतीं काय ?) हा सनदी नोकर अशी भूमिका घेत होता कीं, जी परिस्थिति निर्माण झाली होती, तीं सैन्यामुळेंच झाली होती व सरकारवर याची जबाबदारी नव्हती. (नाहींतर अशा गुप्त बाबतींत त्यानें असें जाहीर विधान करावयास नको होतें.) या तारखेपर्यंत थाग-लाच्या दक्षिणेस चिन्यांनीं एक बटालियन सैन्य आणलेलें होतें.

## २० सप्टेंबर

संरक्षणमंत्र्यांच्या खोलींत बैठक होती. सेनाप्रमुखांनीं सांगितलें कीं, दुसरी पायदळ बटालियन धोला भागांत २४तारखेला पोहोंचेल, तिसरी२९ तारखेला. म्हणजे त्या भागांत एक ब्रिगेड इतकी सख्या एकत्रित झाली असें होईल.

ब्रिग्रेडिअर दळवी हे धोला येथें पोचले व पूल क्र. २ येथें १ वाजतां आले. मिश्रांच्या बरोबर त्यांनीं थाग-ला प्रदेश जिंकण्याच्या दृष्टीनें बोलणीं केलीं. दळवी व मिश्रा यांची खात्री पटलीं कीं, एका बटालियननें हें काम भागण्यासारखें नाहीं. शस्त्रास्त्रें, दारुगोळा, सामुग्री व धान्य यांची इतकी कमतरता असतांना तर शक्यच नाहीं.

त्याच दिवशीं १०–४० ला एका चिनी रक्षकानें आपल्या बंकरमध्यें (जमिनीखालीं खणून केलेला संरक्षक आडोसा) एक ग्रेनेड फेकला व

आपली तीन माणसें जखमीं झालीं. एका जखमी झालेल्या सैनिकानें शत्रूच्या ठाण्यावर मशिनगन चालवली व तेथूनहि प्रतिफैरी झडल्या. मग दोन्हीं बाजूंनी प्रथमच फैरी झडूं लागल्या. दोन शत्रूचे रक्षक ठार झाले व दोन जखमी झाले. ९ पंजाब बटालियननें, डिव्हिजनकडून ब्रिगेडमार्फत आलेल्या आज्ञेनुसार चिन्यांना हिंदीत ओरडून सांगितले कीं, त्यांनीं मेलेल्या लोकांना उचलून न्यावें व हें करीत असतांना त्यांच्यावर गोळ्या सुटणार नाहींत. सबंध दिवसभर चिन्यांकडून कांहींच प्रतिसाद आला नाहीं; परंतु दि. २१।२२ या रात्री त्यांनी ओरडून सांगितलें कीं, त्यांच्यापैकीं मेलेल्यांना नेण्याकरता ते येत आहेत. प्रत्यक्ष या कामासाठीं येतांना त्यांनी ओरडून सांगितलें– 'आम्ही येत आहोंत, गोळ्या झाडू नका.' आपण गोळ्या झाडल्या नाहींत. १६ ते २० या दरम्यान ही झटापट उडण्यापूर्वी, चिनी सारखे हिंदीतून ओरडून सांगत होते.

'हिंदी चिनी भाई भाई. यह जमीन हमारी है. तुम वापस जाव.'

२१ तारखेला दळवी यांनीं निर्णय घेतला कीं, ब्रिगेडचा मुक्काम लुंपू येथें ठेवायचा येथून धोला येथें पोचायला पायीं दोन दिवस लागत असत.

## २१ सप्टेंबर

ब्रिगेडनें लुंपू येथून चाळीस पौंड धान्य-धुन्य घेऊन चाळीस माणसें, ९ पंजाबकडे पूल क्र. २ येथें धाडलीं. जो प्रवास करायला साधारणत: दीड दिवस लागतो, तोच प्रवास करायला या लोकांनीं दुपटीहुन अधिक वेळ घेतला. पूल क्र. २ येथें तीं पोचलीं तेव्हां त्यांच्यापाशीं विशेष अन्न-धान्य नव्हतेंच. एकतर त्यांनीं तें प्रवासांत संपवलें (!) किंवा एवढें ओझें नेण्याचें टाळण्यासाठीं ते वाटेंत फेंकून दिलें.

## २२ सप्टेंबर

मेनन यावेळीं अमेरिकेंत संयुक्त राष्ट्र संघांत गेलेले होते. हंगामी संरक्षण-मंत्री रघुरामय्या यांचे खोलींत बैठक झाली. धोला येथील परिस्थितीची चर्चा झाली. सेनाप्रमुख म्हणाले चिन्यांची सैन्य संख्या अंदाजे अशी होती– एक कंपनी धोलाच्या आग्नेयेस होती, एक कंपनी थागला खिंडीपाशीं होती. चिनी कदाचित ही संख्या वाढवतील व नेफांत इतरत्र कुठें तरी किंवा

लडाखमधील आपल्या ठाण्यांवर प्रतिहल्ला चढवतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कांहीं चर्चेनंतर सरकारनें असें ठरवलें कीं धोरण म्हणून चिन्यांना धोला भागांतून हुसकण्याखेरीज आतां गत्यंतर नव्हतें. सेनाप्रमुखांनीं, हा आदेश सरकारनें लेखी द्यावा असें सांगितलें व सरकारनें या भागांतून चिन्यांना हुसकण्याचा निर्णय लेखी दिला. (सेना प्रमुखांनी ही आज्ञा लेखी मागितली, कारण अशा तऱ्हेचें धोरण पत्करलें तर त्याचे परिणाम काय होतील याची कल्पना त्यांनीं देऊनहि चिन्यांना हुसकावयास सांगण्यांत येत होते.)

## २२ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर

या काळांत भारतीय व चिनी सैन्यांत अधूनमधून गोळाबार चालू होता. २८ तारखेला सायंकाळीं चिन्यांनीं आपल्या मोर्चावर पूल क्र. २ येथें स्वयंचलित शस्त्रें चालवली व आपले ३ सैनिक जखमी झाले. २९ सप्टेंबरला पहाटें २ वाजतां आपण तीन इंची उखळी तोफांच्या चार फेरी प्रथमच झाडल्या. चिन्यांची सरबत्ती बंद झाली. दुसऱ्या दिवशीं १४ प्रेतें व कांहीं चालू शकत असलेले जखमी चिनी सैनिक, यांना घेऊन जात असतांना चिनी आपणांला दिसले.

मेजर जनरल निरंजन प्रसाद लुंपू येथे २४ सप्टेंबरला पोंचले व ते धोला येथें २६ ला जाणार होते. परंतु कोअर कमांडर लेफ्ट. जनरल उमरावसिंग, तेथें येत असल्यानें त्यांना तिथेंच थांबण्यास सांगण्यांत आलें. २७ ला उमरावसिंग आले व त्यांनीं मेजर जनरल निरंजन प्रसाद यांना सरकारनें घेतलेला निर्णय सांगितला. कोअर कमांडर व डिव्हिजनल कमांडर यांनीं दळणवळणाच्या व इतर अनेक अडचणी तेजपूर येथें सांगितल्या; परंतु लेफ्ट. जनरल सेन, यांनीं या सर्व अडचणी ऐकून घेण्यास नकार दिला.

२९ ला २ रजपूत ही कंपनी, पूल क्र. १ या भागांत पोंचली; व त्यांना ९ पंजाब बटालियनच्या हाताखालीं देण्यांत आलें. २ रजपूत कंपनीचा उरलेला भाग व गुरखा कंपनी, या लुंपू येथेंच दोन टप्पे मागे होत्या.

नामकाचू नदीच्या उत्तरेस त्सांगली या ठिकाणीं टेहळे धाडण्यांत आले. ते २ ऑक्टोबरला परतले. त्यांनीं बातमी दिली कीं, नामकाचू नदीच्या पलीकडे पुल क्र. ५ या भागांत शत्रूचा मागमूसहि नाहीं.

### ३० सप्टेंबर

संरक्षण मंत्र्याच्या खोलींतील बैठकींत लेफ्ट. जनरल सेन यांनीं सांगितलें कीं, थाग–ला भागांत धोला येथें चिन्यांची सैन्य संख्या एक बटालियन आहे. त्यांनीं हेंहि सांगितलें कीं, आपल्या तीन बटालियन, या भागांत आघाडीवर एकत्रित करण्यात आल्या आहेत. (प्रत्यक्षांत तीनापैकीं २ बटालियन या लुंपू यथें धोलापासून दूर होत्या.)

संरक्षण मंत्री म्हणाले सरकारचें धोरण आहे कीं, नेफामध्ये चिनी हे हिवाळा काढण्याच्या दृष्टीनें स्थिर होण्यापूर्वी त्यांच्यावर आपण वर्चस्व प्रस्थापित केलें पाहिजे (ही कडक भाषा, पूर्वी मेननर्नी पुन: पुन: जें सांगितलें होतें कीं, भारत हा आपलें संरक्षण करूं शकतो, त्याला धरून अशी होती, कीं हें द्व्यर्थी राजकीय वक्तव्य जनमताची खुषामत करण्यासाठीं करण्यांत आलें होतें ? कां ही नुसतीच फुशारकी होती ?)

लेफ्ट जनरल उमरावसिंग यांनीं लेफ्ट जनरल संत यांना या दिवशीं लिहिलें.

अ) कारवाई सुरूं करण्यापूर्वी ५८० टन दारुगोळा त्सांगधर येथें सांठवला पाहिजे.

ब) नामकाचू दरी ही अतिशय अरुंद असल्यानें थाग-ला तर सरळ हल्ला करणें आत्मघातकी ठरेल.

क) बिनलष्करी टेहळे हे कुचकामी ठरले आहेत.

ड) या भागांत फक्त तीनशें ते पांचशें बिनलष्करी हमाल मिळूं शकत आहेत. त्यामुळें लुंपूचा सांठा त्सांगधर येथें हलवणें कठीण आहे.

इ) जखमी झालेल्यांना कसें हलवावें हाच मोठा प्रश्न निर्माण होणार आहे.

### १ ऑक्टोबर

७ ब्रिगेडनें ९ पंजाब बटालियनला पूल क्र. ४ व ५ यांचे दरम्यान नदी ओलांडण्यासाठीं सोयीस्कर जागा हेरून ठेवण्याची आज्ञा दिली. (मी कोअर कमांडर म्हणून अधिकार घेण्यापूर्वी तीन दिवसांची ही गोष्ट आहे.) ९ पंजाबचे मेजर चौधरी, यांची या कामगिरीवर नियुक्ति झाली. त्यांनीं कळवलें कीं, ४ थ्या पुलापलिकडे चिनी नाहींतच. त्यांनीं पुढें असेंहि

कळविलें, कीं कांहीं दिवसांत पाऊस न पडल्यानें नदींत पाणी फार नाहीं व नदीचा प्रवाहहि जोराचा नाहीं. त्यांच्या दृष्टीनें नदी कुठेंहि ओंडक्यावरून ओलांडता येईल. कारण तीरावर झाडेंहि भरपूर होती.

## २ ऑक्टोबर

संरक्षण मंत्र्याच्या खोलींत झालेल्या बैठकींत लेफ्ट. जनरल सेन यांनीं सांगितलें कीं, त्यांचा अंदाज पुन: चुकला आहे व १० ऑक्टोबर पर्यंत चढाईची तयारी होईल. त्यांनी पुढें सांगितलें कीं, त्यांनीं उमरावसिंग यांना लेखी आज्ञा पाठवली होती कीं, त्सांगलीचा कबजा करा. परंतु उमरावसिंगांनीं कळवलें कीं, त्सांगली ठाणें ताब्यांत ठेवणें कठीण जाईल व चिन्यांना आपला पवित्रा कळेल सेन यांना पाठवलेल्या संदेशांत उमरावसिंग यांनीं कळवलें कीं, एखाद्या भागांत सैन्य पाठवा अशी आज्ञा देण्याचा जरी त्यांना अधिकार असला, तरी किती सैन्य पाठवा हें त्यांनीं सांगणें चूक आहे. उमरावसिंग असें सुचवित होते कीं, सेन हे प्रत्यक्ष कमांड मध्यें ढवळाढवळ करीत आहेत. सेन यांनी संरक्षण मंत्र्यांच्या देखत सांगितलें कीं कोअर कमांडला डावलून त्यांनीं ताबडतोब त्सांगिलीचा कबजा करावा असा हुकुम दिलेला आहे. (जनरल थापर व लेफ्ट. जन. सेन यांनी ठरवलें कीं लेफ्ट. जन. उमरावसिंग यांना तेथून काढलें पाहिजे. कारण त्यांचें व सेन यांचें पटत नव्हतें.)

जनरल थापर यांनीं सेन यांचेसह याच दिवशीं पंतप्रधानांची भेट घेतली. थापर यांनीं नेहरूंच्या हें नजरेस आणलें कीं चिन्यांविरुद्ध प्रथमच आपण बलाचा वापर करीत आहोंत, व याचें गंभीर प्रतिध्वनि उठणार आहेत. नेहरू म्हणाले, त्यांना असें वाटण्यास पुष्कळ आधार आहे कीं, चिनी हे आपल्याविरुद्ध जोराची कारवाई करणार नाहींत (२ ऑक्टोबर १९६२ पर्यंत नेहरू व कृष्णमेनन यांचा हाच विश्वास होता.)

## ३ ऑक्टोबर

रजेवरून परतल्यानंतर मी 'चीफ ऑफ जनरल स्टाफ' या पदाचें कामावर रूजू झालों. सरकार व जनरल थापर यांनीं अगदीं सायंकाळीं असा निर्णय घेतला कीं, एक नवीन कोअर निर्माण करावयाचें व माझी त्यावर नियुक्ती

करावयाची. रात्रीं ९ वाजतां माझ्या घरीं थापर यांनीं मला निर्णय कळवला. त्यांनीं मला असें सांगितलें कीं, हें खास कोअर चिन्यांच्या धोक्यापासून बचाव करण्यासाठीं निर्माण करण्यांत येत असून, ३३ कोअर हें लेफ्ट: जनरल उमरावसिंग यांच्या हाताखालील कोअर, पाकिस्तान व नागालँडच्या दिशेनें येणाऱ्या संभवनीय संकटाचा समाचार घेईल. माझ्या हाताखालीं देण्यांत येणाऱ्या कोअरमध्यें अदमासें ६०० सैनिक होते. म्हणजेच २ ब्रिगेडस् होत्या. (५ व ७) तिसरी ब्रिगेड नंतर आम्हांला मिळण्याची शक्यता होती. साधारणपणें एका कोअरमध्यें ६ ते १२ ब्रिगेडस् असतात. या ब्रिगेडस त्यावेळीं '४ डिव्हिजन'च्या हाताखालीं होत्या. आणखी एक डिव्हिजन एकत्रित करून माझेकडे देण्यांत येणार होती. ही नंतर देण्यांत आली; परंतु फार उशीरा! जवळ जवळ ३६० मैलांची सरहद्द, नेफांत मला सांभाळायची होती. (दुसऱ्या महायुद्धांत फिल्ड मार्शल स्लिम् यांचें दिमतीला ७०० मैलांच्या सरहद्दीसाठीं, ब्रह्मदेशांत १८ डिव्हिजन सैन्य देण्यांत आलेलें होतें) मला थापर व मेनन यांनीं सांगितलें कीं, माझें मुख्य काम धोला–थांग ला भागांतून चिन्यांना हांकलून देणें हें आहे.

कोअर म्हटली कीं, नेहमींची पायदळसंख्या असून, शिवाय पुष्कळ तोफखाना, अेंजिनिअर पंथक, वाहतुकीसाठीं व पुरवठ्यासाठीं सर्व सुविधा या गोष्टी असाव्या लागतात. भरपूर नोकरवर्ग व सर्व कृतींचा मेळ नीट बसावा, म्हणून संदेश पाठविण्याची चोख व्यवस्था असावी लागते. यापैकीं कांहींच मला उपलब्ध केलेलें नव्हतें. जसजसा काळ जाईल तसतशा या गोष्टी मीच निर्माण कराव्या अशी अपेक्षा होती. कोअर स्थापन केल्यापासून सर्व दृष्टीनें तें कार्यक्षम करण्यासाठीं, साधारणत: सहा महिने तें वर्ष एवढा अवधि लागतो. हें कोअर युद्धसज्ज व्हायला आणखी वर्षसहा महिने तयारी करावी लागते. (भारत पाक लढाईत १९६५ सालीं जी दोन कोअर लढलीं, तीं अनेक वर्षांपूर्वी तयार केलेली होती.) अजून ज्याची नीट स्थापना झाली नव्हती व बांधणीहि केलेली नव्हती, अशा कोअरवर मला कमांडर नेमण्यांत आलें होतें. लगेच कारवाईला सुरुवात करून मी चमत्कार घडवावा, अशी अपेक्षा होती. अडचणीबद्दल कुरबुर करण्याची वेळ नव्हती, तेव्हां मी माझ्याकडून शिकस्त करण्याचें ठरवलें.

थापर व मेनन यांना भेटल्यावर, मी नेहरूंची भेट घेण्यास गेलों. मी भेटीला जावें असें मेनन यांनींच सुचवलें होतें. मी नेहरूंना त्यांच्या निवासांत रात्रीं १०–३० वाजतां भेटलों. त्यांनी माझें सौजन्यपूर्वक स्वागत केलें व विचारलें कीं नेफांत निघतांना मला काय वाटते आहे? मी सांगितलें कीं मला ही कामगिरी मिळाली याचा मला आनंद झालेला आहे; परंतु मला अशी भिती वाटते कीं आपली एकंदर दुर्बलता लक्षांत घेऊन, चिनी हे मुद्दामच आपल्याला डिवचून धोलासारख्या खडतर प्रदेशांत अंगावर ओढीत आहेत. नेहरू म्हणाले कीं भारतानें चिन्यांशीं सख्य राखून शांततापूर्ण मार्गानें भांडण मिटवण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. आतां अशी वेळ आली आहे, कीं कणखर भूमिका परिणामांची पर्वा न करतां स्वीकारली पाहिजे. (पूर्वी चिन्यांसंबंधी जो विश्वास माझ्याजवळ नेहरूंनी प्रगट केला होता त्याच्या हें मत सर्वस्वी विरुद्ध होतें,) त्यांच्या दृष्टीनें चिनी धोला भागांत शिरून, नेफा प्रदेशावर हक्क प्रस्थापित करूं पाहात होते व सर्व साधनांनिशीं याचा प्रतिकार करायलाच हवा होता. म्हणून त्यांना असें वाटत होतें, कीं चिनी यामुळें काय तें समजतील. व धोलामधून निघून जातील. परंतु जर गेले नाहींत तर त्यांना हुसकण्याखेरीज गत्यंतर नाहीं. निदान आपण यासाठीं शक्य तेवढा प्रयत्न केला पाहिजे. नेहरू म्हणाले कीं जर अशी कांहीं कारवाई त्यांनीं केली नाहीं, तर सरकार जनतेचा विश्वास संपूर्णपणें गमावील. कांहीं विशेष घडेल तें कळवित जा, असें सांगून नेहरूंनी आशा प्रकट केली, कीं माझें काम व्यवस्थित पार पडेल.

नेहरू व त्यांचे सरकार यावेळीं जनमताची फारच काळजी करीत होतें. कारण जनमत तापवलें गेलें होते. हें होतें ना, तर यावेळींहि आपल्या सरकारनें धोलांत चिन्यांनीं केलेल्या प्रवेशाचा बाऊ केला नसता. कारण अशा तऱ्हेनें इतर डझनावारी ठिकाणीं चिनी आपल्या प्रदेशांत यापूर्वी घुसलेले होते. यावेळीं आपली कांहींच तयारी नसतांनाहि, नेहरूंनी हा जो प्रतिकाराचा पवित्रा घेतला, त्याची जबाबदारी परराष्ट्र खात्यांतील नेहरूंच्या सल्लागारांवर पडते.

( मला हें ठाऊक आहे कीं शांतता राहावी म्हणूनच नेहरू हे चिन्यांशी

मैत्री करण्याचा प्रयत्न करीत होते. याच शांततेसाठीं शास्त्री यांनी ताश्कंद करार.वर, जानेवारी १९६६ मध्यें सही केली. या करारान्वयें भारत व पाकिस्तान या दोघांना, आपल्या ठाम भूमिका सोडाव्या लागल्या; पण हें करूनहि शास्त्री हे शांततेचे मोठे शिल्पकार ठरले व नेहरू मात्र सार्वजनिक टीकेचे धनी झाले. गोष्ट अशी आहे, कीं नेहरूंनी काँग्रेस सिंडीकेट व विरोधीपक्ष यांचा विश्वास गमावलेला होता. उलट शास्त्रींनी आपल्या व्यवहारचातुर्यानें व नम्रतेनें याच लोकांचा पाठिंबा मिळवलेला होता.

उदाहरण द्यायचें तर १९६२ मध्यें, नेफामध्यें थाग-ला ओलांडून चिनी आपल्या प्रदेशांत घुसले, तेव्हां सगळा देश नेहरू व मेनन यांचेवर त्यांच्या गलथानपणाबद्दल तुटून पडला. परंतु थाग-ला ओलांडूनच १९६५ मध्यें चिनी हाथुंग-हापर्यंत आले– १९६२ च्या पेक्षां २ मैल अधिक आंत आले–आपली संरक्षण व्यवस्था अधिक मजबूत असून आले–तरी शास्त्रींविरूद्ध किंवा चव्हाणांविरूद्ध नुसती कुजबुजहि उठली नाहीं! कारण लोकसभेंतील व वृत्तपत्रांतील विरोधकांची तोंडे पद्धतशीर आळवणीनें बंद करण्यांत आलेली होतीं.

मला वाटतें कीं कांहीं राजकारणी विरोधकांनी नेहरूंना धारेवर धरलें नसतें व त्यांना निर्णय घेण्याची मुभा मिळाली असती, तर भारत व चीन यांचा संघर्ष १९६२ मध्यें कदाचित उडाला नसता. कांहीं वर्षांनंतर हा उडता तर चिन्यांचा मुकाबला करायला भारत समर्थ ठरला असता. कुणालाच याची कल्पना नव्हती, कीं आपल्या कडक भूमिकेचें आपली विशेष तयारी नसल्यामुळें इतके झपाट्याने दारूण परिणाम होतील.

मी मध्यरात्रीं घरीं आलों. सकाळीं मला नेफाला निघायचें होतें. मला बांधाबांध करायला फारच थोडा वेळ होता. इतर अनेक गोष्टी उरकायच्या होत्या. माझ्या कोअरपैकीं इतर कुणाचीच नेमणूक झालेली नसल्यानें, तेजपूर येथें मला उतरवून घेण्यास कुणींच येणार नव्हतें. कांहीं थोडी विश्वासाची माणसें बरोबर असावींत, या हेतूनें सेना प्रमुखांच्या व मेजर जनरल मोतीसागर, संरक्षण सचीव यांच्या सल्ल्यानें, मी कांहीं अधिकारी बरोबर घेतले. मध्यरात्री ते पहाटे दोन, या वेळांत, त्यांना माझ्याबरोबर निघण्याची सूचना पाठवण्यांत आली. माझी तयारी होते न होते तोंच पहाट झाली.

## ४ ऑक्टोबर

घाईघाईनें न्याहारी उरकून मी कुटुंबियांचा व मित्रांचा निरोप घेतला. पालमहून आमचें विमान दुर्दैवाच्या दिशेनें सुटलें.

दुपारीं मी तेजपूरला उतरलों. लेफ्टनंट जनरल सेन व उमरावसिंग यांनीं माझें विमानतळावर स्वागत केलें व आम्हीं मोटारीनें विश्रामधामांत येऊन तिथें रात्र काढली. आतापर्यंत नेफाची जबाबदारी उमरावसिंग यांचेवर होती.

मागें सांगितल्याप्रमाणें धोला भागांत प्रत्यक्षांत एकच बटालियन होती व अजून दोन लुंपू येथें होत्या. माझ्याजवळ पुरेसा तोफखाना नव्हता. आकाशांतून संरक्षण मिळण्यासाठीं फायटर विमानें नव्हतीं. चिलखती दल म्हणजे थोडेसे लुळेपांगळे रणगाडे होते. मोठ्या प्रदेशावर भौगोलिक परिस्थिती ध्यानीं घेऊन दळणवळणाची व्यवस्था नव्हती. दळणवळण अशक्य झालें होतें; कारण पुरेसे हमाल नव्हते. एवढ्या उंचीवर दळणवळण फक्त हमालांकरवींच शक्य होतें. मी सरहद्दीवरील रस्ते-बांधणी बोर्डाकडून, हजार हमाल मागवले व सरकारला त्याप्रमाणें कळवलें. मी अशीच कांहीं इतर पावलें टाकली कीं ज्या योगें धोला भागांत ९ ऑक्टोबरपर्यंत ७ ब्रिगेड्स् एकत्र होऊं शकेल याचीं कारणें दोन होतीं.

अ ) जर धोला भागांतून चिन्यांना हुसकावयाचें असेल, तर चिन्यांपेक्षां जलद गतीनें आपल्या सैन्याची जमवाजमव करणें भाग होतें.

(ब) जर उशीर केला व धोला भागांत एकदां बर्फ पडायला सुरुवात झाली, कीं पुढल्या सगळ्या लष्करी बेतावरच पाणी पडलें असतें.

कांहींनीं ध्वनित केलें आहे त्याप्रमाणें, मी सरकारकडे थेट असे संदेश धाडले नाहींत. मी फक्त लेफ्ट. जनरल सेन यांचेमार्फतच काय तें कळवीत होतो. (व याची एक प्रत आज्ञेप्रमाणें जनरल थापर यांना पाठवीत होतो.) मी अशा रीतीनें पहिला संदेश धाडला तो असा होता, कीं शत्रू त्सांगधर–धोला विभागांत आपल्या सैन्याला अंगावर ओढीत असला, तरी त्याचा विचार दुसऱ्या बाजूनें तोवांगचा कबजा करण्याचा दिसतो. हेच कांहीं दिवसांनीं घडलें.

म्हणूनच मी तेझपूरला ४ ला सायंकाळी पोहोंचतांच, दुसऱ्या दिवशीं धोला येथें जाऊन तेथील प्रदेश स्वतः नजरेखालून घालण्याचें ठरवलें. त्या भागांतील सैनिकांची मनःस्थिति काय आहे हें देखील मी पाहणार होतो. (माझे कोअर अजून जमा होत होतें व या धोला प्रवासाला आठवडा लागणार होता.)

मध्यरात्र उलटेपर्यंत मी तेझपूरला, दळवळण बांधण्यासंबंधीं सूचना देत होतो व थोडीशीं झोप नंतर घेऊन पहांटेंच मी धोलाकडे निघालो.

## ५ ऑक्टोबर

तेझपूरहून विमानानें मी भूतान मधील दरंगा या ठिकाणीं गेलो. माझ्या बरोबर लेफ्ट. कर्नल संजीव राव होते. ब्रिग्रेडिअर सिंग व मेजर मल्होत्रा यांना मी माझ्या पाठोपाठ येण्यास सांगितलें होतें, म्हणजे त्यांनाहि हा प्रदेश पाहून अंदाज घेतां येईल.

दरंगा येथील तथाकथित भूपट्टीवर उतरून, मी हेलिकॉप्टरमध्यें चढलों. येथें विमानांत पेट्रोल भरण्यासाठीं आधुनिक सोय नव्हती, त्यामुळें यासाठीं इथें तासन्तास खोळंबा होतो असें मला आढळून आलें. दुपारीं आम्ही झिमिनथांगला पोहोंचलो. ६००० फूट उंचीवरील हें खेडें, ल्हासा येथें जाण्यासाठीं तोवांगवरून जो रस्ता होता त्यावर होतें. येथें मला एक लष्करी माहिती खात्याचा माणूस भेटला. त्यानें धोला भागांतील चिन्यांची जी माहिती दिली, त्यावरून मी ईस्टर्न कमांड व आर्मी हेडक्वार्टर्स यांना खालील माहिती रवाना केली–

अ ) थाग-ला भागांत चिन्यांनीं एक ब्रिगेड सेना आणलेली आहे.

ब ) चिन्यांच्या शस्त्रास्त्रांत तोफखान्याव्यतिरिक्त जड उखळी तोफा व उलट धक्का न खाणाऱ्या बंदुका ( Recoilless Guns ) आहेत.

क ) यामुळें शत्रू आपल्यावर जबर मात करण्याची शक्यता आहे.

ड ) या परिस्थितींतून झपाट्यानें आपण सुधारणा केल्याखेरीज, राष्ट्रीय आपत्ति कोसळण्याची शक्यता आहे.

इ) यासाठीं काळजी घेण्याच्या दृष्टीनें, हल्ला चढवणाऱ्या सैन्याला विमानदलानें मदत द्यावी, अशी शिफारस मी केली. हल्ला करणारी बॉम्ब

फेकीं विमानें हें दुधारी शस्त्र होतें; परंतु हा जुगार खेळून पाहण्यासारखा होता. ही मदत लवकरांत लवकर मिळाली पाहिजे.

(भारत-पाक युद्धांत १९६५ मध्यें मोठ्या प्रमाणावर हवाई मदत आपल्या सैन्याला चढाई सुरू करण्यापूर्वीच उपलब्ध करण्यांत आली होती. यावेळीं मात्र अशी हवाई दलाची मदत द्यावी कीं नाहीं याची अजून चर्चाच चालू होती.)

आम्ही सिरखिम येथें उतरणार होतों. परंतु वाईट हवेमुळें हेलिकॉप्टर उतरूं शकत नव्हतें. मधल्या वेळेचा सदुपयोग व्हावा यासाठीं मी हेलिकॉप्टर लुंपू येथें नेलें. तेथून ७ ब्रिगेड, २ रजपूत व १।९ गुरखा यांना दुसऱ्या दिवशीं मी धोला विभागांत जाण्यासाठीं निघण्यास सांगितलें.

मी ती रात्र झिमिनथांग येथें घालवली. हें ठिकाण खिंझामानेपासून सात मैलांवर होतें.

## ६ ऑक्टोबर

मेजर जनरल निरंजनप्रसाद व मी लेफ्ट. कर्नल राव यांचेबरोबर हेलिकॉप्टरनें सिरखिम येथें गेलों. हें ठिकाण ९००० फूट उंच होतें. तेथून आम्हीं धडपडत होथुंगला खिंडीच्या टोकावर धांपा टाकीत पोहोंचलों. हें ठिकाण १५००० फूट उंचीवर होतें. तेथून आम्हांला त्या भागांत सर्वत्र आढळणारी बुद्धांचीं निशाणें, काठ्यांवरून फडफडतांना दिसत होतीं, या निशाणांनीं म्हणे दुष्ट शक्ती दूर राहात. (अरेरे! आमच्यापासून मात्र त्या दूर राहिल्या नाहींत!) अगदीं उभी उतरण उतरून व अनेक नाले व निसरडे दगडगोटे तुडवीत, आम्ही पुल क्र. १ येथें पोहोंचलों. नामकाचू नदीवरील हा पूल १०,००० फूट उंचीवर आहे. यावेळीं रात्रीचे ८–३० झाले होते. येथें एक रजपुत कंपनी होती. येथून पुढें रस्ता खिंझमानेकडे जातो व थाग–लाकडे फुटतो.

त्या दिवशीं रात्रीं निरंजन प्रसाद यांनीं मला असें सांगितल्याचें आठवतें, कीं धोला भागांत चिनी येण्यापूर्वीं महिनाभर, त्यांनीं ३३ कोअर यांचेकडे थाग-ला हा कडा व्यापण्याची परवानगी मागितली होती. जर थांग-ला हा कडा त्यावेळीं व्यापला असता, तर चिनी सप्टेंबरांत धोला येथें आले नसते, असें त्यांचें

म्हणणें होतें. ते म्हणाले, कीं दोन दिवसांपूर्वीं सेन यांनीं त्यांना तोवांग येथें सांगितलें कीं, 'मी कोअर कमांडर उमरावसिंग यांना हाकललें आहे व लवकरच नवे कमांडर (कौल) येतील. जर ७ ब्रिगेडहि पुढें सरकली नाहीं तर काय होईल हें तुम्ही जाणतांच.' सेन हे दिल्ली येथील बैठकांतून २९ सप्टेंबर, ५ ऑक्टोबर, १० ऑक्टोबर अशा निरनिराळ्या तारखा यासाठीं देत होते. हें ऐकून निरंजनप्रसाद यांनीं आश्चर्य व्यक्त केलें कारण यांतील अडचणी निरंजनप्रसाद यांनीं वेळोवेळीं त्यांना कळविलेल्या होत्या.

## ७ ऑक्टोबर

न्याहारी उरकून मी पूल क्र. २ पर्यंत चालत गेलों. ९ पंजाब ही बटालियन तेथें कबजा करून होती. या बटालियनच्या सर्व श्रेणी या उत्तम मनस्थितींत होत्या व त्यांनीं स्वतःसाठीं उत्तम मोर्चे बांधलेले होते. मी धोला येथें पोहोंचलो. धोलाचें दुसरें नांव आहे 'त्से डोंग'. ७ ब्रिगडचे कमांडर ब्रिगेडियर जॉन पुरुषोत्तम दळवी यांची गाठ पडली.

मी येथून ईस्टर्न कमांडर व आर्मी हेडक्वार्टर्सला जो संदेश पाठवला त्याचा सारांश असा होता.

(अ) ' उंच शिखरावरील जंगलांतील लढाई ' असें येथील वर्णन करतां येईल.

(ब) पूल क्र. ५ चा कबजा प्रतिकाराशिवायच आपण केला आहे व तात्पुरत्या ओंडक्यांच्या पुलावर एक प्लाटून ठेविली आहे.

(क) त्सांग लीचा कबजा प्रतिकाराशिवायच करण्यांत आला आहे.

पूल क्र. ३ पासून ३०० यार्डांवरील धोला ठाण्यावर, मी दुपारीं २ वाजतां पोहोंचलों. यासाठीं कांहीं तास चढ चढावा लागला. १२००० फूट उंचीवर हें ठाणें होतें व १५०० यार्डांवरील शत्रूच्या मोर्च्याच्या टप्प्यांत हें ठाणें होतें. आसपासच्या पर्वत शिखरांवर तुरळक बर्फ चमचमत होतें.

माझी पहिली प्रतिक्रिया हीच झाली, कीं धोला भाग हा कसल्याहि लष्करी हालचालींसाठीं– आक्रमक वा संरक्षक– सोयीस्कर नव्हता व सेन व दळवी यांनीं कारवाईसाठीं हा भाग निवडायलाच नको होता.

थांग-ला च्या कड्यावर शत्रू ठाण ठोकून होता. संख्येंत व सामुग्रींत तो वरचढ आहे हें तो आपल्या अगदीं नाकासमोरच असल्यानें दिमाखानें

जाणवत होतें. आपलें ठाणें ज्याची निवड माझी नेमणूक होण्यापूर्वींच इत-रांनी केली होती हें एका खोलगट अशा चिमटचांत सांपडलेलें होतें व धोक्यांत होतें. सर्व दिशांनीं चिन्यांचें लक्ष आपल्यावर होतें.

मी ईस्टर्न कमांड व आर्मी हेडक्वार्टर्स यांना कळवले—

अ ) आकाशांतून विमानद्वारा टाकण्यांत येणारी रसद, दारूगोळा व हिवाळी कपडे हे जिथें आम्हीं पोहोंचूं शकत नाहीं अशा ठिकाणीं बहुश: पडत आहेत.

ब ) २ रजपूत व १।९ गुरखा यांचेपाशीं फक्त लहान अस्त्रांना ५० फैरी झाडायला पुरेल एवढाच दारूगोळा आहे. व फक्त ३ दिवस पुरेल एवढेंच अन्नधान्य आहे.

क) हिवाळीं कपडयांच्या टंचाईमुळें या दोन्ही बटालियन रात्र १५००० फूट उंचीवर उन्हाळी कपडयांतच व एका घोंगडीवर काढत आहेत. बुटांचाहि तुटवडा आहे. ( मेनन यांनीं खासगी क्षेत्रांत बुटांसाठीं मागणी करण्यास नकार दिल्यानें हा तुटवडा उद्‌भवला होता.)

ड)बिनलष्करी हमालांचा अतिशय तुटवडा होता. आकाशांतून पडणारे साहित्य चुकीच्या जागीं पडत होतें, या दोन्हींमुळें दळवळणाचा वेग मंदावला होता.

इ)रस्ते बांधणी बोर्डाकडून मागविलेले मजुर जवळजवळ २०० मैलांत पसरलेले असल्यानें, ते इथें पोहोंचायला बराच अवधि लागणार होता.

ग)आणखी एक विमान आमच्या दिमतीला मिळावें.

म)चिन्यांना आपल्या भागांतून हुसकावून लावण्यासाठीं मी शक्य ते सर्व करीत आहे.

भ) चिन्यांजवळ उत्तम साधनें असल्यानें, आपण सुरुवातीला कोणतीहि जागा जिंकली, तरी तिथून ते आपल्याला पुन: हुसकाविण्याची शक्यता आहे.

## ८ ऑक्टोबर

अस्वस्थपणें रात्र काढून सकाळीं मी पूल क्र. ४ पर्यंत चालत गेलों. येथें ७ ब्रिगेडची मुख्य कचेरी होती. २ रजपुत व १।९ गुरखा या बटालियन पुल क्र. ३ व ४ येथें होत्या. १२,५०० फूट उंचीवरच्या या ठिकाणीं पोंचा-यला मला तीस मिनिटें लागलीं.

येथील अधिकाऱ्यांशी माझी चर्चा चालू असतांना, चिन्यांनीं स्वयंचलित बंदुकीतून चारशें यार्डावर गोळ्या सोडल्या. आम्हांला भिवविण्यासाठीं किंवा आम्ही घाईनें कांहीं करावें यासाठीं, ही गोळीबारी असावी. आम्ही आडोशाला गेलों व वाट पाहूं लागलो कीं काय होतें. कांहींच झालें नाहीं, तेव्हां आम्ही पुन: जमलों व चर्चा पुढें चालूं केली.

ब्रिगेडियर दळवी यांनीं नामकाचू नदीच्या उत्तरेस, एक कंपनी त्सेंग जॉंग भागांत धाडण्याची योजना मांडली. ती मी मान्य केली. जर येथें प्रतिकार झाला नाहीं तर ही जागा कबजांत घ्यावी असें ठरलें. याला कारणें अशी होतीं—

अ) आपलें सैन्य नदीच्या उत्तरेस आधींच गेलेलें होतें व मी येण्या-पूर्वींच त्यांनी त्सांग ली चा कबजा केलेला होता.

ब) जर आपण त्सेंग जॉंग घेतलें नाहीं तर चिनी सैन्यानें तें लवकरच घेतलें असतें व आपल्या मोर्चांना धोका निर्माण झाला असता.

क) ब्रिगडिअर दळवी यांनी त्सेंग जॉंग चा कबजा करण्यासाठीं, कंपनीहि धाडलेली होती व ती वाटचाल करीत होती.

मी ईस्टर्न कमांड व आर्मी हेडक्वार्टर्सला कळवलें—

१) त्सेंग जॉंग चा कबजा, प्रतिकाराविना झाला. चिनी भारी संख्येने थाग-ला व युमास्तो-ला या १४,००० फूट उंचीवरील, ३५०० यार्ड क्षेत्र-फळांत आढळत आहेत.

२) शत्रूनें या भागांत खंदक खणले आहेत.

३) रेशन तुटवडयामुळें पुढील आज्ञा होईपर्यंत सर्वांनीं काटकसर करावी अशी आज्ञा मी दिली आहे.

हा दिवस दसऱ्याचा होता !

## ९ ऑक्टोबर

आर्मी हेडक्वार्टर्स दिल्ली, येथून मला संदेश मिळाला, कीं चिनी हे तोवांगवर हल्ला करण्याच्या दिशेनें सरकत आहेत, असें कळतें. मी उत्तर पाठवलें, कीं याचा मुकाबला करण्यासाठीं आर्मी हेडक्वार्टर्सनें योग्य तीं पावलें उच-ललीं असतीलच. कारण या रणक्षेत्रावर, उपलब्ध असलेल्या साधनांनिशीं, मी फारच बलाढ्य शत्रूसमोर लढाईत गुंतलेला होतो.

आपल्या मोर्चेबंदींतून फिरतांना ब्रिगेडिअर दळवी यांना मला हें दाखवून द्यावें लागलें, कीं नदीपलीकडे, चिन्यांचे मोर्चे किती उत्तम स्थितींत आहेत व त्या मानानें आपली परिस्थिती कशी ठीक नाहीं. दळवी यांची मोर्चेबंदी योग्य जागीं केलेली नव्हती; आवश्यक तो आडोसा निर्माण केलेला नव्हता व बांधलेले आडोसे व खंदक हे पुरेसे बळकट नव्हते. शत्रूच्या जोराच्या तोफखान्यापुढें व उखळी तोफांपुढें ही तटबंदी टिकण्यासारखी नव्हती. ९ पंजाब बटालियनखेरीज इतर सैन्याला, या प्रदेशाची पुरेशी माहितीहि नव्हती, कारण तें नुकतेंच तिथें आलें होतें.

माझ्या हें लक्षांत आलें, कीं मी जे दोष दाखवले तें माझें सांगणें दळवी यांना आवडलें नाहीं. परंतु मी कांहीं तिथे फक्त चुका दुर्लक्षून पाठ थोपटण्याकरतां गेलेलो नव्हतों. दोष दाखवणें, हें ज्येष्ट कमांडरचें कामच असतें. ज्येष्ठ अधिकारी म्हणजे कांहीं केवळ पोस्ट ऑफिसें नव्हेत. आणीबाणीच्या प्रसंगीं देण्यांत आलेल्या आज्ञा या नेहमींच्या पद्धतीनें फाईलींतून सावकाश प्रवास करीत राहून चालत नाहीं; कारण तिथें सैनिकांच्या जीवनमरणाचा प्रश्न असतो. (१९६५ च्या भारत-पाक युद्धांत असे असंख्य प्रसंग आले, कीं पुष्कळ कनिष्ठ अधिकाऱ्यांना, त्यांच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी कमांडवरून दूर केलें.)

त्या दिवशीं दुपारीं मी ७ ब्रिगेडच्या सर्व कमांडिंग ऑफिसर यांचेपुढें, लहानसें भाषण केलें व त्यांना आपल्या कामगिरीचें महत्त्व विशद करून सांगितलें. त्यांच्या कर्तृत्वार माझा विश्वास आहे व ते ही कामगिरी पार पाडतील असाहि विश्वास मला वाटत असल्याचें सांगितलें. सर्वजण आनंदांत होते.

मी ईस्टर्न कमांड व आर्मी हेडक्वर्टरला कळवलें कीं, आमच्या लष्करी तयारीला पुरें पडेल, असें दळणवळण चालू ठेवण्यासाठीं आकाशांतून विमानाद्वारें रसद सामुग्री टाकावी लागतें; तेव्हां त्वरीत विमानांची संख्या वाढवा.

दिवसभर अतिशय श्रमांत घालविल्यानंतर निरंजनप्रसाद व मी आमच्या बंकरमध्यें परतलों. जरा विश्रांती घेण्यासाठीं आम्ही आडवें झालो मात्र, तोंच कांहीं मिनिटांतच मोठा स्फोट बंकरजवळ झाला.

आम्हांला डिवचून तडकाफडकीं कांहीं कृति करण्यास आम्हांला भाग पाडण्यासाठीं, चिन्यांनी एक ग्रेनेड फेकलेला होता. निरंजनप्रसाद म्हणाले कीं इतक्या पुढें आघाडीवर व इतक्या उंच ठिकाणीं मी–माझे ज्येष्ठत्व लक्षांत घेतां–राहणें योग्य नाहीं. मी सांगितलें, कीं सैनिकांबरोबर राहून वांट्याला येईल तें अनुभवण्यासाठींच तर मी आलों आहे व आणखी एक दिवस राहून मी परतेन.

## १० ऑक्टोबर

जगाच्या या भागांत दिवस लवकर उगवतो. सकाळचे ४–३० झाले होते व मी तयार होत होतो. माझा नोकर चहासाठीं पाणी उकळवीत होता. मी बंकरजवळच्या झाडाच्या फांदीला आरसा टांगून दाढी करत होतो. पूल क्र. ४ च्या वरच आगव्या हा बंकर होता. इतक्यांत नदीपली-कडून जोराची सरबत्ती सुरू झाली. कळलें कीं, चिन्यांनी त्सेंग जाँग जवळच्या ९ पंजाब बटालियनच्या टेहळयांवर, सकाळींच गोळीबार सुरू केला होता. मी घाईघाईनें दाढी उरकली व निरंजनप्रसाद यांचेबरोबर पूल क्र. ४ जवळ रस्त्यावर आलों. मी पाहिलें, कीं २ रजपूत ही तुकडी आदल्या दिवशीं आज्ञा दिल्याप्रमाणें ‘ लॉंग ब्रिज ’ कडे धांवत निघाली होती. आपल्या दृष्टीनें यावेळीं परिस्थिति दारुण होती. सर्व ब्रिगेडला गेल्या कांहीं दिवसांत पुरेसें अन्न मिळालेलें नव्हतें. सैनिकांना पुरेसे बूट नव्हते, हिंवाळी कपडे नव्हते. शस्त्रास्त्रे व दारुगोळा यांची कमतरता तर होतीच. अनेक जणांना न्युमोनिया झालेला होता.

१, २ व ३ नंबरच्या पुलांजवळ, आमच्यापाशीं मध्यम मशिनगन्स नव्हत्याच ! पूल क्र. ४ येथें ४ होत्या व रोज अर्ध्या तासापेक्षां कमी गोळी-बार करतां येईल, येवढाच दारूगोळा होता. पूल क्र. २ येथें ३ इंची दोन उखळी तोफा होत्या. पूल क्र. ४ येथें आणखी दोन होत्या. त्सांगधर येथें ७५ मि. मि. दोन बंदुका शाबूत अवस्थेंत होत्या. चिन्यांची ताकद, शस्त्रास्त्रें व सैनिक या दोन्ही बाबतींत अतिशय वरचढ होती.

५०० सैनिकांच्या एका चिन्यांच्या बटालियननें भरपूर दारुगोळ्याच्या मदतीनें, आपल्या त्सेंग जाँग येथील मोर्चावर हल्ला चढविला. तेथें आपले

फक्त ५० सैनिक होते. चिन्यांच्या हल्ल्यांच्या लाटा मागून आलेल्या लाटा, आपल्या सैनिकांनी परतविल्या व जोराची गोळाबारी सुरू झाली. ९ पंजाब बटालियनच्या कांहीं भागानें, त्सेंग जाँग या ठिकाणच्या वरच्या अंगाला कार्पोला येथें कुणाच्या नजरेस न पडतां, मोर्चा बांधला होता. त्या उंच ठिकाणाहून त्यांनीं सरबत्ती सुरू करतांच, शत्रू गांगरला व त्याची पुष्कळच मनुष्यहानी झाली. मेजर चौधरी या आपल्या कंपनी कमांडरच्या हाताला थोडीशी जखम झाली, परंतु लढाईंतच राहण्याचें त्यांनीं ठरवलें. त्यांनीं नंतर लेफ्टनंट कर्नल मिश्रा यांना मशिनगन व उखळी तोफा यांची मदत देण्यास सांगितली. मिश्रांनीं ब्रिगेडिअर दळवी यांना सांगितलें. ब्रिगेडिअर दळवी यांनीं जबाब दिला, कीं पूल क्र. ४ करून ते लढाई पाहात आहेत व मशिनगन व उखळी तोफा यांच्या कक्षेबाहेर चिनी असल्यानें उपयोग होणार नाहीं; उलट चिनी सूडबुद्धीनें, त्यांची वरचढ अस्त्रें मात्र वापरूं लागतील.

त्या दिवशीं सकाळीं चिन्यांनीं पुन्हां चढईची आंखणी केली व उखळी तोफांनिशीं त्यांनीं त्सेंग-साँगवर तीन दिशांनीं हल्ला चढवला. लगेच हातघाईची लढाई सुरू झाली. कांहीं तासांनीं ब्रिगेड कमांडरनें कंपनीला नदीच्या दक्षिणेंस मागें येण्यास सांगितलें. पुल क्र. ५ च्या दिशेनें नदीचें पाणी तुडवीत आपले सैन्य मागें आलें. आपली सहा माणसें मेलीं, अकरा जखमी झालीं व पांच बेपत्ता झालीं. पेकिंग रेडिओनें चिनी जायबंदींची संख्या १०० दिली.

खऱ्या अर्थानें चिन्यांनीं आपल्याशी केलेली ही पहिली लढाई होय. यापूर्वी फक्त तुरळक चकमकी उडाल्या होत्या. तेव्हां लढाई चीननें सुरू केली, भारतानें नाहीं नामकाचू नदीच्या उत्तरेस असलेलें त्सेंग जाँग हें ठिकाण आपल्याच हद्दींत होते. व तें आपण व्यापलें होतें. इथें मला हें नमूद केलें पाहिजे, कीं आपल्याला कुठलें ठाणें व्यापण्याची ताकद अंगांत होतीच, तर आपण धोला ऐवजी थांग-ला व्यापायला हवें होतें. (जुलै १९६२ मध्यें केली गेलेली ही सूचना सेन यांनी फेटाळली होती.)

ही लढाई प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिल्यानंतर माझी खात्री पटली, कीं चिन्यांच्या वरचढ तयारीपुढें; खोलगट भागांत असलेले धोला हें ठाणें

आपण लढवूं शकणार नाहीं. डिव्हिजनल कमांडरनें सूचना केली, कीं मी दिल्लीला जावें व आर्मी हेडक्वार्टरला व सरकारला या भागांतून चिन्यांना हुसकण्याचा आग्रह सोडण्यास सांगावें. या ऐवजीं आपण अशा ठिकाणीं मोर्चा बांधावा, कीं तेथून आपल्याला शत्रूपेक्षां अधिक फायदे असतील. मी निरंजनप्रसाद यांना सांगितलें, कीं शत्रूला हांकलून लावण्याच्या आज्ञा, तूर्त स्थगित ठेवाव्या. मी दिल्लीला जाऊन येईपर्यंत आहे ती स्थितिमात्र कायम [illegible]

मी ईस्टर्न कमांड व आर्मी हेडक्वार्टरला, त्सेंग जाँग जवळ निर्माण झालेल्या परिस्थितीसंबंधीं कळवलें. माझा अंदाज होता, कीं ७ ब्रिगेडविरुद्ध चिन्यांनीं एक संबध डिव्हिजन एकवटलेली होती. पूल क्र. ३ व ४ च्या जवळ थाग-ला ओलांडून दोन बटालियन चिनी सैन्य येतांना मी गेल्या दोन दिवसांत प्रत्यक्षच पाहिलेलें होतें. तोवांग विभागाला धोका निर्माण होत आहे असें कळवून, मी सुचवलें, कीं मी दिल्लीला येऊन सेना प्रमुखांपुढें प्रत्यक्षच येथील परिस्थिती निवेदन करावी असें मला वाटतें.

मला आर्मी हेडक्वार्टर्सकडून उत्तर आलें, कीं मी स्वत: दिल्लीला ताबडतोब यावें.

त्सेंग जाँग ची लढाई ही ब्रिगेडची किंवा बटालियनची लढाई होती. त्सेंग जाँग येथील आपली स्थिती अधिक मजबूत करणें शक्य नव्हतें. आपण त्सेंग जाँग या हिशोबानें व्यापले होतें, कीं जोंपर्यंत आपण एखादें ठिकाण ताब्यांत ठेवूं तोंपर्यंत तें निर्विवादपणें आपलेंच राहील. त्सेंग जाँग येथील सैन्याला मध्यम मशिनगन्स्ची मदतहि पूल क्र. ४ येथून होऊं शकली नाहीं, कारण चिनी टप्प्याबाहेर होते.

कांहीं सहकाऱ्यांबरोबर मी धोलाहून परत फिरलो व पुन: एकदां हाथुंग-लाचा खडतर कडा चढलों. खिंडीजवळील झोपडी लागेपर्यंत सायंकाळ झाली व रात्र आम्ही तिथेंच काढली. इथें माझ्या छातींतून कळा येऊं लागल्या. जशी रात्र वाढली तशी थंडी वाढली व मला श्वासोच्छ्वासाला त्रास होऊं लागला. छातींतल्या कळा जोरानें येऊं लागल्या व मला गुदमरल्यासारखें होऊं लागलें. रात्रीं डॉक्टर आणला परंतु उपयोग झाला नाहीं. थंडी तर कडाक्याची पडली होती.

## ११ ऑक्टोबर

इकडे आड व तिकडे विहीर अशी माझी स्थिति झाली होती. मी होतो तिथेंच राहिलों असतों, तर उघडें वारें लागून मेलो असतो. तसाच पुढें जात राहिलों, तरी धोका होताच. परंतु मी पुढें जायचें ठरवलें. पहांटे ४ वाजतां माझ्या छातींतलें दुःख कमी झालें नसल्यानें, मला उचलून हाथुंगलाच्या टोकापर्यंत नेण्यांत आलें. तिथून अक्षरशः धांवत मी सिरखिमला आलो. सुदैवानें तिथें हेलिकॉप्टर तयार होतें. तेथून तेजपुरला निघण्यापूर्वी मी कढत पाण्यानें आंघोळ केली; व स्वच्छ कपडे पुनः एकदांचे घातले. तेजपुरहून दिल्लीला निघण्यापूर्वी मी ताप पाहिला, तो १०२ डिग्री होता. मी अंगांत ताप असल्याचें कुणालाच सांगितलें नाहीं. नाहीं तर माझी रवानगी हॉस्पिटलांत झाली असती.

सायंकाळीं ८ वाजतां मी पालमवर उतरलों व तिथें कळलें कीं त्याच रात्रीं पंतप्रधान यांचें निवासस्थानीं बैठक होती व तिथें मी जावें. नेहरू बैठकीचें संचालन करीत होते. त्यांच्याशिवाय या बैठकीला कृष्ण मेनन, सैन्य व हवाईदल प्रमुख, मंत्रिमंडळाचे, परराष्ट्र खात्याचे, संरक्षण खात्यांचे सचीव हजर होते. धोला भागांत मी जें पाहिलें तें मी त्यांना सांगितलें. नामकाचू नदीच्या कडेनें आपण जी मोर्चेबंदी केली होती, ती टिकूं शकणारी नाहीं, हा भाग अरुंद खिंडीत आहे व हालचाल करायलाहि जागा नाहीं, तेथें चिन्यांचें प्रथमपासून वर्चस्व आहे, या गोष्टी मी विशद केल्या. शेवटी मी सांगितलें—

अ) जर आहे त्या स्थितींत आपण चिन्यांवर हल्ला केला, तर मोठा पराभव ठेवलेला आहे. यासाठीं आपण धोला भागांतून मागें हटून, लष्करी दृष्टचा सोयीस्कर ठिकाणीं जावें, म्हणजे चिन्यांशीं आपल्याला अधिक चांगलें लढतां येईल.

ब) धोला भागांत लवकरच बर्फ पडणार आहे व अधिक काळ तो भाग सांभाळणें अशक्य होणार आहे.

क ) थाग-ला च्या विरुद्ध दिशेला आपण कितीहि मोठी तयारी केली, तरी वरचढ साधनांमुळें व चांगली माऱ्याची जागा हातीं असल्यानें चिनी तेथून आपल्याला हुसकूं शकतील.

ड ) चांगल्या दर्जाची तयारी चिनी करूं शकले, कारण त्यांना पिछाडीस उत्तम दळणवळण होतें. त्यांच्या आघाडीला हा आपल्याला नसलेला मोठाच फायदा उपलब्ध होता.

या गोष्टी लक्षांत घेऊन, मी खालील गोष्टींबाबत आज्ञा देण्याची विनंती केली.

अ) याच भागांत तयारी सुरूं ठेवून, चिन्यांकडून मोठा पराभव होण्याची शक्यता असतांना, मी चिन्यांवर हल्ला चढवावा काय ?

ब) किंवा चढाई करण्याच्या आज्ञा रद्द करून आहे तीच फळी संभाळावी ?

क) किंवा इतरत्र आपल्याला सोयीस्कर ठिकाणीं फळी धरावी ?

मी तेथें हजर असलेल्या सर्वांना सांगितलें, कीं माझें सैन्य जी आज्ञा मिळेल त्याप्रमाणें करील. मात्र सरकारनें याचे होणारे परिणाम लक्षांत घ्यावें.

नेहरूंनीं थापर व सेन यांना त्यांचा दृष्टिकोण काय आहे हें विचारलें, तेव्हां त्यांनीं दुसऱ्या पर्यायाला पाठिंबा दिला परंतु तिसऱ्याशीं ते सहमत झाले नाहींत.

नेहरू म्हणाले, कीं जर परिस्थितीच प्रतिकूल असेल व प्रत्यक्ष आघाडीवर कमांडर असलेल्या मला जर असें वाटत असेल, तर चिन्यांवर हल्ला न चढवतां आपण आहे ती फळी फक्त संभाळावी याला त्यांची संमती आहे.

रात्रीं बैठक आटोपली तेव्हां मला १०३ ताप होता. श्वासोच्छ्वास करणें कठीण जात होतें. मी ज्या दिव्यांतून जात होतो, त्याची कुणालाच कल्पना नव्हती.

## १२ ऑक्टोबर

जनरल थापर यांनेबरोबर व इतरांबरोबर आर्मी हेडक्वार्टर्स येथेंच माझ्या कोअरसंबंधी चर्चा करण्यांत दिवस घालवला.

## १३ ऑक्टोबर

मी तेजपूर येथें ४ कोअरच्या हेडक्वार्टर्सला पोहोंचलो. तेथें सिलोनला निघण्यापूर्वी नेहरूंनीं जें पत्रकारांसमोर वक्तव्य केलें, तें माझ्या कानीं आलें. नेहरूंनीं सांगितलें होतें कीं त्यांनीं नेफामधून चिन्यांना हुसकून द्या, असें आपल्या सैन्याला सांगितलें आहे. ११ तारखेला रात्रीं त्यांच्या निवासस्थानीं

झालेल्या बैठकींत नेहरू यांनीं मला जी आज्ञा दिली त्याच्याविरुद्ध हें वक्तव्य होतें. त्या बैठकींत सेना प्रमुखांच्या देखत नेहरूंनीं सांगितलें होतें, कीं चिन्यांवर हल्ला न करतां आपण आपली सध्यांची आहे ती फळी धरून ठेवावी.

नेहरूंनीं १३ तारखेला हें विसंगत विधान कां केलें, हा खरोखरच एक यक्षप्रश्न आहे. (चिन्यांनीं नेहरूंचा विश्वासघात करून चढाई केली त्याचा धक्का नेहरूंना बसलेला असला, तरी त्यांनीं या आणीबाणीच्या परिस्थितींत अधिक वास्तव भूमिका घ्यावयास हवी होती. परंतु त्यांच्या अनुयायांचा मोठ्यानें होणारा आरडा-ओरडा, विरोधकांनीं दिलेले टोमणे, या सर्वांमुळें नेहरू गुदमरून गेले होते. ऑक्टोबर १९६२ मध्यें बहुधा त्यांना कुणी तरी असें सांगण्यास भाग पाडलें असावें, कीं त्यांनीं सैन्याला चिन्यांना आपल्या प्रदेशांतून हांकलण्यास सांगितलेलें आहे. या नेहरूंच्या विधानानें, चिन्यांना आम्हींच प्रथम त्यांच्यावर हल्ला केला असें म्हणायला लेचेंपेंचें कारण मिळूं शकलें.) नेहरूंनीं हें विधान खरोखरच या भावनेनें केले कां, कीं भारत हा आतां खरोखरच इतका समर्थ झाला आहे, कीं त्यांना हें विधान करण्यांस प्रत्यवाय नाहीं ? ज्या कुणा सेनानीला नेफामध्यें आपल्यासमोर जें गंभीर लष्करी संकट उभें होतें त्याची कल्पना असेल, तो नेहरूंना असा सल्ला कधींहि देऊं शकला नसता. माझा असा तर्क आहे कीं नेहरूंनीं हा 'धाडसी' पवित्रा, त्यांना आपण लष्करी दृष्टया कमकुवत असल्याचें माहीत असूनहि अशा करतां घेतला, कीं त्यांना वाटलें या धाडसी (परंतु विसंगत) विधानानें चिनी भारतावर हल्ला करण्यापासून परावृत्त होतील ? कदाचित त्यांना त्यांच्या विश्वासांतील राजकारणी माणसानेंहि असें विधान, मानसशास्त्र दृष्टया लोकांना झुलवण्यासाठीं करण्याचा सल्ला दिला असेल. चिनी हे आपल्यावर केव्हां ना केव्हां चढाई करणारच होते, तेव्हां नसती केली तर पुढें केली असती, परंतु नेहरूंच्या विधानानें ही चढाई लवकर झाली असणेंहि शक्य आहे.

मी ४ इन्फंट्री डिव्हिजनला जी आज्ञा दिली, त्यांत खालील गोष्टी होत्या:

प्र) नामकाचू नदीवरील पूल क्र. १ तें 'तात्पुरत्या' पुलापर्यंतचा भाग वाटेल ती किंमत देऊनहि, हातचा सोडायचा नाहीं.

ब) लुंपू मार्गें होणारे दळणवळण सुरक्षित ठेवावयाचें आहे.

क) हाथुंग ला—नामकाचूच्या दक्षिणेस असलेला भाग सोडावयाचा नाहीं.

ड) त्सांगली तटबंदीबाबत, ती लढवायची कीं नाहीं, हा निर्णय ४ डिव्हिजनच्या जनरल ऑफिसर कमांडिंग यांचेवर सोपवण्यांत यावा.

मी याच आज्ञा कांहीं दिवसांपूर्वीच तोंडीं दिलेल्या होत्याच; त्या आतां लेखी कायम केल्या.

## १४-१५-१६ ऑक्टोबर

१८ तारखेला तोवांग व धोला या आघाडीवरील भागांत जाण्याचा माझा इरादा होता. मी आर्मी हेडक्वार्टर्स व ईस्टर्न कमांड यांना, विमानांच्या तुटवड्यामुळें येणाऱ्या अडचणी समजावून सांगितल्या व त्यामुळें दळणवळण व लष्करी हालचाली यांत कसा व्यत्यय येतो हें सांगितलें. भारतीय हवाई दलें सध्यांच्या त्यांच्या विमानांची संख्या लक्षांत घेतां ही कामगिरी पुरी पाडूं शकत नसतील तर आर्मी हेडक्वार्टरनें त्यांना आणखी त्यांना डाकोटा किंवा कॅरिबस विमानें विकत घेऊं द्यावी असें मी सुचवलें. हें शक्य नसेल तर ज्या खासगी कंपनीनें नेफांतील आपल्या ठाण्यांना परवांपर्यंत पुरवठा केला होता, त्यांनाच जादा विमानें सरकारला उपलब्ध करण्यास सांगावें. मी हेंहि सांगितले, कीं ऑक्टोबर १० ला त्सेंग जाँग येथील लढाईनंतर चिन्यांनीं या भागांत एक बटालियन सैन्य आणून मोठीच मोर्चेबंदी केली आहे व ते कदाचित् त्सांगली फटक्यासरशी कबजांत घेतील. त्सांगली येथील एकटी पडणारी आपली कंपनी प्रतिष्ठेचा बाऊ न करतां शहाणपणानें नामकाचूच्या दक्षिणेस मार्गें घेण्यांत यावी.

## १७ ऑक्टोबर

संरक्षणमंत्री, सेनाप्रमुख व आर्मी कमांडर विमानानें सकाळीं तेजपूरला आले. सेनाप्रमुखांच्या माझ्या हातांखालील अधिकाऱ्यांसमक्ष, कृष्ण मेनन यांनीं सांगितलें, कीं त्सांगली ताब्यांत ठेवणें हें राजकीयदृष्टया महत्त्वाचें आहे. ज्या ठिकाणीं भारत, भूतान व तिबेट यांच्या सरहद्दी मिळतात अशा तिठ्याच्या जवळच हें ठिकाण आहे. मी सांगितलें कीं राजकीय दृष्टया याला काय

महत्त्व असेल तें असो, लष्करी दृष्टया ही कामगिरी अशक्य आहे. यासाठीं आणखी सैन्य व सामुग्री दिली तर गोष्ट वेगळी; परंतु आहे या तुटपुंज्या तयारीनें नामकूच नदीच्या उत्तरेकडील त्सांगली लढवणें शक्य नव्हतें. उगाच शक्ति वाया जाईल. ही गोष्ट थापर व सेन यांच्यादेखत मी सांगितली.

ही प्रतिष्ठित मंडळी सायंकाळीं दिल्लीला परतली असतील, तोंच मी फार आजारी झालो. स्थानिक वैद्यकीय अधिकाऱ्यानें मला कांहीं औषध दिलें, परंतु माझी स्थिती खालावत चालली. रात्रीं छातींत असह्य कळा मारूं लागल्या. श्वासोच्छ्वास करणें कठीण झालें व बोलतां येईना. माझी परिस्थिती जेव्हां फारच बिघडली, तेव्हां मी नको नको म्हणत असतांना, ब्रिगेडिअर पंचनद व लेफ्ट. कर्नल राव यांनीं टेलीफोननें ही गोष्ट ब्रिगेडिअर पालिट—डायरेक्टर, मिलिटरी ऑपरेशन्स, आर्मी हेडक्वार्टर्स, दिल्ली यांना कळवली. पालिट यांनी थापर यांना व थापर यांनीं संरक्षण मंत्री यांच्या नजरेस ही गोष्ट आणली पंचनद व राव हे सर्व रात्र माझ्या बिछान्याशीं बसून होते.

## १८ ऑक्टोबर

कर्नल लाल हे वैद्यकीय तज्ज्ञ पहांटेंच तेजपूरला आले. सेनाप्रमुख व संरक्षणमंत्री यांनीं त्यांना खास विमानानें तेजपूरला धाडलें असल्याचें त्यांनीं सांगितलें. माझी प्रकृति तपासल्यानंतर लाल यांनीं सांगितलें, कीं मला ताबडतोब दिल्लीला हलवलें पाहिजे. तिथें अधिक तपशीलवार परीक्षा करून उपचार करतां येतील. मी याला विरोध करतांच, लाल यांनीं सांगितलें, कीं माझी प्रकृति इतकी वाईट नसती, तर त्यांनीं हें सुचविलें नसतें. कांहीं दिवसांत परत पाठवूं, असें आश्वासन त्यांनीं दिलें. तेजपूरच्या दमट हवेंत माझी प्रकृति अधिक बिघडेल असें लाल म्हणाले मी लाल यांच्या बरोबर दिल्लीला जायला निरुपायानें तयार झालो. परंतु विमानांत बसण्यापूर्वीं, मी लेफ्ट. जनरल सेन यांना फोन करून दिल्लीला जाण्याची परवानगी मागितली. सेन यांनी परवानगी दिली. हे फोन-वरील संभाषण ब्रिगेडिअर के. के. सिंग यांच्या देखतच झालें. मी ही गोष्ट इथें मुद्दाम सांगत आहे, कारण कांहीं जणांनीं द्वेष्टीपणानें असें

सांगितलेलें आहे कीं मी आर्मी कमांडर यांची परवानगी न घेतां, संरक्षण मंत्र्यांच्या परवानगीनेंच दिल्लीला गेलों. मी दिल्लीला पोहोंचतांच मला सरळ माझ्या घरीं नेण्यांत आलें व तेथून मी संपूर्ण वैद्यकीय तपासणी-साठीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं लष्करी रुग्णालयांत दाखल झालों.

## १९ ऑक्टोबर

ब्रिगेडियर (आतां मेजर जनरल) इन्द्रजीत, या लष्करांतील प्रमुख डॉक्टरांनीं माझी कसून तपासणी केली. एक्सरे घेण्यांत आला. कार्डिओग्रॅम घेण्यांत आला. त्यांत असें आढळून आलें, की विशेषतः एवढ्या उंच ठिकाणाच्या अतिश्रमांमुळें मला गंभीर प्रकारचा 'ओडेगा' (हृदय प्रसरण पावणें व दोन्ही फुफ्फुस्सांत पाणी होणें) झाला होता. डॉक्टरांचें म्हणणें पडलें की १० तारखेला सायंकाळीं ह्यांथुंग-ला येथें जेव्हां या रोगाची प्राथमिक लक्षणें दिसून आली, तेव्हांच मी ताबडतीब विश्रांती घ्यायला हवी होती. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें मी जिवंत होतो, हें एक आश्चर्यच होतें. मला संपूर्ण विश्रांती मिळावी यासाठीं डॉक्टरांनीं माझ्या खोलीबाहेर एक सैनिक बसवला व कुणालाहि मला भेटायला द्यायचें नाहीं, हें काम त्याला दिलें होतें.

मी जेव्हां नंतर परत तेजपूरला गेलो, (२९ ऑक्टोबरला बरा झाल्या-नंतर) तेव्हां मला सांगण्यांत आलें, कीं थाग-ला भागांत चिनी, तटबंदी व शिबंदी वाढवीत होते. पॅराशूटद्वारें टाकलेल्या आमच्या बंदुकांपैकीं कांहीं इकडे निकामी होत होत्या, तर तिकडे जनावरांच्या पाठीवरून थाग-ला मार्गें चिनी बंदुका आणीत होते. आमच्यापैकीं कांहीं तज्ञांनीं सांगितलें होतें, कीं इतक्या उंचीवर आपलीं जनावरें चढूं शकत नाहींत व आम्ही तें मानीत आलों होतों. थाग-लाच्या उत्तरेस लीपर्यंत १० मैलावर चिन्यांना उत्तम पक्का रस्ता होताच. ते जेव्हां आपल्या प्रदेशांत पुढें घुसले, तेव्हां त्यांच्या लक्षांत आलें असेल, कीं तोवांग ते झिमिन थांग हा ३५ मैलांचा आमचा रस्ता, म्हणजे केवळ मळवाट होती. झिमिनथांग ते पूल क्र. १ हा १५ मैल रस्ता व पूल क्र, १ ते पूल क्र. ५ हा सात मैलांचा रस्ताहि मळवाटाच होत्या. चांगला रस्ता सुरू होत होता तो तोवांगपासून व तोवांग होतें साठ मैलांवर.

हा तोवांगपर्यंतचा रस्ताहि नुकताच पुरा झाला होता. हें काम पांच वर्षांपूर्वीच चिन्यांप्रमाणें करायला हवें होतें. आम्ही उशीरा जागे झालो होतो व ते देखील हळूहळू. चिन्यांची ही तयारी (तिबेटपासून आपल्या सरहद्दीपर्यंत) १९५५ मध्येंच सुरू झाली होती.

चिन्यांनीं त्सांगली समोरचें डमडमला हें ठिकाण ताब्यांत घेतलें होतें, व तिथें एक बटालियन १७ तारखेला दाखल झालेली होती. १७ तारखेला डमडम-ला येथून पुल क्र. ५ च्या दिशेनें चिन्यांनीं टेहळे धाडले. पुल क्र. ५ वरील आपल्या सैनिकांनीं गोळीबार केला व एक चिनी ठार झाला. त्याला पुरण्यापुर्वी लक्षांत आलें, कीं तो सैनिक नव्हता, तर राजकीय ' कमिसार ' असावा. १९ तारखेला २००० चिनी,थाग-ला कडून त्सांगलीकडे निघाल्याची बातमी आली. ब्रिगेडियर दळवी यांची कल्पना झाली, कीं त्सांगली हें चिनी सैन्याचें पुढचें उद्दिष्ट दिसतें. आतां बर्फ पडायला सुरुवात झाली असल्यानें मेजर जनरल निरंजनप्रसाद यांचेकडून त्यांची ब्रिगेड लुंपू येथें २५ ऑक्टोबरपर्यंत मागें घ्यावी अशी परवानगी मिळवली.

## २० ऑक्टोबर

या दिवशीं सकाळीं मी लवकर जागा झालों; आणि एकदम अतिशय आजारी वाटूं लागलें. सकाळचे नऊहि झाले नसतील, तोंच माझ्या टेलिफोनची घंटा घणवणली. तेजपूरहून ब्रिगेडिअर सिंग बोलत होते. त्यांनीं सांगितलें कीं, दुःखदायक गोष्ट आहे, कीं चिन्यांनीं ७ ब्रिगेडच्या धोला भागांतील फळीवर, पहांटे पासून प्रचंड हल्ला चढवला आहे. हातघाईची लढाई अजून चालूं आहे व सर्व तपशील अजून कळलेला नाहीं. पुनः दिवसभर फोन करून पुढची हकिगत कळवतो, असें ते म्हणाले. मी इथें आगतिक, अतिशय आजारी स्थितींत असतांना तिकडे माझे सैनिक या रणदिव्यांतून जात होते.

नंतर मला समजलें, कीं पहाटें ४ वाजतां त्सांगली येथून चिन्यांनीं कांहीं गोळीबार केला. ४–३० वाजतां पूल क्र. ४ च्या समोर चिन्यांचा जो मोर्चा बांधलेला होता, तेथून 'दोन लाल गोळे' उडवण्यांत आले. हल्ला सुरूं करण्याची ही सूचना होती. (शत्रू हा हल्ला दिवसभरांत केव्हांहि सुरू करूं-

शकतो परंतु सर्वसाधारणपणें दिवस फुटण्यापूर्वी किंवा दिवस मावळल्या नंतर हल्ला करण्यांत येतो. कारण एकतर विरुद्ध पक्ष सकाळच्या कामांत गुंतलेला असतो किंवा सायंकाळ झाली असेल, तर विश्रांतीला जाण्याची तयारी करीत असतो.) पाठोपाठ उखळी तोफांतून व तोफांतून पुल क्र. ३ व ४ या दिशेनें व त्सांगधर दिशेनें सरबत्ती सुरू झाली व चिन्यांनीं नामकाचू नदी पुल क्र. ३ व ४ यांच्या दरम्यान अनेक ठिकाणीं उजाडतांच ओलांडली.

जे चिनी रेजिमेंट आदल्या दिवशीं त्सांगलीकडे जातांना दिसलें होतें. तेंच त्सांगधर चढूं लागले. ८–३० वाजतां चिनी या ठिकाणांच्या अगदीं खालीं पोहोंचले. अधिक संख्येनें व अधिक शस्त्रसंभारानिशीं मग चिन्यांनीं पुल क्र. ३ व ४ येथील आपल्या तटबंदीवर दमदार चढाई सुरू केली. थोड्याशा लढाईनंतर त्यांनी या पुलांचा कबजा केला. ( येथें २ रजपूत व १।९ गुरखा बटालियन होती. )

सकाळी ७ वाजतांच ब्रिगेडिअर दळवी यांनीं पूल क्र. २ व ३ यामध्यें ठेवलेलें ब्रिगेड हेडक्वॉर्टर्स, चिन्यांनीं व्यापलें. प्रत्यक्ष डोळ्यांनीं हें पाहिलेल्या माणसांकडून मला समजलें कीं, हें ठाणें नीट तयारीचें नव्हतें. उघड्यावर पॅराशूट पसरून पावसापासून आडोसे निर्माण केलेले होते. कांहीं थोडेसे खंदक खणलेले होते; परंतु संरक्षक अशी तयारी जवळ जवळ नव्हती.

आपली दळणवळणाचीं सर्व साधन व्यवस्था सकाळींच अनेक ठिकाणीं तोडण्यांत आली. पुलावरील बिनतारी यंत्रें, सकाळीं ६ लाच बंद करण्यांत आलीं. ८ वाजतां आसाम रायफलसमधील दोन माणसें, पूल क्रमांक २ येथें पोहोंचली व त्यांनीं तेथील ९ पंजाब यांना सांगितलें, कीं पुल क्र. ३ व ४ हे शत्रूच्या हातीं पडले असून, खिझमानेहि तोंपर्यंत शत्रूनें ताब्यांत घेतलें होतें.

९ पंजाबचे टेहळे पूल क्र. २ व ३ कडे गेले होते ते ९ वाजतां परत आले. व त्यांनीं सांगितले आपला ब्रिगेड हेडक्वार्टर अदृश्य झाला असून, तो भाग चिन्यांनीं भरून गेला आहे.

## त्सांगधरची लढाई

चिन्यांनीं या ठिकाणीं तोफांनीं, पहाटें पांचपासून हल्ला सुरू केला.

आपल्या तोफांनीं प्रत्युत्तर दिलें; परंतु आपला दारूगोळा कमी पडला. लगेंच चिन्यांनीं त्सांगधर ठाण्यावर चढाई केली. तिथली 'दुर्बळ गुरखा कंपनी' ही तोफांच्या जागा झुंझवीत होती व त्यांनीं प्रखर प्रतिकार केला. मध्यंतरी, ४ डिव्हिजननें एक बिनतारी यंत्र घेऊन, एक हेलिकॉप्टर या भागांत धाडलें. हेलिकॉप्टर खालीं उत्तरलें तों सगळीकडे चिनी पसरलेले. वैमानिक फ्लाईट लेप्टनंट सहगल याला बहुधा चिन्यांनीं गोळी घालून ठार मारलें व हेलिकॉप्टर ताब्यांत घेतलें. सकाळीं ११ वाजण्यापूर्वींच त्सांगधर पडलें.

येथून शत्रू कार्पोला (१) मार्गें लुंपूकडे निघाला. तिथें ते २१ तारखेला दुपारीं पोहोंचले. त्याच दिवशीं चिनी सैन्य पूल १ ते ४ ओलांडून हाथुंग-ला व खिझमाने येथें पोहोंचले. लुंपुला ते अनेक मार्गांनीं गेले. त्यांनीं लुंपू व खिझमाने येथून २२ तारखेला मुक्काम हलवला व शक्ती मार्गें ते तोवांगकडे निघाले.

त्सांगत्सी येथून आपल्या कंपनीनें ताशी गोंग झोंग, या भूतानमधील ठिकाणीं माघार घेतली. मेजर जनरल निरंजनप्रसाद हे सर्व ब्रिगेडला लुंपू येथून आज्ञा देत होते; कारण ब्रिगेड कमांडर पकडला गेला होता.

निरंजनप्रसाद यांनीं आज्ञा दिली, कीं ९ पंजाबनें हाथुंग-ला येथें माघार घ्यावी. २१ तारखेला सकाळीं हाथुंग-ला पडले व ९ पंजाब बटालियन येथें मागें येऊन, तेथून ताशी, गोंग झोंग येथें आली. ग्रेनेडियर, गुरखा व रजपूत या सर्वांना, १६०००–१७००० फूट उंचीवरून, अपुऱ्या प्रावरणांत कडाक्याच्या थंडींत मागें वाटचाल करावी लागली. पोटांत अन्न नव्हतें, जीवघेण्या माघारींत अनेक जण आजारी पडत होते. अशा स्थितींत या सर्व बटालियन्सनीं काढता पाय घेतला. ब्रिगेडची बहुतांशी माणसें ७ नोव्हेंबरला धरंगा येथें पोहोंचली.

## २२ ऑक्टोबर

लेफ्टनंट जनरल सेन हे २२ ऑक्टोबर १९६२ ला तोवांग येथें पोहोंचले. ते तेथें पोहोंचतात तोंच, तोवांग व जांग वर, सुमारें एक डिव्हिजन सैन्यानिशीं चिन्यांनीं खालील ठिकाणी हल्ला चढवला.

अ) लुम-ला कडून तोवांगवर

ब) बुम-ला कडून तोवांगवर

क) खिझमाने कडून तोवांगवर

ड) तुम-ला कडून जाँगवर

लेफ्टनंट जनरल सेन यांनीं तोवांग येथील शिबंदी, जांगच्या दक्षिणेस काढून घेण्याचा हुकूम दिला. कारण हें सैन्य वेढलें जाण्याचा व खलास होण्याचा धोका निर्माण झाला होता. सेन यांनीं घाईघाईनें तोवांग सोडलें. (प्रतिकाराशिवायच शत्रूनें २५ तारखेला तोवांग घेतलें. मी इकडे दिल्लीला आजारीच होतो.)

चिनी व पाकिस्तानी रेडिओवरून असें हलकटपणें सुचविण्यांत आलें, कीं मी व इतर कमांडर, यांनीं रणांतून पळ काढला. यांतील उपरोध असा, कीं माझ्याच कांहीं देशबांधवांनीं या प्रचाराचा फायदा राजकीय व खासगी कारणासाठीं उठवला. त्यांनीं हीं असत्यें उचललीं व वडवानल पसरावा तशी ती सर्वत्र पसरवलीं; जणू हे शत्रूचेच हस्तक होते. अशा वेळीं सर्वांनीं एक आवाज न उठवतां, या आणीबाणीच्या वेळीं, जनतेंतील कांहीं-जणांनीं व वृत्तपत्रांनीं, नेहरू, मेनन व मला या परिस्थितीला जबाबदार धरलें व अवहेलना सुरू केली.

कांहींनीं तर असें सांगण्यास सुरुवात केली, कीं चिन्यांना अंगावर घ्यावें असा सल्ला सरकारला मीच दिला. इथेंच न थांबतां पुढें असेंहि सांगितलें गेलें कीं ४ कोअरचा कमांडर म्हणून माझी नियुक्ति झाल्यानें, माझ्या सैनिकांचें मनोधैर्यच खचलें. (मी यावेळेपर्यंत फक्त पंधराच दिवस कमांडर म्हणून काम केलें होतें व बाकीचे सर्व त्या क्षेत्रांत याहून पुष्कळ काळ कमांडर म्हणून होते. माझ्या नेमणुकीनें हजारों सैनिकांचें मनोधैर्य रातोरात तर खचूं शकत नाहीं ?)

एका वृत्तपत्रानें बातमी दिली कीं नेफाची लढाई अंथरुणावरून आजारी अवस्थेंत मी चालवीत होतो. मी आजारी असतांना त्सांगली येथील ठाण्या-संबंधीं, फक्त एक आज्ञा पाठविली. तें कांहीं असलें तरी मी आजारी पडल्यानंतर पांचव्याच दिवशीं लेफ्ट. जनरल हरबक्षसिंग, याची माझ्या जागीं हंगामी नेमणूक झालेली होती.

मला घरांतच अटक करून ठेवल्याची खोटी बातमी पसरवली गेली, हा

अगदीं दुष्टपणाचा कळस झाला. (ज्यांनीं माझी बदनामी करणारे हें दुष्कृत्य केलें, त्यांनीं त्यांच्या इच्छेप्रमाणें माझी प्रतिमा डागळण्यास यामुळें मदत केली असली, तरी या प्रकारानें त्यांनीं आपल्या जनतेचें व विशेषत: आपल्या सैन्याचें मनोधैर्य खचवून ऐन युद्धांत शत्रुलाहि मदत केलेली आहे. यापेक्षां ते स्वत: आघाडीवर जाते व कांहीं ना कांहीं करते, तर त्यांच्या देशभक्तीचा पुरावा मिळाला असता व भारताची अधिक चांगली सेवाहि त्यांचे हातून घडली असती.)

## २३ ते २५ ऑक्टोबर

नेहरू व मेनन हे मला पाहण्यासाठीं २३ तारखेलाच असावें, माझ्या घरीं आले. माझ्या प्रकृतीची चौकशी केल्यानंतर त्यांनीं मला व्यक्तिगत नात्यानें, चिन्यांना आपल्या प्रदेशांतून हांकलण्यासाठीं काय उपाय योजावें तें सूचवण्यांस सांगितलें. मी तीन प्रत्यक्ष सुचना केल्या.

१) हिमालयामधील प्राप्त परिस्थिति लक्षांत घेऊन सर्व ‘ कमांडची ’ पुनर्रचना करावी. (२) आपल्याला उपलब्ध असलेल्या साधनांनिशीं, पुरेसें मोठें सैन्यदल, ताबडतोब निर्माण करण्यांत यावें व (३) परकीय देशाकडून वा देशांकडून लष्करी मदत घेण्यांत यावी. या तिसऱ्या सूचने-बद्दल मेनन हे मला तितकेसे उत्सुक दिसले नाहींत परंतु ताबडतोब सैन्य वाढवण्याची सूचना त्यांनीं मान्य केली.

रणक्षेत्रावर आपल्या ढासळणाऱ्या परिस्थितीमुळें (तोवांग पडलें म्हणून?) किंवा इतर कशामुळें असेल, परंतु नेहरू व मेनन यांना या गोष्टींचा फेर-विचार करणें भाग पडलें असावें. मेनन हे २६ तारखेला पुन: आले व त्यांनीं माझ्या सूचना लवकरांत लवकर लेखी मागितल्या. मी अंथरुणावर पडल्या पडल्या कांहीं तज्ञांच्या सल्ल्यानें आणखी कोणत्या प्रकारच्या (डोंगरी) तुकडया उभ्या करायला हव्यात, लष्कराच्या अधिकार पदांची, फेररचना कशी करायला हवी, या संबंधी छोटासा प्रबंध तोंडी सांगितला; हा लेखी प्रबंध मंत्रीमंडळ खात्याचे सचिव खेरा यांनीं स्वत: माझें घरीं येऊन नेला. यानंतर मी बाहेरच्या देशांतून काय सामुग्री व शास्त्रास्त्रें आणवी लाग-तील, त्यांची यादी तयार केली. सरकारनें सैन्यवाढहि केली व परदेशांतून लष्करी मदतहि घेतली, परंतु हे सर्व फार उशीरा केलें. जर नेहरू, मेनन

व इतर कांहींनीं वेळच्या वेळीं सैन्याच्या आग्रहाप्रमाणें, या बाबतींत कांहीं केलें असतें, तर इतिहास निराळा सांगावा लागला असता.

(परदेशांतून लष्करी मदत घ्या ही माझी सूचना, मी नेहरू, मेनन यांना केल्यानंतर संरक्षण खात्याचे उत्साही संयुक्त सचिव सारिन यांनीं, अगदीं स्वतंत्रपणें परराष्ट्रखात्याचे सचीव एम्. जे. देसाई यांचेकडे असें बोलणें केलें, कीं नेहरूंनीं जगांतील सर्व राष्ट्रांना आपल्या देशाला या गंभीर स्थितींत मदत करण्याचे आवाहन करावें. नेहरूंनीं सर्व राष्ट्रांना पाकिस्तान-सह हें आवाहन केलें. अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया व इतर कांहीं देशांनीं प्रतिसाद देऊन लष्करी मदत पाठविण्याचें मान्य केलें; व सुमारे ७५ देशांनीं आपला नैतिक पाठिंबा व्यक्त केला. या मदतीनुसार आलेलीं सामुग्री व शस्त्रास्त्रें आपल्या तुकड्यांना व विभागांना वांटून, ती नेफा, लडाख, येथील सैनिकांच्या हातीं सांगण्यासारख्या संख्येनें जाईपर्यंत, व त्याचा सराव होईपर्यंत लढाई संपली ! )

१९ ते २४ ऑक्टोबर या दरम्यान थापर मला तीन चार वेळां भेटायला आले. त्यांनीं सुचवलें, कीं मी 'चीफ जनरल स्टाफ' या जागेवर पुनः यावे. माझें असें मत होतें, कीं प्रत्यक्ष आघाडीवरील कामगिरी स्वीकारल्यावर लगेंच मी ती सोडली, तर त्याचा अर्थ मला ही शिक्षा करण्यांत आली किंवा मी आघाडीवर जाण्याचें टाळलें असा होईल. तेव्हां हें शक्य नाहीं, असें मी सांगितलें. थापर यांना हें पटलें.

## २६–२९ ऑक्टोबर

२८ तारखेला इंद्रजितसिंग यांनीं मला घरांत चालण्याची परवानगी दिली व मी तेजपूरला गेल्यावर डोंगर वगैरे चढणार नाहीं या अटीवर मी २९ तारखेला विमानानें तेजपूरला निघालो. प्रकृति पुरेशी सुधारलेली नसतांना पुनः कामावर रुजूं होणें, हेंच माझ्या दुष्ट टीकाकारांना या परिस्थितींत उत्तर होतें. माझा आजार किंवा माझी त्यानंतरची विश्रांति यामुळें कांहीं धोला, तोवांग, सेला, बोमडीला, वालाँग या भागांत आपला मोठा पराभव झालेला नव्हता. या भीषण पराभवाचीं कारणें अधिक खोल होती. तीं कांहींना माहित होतीं; परंतु त्यांनीं या कारणांकडे मुद्दाम दुर्लक्ष केलें.

मी तेजपूरला माझ्या प्रमुख कचेरींत आलों, तेव्हां निरंजनप्रसाद माझी वाट पाहात होते. त्यांना ताबडतोब दिल्लीला येण्यास सांगितलेलें होतें. परंतु माझी गांठ घेतल्याखेरीज ते जाण्यास तयार नव्हते. त्यांना संताप आलेला होता. त्यांनीं मला विश्वासानें सांगितलें, कीं लेफ्टनंट जनरल सेन यांनीं त्यांच्यावर गंभीर अन्याय केलेला आहे. सेन यांनीं सेनाप्रमुखांना असा अहवाल पाठवला होता, कीं त्यांचें ठिकाणीं नुकत्याच झालेल्या लढाईंत नेतृत्व कमी पडलें व यामुळें त्यांच्याकडून कमांड काढून घेण्यांत आली होती. (मी एवढें म्हणूं शकतों, कीं जोंपर्यंत निरंजनप्रसाद माझे बरोबर होते, तोंपर्यंत तरी हे दोष मला आढळले नाहींत.)

निरंजनप्रसाद यांनीं मला त्यांचें लेखी निवेदन दिलें व तें मी त्यांना अनुकूल शेरा मारून वर पाठविलें. त्यांनीं शेवटीं राष्ट्राध्यक्षांची भेट घेतली व सैन्याचे सुप्रीम कमांडर या अधिकारांत, त्यांना दोषमुक्त ठरवण्यांत येऊन त्यांची नेमणूक चीफ ऑफ स्टाफ म्हणून झाली.

## २९ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर

'न्यूयॉर्क टाईम्स' नें १३ ऑक्टोबर १९६२ च्या अग्रलेखांत म्हटलें होतें—'भारताचे अतिशय कार्यक्षम व कणखर सेनानी लेफ्टनंट जनरल कौल यांना नेफांमधील विशेष कोअरचे कमांडर नेमण्यांत आले आहे.' पुन: २९ ऑक्टोबर १९६२ च्या अंकांत या पत्रानें लिहिलें—'कौल यांची धाडसीपणा, व्यवहारकुशलता व अमाप उत्साह, यासाठीं ख्याति आहे.'

## ३० ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर

वैद्यकीय सल्ला बाजूस ठेवून, मी वॉलॉंग व त्सेला या ठिकाणीं जाऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली.

कृष्ण मेनन यांनीं भारतीय व परकीय वार्ताहरांना, नेफांतील आघाडी-वर जाण्यास बंदी कां करावी हें मला समजत नाहीं. पुष्कळांनीं मला परवानगी देण्यासाठीं विनंती केली. मी ही दिली असती तर तें 'सरकार' च्या धोरणाविरुद्ध झालें असतें. मेनन यांनीं ही जातीनें दिलेली आज्ञा होती. आपला जीव धोक्यांत घालूनहि देश परदेशांतून आलेल्या या वार्ताहरांना, प्रत्यक्ष आघाडीवरील आपल्या हालचाली पाहण्याची जबर इच्छा होती. मी यामुळें मेनन यांची आज्ञा धाब्यावर बसवून कांहीं

वार्ताहरांना आपल्या आघाडीकडे जाऊं दिलें. ' टाईम ' या पत्राचा वार्ताहर एडवर्ड बेर, ज्याचे पायमोजे तो झोपला असतांना आदल्या दिवशींच तेजपूर येथें गाईनें खाल्ले होते, हाहि त्यांत होता. आपल्या आघाडीवर जाऊन आल्यानंतर त्यानें लिहिलें: ' सैन्य व वाहनें यांची परीक्षा पहाणारी ही भूमी सैतानी कल्पनेंतहि आकार घेऊं शकणार नाहीं अशी होती.'

बेर हा दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं भारतीय सैन्यांत ब्रिटिश अधिकारी-म्हणून तीन वर्षें होता.

पुढें मी स्वत: होऊन भारतीय सेनेंतून निवृत्त झाल्याचें कळतांच बेर यानें मला लिहिलें--

' जे ऑक्टोबर नोव्हेंबरमध्यें भारतांत होते व ज्यांना, तुमच्या पुढल्या कठीण समस्यांची तुमच्या जनरल म्हणून कर्तृत्वाची कल्पना आहे, त्यांना हें माहीत आहे, कीं त्या परिस्थितींत तुम्ही केलेंत त्यापेक्षां अधिक कुणी कांहीं करूं शकला नसता.'

## ८ नोव्हेंबर

या ठिकाणीं मला ही गोष्ट सांगितलीच पाहिजे, कीं यापूर्वी जेव्हां मी लष्करी हालचालीचे आराखडे तयार केले, तेव्हां ब्रिगेडियर के. के. सिंग यांनीं मला अमूल्य साहाय्य केलें. याशिवाय पुढें जेव्हां जेव्हां कठीण परिस्थिति निर्माण झाली तेव्हां तेव्हां ते मला मोठे आधारस्तंभ ठरले.

८ नोव्हेंबरला मी आर्मी हेडक्वार्टर्स व ईस्टर्न कमांडला जी माहिती पाठविली त्यांत माझ्या आघाडीवर निर्माण होणाऱ्या ३ संकटांचा उल्लेख होता.

अ) शत्रू तोवाँग भागांत दोन डिव्हिजन सैन्य एकत्रित करण्यांत गुंतला असून तो सेला येथील आपल्या मोर्चाला पूर्व पश्चिम दिशेनें चिमटयांत पकडून बगल देण्याचा संभव आहे

ब) माचूका विभागासमोरहि शत्रू तयारींत असून तेथील आपलें ठाणें वेगळें पडण्याचा धोका आहे.

क) वलाँग हयुलियाँग ठाण्यांविरुद्धहि शत्रू एक डिव्हिजन सैन्य एकवटत आहे.

वलाँग वर ७ नोव्हेंबरला चौथ्यांदा हल्ला झाल्याचेंहि मी कळवलें होतें.

हें कळवूनहि आर्मी हेडक्वार्टर्स हे दोन कारणांनीं मला जादा कुमक पाठवूं शकत नव्हतें. दोन डिव्हिजन सैन्य अधिक हवे होते. मला फक्त १७ नोव्हेंबरला एक अधिक ब्रिगेड देण्यांत आली. (एक डिव्हिजन नंतर आली परंतु फार उशीरा. सेला व बोमडीला पडल्यानंतर) कारणें अशी होती.

सरकारनें थापर यांना पंजाब किंवा काश्मीरमधील पाकिस्तानी सरहद्दीवर तुकड्या काढून नेफाकडे धाडण्यांस परवानगी नाकारली होती. दुसरी गोष्ट म्हणजे आर्मी हेडक्वार्टर्स जवळ नवीन डिव्हिजनला देण्यासाठीं, जादा रस्ते वहातुकीचीं साधनें किंवा विमानें नव्हतीं.

८ नोव्हेंबरची माझी तांतडीची गरज होती, कीं रोज आकाशमार्गानें २६० टन पुरवठा २ व ४ डिव्हिजनना करावा. पुढें मिसामारी ते सेला यांचे दरम्यान ने-आण करण्यासाठीं चार दिवस लागत. या मार्गावर एक टनी १२०० लॉऱ्या हव्या होत्या. या ऐवजीं माझ्यापाशीं होत्या फक्त एक टनी ३०० गाड्या व आकाशमार्गानें फक्त ६० ते ८० टन पुरवठाच होऊं शकत होता. यामुळें आमची आघाडी मजबूत करण्याचें काम अगदीं मंद गतीनें चालूं होतें.

## ९ ते ११ नोव्हेंबर

डिव्हिजन २ व ४ यांना मी कमांडरच्या नांवानें दोन लष्करी कारवाई संबंधीं सूचना पाठविल्या. शत्रूची अशी संवय दिसते, कीं जिथें आपले मोर्चे आहेत तिथें समोरून आपल्याला लढाईत गुंतवायचें व मुख्य हल्ला मागच्या बाजूनें चढवावयाचा. याच वेळीं मागल्या भागांतून दळणवळण तोडीत आणायचें. माझा असा अंदाज होता, कीं तोवाँग हें मुख्य उद्दिष्ट आतां साध्य झालेलें असल्यानें, तिथली फळी पक्की करून शत्रू तोवाँगचू नदीच्या दक्षिणेस सरकेल; त्यांचे पुढचें उद्दिष्ट बिमडी-ला राहील. मी असा अंदाज शत्रूच्या हालचालीसंबंधीं व्यक्त केला कीं—

अ) शत्रू आपल्या नूरनाग जवळच्या सैन्याला कोंडींत पकडून, सेला येथील आपल्या सैन्याला भिडायचा प्रयत्न करील.

ब) सेगे येथें आपलें दळणवळण तोडून सेलावर पिछाडीकडून हल्ला करील.

क) दिरंग जाँगचा कबजा करील.

ड) ला-थुंगरी झोंगच्या बाजूनें बोमडीला ताब्यांत घ्यायचाहि प्रयत्न करील.

जवळ जवळ असेंच घडलें.

मी त्याला (कमांडरला) अशी आज्ञा दिलेली होती, कीं त्यानें नूरनाग वरचा कबजा सोडूं नये व तोवांगचू नदीची कडा, सेला व बोमडी-ला यांचेंहि रक्षण करावें. मी असाहि आदेश दिला, कीं सेलाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर एकदोन ठिकाणीं वाहनांची पथकें ठेवावीं, म्हणजे या भागांत कुणीं एखाददुसरें घुसलें तर त्याचा निकाल लावतां येईल. बोमडी-लाच्या सर्व वाटा पश्चिमेकडून व उत्तरेकडून रोखण्यांत याव्या असाहि मी हुकुम केला.

वलाँग वर हल्ला होण्याचा संभव असल्यानें तिथें विमान उतरण्याच्या ज्या जागा होत्या, त्या दिसूं नयेत यासाठीं काळजी घेण्याची आवश्यकता होती. दळणवळण बांधलें गेलें, कीं वलाँग येथें दोन ब्रिगेड सैन्य एकवटण्याचा माझा विचार होता.

माझ्या आधिपत्याखालीं नेफा भागांत नोव्हेंबर १९६२ मध्यें ज्या लढाया झाल्या, त्यांचें वर्णन मी आतां देतो. आपला चिन्यांशीं जो संघर्ष उडाला, त्यांतून शेवटीं खालील सत्यें उजेडांत आलीं. त्यांच्याजवळ तिबेटांत व आपल्या सरहद्दीच्या कडेनें खूपच सैन्य उपलब्ध होतें व त्या मानानें भारता-जवळ इतरत्र किंवा सरहद्दीजवळ सैन्यसंख्या कमी होती. त्यांचे डावपेंच व त्वरेनें केलेल्या हालचाली, या अधिक खंबीर अशा होत्या, त्यांची शस्त्रास्त्रें, सामुग्री व दळणवळण व्यवस्था विशेषतः संदेश वहातूकीची व्यवस्था ही आपल्यापेक्षां उत्तम होती. यामुळें त्यांना त्यांच्या ठाण्यावर कुमक पाठविणें जलद गतीनें करतां येत असें. या अशा सर्वांगीण वरचढ-पणामुळें त्यांचा जय झाला !

## वलाँगची लढाई

वलाँग हे नेफाच्या पूर्व टोंकाला जिथें भारत, तिबेट व ब्रह्मदेश यांच्या सरहद्दी भिडतात तेथून जवळच आहे. तेजूच्या उत्तरेस १०० मैलांवर हें ठिकाण असून, तेजू येथेंच रस्ता संपतो. ५००० ते ६००० फूट

उंचीवर हें ठिकाण असून आसपासच्या शिखरांची उंची १०,००० ते १५,००० फूट आहे. ११ ब्रिगेड, (२ डिव्हिजनमधील) यांत ४ शिख, ६ कुमाँव व ३।३ गुरखा बटालियन होत्या, ही या ठिकाणीं ठेवण्यांत आलेली होती. या शिबंदीविरुद्ध चिन्यांच्या प्रथम दोन व नंतर ३ ब्रिगेड विरुद्ध ठाकलेल्या होत्या, सुरुवातीपासूनच चिन्यांनीं या ठाण्यावर हल्ले चढवले होते परंतु आतांपर्यंत हें ठाणें उत्तम रीतीनें झुंजत होतें.

मी १२ तारखेला वलाँग येथें विमानानें जायला निघालों. तिथें महत्त्वाची लढाई सुरू असल्याचें कळलें होतें. माझ्याबरोबर लेफ्टनंट कर्नल व्होरा होते.

मी विमानांतून खालीं पाऊल ठेवतों, तोंच भूपट्टींपासून २०० यार्डांवर मोठा स्फोट झाला. एक तोफगोळा पॅराशुटनें खालीं टाकण्यांत आला होता परंतु छत्री उघडली न गेल्यानें, तो जमिनीवर आदळून स्फोट झाला होता. मी तिथून ४ शीख बटालियनच्या मुख्य ठाण्याकडे गेलो. तिथें जवळच लढाईला तोंड लागलेलें होतें; व त्याचे आवाज आसपासच्या टेकड्यांतून सर्वत्र घुमत होते. शीख बटालियनची एक कंपनी पुढें टेहळणीवर फिरत असतांना, त्यांची मोठ्या संख्येनें असलेल्या चिन्यांशीं गांठ पडली होती. या झटापटींत आपलीं दोन माणसें ठार झालीं व सात जखमी झालीं. या जखमींना स्ट्रेचरवरून परत आणलेलें मी पाहिलें. सर्वांना लहान लहान काडतुसांच्या जखमा झाल्या होत्या; व ते विव्हळत होते. रुग्णालयांत पाठवण्यापूर्वीं त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यांत आले. अनेक तास खडकाळ जमिनीवरून त्यांना हिंदकळत आणलेले होते.

शीख टेहळे इकडे या लढाईंत गुंतलेले असतांना, एक कंपनी 'त्रिजंक्शन' हें ठिकाण ताब्यांत घेण्यासाठीं धाडली. या कंपनीवर शत्रूनें भडिमार केला परंतु अखेर इथें पाय रोवण्यांत कंपनीला यश मिळालें. मग या ठिकाणाहून व वलाँग येथून व जवळच्याच डोंगर विभागांतून चिन्यांवर उखळी तोफांचा भडिमार आम्ही सुरू केला. मिळालेलें हें यश फायद्यांत पडावें याकरतां ब्रिग्रेडनें ६ कुमाँव या बटालियनला, २ कंपनी तिथें धाडून त्रिजंक्शन येथील शिबंदी अधिक बळकट करण्यास सांगितली.

रात्र वलाँग येथेंच काढून मी अलाँग मार्गें सकाळीं तेजपूरला आलों. १४

तारखेला सकाळीं चिन्यांनीं वलाँगमधील महत्त्वाच्या भागावर हल्ला चढवला व त्यांनीं कांहीं भागाचा कब्जा केल्यानें, त्रिजंक्शनपर्यंत आम्हांला माघार घ्यावी लागली. जर शत्रू असाच पुढें आला, तर वलाँग येथें विमान उतरण्याची भूपट्टी धोक्यांत येणार होती. या परिस्थितीची मला फार काळजी वाटूं लागली. असें झालें तर त्या भागांत आपली स्थिति दारुण होणार होती.

सेला विभागांत शत्रूचा हल्ला होण्याचा धोका ताबडतोब आहे असें कळलेलें नव्हतें; तिथें मी नुकताच जाऊनहि आलेलों होतों; तेव्हां मी विचार केला, कीं वलाँग येथें चालू असलेली लढाई पाहायला जावें हें बरें. मला भेटायला आलेले माझे उपअधिकारी मेजर जनरल धीलाँ यांचेसह मी १५ तारखेला दुपारीं विमानानें तेजू येथें गेलों व हवा चांगली नसल्यानें रात्र तेथेंच घालवली. १६ नोव्हेंबरला पहांटें पुन: विमानानें निघालों, तो वलाँगला पांच वाजतां पोहोंचलो. तेथें लढाईची धुमश्चक्री चालूंच होती. जवळच उखळी तोफांचे व बंदुकांचे आवाज गर्जत होते. चिन्यांनीं एक डिव्हिजन सैन्यानिशीं आमच्यावर हल्ला चढवला होता व आपल्या शिबंदींत त्यांनी पाचर ठोकली होती.

लगेचच धीलाँ हे वलाँगहून पुन: दिल्लीला परतले. मी मात्र मागें राहिलो.

११ ब्रिगेडच्या कमांडरनें ४ शीख बटालियनला लढत राहून, ठाणें झुंझवा असा हुकुम दिला. ४ डोग्रा ही बयालियन विमानानें या लढाईच्या गर्दीत वलाँग येथें तेथील सैन्याच्या दिमतीला पाठवण्यांत येत होती. तो सर्व प्रदेश त्यांना नवखा असल्यानें हे सैनिक बावरलेले दिसत होते.

वलाँग येथील शिबंदी ठाण्याचे नदीमुळें दोन भाग झालेले होते. उजवा कांठ व लगतचा प्रदेश या ठिकाणीं ३।३ गुरखा बटालियन होती. डाव्या कांठाला ४ शीख व ६ कुमाँव या बटालियन होत्या. ४ डोग्रा ही बटालियन ६ कुमाँव बटालियनला कुमक म्हणून धाडण्यांत आली होती. आपल्या तेथील महत्त्वाच्या विमानतळाचे रक्षण करण्याची तयारी केलेली होती.

मी ११ ब्रिगेडच्या मुख्य कचेरींत असल्यामुळें कमांडर व ११ ब्रिगेडचे ब्रिगेड मेजर, अशोक हंडू यांच्याशीं. कंपनी व बटालियनच्या कमांडराचीं प्रत्यक्ष रणक्षेत्रावरून होणारीं टेलिफोन संभाषणें माझ्या कानावर पडत

होतीं. ४ शीख व ३।३ गुरखा यांनीं आपल्या ठिकाणांपासून चिन्यांच्या रेटयापुढें माघार घेण्यास सुरुवात केल्यानंतर मेजर हंडू यांनीं बटालियनला लढत रहा, मागें हटूं नका, असे हुकुम सोडल्याचें मी ऐकलें. कांहींनीं ते मानले. कांहींनीं मानले नाहींत.

मला व डिव्हिजनल कमांडर यांना ब्रिगेड कमांडरला नैतिक पाठिंबा देण्यापलीकडे प्रत्यक्ष कांहीं करण्यासारखे नव्हतें. (आम्हीं या ठाण्यावर माणसें पाठवलीं होतींच, शिवाय बंदुका, उखळी तोफा, अशी अनेक प्रकारची मदत गेल्या कांहीं दिवसांत तेजू येथून–१५० मैलांवरून–पाठवली होती. चिन्यांनीं युद्धबंदी झाल्यानंतर यांतली पुष्कळशी शस्त्रास्त्रें परत केली !)

११ ब्रिगेडचे कमांडर ब्रिगेडियर रावली यांनीं १० वाजतां मला विचारलें, कीं वलाँग येथील ठाणें आतां डळमळूं लागलें आहे. तेव्हां माझ्या आज्ञा काय आहेत ? शत्रूची सरबत्ती हळूंहळूं ब्रिगेडच्या मुख्य कचेरीच्या जवळ सरकत असलेली मी पाहात होतोंच. मी डिव्हिजनल कमांडरच्या संमतीनें असें सांगितलें—

अ) शक्य तेवढा प्रयत्न, आहे ती फळी टिकवण्यासाठीं करण्यांत यावा.

ब) जर मागें हटावें लागलें तर दुसरी फळी लगेंच धरावी.

क) याच पद्धतीनें त्यानें शत्रूला, फळयांमागून फळया धरून पुढें सरकण्यास जास्तीत जास्त विलंब करावा.

माणसें काढून घेतांना, माघारीच्या वेळीं, अग्रक्रम कसा ठेवावा, या विषयींहि रावली यांनीं माझी आज्ञा घेतली. मी जो क्रम लावून दिला त्याला त्यांनीं संमति दिली.

११ ब्रिग्रेड ही आतां माघार घेऊं लागली होती. मी शेवटून दुसऱ्या विमानानें, ११ वाजायला कांहीं मिनिटें असतांना वलाँग सोडलें.

ब्रिगेड आतां हायूलियांगच्या दिशेनें मागें येत होतें. सेला भागांतून कांहीं बातमी नसल्यानें मी ती रात्र (१६।१७ नोव्हेंबरची) २ डिव्हिजनच्या मुख्य ठाण्यावर काढली. मी आर्मी हेडक्वार्टर्स व ईस्टर्न कमांड यांना संदेश पाठवून अधिक कुमक धाडण्यास विनंती केली. मी सूचना केली कीं, चिन्यांच्या व आपल्यांत इतकी तफावत आहे, कीं देशाच्या हितासाठीं ताबडतोब परदेशांतून लष्करी मदत घेण्यांत यावी. दि. १७ ला थापर तेजपूर येथें मला भेटायला

आले, तेव्हां मी ही सूचना तोंडीहि केली होती. थापर यांनीं दुसऱ्या दिवशीं नेहरूंजवळ याविषयीं बोलणें केलें. मला असें कळलें, कीं नेहरूंनीं अमेरिकेच्या स्टेट डिपार्टमेंटकडे तावडतोब एक संदेश धाडला. परंतु काय करणार ! लढाई चार दिवसांत संपलीच. (परंतु यानंतरहि आपण निरनिराळ्या परकीय देशांपासून लष्करी मदत घेतली नसती, तर १९६५ च्या भारत-पाक संघर्षांत आपली काय स्थिति झाली असती? किंवा आज काय झाली असती ?)

नेफांतील आपल्या सैनिकांजवळ पुरेशी खणण्याची साधनें नव्हती. स्वयंचलित व इतर अस्त्रांचाहि पुरवठा पुरेसा नव्हता. हेलिकॉप्टर्स कमी होतीं. यामुळें जखमींना हलवण्यांत विक्षेप आला. पॅराशूटपैकीं पुष्कळशा कापडी छत्र्या या उघडल्याच गेल्या नाहींत व यामुळें महत्त्वाच्या सामुग्रीचा नाश झाला. आपले पुष्कळसे सैनिकच रसदीच्या मोठमोठ्या पेट्या उभ्या चढणीवरून उंच भागीं नेण्यासाठींच रावत होते.

अजून सेला शांत असल्यानें मी हेलिकॉप्टर मधून १७ तारखेला सकाळीं पुन: वलाँगच्या दिशेनें निघालो. ब्रिग्रेड कुठे दिसते कां हें मला पाहावयाचें होतें. आम्ही हायुलियांगवरून पुढें आलो. हेलिकॉप्टरच्या एका खिडकींत एक कागदाचा कपटा अडकलेला होता व आंत येणाऱ्या जोराच्या वाऱ्यामुळें त्याचा मोठा आवाज होत होता. हा आवाज दूर उडणाऱ्या मशिनगनसारखा असल्यानें आमच्या हेलिकॉप्टर मधील कुणीतरी ओरडलें—

"आपल्यावर शत्रू गोळ्या मारीत आहे.' परंतु वैमानिकानें लक्ष न देतां हेलिकॉप्टर पुढें नेलें. वलाँगपासून १० मैलावर आम्हांला करड्या लोकरीचा शर्ट घातलेले ब्रिगेडियर रावली आमच्या हेलिकॉप्टरला हातानें खुणावतांना दिसले. खालीं एका मळवाटेवर नदीच्या कांठावर ते कांहीं सहकाऱ्यांच्या मध्यें उभे होते. तिथे उतरायला चांगली जमीन नसल्यानें वैमानिकानें हेलिकॉप्टर नदीच्या वालुकामय पात्रांत उतरवलें. मी धांवतच रावली यांचेपाशीं गेलो. त्या सर्वांना सुरक्षित पाहून मी श्वास टाकला. मी रावली व त्यांचे महत्त्वाचे निवडक सहकारी यांना खाण्यापिण्यासाठीं हायुलियांग येथें नेण्यासंबंधीं विचारणा केली. नंतर ते परत येऊं शकतील असें सांगितलें. परंतु रावळी यांनी अगदीं योग्य तेंच सांगितलें. ते म्हणाले, कीं

इतर लोकांबरोबर ते तिथेंच थांबतील. त्यांनीं कांहीं अन्न खालीं टाकण्याची विनंती केली, कारण आदल्या दिवसांपासून सर्वांच्याच पोटांत कांहीं नव्हतें. मी ह्यायुलियांगला परत येतांच हें काम केलें. मला तिथेंच संदेश आला कीं थापर व सेन इतक्यांत तेजपूरला येतील. मी तांतडीनें तेजपूरला परतलो.

मी वारंवार अगदीं आघाडीवरील ठिकाणांना भेटी देत असे, याबद्दल माझ्या कांहीं टीकाकारांनीं नापसंती व्यक्त केली आहे. माझ्या मुख्य ठाण्यावर राहूनच मला हालचालींचें योग्य तें नियंत्रण व एकसूत्रीकरण अधिक चांगलें साधतां आलें असतें असें त्यांचें म्हणणें. मला वाटतें जो खरा सेनानी असतो, त्याला मुख्य ठाण्यावर खुर्चीला चिकटून राहण्यापेक्षां अधूनमधून प्रत्यक्ष आघाडीवर जाणें आवडतें. यामुळें लष्करी हालचालींची प्रगति त्याला प्रत्यक्ष पाहता येते, शिवाय धोक्याच्या स्थितींत जातीनें वावरून, तो उदाहरण घालून देऊं शकतो. आपल्या सैनिकांच्या व कनिष्ठ कमांडरच्या वांटयाला येणारीं दिव्यें तो स्वतः अनुभवतो व आणीबाणीच्या लढाईंत तो सेनेचें मनोधैर्य टिकवून धरतो.

दुसऱ्या महायुद्धांत (फ्रान्समधील रणक्षेत्रांत जर्मनांविरुद्ध गाजलेले) जनरल पॅटन हे आपल्या हेडक्वार्टरपासून लढाईच्या वेळींहि दूर असत. यासंबंधीं ते एकदां म्हणाले—

'समुद्र किनाऱ्यावर जातीनें राहून हातानें होडया ढकलून, शत्रूचीं विमानें वर घिरटया घालूं लागलीं तरी संरक्षणासाठीं न पळतां, मी किनाऱ्यावर पाऊल टाकलेल्या आमच्या सेनेच्या चित्तवृत्ति शांत ठेवल्या. मी अठरा तास हेडक्वार्टरपासून लांब होतो. व ओलाचिंब झालेला होतो. कांहीं लोक म्हणतात, कीं आर्मी कमांडरने अशा गोष्टी करूं नयेत. माझा सिद्धांत असा आहे, कीं कमांडरनें आपलें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं आवश्यक तें सर्व केलें पाहिजे आणि या उद्दिष्टांचा ऐंशीं टक्के भाग हा असतो कीं आपल्या सैन्यांत मनोधैर्य निर्माण करणें.'

हें कांहींहि असलें तरी मी माझ्या मुख्य कचेरीपासून थोडा थोडा काळ दूर रहात असे व पुनः परतून एकसूत्रीकरणाचें व नियंत्रणाचें बिकट काम करीतच होतो.

## सेलाची लढाई

सेला हें शिबंदी ठाणें १४,००० फूट उंचीवर, सेला खिडीच्याच भोंवताली मुख्यतः होतें. हें ठिकाण तोवाँगच्या (१०,००० फूट) दक्षिणेस २५ मैलांवर व बोमडी-लाच्या (८५०० फूट) उत्तरेस ७५ मैलांवर होतें. दिरंगजाँग हें ठिकाण एका दरींत ६००० फूट उंचीवर होते. सेला व तोवाँग यांच्या दरम्यान नुकताच रस्ता बांधण्यांत आलेला होता.

थापर व सेन यांनीं २४ ऑक्टोबरला (मी या वेळीं दिल्लीला आजारी होतो.) तोवाँग खालीं करण्याचा निर्णय घेतला व सेला येथें फळी धरण्याचें ठरवलें. याला कारण सेला ही जागा अजिक्य आहे असें त्यांचें मत होतें. माझ्या उपाधिकाऱ्यांपैकीं ब्रिगेडिअर जनरल सिंग यांनीं माझ्या गैरहजेरींत असें सांगितले होतें, कीं तोवाँग नंतर चिन्यांविरुद्ध फळी उभी करायची ती सेला या ठिकाणीं न करतां बोमडी-ला येथें करावी. कारण बोमडी-ला येथील रसदीची वाहतुक व्यवस्था ही कमी अंतराची होती. शिवाय बोमडी-ला या ठाण्याला लष्करी डावपेंचाच्या दृष्टीने व सोयीच्या दृष्टीनें अधिक फायदे होते. परंतु सिंग यांचें म्हणणे ऐकून घेण्यांत आलें नाहीं.

सेला येथील ४ डिव्हिजनचे आधिपत्य करण्यासाठीं मेजर जनरल ए. एस्. पठानिया यांची निवड थापर यांनीं केली. पठानिया यांचा युद्धानुभव व कामगिरी उत्तम होती.

४ डिव्हिजनचें मुख्य ठाणें दिरंगजाँग येथें राहणार होतें व या डिव्हिजनमध्यें ४८,६२ व ६५ या ब्रिगेड होत्या.

४८ ब्रिगेड हें बोमडी-लाच्या रक्षणासाठीं, ६२ ब्रिगेड हें सेलाच्या रक्षणासाठीं व ६५ ब्रिगेड हें दिरंग जाँग येथें राहणार होतें.

३०१ ब्रिगेड हें शक्य तितक्या लवकर एकत्रित होत होतें.

सेला यथील ६२ ब्रिगेडचे कमांडर होते ब्रिगेडियर होशियारसिंग. यांचीहि युद्धांतील कामगिरी लक्षणीय होती. त्यांच्या दिमतीला तोफखाना व दारूगोळा व इतर सामुग्री परिस्थितींत शक्य होतो तेवढी देण्यांत आली होती.

तोवाँगचें ठाणें चिनी आतां बळकट करीत होते. तोवाँग-बूमला रस्ता त्यांनीं बांधत आणला होता, तो पुरा होतांच या भागांत त्यांनीं दोन डिव्हिजन सैन्य आणलेलें होतें.

शत्रूवर अधुनमधून आमची गोळीबारी चालू होती व टेहळे धाडले जात होते. माझें स्वतःचें मत होतें, की सेला वर हल्ला झालाच तर सेला हें अनेक दिवस, अधिक कुमक येईपर्यंत लढू शकलें असतें. कारण येथील सांठा चांगला होता. फक्त रसदीची अंतरें मोठीं होतीं हीच काय ती अडचण होती.

१७ तारखेला नौरनाग येथें चिन्यांनीं ४ गरवाल या बटालियनवर हल्ला केला. सेला खिंडीच्या उत्तरेस हें ठिकाण होतें. चौपट चिनी संख्या असूनहि गरवाल फलटण शौर्यानें (शर्थीनें) लढली व प्रत्येक हल्ला तिनें परतवला. शत्रूनें मग १ शीख बटालियनवर खिंडीच्या पूर्व भागांत हल्ला केला. गरवालइतकी चांगली ही शीख फलटण लढली नाहीं.

वलाँगहुन परतून १७ तारखेला सायंकाळीं ७॥ वाजतां मी जेव्हां तेजपूर यथील माझ्या खोलींत शिरलो, तेव्हां तिथें लेफ्ट. जनरल सेन, जनरल थापर व ब्रिगेडिअर पालिट हे माझी वाट पाहात होते. पाहुण्यांशीं हस्तांदोलन होतांच मला हें सांगण्यांत आलें, कीं सेला येथील परिस्थिति खराब झाली आहे. दुर्दैवें हीं कधीं एकटीं येत नसतात ! जनरल थापर म्हणाले, कीं मेजर जनरल पठानिया हे मला फोनवर थोडचा वेळापूर्वीं बोलावीत होते. थापर व सेन हे जेव्हां त्यांच्याशीं बोलूं लागले, तेव्हां पठानिया यांनीं सांगितलें, कीं चिन्यांचा प्रचंड रेटा घ्यानीं घेतां व शत्रू सेलाचा दिरंग जाँगशीं संबंध तोडण्याचा संभव आहे हें लक्षांत घेता, ६२ ब्रिगेड हे सेला मधून दिरंग-जाँग येथें मागें घेण्याची परवानगी मिळेल काय ? थापर व सेन यांनीं पठानिया यांना कांहींच आशा दिली नव्हती व कळवलें होतें, कीं या बद्दलचा निर्णय कौल हे मुख्य ठाण्यावर परतले कीं देतील.

मेजर जनरल पठानिया हे माझ्याशीं ७–४५ वाजतां फोनवरून बोलले. त्यांनीं पुनः पुनः विनंती केली, कीं १७।१८ नोव्हेंबरच्या रात्रीं ६२ ब्रिगेड ही सेला येथून मागें घेण्यास परवानगी द्यावी. त्याच रात्रीं सेला हे सेंगे या ठिकाणापासून वेगळें पाडलें जाईल अशी भीति त्यांना वाटत होती. मी आग्रहानें सांगितलें, कीं सेला येथें पाय रोवून उभे राहणें अवश्य आहे. त्यांच्याजवळ पुरेसें सैन्य आहे, दारुगोळा होता, रसद होती व शत्रूनें मागल्या बाजूनें दळणवळण तोडलें तरी, अडचण येण्यासारखी नव्हती. मी

त्यांच्या हे निदर्शनास आणलें कीं, माघार घेतांनाहि त्यांचें सैन्य वेढलें जाण्याचा धोका होताच. तेव्हां ६२ ब्रिगेडनें सेला येथेंच लढाईचा सोक्ष-मोक्ष लावावा. त्या रात्रीं थापर, सेन व मी जेवण घेत असतांना पठानिया यांचा पुन: फोन आला व त्यांनीं माघार घेण्याची पुन: परवानगी मागितली. त्यांचें म्हणणें, कीं परिस्थिति झपाट्यानें आटोक्याबाहेर जात होती. सेनाप्रमुख थापर यांना ऐकूं जाईल एवढ्या मोठ्यानें मी पठानिया यांना आज्ञा दिली, कीं, त्यांनीं सेला येथेंच निदान १७–१८ ची रात्र झुंझत राहिलें पाहिजे., ( मला वाटलें, कीं जर त्या रात्री तें टिकून राहिले तर कदाचित आपली जागा स्थिरपणें धरूं शकतील.) मी सांगितलें, कीं १८ तारखेला सकाळीं मी याबाबत अखेरची आज्ञा कळवीन. माझा हा निर्णय त्यांना आवडलेला दिसला नाहीं. सेनाप्रमुख व सेनेचे कमांडर यांच्याशीं विचार विनिमय करून त्या रात्रीं मी खालील निवेदन पठानिया यांना धाडलें.

अ ) ज्या ठिकाणीं तुम्हीं आहांत तें ठिकाण कबजांत ठेवण्याची पराकाष्ठा करावी.

ब) हे जेव्हां अशक्य होईल, तेव्हां या ऐवजीं दुसरें सोयीचें ठिकाण निवडून त्या ठिकाणीं फळी धरण्याची मुभा मी तुम्हांला देत आहे.

क) सुमारे ४०० चिन्यांनीं बोमडी-ला–दिरंग जाँग रस्ता तोडला आहे.

ड) बोमडी-ला येथील ४८ ब्रिगेडला हा रस्ता, चिन्यांना हुसकून आज रात्रीं मोकळा करण्याची आज्ञा मी दिली आहे.

इ) तुमचे सेंगेशी असलेले दळणवळण कदाचित शत्रू तोडणार आहे.

प) शक्य तेवढें शर्थीनें लढणें हेंच तुमच्या हातीं आहे.

फ) १८ तारखेला सकाळपर्यंत बोमडी-ला येथें दोन डिव्हिजन सैन्याची कुमक येत आहे.

ब) रसदीची नाडी शाबूत ठेवण्यासाठीं तुमच्या जवळच्या रणगाड्यांचा व इतर शस्त्रांचा जास्तीत जास्त उपयोग करा.

(मला एक गोष्ट सांगितली पाहिजे. जनरल थापर व सेन हे १७ व १८ तारखेला माझे येथेंच होते. ज्या कांहीं महत्त्वाच्या आज्ञा, मी या दोन दिवसांत दिल्या, त्या मी त्यांच्याशीं विचारविनियम करून दिल्या व संमतीनें दिल्या.)

पुढें पुष्कळ दिवसांनीं मला कळलें, कीं पठानिया यांनीं ब्रिगेडियर होशियार-सिंग, ६२ ब्रिगेडचे कमांडर यांना असें सांगितलें, कीं त्यांची पिछाडी तुटण्याचा संभव आहे व डिव्हिजनची व ६५ ब्रिगेडची स्थितीहि कठीण होत आली आहे; याकरतां म्हणून त्यांनीं १७ तारखेला रात्रीं माघार घेऊन दिरंगजाँग येथील फळी मजबूत करावी. होशियारसिंग यांनी सांगितलें, कीं दिरंग-जाँग येथें एक डिव्हिजन पाठवलेली आहे व अशा मोठ्या माघारीला निदान २ दिवसांची तयारी करावी लागेल. म्हणून ते ४८ तासांत माघार घेतील. परतु पठानिया यांनीं त्याच रात्रीं माघार घ्या असा आग्रह धरला व होशियारसिंग यांनी त्या रात्रींच सेना खाली करण्यास सुरुवात केली.

पठानिया यांनी ही माघारीची आज्ञा, माझ्या सूचनांच्या आशयाविरुद्ध दिलेली होती. मी शक्य तो सेला लढवा असें सांगितलें होते. होशियार-सिंग हे जेव्हां माघार घेऊन सेंगे येथें आले व तेथें त्यांनीं फळी धरण्याचा प्रयत्न केला, तेव्हां त्यांच्या लक्षांत आलें कीं, सैन्यांत व अधिकाऱ्यांत पळापळीचा विस्कळीतपणा शिरला होता व त्यांचा हा प्रयत्न फसला. चिन्यांवर उलट हल्ला करण्यांत लेफ्ट. कर्नल भट्टाचार्यजी यांना चिन्यांनीं पकडले. त्याच रात्रीं चिन्यांनी शेजारच्या न्युकमांडोंग या कड्यावर हल्ला केला. १८ तारखेला सकाळीं पूल क्र. २ ओलांडल्यानंतर तो उडवण्याच्या यत्नांत असतांनाच, या ब्रिगेडवर चिन्यांनीं तोफांचा मारा सुरू केला.

सेला व दिरंग जाँग यांचेमध्यें चिन्यांनी पाचर ठोकली होती. ब्रिगेड जेव्हां अर्ध्या वाटेवर आली, तेव्हां तिच्यावर चिन्यांनीं मशिनगननें व उखळी तोफांनीं भडीमार केला. आपले अनेक सैनिक जखमी झाले. सर्व वाहनांसह या सैन्याला कोंडून चिन्यांनीं सैरावैरा करून टाकले. सर्वत्र काळोख पडला होता व या अंधारांत हें आपलें सैन्य चारी वांटा पळत सुटलें. काय होतें आहे तें कुणालाच समजेना. आज्ञा, प्रतिआज्ञा येत होत्या. अनेकांनीं शस्त्रें टाकली, दारुगोळा, वायरलेस सेट, हे सर्व तिथेंच टाकून सैनिक पळाले. कांहीं आसपासच्या डोंगरांत अदृश्य झाले. आतां खायला कांहीं नव्हते व प्यायला गलिच्छ पाणी होतें. सेला घाईनें सोडण्याची जी निकड लावली गेली, त्यामुळें सैन्याची अशी वाताहत उडाली.

१८ नोव्हेंबरला सकाळीं ५-३० बाजतां मी जेव्हां पठानिया यांचेशीं फोन वरून बोललों, तेव्हां त्यांनीं पुन: सेला खालीं करण्याची परवानगी मागितली. आतां परवानगी देण्यावाचून गत्यंतरच नव्हतें. (थापर व सेन हे अजूनहि तिथें होतेच.) पठानिया यांनीं फोनवर सांगितलें, कीं ६२ ब्रिगेडहि सेला सोडून मागें हटूं लागली आहेच. १७ तारखेला त्यांनीं दोन्ही बगलांवर जोराची लढाई दिली असें पठानिया यांनीं सांगितलें. नंतर मला कळलें, कीं अशी लढाई झालीच नाहीं. फारसा प्रतिकार न करतांच सेला सोडण्यांत आलें.

होशियारसिंग यांचा सेलाहून माघार घेण्याचा आग्रह नव्हता. तर पठानिया यांचाच होशियारसिंग यांना माघारीचा आग्रह झाला होता ! खरोखर पठानिया हेच त्यांच्या हाताखालील एका अधिकाऱ्याच्या सल्ल्यानुसार सेला येथील बळकट ठाणें सोडून दिरंग जाँग येथील त्यांचें ठाणें बळकट करण्यासाठीं धडपडत होते. यांत झालें काय तर ते दोन दगडांत सांपडले. (त्यांचीं मर्मस्थानें सेला, दिरंग जाँग व बोमडी-ला हीं सर्व ओळीनें पडली.) नेफांत इतका आपला जो पराभव झाला, त्याला चिन्यांची वरचढ लष्करी तयारी हें कारण असलें तरी सेला येथील या पराभवाला पठानिया व त्यांचे सहकारी कमांडर हेच जबाबदार आहेत.

सेला पडतांच शत्रू पाठोपाठ बोमडी-ला व दिरंग जाँग यावर आला. त्यानें हीं दोन्हीं ठाणीं चहुबाजूंनीं एकटी पाडलीं. दिरंग जाँग हें ६२ ब्रिगेडनें व ४ डिव्हिजननें १८ तारखेला सकाळींच मोकळें केलें.

४ डिव्हिजन ही दिरंगजाँग–बोमडी-ला रस्त्यानें मागें येऊं लागली. परंतु वाटेंत चिनी येतांच, (हे किती संख्येने होते हें मला ठरवतां आलेलें नाहीं) कमांडरनें स्वत:च्या अधिकारांत असा निर्णय घेतला, कीं आतां मुख्य रस्ता सोडून मंडालावरून जावें. हें सैन्य मग मळवाटांनीं पायथ्याच्या टेकडीकडे गेलें. मला असें कळलें, कीं या सैन्याला अडवणाऱ्या कांहीं चिनी सैनिकांचा गणवेष हा हिंदी सेनेचा गणवेष होता. (बहुधा मृत सैनिकांच्या अंगावरचे हे गणवेष असावेत.) या वेषांतर केलेल्या चिन्यांनी हिंदी भाषेंत हुकूम देऊन आपल्या सेनेंत गोंधळ उडवून दिला. आपल्याला हें करतां आलें नाहीं; कारण चिनी भाषा येणारे कुणीच आपल्यापाशीं नव्हतें. या मागें राहिलेल्या सैन्याला दिरंग जाँग सोडण्यापूर्वी व मुख्य रस्ता सोडण्यापूर्वीं



मेजर डुबे व लेखक.

*( १९६२ च्या उन्हाळ्यांत काश्मीरमध्यें एका स्थळीं )*

पठानिया यांनीं काय आज्ञा दिलेली होती हें मला माहीत नाहीं. सेलाव दिरंगजाँग हीं फारसा रक्तपात न होतांच चिन्यांच्या हातीं पडलीं.

ज्या चार क्रमांकाच्या पायदळ डिव्हिजनचें नेतृत्व करण्याचें भाग्य मला एकदां लाभलेलें होतें, त्यांच्या कर्तृत्वशक्तीचा हा कांहीं परमोच्च काल नव्हता. १९५६–५९ या वर्षांत या डिव्हिजनची स्थिति नोव्हेंबर ६२ मधील स्थितीहून फार वेगळी होती. कांहीं ब्रिगेडस नवीन आली होतीं,

कांहीं बटालियन नवीन आल्या होत्या. परंपरेला शोभेल असा लढा ही डिव्हिजन देऊं शकली नव्हती. (पठानिया यांना या डिव्हिजनच्या अधिकारावरून दूर करण्यांत आलें व त्यांना सरकारनें सेनेबाहेरचें कांहीं काम दिलें.)

## बोमडी-ला ची लढाई

पायथ्याची टेंकडी व सेला खिंड यांच्या बरोबर मध्यें बोमडी-ला आहे. ब्रिगेडियर गुरूबक्षसिंग यांनी बोमडी-ला चे संरक्षणासाठीं येथें ४८ ब्रिगेड ही नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून एकवटलेली होती. परंतु या कठीण जागीं संरक्षणाला आवश्यक तो साधन सामुग्रीचा सांठा मात्र केलेला नव्हता. ४ डिव्हिजनचीच ही ब्रिगेड होती व सामुग्रीच्या बाबतींत या ब्रिगेडला शेवटचा क्रम देण्यांत आलेला आहे, असें ४ डिव्हिजननें कळवलें होतेंच.

११ नोव्हेंबरला या ब्रिगेडला ४ डिव्हिजननें आज्ञा दिली, कीं पोशिंग-ला या जवळच्या उपठाण्याजवळ एक कंपनी ठेवण्यांत यावी. एक प्लाटून तिकडे गेलेलीच होती. ४८ ब्रिगेडनें आणखी एक प्लाटून तिकडे १२ तारखेला पाठवली व १३ ला तिसरी पाठवली. या पोशिंग-ला ठिकाणावर नंतर चिन्यांनीं एका ब्रिगेडच्या संख्येनें हल्ला चढवला व हें ठाणें खिशांत घालून चिनी बोमडी-ला व दिरंगजाँग च्या दिशेनें प्रगति करीत राहिले.

१५ तारखेला ४८ ब्रिगेडला आज्ञा आली, कीं थेंब बाँग येथें पाय रोवून पोशिंग-ला परत कबजांत घेण्याचा प्रयत्न करावा. ५ गार्डस् ही बटालियन तिकडे धाडण्यांत आली. ५ गार्डस् ही बटालियन थेंब बाँग येथें १६ तारखेला पोहोंचली. बटालियन कमांडरनें तिथें बस्तान बांधण्यास सुरुवात करून एक कंपनी पोशिंग-ला ह्या दिशेनें पुढें धाडली. मध्यंतरी काय झालें, कीं चिनी आमच्या दिशेनें बरेंच पुढें आले होते. ५ गार्डस् बटालियनला थेंब बाँग झुंझवणें एकटचानें शक्य नसल्यानें, त्यांना ब्रिगेड कमांडरनें बोमडी-लाकडे माघार घेण्यास सांगितलें. परंतु ५ गार्डस् ही बटालियन परत फिरते, तों चिन्यांनीं रस्ता अडवलेला होता. ब्रिगेड विस्कळीत झाली व मुख्य रस्ता सोडून गटागटानें सैनिक कसे तरी पायथ्याच्या टेकड्यांपाशीं अखेर एकत्र आले.

५ गार्डस् या बटालियनला अशा रीतीनें बोमडी-लापासून मागें हलवल्या-नंतर, चिन्यांनीं बोमडी-ला—दिरंग जाँग रस्त्यावर, बोमडी-लाच्या उत्तरेस ६ किलोमीटर वर पाचर मारली. हें काम सुमारें ४०० चिनी सैनिकांनीं १७ तारखेला रात्रीं ९ वाजतां उरकलें. लगेंच ४८ ब्रिगेडच्या कमांडरनें माझ्याशीं संपर्क साधला. मी सांगितलें, कीं त्याच रात्रीं शत्रूवर हल्ला चढवून रस्ता मोकळा करण्याचा प्रयत्न करा. नाहीं तर बोमडी-ला धोक्यांत येणार आहे.

मी त्यांना सांगितलें कीं, २ पायदळ बटालियन (६।८ गुरखा रायफल्स व ३ जम्मू काश्मिर रायफल) दिमतीला धाडत आहे व १८ तारखेला सकाळीं ह्या पोहोंचतील. कमांडरनें सांगितलें, कीं आतां फक्त सहाच कंपनी उरल्या होत्या व निदान सोळा कंपनी एवढें सैन्य तरी दिलेल्या कामगिरी-साठीं असणें आवश्यक होतें. तेव्हां माझी आज्ञा पार पाडणें शक्य नाहीं. मी सांगितलें कीं, शक्य असलें तें करा. जे दोन टँक होते त्यांचा उपयोग करा व शक्य तो दिरंग जाँगचा रस्ता मोकळा करा.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ११ वाजतां २ टँकसह, दोन कंपनी सैन्य हे दोन डोंगरी तोफांसह हे दिरंगजाँगचा रस्ता मोकळा करण्यासाठीं एकत्रित होऊन निघणार, तोंच ४८ ब्रिगेडनें सोडलेल्या जागा व्यापून चिन्यांनीं या सैन्यावर गोळीबार सुरू केला.

ज्या दोन पायदळ बटालियन मी धाडल्या होत्या त्या बोमडी-ला येथें दुपारी पोहोंचल्या. त्या जर सकाळीं पोहोंचल्या तर कदाचित तिथलें चित्र बदललें असतें.

बोमडी-लाचे कडे आतां चिन्यांनीं व्यापले होते. ब्रिगेड कमांडर यांना जेव्हां आढळलें, कीं परिस्थिति हाताबाहेर जात आहे तेव्हां आपल्या कांहीं सहकारी उप-अधिकाऱ्यांसह ते ४-३० वाजतां रूपा येथें आले. मी पाठविलेल्या बटालियन तोंवर तेथवर पोहोंचलेल्या होत्या. रूपा येथें पोहोंचल्यावर ब्रिगेडियर गुरुबक्षसिंग यांना जेव्हां कळलें, कीं कांहीं सैनिक बोमडी-ला येथें अडकले आहेत, तेव्हां ते बोमडीला येथें त्या रात्रीं परत गेले. तेथें विमान उतरण्याच्या भूपट्टीजवळ दोनशें सैनिक जमा झालेले होते. गुबक्षसिंग यांनीं त्यांना पहाटेपर्यंत रूपा येथें आणलें.

१८ तारखेला ६॥ वाजतां तेजपूर येथें मला कळलें, कीं बोमडी-ला दुपारीच पडलें. तीस मिनिटांत मी तेजपूर सोडलें. कारण अशा वेळीं मागें राहाण्यांत कांहीच अर्थ नव्हता. मी ९ वाजेपर्यंत पायथ्याच्या टेकडीपाशीं पोहोंचलो.

१९ तारखेला सकाळीं मी पायथ्याकडून बोमडी-लाचे दिशेनें वर जाऊं लागलो. सर्व रस्ता माघार घेणाऱ्या सैनिकांनीं व शरणार्थींनीं भरून गेला होता. गोगलगाईच्या गतीनें मी यांतून मार्ग काढीत चाललो होतो. मी या आशेनें उलट दिशेनें निघालो होतो, कीं अजून शक्य असेल तर कांहीं करून परिस्थिति सुधारावी.

मी जेव्हां पायथा व बोमडी-ला यांच्या मध्यावर असलेल्या चाको या ठिकाणीं आलो–४८ ब्रिगेडनें हें ठिकाण सकाळींच ११ वाजतां खालीं केलें होते– तेव्हां मी कांहीं भारतीय व परदेशीय वार्ताहर परतत असतांना पाहिलें. यापैकीं एका वार्ताहरानें मला चिन्यांच्या दिशेनें जातांना पाहिलें व अंदाजानें त्यानें बी. बी. सी. ला तांतडीची वार्ता धाडली, कीं मला चिन्यांनीं पकडलें आहे. बी. बी. सी. वरून अशी बातमी यामुळें देण्यांत आली.

मी पाठविलेल्या दोन्हीं बटालियन चाको येथें असतांनाच चिन्यांनीं हल्ला करून त्यांना गुंडाळलें.

तेजपूरहून कोअरचें ठाणें गौहत्तीला न्यावें असा निर्णय मी, लेफ्ट. जन. सेन व जनरल थापर यांनीं सल्लामसलतीनें घेतला. २० तारखेला दुपारीं हें ठाणें हललें तरी मी, ब्रिगेडियर सिंग, आसामच्या गव्हर्नरांचे सल्लागार लुथ्रा व दोन तीन निवडक मंडळी यांनीं तेजपुरलाच राहाण्याचें ठरवलें. मी गौहत्तीला त्याच दिवशीं पळालों अशी जी वदंता बाहेर प्रसृत झाली, ती खोटी होती. चिखलफेंक करणें व चारित्र्य हनन करणें हें तर सतत चालूंच होतें.

श्रीमती इंदिरा गांधी व कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष ढेबर हीं दोघे तेजपूरला आलीं. ढेबर हे तेथें स्त्रियांचें पुनर्वसन करण्याच्या कामासाठीं व इतर कामासाठीं आले होते. जेव्हां वलॉंग, सेला, बोमडी-ला पडलीं तेव्हां तेजपुरच्या डेप्युटी कमिशनरला परिस्थितीची कल्पना मी दिली होती.

पुढें मला कळलें ही स्वारी, आपली कुटुंबीय माणसें घेऊन वरून परवानगी न घेतांच त्याच दिवशीं दुपारीं कलकत्त्याला पळाली !

जेव्हां तिथल्या ब्रिटिश चहा मळेवाल्यांनी माझा सल्ला विचारला, तेव्हां मी सांगितलें, कीं काळजी घेतलेली बरी, या दृष्टीनें त्यांनी आपलीं बायका व मुलें सुरक्षित स्थळीं पाठवावी, परंतु स्वत: त्यांनीं मात्र आपल्या जागींच राहावें. याप्रमाणें ते वागले. संकटकाळीं जें खास इंग्लिश मनोधैर्य दिसून येतें, त्याचा प्रत्यय यामुळें आला.

## १८ ते २० नोव्हेंबर

थापर यांनीं १८ तारखेला तेजपूर येथें मला म्हटलें, कीं लडाख व नेफा-मध्यें जे लष्करी अनर्थ झाले त्यामुळें सरकारवर जोराची टीका लोकांकडून होणार आहे; व या दृष्टीनें जर आवश्यकता असेल तर तें कदाचित नेहरूंकडे आपला राजिनामा पाठवतील. मी त्यांना म्हणालों, कीं अशा तऱ्हेचें करण्याची मुळीच गरज नाहीं. तेजपूरहून दिल्लीला परततांना थापर यांनीं हाच विचार ब्रिगेडिअर पालिट यांचे जवळ सांगितला. प्रथम पालिट यांनींहि याची खरोखरच जरुरी नाहीं असें सांगितलें, परंतु नंतर कांहीं विचारानंतर त्यांनीं सांगितलें, कीं थापर यांनीं दिल्लीला पोहोंचल्यावर हें केलें तर त्यांच्या दृष्टीनें त्यांनीं योग्य तें केलें असें होईल. अर्थात नेहरू कांहीं सेनाप्रमुखांचा राजिनामा स्वीकारणार नाहींत. जेव्हां थापर हे दिल्लीला रात्रीं पोहोंचले तेव्हां ते तडक नेहरूंच्या निवासस्थानीं गेले. त्यांनीं सांगितलें, कीं नुकताच झालेल्या पराभवाच्या संदर्भात जर त्यांनीं राजीनामा दिल्यानें नेहरूंना किंवा सरकारला तें सोईचें होणार असेल, तर ते राजीनामा देण्यास तयार आहेत. नेहरूंनीं थापर यांना म्हटलें कीं अशी कांहीं निकड निर्माण झाली तर पुढें पाहूं. दुसऱ्याच दिवशीं मंत्रीमंडळ खात्याचे सचीव एस्. एस्. खेरा थापर यांना भेटले व त्यांनीं सांगितलें, कीं नेहरूंनीं त्यांचा राजीनामा स्वीकारण्याचें ठरवलें आहे. थापर यांनीं मग निवृत्तीवयापूर्वींच निवृत्त होण्याची परवानगी मागितली व ती देण्यांत आली. अशा रीतीनें राजकीय कारणासाठीं थापर यांचा बळी घेतला.

थापर यांनीं त्यांच्या नंतरचे ज्येष्ठ सेनाधिकारी म्हणून लेफ्ट. जनरल

जे. एन्. चौधरी यांचें नांव सेनाप्रमुखपदासाठीं सूचवलें. नशिबानें चौधरींना अचानक कसा हात दिला पाहा ! सेवेचीं संपूर्ण वर्षे पूर्ण होत आल्यानें निवृत्त होण्याची सूचना त्यांना मिळालेली होती व लेफ्ट. जनरल म्हणून ते निवृत्त होणार होते. लष्करी पेशांत अधिक मानमरातब मिळ-ण्याची त्यांची आशा खुंटलेली असतांना, अचानकपणें ते सेनाप्रमुख या जागेवर चपखलपणें आरुढ झाले. परमेश्वरी इच्छा म्हणूनच हें घबाड त्यांना लाभलें. २० नोव्हेंबरची ही हकिगत आहे.

दैवगती अशी, कीं कांहीं दिवसांपूर्वीच चौधरी यांनीं थापर यांना विनंती केली होती, कीं त्यांना दिल्लीला कांहीं तरी महत्त्वाच्या कामावर आर्मी हेड्क्वार्टर्सला घेण्यांत यावें. पुण्याला आर्मी कमांडर म्हणून आपण वेळ फुकट घालवीत आहोंत असें त्यांना वाटत होतें. थापर यांनीं जेव्हां आपल्या प्रमुख स्टाफ अधिकाऱ्यांशीं या बाबतींत सल्लामसलत केली तेव्हां त्यांना असा सल्ला मिळाला, कीं चौधरी यांना दिल्ली येथें जबाबदारीच्या जागेवर मुळींच आणूं नये. कारण त्यांच्या अहंमन्यतेमुळें, संघ वृत्तीनें काम करणें त्यांच्या स्वभावांत नाहीं. थापर यांनीं म्हणून चौधरी यांना दिल्लीपासून दूर ठेवण्याचें ठरवलें. परंतु मध्यंतरी प्रारब्ध चौधरींना खुणावतच राहिलें.

२० नोव्हेंबरला परिस्थिति अजूनहि गंभीरच होती. चिनी हे आपली चढाई अशीच चालूं ठेवणार आहेत कीं काय व भारतीय सेनेपुढें आणखी काय काय अरिष्टें वाढून ठेवलेलीं आहेत, याची कुणालाच कल्पना नव्हती. चौधरी यांना तर मुळींच नव्हती. ज्या चौधरींचें वर्णन 'स्टेटस्‌मन' पत्रानें, 'यांच्या मागें गौरवांची प्रभावळच आहे' असें केलेलें होतें, त्या चौधरींनीं, घाबरटपणानें जनरल थापर यांना विचारलें, कीं सैनिक बळाची व सामुग्रीची इतकी दारुण वानवा असतांना, सेनाप्रमुख म्हणून ते (चौधरी) किती दिवस टिकणार आहेत ? थापर यांनीं चौधरींना शांत करून म्हटलें, कीं उगाचच काळजी करूं नका, कारण जें कांहीं वाईट व्हायचें तें होऊन गेलें आहे व चिन्यांना त्यांची चढाई मैदानांत उतरल्या-नंतर आम्हांला अडवतां येणार नाहीं अशी खात्री वाटत नाहीं.

नशिबानें पुनः चौधरींना हात दिला. चिन्यांनी एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली व ज्या आपल्या प्रदेशांत ते पुढें आले होते, तेथून ते मागें गेले.

चौधरी यांनीं एकदम पलट घेतली व आपण मोठे जिद्दीचे सेनाप्रमुख आहोंत असा पवित्रा त्यांनीं धारण केला. लोकांना असें वाटावें कीं चौधरी हे कांहीं तरी चमत्कार करून ‘ जीव गाळलेल्या सेनेला टवटवी ’ आणणारच! सेनेच्या या हलाखीचीं कारणें खासगी कुजबुजींत अशीच सांगितली जात होती, कीं ‘ आपापसांतील हेवेदावे व कुचकामी नेतृत्व ’ ही याला कारणीभूत आहेत ! इतक्या झपाट्यानें रंग बदलणें चौधरींखेरीज कुणालाहि जमण्यासारखें नव्हतें, आणि नेहमीप्रमाणें परिस्थिति त्यांना अनुकूल अशीच होत गेली. ( आपल्या एका राजकीय पुढाऱ्यानें या वेळीं अशी वल्गना केली होती कीं चिन्यांनी घेतलेली सर्व भूमी परत मिळवेपर्यंत तो एका विरक्षित शहरांत पाऊल टाकणार नाहीं ! चार वर्षे झाली तरी ही प्रतिज्ञा पुरी झालेली नाहीं. अजूनपर्यंत ही स्वारी त्या शहरांत गेली कीं नाहीं, हें मात्र मला ठाऊक नाहीं.) आपल्या पुढाऱ्यांना हें कळलें पाहिजे, कीं जांदा सेना उभारायला कांहीं वर्षे लागतात. उगाच आधीपासून ढोल बडवण्यांत अर्थ नाहीं. यानें फक्त स्वतःची फसवणूक होते. इतरांची नाहीं. चीन व पाकिस्तान हे आपल्या शब्दाला तेव्हांच किंमत देतील, जेव्हां आपण शक्तिमान होऊं. नुसता तलवारीची पोकळ खडखडाट केला तर ते तिकडे लक्षच देणार नाहींत.

—आणि माओ त्से तुंग यांच्याच म्हणण्याप्रमाणें राष्ट्रशक्ति ही ‘ बंदुकीच्या नळींतूनच वाढते ! ’

येन केन प्रकारेण देशाची अशी समजूत करून देण्यांत आली, कीं १९६२ चें अरिष्ट कोसळलें, हें सेनेंतील कांहीं कमांडरांच्या अकार्यक्षमतेमुळें ( आणि सरकारच्या एकंदर नालायकीमुळें नाहीं कीं ज्यांनी देशाचें सैन्य युद्धसज्ज स्थितींत ठेवण्यांत, सेनेनें पुनः पुनः याविषयीं कांहीं करा असा आग्रह धरूनहि वर्षानूवर्षे हयगय केली ! )

## २१ नोव्हेंबर (अ)

‘सेला, बोमडी-ला, रूपा, चाको हीं पडलीं. धोला, तोवाँग व लाँग, आधीचं पडलेलीं होतीं. लडाखमध्यें अशीच दाणादाण झाली. मग चिन्यांनीं एकतर्फी युद्धबंदी घोषित केली.

इतक्या पराभवानंतर युद्ध थांबलें; व दृष्टीच्या नजीकच्या टप्प्यांत तरी, या पराभवाचा सूड घेण्याची शक्यता संपली ! खोटया प्रचाराचा अविरत मारा माझ्यावर चालूं झाला होता. त्यांतच, आर्मी हेडक्वार्टरला आतां नवी हुकमत सुरू झाली असल्यानें, हें सर्व मला सहन करणें अशक्य झालें. निवृत्ती वयापूर्वींच सेनादलांतून निवृत्त व्हावें, हा विचार त्या रात्रीं माझ्या मनांत पुन: पुन: येत राहिला.

माझ्या टीकाकारांचें म्हणणें होतें, कीं नेफांतील पराभवाचें मुख्य कारण मला प्रत्यक्ष रणक्षेत्रावरील कोअर हाताळण्याचा पुरेसा अनुभव नव्हता. आतां प्रश्न उभा राहतो, कीं ज्येष्ठ सेनानींना किती अनुभव हा पुरेसा अनुभव धरायचा ? एखाद्याच्या ठिकाणीं जें नेतृत्वाचे गुण असतील ते व लष्करी पेशाचे त्याचें ज्ञान हीं सेनाशासनाच्या व आधिपत्याच्या निरनिराळ्या क्षेत्रांत, युद्धांत तसेंच शांतता कालांत वापरण्याची संधि मिळण्याचा हा सवाल आहे. बहुतेक भारतीय सेनाधिकारी हे दुसऱ्या महायुद्धांत किंवा काश्मीर युद्धाच्या वेळीं फार तरुण होते. यापैकीं जवळ जवळ बहुतेकांना प्रत्यक्ष रणक्षेत्रावरील वरच्या श्रेणींतील आधिपत्याचा अनुभव घेण्याची संधि मिळूं शकलेली नाहीं. ते ज्या श्रेणींत सुरुवातीला होते त्याच पातळीचा म्हणजे मेजर किंवा लेफ्ट. कर्नल या पदांचा अनुभव, त्यांना घेता आला. कांहीं भारतीय अधिकारी तर असे होते, कीं युद्ध कधींहि न पाहतांच ते जनरल या पदावर गेले. मी माझ्या लष्करी कारकीर्दींतील विवक्षित बाजूवर जोर देऊ इच्छित नाहीं, कारण ती जी कांहीं होती ती होती... पण मला एवढेंच सांगायचें आहे. कीं माझा नोकरींतील विविध क्षेत्रांतील अनुभव हा माझ्या समकालिनांच्याशीं तुलना करतां मुळींच उणा नव्हता.

मी ४ ऑक्टोबर १९६२ रोजीं नेफांतील कोअरचें नेतृत्व स्वीकारलें. कोअर मध्यें सहा ते नऊ बिगेड असण्याची पद्धत असतांना या कोअर खाली फक्त दोनच बिगेडस् देण्यांत आल्या. मी अधिकार घेतल्यानंतर पंधराच दिवसांत यांतली एक ब्रिगेड धोलाच्या लढाईंत चिन्यांनीं कामीं आणलीं. जर या ब्रिगेडनें कांहीं चुका केल्या असतील किंवा ही ब्रिगेड आवश्यक तेवढी कार्यक्षम ठरली नसेल, तर दळवी यांनीं याचें उत्तर द्यायला हवें. ही ब्रिगेड ( व इतर तुकड्या ज्या नंतर आल्या.) नेफांत माझेकडे देण्यापूर्वीं

इतरत्र इतर यंत्रणेखालीं होती. जर या ब्रिगेडच्या कमकुवतपणाबद्दल कुणाला जबाबदार धरायचें असेल, तर त्या यंत्रणांना जबाबदार धरलें पाहिजे. त्यांना पुरेसें शिक्षण नव्हतें, हवामानाची संवय नव्हती, लष्करी साहित्याचा तुटवडा होता, या सर्व गोष्टींना सबंध भारतीय सेना किंवा सरकार जबाबदार आहे. भारतीय सेनेंतील एक अधिकारी म्हणून या सामुदायिक जबाबदारींतील माझा जो वांटा आहे. तो स्वीकारायला माझी तयारी आहे; परंतु या दु:स्थितीसाठीं मला एकटयाला वेगळा काढून दोष देणें योग्य नाहीं. मी फक्त तांत्रिक दृष्टया यांत गोवलेला आहे, कारण हीं घाईघाईनें जमवलेलीं पथकें व तुकडया त्या वेळीं, माझ्या हाताखालीं देण्यांत आल्या. मी माझ्या अधिकारांत शक्य होतें तें सर्व या सैनिकांकरतां केलेलें आहे. वस्तुत: माझ्या अधिकाराखालील कमांडरना त्यांच्या लगतच्या वरिष्ठांना अंधारांत ठेवून कांहीहि आदेश दिलेलें नाहींत. नेफांतील, धोला तोवांग, सेला, बोमडी-ला, किंवा लाँग यांतलें एकहि ठाणें चुकीचे हुकूम दिले म्हणून हातांतून गेलेलें नाहीं. याचें रक्षण करायचें काम वरिष्ठ लष्करी शासनानें माझेकडे दिलें व ही गोष्ट माझ्या शक्तीबाहेरची असल्यानें सर्व ठाणीं पडलीं.

शिवाय ऑक्टोबर-नोव्हेंबर १९६२ या काळांत, नेफांत मी कांहीं एकटाच जबाबदार सेनानी लढत नव्हतो. कांहीं माझे वरिष्ठ होते, पुष्कळ हातांखाली होते.

सेनेची यंत्रणा अशी असते. सर्वांत वर सेनाप्रमुख असतो. त्याच्या हाताखालीं तीन कमांडर असतात. यांतील एक लेफ्टनंट जनरल सेन हे एप्रिल ६१ पासून 'ईस्टर्न कमांड' सांभाळीत होते, ज्यांत नेफा भाग येतो. सेन यांच्या हातांखालीं दोन कोअर होतीं. कोअर ३३ व कोअर ४. यांतील कोअर ३३ हे नागालँड विभागासाठीं व कोअर ४ हे माझ्या अधिकाराखालील नेफा विभागासाठीं नियुक्त झालेलें होतें.

माझ्या कोअरखालीं दोन डिव्हिजन्स होत्या. त्या प्रत्येक डिव्हिजनवर एकेक मेजर जनरलचा अधिकार होता. या प्रत्येक डिव्हिजनमध्यें अनेक पायदळ ब्रिगेड होत्या. या प्रत्येक ब्रिगेडवर ब्रिगेडियर होता. इतके अधिकारी माझ्या वर-खाली होते व सर्व नेफा रक्षणाची किंवा विवक्षित विभाग रक्षणाची जबाबदारी या सर्वांवर होती.

उदाहरणार्थ मेजर जनरल पठानिया हे माझ्या एका डिव्हिजनचे कमांडर होते. सेला हें महत्त्वाचें ठाणें हातून गेलें याला पठानिया जबबदार आहेत. लेफ्टनंट जनरल सेन हे माझे आर्मी कमांडर होते. माझ्या कुठल्याहि कृतींत त्यांना दोष आदळला नाहीं व त्यांनीं माझ्या कृतींना पाठिंबाच दिलेला आहे. निदान माझ्या माहितीप्रमाणें असें असल्यामुळें तिथें जें कांहीं नेफांत घडलें, त्याची जबाबदारी सेन यांचेकडेहि जाते. आर्मी कमांडर यांच्या इतिहासांत असें प्रसंग नमूद आहेत, कीं लष्करी कारवाईच्या वेळीं त्यांच्या हाताखालच्या विवक्षित अधिकाऱ्यामुळें एखादा मोठा पराभव झाला म्हणून आर्मी कमांडरलाच डच्चू मिळालेला आहे.

लडाखमध्यें माझ्या समाधिकारावरील असलेल्या सेनानींच्या आधिपत्याखालीं, असेच लष्करी पराभव याच वेळीं होऊनहि त्यांची मात्र 'प्रखर प्रतिकार' केला म्हणून स्तुती करण्यांत आली ती कां, असा प्रश्न विचारणें समयोचित ठरेल.

नेफा (किंवा लडाख) येथें जें घडलें तें अनेकांच्या चुकांमुळें घडलें. सरकार व त्यांचे सनदी व लष्करी शासक हे सर्व याला जबाबदार आहेत. या सर्वांबरोबर मी देखील यांतील माझा वांटा घेण्यास तयार आहे. पण यापेक्षां जास्त नाहीं. मला वाटतें केवळ माझ्याचकडे बोट करून माझे टीकाकार उघडे पडत आहेत. कारण अशाच परिस्थितींतील इतर कुणाला याच न्यायानें तें मापूं लागले तर त्यांचें माझ्या विरुद्धचें गाऱ्हाणें लंगडें होईल !

## २१ नोव्हेंबर (व)

तेजपूर शहर उजाड झालें होतें. सनदी अधिकाऱ्यांनीं तुरुंगांतून कैद्यांना मुक्त केलें होतें. बँकांनीं सर्व चलनी नोटा जाळून टाकल्या होत्या व त्या बंद झाल्या होत्या.

गृहमंत्री लालबहाद्दूर शास्त्री, ओरिसाचे मुख्यमंत्री बिजू पटनाईक व आसामचे मुख्य मंत्री चालिहा यांचेशीं तेजपूरच्या विमानतळावर २१ तारखेस एक तासभर माझी भेट झाली. या वेळीं त्यांनीं निर्माण झालेल्या परिस्थितीची चर्चा केली.

१८ ते २२ नोव्हेंबर या दिवसांत मला मेजर जनरल पठानिया यांची कांहींच बातमी नव्हती व त्यांच्या सुरक्षिततेविषयीं मला मोठीच काळजी वाटत होती. आतां युद्ध संपलें होतें. मला वाटलें, कीं आतां त्याचा शोध घेतला पाहिजे.

दुपारीं मला कळलें, कीं ४ डिव्हिजनचे कांहीं सैनिक कलकटोंग जवळ आढळले आहेत. हें ठिकाण तेजपूरच्या वायव्येस पायथ्याच्या टेकडीवर होतें. मी तेथें पठानियांच्या शोधार्थ हेलिकॉप्टरने जायचे ठरवलें. होमगार्ड संघटनेचे कमांडिंग जनरल मानेकजी हे दिल्लीहून आले होते व मला भेटतच होते. मी त्यांना माझ्या या वेधक कामगिरीचें स्वरूप सांगतांच ते माझ्याबरोबर यायला आनंदानें तयार झाले.

हेलिकॉप्टरमधून आम्ही कलकटोंगच्या दिशेनें गेलो व तिथून बोमडी-ला दिरंग जाँगच्या दिशेकडे वळलो. आमचीं माणसें दिसावीं म्हणून आम्ही खूपच खालच्या उंचीवरून उडत होतो. पठानिया किंवा त्यांचे कुणीच सैनिक आढळले नाहींत व निराशेने परत आलो. मानेकजी हे नंतर दिल्लीला गेले.

मी तेजपूर विमानतळावरच असतांना आणखी एक वैमानिक मला भेटला. त्याच्याजवळ दुसरें हेलिकॉप्टर होतें. दोन दिवसापूर्वीं केव्हांतरी त्याच्या पायाला जखम झालेली होती. त्यानें पठानियांच्या शोधार्थ पुनः मला नेण्याचें कबूल केलें. त्याला खात्री वाटत होती, कीं आपले सैनिक कुठें आहेत हें त्याला शोधतां येईल. आतां फक्त अर्धाच तास दिवसाचा प्रकाश राहणार होता. चंद्र खूप उशीरा उगवणार होता. तेव्हां परततांना गर्द अंधार पडलेला असणार हें दिसत होतें. तरीहि या शूर वैमानिकानें— त्याचें नांव माझ्या स्मरणांतून घरंगळलें आहे— हेलिकॉप्टरमधून मला नेण्याची तयारी दाखविली.

अर्धा तास उड्डाण केल्यानंतर आम्ही भैरपकुंड इथें उतरलो. पायथ्याच्या टेकडींत उदलगिरीच्या उत्तरेस हें ठिकाण होतें. तिथें कांहीं सैनिक दिरंग जाँगहून रखडत रखडत येऊन पोहोंचलेले होते. त्यांना वाटेंत कांहीं खायला मिळालेलें नव्हतें व ते सर्व थकले भागलेले व भकास दिसत होते. कांहीं मिनिटांतच पठानिया हे

देखील तिथें आले. त्यांना सुरक्षित पाहून मी निश्वास सोडला. हें मात्र मनांत आलें, कीं नेफांतील आपल्या प्रमुख पराभवाचा हाच तो शिल्पकार !

जखमी झालेले कांहीं सैनिक व पठानिया यांना हेलिकॉप्टरमध्यें घेऊन आम्ही पाऊण तासानें तेजपूर येथें उतरलों.

थोड्याच वेळापूर्वीं सर्व बाजूंनीं दबाव आल्यानें मेनन यांनीं सरकारांतून राजीनामा दिला होता. इतरांचा प्रखर विरोध असतांना मेनन यांचे मंत्रिमंडळांतील कायम अस्तित्व हें नेहरूंनाच धोक्यांत आणणारें ठरलें असतें. मेनन यांनी शासकीय क्षेत्रांत अतिशय चांगली कामगिरी केली होती. परंतु रणक्षेत्रावरील हालचालींच्या नियंत्रण क्षेत्रांत त्यांनीं जे चुकीचे अंदाज बांधले, त्यांचे ते बळी ठरले होते. नशीब असें, कीं परिस्थितीनेंहि जणूं या एकांड्या लांडग्याविरुद्ध कटच केला.

मेनन हे मंत्रीपदावरून गडगडतांच, त्यांनीं भारताची केलेली पूर्वसेवा लगेंच विसरली जाऊन, फक्त त्यांच्या चुकाच आठवण्यांत येऊं लागल्या. मानवी स्वभावाच्या चंचलतेनुसार मेनन वैभवांत असतांना ज्यांनीं त्यांची पूजा केली तींच माणसें ते आतां फेकले जाऊन एकटे पडतांच त्यांचे वैरी झाले.

हकिगत पुढे सांगण्यापूर्वीं लडाखमध्यें काय झालें तें थोडक्यांत सांगणें आवश्यक आहे.

नेफांत लढणाऱ्या आम्हांला, सैनिक व भारतीय म्हणून, निर्घृण चिनी हे लडाख विभागांतहि प्रचंड संख्येनें. आपल्यावर कोसळले आहेत, हें कळतांच, आमचीं अंत:करणें विदीर्ण झालीं. तिथें देखील आमची सेना क्रूर विषम परिस्थितींत लढत होती. मला बदनाम करण्यासाठीं, माझ्या खऱ्याखोट्याची चाड नसलेल्या टीकाकारांनीं जरी त्या दिवसांत, लडाखमध्यें आपल्या लोकांनीं ‘ प्रखर प्रतिकार ’ केला असें, नेफांतील आमच्या कमकुवत प्रयत्नांशी तुलना करून सांगितलें असलें, तरी माझ्या देशाची सतत फसवणूक होतां कामा नये. आपले लडाखमध्यें काय झालें, तियला पराभव हा नेफांतील पराभवाइतकाच कसा भीषण होता, हें पुढील परिच्छेदांत सांगितलेलें आहे.

२० ऑक्टोबरला सकाळीं दौलत बेग ओल्डी या ठाण्यावर रसद टाकण्यासाठीं गेलेल्या विमानाच्या वैमानिकाला, चिन्यांनीं जमिनीवरून मारलेल्या वीस गोळ्या लागल्या. दौलत बेग ओल्डी या ठाण्याच्या जवळच कांहीं मैलावर, काराकोरम खिंडीच्या खालीं, या वैमानिकाला पुष्कळ संख्येनें चिनी आलेले आढळले. तेथून धूरही येत होता. सायंकाळपर्यंत या विभागांतील पांच ठाणीं चिन्यांनीं ताब्यांत घेतलीं.

या भागांतील ११४ ब्रिगेडचे आर्मी कमांडर लेफ्टनंट जनरल दौलतसिंग व कोअर कमांडर लेफ्ट. जनरल विक्रमसिंग यांनीं सैन्याला दौलत बेग ओल्डीच्या पिछाडीस मागें हटण्यास सांगितलें. ही माघार २३ तारखेला पुरी करण्यांत आली.

२१ तारखेला, पॉईंट १८५४० हें ठाणें पडलें, २२ तारखेला गलवन पडलें, कोंगा पडलें, चांगचेमो पडलें. अनीला व चार्टस् या ठिकाणच्या शिबंदीला फोब्रँगपर्यंत मागें घेण्यांत आलें.

२४ तारखेला यु ला येथील शिबंदी मागें आली. अशा रीतीनें ४८ तासांत जवळ जवळ सर्व उत्तर लडाख आपण सोडला.

२७ ला चांग ला शत्रूनें घेतलें. जार ला कांहीं काळ झगडलें परंतु अखेर पडलें. डॅमचोक व न-ला आणि हॉट स्प्रिंग हीं ठाणीं आपणच खालीं केलीं.

चिन्यांच्या आक्रमणाच्या या पहिल्या झपाट्यांत लडाखमधील हीं सर्व ठाणी व नेफांतील धोला व तोवांग हीं ठाणीं पडलीं. पहिली फेरी पुरी झाली होती.

दुसऱ्या फेरींत जेव्हां नेफामध्यें चिन्यांनीं व-लॉंग, सेला व बोमडी-ला सर केली, त्या वेळीच म्हणजे १८ नोव्हेंबरला लडाखमध्यें शत्रूनें राझनाक-ला गुरंग हिल व स्प्रँगूर गॅप या ठिकाणांवर गोळाबारी सुरू केली. चुशूल येथील विमानतळानजिकहि चिन्यांनीं हल्ला चढवला.

राझनाक-ला, गुरंग हिल, स्प्रँगूर ग्रॅप, गोस्वामी हिल, गनहिल, पॉईंट १८३०० ही फळी चिन्यांनीं फोडली व या ठाण्यांच्या मागें ते थांबले. चुशूलगांव व तेथून चार मैलांवरील विमानतळ अजून त्यांनीं व्यापला नव्हता. (राझनाक-लाच्या लढाईंत मेजर शैतानसिंग याला वीरमरण आलें.) चुशूल व तेथील विमानतळ यासाठीं घनघोर लढाओ झाल्याचीं जीं चित्रें

रेखाटण्यांत आलीं तीं लडाखमध्यें प्रखर प्रतिकार झाला हें सिद्ध करण्याकरतां होतीं. खरें पाहतां चुशूल भागांत लढाई झालीच नाहीं. जीं ठिकाणें चिन्यांनीं व्यापायची ठरविलीं होतीं, त्यांत चुशूल नव्हतें. चुशूलवर कधीं हल्लाच झाला नाहीं व तें आहे तसेंच राहिलें. उत्तर, मध्य व दक्षिण लडाखमध्यें आपलीं मोक्याचीं ठिकाणें आपण गमावलीं. २०-२१ तारखेच्या रात्रीं चिन्यांनीं एकतर्फी युद्धबंदी अंमलांत आणली. लडाख व नेफा या दोन्हीं ठिकाणीं लहान लहान ठाणीं वेढली गेली, तेव्हां कांही शर्थीनें लढलीं. नेफांत गरवाल फलटण लढली. वलाँगनें चांगली टक्कर दिली. या गोष्टी कां विचारांत घेतल्या जात नाहींत ? लडाख व नेफांतील लढायांचा निकाल शेवटीं सारखाच लागला. दोन्ही ठिकाणीं आपण मोठमोठे प्रदेश चुटकीसरशीं गमावले.

आठवत असेल कीं, जेव्हां आपण जागे झालों व चिन्यांनीं आपली हजारो चौरस मैल भूमि व्यापल्याचें आपल्या ध्यानांत आलें, तेव्हां लोकक्षोभ झाला; तेव्हां आपल्या कांहीं पुढाऱ्यांनीं या भूमींत 'गवताचें एक पातेंहि वाढत नाहीं' असें सांगून या क्षोभाची हेटाळणी केली. यामुळें लोकांची अशी समजूत झाली, कीं नेफा भाग हा लडाखपेक्षां जास्त महत्त्वाचा दिसतो आहे ! प्रत्यक्षांत असें नाहीं. जर शासनाच्या दृष्टीनें नेफा महत्त्वाचा असला तर राजकीय डावपेंचांच्या दृष्टीनें लडाख हा महत्त्वाचा होता.

लडाखमध्यें मोठी लढाई अशी झाली नाहीं. ज्या लहानलहान चकमकी उडाल्या, त्यांत आपण एकाहि ठिकाणीं चिन्यांवर मात करूं शकलों नाहीं. लडाख व नेफा या दोन्ही रणांत कांहीं वैयक्तिक शौर्याचीं अुदाहरणें नमूद आहेत. ही दोन्हीं ठिकाणीं सारख्याच प्रमाणांत आहेत. ९ पंजाब बटालियनचा जवान कानशीराम याला महावीर चक्र सरकारनें दिलें आहे.

लडाख व नेफा या ठिकाणीं ऑक्टोबर-नोव्हेंबर १९६२ च्या भारत-चीन युद्धांत आपली जी हानी झाली तिचे आंकडे बोलके आहेत.

| | ठार | जखमी | बेपत्ता | एकूण |
|---|---|---|---|---|
| नेफा | १,१५० | ५०० | १,६०० | ३,२५० |
| लडाख | २३० | ५० | ६० | ३४० |

वरील आंकडयांवरून ध्यानांत येईल, कीं लडाखच्या पांचपट सैनिक नेफामध्यें कामास आले व दहापट जखमी झाले. तरीहि म्हणतात कीं लडाखमध्यें जोराची लढाई झाली ! याचें गमक तरी काय ?

ही गोष्ट खरी, कीं नेफांत आपली फौज अधिक होती; परंतु त्या प्रमाणांत चिनी सैन्यहि कितीतरी पटीनें अधिक होतें. लडाखमध्यें १९६२ पूर्वीपासून आपण चिन्यांशीं झगडा करीत होतो. थोडी फार संरक्षणाची तयारी आपण इथें करत आलो होतो व सैनिक तेथील हवामानाला सरावलेले होते. पर्वत शिखरावरील हवामानाशीं सैनिकांची जानपछान होती.

नेफामध्यें उलट होतें. १९६२ मध्यें इथें प्रथमच आपण मॅकमोहन रेषेपर्यंत गंभीरपणें गेलों. तिथें सरहद्दीवर आपण नुकतीच कुठें कांहीं ठाणीं स्थापन केलीं न केलीं, तोंच चिनी आक्रमण झालें. यामुळें तिथें पुरेसें सैन्य नव्हतें; कीं दळणवळणाचें नियंत्रण करणारी यंत्रणा नव्हती. या गोष्टी लोकांपासूनच मुद्दामच दडवून ठेवण्यांत आल्या. त्यांना हें सिद्ध करावयाचें होतें, कीं लेफ्ट. जनरल कौल हा किती नालायक जनरल होता पाहा ! तरी त्याला नेहरू, मेनन यांनी महत्त्वाचे आधिपत्य दिलें. नेहरू, मेनन यांच्या या वशिलेबाजीमुळें चुकीच्या माणसांना वरच्या जागा लायकी नसतांना देण्यांत आल्या. (असेच आरोप थापर यांचेवरहि झाले.) लडाख येथें मात्र लष्करी पेशांतील कार्यक्षम जनरल होते व त्यांनीं चांगली कामगिरी केली.

वस्तुस्थिती अशी आहे, कीं नेफा व लडाख या दोन्ही ठिकाणीं चिनी सैन्यानें हिंदी सैन्याला मागें रेटलें; व दोन्हीं ठिकाणीं त्यांचें ठरलें होतें त्या रेषेपर्यंत रेटा देऊन तें सैन्य थांबलें व नंतर त्यांनीं एकतर्फी युद्धबंदी जाहीर केली.

चिन्यांनीं आपल्यावर १९६२ च्या ऑक्टोबरांत आक्रमण कां केलें, त्यांनीं आक्रमण एकतर्फी युद्धबंदी करून कां थांबवलें, भारताच्या पराभवाचीं व चीनच्या विजयाचीं कारणें काय व भारतानें पुढें काय करावें, या सर्व प्रश्नांचीं संभाव्य उत्तरें खालीं दिलीं आहेत.

चीननें आपल्या सरहद्दीवर सर्वत्र हल्ला चढवला, तो जगांत आपण एक बडे राष्ट्र झालो आहोंत हे सिद्ध करण्यासाठीं. रशिया व अमेरिका

यांना चीननें या कृतीनें इशारा दिला, कीं आशियांत चीन हा सर्वांत प्रबळ देश झालेला आहे व आशियांत आतां त्याचें वर्चस्व राहणार आहे. नेपाळ, ब्रह्मदेश, सिलोन, कंबोडिया व सिक्किम, भूतान यांनाहि व पश्चिमेलाहि आपल्या लष्करी सामर्थ्यानें दिपवून टाकावें व भारतापासून फोडावें यासाठीं चीननें हें केलें. चीनचा आर्थिक विकास झालेला आहे व तेथील राज्यपद्धति ही प्रभावी आहे, हें जगाला सांगण्याचाहि त्यांचा हेतू होता. चीनला, रशियाला हें दाखवून द्यायचें होतें, कीं भारताचें अलिप्ततेचें धोरण ही एक भ्रामक गोष्ट आहे. ध्येयवादांत, राजकीय व आर्थिक क्षेत्रांत, भारत हा चीनला प्रतिस्पर्धी असल्याचा आव आणीत होता. त्याची नामुष्की करण्यासाठीं व आपली आर्थिक घडी विस्कटवून, आपलें मनोधैर्य खचवून टाकून, येथील लोकशाही पद्धतीला बदनाम करण्यासाठीं, चीनचा हा पवित्रा होता. त्यांना तिबेटी जनता व दलाईलामा यांना धडा शिकवायचा होता, कीं भारतासारखा कमकुवत देश हा चीनसारख्या बलाढ्य देशाविरुद्ध तुम्हांला साहाय्य करूं शकणार नाहीं. अंतर्गत अडचणींपासून चिनी जनतेचें लक्ष इतरत्र वेधण्यासाठीं व त्यांना ऐक्यासाठीं–भारताचा साम्राज्यवादी धोका–ही नवी घोषणा देण्यासाठीं हें आक्रमण चीननें केलें.

चीननें २० ऑक्टोबर १९६२ याच वेळीं आक्रमण करण्याचा उद्देश हा असावा, कीं त्यावेळीं क्युबाची गडबड (२०–२६ ऑक्टोबर) उडालेली होती चीनला वाटलें कीं, रशिया, अमेरिका व जगाचें लक्ष तिकडे गुंतलें असतांना, इकडे हात मारायला हरकत नाहीं. शिवाय ऑक्टोबरच्या अखेरीस नेफा व लडाखमध्यें पावसाळा संपून उत्तम हवा पडूं लागते व हीच वेळ आक्रमणाला सोयीची होती.

चीननें एकतर्फी 'शांततामय' युद्धबंदी अंमलांत आणली याला अनेक कारणें आहेत.

(क्लॉसेविच म्हणतो . जेता हा नेहमींच शांततेचा उपासक असतो.) चीनची अपेक्षा होती, कीं भारताला तडे जाऊन तो तहाची भीक मागेल, अर्थांत हें झालें नाहीं. तिबेटच्या रक्षणासाठीं जेवढी व जी भूमि व्यापणें त्यांना आवश्यक वाटत होतें तेवढीच त्यांनीं व्यापली. चीनला भीति वाटत होती,

कीं जिंकलेला सर्व प्रदेश ताब्यांत ठेवायचा म्हटला, तर इतक्या दूर रसद पुरवठा व दळणवळण शाबूत ठेवणें विशेषत: हिवाळ्यांत अशक्य झालें असतें. जर लष्करी संघर्ष रेंगाळता, तर चीननें जिंकलेल्या प्रदेशापुढें, चीनवर हल्ला करण्याची संधि अमेरिका व पाश्चिमात्य राष्ट्रांनीं घेतली असती व यांच्याशीं एकाकी लढणें चीनला जड जाणार होतें. रशिया आणि समाजवादी राष्ट्रांना, चीननें विश्वासांत घेतलें नसल्यानें त्यांचा पाठिंबा मिळेल अशी चिन्यांची अपेक्षा नव्हती. त्यांच्या भारतावरील आक्रमणामुळें जगांत व विशेषत: रशिया व अमेरिकेंत जी प्रतिक्रिया झाली, त्यामुळें चीनला आश्चर्य वाटलें. क्युबाचें प्रकरण क्रुश्चेव्ह व केनेडी हे समजुतदारपणानें इतक्या लवकर मिटवतील अशी चीनची अपेक्षा नव्हती. यासाठींच चीननें क्रुश्चेव्हला धारेवर धरलें. कारण त्यानें त्यांचा बेत उधळला होता. अफ्रो-आशियाई देशांना चीनला असें दाखवून द्यायचें होतें, कीं ह्यांना आक्रमणाची किंवा दुसऱ्याचा प्रदेश गिळंकृत करण्याची अिच्छा नाहीं. यासाठीं त्यांनीं मोठ्या नाट्यमय पद्धतीनें व उदार वाटावें अशा थाटांत एकतर्फी युद्धबंदी पत्करून ते परत गेले. मात्र त्यांनीं परततांना आपल्याला इशारा दिला, कीं जर त्यांनीं खालीं केलेल्या प्रदेशांत आपण पुन्हा जाऊं तर ते परत आल्याशिवाय रहाणार नाहींत. त्यांचें हेतू सफल झाल्यानंतर तिथें रहाण्यांत तरी काय अर्थ होता ?

पश्चिमी राष्ट्रांत चीनच्या भारतावरील आक्रमणाची प्रतिक्रिया अशी झाली, कीं चीनविषयीं भारताची दृष्टी भ्रामक ठरून त्यांचा चीनबद्दलचा अंदाज खरा ठरला, याबद्दल तिथें कांहीं अंशानें समाधान पसरलें. आतां तरी भारत धडा शिकेल. दुसरी गोष्ट म्हणजे भारत हा आपल्या कल्पना विश्वांतील कृत्रिम जगांत न राहतां, जीवनांतील वास्तव गोष्टींशी मुकाबला करूं लागेल, असें पश्चिमी देशांना वाटूं लागलें. तिसरी गोष्ट अशी, कीं भारत हा आतां आपल्या परराष्ट्र धोरणाचा फेरविचार करील, अशी आशा त्यांना वाटूं लागली. समान शत्रूविरुद्ध भारत व पाकिस्तान हे संयुक्त संरक्षणाची योजना हातीं घेतील, ही अपेक्षा निर्माण झाली. पश्चिमी राष्ट्रें म्हणत होतीं, कीं भारताचा तीन गोष्टींवर विश्वास आहे. पेकिंग कधींहि आक्रमण करणार नाहीं, पश्चिमेकडून मदत न घेतां भारत

स्वत:चें संरक्षण करूं शकेल व चीनविरुद्ध रशिया भारताला मदत देईल. आतां त्यांनीं पाहिलें, कीं या तिन्हीं समजुती चुकीच्या होत्या हें सिद्ध झालें.

अमेरिकन सिनेटर रसेल याच्या म्हणण्याप्रमाणें जी लष्करी मदत अमेरिकेकडून भारताला मिळेल, ती चिन्यांच्या हातीं पडण्याचा धोका आहे, कारण चीनपासून संरक्षण करणें भारताला जमणारें नाहीं.

सोविएट प्रतिक्रिया ही १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर त्यांनीं जें एक विधान केलें, त्यानें चांगली व्यक्त होतें. सोविएट देशानें म्हटलें, कीं चिनी हे त्यांचे भाऊ आहेत व भारतीय हे त्यांचे मित्र आहेत. ( आज ही परिस्थिति राहिलेली नाहीं. )

चिनी सैन्य हें लाटामागून लाटा याव्यात तसें मनुष्यहानीची पर्वा न करतां आलें असें सांगण्यात येतें. खरोखर पाहिलें तर त्यांचें लष्करी डावपेंच हे सर्व बाबतींत सनातन पद्धतीचेच होते. त्यावर फक्त गनिमीकाव्याच्या पद्धतीची छाप होती. जिथें प्रदेश कोंडलेला होता, किंवा आघाड्या अरुंद होत्या, त्याच भागांत फक्त ते लाटांसारखे आले; आणि ते गति येण्यासाठीं व शत्रूच्या गोटांत धडक घेण्यासाठीं. ते नुसते पाशवी बळ वापरीत नव्हते, ते उत्तम डावपेंच लढवीत होते. जर आपण त्यांची युद्धपद्धति ही ठोकळेबाज रीतीनें निकलांत काढणार असलों, तर ती आपली एक ' इच्छित अपेक्षा ' ठरेल इतकेंच.

असें सांगितलें गेलें, कीं चिनी सैनिक हे बिनीच्या प्रदेशांत नि:शस्त्र आले. हे खरें नाहीं. फक्त त्यांच्या सेनेबरोबरचे हमाल नि:शस्त्र होते. ते बिनीच्या तुकड्यांबरोबर आले व त्यांनीं आपल्या मृत सैनिकांचीं मिळतील तीं शस्त्रें वाटेंत उचललीं.

मी ज्या कोअरचा कमांडर नेमला गेलों, तें कोअर रातोरात उभारण्यांत आलें होतें. पुष्कळांना लष्करी शासन नियंत्रणांतच मुळीं संशय होता, कीं खरोखर चिन्यांचा व आपला संघर्ष इतक्या लवकर उडणार आहे कां ? यामुळें आपल्यापैकीं बहुतेकांच्या ठिकाणीं निकड अशी नव्हतीच. पूर्वींच जागें न होतां आपण उशीरा चाळवाचाळव फक्त करूं लागलो—जेव्हां चिनी थाग ला, धोला प्रदेशांत घुसले तेव्हां ! मग घटना इतक्या झपाट्यानें घडल्या, कीं त्यावर आपलें नियंत्रण बसूंच शकलें नाहीं.

आपली लष्करी यंत्रणा व रचना ही डोंगरी युद्धाला पोषक अशी नव्हती. आपण भारतांतील निरनिराळ्या भागांतून अल्पसूचना देऊन सैन्य आणलें. डोंगरांत उंच ठिकाणीं असणाऱ्या हवामानाची, त्यांना संवय नव्हती. ही गोष्ट विचारांत घेतली नाहीं, तरी या घाईघाईनें केलेल्या जमवाजमवीमुळें परिणाम असा झाला, कीं तेथें आलेले अधिकारी व सैनिक हे शारीरिक-दृष्ट्या व मानसिक दृष्ट्याहि त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी पेलण्यास असमर्थ ठरले. बहुतेक तुकड्या तिथें आल्या तेव्हां त्यांच्याजवळ पुरेशीं शस्त्रास्त्रें नव्हतीं, बिनतारी तारायंत्रें, खणण्याचीं साधनें, वस्त्रप्रावरणें अशा प्राथमिक गोष्टीहि त्यांचेपाशीं नव्हत्या.

निरनिराळ्या डिव्हिजन व ब्रिगेड या ऑक्टोबर-नोव्हेंबर १९६२ मध्यें एकमेकांपासून वेगळ्या करण्यांत आल्या. यामुळें पुष्कळ तुकड्यांच्या एक-जिनशीपणावर आघात झाला. उदाहरणार्थ ५ व ११ हीं ब्रिगेडें २ पायदळ डिव्हिजनच्या हाताखालीं देण्यांत आलीं. हीं ब्रिगेडें खरें म्हणजें ४ डिव्हि-जनचीं होतीं व तीं त्याच डिव्हिजनचा भाग म्हणून राहावयास हवीं होतीं. ब्रिगेडमधील बटालियन या देखील एका ब्रिगेडमधून दुसऱ्या ब्रिगेडकडे हालवण्यांत आल्या. यामुळें पथकें व तुकड्या या एकमेकांशीं, अनोळखी माणसासारख्या व्यवहार करूं लागल्या. ही जी पुनर्रचना झाली, ती माझ्यापेक्षा वरच्या अधिकाऱ्यांनीं केली होती.

आपलें हेर खातें हें चिन्यांशीं तुलनेने कमी प्रतीचें होतें. चिन्यांनीं पद्धतशीरपणें भारतांत व विशेषत: नेफा, भागांत आपले हस्तक पेरलेले होते. (आपण असें कांहींच केलें नव्हतें.) या हस्तकांनीं चिन्यांना, मागें माहिती पाठविण्यासाठीं जाळीं विणलेलीं होतीं. या हस्तकानीं आपल्या सैनिकी पथकांतच निरनिराळ्या स्वरूपाच्या नोकऱ्या पत्करल्या होत्या; व नेफाच्या राज्यकारभारांतही ते पसरलेले होते. त्यामुळें चिन्यांना पुष्कळ वेळा आपल्या मोर्चाची व हालचालींची माहिती आगाऊ अचूक कळत असे. अशा तऱ्हेचे कांहींच ज्ञान त्यांच्याबद्दल आम्हांला उपलब्ध होत नव्हतें. कारण आपलें हेरखातें सदोष होतें. नेफांतील स्थानिक जनतेंतील अनेकांनीहि चिनी हस्तकांना साहाय्य दिलें.

चिनी सेना ही रात्रीं अलगद रीतीनें आपल्या विरुद्ध हालचाल करूं शकत

असे. पक्षांचे आवाज, स्थानिक टोळयांप्रमाणें वेष करून वावरणें, हिंदी घोषणा लढाईंत करण्यासाठीं दुभाष्यांचा वापर व आपल्या सैनिकांचे पोषाख घालून आपल्या सैन्याचा गोंधळ उडवणें अशा निरनिराळ्या युक्त्या प्रयुक्त्यांचा उपयोग चिन्यांनीं केला. त्यांचें सैन्य दिवसा एका दिशेनें जातांना दिसे व रात्रीं हल्ला विरूद्ध दिशेनें होई. यानेंहि आमची फसवणूक झाली.

आपली टेहळेगिरीहि प्रभावी नव्हती. चिन्यांची हालचाल आम्हांला कळूं शकत नसें व लडाख नेफाच्या १९६२ च्या या युद्धांत आपण एक देखील चिनी सैनिक कैद करू शकलों नाहीं. त्यानीं मात्र आपली इतकीं माणसें कैद केलीं. चिन्यानीं या कैद्यांकडे प्रथम फारसें लक्ष दिलें नाहीं व जेव्हां पुढें एप्रिलमध्यें कैदी परत करण्याचें त्यांनीं ठरवलें, तेव्हां मात्र त्यांनीं कैद्यांना वागवण्याची पद्धत सुधारली.

चिन्यांनीं आपल्याविरुद्ध अधिक दारुगोळा वापरला. त्यांच्याजवळ स्वयंचलित शस्त्रें व तोफा अधिक होत्या. आपल्या सेनेबरोबर जीं इंजिनिअर पथकें होतीं, त्यांना आवश्यक त्या साधनांचा तुटवडा होता. आपलीं सर्व बिनतारी तारायत्रें व संदेश देण्याचीं यंत्रें हीं जुनीं व वाहून न्यायला जड अशी होती. डोंगरी भागांत वापरायला तीं सुलभ नव्हती. या यंत्रांचे सुटे भाग कमी पडत असत. यामुळें आपली संदेश यंत्रणाहि, पथकें व तुकड्या लढाईंतून माघार घेत असतांना नेमकी बंद पडत असे. चिनी या बिनतारी यंत्रावर फारसे अवलंबून नव्हते. त्यांनीं पक्षांचे आवाज, दिव्यांच्या खुणा अशा सोप्या सोप्या पद्धति यासाठीं वापरल्या. चिन्यांचे भात, मीठ व दूधाशिवाय चहा, येवढ्यावर भागत असे, याउलट आपल्या सेनेला अशा काटकसरीची संवय नव्हती. चिनी सैनिक हे आपलें तीन दिवसांचें अन्न आपल्याबरोबर अशा काटकसरीमुळें वागवूं शकत असत.

आपल्याकडे विमानांची व प्रशिक्षित वैमानिकांची कमतरता होती. आपले विमानतळ हे डोंगरी भागांतील गरजा व परिस्थिति लक्षांत घेऊन बांधलेले नव्हते.

आपले मुलकी हमाल हे शत्रूचा धोका उत्पन्न झाला व लढाईला तोंड लागलें रे लागलें, कीं पळून जात असत. या हमालांवर चिन्यांप्रमाणें आपला

अधिकार चालत नसे. चिन्यांचा चालत असे. कारण मला कळलें, कीं त्यांनीं हमाल हे सैन्य-पथकांतच समाविष्ट करून घेतलेले होते. आपण या हमालांची राहण्याची व्यवस्था केली नव्हती, कीं त्यांना इतक्या उंच ठिकाणीं, गरम कपडयांची सोय केलेली नव्हती. वाहतुकीसाठी जनावरेंहि कमी पडत होती.

आपला हिंवाळी पोषाख हा परिश्रमपूर्वक केलेला अति किचकट असे व पुरेशा संख्येनें तो कधीं उपलब्ध नसे. चिन्यांचा हिंवाळी पोषाख हा आंतून गादीसारखी भर घातलेला असा स्वस्त पोषाख होता. जखमींना रणांतून हलविण्याची आपली व्यवस्था अत्यंत असमाधानकारक होती. ही गोष्ट चिन्यांनीं ज्या संख्येनें आपले जखमी सैनिक परत केले, (ज्यांना-माघार घेण्यापूर्वी आपण मागें ठेवून आलो होतो.) त्यावरून दिसून येईल.

चिन्यांच्या सैन्यांत प्रत्यक्ष लढणारे यांची संख्या शासकीय यंत्रणेंत काम करणाऱ्या माणसांपेक्षां अधिक होती. दुसऱ्या शब्दांत सांगायचें तर त्यांचे 'दांत' पुष्कळ होते व 'शेपुट' आंखुड होतें. त्यांनीं आपल्या बिनीच्या ठाण्यांपर्यंत रस्ते तयार केले होते. यामुळें त्यांची हालचाल त्वरेनें होत असे. चिनी सैनिक हे काटकसरीनें राहात, जलद पुढें सरकत व शारीरिक दृष्टया ते अगदीं तंदुरुस्त होते.

शेवटीं सांगायचें तर या युद्धांत आपण आपल्या हवाईदलाचा पायदळ तुकडयांना साहाय्य म्हणून उपयोग न करण्यांत मोठीच चूक केली. कदाचित असा विचार केला असेल, कीं चिन्यांनीं तिबेट व्यापल्यामुळें, त्यांना हवाई-दलाच्या वापराच्या बाबतींत अधिक सोयीस्कर परिस्थिती उपलब्ध होती. कदाचित भारतीय शहरांवर चिनी विमानें हल्ला चढवतील, या भीतीनें विमानदळ हें या नेफा व लडाखच्या युद्धांत जमिनीवरच खिळवून टाकण्यांत आलें असावें. अर्थात हा सगळा मानीव धोका होता. या धोक्याचें स्वरूप काय, शक्यता काय याची माहिती वादाकरतांहि, कोणत्याच राजकीय आढाव्यांत पुढें मांडण्यांत आली नाहीं.

चिनी विमानांना यासाठीं अतिशय उंचीवरील विमानतळांवरून यावें लागणार होतें व फारसे बॉम्ब बरोबर घेणें त्यांना शक्य नव्हतें. त्यांची फायटर विमानें ही या भागांत येऊं शकली असती कीं नाहीं याचीच शंका आहे. कारण, हीं विमानें इतक्या उंचीवरील विमानतळावरून उतरण्याच्या

व उडण्याच्या तांत्रिक अडचणीमुळें व्यवहार करूं शकत नाहींत. आपल्या हेरगिरी व माहिती खात्याला अर्थांत यांतलें फारसें कांहींच ठाऊक नव्हतें. शत्रूसंबंधी अवास्तव कल्पना करणें, हे आहेत त्या सत्य गोष्टी कमी करून सांगण्याइतकेंच धोकादायक असते.

तिबेटमध्यें चिन्यांनीं हवाई दलाची वाढ किती केली आहे, यासंबंधीं हेरखात्याकडून जें थोडेंसें कळलें, तें कळलें नाहीं असें म्हटलें, तरी या अपेक्षित धोक्याचा संभव, चिन्यांनीं कोडगेपणानें नेफामधील लोंगजूचा तीन वर्षांपूर्वी कबजा केला तेव्हांपासून असतांना, हवाई संरक्षणाची कांहींहि योजना आपण आंखलेली नव्हती. हें आपल्या असामान्य राजकीय मूर्खपणाचें उदाहरण आहे.

जर चिन्यांकडून हवाई हल्ले होण्याचा धोका एवढ्या मोठ्या प्रमाणांत आहे, ही माहिती खरी होती तर मग त्याच्या प्रतिकारार्थ भारतीय विमान दलासाठीं फायटर विमानें मिळवणें, पुरेसें वैमानिक तयार करणें, योग्य त्या ठिकाणीं विमानतळ बांधणें, आहेत ते सुस्थितींत आणणें, या प्राथमिक गोष्टीहि का करण्यांत आल्या नाहींत ? जर ही माहिती खोटी असेल, किंवा अर्धी खरी असेल–आणि ती अर्धी खरी असण्याचीच शक्यता अधिक आहे–तर मग युद्धांत चिनी आक्रमण प्रखर होत असतांना भारतीय विमान दलाला मागें ओढून धरण्यांत, लष्करी दृष्टया किंवा राजकीय दृष्टया काय अर्थ आहे, हें समजत नाहीं. कदाचित युद्ध व्याप्ति वाढेल, हवाई हल्ल्याचा प्रतिसूड घेतला जाईल, या वैचारिक गोंधळामुळें हें घडलें असेल.

सर्व प्रकारचीं विमानें व विमानतळ यांचा आपल्यापाशीं तुटवडा होता. विमानतळावर राडार व इतर आवश्यक यंत्रें पुरेशी नव्हतीं. असा नियम आहे, कीं ज्या वैमानिकानें दोन महिन्यांत विमान चालवलें नसेल, त्यानें पुन: एकट्यानें विमान नेण्यापूर्वी, पुनः एकदां शिक्षकाबरोबर विमान चालवले पाहिजे. अशा तऱ्हेची दोन वैमानिकांची (यांतील एक शिकाऊ) सोय असलेलीं विमानें सुटे भाग पुरेसें नसल्यानें, जमिनीवरच ठेवलेली होती. इतर कांहीं विमानांना दुरुस्ती व्हायची होती. ऑक्सिजन मुखवटे पुरेसे नव्हते; वैमानिकांच्या गणवेषांचा तुटवडा होता. यामुळें वैमानिकदल वाईट स्थितींत होतें. हीच परिस्थिति १९६५ सालींहि साधारणतः होती.

दुर्दैवानें भारतीय विमान दलानेंहि संरक्षणाचा भाग म्हणून सेना कोंडली गेली असतां, शत्रूवर अचानक हल्ला चढवण्याबद्दल फारशी उत्सुकता दाखविली नाहीं. यामुळें दिल्ली सरकारची भीति अधिकच वाढली. जर जमिनीवरील युद्ध चालू असतांना आपलें हवाई दल त्यांत उतरलें असते, तर चीन विरुद्धच्या आपल्या या संघर्षांत आणखी एक नवें अस्त्र आलें असतें. आकाशांत आपलें वर्चस्व आहे कीं नाहीं याचा विचार न करतां जरी हें केलें असतें, तरी १२०००–१५००० फूट उंचीवरील रण-क्षेत्रांत हवाईदल सुस्थितींत ठेवण्यासाठीं चीनच्या दळणवळणावर जो ताण पडला असता, तो निदर्शनास आला असता.

या सर्वाखेरीज, चिन्यांचा भारतीय प्रदेशांतील मोठ्या प्रमाणावरील या प्रदेशाचा, सर्व उपलब्ध साधनांनिशी निकरानें प्रतिकार करण्याची आमची इच्छा व निर्धार आहे हें सर्वांना कळलें असतें हें एक व दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या हवाई संरक्षक साधनांत काय उणीवा आहेत, हे आपल्याला वस्तुनिष्ठ रीतीनें प्रत्यक्ष कळलें असते. वाईटांत वाईट काय झालें असतें, तर आपली इच्छा असती तर आपली हरकत नसेल तोपर्यंत, आपल्या मित्रांची हवाई दलें, सोविएट रशियाला या युद्धांत ओढण्याचा धोका न पत्करता, आपल्या मदतीला आलीं असतीं व लढाईचें क्षेत्र वाढण्याची भीतीहि यामुळें नव्हती.

चिन्यांपासून नेफांचें संरक्षण कसें करतां आलें असतें, यासंबंधीं दोन विचार पुढें मांडले गेलेत, ते माझ्या कानांवर आलेले आहेत. कांहींचें म्हणणें आपण चिन्यांना आपल्या प्रदेशांत खूप आंतल्या रेषेवर खेंचायला हवें होतें. यामुळें त्यांची दळणवळणाची रांग लांबत गेली असती. हें झाल्यावर हे दळणवळण मागून तोडून त्यांचा खात्मा करतां आला असता. कांहींचें म्हणणें तर त्यांना पार सपाटीवर खेचायला हवें होतें व यामुळें तर दळणवळणाची रांग खूपच लांबली असती व त्यांचा नाश करतां आला असता. हें सर्व बोलायलाच सोपें आहे. एक तर चिन्यांनाहि लष्करी डावपेंचांतले कळतें ! ते कांहीं सरळ आपल्या या सांपळ्यांत आले नसते; परंतु समजा ते आले असते, तरी त्यांचे दळणवळण तोडण्यासाठीं आपली कांहीं तयारी असायला हवी ना ? आपण या दृष्टीनें कांहींच पावलें

टाकलेलीं नव्हतीं. प्रबळ अशा शत्रू सैन्याची तयारी न करतां, नाश घडवून आणणें कुठेंहि शक्य नाहीं. आपल्या सरकारचा असा निर्धार होता, कीं धोला थाग-ला भागांतून जिथें ते घुसले होते, तेथून त्यांना हुसकायचे. त्यांच्याशीं इतरत्र लढण्याचा प्रश्नच पुढें आला नव्हता !

आपण कांहीं करायला हवें होतें तें हें, कीं काय घडू शकेल याचा अंदाज घेऊन त्यांना आपल्या मुत्सद्देगिरीनें, कौशल्यानें एकटें पाडायला हवें होतें, किंवा आपली तयारी होईपर्यंत जरी त्यांनीं थाग-ला, धो-ला भागांत आक्रमण केले असलें, तरी तिकडे लक्ष न देतां त्यांना झुलवत ठेवायला हवें होतें. लोंगजू १९५९ सालीं त्यांनीं घेतलें, तेव्हां आपण हेंच केलें. या मधल्या काळांत आपण आपली सैन्यशक्ति वाढवून, परकीय लष्करी मदत मागून घेऊन, शिवाय १९६३ मधें केलें त्याप्रमाणें मित्र राष्ट्रांकडून आणीबाणी निर्माण झाल्यास हवाई छत्री उपलब्ध करून, आपल्या मदतीला ते येतील, अशी व्यवस्था करायला हवी होती. तोंपर्यंत उत्तम शिक्षण देऊन आपली सेना सरहद्दीवर योग्य त्या ठिकाणीं तयारींत ठेवून, चिन्यांना आपण ठरवू त्या रणक्षेत्रांत लढायला लावायला हवें होतें.

सारांशानें म्हणायचें तर, चिन्यांनीं युद्धासाठीं संपूर्ण तयारी केलेली होती व आपण केलेली नव्हती. चिनी किंवा इतर कुणाविरुद्ध यापुढें जेव्हां लष्करी कृति करण्याचा प्रसंग येईल तेव्हां त्यापूर्वींच आपण त्यांच्या युद्धाची पद्धत अभ्यासली पाहिजे, गनिमी काव्याचें पुरेसें शिक्षण आपल्या सेनेला दिलें पाहिजे, काटकसरीनें राहणें शिकलें पाहिजे. कमींत कमी अन्नावर हालचाली करणें जमलें पाहिजे व वेळच्या वेळीं हव्या त्या ठिकाणीं सैन्य पोहोंचेल याची काळजी घेतली पाहिजे. सैन्य संख्या पुरेशीं असायला हवी. या सेनेला हवाई, चिलखती दलाचा, तोफखान्याचा, इंजिनिअर पथकांचा, दळणवळणाच्या साधनांचा उत्तम आधार असायला हवा. आपल्या सेनेला केवळ पुरेशीं शस्त्रें नको आहेत; किंवा सामुग्री नको आहे तर त्यांच्या मानसिक दृष्टिकोणांत मूलभूत बदल व्हायला हवा आहे. या आपल्या सेनेंत उभारी व जोम निर्माण करून अखेरपर्यंत लढण्याची जिद्द निर्माण करण्याची गरज आहे. अशा या सुसज्ज सेनेच्या पाठीशीं शब्दानें व कृतीनें एकदिलानें उभे राहण्याची क्षमता आपल्या देशांत वाढीस लावली पाहिजे.

भारताला यापुढें आपल्या सरहद्दीच्या संरक्षण योजनांत, आपले शेजारी कोण आहेत व या प्रत्येकाशीं भारताचें काय नातें ठेवलें पाहिजे, याचाहि विचार करावा लागेल. चाणक्य-यालाच कौटिल्य असेंहि म्हणतात. यानें दोन हजार वर्षांपूर्वी शेजाऱ्याविषयीं म्हटले आहे— 'जो कुणी राजा हा जेत्याच्या ताब्यांतील प्रदेशाच्या सरहद्दीला लागून असतो, तो त्या जेत्याचा शत्रू होय; जो दुसरा राजा अशा तऱ्हेनेंच या शत्रू राजाच्या सीमेला लागून असतो परंतु केवळ मध्यें असलेल्या शत्रूमुळें जो वेगळा पडलेला असतो, तो दुसरा राजा त्या जेत्याचा मित्र समजावा.'

जेव्हां माझ्या आटोक्याबाहेर परिस्थिति गेल्यानें नेफा पडलें, तेव्हां ज्यांनीं माझ्या बाजूनें उभें राहायला हवें होतें. त्यांनीं मला दगा दिला. ज्या अडचणींना त्यावेळीं मला तोंड द्यावें लागलें, त्या परिस्थितिसंबंधीं व दारुण परिस्थितींतून मार्ग काढण्याचा मी प्रयत्न केला, त्या संबंधी, कुणी कांहीं विचार करीत होते, कीं नाहीं, हें मला ठाऊक नाहीं. लढाईंतील जय-पराजय हे त्या खेळाचेच भाग असतात. नेफामध्यें जें घडलें त्याच्या जबाबदारींत जाहीर रीतीनें वांटा उचलण्याची कुणाची तयारी नव्हती. मला तर नेफांत अगदी आयत्या वेळीं व विपरीत परिस्थितींत पाठविण्यांत आलें होतें. माझे टीकाकार एका सुरांत माझे द्वेषस्तोत्र घुमवीत होते. त्यांनीं मला नेफामधील पराभवाचा प्रमुख शिल्पकार म्हणून दोषी ठरवलें होतें. आयुष्यभर इमानानें देशाची व सैन्याची सेवा केल्यानंतर माझी प्रतिष्ठा व लष्करी मानमरातब हे सर्व आज पायाखालीं तुडवण्यांत येत होते; व पद्धतशीर रीतीनें द्वेषमूलक अशी चिखलफेंक सुरू झाली होती. माझ्याविरुद्ध सर्व ठिकाणीं जोराची कुजबूज सुरू करण्यांत आली. यांत इतर गोष्टींबरोबर असेंहि सांगण्यापर्यंत मजल गेली, कीं नेफाच्या लढाईंत मी आपल्या सेनेला हेतुतः अपायकारक वागलो. अकारण माझी अशी अवहेलना चालू झाल्यानें मला ती सहन करणें अशक्य झालें व या हलकटपणाशीं जमवून घेण्याचें मी नाकारलें. मला वाटलें, कीं लष्करी पेशाला रामराम–ठोकण्याची निकडीची वेळ आतां आली आहे. अशा तऱ्हेच्या परिस्थितींत अशी मनःस्थिति होणारा मी कांहीं पहिलाच सैनिक नव्हतो.

माझें दैव व दुष्मन यांनीं माझ्याविरुद्ध संगनमत केलें. मीदेखील मानवी मातीचाच असल्यानें मला ही परिस्थिति असह्य झाली. शिवाय नोकरीच्या शृंखला व शहाजोग पद्धति, यामुळें कांहीं महत्त्वाच्या गोष्टी लोकांच्या नजरेस आणून, माझी बाजू स्पष्ट करण्याची संधि मला मिळणार नव्हती. मला यासाठीं मुक्त होणेंच भाग होतें. मी म्हणूनच माझा आवडता लष्करी पेशा सोडून देण्याचें ठरवलें. युद्धबंदी होऊन युद्ध संपलेलें होतें; लढाई चालू असतांना मी हें पाऊल उचलीत आहे, अशी टोंचणीहि आतां नव्हती.

तीन एक दिवस विचारांत घालवून मी माझा विश्वासू अुपअधिकारी ब्रिगेडियर आय्. डी. वर्मा यांना बोलावलें व निवृत्ति-वयापूर्वीच निवृत्त होण्यासाठीं, माझा विनंती अर्ज टंकलिखित करण्यास सांगितला. हा अर्ज मला अशा भाषेंत हवा होता, कीं त्यावर वादंग होऊं नये. मी यांत लिहिलें, कीं नेफांतील पराभव हा शत्रूजवळ आपल्यापेक्षां अधिक सैन्यसंख्या असल्यामुळें, त्यांच्या जवळच्या अधिक चांगल्या शस्त्रांमुळें व त्यांच्या अुत्तम तयारीमुळें झाला असला, तरी तो मी तेथें कमांडर असतांना झाला आहे व त्यामुळें माझें सैन्यांतील स्थान राहूं शकत नाहीं. अशा वेळीं मी राजीनामा देणें, हेंच पेशाच्या हिताचे व लष्करी पेशाच्या परंपरेला धरून होईल

अमेरिकन सेनेचे जनरल ॲडमस् व ब्रिटिश सेनानी जनरल हल यांनीं माझ्या मुख्य ठाण्याला, मला वाटते २५ नोव्हेंबरला— लेफ्टनंट जनरल सेन यांचेसह भेट दिली. या दोघा परदेशीय जनरलना चालू परिस्थितीचें चित्र सांगितल्यानंतर, मी लेफ्ट. जनरल सेन यांना बाजूला नेलें व माझी निवृत्त करण्याविषयीची लेखी विनंती त्यांचें हातीं ठेवली.

तीन दिवसांनीं, ४ कोअरच्या माझ्या सहकारी अधिकाऱ्यांचा मी निरोप घेतला; व दिल्लीला जाण्यासाठीं मी तेजपूरच्या विमानतळावर आलों तेव्हां माझा कंठ दाटून आला. माझ्याबरोबर जी मंडळी दिल्लीला निघाली होती, त्यांत डॉक्टर होतेच. आर्मी मेडिकल कोअरचे मेजर–खन्ना. कारण मला पुनः बरें वाटत नाहींसें झालें होतें.

मी 'सोपा मार्ग' पत्करला, असें माझे कांहीं समकालीन म्हणाले. हा ज्याच्या त्याच्या मताचा प्रश्न आहे. मला वाटतें, जी अधिकाराची जागा'

अजून तुमच्याकडे राहूं शकली असती, ती सोडणें ही सोपी गोष्ट नाहीं. शिवाय विवक्षित परिस्थिति ही कांहीं जणांना सहन करतां येते, इतरांना नाहीं करतां येत. कांहीं असलें तरी केवळ तर्कानें अशा गोष्टीचे निर्णय होत नाहींत.

मी कांहीं तासांनीं दिल्लीला विमानांतून उतरलो. माझी पत्नी, मेजर जनरल धीलाँ, ब्रिगेडियर पंचनद व कर्नल खन्ना यांनीं माझें उतरल्यावर स्वागत केलें. धन्नोला, मी निवृत्त करण्याची विनंती सरकारला केली आहे, ही गोष्ट मी भेटल्यावरच कळली. तिनें सस्मित मुद्रेनें याला संमति दाखविली.

मी आल्याची बातमी पसरली. अनेक जण मला भेटायला आले. राजकारणी लोक, लोकसभेचे कांहीं सदस्य, मुलकी व सनदी अधिकारी, नातेवाईक व मित्र असे सर्व आले. सर्वांनीं मला आग्रह केला, कीं मी निवृत्त करण्याची विनंती मागें घ्यावी. अनेकांनीं मला पत्रानें हेंच लिहिलें. माझा शूर मित्र मेजर जनरल रायविंदसिंग गरवाल यानें लिहिलें--

'तुम्ही जात आहांत हें कळल्यावर आम्हीं कांहीं जण अस्वस्थ झालों. मी छोटा माणूस आहे व वरच्या श्रेणीच्या राजकारणांत मला रस नाहीं. परंतु या वेळीं तुमच्यासारखा अतिशय प्रामाणिक माणूस गेल्यानें सैन्याचें नुकसान होत आहे. मी कांहीं तुमची स्तुती करण्याचा प्रयत्न करीत नाहीं, पण मी हें नक्की सांगतो, कीं तुम्हांला निघून जाऊं दिलें, तर हें सैन्य अधिक दीनवाणें होईल...तुम्ही अजून रजेवर आहांत माझी तुम्हांला प्रार्थना आहे, कीं तुम्ही सैन्यांतून निघून जाण्याच्या आपल्या निर्णयाचा फेरविचार करा...कांहींना तुम्ही आवडत नसाल. काय बिघडलें ? आम्हांला ठाऊक आहे, कीं तुम्ही भ्याड तर नाहीं.'

माझ्या पत्नीचें माझ्यासारखेंच मत पडलें, कीं मी खंबीर राहून कसल्याहि परिस्थितींत घेतलेला निर्णय बदलूं नये.

वृत्तपत्रांत सणसणाटी बातमी आली, कीं मला 'अधिकारांतून मुक्त करण्यासाठीं' चौधरी हे स्वत: तेजपूरला गेले आहेत. प्रत्यक्षांत चौधरी व माझ्या जागेवर येणारे माणेकशा हे तेजपुरला, मी तेजपूर सोडल्यानंतर पोहोंचले. त्यांचा मी निघण्यापूर्वीं पोहोंचण्याचा मुळीं इरादाच नव्हता. मी

स्वत:च निवृत्ति मागितली आहे ही गोष्ट वृत्तपत्रांत थोड्या उशीरानें आली.

नेहरूंचें मला दिल्लीला गेल्यावर निमंत्रण आलें. मी समोर गेलो तेव्हां ते पुतळ्यासारखे स्तब्ध होते.

'बिजी, मला तुम्हांला काय वाटतें आहे याची कल्पना आहे. पण तुम्ही राजीनामा द्यायला नको होता. राजीनामा कशाला दिला?' त्यांनीं विचारलें.

'सर, याला पुष्कळ कारणें आहेत. परंतु त्यांची चर्चा करण्याची माझी इच्छा नाहीं.'—मी उत्तर दिलें.

'तुम्हांला नेमकें काय म्हणायचंय?' नेहरूंनीं पृच्छा केली. 'तुम्हांला सैन्य सोडण्याची गरज नाहीं. मला माहीत आहे, कीं तुमच्या बाबतींत बऱ्याच अन्यायकारक गोष्टी–बोलल्या गेल्या आहेत. परंतु माझा त्यांच्या-वर विश्वास नाहीं, इतर अनेकांचाहि नाहीं. मी जाहीरपणें एकापेक्षां अधिक वेळां तुमची तरफदारी केलेली आहे. तुमचे पुष्कळ मित्र आहेत, ते तुमची किंमत ओळखतात. तुम्ही पुन: विचार केला पाहिजे.'

—नेहरूंनीं बोलणें संपवलें.

[८ नोव्हेंबर १९६२ ला माझ्याबद्दल नेहरूंनीं लोकसभेंत सांगितलें होतें; 'नेफांतील आपले कमांडर जनरल कौल यांच्याविरुद्ध ज्या लोक-विलक्षण गोष्टी बोलल्या जात आहेत, त्या अन्यायकारक आहेत. धैर्य, हिंमत व कष्ट एवढ्यांचा जरी विचार केला, तरी या बाबतींत त्यांना मागें सारणारा कुणीं असेलसें मला वाटत नाहीं.']

मी ४ डिसेंबरला जनरल चौधरी यांना भेटायला गेलो. माझें औप-चारिक स्वागत करून, हातांतल्या सिगारेटचा झुरका घेत, खोलींत फेऱ्या मारीत ते मला चुचकारल्यासारखे म्हणाले–

'आपल्यापैकीं सर्वांनाच बिजी, केव्हां केव्हां दुर्दैव गांठतेंच. तुम्ही जर निवृत्तीसाठीं केलेल्या विनंतीचा आग्रह धरला नाहीं, तर मी तुम्हांला पुन: सेनादलांत योग्य तें स्थान मिळवून देईन.'

मला ते आमीष दाखवीत होते, कीं त्यांच्या उपकाराची मी वाट पाहात राहावें. माझ्या मनांत या वेळीं कांहीं जुन्या आठवणी उफाळून आल्या.

१९५९ सालीं मला कळलें, कीं चौधरी यांना हृदयविकाराचा झटका आला आहे. मी त्यांना सहानुभूति व्यक्त करणारें पत्र पाठविण्याची तातडी केली. या पत्राला उत्तर म्हणून त्यांनीं १२ जानेवारी १९६० ला मला एक लांबलचक गडबडगुंडा पत्र लिहिलें. त्यांत जोर याचेंवर होता, कीं त्यांना हृदयविकार झालेला नाहीं. या पत्रांत त्यांनीं मला पुष्कळच खोंचक लिहिलें होतें. या पत्राला मी खालील उत्तर धाडलें होतें.––

'तुम्ही तुमच्या प्रकृतीवर जें मोठें भाष्य मला पाठवलेंत, तें पाहून मी आश्चर्यचकित झालो. तुम्ही माझ्या पत्रांतील दोन वाक्यांतून फारच सूचक अर्थ काढला आहे... तुम्ही जें कांहीं लिहिलें आहे, त्यावरून पाहतां मी तुमच्या प्रकृतीची चौकशी केली याबद्दलच मला दुःख होतें आणि यापुढें आपल्या प्रकृतीची कांहींहि चौकशी मी करणार नाहीं...'

१६ जानेवारी १९६० ला चौधरी यांचेकडून या माझ्या पत्राला खालील उत्तर आलें.

'माझ्या १२ जानेवारी १९६० च्या पत्रानें तुम्हांला राग आला, याचें मला कांहींसें दुःख होतें आहे. खरें पाहतां मी तें अशा करतां लिहिलें, कीं तुम्ही मला मदत कराल...मला वाटलें, कीं माझे हितचिंतक म्हणून, माझ्या आजारासंबंधीं संपूर्ण हकिगत तुम्हांला कळवली, तर तत्संबंधीं अफवांना तुम्ही उत्तर देऊं शकाल. त्यांत मी माझें जीवितविषयक तत्वज्ञान अशासाठीं सांगितलें, कीं माझ्यावर महत्त्वाकांक्षी असल्याचा जो आरोप होतो, त्याचें निराकरण तुम्हांलाहि करतां येईल. मी कधीं कुणाला 'भाष्य' ऐकवलेलें नाहीं व आतां या गोष्टीला सुरुवात करणें म्हणजे फार उशीर झाला असें होईल. निदान तुमच्यासारख्या माझ्या जुन्या मित्रापुढें तरी मी 'भाष्य' करणार नाहीं.

मला वाटतें यामुळें सर्व गैरसमज दूर होईल.

माझ्या नेहमीच्या शुभेच्छा.'

आपला प्रामाणिक

मुचू चौधरी.

१९६१ मध्यें त्यांनीं त्यांच्याविषयीं योग्य त्या ठिकाणीं शब्द टाकण्यासाठीं मला जी विनंती केली होती ती या वेळी मला आठवली.

हेच चौधरी मला आतां सांगत होते, कीं जर मी सेनेंतच राहिलो तर ते माझें पुनर्वसन करतील ! एक दीर्घ निश्वास मी टाकला, राग आवरला व थंड अशा मोजक्या आवाजांत म्हणालो—

'दुर्दैवानें मला गांठलें, हें आपण मानतां, याचा मला आनंद आहे. तुम्हांला माहीत आहे, कीं मी कधीं डचमळत नाहीं.'

तीन दिवसांनीं संरक्षण मंत्री चव्हाण (मेननंतर चव्हाणांकडे संरक्षण मंत्रीपद आलेलें होतें.) यांनीं मला बोलावलें. चौधरी माझेबरोबर होतेच. चव्हाणांनीं मला विचारलें, कीं माझा निर्णय पक्का आहे कां ? मी म्हटलें हो. त्यावर ते म्हणाले, कीं माझी विनंती ते नेहरूंकडे धाडीत आहेत.

नेहरूंनीं मला पुन: बोलावलें, तें म्हणाले कीं, मी चव्हाण व मेनन यांना असें सांगितल्याचें कळतें, कीं मी जाण्याचें मनानें नक्की केलें आहे. ते म्हणालें कीं, चौधरी यांनीं माझ्याविरुद्ध एक लांबच लांब निंदावजा टिपण पाठवलें आहे व त्यांत माझ्याविरुद्ध अनेक प्रकारचे आरोप करण्यांत आलेले आहेत, मात्र ते सिद्ध केलेले नाहींत.

जेव्हां नेहरूंनीं मला चौधरींचे माझ्याविरुद्ध जे दोषरोप होते, त्याचा गोषवारा सांगितला, तेव्हां मी थक्क झालो. माझ्या तोंडावर हे आरोप करण्याचें धैर्य त्यांच्यापाशीं नव्हतें. नेहरू म्हणालें कीं, चौधरी यांनीं माझे सेवाटिपण मात्र पाठवलेलें नाहीं, जें त्यांनीं माझ्या विनंती अर्जाबरोबर नियमानुसार धाडायला हवें होतें. यावरून त्यांनीं केलेल्या आरोपांची शहानिशा होऊं शकली असती. यापूर्वीं चौधरी यांनीं मला जे उत्तम वार्षिक शेरे दिले होते, ते नेहरूंच्या नजरेस पडूं नयेत अशी चौधरींची इच्छा होती. कारण ते चौधरी यांनीं माझ्यावर केलेल्या आरोपांशीं विसंगत ठरले असते. शिवाय नुकत्याच झालेल्या पराभवाची देशांत जी प्रतिक्रिया झाली होती, त्यांतील मुद्दाम निर्माण केलेल्या सनसनाटी प्रचारामुळें नेहरूंना उबग आलेला होता व माझ्या बाबतींत या वेळीं कांहीं प्रकरण निर्माण करण्याची त्यांची इच्छा नव्हती. ते मला शेवटीं म्हणालें कीं, या सर्व चमत्कारिक घटनांच्या पार्श्वभूमीवर त्यांनीं नुकतीच माझ्या अर्जावर (होकाराची) स्वाक्षरी केली होती, याबद्दल ते दिलगीर होते. मी सांगितलें कीं, ज्या बिकट परिस्थितींत ते सांपडले आहेत, त्याची मला कल्पना आहे व या गोष्टीचें त्यांनीं मनाला लावून घेऊं नये.

( माझ्या वार्षिक सेवा टिपणांत (कॉन्फिडेन्शीयल रिपोर्ट ) चौधरी यांनीं वर्षानुवर्षे मला चांगले उत्तम शेरे दिलेले होते. उदाहरणार्थ एक वर्षी त्यांनीं लिहिलें होतें कीं, माझी सचोटी संशयातीत आहे. मी आधिपत्य करण्यास व शासकीय कारभार करण्यास अतिशय लायक आहे वगैरे. एकिकडे मला वर्षानुवर्षे अशा तऱ्हेनें तोंडीं व लेखीं स्तुतीसुमनें देऊन व शेवटीं माझ्या पाठींत आज असा खंजीर त्यांनीं खुपसला होता ! ढोंगीपणाचें हें नमुनेदार उदाहरण आहे. )

माझ्या मित्रांनीं, तसेंच अमेरिकन वकील गालब्रेथ, राष्ट्राध्यक्ष राधाकृष्णन् यांनीं-ज्यांचा मी अे. डी. सी. जनरल होतो तसेंच 'नेहरूनंतर कोण ?' या आपल्या पुस्तकांत माझ्यावर एक प्रकरण लिहिणारे वेल्स गेन, या सर्वांनीं मला राजीनामा मागें घेण्याची विनंती केली– परंतु त्याचा माझ्यावर परिणाम झाला नाहीं.

याच सुमारांस 'रीसी हालसी एजन्सी' या लॉस अेंजल्स येथील एजन्सीनें प्रसिद्ध करण्याजोगी व चित्रपट तयार होऊं शकेल अशी, माझी अनुभवकथा मागितली. मी ती दिली नाहीं.

११ डिसेंबरला जनरल चौधरी यांचा मला घरीं फोन आला व त्यांनीं कळवलें, कीं सरकारनें माझ्या निवृत्तीची विनंती स्वीकारली आहे. माझा लष्करी पेशा अशा रीतीनें पन्नासाव्या वर्षीच संपुष्टांत आला. मला आतां या वातावरणापासून, या लोकांपासून दूरवर जाण्याची प्रबळ इच्छा झाली होती. कारण माझा यांच्याविषयीं भ्रमनिरास झाला होता.

एका उर्दू कवीच्या दोन ओळींची मला या वेळीं आठवण झाली.

'गरदिश्-ई-अयम् तेरा शुक्रिया
हमने हर पहलूसे देनिया देख ली।'

(दैवाच्या लहरी आतां पुरे झाल्या, मी जीवनाचीं सर्व अंगें आतां पाहिलीं आहेत.)

५ यॉर्क रोड यथील निवास मी सोडण्याचें ठरविलें व मला इतरत्र देऊं करण्यांत आलेली जागाहि मी नाकारली. आतां माझ्या स्वत:च्या खासगी जागेंतच जाण्याचें मी ठरवलें. माझी प्रकृति बिघडत होती व माझ्या मुलीलाहि पुनः बरें नव्हतें.

मी १८ डिसेंबर १९६२ ला नेहरूंना निरोपाचें पत्र लिहिलें. त्याला त्याच दिवशीं नेहरूंचें उत्तर आलें,

प्रिय बिजी,

तुम्ही निवृत्त होत आहांत याचें वाईट वाटतें. मी तुम्हांला हें करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला परंतु तुमचा ठाम निश्चय दिसला व मला अधिक कांहीं करतां आलें नाहीं. ज्या घटनांमुळें ही वेळ तुमच्यावर आली. त्या सर्व शोचनीय आहेत व त्यांनीं आमच्यापैकीं अनेकांनाहि दुःख दिलें आहे. माझी खात्री आहे, कीं याचा दोष विशेषेकरून तुमच्यावर येतो असें नाहीं. पुष्कळ व्यक्ति व कदाचित् परिस्थितीच याला कारणीभूत असेल.

माझा विश्वास आहे, कीं तुमच्यासारखा उत्साही व देशप्रेमी माणूस देशाकरतां कांहींच न करतां स्वस्थ बसणें शक्य नाहीं. कदाचित् कालांतरानें तुम्हांला असें करण्यासारखें काम आढळेल......

आपलें प्रेम इच्छिणारा,
जवाहरलाल नेहरु.

( ऑगस्ट १९६३ मध्यें नेहरूंनीं लोकसभेंत जाहीर केलें, कीं १९६२ मध्यें चिन्यांविरुद्ध झालेल्या आपल्या लष्करी पराभवाचा दोष सेनेंतील अधिकाऱ्यांवर लादतां येणार नाहीं. त्यांनीं २२ डिसेंबर १९६२ ला मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या मासिक पत्रांत लिहिलें, कीं जनरल थापर व कौल यांनीं स्वतः होऊन सेनेंतून निवृत्ति पत्करली ही गोष्ट त्यांनीं सन्माननीय अशीच केलेली आहे. )

११ जानेवारीला मी ५ यॉर्क रोड हा निवास सोडणार होतो. एका सायंकाळीं नेहरूंनीं मला व अनुला घरीं बोलाविलें. अनुला बरें नव्हतेंच. तिला चुचकारून ते म्हणाले– 'आतां तुला स्वतःची व वडिलांचीहि काळजी घ्यायला हवी.' मग अचानक, आपल्या भावनांचा उद्रेक आवरण्यासाठीं ते उभे राहिले व दालनाबाहेर निघून गेले. १० तारखेला श्रीमती इंदिराजी गांधी, ५ यॉर्क रोड येथें येऊन गेल्या.

मी ११ जानेवारीला घर सोडीत होतो. सामान बाहेर येत होतें. ट्रक भरली जात होती. तेवढ्यांत दारावरून लग्नाची मिरवणूक जातांना दिसली. अशा परस्पर विसंगत गोष्टी घडतांना आपण नेहमींच पाहतो.

मी कांहीं दिवस मेजर जनरल भगवति यांचेकडे राहिलो. मग मी ग्रँट ट्रक रोडनें माझ्या मोटारींतून निघालों. वाटेंत मथुरेला मुक्काम केला. इतर कांहीं ठिकाणीं राहिलों. अशा तऱ्हेनें कांहीं आठवडे निर्हेतुक भटकंती करून मी माझ्या नात्यांतील लग्नाकरतां दिल्लींत परत आलो. या लग्नाला नेहरू आलेले होते. ते मला तिथें भेटले व त्यांनीं विचारलें, कीं मी दिल्लींत सध्यां कुठें राहतो ? मला माझें घर नसल्याचें मी सांगितलें व म्हणालो, कीं मी 'गीता आश्रमां'त राहतो. त्यांना दुःखमिश्रीत आश्चर्य वाटल्याचें चेहऱ्यावरून दिसलें.

कांहीं दिवसांनीं नेहरूंचें बोलावणें आलें. ते म्हणालें, कीं सिमला येथें हिमाचल प्रदेशाचें राज्यपालपद मला मिळण्याचा संभव आहे. याविषयीं मी पुढें कांहींहि ऐकलें नाहीं. त्यावरून ही सूचना कांहीं कारणानें बारगळलेली दिसते.

उन्हाळा सुरू होत होता. आश्रमांत राहणें आरामाचें नव्हतें. विशेषत: मी आणि मुलगी आजारी असतांना ! जे दिवस मी पाहिले होते त्यांच्याशीं या दिवसांची तुलनाच होऊं शकत नव्हती. आतां मी देशकारणांत गुंतलेला नव्हतो. मला अधिकार नव्हता, कीं प्रतिष्ठा नव्हती. खासगी नोकरवर्ग नव्हता. दाराशीं रक्षक नव्हते. महत्त्वाच्या समारंभांना आतां निमंत्रणें येत नव्हतीं. आतां कुठल्याहि सामाजिक संस्थांना मी अध्यक्ष, सभाध्यक्ष्य, प्रमुख हितचिंतक म्हणून नको होतो. सगळी धांदल संपली होती. वर्षांनुवर्षें घड्याळाच्या कांट्यावर काम केल्यानंतर आतां वेळ मला खायला उठत होता. माझी ही अवस्था पाहून आतां माझ्याकडे कुणी वळत नव्हतें, याचें वाईट तर वाटत असेंच. मित्रांपैकीं बहुतेकांनीं आपलें प्रेम कायम ठेवलें असलें, तरी कांहीं चंचल संधिसाधू दंवबिंदूसारखे अदृश्य झाले होते. यामुळें मला एकटेपणा व उदासिनता वाटूं लागली. कांहीं प्रयत्नानंतर अर्थातच मी व धन्नो या आयुष्याला सरावलों. जर भोंवतालच्या परिस्थितीशीं जमवण्याची सक्तीच झाली, तर माणूस किती लवकर आश्चर्यजनक रीतीनें तिच्याशीं समरस होतो !

यावेळीं माझे शत्रू आनंद मानीत असतांना, माझी पत्नी हीच माझा आधार ठरली. एखाद्या खडकासारखी ठाम ती माझ्या शेजारीं उभी राहिली.

जें झालें त्याबद्दल तिनें कधीं दुःख प्रदर्शित केलें नाहीं व जें वांटयाला आलें, तें तें तिनें उदारपणें स्वीकारलें. तिनें यापूर्वी कधीं फारसें कांहीं मागितलेंहि नव्हतें. साधेंसुधें देवभक्तीचें, निस्वार्थीपणें काम करीत राहण्याचें जीवन तिनें वरलें होतें. ती पावित्र्यांतली पवित्रता आहे व माझा सर्वांत मोठा जीवनाधार आहे.

२४ एप्रिल १९६३ रोजीं मी 'चीफ ऑफ जनरल स्टाफ' यांना एक अधिकृत पत्र लिहिलें; (हें चौधरी यांनीं वाचलें.) यांत मी लिहिलें, कीं नेफामधील लष्करी पराभवाची लेफ्टनंट जनरल हेंडरसन ब्रुक्स हे चौकशी करीत असल्याचें मला कळलें आहे, त्यांच्यासमोर माझ्या हाताखालीं काम केलेल्या पुष्कळ कमांडरांच्या व शासकीय अधिकाऱ्यांच्या साक्षी झालेल्या आहेत, तेव्हां त्यावेळीं मी नेफामध्यें कोअर कमांडर असल्यानें मलाहि साक्षीला बोलावण्यांत यावें. मी पुढें लिहिलें, कीं या चौकशी समितीचे निष्कर्ष हे पुढें लोकसभेंत चर्चेचा विषय होण्याची शक्यता आहे व वृत्तपत्रांतूनहि त्याविषयीं मजकूर अपेक्षित आहे. माझी लष्करी प्रतिष्ठा यांत गुंतली असल्यानें व माझ्यावर वृत्तपत्रांत व इतरत्र बरेच दोषारोप झालेले असल्यानें माझी विनंती आहे, कीं, मला हेंडरसन ब्रुक्स यांना, त्या परिस्थितिसंबंधींची माझी प्रतिक्रिया सांगण्याची संधि मिळावी.

चौधरींनीं मला 'चीफ ऑफ जनरल स्टाफ' मार्फत कळवलें, कीं दुसऱ्या दिवशीं जालंदर येथें नेफा चौकशी समितीपुढें मी साक्ष देऊं शकतो.

परंतु मी जेव्हां लेफ्ट. जनरल हेंडरसन ब्रुकस् यांना भेटायला गेलो, तेव्हां ते म्हणाले, कीं माझी तोंडी जबानी घेऊं नये अशी आज्ञा आलेली आहे. म्हणजे हेंडरसन ब्रुकस् यांचेपुढें तोंडी साक्ष देण्यासाठीं चौधरी यांनींच मला जालंदरला यायला सांगितलें व आतां हेंडरसन ब्रुकस् सांगत होते कीं, तोंडी जबानी घेऊं नये अशी आज्ञा आहे! याचें तांत्रिक किंवा बाह्यात्कारी कारण हें असूं शकेल, कीं हेंडरसन ब्रुकस् हे लेफ्टनंट जनरलच्या श्रेणींत मला कनिष्ट होते व ते माझी 'जबानी' कशी घेणार किंवा मी नेफासंबंधीं माझा दृष्टिकोण यापूर्वीच लेखी दिलेला असल्यानें, आतां माझेकडून आणखी कांहीं साक्ष त्यांना नको होती. हें म्हणणें जर खरें असेल, तर मग चौधरी यांनीं मला जालंदरला हेंडरसन ब्रुक्स यांचेकडे पाठवले तें कशाकरतां? मी दिल्लीहून जालंदरला निघण्यापूर्वीच त्यांना हें मला सांगतां आलें असतें.

म्हणजे ज्या चौकशी समितीचे निष्कर्ष लोकसभेंत चर्चेला येणार होते, ती समिती तेथील कोअर कमांडरविरुद्ध इतकें बोललें गेलें असतां, त्याची तोंडी जबानी घेण्यास मात्र तयार नव्हती. ही सवलत ज्यांनीं माझ्या हाताखालीं काम केलें त्यांना मात्र देण्यांत आली. मी नेहरूंना या प्रकाराची माहिती लिहून कळवली.

(नेफा चौकशी समितीचा अहवाल आजतागायत प्रसिद्ध कां केला जात नाहीं ? या अहवालांत, या शोचनीय घटनेबाबत सरकारची जी जबाबदारी होती, त्या संबंधीं पंचायतींत टाकणारे कांहीं सदर्भ आले आहेत, कीं काय ?)

मी हेंडरसन ब्रुकस् यांना सुचवलें, कीं जर माझी तोंडी जबानी ते घेऊं शकत नसतील तर नेफामधील लढाईची माझी प्रतिक्रिया मी लिहून समितीला सादर करतो. त्यांनीं ही सूचना मान्य केली कारण याविरुद्ध आज्ञा नव्हती. मी त्यांना लेखी निवेदन दिलें.

मी मे १५, १९६३ ला निवृत्त होणार होतो. तत्पूर्वी सेना प्रमुखांना भेटून त्यांचेमार्फत सैन्याचा निरोप घेण्यासाठीं मी चौधरींच्या कार्यालयांत गेलों. मी आंत शिरून सलाम करतांच ते उठून माझ्या दिशेनें आले व त्यांनीं आदरानें माझें स्वागत केलें. मीं निरोप घेण्याकरतां आलों आहे, हें सांगितल्यावर त्यांनीं माझ्या या तसदीबद्दल प्रसन्नता दाखवली. ते म्हणालें, कीं त्यांना एक प्रश्न मला विचारावयाचा आहे. मी म्हणालों, कीं मी नोकरीच्या या शेवटच्या दिवशीं, प्रश्नांचीं उत्तरें देण्याकरितां कांहीं आलेलों नाहीं. पण जर त्यांचा आग्रह असेल तर मी प्रयत्न करतो. त्यांनीं विचारलें, कीं जर पुरेशीं साधनसामुग्री नसतांना १९६२ सालीं चिन्यांना हुसकण्याची कामगिरी सेनेला सांगण्यांत आली होती, तर थापर किंवा मी यांनीं टेबलांवर मूठ आपटून सरकारला स्पष्ट नकार कां दिला नाहीं ? मी त्यांना योग्य तें उत्तर दिलें.

एप्रिल १९६३ मध्यें दिल्लीला एका खान्याच्या प्रसंगीं तेजा मला भेटले. मी त्यांना कधीं भेटलो नव्हतो, किंवा त्यांचें नांवहि ऐकलें नव्हतें. या भेटीच्या वेळीं ते म्हणाले, कीं १९६२ मध्यें केव्हां तरी मी त्या वेळीं सेना सेवेंत असतांनाच ते मला भेटण्यासाठीं माझ्या घरीं आले होते, परंतु मी

त्या दिवशीं आजारी असल्यानें भेट होऊं शकली नव्हती. तेजा यांनीं मला परदेशांत नोकरी देऊं केली. या नोकरीचा तपशील त्यांनीं मला एका पत्रानें कळविला. त्या पत्रांत लिहिलें होतें.

'मी कांहीं महत्त्वाच्या उद्योगधंद्याचें प्रकल्प संभाळतो. या उद्योगधंद्यांना भारताच्या दृष्टीनें कांहीं विशेष महत्त्व आहे. यांतील एक म्हणजे 'जयंती शिपिंग कंपनी' आहे. मी तूर्त एक १२० मेगॅवॉट वीज निर्मितीचें पॉवर स्टेशन, ३००,००० टन एवढें पिग् लोखंड तयार करण्याची भट्टी अशा योजना आंखीत आहे.

'या सर्व योजनांकरितां परदेशांतून तांत्रिक व यांत्रिक मदत मिळवण्याच्या दृष्टीनें, तेथें कांहीं प्राथमिक काम करावें लागतें. अनुभवी असें, उच्च दर्जाचे शासकीय अधिकारी यासाठीं लागतात.

'तुम्हीं 'ज्येष्ठ सल्लागार' म्हणून या आमच्या योजनेंत दाखल झाला, तर मला मोठा आनंद होईल.

'टोकियो येथें जें कार्यालय या दृष्टीनें मी काढीत आहे, त्या कार्यालयाचा अधिकार आपण घ्यावा. तुम्हांला परवडेल तेवढा काळ तुम्हीं या योजनेशीं संबंधीत राहूं शकतां.

'मी तुम्हांला यासाठीं तोंडीं विनंती कांहीं दिवसांपूर्वींच केली होती व त्यानंतर मी यासंबंधीं संरक्षण मंत्री य. ब. चव्हाण यांचेशींच फक्त बोललो आहे. माझ्या मनांत आलें, कीं या गोष्टीची त्यांना माहिती देणें आवश्यक आहे. माझी अशी समजूत झाली, कीं त्यांची याला अनुमति आहे. मी २९ एप्रिल १९६३ ला भारतांतून परदेशांत जात आहे. तत्पूर्वीं तुमचें उत्तर मला येईल अशी आशा करतो.'

तेजा यांनीं मला रु. ८०००|– मासिक पगार देऊं केला (प्राप्तीकर यावर माफ नव्हता.) तेजा यांच्या या प्रश्नाबाबत माझी अनुकूल प्रतिक्रिया झाली, याचें कारण मिळणारा पगार मोठा होता हें नाहीं, कारण यांतला बराच भाग प्राप्तिकर भरण्यांत जाणार होता. यामुळें मला आरामाचें आयुष्य मिळणार होतें, हेंदेखील याचें कारण नाहीं. मी मुख्यतः यासाठीं ही नोकरी पत्करीत होतो, कीं भोंवतालच्या उदासीन वातावरणां-

तून मी बाहेर पडेन. म्हणून सरकारची परवानगी मिळाल्यावर मी तेजा यांना लेखी अनुमति कळविली.

मी जरी संरक्षण मंत्र्यांच्या कचेरीला लेखी कळवलें होतें, कीं माझा पगार हा प्राप्तीकर योग्य आहे, तरीहि चव्हाणांनीं लोकसभेंत एका प्रश्नास उत्तर देतांना माझ्या पगारावर प्राप्तिकर लागू नाहीं, असें सांगितलें. मी त्यांना भेटून दुरुस्ती केली तेव्हां आपलें पूर्वीचें विधान त्यांनीं नंतर लोक-सभेंत सुधारलें, परंतु ते प्रथम जें म्हणालें त्याला ठळक प्रसिद्धि लाभली तेवढी या चुकीच्या दुरुस्तीला मिळली नाहीं.

जेव्हां इतर जनरलनीं व सनदी नोकरांनीं, माझ्याहून मोठ्या पगाराच्या खासगी नोकऱ्या पत्करल्या, तेव्हां कुणीं (आजतागायत) त्यांविरुद्ध ब्रहि काढला नाहीं, पण मी ही नोकरी पत्करतांच मात्र आरडाओरडा झाला.

मी जेव्हां नेहरूंचा निरोप घ्यायला गेलो तेव्हां नेहरू म्हणाले, कीं मी इतक्या लांब जातो आहे याबद्दल त्यांना वाईट वाटतें. मग ते म्हणाले, कीं फार काळ तिकडे राहूं नका, लवकर परत या.

मी पालमवर आलो तेव्हां माझी प्रकृति ठीक नव्हती. पाय कांपत होते. कांहीं दिवसांपूर्वीं प्रकृतीविषयीं साधार अभिमान बाळगणाऱ्याची अशी अवस्था व्हावी यावर विश्वास ठेवणें कठीण होतें. मला खचल्यासारखें वाटूं लागलें. मी मनांतल्या मनांत देवाची प्रार्थना केली, कीं निदान विमान उडेपर्यंत तरी माझ्या चेहऱ्यावर कांहीं दिसू देऊं नकोस. विमाम आलें व मी विमा-नांत चढलो. मी अशा मन:स्थितींत होतो, कीं मी कुठें निघालो होतो याची मला विशेष क्षिति नव्हती.

मी टोकियोला पोहोंचलो तेव्हां अगदीं गळून गेलेलो होतो. हाता-पायांना कंप होता. श्वासोछ्वासाला अडचण वाटत होती. पहिलें कांहीं दिवस, मी जपानमध्यें कसेबसे काढले. मी उगाच इतक्या दूर देशांत आलो असें वाटूं लागलें. माझ्या पत्नीलाहि अगदीं सुनें सुनें वाटत होतें.

उत्तम वैद्यकीय देखरेखीखालीं माझी प्रकृति झपाट्यानें सुधारली. कांहीं दिवसांनीं कांहीं कामाकरतां मी लंडनला गेलो. तिथें आपले मास्कोमधील वकील टी. एन्. कौल भेटले. त्यांनीं मला मास्को भेटीचें निमंत्रण दिलें. मी

प्रागला जाणारच होतो म्हणून मी तें स्वीकारलें. प्राग येथें झेकोस्लोव्हाकीयाचे उपपरराष्ट्रमंत्री सिमोविक यांची माझी गांठ झाली. सिमोविक हे तटस्थ राष्ट्रांच्या कमिशनवर कोरियांत झेक प्रतिनिधी होते. १९६२ मध्यें ते अेक वकील म्हणून दिल्लीला होते तेव्हां पुन: आमची भेट झाली होती. त्यांनीं मला आपल्या घरींहि नेलें.

ज्या विमानानें मी प्रागहून मास्कोला जाणार होतो, त्याला अतिशय विलंब झाला. मला त्यामुळें विमानतळावर बराच वेळ काढावा लागला. त्या वेळीं तिथें एक मध्यम वयाचा मनुष्य मोठमोठ्यानें कम्युनिस्ट देशांविषयीं कटुतेनें बोलत होता. त्याच्या या कृतीनें आसपास आश्चर्य पसरलें. कांहीं मिनिटांतच पोलिस आला व त्यानें त्याला उचललें. बिचाऱ्याचें पुढें काय झालें कुणास ठाऊक ! टिक्की (टी. एन्. कौल) मॉस्को विमानतळावर माझी अनेक तास वाट पाहात थांबलेले होते. विमानासंबंधीं कांहींच कळेना तेव्हां ते परत घरीं गेले होते. मी पहांटें २ ला मॉस्को येथें पोहोंचलों. हा मॉस्कोचा विमानतळ मला रोम, पॅरिस किंवा न्युयॉर्क येथील विमानतळाइतका आधुनिक वाटला नाहीं. कस्टम अधिकारी चांगले वागले. माझ्या पासपोर्टाची मात्र, निरनिराळ्या लोकांनीं कसून तपासणी केली. मी टॅक्सी करून भारतीय वकिलातींत गेलो. अंतर ३० किलोमिटर होतें. तेथें पोहोंचलो तेव्हां ३-३० झाले होते. टिक्कींचे चिटणीस माझी वाट पाहात होते. मग टिक्कीहि उठून स्वागताला आले.

ती सात नोव्हेंबर तारीख होती व अतिशय थंड वाटत होतें. सकाळीं ६ पर्यंत आम्ही गप्पा मारल्या व ऑक्टोबर क्रांतीचें संचलन पाहण्यास जाण्याची तयारी करूं लागलो. त्या दिवशीं मी नेमका मॉस्कोला आल्यानें मी संचलन पाहावें असा टिक्कींचा आग्रह होता. त्यांनीं रशियन परराष्ट्र खात्यांतून माझ्यासाठीं परवाना आणला होता. आम्ही जेव्हां लाल चौकाच्या बाहेर पोहोंचलो, तेव्हां सर्व मोटारी तिथेंच थांबलेल्या होत्या. तिथून आम्ही पुढें चालत निघालो. आमच्या बसायच्या जागेकडे जात असतांना पुन: पुन: सुरक्षा तपासण्या होत होत्या. टिक्की यांचेजवळ वकिलातीचें ओळखपत्र असल्यानें ते पुढें गेले व मला सुरक्षा रक्षकांनीं अडवलें. माझा पासपोर्ट मागण्यांत आला. मी म्हटलें, कीं रशियन परराष्ट्रीय कचेरीचा परवाना

आहे, मग पासपोर्ट कशाला. तो रक्षक ऐकेना. या वेळीं मेजर जनरल व्ही. आर्. खानोलकर यांनीं मला एकदां सांगितलेल्या गोष्टीची आठवण झाली. ते म्हणायचे, कीं कांहीं अडचण उपस्थित झाली किंवा संशय निर्माण होऊं लागला तर मोठ्यानें आरडाओरडा करावा. ह्यांनीं जमलें नाहीं, तर मग गोडीगुलाबीनें घ्यावें. मी या उपदेशाचा उपयोग करण्याचें ठरवलें; व मोठमोठ्यानें हिंदींत ओरडूं लागलों, तो तगडा सुरक्षा रक्षक गडबडला व त्यानें मला पुढें जाऊं दिलें. टिक्कीबरोबर मग मी तें मोठें प्रदर्शनी संचलन पाहिलें. हजारों मागून हजारों पुरुष स्त्रिया व मुलें, उत्साहानें संचलन करीत, लाटा मागून लाटा याव्या तशी येत होती. तें दृश्य मोठें प्रचंड होतें.

मी मॉस्कोला फक्त आठवडाभर होतो. तेथें सामान्य जनता व उत्तम लोक यांत इतर अनेक देशांत असतें त्यापेक्षां फारच कमी अंतर आहे असें मला आढळलें. महत्त्वाचीं ठिकाणें व संस्था मी पाहिल्या.

मॉस्कोहून मी विमानानें टोकियोला पोहोंचलो व अमेरिकेंत अध्यक्ष केनेडी यांचा वध झाल्याचें कळलें. लेफ्टनंट जनरल दौलतसिंग व कांहीं ज्येष्ठ सैनिकी अधिकारी हे त्याच दिवशीं विमान अपघातांत ठार झाले होते.

चार महिने जपानला राहिल्यानंतर मी ‘ सायोनारा ’ म्हटलें. या काळांत माझी पुष्कळच महत्त्वाच्या व्यक्तींची गांठ पडली व मी पुष्कळ प्रेक्षणीय ठिकाणांना भेटीहि दिल्या. एका जपानी विचारवंताशीं माझी चांगली ओळख झाली. (याचें नांव मी मुद्दाम सांगत नाहीं.) तो संभाषणाच्या ओघांत म्हणाला, कीं जपानी कधीं कांहीं विसरत नाहींत. पश्चिमी देशांनीं दुसऱ्या महायुद्धांत त्यांचा अपमान केलेला आहे. जीवित व मालमत्ता यांची अगणित नुकसानी त्यांनीं सोसली आहे. एके दिवशीं या पराभवाचा सूड घेतल्याशिवाय ते राहणार नाहींत, असें शेवटीं तो म्हणाला.

हवाई बेटांतील होनोलूलूचें धांवतें दर्शन घेऊन, मी सॅन फ्रॉन्सिस्को येथें पोहोंचलों, तों टोकियो सोडलें त्याच्या आदल्या दिवशीं ! आंतरराष्ट्रीय दिनांक रेषा अशी तुमची गंमत करते ! मी शेवटीं न्युयॉर्कला पोहोंचलो व तिथें माझी पत्नी व मुलें कांहीं दिवसांनीं आलीं.

मी वॉशिंग्टनला वी. के. नेहरू या आपल्या राजदूतांकडे राहण्यासाठीं गेलो. वी. के. नेहरू व त्यांची पत्नी फोरी यांचा अमेरिकेंत दबदबा वाढलेला होता. मी ज्या दिवशीं अरलिंग्टन् दफन भूमीवर गेलो, त्या दिवशीं जोरांत बर्फ पडत होतें व थंडी कडक पडली होती. मी केनेडी यांच्या थडग्यापाशीं गेलो, तेव्हां तिथें पुरुष, स्त्रिया व मुलें यांचा लांबच लांब क्यू लागलेला होता. माना खालीं घालून ते दुःखित मनानें मृत अध्यक्षाकडे सरकत होते. केनडी एकदां आपल्या भाषणांत म्हणाले होते— 'माझ्या अमेरिकन देशबांधवांनो, तुमचा देश तुमच्याकरतां काय करणार आहे हें विचारूं नका, देशाकरितां तुम्ही काय करणार आहांत ते स्वतःला विचारा.' केनेडी यांची सेनेंतील, आरमारांतील हवाई दलांतील अशा विविध टोप्या, तेथें त्यांच्या दोन्हीं मृत अर्भकांच्या थडग्यांभोंवतीं पसरलेल्या होत्या. थोडीं फुलें टाकलेलीं होतीं व 'अखंड ज्योती' तिथें तेवत होती. ज्यानें आपल्या देशाची इतकी उत्तम सेवा केली, असा हा उमदा तरुण या ठिकाणीं चिर-मूक होऊन या थडग्यांशेजारीं राहावा हें दृश्य अंतःकरण विदीर्ण करणारें होतें. माझ्या तोंडांतून तर शब्द फुटेना.

मे च्या सुरुवातीलाच मला हारवर्ड विद्यापीठांतील प्रोफेसर रुडॉल्फ व सौ. रुडॉल्फ यांचें, भाषणासाठीं निमंत्रण आलें. मी बोस्टन जवळच्या या विद्यापीठांत भारत व चीन यांवर भाषण दिलें. भाषणानंतर मला अनेक प्रश्न विचारण्यांत आले. त्यांत व्हिएटनामविषयीं प्रश्नहि होते. एक प्रश्न असा विचारण्यांत आला, कीं भारतांत एखादा लष्करी गट क्रांतीनें सत्ता काबीज करण्याची शक्यता आहे काय ? मी उलट विचारलें, कीं अमेरिके-सारख्या मोठ्या लोकशाही देशांत हें शक्य आहे कां ? मी सांगितलें कीं, अशा तऱ्हेच्या प्रयत्नाला अमेरिकेंत यश येण्याची जशी शक्यता नाहीं तशीच भारतासारख्या लोकशाहींतहि नाहीं.

नंतर मला न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठांतून निवडक लोकांपुढें व्याख्यानासाठीं निमंत्रण आलें.

कोलंबिया व हारवर्ड येथील विद्यापीठांतील अनुभव उत्साहवर्धक होते.

या सगळ्यांतच न्युयॉर्कच्या टॅक्सी ड्रायव्हरांनें माझें लक्ष वेधून घेतलें होतें. टॅक्सी ड्रायव्हरांची येथील जात ही प्रेमळपणा व उद्धटपणा यांचें चमत्कारिक

मिश्रण आहे. एकदां दुपारी खूप बर्फ पडत होतें व मी यॉर्क अ‍ॅव्हेन्यू येथील संयुक्त राष्ट्रांच्या इमारतीजवळ टॅक्सी पाहात होतो. रिकाम्या टॅक्सी न थांबता अंगावरून जात होत्या. कांहीं घरीं निघाले होते, कारण त्यांची पाळी संपली होती. बाकीच्यांनीं पुरेसें कमावलेलें असावें. वीस पंचवीस मिनिटें थांबल्यावर मी कंटाळलो व सरळ रस्त्यांत मध्यमागीं उभा राहून एक टॅक्सी रोखली.

'काय पाहिजे ?' ड्रायव्हर ओरडला.

'८५ यॉर्क येथें जायचें आहे.' मी सांगितलें.

'तुम्हांला अशी वाहतूक रोखून धरतां येणार नाहीं. वाटेंतून दूर व्हा...' तो ओरडला व त्यानें धमकी दिली. 'दूर व्हा नाहीं तर अंगावरून मोटार जाईल.'

'घाल कशी अंगावर घालतोस ती ! इथें कांकडत किती वेळ वाट पाहायची मी टॅक्सीची.' मी उत्तर दिलें.

'पण मी घरीं चाललो आहे.' ड्रायव्हर म्हणाला.

'कुठें का जाईनास. घरीं जा नाहीं तर आणखी कुठें जा. पण मला या बर्फांतून दूर ने. तुझ्याच घरीं कां नेत नाहींस ?"– मी गंमतीनें म्हटलें.

तो कांहीं वेळापूर्वीं यमासारखा वाटणारा ड्रायव्हर एकदम विरघळला. अनपेक्षितपणें म्हणाला,

'लवकर बसा आंत, तुम्हांला हवें असेल तिथें सोडतो.'

मी त्याला उतरल्यावर भरपूर बिदागी वर दिली.

२७ मे १९६४ ला न्यूयॉर्क येथें कळलें, कीं नेहरू निधन पावले. मला धक्काच बसला. वर्षभरापूर्वीं परदेशी जावयास निघतांना मी त्यांना भेटायला गेलो होतो, तो दिवस मला आठवला. ते म्हणाले होते— 'फार दिवस राहूं नका. लवकर परत या.' आणि आज हें काय झालें ! मी परतण्यापूर्वींच नेहरू गेले. मी व माझी कुटुंबीय माणसें यांना या वार्तेनें खचल्यासारखें झालें. अशा वेळीं अश्रू ढाळण्यापलीकडे काय करणार !

नेहरूंच्या मृत्युनंतर मी भारतांत परत येण्याचें ठरवलें. परंतु तत्पूर्वीं मला रोज ताप येऊं लागला. श्वासोच्छ्वासाची तक्रार सुरू झाली.

मला न्युयॉर्क विद्यापीठाच्या रुग्णालयांत दाखल करण्यांत आलें. मी घरीं जायला निघालों तेव्हां पुरता बरा झालेला नव्हतोच.

आठ महिन्याच्या वास्तव्यानंतर अमेरिका सोडण्यापूर्वी मी तिथल्या जीवनाचा व माणसांचा आढावा घेतला. अमेरिकनांना वाटतें, कीं त्यांच्या देशासारखा मोठा देश नाहीं व उत्तम देश नाहीं. त्यांच्यांत जें कमी आहे त्याबद्दल ते प्रांजलपणानें कबुली देतात. उदाहरणार्थ एका अमेरिकन सिनेटरनें अमेरिकेंतील सिनेटबद्दल आपल्या दैनंदिनींत लिहिलें आहे.

'आमच्यापैकीं बहुतेक सिनेटर यांचा प्रामाणिकपणा व खरेपणा यावर मी अगदींच अल्प विश्वास ठेवतो. यांतले बहुसंख्य हे छोटया दिवटयांसारखे आहेत. मनानें दुबळे आहेत व सिनेटर व्हायला अजिबात लायक नाहींत... कांहीं लक्ष्मीपुत्र आहेत व त्यांनीं आपली स्थानें खरेदी केलीं आहेत. कांहीं बुद्धीनें कमी आहेत, समज कमी आहे, क्षुद्र पक्षबाजीनें कलुषित आहेत...'

अमेरिकन लोकांच्या विवक्षित विनोद बुद्धीचें उदाहरण द्यायचें, तर खूपच प्रसिद्धि लाभलेल्या जाहिरातीचें देतां येईल. ही जाहिरात अशी आहे—

'उत्तम प्रेतयात्रेला जर फक्त पन्नास डॉलर्सच पडत असतील तर जगण्याचा हट्ट कशाला !'

अमेरिकन माणसांना लोकप्रिय व्हावेसें वाटतें व ते मोठे दिलखुलास असतात. काम देखिल ते मजेंत करतात व सुट्टया त्यांना प्रिय असतात. घाईत असल्यासारखे ते या जीवनांत पळत असतात. अमेरिकेंत भाषणस्वातंत्र्य खूपच आहे. (यांत लेखन स्वातंत्र्य आहेच.) याचें उदाहरण द्यायचें तर एक स्तंभ लेखक काय लिहितों तें पाहा.

'लोकशाहींतील यशस्वी राजकारणी पुढारी हे असुरक्षित असतात, दहशत खाल्लेले असतात. ते राजकारणांत पुढें सरकतात, ते लोकांना वश करून लांच देऊन, फुस लावून, लबाडी करून किंवा अन्य कांहीं प्रकारानें. आपल्या मतदार संघांतील, मागण्या करणाऱ्या, धमक्या देणाऱ्या मंडळींशीं तडजोड करूनच.'

मी व धन्नो न्यूयॉर्क येथील कॅनेडी विमानतळावरून निघालो व दिल्लीला

९ ऑगस्ट १९६४ रोजीं पोहोंचलो. आल्या आल्या मी माझे डॉक्टर मेजर जनरल इंद्रसिंग यांना भेटलो. त्यांनीं औषधोपचार सुरू केले. अंथरुणांत सहा आठवडे कांहीं त्रासदायक काळ काढल्यानंतर, मी पुन: चांगला बरा झालो. आतां ऑक्टोबर संपत आला होता.

१९६४ सालांत घटना पाठोपाठ घडत होत्या. शेख अब्दुल्ला यांना तुरुंगांतून मुक्त करण्यांत आलें व त्यांच्याविरुद्ध चालू असलेला काश्मीरांत कट केल्याचा आरोप काढून घेण्यांत आला. जयप्रकाश नारायण हे रावळपिंडीला अनधिकृत सदिच्छा भेटीसाठीं गेले त्यांना त्यांच्याच कांहीं कृतघ्न देशबांधवांनीं, याबद्दल देशद्रोही ठरवलें

६ फेब्रुवारी १९६५ रोजीं पंजाबचे माजी मुख्यमंत्री प्रतापसिंग कैरो यांना, तोंडावर फडकीं बांधलेल्या, चार बंदुकधारी लोकांनीं दिल्लीबाहेर, वीस मैलांवर गोळ्या घालून ठार केलें. १ एप्रिल रोजीं, शेख अब्दुल्ला यांनीं अल्जीस येथें चौ एन् लाय यांची भेट घेऊन, काश्मिरच्या स्वयंनिर्णयाच्या मागणीसाठीं चाललेल्या चळवळीसाठीं त्यांचा पाठिंबा मिळण्याचा प्रयत्न केला. महिन्याभरांत शेख अब्दुल्लांना पुन्हां अटक झाली.

१६ एप्रिलला पंतप्रधान शास्त्री यांची अमेरिका भेट ठरली होती, ती रद्द केली गेल्यानें देशांत बराच क्षोभ निर्माण झाला. २० मे या दिवशीं लेफ्ट. कमांडर कोहली हे आपल्या पथकांसह माऊंट एव्हरेस्टवर पोहोंचले. अशा रीतीनें या वर्षीं खूपच घटना घडल्या.

अलिकडे कांहीं महिन्यांत पुष्कळच पाश्चात्य व हिंदी लेखक मला भेटायला आले. त्यांतच नेहरूंचे कॅनेडियन चरित्र लेखक मिकायेल ब्रिचर हे देखील होते. नेहरू युगांतील बऱ्याच गोष्टींची माझ्याशीं चर्चा करण्यासाठीं ही मडळी येत असत. त्या कालखंडावर पुस्तकें लिहिण्याचें काम चालू होतें. आपल्या परराष्ट्र संबंधाची चर्चाहि यांत होत असे.

जुलैमध्यें मी बी. के नेहरू यांना ते दिल्लींत आले असल्यानें, भेटायला गेलो होतो. त्यांचे वडील वारले होते व म्हणूनच मी भेटायला गेलो होतो. तिथें मला फोन आला, कीं कांहीं मिनिटांपूर्वीं माझी पत्नी मुलीला घेऊन तांतडीनें लष्करी रुग्णालयांत गेली आहे. कारण अनुला रक्तस्राव

सुरू झाला होता. मी हॉस्पिटलांत गेलों तेव्हां तिथल्या गायनेकॉलॉजिस्टनीं सांगितलें, कीं सिझरीन शस्त्रक्रिया करावी लागणार आहे.

चार वर्षांपूर्वी अनुचें लग्न झालें. तेव्हांपासून तिच्यावर सारखीं संकटें येतच होतीं. ही तिच्यावरची चौथी शस्त्रक्रिया होती.

अनुनें मात्र या वेळीं मोठा धीर दाखवला. शस्त्रक्रिया करायची ठरली हें तिला कळलें, तरी तिनें कसलीहि चुळबूळ दर्शविली नाहीं. ती तयार झाली. स्ट्रेचरवर तिला ठेवलेलें होतें, तेव्हां ती गंभीर व नेहमीची निष्पाप अनूच होती. ॲम्बूलन्समधून तिला शस्त्रक्रिया दालनांत नेण्यांत आलें. कारण ही जागा थोडी दूर होती.

अनूला आंत नेलें तेव्हां मी व धन्नो बाहेर व्हरांड्यांत बसून होतो. डॉक्टरांनीं आंत जातांना सांगितलें, कीं शस्त्रक्रियेला तास लागेल व अनू ही ॲनिमिक असल्यानें रक्त द्यावें लागेलसें वाटतें.

शस्त्रक्रिया चालू होती, ती साठ मिनिटें मी अगतिकपणें चिंतेंत बसून होतो. अनुचा चेहरा माझ्या डोळ्यांपुढून हलत नव्हता. अशा परिस्थितींत नेहमी वेळ जातां जात नाहीं. असें मध्येंच वाटतें, कीं काळ थबकलाच आहे. हें मोठें आश्चर्यकारक आहे, कीं अशा वेळीं बाकी सर्व गोष्टींचें महत्त्वच संपतें आणि या जगांत महत्त्वाचें कांहीं वाटत असेल तर ती फक्त, आपली जी व्यक्ति मृत्यूशीं झगडत असते तिची काळजी. जर सर्व नीट झालें तर आपण अशा वेळीं अनेक गोष्टी कायमच्या सोडण्यास तयार असतो. आपण अनेक शपथा घेतो, अनेक प्रकारें करुणा भाकतो. अर्थात या वेळीं घेतलेल्या शपथा संकट टळलें, कीं आपल्यापैकीं बहुतेकजण विसरतात.

अखेर डॉक्टर बाहेर आले. त्यांनीं मला व धन्नोला सांगितलें, कीं शस्त्रक्रिया यशस्वी झाली असून अनू ठीक आहे.

(जरी या पुढच्या पृष्ठांवर, चर्चा होणार असलेल्या गोष्टींचा, माझ्या व्यक्तिगत अनुभवांशीं कांहीं संबंध नसला तरी मीं आतापर्यंत जें सांगितलें त्याच्याशीं त्यांचा संबंध असल्यानें, मी त्या नमूद करीत आहे.)

६

# भरतवाक्य झालेलें नाहीं—

## ६ : भरतवाक्य झालेलें नाहीं–

**नेहरूंच्या** मृत्यूनंतर आपल्या पुढाऱ्यांनीं असा एक आव आणला होता, कीं १९६२ नंतर भारताची संरक्षणसिद्धता इतकी मजबूत करण्यांत आली आहे, कीं जर पाकिस्तानने किंवा चीननें दोघांनीं आक्रमण केलें; तर एकाच वेळीं, स्वतःच्या एकट्याच्या बळावर दोघांशीं भारत टक्कर घेऊं शकेल. संरक्षण खात्याचें खर्चाचें अंदाजपत्रक १९६२ मध्यें ३०० कोटी पये होते तें आतां १९६५–६६ सालीं ८०० कोटी रुपये झालेलें होतें, ही गोष्ट तर खरीच. १९६२ सालीं आपली जी सैन्यशक्ति होती, ती आतां जवळ जवळ दुप्पट वाढलेली होती. आपणाला परदेशांतून खूपच लष्करी मदत, शस्त्रास्त्रें व सामुग्रीच्या स्वरूपांत आली होती. ही आपण पूर्वीच मागितलेली होती. अशा तऱ्हेनें १९६५ सालीं 'सुधारलेली परिस्थिति' असूनहि सेनादलाला अडचणी भासत होत्याच.

काश्मीरमध्यें पाकिस्ताननें आपल्याविरुद्ध जी कारवाई केली, ती दोन निरनिराळ्या हप्त्यांत केली. पहिल्या प्रथम हल्लेखोर आंत घुसले व नंतर नेहमी होतो तसा सरळ लष्करी हल्ला पाक सेनेनें केला.

५ ऑगस्टला सुमारें ५००० हल्लेखोरांची टोळी (या हल्ल्याला सांकेतिक नांव 'जिब्राल्टर' असें होतें.) मेजर जनरल अक्तर हुसेन मलिक यांच्या नेतृत्वाखालीं, आपली सरहद्द ओलांडून गुपचूपपणें जम्मू काश्मीर-मध्यें घुसली. आपल्या राजकीय नेत्यांनीं किंवा लष्करी नेत्यांनीं ही गोष्ट मान्य केली नाहीं, कीं जम्मू काश्मीरवर आक्रमण झालेलें आहे. या घुसखोरांजवळ हलकीं आधुनिक अशीं स्वयंचलित शस्त्रें होतीं, चांगली बिनतारी संदेश यंत्रणा व वाहनेंहि होतीं. या हल्लेखोरांचा घातपाताचा हेतू तर होताच, परंतु काश्मिरी लोकांना मथवून, त्यांना भारताविरुद्ध बंड करण्यास उद्युक्त करणें, हें त्यांचें उद्दिष्ट होतें. या हल्लेखोरांनीं जादा

शस्त्रें याचसाठीं आणलीं होतीं, कीं काश्मिरी लोकांना ती वाटून त्यांचा वापर करण्याचें शिक्षण ते त्यांना देणार होते. रात्रीच्या वेळीं दूर अंतरावरून ते बहुधा आपल्यांत घबराट निर्माण करण्यासाठीं गोळीबार करत, व जर आपण उलट गोळीबार केला तर ते मागें हटत. स्थानिक काश्मिरी लोकांतून त्यांना मदत होत असे. त्यांना वाटा दाखविणें, हमाली करणें त्यांना अन्न व निवारा देणें अशी ही मदत असे. १९५३ मध्यें अब्दुल्लांना ज्या दिवशीं अटक झाली, तो दिवस म्हणजे ९ ऑगस्ट १९६५ हा दिवस 'जिब्राल्टर' सेनेचा, हल्ला चढवण्याचा दिवस म्हणून मुक्रर झालेला होता.

आपण प्रथम आत्मसंतुष्टपणें असें सांगायला सुरुवात केली, कीं फक्त हजारच हल्लेखोर आंत घुसले आहेत. मग हें मान्य केलें, कीं ही संख्या कदाचित २००० ते ३००० असावी कदाचित जास्तहि असेल. निर्माण झालेलें संकट कमी आहे असें भासवून, आपण स्वतःलाच फसवीत राहिलों. आपण सांगूं लागलों, कीं आंत शिरलेल्या हल्लेखोरांजवळ पुरेंसें अन्न नाहीं व स्थानिक काश्मिरी जनतेनें त्यांच्याकडे पाठ फिरवली असल्यानें ते खचून गेले आहेत. आपल्या सुरक्षा सेनेनें त्यांचा योग्य तो समाचार घेतला असून ते आतां पळून जात आहेत. प्रत्यक्षांत त्यांनीं पुष्कळच घातपाताचे प्रकार केले. मात्र पूल उडवणें, खून पाडणें, अर्थव्यवस्था मोडणें या बाबतींत त्यांना अपेक्षित यश लाभलें नाहीं. तेथील राजकीय व सामाजिक घडी विस्कटविण्यांत किंवा आपल्या दळणवळणांत विक्षेप आणण्यातहि, यश लाभलें नाहीं. काश्मीरी लोकांत बंड पेटवणेंहि त्यांना साधलें नाहीं. असें असलें तरी त्यांना संपूर्ण अपयशच आलें असें म्हणणें खरें नाहीं. आपल्या सरहद्दीचें संरक्षण डोळ्यांत तेल घालून चालूं असतांना एवढ्या मोठ्या संख्येनें हल्लेखोर सरहद्द ओलांडून आंत शिरतात हें एक आश्चर्य आहे! आणि त्यांच्या या हालचाली आपल्याला आधीं कळत कशा नाहींत?

जम्मू विभागांत, कांहीं प्रदेशांत बुंदील, रियासी तेहसील-अशा ठिकाणीं या हल्लेखोरांनीं स्वतःची शासनव्यवस्था चालूं केली होती. ती उखडतांना आपल्याला फार प्रयास पडले.

( इंदिरा गांधी ह्या त्या वेळीं नभोवाणी खात्याच्या मंत्री होत्या. त्यांचा मला ऑगस्ट महिन्यांत एक दिवशीं फोन आला व मला त्यांनीं दुसऱ्या

दिवशीं भेटायला बोलावलें. आम्हीं जेव्हां भेटलों, तेव्हां त्या म्हणाल्या, कीं काश्मिर व्यवहारांत लक्ष घालणाऱ्या कांहीं मंडळींनीं असें सुचवलें आहे, कीं आंत घुसलेल्या पाक हल्लेखोरांचे प्रश्न हाताळण्यासाठीं मला काश्मीरला धाडण्यांत यावें. त्या म्हणाल्या, कीं तिथें कोणत्या प्रमाणावर काय घडत आहे याची त्यांना कल्पना नव्हती. निरनिराळे वृत्तांत त्यांचेकडे आलेले होते. त्यांनीं मला विचारलें कीं, मी लगेंच या कामगिरीवर काश्मीरला जाऊं शकेन काय ? मी होकार दिला. यानंतर १ सप्टेंबरला पाकिस्ताननें जम्मू विभागांत आपल्यावर हल्ला चढवला व पुनः या विषयावर इंदिरा गांधींकडून मला कांहींहि समजलें नाहीं.

१ ते ६ सप्टेंबरच्या दरम्यान पाकिस्तानी सेनेनें आपल्या प्रदेशांत जौरियनपर्यंत कांहीं प्रगति केली. त्यांचा बेत होता कीं, पहिल्याच झडपेंत चेनाब नदीवरील अखनूर कबजांत घ्यावयाचें, जम्मू ते पूँच हें आपलें दळण-वळण तोडावयाचें व जम्मू शहर घेऊन, जम्मू–श्रीनगर मुख्य रस्त्याला लागावयाचें. आपलें तेथील कोअर कमांडर लेफ्टनंट जनरल के. अेस्. काटोश यांनीं त्यांचा हा बेत हाणून पाडला.

मी ६ सप्टेंबर १९६४ रोजीं लालबहादूर शास्त्री यांना पत्र लिहिलें.

‘ भारतापुढें आज जी संकटकालिन स्थिति निर्माण झाली आहे, अशा-वेळीं आपल्याला योग्य वाटत असेल त्या नात्यानें मी सेवा करूं इच्छितो. जर भारताची सेवा करण्यासाठीं मला आपण बोलावलेंत, तर सर्व इतर गोष्टी सोडून यासाठीं मी येईन. ’

त्याच दिवशीं मला या पत्राला औपचारिक उत्तर आलें.

‘ तुमच्या ६ सप्टेंबर १९६५ च्या पत्राला उत्तरादाखल या दोन ओळी लिहीत आहे. आपण देऊं केलेल्या सेवेबद्दल मी कृतज्ञ आहे. ’

शत्रूचें लक्ष जम्मू व काश्मिर रणक्षेत्रांतून दुसरीकडे खेंचण्यासाठीं, आपल्या लष्करी हायकमांडनें ६ व ८ सप्टेंबरला लाहोर व सियालकोट विभागांत व राजस्तानांत दोन बगलांवर हल्ला सुरू केला.

भारत-पाक युद्धांत ६ तारखेला जें घडलें, त्याचा परामर्ष मी तीन प्रकारें घेऊं शकतो. या युद्धांत भारताचें पारडें जसें वर-खालीं झालें त्याचा तपशील

देऊन, इतरांनीं केलें त्याप्रमाणें फक्त चांगली बाजू तेवढीच रंगवून किंवा या घटनांशीं जीं माणसें संबंधींत होती, त्यांचे व युद्धघटनांचे संदर्भ देऊन.

या युद्धाचें तपशीलवार वर्णन करण्याचें मी टाळतो. या युद्धाची फक्त झगमगती बाजू पाहणें, म्हणजे स्वतःस भ्रम निर्माण करणें होय. म्हणून मी तिसऱ्या पद्धतीनें तूर्त लिहितो व या विषयाची सर्वांगीण चर्चा पुढें केव्हां तरी करीन. मी येथें येवढेंच म्हणतो, कीं आपल्यापेक्षां लहान राष्ट्र असलेल्या अशा पाकिस्तानचा पराभव आपण करूं शकलों नाहीं. हा पराभव आपण करायला हवा होता. शिवाय कांहीं घटनांतून आपण केवळ परमेश्वरी कृपेनें बचावलों. पाकिस्तानविषयीं सांगायचें तर आपलें सैन्य व हवाई दल हें हल्ल्यांपुढें नमेल हा पाकिस्तानचा अंदाज चुकीचा ठरला.

केवळ १२ दिवस पाकिस्तानशीं लढाई केल्यानंतर भारतानें शस्त्रसंधि करारावर सही केली. जर भारत हा पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्याच्या स्थितींत होता असें म्हणतात तें खरें मानलें तर मग शस्त्रसंधि कां केला ? शिवाय शास्त्री यांनीं तर ६ सप्टेंबर १९६५ रोजीं असें जाहीर केलें होतें, कीं एका शस्त्रसंधी करारानंतर दुसरा शस्त्रसंधी करार असा प्रवास पत्करणार नाहीं राष्ट्रीय संरक्षण समितीच्या बैठकींत सर्व मुख्यमंत्री जमलेले असतांना शास्त्रींनीं भाषणांत म्हटलें होतें–

'कांहीं का परिस्थिति असेना, आतां बंदूकी खालीं ठेवणें शक्य नाहीं.'

शास्त्री व सरकार यांनीं हा अंदाज करायला हवा होता, कीं आज ना उद्या बडीं राष्ट्रें ही आपली इच्छा संयुक्त राष्ट्रसंघामार्फत आपल्यावर लादणार, आपण लढाई थांबवावी, यासाठीं अपरिमित दबाव आणणार आणि याकरता म्हणून, अशीं विधानें त्यांनीं करायला नको होतीं, कारण त्याप्रमाणें वागतां येणार नव्हतें.

शस्त्रसंधि तेव्हां होतो, कीं जेव्हां दोन्ही बाजूंना हें पटतें, कीं लढाईनें हा निर्णय लागणें कठीण आहे. याचा अर्थ युद्ध संपलेलें नसतें तर ते अनिर्णित अवस्थेंत थांबतें. दोन्ही बाजूंना दिलासा मिळतो. ज्या भूमिकावरून युद्ध सुरू केलेलें असतें त्या भूमिका तशाच वादग्रस्त राहतात. अब्राहम लिंकननें म्हटलें आहे.

'समजा तुम्हीच युद्ध सुरू केलें तरीसुद्धां सतत कांहीं लढायचें नसतें. जेव्हां दोन्हीकडची हानीच सुरू असते व फायदा कुणाचाच होत नाहीं तेव्हां तुम्ही लढाया थांबवतां, जुने प्रश्न जसेच्या तसेच पुन्हां पुढें येतात.'

आपल्या युद्धप्रयत्नांची प्रसिद्धि ही अधिक वास्तवपूर्ण करतां आली असती. जेव्हां आपल्या वार्ताहरांनीं लढाईच्या धुमश्चक्रींत हजर राहण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हां त्यांना जाऊं देण्यांत आलें नाहीं. कारण काय तर तें धोक्याचें होतें ! किंवा सैन्याला त्यांच्याकडे लक्ष द्यायला ऐन लढाईंत फुरसत नव्हती; हें दुर्दैव होय दुसऱ्या महायुद्धांत इतर देशांनीं वार्ताहरांना लढाया चालू असतांना त्या पाहूं दिल्या. कोरियन युद्धांत व इतरत्र हेंच चालतें अनेकांचे यांत प्राण गेले परंतु वार्ताहरांनीं त्यांच्या व्यवसायांत मोठ्या परंपरा निर्माण केल्या. यामुळें आपल्या लढायांचीं प्रत्यक्ष वर्णनें आपल्याला मिळूं शकलीं नाहींत. तरीसुद्धां वृत्तपत्रकारांनीं, या लढाईच्या साद्यंत हकीगती अशा अडचणींतूनहि देऊन चांगली कामगिरी केली.

भारत व पाकिस्ताननें युद्धानंतर जीं पत्रकें प्रसिद्ध केलीं, त्यावर भाष्य करतांना स्टेट्समन पत्राच्या लश्करी निरीक्षकानें लिहिलें—

'जर भारत व पाकिस्ताननें पाठोपाठ प्रसिद्ध केलेलीं पत्रकें एकत्र वाचली तर असें दिसून येईल कीं, भारताचे व पाकिस्तानचे जे रणगाडे व विमानें नष्ट झालीं आहेत, ती मुळांत अस्तित्वांत असलेल्या संख्येच्या दुप्पट आहेत.'

हें उचित होय कीं, आपल्या हवाई दलाचें व सेनेचें नेतृत्व ज्यांनीं केलें त्यांच्यासंबंधी मी कांहीं सांगावें. एअर चीफ् मार्शल अर्जुनसिंग ह्यांची वैमानिक म्हणून झालेली सेवा उत्कृष्ट आहे. एखाद्या ट्रोजन योद्धयाप्रमाणें ते लढाईभर वागले व गंभीर परिस्थितींतहि त्यांच्या मनाला निराशेचा स्पर्श झाला नाहीं. तरुण वैमानिकांना त्यांच्यापासून धाडसाची, पेशांतील ज्ञानोपासनेची व वैमानिक कलेची स्फूर्ति मिळे. कितीहि आघात झाले तरी ते शांत असत, खंबीर असत. त्यांचा सल्ला मोलाचा असें व त्यांनीं कठिण प्रसंगांत स्वत: चांगलें उदाहरण घालून दिलें. सरकारला या सर्व गोष्टींमुळें अर्जुनसिंग हे मोठाच आधार वाटत.

यावेळचे आपले सेनाप्रमुख जनरल जे. एन. चौधरी यांचेविषयीं मला असेच म्हणतां आलें असतें तर बरें झालें असतें. त्यांच्या लष्करी सेवेची कांहीं बाजू व त्यांच्या व्यक्तिमत्वाचे कांहीं पैलू मी येथें सांगणार आहे. या पुस्तकांत इतरत्र मी जें वैयक्तिक अनुभव सांगितलें आहेत व जे सैन्यांत इतरांनीं अनुभवले आहेत, त्यावर माझें हें बोलणें आधारलेलें आहे. जर असें करीत असतांना चौधरी यांची अशी कांहीं प्रतिमा उभी झाली, कीं जी लोकांना आतांपर्यंत विश्वास ठेवायला लावलेल्या प्रतिमेशी विसंगत आहे, तर याला माझें त्यांच्याशीं वैर आहे हें कारण नाहीं. कारण आम्हीं दोघें आतां सैन्यांतून निवृत्त झालेलो आहोंत. अशी कांहीं विसंगत प्रतिमा उभी राहिली, तर त्याचें कारण एकच असेल, कीं खऱ्या गोष्टी ह्या सांगितल्याच पाहिजेत.

आपल्या देशांतील पुष्कळ लोक हे एखाद्याला खऱ्या गोष्टी न पारखतांच बदनाम करण्यास वा वाखाणण्यास तयार असतात. कारण आपले लोक हे सहज फसणारे लोक आहेत. उदाहरणार्थ चौधरी यांच्या निवृत्तीवर भाष्य करतांना, ज्या पत्राचे चौधरी हे अनेक वर्षे वार्ताहर होते, त्या 'स्टेट्समन्' पत्रानें लिहिलें:

'जनरल चौधरी हे भारताच्या उत्कृष्ट शिपाई गड्यांपैकीं एक आहेत. नुकत्याच पाकिस्तानाशीं झालेल्या युद्धांत त्यांनीं आपल्या सेनेला उत्कृष्ट नेतृत्व दिलें. यामुळें त्यानंतर ते एकदम एवढें प्रकाशांत आले, कीं इतरांना हेवा वाटावा. त्यांच्या मागें मोठेपणाचें वलय निर्माण झालें असून ते देशाच्या गळ्यांतील ताईत झाले आहेत.'

चौधरी यांच्याभोंवतीं जें तेजोवलय निर्माण करण्यांत आलेलें आहे, तें त्यांच्या वास्तव व्यक्तित्वाचा विचार करता, अव्वाच्या सव्वा आहे. सप्टेंबरच्या युद्धांत लष्करी कारवाईंत त्यांनीं जी 'बहाद्दरी' दाखवली व त्यांनीं लढाईचे जें 'उत्कृष्ट' नेतृत्व केलें, याबद्दल त्यांना विपुल प्रसिद्धि मिळाली आहे. सैन्यांत व इतरत्र असें पुष्कळजण आहेत कीं, ज्यांचें या विषयावरील मत भिन्न आहे.

चौधरी यांचें लष्करी पेशाचें पुस्तकी ज्ञान चांगलें आहे व त्यांच्या सेवेची नोंदहि नशिबानें चांगली आहे. सेनेंतील आपल्या सहकाऱ्यांत चौधरी

हे उत्तम शासकीय अधिकारी व चांगलें कार्यालयीन आसामी म्हणून ख्याती पावलेले आहेत. परंतु थिमय्यांप्रमाणें प्रत्यक्ष रणांगणांवरील अद्वितीय सेनानी म्हणून ते कधींच ज्ञात नव्हते. संकटांना हंसत सामोरे जावें, आनंदानें स्वतःचें प्राण धोक्यांत घालावें अशा तऱ्हेचे सेनानी नेतृत्व त्यांनीं केल्याचें, सर्व सेनेंत कोणाचें ऐकिवांत नाहीं. ते अहंमन्य, वरिष्ठांना खूष करण्यासाठीं सदैव उत्सुक असलेले व बडबडे असे होते.

चौधरी हे नेहमी त्यांच्या विलक्षण युद्धानुभवाबद्दल बोलत असत. प्रत्यक्षांत कर्नल, ब्रिगेडियर वा मेजर जनरल म्हणून लढाईंत त्यांनीं सेनेचें आधिपत्य कधींहि केलेलें नव्हतें. १९५८ सालीं ते एकदां मला म्हणालें, कीं कोणत्याहि भारतीय सेनाधिकाऱ्यांपेक्षा–थिमय्या धरून– त्यांनीं अधिक युद्ध पाहिलेलें आहे. मला हें पटेना. मी संशयानें विचारलें, 'कुठें पाहिलें ?' त्यांनीं जें युद्ध पाहिलें होतें तें शासकीय विभागांत अधिकारी म्हणून व अगदीं अल्पकाळच ते सेनेचें आधिपत्य करीत होते.

जनरल जे. एन. चौधरी यांचें वर्णन पत्रकारांत कांहींजण, जगांतील प्रमुख 'रणगाडा तज्ञ' म्हणून करीत असत. याचा अर्थ ते फील्ड मार्शल रोमेलसारख्या रणगाडा युद्धांत कीर्ति संपादन केलेल्या सेनानींच्या तोडीचे होते. चौधरी यांनीं प्रत्यक्षांत कधींहि रणगाडापथकांचें लढाईंत नेतृत्त्व केलेलें नाहीं. रणगाडा पथकांचें नेतृत्त्व करायचें तर प्रत्यक्ष रणांगणांवर जावें लागतें, दिल्लीसारख्या ठिकाणीं बसून नाहीं करतां येत. त्यांनीं मोठ्यांत मोठें रणगाडा पथक हाताखालीं वागवलें तें एक डिव्हिजन होते. आणि या पथकानें लढाईंत कधींहि भाग घेतला नाहीं. हैदराबादच्या पोलीस कारवाईंत हें पथक रझाकारांवर चालून गेलें. दुसऱ्या महायुद्धांत त्यांच्या हाताखालीं चिलखती दलाची रेजिमेंट होती– रणगाडा पथक नव्हे. अशी शक्यता आहे, कीं त्यांना रणगाड्याची यंत्रयोजना, बांधणी व इतर कांहीं बाबी याबद्दल माहिती होती. मला म्हणायचें आहे एवढेंच, कीं त्यांनीं रणगाडा पथकाच्या लढाईंत भाग घेतलेला नाहीं म्हणून त्यांची पूर्वपिठीका पाहिली तर ते कांहीं जगांतले एक रणगाडा तज्ञ मुळींच ठरत नाहींत.

लढाईंत त्यांनीं निर्णय घेतांना पुष्कळ चुका केल्या. त्यांनीं प्रथम काश्मीर-

मध्यें कांहीं लष्करीं पावलें उचललीं खरीं परंतु त्यांच्या परिणामांचा त्यांना अंदाज आला नाहीं. नंतर त्यांनीं खूप मोठ्या क्षेत्रावर चढाईचें धोरण पत्करलें. यामुळें कुठेंच एका ठिकाणीं त्यांना सैन्य एकवटता आलें नाहीं. यामुळें सिंध, लाहोर वा सियालकोट आदी विभागांत, या हल्ल्यांचा जोर त्यांना वाढवितां आला नाहीं कांहीं तुकड्या त्यांनीं बिनीला उशीरा धाडल्या व लढाईचें पारडें वेळींच आपल्या बाजूला फिरवणें त्यामुळें अशक्य झालें. त्यांचा एक ' नगण्य ' प्रयत्न सांगायचा तर, ९–१० सप्टेंबरला खेमकरण येथील लढाई जोरांत असतांना, त्यांनीं आपल्या एका ज्येष्ठ सेनाधिकाऱ्याला अनेक मैल मागें पिछाडीला मोर्चा नेण्यास सांगितलें. याचा अर्थ कांहीं प्रसिद्ध व महत्त्वाचा जागा सोडून देणें असा होतो. (जर चौधरींचें ऐकलें गेलें असतें तर भारताची स्थिति चमत्कारिक झाली असती. लेफ्टनंट जन-रल हरबक्षसिंग व धीलाँ यांनीं हिंमत दाखवली आणि दुर्दशा टळली.) सेनाप्रमुख या नात्यानें यावरून त्यांनीं कांहीं खंबीरपणा किंवा सैन्याला स्फूर्ती येईल असा पवित्रा घेतला असें म्हणतां येत नाहीं. सर्व भारत पाक युद्धांत हे जनरल चौधरी, हे महान सेनानी, प्रत्यक्ष लढाईच्या आसपासहि गेले नाहींत. इचिगोल कालव्याच्या कांठावर जवानांच्या खांद्याला खांदा लावून उभी असलेली त्यांची छबी मात्र वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली ती अर्थात युद्धबंदीनंतर.

युद्धबंदी झाल्यानंतर कांहीं आठवडे गेले व वृत्तपत्रांत बातमी आली, कीं चौधरी यांना सरकार त्यांच्या निवृत्ति वयानंतरहि सेवावाढ देऊन सैन्यांत ठेवून घेण्याचा विचार करीत आहे. दुसऱ्याच दिवशीं सरकारनें या बातमीचा इन्कार केला. वृत्तपत्रांत अशाच प्रकारच्या वावड्या उठत होत्या– सेना-प्रमुख यांना फील्ड मार्शल या श्रेणीच्या ' चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ' या पदावर बढती मिळणार या निराधार बातम्या कुठून निर्माण होतात हें खरोखर कळलें पाहिजे. माणसाचे मातीचे पाय न पाहतां, त्याच्याभोंवतीं तेजोवलय निर्माण करण्याची आपली जी वृत्ति आहे, तिचीच हीं उदाहरणें होत.

५००० वर्षांच्या मानवी इतिहासांत १५००० लढाया साधारणपणें आजपर्यंत झाल्या आहेत. म्हणजे वर्षाला तीन लढाया होत असतात. लढाई

हा अटळ मानवी स्थायीभाव आहे. रिकार्ड बर्टन काय म्हणतात तें आपल्या पुढाऱ्यांनीं लक्षांत ठेवायला हवें. तो म्हणतो:

'शांतता हें शहाण्याचें स्वप्न असतें युद्ध हा माणसांचा इतिहास असतो.'

हें मूलभूत सत्य दुर्लक्षित करून, या सर्व पुढाऱ्यांत स्वातंत्र्य मिळाल्यापासून अशी एक विचारसरणी प्रसृत झाली, कीं नजिकच्या भविष्यांत आपल्याला युद्ध कधीं करावें लागणार नाहीं. १९६२ नंतर तरी त्यांचा हा दृष्टिकोण बदलणें भाग आहे.

आतापर्यंत जें झालें, त्यावरून जे कोणी आपले लष्करी प्रश्न हाताळीत असतील त्यांनीं, शांततेसाठीं अवश्य प्रयत्न करावा परंतु आपलें सेनादल मात्र सदैव युद्धसज्ज ठेवावें. ज्या लष्कराच्या विषयांत ते कांहीं करूं इच्छितात, त्या लष्कराची गुंतागुंतीची योजना समजण्यासाठीं, त्यांनीं प्रथम लष्करी डावपेंचांचें आवश्यक ज्ञान पैदा करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. या ज्ञानामुळें त्यांना आत्मविश्वास येईल, ज्यांचा देशाच्या संरक्षणाशी संबंध आहे, अशा बाबींवर त्यांची पकड अधिक दृढ होईल व त्यांना हें पाहतां येईल, कीं जें पुस्तकी ज्ञान आपलें लष्करी तज्ञ सांगतात, तें प्रत्यक्षांत उतरतें आहे.

धोरणाच्या बाबतींत त्यांनीं पड़खाऊ धोरणाचा पवित्रा सोडला पाहिज आणि याची काळजी घेतली पाहिजे कीं सैन्याला व इतरांना हीं धोरणें अडसर ठरतात असें वाटतां कामा नये.

बोध हा घ्यायला हवा, कीं राजकीय पुढारी जें बोलतात त्यापेक्षां अधिक त्यांनीं केलें पाहिजें सैन्याला आवश्यक तेथें ताबडतोब कृति करण्याची मुभा त्यांनीं दिली पाहिजे. याचा अर्थ त्यांनीं युद्धाचा राजकीय ताबा सोडावा असा नाहीं. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं लढाईची गुंतागुंतीची यंत्रणा, त्याचें अर्थकारण, डावपेंच यांसह समजून घेण्यासाठीं परिश्रम करावें. स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठीं सैन्यशक्ति वाढवण्यासाठीं त्यांनीं इतर कांहींहि करावें, परंतु त्याचबरोबर पुढाऱ्यांनीं सेनेंत नवें वारें खेळवणें महत्त्वाचें आहे.

नेपाळ, ब्रह्मदेश, थायलंड, रशिया, अफगाणिस्तान, या देशांशीं आपलें दूरगामी धोरण काय राहणार आहे, याचा मनाशीं आपण एकदा निश्चय

केला पाहिजे. मुत्सद्देगिरीची या गोष्टीसाठीं फार आवश्यकता आहे. आपल्या सरहद्दीवरील प्रदेशांत शांतता राहिली व राज्यकारभार चांगला चालला तर तें आपल्या हिताचें आहे.

आपल्या समुद्रकिनाऱ्याकडेहि आपण लक्ष दिलें पाहिजे. लंडन व सिंगापूर यांच्यामध्यें सर्वांत मोठा देश भारत आहे. या पट्ट्यांतील कोण-ताहि देश आपल्या व्यापाराला धोका निर्माण करूं शकतो. यासाठीं या समुद्रावर आपली अधिसत्ता केव्हां न केव्हां निर्माण करणें आवश्यक आहे. १९६२ च्या चिनी आक्रमणानें आपल्याला यांची प्रचीती आणून दिली, कीं प्रचंड हिमालय हा देखिल समर्थ आक्रमकांच्या आड येऊं शकत नाहीं.

या जबाबदाऱ्या पेलण्यासाठीं, आपल्याजवळ शक्तिमान असें आधुनिक सैन्यदल सदा युद्धसज्ज स्थितींत असणें आवश्यक आहे. या सेनेमागें भक्कम आर्थिक स्थिति व बलाढ्य मित्रराष्ट्रांचें पाठबळ उभें राहायला हवें.

चिन्यांनीं आपल्या सरहद्दीचा अनेकवार भंग करून आपल्यांत पुरेसा क्षोभ निर्माण केला, याबद्दल संशय नसला, तरी १९६२ सालीं आपण चिन्यांशीं एकाकी लढायला नको होतें व पुरेशीं तयारी होईपर्यंत थांबायला हवें होतें. आपल्याला करणें शक्य आहे तेवढें केल्यानंतर, आपण वेळच्या वेळीं मित्रराष्ट्रांकडून लष्करी मदत कुठलीहि बंधनें न स्वीकारतां घ्यायला हवी होती. या संबंधीं चाणक्य, ख्रिस्त शतकापूर्वी ३०० वर्षें लिहिलेल्या अर्थ-शास्त्रांत म्हणतो:

'जेव्हां एखाद्या राजाला शत्रूशीं एकाकी लढणें अशक्य आहे, असें आढळून येईल व जेव्हां लढाई तर करावीच लागणार आहे अशी वेळ त्याचेवर येईल तेव्हां त्यानें सर्व प्रकारच्या इतर राजांशीं हात मिळवणी करावी; मग हे राजे कनिष्ठ असोत, बरोबरीचे असोत वा बलिष्ठ असोत.'

जर्मनीचा पराभव करण्यासाठीं अमेरिका व ब्रिटन यांनीं दुसऱ्या महायुद्धांत रशियाशीं अशी हातमिळवणी केली. आपल्या राज्यकर्त्यांनीं पुन: पुन: हें सांगणें बंद करावें, कीं अमुक अमुक परिस्थिति निर्माण झालेली पाहून त्यांना आश्चर्य वाटलें किंवा चीन पाकिस्तानानें आपल्या पाठींत सुरा खुपसला वगैरे! आपल्याला पेंचांत टाकील अशी लष्करी परिस्थिति निर्माणच

होऊं देतां कामा नये. १००० वर्षांपूर्वी चाणक्यानें सांगितलें आहे, कीं ज्या राजाला आपल्या शत्रूंच्या हालचालीचा अंदाज लागत नाहीं व जो सतत रडारड करतो, कीं माझ्या पाठींत सुरा मारला हो, अशा राजाला सिंहासनावरून खाली खेचलें पाहिजें.

आपल्या संरक्षक प्रयत्नांवर योग्य ती टीका वृत्तपत्रांतून झाली पाहिजे. नुसती स्तुती नको. लोकशाही राष्ट्रांत हें होतें. आपण आपलें मनोधैर्य टिकवण्यासाठीं फक्त आपल्या विजयाचेंच सतत कौतूक न करता, आपल्या पराभवाचाहि विचार केला पाहिजे. दूरवर विचार केला तर वेळींच सत्य सांगणेंच योग्य ठरेल– कारण झालेल्या चुकांतून आपल्याला शिकता येते. न पचणाऱ्या गोष्टी अंधारांत ठेवण्यांत हंशील नाहीं.

आपल्या संकटांचा शेवट अद्याप झालेला नाहीं. नुसत्या घोषणांच्या जगांत वावरणें आपण टाळलें पाहिजे. आपल्या प्रयत्नांना आपण कधींहि कमी लेखता कामा नये. परंतु स्वतःची अवास्तव स्तुती करून घेण्याचा मोहहि टाळतां आला पाहिजे. पाकिस्तानला वा इतर कुणालाहि आपल्या विरूद्ध चढाईखोर पवित्रा घेऊं न देतां, जेव्हां जेव्हां क्षोभकारक परिस्थिति निर्माण होते, तेव्हां तेव्हां आक्रमक धोरण पत्करलें पाहिजें.

लढणाऱ्या सैनिकांचें व पर्यायानें सर्व सेनेचें मनोधैर्य चार गोष्टींवर अवलंबून असते. लढण्यासाठीं तशा योग्यतेचें कारण हवें, राजकीय व लष्करी नेतृत्वावर त्यांचा विश्वास हवा, अत्याधुनिक शस्त्रास्त्रें जवळ हवींत व दळणवळणाचीं साधनें चांगलीं हवींत. या गोष्टी उपलब्ध केल्या तर सैन्य आपलें बाकीचें काम करील. आपल्या नेत्यांचें हें काम आहे, कीं त्यांनीं या गोष्टी सैन्याला उपलब्ध होतील असा नितांत विश्वास दिला पाहिजे.

मी जेव्हां १९६५ च्या अखेरीस तेजा यांच्या कंपनींतील काम सोडलें, तेव्हां मला माहित होतें, कीं आतां माझ्या पत्नीला व मला कष्टाचें जीवन कंठावें लागणार. आतां माझी आमदानी म्हणजे फक्त मला मिळणारें निवृत्ति–वेतन, हीच राहणार होती. माझें मालकीचें घर असेंहि कुठें नव्हतें. मी पुनः आजारी पडलो तर उत्तम वैद्यकीय उपचार आतां शक्य होणार नव्हते. इतर अनेक सुखसोयी आतां मला मिळूं शकणार नव्हत्या. मी पुनः गीता आश्रमांत राहावयास जाणार होतो. तिथें राहणें सोपें नव्हतें. माझी

थोरली मुलगीहि अजून माझें जवळच होती. कारण तिचा नवरा भारत-पाक सरहद्दीवर भारतीय हवाई दलांतून वैमानिक म्हणून गेलेला होता. पण आतां मी हळूंहळूं परिस्थितीशीं पुष्कळच जमवून घेतलेलें होतें व मला प्रस्तुत पुस्तक लिहिण्यासाठीं एकाग्रता हवी होती. म्हणून मीं 'जोर-बाग' येथील माझें बिऱ्हाड डिसेंबर ६५ मधें मोडलें व मी पुनः 'गीता आश्रमां'त राहावयास आलों.

१९६६ साल उजाडलें. मी पुनः प्रथमपासून सर्व जीवन नव्यानें सुरू करत होतो. १९६३ सालापासून मी लिहीत असलेलें पुस्तक अर्धवटच पडलें होतें. जीवनांत पुनः एकलेपणा आला होता. राघवन्, खन्ना, ग्यानी, उज्वल, ही मित्रमंडळी अधुनमधून येत.

११ जानेवारीला पहांटें मला पत्नीनें जागें केलें व सांगितलें, कीं पंतप्रधान शास्त्री हृदयविकारानें ताश्कंद येथें कांहीं तासांपूर्वींच गेल्याचें वृत्त आलें आहे. मीं अंथरूणांतून धडपडत बाहेर आलो व रेडिओ लावला. शास्त्रींचा मृतदेह पालम विमानतळावर दुपारीं २-३० वाजतां येणार होता. पोलो मैदानाजवळ कँटोनमेंट भागांत, मी पत्नी व मुलींसह माण-सांच्या चेंगराचेंगरींत त्यांच्या अखेरच्या दर्शनासाठीं उभा होतो. होमगार्डमधील मेजर वालिया यांनीं आम्हांला ओळखलें व त्यांनीं आम्हांला अशा सुरक्षित जागीं नेलें कीं जेथून शास्त्रींच्या मृतदेहाचें आम्हांला चांगलें दर्शन घेता आलें.

शास्त्रींच्या मृत्यूनें देशावर अवकळा पसरली. हा साधासुधा, शहाणा माणूस फारच अल्पकाळ पंतप्रधान होता. परंतु या काळांत महत्त्वाच्या घटना घडल्या. त्यांनीं मृत्यूपूर्वींच ज्या ताश्कंद करारावर, दडपणामुळें सही केली त्या कराराचें भारतांत संमिश्र स्वागत झालें. जर शास्त्रींनीं कोसि-जिनचें दडपण मानलें नसतें व ताश्कंद करारांतील ज्या अटी भारतावर अन्यायकारक होत्या, त्या स्वीकारण्याचें नाकारलें असतें, तरी रशियन आपलें कांहीं करूं शकत नव्हते. फार तर त्यांनीं नापसंती व्यक्त केली असती. परंतु परराष्ट्र व्यवहारांत अशा नापसंतीनें कुणाचें कांहीं वांकडें होत नाहीं; कारण ती नापसंती तात्पुरती असते. १९४८ पासून पाकिस्तान-बाबत आपला अनुभव हेंच सांगतो आहे कीं, जेव्हां संधि मिळेल व शक्य

होईल तेव्हां पाकिस्तान पुन: आक्रमण केल्याशिवाय राहणार नाहीं. या बाबतींत पाकिस्तानशीं बोलणीं करण्यांत अर्थ नाहीं, हें लक्षांत घेऊन शास्त्रींनीं ताष्कंद करार केला नसता, तर संयुक्त राष्ट्रसंघाची सुरक्षा समितीहि हळूहळू गप्प बसली असती. भारतांत परतल्यावर शास्त्रींनीं लोकांना हें सांगायला हवें होतें, कीं त्यांनीं लोकांच्या इच्छेला अनुसरून, जनतेला दिलेल्या आश्वासनापासून ते ढळलेले नाहींत व आतां लोकांनीं या पवित्र्याचे जे परिणाम होतील, त्यासाठीं तयार राहावें. वाटल्यास त्यांनीं जनमताचा कौल यावर घेऊन काय तें करायला हवें होतें.

शास्त्रींच्या दु:खद निधनाचा उल्लेख करून, जे. बी. कृपालानी यांनीं १७ फेब्रुवारी १९६६ रोजीं लोकसभेंत सांगितलें--

'मला वाटतें, शास्त्रींवर ताष्कंद येथें जीं नेक दडपणें आणण्यांत आलीं, त्यांचा ताण इतका झाला, कीं शास्त्री हे लोकांना दिलेलीं वचनें विसरले. त्यांनीं सांगितलें होतें, कीं पुरेसें आश्वासन मिळाल्याखेरीज, सैन्य मागें घेण्यांत येणार नाहीं. हे ताण असह्य होऊन शास्त्रींनीं सही दिली. सही केल्यानें त्यांना तात्पुरता दिलासा मिळाला व ते आनंदितहि झाले. पण ही स्थिति फार काळ टिकली नाहीं जेव्हां ते १० जानेवारीला रात्रीं अंथरुणावर पडले, तेव्हां त्यांना याची जाणीव झाली, कीं लोकांना दिलेल्या आश्वासनांना ते जागलेले नाहींत. या साक्षात्कारामुळें शास्त्रीजींना हृदयविकाराचा झटका आला व मृत्यूनें त्यांना गांठलें.'

ताष्कंद करारांत कांहीं फायदे नि:संशय समाविष्ट आहेत, परंतु त्यामुळें मूलभूत व गुंतागुंतीची परिस्थिति मुळींच बदलली नाहीं रशियाला भारताची मैत्री असावी अशी ओढ आहे. पण त्यांना पाकिस्तानशीहि स्नेह हवा आहे. अमेरिका व चीन यांच्या कच्छपीं लागलेल्या पाकिस्तानला त्यांना वेगळें करावयाचें आहे. रशिया, अमेरिका व ब्रिटन यांना भारताचें अनेक दृष्टीनें महत्त्व वाटत असलें, तरी पाकिस्तानची डावपेंचांच्या दृष्टीनें असलेली किंमत त्यांना व चीनलाहि ठाऊक आहे. या सर्वांना म्हणून पाकिस्तानवरहि जास्तींत जास्त प्रभाव हवा आहे. भारत-पाकिस्तान युद्ध झालें तर चीनखेरीज बाकीचे हे देश, हें युद्ध येन केन प्रकारेण बंद व्हावें म्हणून जास्तींत जास्त दबाव आणणारच. कारण या युद्धांत

हीं राष्ट्रें गुंतलीं जातील अशी भीति त्यांना वाटते. भारत-पाक यांच्यामधील वितुष्टाचें जें प्रमुख कारण काश्मीर, तेथें कांहीं तरी समझोता व्हावा, यासाठीं उघडपणें सांगत नसले तरी रशिया, अमेरिका व ब्रिटन हे उत्सुक आहेत. त्यांना हें अजून समजत नाहीं, कीं काश्मीरांत तडजोड झाली, तरी पाकिस्तान भारताशीं कुरापतीला नवें कारण शोधून काढील ! म्हणूनच हे लोक जेव्हां आपल्याला शांततासुक्तें सांगतात, तेव्हां ते हें लक्षांत घेत नाहींत, कीं गेलीं १८ वर्षें पाकिस्तानशीं सुखानें नांदण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे व त्याला पाकिस्ताननें प्रतिसाद दिलेला नाहीं. तीन वेळां पाकिस्ताननें या काळांत आक्रमणेंच केलीं आहेत. १९४७ मध्यें काश्मीरांत, १९६५ मध्यें सुरुवातीला कच्छमध्यें व पुन: त्याच वर्षअखेरीस काश्मीरांत, जर पाकिस्ताननें हेंच विषारी व सतत शत्रुत्वाचें धोरण अंगिकारलें, तर ' किरातार्जुनीय ' या संस्कृत ग्रंथांत भारवीनें राजांना जो उपदेश केला आहे, त्याप्रमाणें, आपल्याला वागावें लागणार आहे. भारवी म्हणतो—

' हे राजा, आतां ही उदासीनता सोड आणि शत्रूंच्या नाशाकरतां स्वत:ची ज्योत प्रज्वलित कर. शत्रूंना प्रेमानें जिंकणें वा स्वत:ची अशी आकांक्षाच नसणें, या गोष्टी ऋषींना ठीक आहेत. राजांचा हा धर्म नाहीं.'

ताष्कंद कराराचे आनुषंगिक परिणाम ध्यानांत येण्यापूर्वींच व शास्त्रींच्या निधनाच्या धक्क्यांतून सांवरण्यापूर्वींच, नेहरूंच्या निधनानंतर निर्माण झाला तसा शास्त्रींच्या नंतर वारसाचा प्रश्न देशापुढें प्रामुख्यानें उभा राहिला. यासाठीं जोराची व सत्यासत्य विवेकाची चाड न ठेवतां चुरस होईल असा सर्वांचा तर्क होताच. अनेक उमेदवार यासाठीं पुढें सरसावले परंतु विजयाची खात्री कुणालाच नव्हती. शेवटीं मोरारजी देसाई व इंदिरा गांधी यांच्यांत मोठी चुरस होऊन, जास्तींत जास्त लोकांना चालूं शकतील अशा इंदिरा गांधी मोठ्या बहुमतानें निवडून आल्या.

आतां इंदिरा गांधींच्या हातीं या देशाचीं सूत्रें आली आहेत. अनेक दिशांनीं स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारतानें प्रगति केली असली, तरी कांहीं बाजू अतिशय लंगड्या आहेत. आर्थिक आघाडी ही त्यांतली एक बाजू. लोकसंख्या बेसुमार वाढत आहे. एवढ्या लोकांना पुरेसें अन्न, निवारा व निर्वाहाचें साधन उपलब्ध करणें कठीण झालें आहे. आपलें परदेशांचें कर्ज

आतां ४५०० कोटी रुपयांच्या घरांत गेलें आहे. कांहीं वर्षांपूर्वीं आंतर-राष्ट्रीय जगतांत आपल्या देशाला जो मान होता तो आज राहिलेला नाहीं.

या परिस्थितीला अनेक कारणें आहेत. त्यांतील कांहींवर आपला ताबा नव्हता. परंतु आपली दुर्बलता, उदासीनता, अकार्यक्षमता व आपल्या व्यवहारांतील अप्रामाणिकपणा, अनेक क्षेत्रांतील शिस्तीचा अभाव, वागणुकींतील ढोंगबाजी आणि स्वतःला फसवून काल्पनिक जगांत वावरण्याचा आपला अट्टाहास, या गोष्टीहि याला कारणीभूत आहेत.

इंदिरा गांधी व त्यांच्या पक्षांतील सहकाऱ्यांना कदाचित हें माहीत असेल, कीं आपल्या नेत्यांत मुख्य गुण कोणता हवा असेल तर तो धीरोदात्तपणा-सद्गुणांतील सर्वांत पौरुषार्थी सद्गुण ! या गुणाचें वर्णन अर्न्स्ट हेमिंग्वे, 'संकटकाळांतहि आढळणारा डौल' (Grace under pressure) असें करतो. म्हणून जर आपलें घर आपण धैर्यानें, निष्ठेनें व खंबीर नेतृत्वानें, सामुदायिक मानून सुधारलें नाहीं, तर सगळा सांवळा गोंधळ झाल्याखेरीज राहणार नाहीं, मग महत्त्वाकांक्षी गट हितसंबंधी लोकांच्या सुप्त पाठिंब्यानें, या परिस्थितीचा गैरफायदा घेतील. मला आशा आहे, कीं इंदिरा गांधी या योग्य पावलें टाकतील असें झालें, तरच भारताला शांतता व वैभव लाभणार आहे.

जम्मू–काश्मीरचे माजी मुख्यमंत्री बक्षी गुलाम महंमद, हे मला मार्च ६६ मध्यें दिल्ली येथें तीन वर्षांनीं प्रथमच एका लग्नसमारंभांत भेटले. ते आजारांतून त्या वेळीं नुकतेच उठलेले होते व ते राजकीय गंडातरांतूनहि गेले होते. यामुळें आतां पूर्वीच्या अध्यानेंहि राहिलेले नव्हते. तरीहि त्यांच्या डोळ्यांत पूर्वीची चमक होती.

जम्मू व काश्मीरचें भारतांत विलिनीकरण घडवतांना, बक्षींनीं भारताची मोठी सेवा केली आहे. भारताच्या एकात्मकतेवर त्यांचा दृढ विश्वास आहे. त्यांनीं पाकिस्तानधार्जिण्या व राष्ट्रविरोधी लोकांना थारा दिला नाहीं व त्यांचा त्यांनीं कुणीहि पूर्वी केला नव्हता असा बंदोबस्त केला. बक्षींनीं धैर्यशाली व जोमदार नेतृत्वाचें उदाहरण घालून दिलें. १९४८ नंतर त्यांनींच काश्मीरच्या राज्यकारभाराला, कांहीं तरी आकार आणला.

ही गोष्ट सोपी नव्हती. जम्मू–काश्मीरची भूमि व तिथली राजकीय परिस्थिति, यांचें ज्ञान त्यांच्याइतकें दुसऱ्या कुणाजवळ नाहीं.

आपल्यांतील कांहीं महत्त्वाचे राजकीय पुढारी, मंत्री व उच्चपदस्थ अधिकारी, हे आतां बक्षींची अवहेलना करीत असतात. परंतु हीच मंडळी ते जेव्हां अधिकारावर होते, तेव्हां त्यांच्याविरुद्ध एक शब्दहि उच्चारीत नसत. ते असें म्हणू शकत नाहींत, कीं त्यांना त्या वेळीं ठाऊक नव्हत्या अशा कांहीं गोष्टी आत्तांच त्यांना कळल्या आहेत. असे सर्व असतांना आतां अधिकारावरून दूर झाल्यामुळें बक्षींना नांवें ठेवणाऱ्यांना, त्यांचें मन खात कसें नाहीं ? आपल्या स्वभावांतील ह्या दोषांचें भूत आपण गाडून टाकलें पाहिजे.

एप्रिल १९६६ मध्यें एका वृत्तपत्रानें जम्मूहून आलेल्या बातमीनुसार प्रसिद्ध केलें, कीं सादीक यांच्या सरकारनें डॉ. करणसिंगानंतर मला जम्मू-काश्मीरचे राज्यपालपद द्यावें, अशी अनौपचारिक सूचना केंद्राला केली आहे. या तर्कावरून ज्या कांहींनीं पूर्वी माझ्याबद्दल आस्था दाखविली होती त्यांना मी अजून जिवंत असल्याचें प्रथमच कळलें असावें.

ऑगस्टमध्यें माझें नांव लोकसभेंत 'तेजा प्रकरणांत' पुन्हां घेतलें गेलें. 'जयंती शिपिंग कंपनीच्या' व्यवहाराबद्दल चर्चा चालू असतांना, कांहीं विरोधी पक्षाच्या लोकांनी माझा नामोल्लेख केला. ज्यांनीं माझा नामोल्लेख केला, त्यांनीं सत्याचा आधार नसलेल्या कांहीं गोष्टी तिथें सांगितल्या. (फक्त कॉंग्रेससदस्य अर्जुन अरोरा यांनीं माझा बचाव केला.) म्हणून मी खालील पत्र सर्व भारतांतील वृत्तपत्रांच्या संपादकांना धाडलें व तें अनेक वृत्तपत्रांनीं सप्टेंबर ६६ मध्यें प्रसिद्ध केलेलें आहे. पत्र असें आहे—

'लोकसभा सदस्यांनी 'जयंती शिपिंग कंपनी'च्या प्रकरणाची चर्चा चालू असतांना वेळोवेळीं व गेल्या दोन आठवड्यांत विशेषतः माझ्याविषयीं कांहीं विधानें केली आहेत, ती वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालीं आ त. हीं विधानें सत्याला धरून नाहींत. जर लोकसभेचा सुरक्षित आधार सोडून, या मंडळींनीं हींच विधानें सभागृहाबाहेर जाहीर रीतीनें करण्याचें धाडस दाखवलें, तर मी त्यांचा आभारी होईन.

म्हणजे मग या विधानांची सत्यासत्यता कायदेशीर कारवाईनें तपासतां येईल.' आजपर्यंत लोकसभेच्या कुणाहि सभासदानें माझ्या या पत्रावर कांहींहि कृति केलेली नाहीं.

माझा तेजा यांच्याशीं संबंध कसा आला, हें मी पूर्वीं सांगितलें आहेच, तेव्हांपासून अशी कुजबूज अधुनमधून सुरू होती, कीं तेजा यांनीं नेहरूंना खूष करण्यासाठीं किंवा त्यांच्याच सूचनेनुसार मला नोकरी दिली. ही कुजबूज या सत्यावर आधारलेली आहे, कीं भारतांत पुष्कळजण (आजहि) वरिष्ठांचा किंवा जे कोणी उपयोगी पडूं शकतील त्यांचा असा उपयोग करीत असतात. अर्थात तेजा यांचें मनांत त्यावेळीं काय होतें, हें मला कळणें शक्य नाहीं किंवा त्यानींहि मला याची कल्पना कधीं दिलेली नाहीं. मला नेहरूंनीं नोकरी देण्यासंबंधीं सांगायचें तर ज्यांनीं ज्यांनीं नेहरूं-बरोबर काम केलें आहे, त्यांना हें माहीत असेल, कीं नेहरू अशा नोकऱ्या वाटीत नसत.

कांहीं गोटांत असेंहि म्हटलें गेलें, कीं सरकारनें मला खासगी क्षेत्रांत रु. ८००० एवढा पगार घेऊं द्यावयास नको होता, कारण नेफांतील माझ्या जबाबदारीची चौकशी सुरू होती. अशा परिस्थितींत मला देशाबाहेर जाण्याची परवानगीहि द्यावयास नको होती. पहिली गोष्ट अशी, कीं माझ्या वर्तुणुकीची चौकशी कधींच चालू नव्हती. दुसरी गोष्ट नेफा चौकशी समितीचें कामकाज, मी भारत सोडण्यापूर्वीं पुरें झालेलें होतें. आणि जरी या चौकशी समितीला, नेफामधील आपल्या लाजिरवाण्या पराभवाची अनेक कारणें शोधतां आलेलीं असलीं, तरी समितीनें कोणाहि जनरलला या पराभवा-बद्दल जबाबदार ठरवलेलें नाहीं.

पगाराविषयीं सांगायचें, तर सरकारी नोकरांपेक्षां खासगी क्षेत्रांतील पगार जास्तच असतात, ही गोष्ट सर्वांना माहीत आहे. या प्रश्नावर बोल-तांना वाहतुक मंत्री संजीव रेड्डी यांनीं सभागृहास सांगितलें, कीं जयंति शिपिंग प्रकरणांत जनरल कौल व इतर कांहीं नांवें घेतलीं जावीं हें दुर्दैव आहे. पगाराविषयीं बोलतांना ते म्हणाले, रु. ४००० पगार निवृत्तीच्या [illegible] घेणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांनीं, खासगी क्षेत्रांत रु १०,००० पगार घेतल्याचीं उदाहरणें आहेत. जनरल कौल यांचें उदाहरण कांहीं एकच नाहीं

शिवाय माझा पगार हा प्राप्तीकर योग्य होता. मी एक लाख वीस हजार रुपये प्राप्तीकर म्हणून भरले आहेत. याच्या पावत्या माझ्यापाशीं आहेत.

मी तजा यांच्याजवळ असतांना माझ्या कामाचें स्वरूप काय होतें, हें जाणण्याची कांहींना उत्सुकता आहे. मी म्हणून या ठिकाणीं तें थोडक्यांत सांगतो. जपानमध्यें जून तें नोव्हेंबर १९६३ ह्या कालांत मी तेजांना जपान-कडून खरेदी करावयाच्या यंत्रसामुग्री व यंत्रें याबाबत सल्ला देत होतो. मी नागासाकी, कुरे इत्यादि ठिकाणीं जाऊन तेथील जहाजबांधणीची पाहणी केली. तेथील यार्डामधून 'जयंति शिपिंग कंपनी'ला हव्या असलेल्या बोटी बांधतां येतील काय याचा अंदाज घेण्यासाठीं मी गेलों होतों.

मी १९६४ मध्यें अमेरिकेंत असतांना, श्री. तेजा यांना भारतांतील त्यांच्या योजनेसाठीं लागणाऱ्या इंजिनियरिंगविषयक सामुग्री व तंत्रज्ञ मदत, यासंबंधी माझा सल्ला हवा असे. हुगळी नदींतून वाळू काढण्यासाठीं जें ड्रेजिंग करावें लागणार होतें, त्यासंबंधींदेखील मी तिथें चर्चा केली. भारतांत कागदाचा कारखाना काढण्यासाठीं ते फिनलंडला गेले असतांना, तेथेंदेखील कारखाना उभारणीबद्दल सल्ला विचारण्यासाठीं त्यांनीं मला बोलाविलें होतें. त्यांच्या वतीनें मी युरोपांत लंडनला गेलों, तों 'जयंति' जहाजें तेथें भाड्यानें देण्यासंबंधीं पाहणी करण्यासाठीं.

मी १९६४ सालीं भारतांत परतल्यावर, तेजा यांनीं त्यांच्या 'राम-गुंडम थर्मल' प्रकरणासंबंधीं माझा सल्ला विचारला. या प्रकरणासंबंधीं सर्वांगीण विचार करून मी त्यांना माझें मत कळवलें.

तेजा यांची हैद्राबाद येथें 'रिपब्लिक फॉर्ज कंपनी' होती. त्याबद्दलहि मी त्यांना सल्ला दिला. याशिवाय ही कंपनी काढण्यासाठीं १ कोटी रुपयांचें कर्ज कसें उभारावें या संबंधांत त्यांनीं माझी मदत मागितली. हें कर्ज रिझर्व बँक, इंडस्ट्रिअल फायनान्स कार्पोरेशन, अशा भारतांतील विविध संस्थांकडून काढावयाचें होतें. या संस्थांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं चर्चा करून मी तेजा यांना या कर्ज उभारणींत शक्य ती मदत केली.

१९६५ च्या अखेरीस मी स्वतः होऊन पूर्वी सांगितलेल्या कारणासाठीं,

तेजा यांचेकडील नोकरी सोडली. त्यावेळीं ‘जयंती शिपिंग कंपनी’ च्या आर्थिक व्यवहारांची मला कल्पना नव्हती, कारण मी फक्त तेजा यांचा सल्लागार होतो. सल्ला विचारला तर तो देणें एवढेंच माझें काम होतें. मी कांहीं त्यांची एखादी कंपनी चालवीत नव्हतो किंवा मला पुढें होणाऱ्या घटनांची चाहूल यावी अशा अधिकारावरहि नव्हतो.

असा प्रश्न विचारला जातो, कीं तेजा यांच्या ‘जयंती शिपिंग कंपनी’च्या व्यवहाराची चौकशी करण्यासाठीं १९६६ मध्यें जी ‘सुखटणकर कमिटी’ नेमण्यांत आली, त्यापुढें मी साक्ष कां दिली नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे, कीं या समितीला कुणाची साक्ष काढण्याची जरूरी पडली नाहीं. शिवाय ज्या ‘जयंती शिपिंग कंपनी’च्या व्यवस्थेसंबंधी चौकशी सुरू होती, त्यासंबंधीं मला कांहींच ज्ञान नव्हतें.

तेजा हे अनेक उच्चपदस्थ प्रतिष्ठितांच्या विश्वासांतले होते. यांत नेहरू मोरारजी आणि एस्. के. पाटील हे येतात. १९६५ अखेरपर्यंत मन्त्रिमंडळाचे सदस्य, इतर राज्यांचे मंत्री, राजदूत, सरकारचे सचीव, निरनिराळ्या पक्षांचे प्रमुख राजकीय पुढारी, या सर्वांशीं तेजा यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. पुष्कळजण हे परदेशांत तेजा यांचे पाहुणे म्हणून राहिले आहेत. निर-निराळे स्वरूपांत त्यांचा पाहुणचार त्यांनीं स्वीकारलेला आहे.

माझ्याविरुद्ध किटाळ जें घेण्यांत येत आहे, त्यासंबंधीं मी निसंदिग्धपणें सांगतो, कीं तेजा यांचेबरोबर काम करीत असतांना, बेकायदेशीर अशी कसलीहि कृति मी केलेली नाहीं. पगाराव्यतिरिक्त मला तेजांकडून किंवा कुणाकडून कांहींहि रकमा मिळालेल्या नाहींत. मला तेजांवर अन्याय होऊं नये म्हणून हें देखिल सांगितलें पाहिजे, कीं तेजा यांनीं कुठल्याहि मापानें विचार करतां, चुकीची वा अयोग्य ठरेल अशी कोणतीहि गोष्ट करण्यास मला सांगितलेलें नाहीं.

माझ्या सेवाकाळांत व निवृत्त झाल्यानंतरहि पूर्वी सांगितल्याप्रमाणें, मी अनेक व्यक्तींचा रोष ओढवून घेतलेला आहे व अशांनींच दुष्ट प्रचार करून माझें नांव अनेक वादग्रस्त प्रकरणांत ओढलेलें आहे. सत्य कुणाच्या बाजूला आहे याचा वाचकांनींच आतां निर्णय घ्यावा.

७

# समारोप

# ७ : समारोप

भारत आज एका भयंकर कड्याच्या टोंकावर उभा आहे, असें मला दिसत आहे. पण मला आशा आहे, कीं परिस्थितीला चांगलें वळण लागेल आणि किपलिंग यानें जें त्याच्या देशाविषयीं म्हटलें आहे, तें आपल्यालाहि लागूं पडेल.

किपलिंग म्हणतो :

'जोंपर्यंत ब्रिटन जिवंत आहे तोंपर्यंत कुणालाहि मरण नाहीं.'
( किंवा ब्रिटनच नष्ट झालें तर कोण जगेल ? )

तोंपर्यंत आपलें समाधान आपणच करून घ्यायचें. फ्रॅन्सिस क्वार्लिस (Francis Quarles) म्हणतो :

'माझ्या हृदया तूं शांतपणें पहात रहा;
जोंपर्यंत भरतवाक्य झालें नाहीं तोंपर्यंत,
नाटकाविषयीं कोणताही निर्णय देऊं नकोस.
नियतीच्या कथानकांत नेहमीं अनेक बदल होतात;
प्रत्येक दिवशीं नवा प्रवेश सुरूं होतो,
अखेरचा अंक हाच नाटकाचा कळसअसतो.'

माझी कहाणी आतां संपली.

◆◆◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना

अनुक्रम. ............ ..................

मराठी भाषेंतील युद्धशास्त्रावरील
पहिलेंच पुस्तक

# " युद्धशास्त्र : यंत्र व तंत्र "

लेखक : प्रा. अ. वि. बेंद्रे

मूल्य रुपये सात * पृष्ठें २५५

या पुस्तकांत भारतीय सैन्याचा इतिहास, भारतीय पायदळ, हवाई दल, उखळी तोफा, रणगाडे, चिलखती वाहनें, मॉर्टर, पाणबुडी, फ्रिगेट, क्रुझर, विनाशिका, विमानवाहू नौका, रडार, विमानांचे प्रकार व त्यांचा शस्त्रसांभार यांची सचित्र माहिती आहे. तसेंच सेना-दलाच्या विविध शिक्षण प्रशिक्षण संस्था, संरक्षणाची दुसरी आघाडी, एन्. सी. सी., होमगार्डस यांची संपूर्ण माहिती. शाळा महाविद्यालयें, सैनिकी शाळा, डफरीन यांना अत्यंत उपयुक्त.

---

प्राप्ति स्थळ :

**मनोरंजन प्रकाशन, मुंबई ७.**

## मनोरंजन प्रकाशनें–

### कथा संग्रह

| | | |
|---|---|---|
| ताजवा | द. मा. मिरासदार | ३–५० |
| उत्तर ध्रुव | श्री. ज. जोशी | ३–०० |
| गोरी मोरी | मनोहर तल्हार | ४–०० |
| बोगनवेलीची फुलें | ना. सी. फडके | ३–५० |
| वायबार | पु. भा. भावे | ३–७५ |
| वेगळी | अरविंद गोखले | ४–०० |
| केवड्याची पात | अच्युत बर्वे | ४–०० |

### कादंबऱ्या

| | | |
|---|---|---|
| चंदनाचें खोड | वि. वि. बोकील | ४–५० |
| चुकला फकीर | वि. वि. बोकील | ५–०० |
| अवशेष | श्रीपाद काळे | ४–५० |
| वावटळ | कृ. ज. दिवेकर | ५–५० |
| याला जीवन ऐसे नांव | कृ. ज. दिवेकर | ४–०० |
| झुलता पूल | माधव कानिटकर | ३–०० |
| दीपराग | माधव कानिटकर | ३–५० |
| चोरांचा बाजार | पु. भा. भावे | ६–७५ |
| तूं माझा सारथी | वा. शि. आपटे | ४–५० |
| अप्रिया | मनोहर तल्हार | ६–०० |
| कांट्यावांचून गुलाब नाहीं | सौ. कुमुदिनी रांगणेकर | ६–५० |

### इतर

| | | |
|---|---|---|
| ससेमिरा ( नाटक ) | वसंत गांगल | २–०० |
| ग्रहांच्या प्रकाशांत ( बारा क्षार व बारा राशी ) | रविंद्र कोरगांवकर | २–०० |
| करपल्लवी | आ. स. कबरे | ०–६० |
| डॉ. जयंत नारळीकर | सदानंद चेंदवणकर | २–०० |
| युद्धशास्त्र : यंत्र व तंत्र | प्रा. अ. वि. वेंद्रे | ७–०० |
| अकथित कहाणी | ले. ज. बी. एम्. कौल | १५–०० |

मनोरंजन प्रकाशन
अभ्यंकर बिल्डिंग, स्लेटर रोड,
मुंबई ७.

REFBK-0016014